शक्तिपातयोगरहस्य
अर्थात्
सिद्धमहायोगशास्त्र



केशव रामचंद्र जोशी

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

शक्तिपातयोगरहस्य

अर्थात्

सिद्धमहायोगशास्त्र



लेखक :- केशव रामचंद्र जोशी एम. ए.

॥ श्रीगुरुःशरणम् ॥





शक्तिपातयोगरहस्य

अर्थात्

सिद्धमहायोगशास्त्र



लेखक :– केशव रामचंद्र जोशी, एम्. ए.

© केशव रामचंद्र जोशी, एम्. ए



प्रथमावृत्ती

दि. ११-४-७३
चैत्र शुद्ध श्रीराम नवमी, शके १८९५



प्रकाशक :

श्रीवासुदेव प्रकाशन,
" श्रीवासुदेव निवास "
कर्वेपथ, एरंडवन, पुणे ४.



मुद्रक :

रामचंद्र शंकर नेलेकर
" श्रीनाथ प्रिंटिंग प्रेस "
३३५ शनिवार पेठ, पुणे ३०.



मूल्य ६ रुपये



मुखपृष्ठ – श्री अनंत सालकर, पुणे.

श्रीगुरुः शरणम् चैत्र शुद्ध १ शके १८९५.

शक्तिपातानुसारेण शिष्योऽनुग्रहमर्हति ।
यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न जायते ॥

चि॰ केशव रामचंद्र जोशी एम्. ए. यानीं लिहिलेला शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धसंप्रदायोगशास्त्र हा समग्र ग्रंथ वाचून माझ्या परम संतोष झाला. आजपर्यंत सिद्धसंप्रदायोगशास्त्राच्या सर्व अंगांचें विवेचन करणारा ग्रंथ मराठी भाषेत झाला नव्हता ती उणीव या ग्रंथानें भरून निघेल असा विश्वास वाटतो.

शक्तिपातयोगाचें साधन करणाऱ्या साधकांना हा ग्रंथ अत्यंत उपयोगी व मार्गदर्शक ठरेल. भारतीय संस्कृतीमध्ये परमेश्वरप्राप्तीसाठी ज्या साधनप्रणाली आहेत त्या सर्वांमध्ये या शक्तिपातयोगाचे स्थान कितीही अनुपमेय आहे याची जाणीव हा ग्रंथ वाचून होईल. या ग्रंथाचा लाभ सर्वांनी अगत्य घ्यावा. या ग्रंथाच्या वाचनानें परमकल्याण इच्छिणाऱ्या सर्व साधकांचे कल्याण होवो अशी श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना आहे.

या ग्रंथाला माझे पूर्ण आशीर्वाद आहेत

श्रीनिवास निवास
कोरेगांव जुने नं. ४

वा. द. गुजराथी.



अर्पणपत्रिका


भरोनी दिव्य सद्भावांची अंजुली ।
केशव अर्पितो हृदयारविंदे मोकळी ।
श्रीसद्गुरु वामनचरणकमल युगुली ।
भक्तिभावे ॥



— प्रार्थना —

अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज श्रीसद्गुरु-
महाराज यांच्या चरणकमलांना वंदन करून ग्रंथाला
प्रारंभ करतो. माझ्या अंतकरणात त्यांनी निवास
करून बुद्धीला प्रेरणा देऊन शक्तिपातयोगरहस्य
अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र हा ग्रंथ पूर्ण करून
घ्यावा अशी त्यांच्या चरणी माझी नम्र
प्रार्थना आहे. श्रीगुरुमहाराजांच्या कृपा-
कटाक्षाने एका क्षणात जीव ब्रह्मरूप
होऊन जातो. शिवत्व पावलेला
महात्मा अनेक जणांना कृतार्थ
करतो. त्याप्रमाणे हा ग्रंथ अनेक-
जणांना मार्गदर्शक व्हावा म्हणून
त्यांनी ग्रंथावर अनुग्रह करावा.





योगीराज सद्गुरू
श्रीवामनराबजीगुळवणीमहाराज

आधार क्रम

१) मनुष्य जन्माचे ध्येय
२) पिंडब्रह्मांडाची उभारणी व संहारणी
३) पिंडब्रह्मांडाचे ऐक्य
४) शक्तिपातयोगाचा महिमा
५) शक्तिपातयोगाच्या विविध नावांचे रहस्य
६) शक्तिपातयोगाची वैशिष्टये
७) शक्तिपातयोगाचे स्वरूप
८) कुंडलिनी शक्तीचे स्वरूप
९) शक्तिपातयोगाची दिव्य व अलौकिक वैदिक परंपरा
१०) शक्तिपातयोगाची साधनसंपत्ती
११) शक्तिपातयोगाची शास्त्रीय प्रक्रिया
१२) शक्तिपातयोगाची फलनिष्पत्ती



कुंडलिनी जगदंबा

ते कुंडलीनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जया विश्वबिजाचिया कोंभा । साऊली केली ।।

मूलपद्मे कुंडलिनी यावत् सा निद्रिता प्रभो ।
तावत् किंचिन्न सिद्धयेत मंत्रयंत्रार्चनादिकम् ।।

मूलाधारे आत्मशक्तिः कुंडलिनी परदेवता ।
शयिता भुजगाकारा सार्द्धत्रय वलयान्विता ।।

यावत्सा निद्रिता देहे तावज्जीवः पशुर्यथा ।
ज्ञानं न जायते तावत् कोटियोगविधेरपि ।।

आधारशक्तिनिद्रायां विश्वं भवति निद्रया ।
तस्यां शक्तिप्रबोधेन त्रैलोक्यं प्रतिबुध्यते ।।

सशैलवनधात्रीणां यथाधारोऽहिनायकः ।
सर्वेषां योगतंत्राणां तथाधारोहि कुंडली ।।

शक्तिपातानुसारेण शिष्योऽनग्रहमर्हति ।
यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न जायते ।।

– प्रस्तावना –

श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः

माझे स्नेही गुरुभक्त श्रीयुत केशवरावजी जोशी यांनी अभ्यास व स्वानुभवपूर्वक लिहिलेले 'शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र' हे पुस्तक धावत्या नजरेने आमूलाग्र पाहिले. पण त्यानेसुद्धा चित्तास परम समाधान वाटले. परमपूज्य प्रातःस्मरणीय श्रीगुळवणीमहाराजांकडून परंपरेने आलेल्या दिव्य शक्तियोगरहस्याचे शाब्दिक व प्रात्यक्षिक ज्ञान संपादन करून लिहिलेले हे पुस्तक आहे. शाब्दब्रह्म व परब्रह्मनिष्णात आणि उपशमाश्रय अशा सद्गुरूंच्या कृपेकरता आपले सर्व आयुष्य सद्गुरूंना समर्पण करणारे श्रीयुत सद्गुरुभक्त केशवराव म्हणजे गुरुमहाराजांचे एक स्थूल शरीरच आहेत असे म्हटले तर अत्युक्ती होणार नाही. गुरुमहाराजांशिवाय केशवराव व केशवरावाशिवाय गुरुमहाराज बहुतेक विभक्त नसतातच. **'यत्रसद्गुरुस्तत्रकेशवोयत्रकेशवस्तत्रसद्गुरुः'** अशी समव्याप्ति या गुरुशिष्यांमध्ये मला नेहमी दिसून येते. **'सर्वहिअर्पी गुरुचेपायी। जगी तयाविण न दिसे कांही। एकचि निश्चय दुसरा नाही। गुरुसि वरारे। आपुलासा देव करारे। भाव धरारे आपुलासा देव करारे॥** असे एका संताच्या पदात कडवे आहे. इतके सद्गुरूंचे साहचर्य लाभल्या वर सद्गुरूंच्या चित्तातील शक्तीशिष्याच्या चित्तात येण्यास काय वेळ लागणार? **'स्वीयं साम्यंविधत्ते भवतिनिरुपमस्तेन वा लौकिकोपि'** सामान्य माणूसही सद्गुरुंच्या कृपेने अलौकिक पुरुष होतो. हा सद्गुरूंचा महिमा शास्त्रकारांनी व भगवत्पादांसारख्या संतश्रेष्ठांनीही वर्णिलेला आहे. यामुळे हा ग्रंथ किती श्रेष्ठ आहे हे निराळे सांगावयास नको.

या ग्रंथात शक्तिपातयोगाचे रहस्य सांगितले आहे. 'सूतसंहिता' वगैरे संस्कृत ग्रंथात शक्तिपातयोगाचे सांगोपांग विवेचन आहे. व इतरही संतांच्या ग्रंथात ठिकठिकाणी ते सांगितले आहे. या सर्वांचे संकलन किंवा मंथन करून व त्यांस सद्गुरुंच्या अनुभवाची जोड देऊन हा ग्रंथ लिहिला असल्याने तो सर्वोत्कृष्ट असाच आहे. याच्या आधाराने व सद्गुरूंच्या कृपाछत्राने यातील विषयाचे मनन व निदिध्यासन केल्यास साधकांचे अवश्य परमकल्याण होईल असे खात्रीलायक वाटते.

हे सर्वदृश्यमान जगत् व मी वासुदेवरुप आहे व वासुदेवाशिवाय जगात दुसरे काहीच नाही असा पक्का निश्चय झाला म्हणजे अधिकारी जीव **'कृतकृत्य व प्राप्तप्रापणीय'** म्हणजे जे करावयाचे ते मी केले व जे मिळवावयाचे ते मिळविले असा कृतार्थ होतो व असे कृतार्थ होण्याकरताच मनुष्य जन्म ईश्वराने जीवाला दिला आहे. मनुष्य जन्माचे दुसरे काहीच ध्येय नाही. मनुष्य जन्माच्या सर्व प्रयत्नांचे फळ हेच आहे. वास्तविक सर्वच जीव परब्रह्म-परमात्मा किंवा भगवत्स्वरूप आहेत असे गुह्य तत्त्व भगवान् व्यास महर्षींनी वर्णिले आहे ते भागवताच्या **'धर्मः प्रोज्झित'** या दुसऱ्या श्लोकात वास्तव म्हणजे वस्तु संबंधी अर्थात् ईश्वरसंबंधी मायाशक्ती-ईश्वरांश जीव व मायानिर्मित जगत् हे सर्व वस्तुस्वरुपच आहे असे **'वास्तवं-वस्तु'** अशा शब्दाने खरे तत्त्व सांगितले आहे. **'प्रगट गुह्यबोले। विश्व ब्रह्मचिठेले'** या श्रीज्ञानेश्वरांच्या आरतीत ज्ञानेश्वरमहाराजांचा सिद्धान्तही असाच आहे असे रामाजनार्दनांनी म्हटले आहे. **'सर्वंखल्विदंब्रह्म'** या श्रुतीतही हेच सांगितले आहे. शेकडो, हजारो व लाखो वचनांनी श्रुतिस्मृतिपुराणसन्त गाथेत हेच तत्त्व वर्णिले असून **'तुका म्हणे कैसे आंधळे हे जन। गेले विसरून खऱ्या देवा'** या न्यायाने मुख्य तत्त्व विसरल्यामुळे सर्व लोक आंधळे आहेत असे संतश्रेष्ठ तुकाराममहाराज म्हणतात. हा आंधळेपणा जाऊन डोळसपणा येण्याकरता सद्गुरु शिष्यावर 'शक्तिपात' करीत असतात. भगवान् श्रीकृष्णांनी भक्तश्रेष्ठ अर्जुनावर, श्रीभगवान् वसिष्ठानी श्रीरामचंद्रावर व श्रीमदत्तात्रेय भगवंतानी अलर्कावर याच शक्तिपाताचा प्रयोग केला असे इतिहास ही सांगत आहे.

शक्तिपाताचे विवेचन शास्त्रात फारच विस्तृत रूपाने केले आहे. ते सर्व लिहिण्याचे हे स्थळ नव्हे. हे केवळ प्रास्ताविक आहे. संक्षेपतः शक्तिपाताचे निरूपण प्रकृतोपयोगी असल्याने येथे करीत आहे.

आगम शास्त्रकार **'अधर्म-धर्मयोःसाम्ये जाते शक्तिःपतत्यसौ। ज्ञानात्मिका पराशक्तिःशंभोर्यस्मिन्निपाति ता।।** असे म्हणतात.

आगतं पञ्चवक्त्रान्तु गतंच गिरीजानने। मतंच वासुदेवस्य तस्मादागममुच्यते।। म्हणजे श्रीशंकरापासून आले व पार्वतीच्या मुखात गेले आणि भगवान् वासुदेवाला जे संमत झाले अशा शास्त्राला आगम असे म्हणतात. वरील आगम शास्त्रात गुरू व शिष्य यांच्यामध्ये धर्म व अधर्म यांचे साम्य झाले असता शंभूची ज्ञानरूपिणी म्हणूनच श्रेष्ठ अशी शक्ती

ज्या अधिकारी शिष्यावर पाडली जाते, चाक्षुष्य-स्पार्शन इत्यादी दीक्षेच्या योगाने शिष्याचे ठिकाणी पेरली जाते, यालाच 'शक्तिपात' असे म्हणतात. आता शक्तिपात येथे 'शक्ती' या शब्दाचा अर्थ केवळ अद्वैत चिती म्हणजे 'चैतन्य' असा जर घेतला तर ते शिष्याचे आपले स्वरूपच असल्याने व ते देश काल वस्तु या तिन्ही परिच्छेद म्हणजे मर्यादा यांनी रहित असल्याने आणि पडण्याला लायक अशा मूर्तीने रहित असल्याने त्याचा पात म्हणजे खाली पडणे किंवा शिष्यावर पडणे याचा संभवच नाही. वरून खाली पडणारा पदार्थ मूर्तीमान् असावा लागतो. चैतन्यशक्ती तशी नाही. जर शक्ती म्हणजे चैतन्याहून काही वेगळा पदार्थ असेल तर 'ज्ञानात्मिका' 'परा' अशी दोन विशेषणे शक्तीला लागू पडत नसल्याने ती दोन्न विशेषणे शक्तीला लावणे व्यर्थ आहे, अशी शंका करून येथे 'पात' शब्दाचा अर्थ पडणे किंवा पाडणे असा न धरता त्याचा औपचारिक म्हणजे गौण अर्थच घेतला पाहिजे. जसे "गंगेवरती गौळवाडा," येथे गंगा शब्दाचा लाक्षणिक अर्थ 'तीर' किंवा मनुष्याला लावलेला. 'सिंह' शब्दाचा अर्थ शूर असा गौण घ्यावा लागतो. तसाच येथे गौण अर्थ 'पात' शब्दाचा घेतला पाहिजे, विद्यारण्यांनी 'पात' शब्दाचा गौण अर्थ घेऊन त्याचे विवेचन केले आहे. ते म्हणतात 'पात' शब्दाचे रहस्य तुम्हाला सांगतो ते ऐका. पराशक्ती परमेश्वर स्वरूपच असल्याने ती सर्व व्यापक आहे. व शिष्यसुद्धा वास्तविक परमेश्वर स्वरूपच असल्याने तो शक्तीरूपच आहे. म्हणून आपणच आपल्यावर पडणे हे असंभवनीय आहे. आपल्या खांद्यावर जसे आपण बसू शकत नाही तसे आपणच आपल्यावर पडू शकत नाही. म्हणून 'पात' शब्दाचा अर्थ येथे पडणे असा न धरता 'आवृत' किंवा 'आच्छादित' असा धरला पाहिजे. या शक्तीला म्हणजे शिष्यांतर्गत चैतन्याला कामक्रोधादी मल व पापपुण्यात्मक कर्मांनी अनादिकालापासून आच्छादित केले आहे. म्हणून ती शक्ती भस्माने आवृत अग्निप्रमाणे कांही काम करू शकत नाही. म्हणून ती भस्माच्छादित अग्निप्रमाणे असून नसल्यासारखी झाली आहे. आचार्यांनी "दीक्षा" दिल्यानंतर शक्तीवरचे 'मल' व पापपुण्यादी कर्मे नष्ट झाली असता ती शक्ती भस्मरहित अग्निप्रमाणे प्रगट झाली म्हणजे "शक्तीपात झाला," "शक्तीपात झाला" असा व्यवहार होतो. अरणीतून "अग्नि पडला," "अग्नि पडला" इत्यादी व्यवहारा सारखा हा व्यवहार आहे. अरणीत अग्नी पूर्वीपासूनच आहे. घर्षणाने उत्पन्न झाला नाही. तो अभिव्यक्त झाला. असेच शक्तिपातासंबंधी आहे असे समजावे.

मग सद्गुरुमूर्तीनें शक्तीला प्रगट केले म्हणजे शक्तिवर असलेल अज्ञान मूलक कामक्रोधादी मल कर्तृत्व भोक्तृत्वादि विपरीत धर्म व पाप पुण्यादि कर्मे यांचा नाश केला, असाच अर्थ झाला. म्हणजे जीवाचे खरे स्वरूप जे ईश्वर तेच गुरूंनी प्रकट केले असे म्हटले पाहिजे. मग "तत्त्वमसि" म्हणजे तू ब्रह्म आहेस असा सद्गुरूंनी उपदेश केला. म्हणजेच त्या वाक्याने मी ब्रह्म आहे असा साक्षात्कार होतो व मग अज्ञानादिकांचा नाश होऊन जीव ब्रह्मभावाला प्राप्त होऊन कृतार्थ होतो. अशा सिद्धांतास कांहीच अर्थ नाही असे होणार नाही कां? व **'गुरुबिन कोन बतावे बाट'** अशा कबीरादी संतांच्या वाक्यास तरी काय अर्थ राहिला! कारण तू ब्रह्म आहेस असे सांगणे हीच सद्गुरूंनी दाखविलेली वाट आहे. परंतु शक्तीपातात हे कांहीच नाही. उपदेशाशिवाय एकदम ब्रह्म होऊन बसणे असा तुमचा मार्ग दिसतो व तो वर सांगितले तशा शास्त्राच्या विरूद्ध दिसतो. शास्त्रात प्रमाणजन्य ज्ञान हेच अज्ञानाचा नाश करून जीवाची प्रथमपासूनच असलेली परब्रह्मरूपता प्रकट करते असे म्हटले आहे, इत्यादी शंका करण्याचे येथे कारण नाही. सद्गुरूंनी दीक्षाद्वारा शक्तिपात करणे म्हणजे ज्ञान उत्पन्न होण्याला जे प्रतिबन्ध आहेत ते दूर करणे एवढाच येथे शक्तिपात या शब्दाचा अर्थ आहे. ज्ञान उत्पन्न होण्यास काही प्रमाण पाहिजेच व ते प्रमाण म्हणजे तत्त्वमस्यादि वाक्येच आहेत. या वाक्यांचा अनुभव किंवा स्मरण होऊनच त्या वाक्यांनी तत्त्व साक्षात्कार होतो व जीव ज्ञानसंपन्न होऊन कृतार्थ होतो, म्हणूनच योगशास्त्राच्या अभ्यासाने निर्विकल्प समाधी सिद्ध होऊन स्वरूप साक्षात्कार झाला तरी तो प्रमाणजन्य नसल्याने मी कोण हे अज्ञान त्याने जात नाही. ते वेदान्त महावाक्यांनी झालेले ज्ञान नसल्याने मी ब्रह्म आहे असेच ज्ञान झाले पाहिजे व निर्विकल्प समाधी नंतर वेदान्त वाक्यजन्य साक्षात्कार झाला पाहिजे. तरच अज्ञान जाते. म्हणून योगशास्त्राला वेदान्त शास्त्राची जोड व वेदान्तशास्त्राला योगशास्त्राची जोड असा शास्त्र सिद्धांत आहे. योगाशिवाय केवळ वेदान्तजन्य ज्ञान म्हणजे अनुभवाशिवाय प्रवचन व वेदान्तजन्य ज्ञानाशिवाय केवळ योग म्हणजे नुसती कसरत असे शहाणे संत म्हणत असतात तेच खरे.

तदाशिष्यस्य चिद्रूपे कल्पितामोहरुपिणी ।
मायादग्धाभवोकिंचित्तदा पतति विग्रहः ॥

त्यावेळी म्हणजे शक्तिपातानंतर शिष्याच्या चिद्रूपावर चिद्रूपाला

आवरण करणारी म्हणजे हेयोपादेय विवेकज्ञानाला आच्छादित करणारी मोहरूप जी माया ती अभिव्यक्त झालेल्या परशक्तीच्या प्रसादाने किंचित् दूर होते व देह पडतो. म्हणजे मायासंबंधामुळे कर्तृत्व भोक्तृत्वादीसंबंध जो आलेला असतो, ज्यामुळे सुखदुःखाला कारण असणारी पापपुण्यात्मक कर्मे घडतात व बऱ्यावाईट शरीराचाही संबंध घडतो. हे सर्व शक्तिपाताने ढिले होते. मग देहाचाही अभिमान ढिला झाल्याने देहाचाही पात होतो. शक्तिपाताचे कार्य देहाभिमान ढिला होणे, देहाला कंप सुटणे, परमानंद होणे, हर्ष होणे, घाम येणे, रोमांच उभे राहाणे, हे आहे व ही सर्व शक्तिपाताची लक्षणे आहेत. येथे घाबरु नये. शिष्याचा देह जमिनीवर पडला म्हणजे शंकराचा प्रसाद झाला असे समजावे. हा प्रसाद झाल्यावर वेदांतवाक्यापासून मी ब्रह्म असे ज्ञान प्रमाणजन्य होते. मग सर्व अनर्थाला मूळ कारण असणारी अविद्या सूर्योदयानंतर अंधाराचा नाश जसा होतो तशी नष्ट होते. **तस्य प्रसादयुक्तस्य विद्यावेदान्त वाक्यजा । दहत्यविद्यामखिलांतमःसूर्योदयोयथा ।।** असे आगमप्रमाण याविषयी आहे. अहो पण या वेदान्तवाक्यजन्य तत्त्वज्ञानाच्या उत्पत्तीच्या प्रतिबंधांचा म्हणजे मलकर्म इत्यादिकांचा नाश जर शक्तिपातानेच होत असला तर ज्या मुमुक्षूला अशा शक्तिपाताने पूर्ण आचार्यांचा लाभ झाला नाही तर त्याची काय गती होईल ? त्याने असेच बद्ध राहावे काय ? अशी शंका घेऊ नये. कर्मानुष्ठान निष्कामपणे करून चित्तशुद्धीनंतर शमदमादी अंतरंग साधनानुष्ठान व श्रवणमनन निदिध्यासनादी अत्यंत अंतरंग साधनानुष्ठान श्रीगुरुभक्तिपूर्वक सतत केल्यास त्यांच्याही प्रतिबंधांचा क्षय होतो व मग तत्त्वमस्यादी वाक्यार्थाच्या अनुसंधानाने त्यालाही 'अहंब्रह्मास्मि' असा साक्षात्कार होऊन तोही मुक्त होतोच यात बिलकुल शंका नाही. परंतु शक्तिपात झाल्याबरोबर लगेच प्रतिबंध क्षय होऊन तत्त्वमसि वाक्यजन्य अपरोक्ष " अहंब्रह्मास्मि " असा साक्षात्कार होऊन तो तत्काळ कृतार्थ होतो, एवढाच फरक आहे. दोन्हीही प्रकारची उदाहरणे आहेत.

शक्तिपातविहीनोऽपिसत्यवाग्गुरुभक्तिमान् । आचार्याच्छ्रुतवेदांतः क्रमान्मुच्येतबन्धनात् ।। शक्तिपातेनसंयुक्ताविद्यावेदांतवाक्यजा । यदायस्यतदातस्यविमुक्तिर्नात्रसंशयः ।। इति ।।

दृष्टिक्षेपरुप शक्तिपात केल्याबरोबर तत्काळ ज्ञानप्रतिबंधरुप आवरण नष्ट होऊन कृतार्थ होणारा श्रीदत्तमहाराजांचा लाडका शिष्य अलर्कराजा झाला. दत्तमहाराजांच्या भेटीला अलर्क आईच्या उपदेशाप्रमाणे गेला असता दर्शन झाल्याबरोबर त्याने दत्तमहाराजांना प्रश्न

केला. '**म्हणेजी भक्तवत्सला । अपार दु:ख झाले मला । अनुग्रह होता आपुला । मीकुशला पावेन ॥ २६ ॥ त्याचे वचन ऐकूनी । मनी म्हणे अत्रिनंदन । हे मदालसागर्भरत्न । येथें यत्न न लगेची ॥२८॥** महाराज म्हणतात, अलर्का **दु:खाचे स्थान सांग । तयावरी देऊ डाग । आधी तू कोण सांग । वारुमग दु:ख तुझे ॥३०॥** अलर्काने आपल्याशी आपला व दु:ख स्थानाचा विचार केला ? व उत्तर दिले '**परक्याच्या दु:खेंकरुन । मी कसा दु:खी होईन । तेव्हां मीच केला प्रश्न । त्याचे प्रतिवचन मीच देतो ॥६१॥ सुखदु:ख स्वप्नोपम । मन हें तयाचे धाम । मी असे आत्माराम । पूर्णकाम भूमरुप ॥६२॥** यानंतर दत्तमहाराजांनी त्याच्या दृढ निश्चयाची परीक्षा केली व म्हणाले '**असाच शिष्य मिळावा । दृष्टी पडता कृतार्थ व्हावा । अन्यथा घ्यावया सेवा । गुरुशिष्यभावा गणावे ॥ १०८ ॥** या सर्व एकतिसाव्या अध्यायातील दत्तमहात्म्याच्या ओव्यातून शक्तिपातजन्य तत्काळ प्रतिबंध नाहीसा करून तत्त्वमसि महावाक्याने एकदम मुक्त होणाऱ्या मुमुक्षूचे उदाहरण आहे व विक्रान्तवर्मा सुबाहु-अरिमर्दन इत्यादी अलर्काचे बंधू मदालसेचे पुत्र व शिष्य आणि सहस्त्रार्जुनादी दत्तमहाराजांचे शिष्य हे क्रमाने मुक्त होणारे शिष्य अशी उदाहरणे आहेत.

शक्तिपाताचे प्रकार परिणाम वगैरे बरेच विषय शास्त्रात आहेत व ते वाचनीय, मननीय व निदिध्यासनीय असे आहेत. ते मुमुक्षूने वाचले पाहिजेत. त्या करिताच मनुष्य जन्म आहे '**मनुख जन्मम नहिं बारबार । करना हो सोकरिये**'। असे संत सांगत आले आहेत.

गुरुभक्त केशवरावांनी अनुभवाने शास्त्र व संतवचनांनी मंडित असे हे पुस्तक लिहिले आहे. ते वाचल्यास शक्तिपाताचे ज्ञान होईल व अधिक जिज्ञासा निर्माण होऊन वाचक प्रयत्नाने कृतार्थ होतील व त्यांच्या मनुष्य जन्माचे सार्थक होईल तरी आम्हा सर्वांचे गुरुमहाराजांच्या कृपेने परमकल्याण होवो अशी अखेर नामदेवांच्या शब्दात प्रार्थना करून विराम घेतो. **आकल्प आयुष्य व्हावेतयाकुळा । माझिया सकळा हरिदासा ॥१॥ कल्पनेची बाधानहो कोणेकाळी । ही संत मंडळी सुखी असो ॥ ध्रु० ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकांसी ॥ २ ॥ नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखींनिधान पांडुरंग ॥ ३ ॥.**

—श्रीगुरुदत्तार्पणमस्तु—

— पंडीत आत्माराम शास्त्री जेरे

19-8-03
2 रामे
2 ले 1 ८८५

प्रस्तावना → प.पू.श्रीदत्तमहाराज

श्रीगणेशदत्तगुरूभ्योनमः

यन्नामस्मरणाद्दैन्यं पापंतापश्चनश्यति । भीतिग्रहार्ति दुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामितम् ॥१।

श्रीमान् गुरुभक्त केशवराव जोशी, एम्. ए. यांनी लिहिलेल्या शक्तिपातयोगरहस्य या ग्रंथाचे काही मुद्रित फॉर्म पाहाण्यास मिळाले. महाराष्ट्रात विशेष अभिव्यक्त झालेल्या या शक्तिपातसंप्रदायाबद्दल सोपपत्तिक विवेचनाची जिज्ञासू मंडळीना वाटत असलेली आवश्यकता या ग्रंथाने बऱ्याच अंशात पूर्ण केली जाईल असे समजण्यास हरकत नाही. ग्रंथाचे बहिरंग व अंतरंग दोनीही आकर्षक आहे. प्रत्येक आधारात चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची सूची त्या त्या आधाराच्या पहिल्या पानावरच दिलेली असल्याने वाचकांना त्यात येणाऱ्या विषयांची सामान्य कल्पना आधीच येऊ शकते. विशेष जिज्ञास्य विषय प्रथमच लक्षात आल्याने वाचनास वेळ थोडा असल्यास तेवढाच वाचून जिज्ञासापूर्ती होऊ शकते ही एक उत्तम सोय या रचनेमुळे साध्य झाली आहे. वस्तुतः संपूर्ण ग्रंथ शांतपणाने वाचून त्याचे चांगले मनन झाल्याशिवाय या कठीण विषयाचे यथार्थ ज्ञान होणे व या साधनाकडे निःसंदिग्ध प्रवृत्ती होणें असाध्य आहे. शक्तिपातयोग हा केवळ शब्दगम्य विषय नसून तो अनुभवगम्य आहे. पण स्वतः अनुभव घेण्याची प्रवृत्ती होण्याकरिता, या ग्रंथात दिलेली प्रमाणे व इतरांच्या अनुभवांचे शाब्दिक ज्ञान हे सर्व व्यवस्थित समजाऊन देण्याकरिता या ग्रंथांचा मोठा उपयोग होणार आहे यात संशय नाही. ग्रंथकारांच्या जवळ केवळ शाब्दिक ज्ञानाचाच साठा नसून आज बरीच वर्षे या श्रीगुरुदत्त विशिष्ट साधनाचा त्यांचा सश्रद्ध अभ्यास चालू आहे. यामुळे त्यांचे लेखन स्वानुभवप्रमाणानेही परिपुष्ट झालेले आहे असे दिसून येईल. अनेक संस्कृत, प्राकृत ग्रंथातील बरेच आधार या ग्रंथात दाखविले आहेत. त्यावरून ग्रंथकारांचा बहुश्रुतपणाच जसा दिसून येतो तसेच या विषयाचे महत्त्वही कळून येईल. श्रीगुरुकृपाच शक्तिजागृतीला कारण आहे या शक्तीचे १६ व १७ पानावरील श्रीगुलाबरावमहाराजांचे विवेचनावरून लक्षात येण्यासारखे आहे. शक्तिपातयोग हाच सर्वयोग स्वरूप अथवा तत्साधक

आहे या विषयाचे एका निराळ्या दृष्टीने विवेचन होणे आवश्यक आहे. व्यासमहर्षींनी शिव, विष्णू, देवी इत्यादी देवतांची पुराणे लिहिली व त्या त्या देवतांचेच प्राधान्य त्या त्या पुराणातून दाखविले. पुराणसमन्वयवाद्यांचे दृष्टीने, याचा अभिप्राय असा आहे की, त्या त्या देवतांच्या उपासकांची बुद्धी, आपापल्या उपास्याचे ठिकाणी स्थिर राहाणेकरिता श्रीव्यासमुनींनी त्या त्या देवतांचे प्राधान्य वर्णिले आहे. याप्रमाणे शक्तिपातयोगाकडे प्रवृत्त झालेल्या साधकांची बुद्धी स्थिर राहाणेकरिता या योगाची प्रशंसा आहे किंवा तो योग खऱ्या अर्थाने सर्वयोगसाधक आहे ? तसा असल्यास हा योग, भक्तियोगादी प्रत्येक योगाच्या परमसीमेपर्यंत कसा नेऊन पोचवितो इत्यादी सामान्य जनांना जिज्ञास्य विषयाचे विवेनच स्वतंत्र लेखकात अथवा पुढील आवृत्तीत दिले गेल्यास हा ग्रंथ सर्वांनाच उपकारक ठरेल असे वाटते. 'निषेध्यबोधाद्धिनिषेध्यबाधः' या उक्तिप्रमाणे येणाऱ्या संभाव्य शंका व त्यांची तर्कशुद्ध उत्तरे याची जोडही आवश्यक ठरेल. असलेल्या नवीन दुर्बोध विषयावर या ग्रंथाने बराच प्रकाश पडून जिज्ञासूंची बुद्धी इकडे वळण्याचे मोठे कार्य हा ग्रंथ प्रकाशित करून ग्रंथकारांनी केलेले असल्यामुळे धन्यवादास ते पात्र आहेत. तपस्या, त्याग, गुरुभक्ती, ईशनिष्ठा, संप्रदायश्रद्धा, यथार्थजिज्ञासा अभिनिवेशराहित्य इत्यादी सद्गुणांसहित त्यांचा होणारा ज्ञानविकास, अज्ञानतमाचा नाश करून भारतीय जनतेला यथार्थ मार्ग दर्शन करण्यास समर्थ ठरो एवढीच सर्वशक्तिसंपन्न श्रीगुरुमहाराजांचे चरणांजवळ अखंड प्रार्थना आहे.

श्रीएकनाथषष्ठी १८९४ — **दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर**

रहस्योद्घाटनापूर्वी :-

शक्तिपात म्हणजे सिद्धमहायोगशास्त्र हा भारतीय संस्कृतीचा अपूर्व व अलौकिक ठेवा आहे. आज शतकानुशतके या शक्तिपातयोगाचा प्रवाह वाहात आला आहे व महेशान्वयसंभूत म्हणजे आदिनाथशंकराच्या पासून चालत आलेला हा शिवसंप्रदाय पुढेही त्यांच्या कृपेने चालत राहाणार आहे असा विश्वास वाटतो या विश्वासाचे खरे कारण या योगाच्या सामर्थ्यात अंतर्निहित आहे. शिवसंहिताकारांनी "**आलोक्यं सर्वशास्त्राणि विचार्य च पुनः पुनः। इदमेकं सुनिष्पन्नं योगशास्त्रं परं मतम् ॥ यस्मिन् ज्ञाते सर्वमिदं ज्ञातं भवति निश्चितम् । तस्मिन् परिश्रमः कार्यः किमन्यत् शास्त्रभाषितम् ॥**" असे म्हणून या शक्तिपातयोगशास्त्राच्या पुढे इतर सर्व शास्त्रे कशी फिकी आहेत हे पटवून दिले आहे. सर्वशास्त्रांचे अध्ययन केल्यावर आणि पुनःपुन्हा विचार केल्यावर असे निश्चित वाटते की योगशास्त्र हे सर्व शास्त्रात श्रेष्ठ आहे. या शक्तिपातयोगाने ज्ञानाचा लाभ होत असल्याने सर्व जगताचे निश्चित ज्ञान होते. यासाठी इतर दुसऱ्या कोणत्याही शास्त्रांचे अध्ययन करण्यापेक्षा या शास्त्राप्रमाणे योगाभ्यास करणे हेच उचित आहे.

शक्तिपातयोग हे महान शास्त्र आहे. ग्रंथग्रंथातरी या शास्त्राचा पुरावा पाहावयास मिळतो. वेद, पुराणे, तंत्रग्रंथ, उपनिषदे, संतवाङ्मय इत्यादी ग्रंथातून या शक्तिपातयोगशास्त्राची प्रसंगानुसार संक्षेपाने व विस्तारांने चर्चा केलेली आढळून येते. मात्र वेदकालापासून अक्षुण्ण रीतीने प्रवाहित झालेला हा योग नानाविध नावांनी व पद्धतींनी नटलेला दिसून येतो. परंतु विविधतेने साकारलेले हे बहिरंग अभ्यासाने दृष्टिआड करून अंतरंगात बुडी मारली की त्याची जी मौक्तिकरूप लक्षणे दृष्टीस पडतात ती मुळातील शक्तिपातयोगाच्या शास्त्राशी इतकी जुळून येतात की त्यावेळी वस्तुतः भिन्न वाटणारे द्वैत हे खरे नसून ते आपाततः लेखकाच्या वैचारिक, पारंपारिक किंवा स्वाभाविक दृष्टिकोनामुळे उत्पन्न झाले असून ते खरे नाही याचे प्रत्यंतर आल्याने आत्यंतिक आनंद होऊन मन प्रसन्नतेने भरून जाते. "**आकाशमार्गी गुप्तपंथ। जाणती योगिये समर्थ। समर्थामध्यें समर्थ। योग हा ॥**" असे म्हणून या योगमार्गाचे सामर्थ्य श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांनी स्पष्ट केले. तर "**पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु। परि दाऊनि गेला उद्देशु। श्रीमहाविष्णू ॥**

असे सांगून हा शक्तिपातयोगमार्ग म्हणजे आदिनाथ शिवांनी जीवांच्या कल्याणाकरिता प्रवर्तित केलेला अपूर्व मार्ग आहे असे श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांनी आवर्जून सांगितले आहे. श्रीसंत एकनाथ महाराजांनीही **" भक्तियोगाचा योगमार्ग । समूळ सप्रेम शुद्ध सांग । स्वमुखे बोलिला श्रीरंग । ते उद्धवे चांग अवधारिले ॥** असे सांगून शक्तिपातयोगमार्ग हा भक्तियोगाचा योगमार्ग आहे असे श्रीनाथ भागवतात निःसंदिग्धपणे स्पष्ट केले आहे.

मनुष्याच्या मनाची ठेवण आवड व पात्रता भिन्न आहे हे सर्वांनी ओळखले होते. असे असल्यामुळे मनुष्य जेथे असेल तेथून त्याला वर काढण्यासाठी त्यांनी नानाविध नावांनी हाच मार्ग आपापल्या ग्रंथात सांगितला असून या सर्वांचा हेतू माणसाला खरे अंतरंग साधन मिळून तो या अनादी जन्ममरण परंपरेच्या अनर्थातून वाचावा हाच आहे.

शक्तिपातयोगाच्या मार्गाला निरनिराळी नावे प्राप्त झाल्याने त्याचे बहिरंग विविध बनले असले तरी त्याचे अंतरंग मात्र सद्गुरुकृपा व शिष्यशरणागती या एकाच प्रक्रियेत एकरस परिपूर्ण झालेले दिसते. सद्गुरूंची कृपा व शिष्याची शरणागती ह्या एकाच गोष्टीत शक्तिपातयोगाचे सर्व रहस्य सामावलेले आहे. कृपा म्हणजे दान व शरणागती म्हणजेही दानच होय. कृपा म्हणजे सद्गुरूंनी शिष्याला अहेतुकपणे केलेले विभुत्त्वाचे किंवा शिवत्वाचे दान होय तर शरणागती म्हणजे साधकाने सद्गुरूंना आपल्या अणुत्वाचे किंवा जीवत्वाचे निरहंकारित्वाने केलेले दान होय. असे जेव्हा उभयविध दान घडते तेव्हाच कृपेचा आविष्कार होतो व गुरुशिष्य दोघेही सुखानंदात निमग्न होतात. **" शिष्य साचार अनुभव लाहे । तेणे सद्गुरू सुखाचा मेरू होये ॥ "** या नाथांच्या म्हणण्यात हे रहस्य स्पष्टपणे प्रतीत होते.

अशा प्रकारे शक्तिपातयोग ही ज्ञानदानाची, भक्तिदानाची, अद्वैत बोधाची व आत्मानुभूतीच्या दानाची गोष्ट असल्याने ज्याच्या ठिकाणी अशा प्रकारचे दान करण्याची शक्ती असते तो खरा गुरू होय व हे दान स्वीकारण्याची ज्याची तयारी असते तो खरा शिष्य होय. ज्यावेळी गुरुशिष्यांचा अशाप्रकारे समसमा संयोग होतो त्यावेळी ही अद्वैतबोधाची अतुट परंपरा सिद्ध होऊन मुक्तीची मार्गप्रतीक्षा करणारे जीव कृतार्थतेला पात्र होतात. अशाप्रकारे चालत आलेल्या या अद्वैतबोधाच्या परंपरेचा लोप होऊ न देणे हे सर्व भारतीयांचे कर्तव्य आहे. या कर्तव्यातून या पुस्तकाचा प्रपंच झाला. याच विषयावरील योगवाणी या हिंदी पुस्तका-

तील प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "इस कालमें इस बातकी बडी आवश्यकता है कि साधनसंपन्न योग्य जिज्ञासु इस विषयका अनुसंधान कर स्वयं अनुभवी एवं स्पर्शमणि बन जावें ताकि दुसरोंको भी स्वर्ण बना सकें और इस प्रकार इस विद्याका लोप न होने पावे।"

श्रीआदिनाथ शंकरांनीं शक्तिपात–सिद्धमहायोग प्रवर्तित केला. त्या गंगेत स्नान करून बंगालमधील श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराज यांनी त्यांचे परमशिष्य श्रीनारायणतीर्थस्वामीमहाराज यांना असा उपदेश केला की, "ही ब्रह्मज्ञानप्राप्तीची दीक्षा असाधारण असून ती मी तुला दिली आहे. तुझ्या पदरात या दीक्षेच्यारूपाने दिव्य अग्नीच बांधून दिला आहे. त्याचा प्रसार तू भारतभर कर." श्रीनारायणतीर्थ-स्वामीमहाराजांनी गुर्वाज्ञेप्रमाणे अनेकांना ही दीक्षा देऊन कृतार्थ केले. त्यात श्री शंकरपुरुषोत्तमतीर्थ यांना दीक्षागुरुत्वाचा अधिकार दिला. त्यांनी श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराजांना या ज्ञानदीक्षेचा अधिकार देऊन सर्वार्थाने कृतार्थ केले. त्यांच्याकडूनच माझे सद्गुरू श्रीसंत वामनरावजी गुळवणीमहाराज यांना हा ठेवा मिळाला. त्यांनी या शक्तिपातयोगदीक्षेचा प्रसार आसेतुहिमाचल करून अनेक जीवांना मुक्तीच्या मार्गावर मार्गस्थ करून निरतिशय आनंदाचा ठेवा उपलब्ध करून दिला आहे. ज्या मार्गावरून आपण चाललो आहोत त्या मार्गाची आपल्याला आपल्या भाषेत माहिती वाचावयास मिळाली म्हणजे विषय अंतरंग होण्यास मदत होऊन शंकानिवृत्तीही त्वरित होते. त्यामुळे या परंपराप्राप्त साधनाची सर्वांना सुलभतेने प्राप्ती व्हावी म्हणून हा प्रपंच मराठी ग्रंथ लिहून केला.

गेली बारा वर्षे हा ग्रंथ आकार घेत होता. अभ्यास चालू होता. यातील दुसरे व आठवे आधार या पूर्वीच "शक्तिपातयोगमाहात्म्य" व "शक्तिपातयोगाची दिव्य व अलौकिक वैदिक परंपरा" याछोट्या छोट्या पुस्तकांच्या रूपाने प्रकाशित झाले आहेत. ते या पुस्तकात कमी अधिक करून समाविष्ट केले आहेत. त्याच प्रमाणे श्रीदीपलक्ष्मी या मासिकात "शक्तिपात योगाची साधनसंपत्ती" या आधारातील काही लेख प्रकाशित झाले होते. तेही त्या आधारात समाविष्ट केले आहेत.

शक्तिपातयोगाच्या शास्त्रावर मराठीत आजपर्यंत एकही समग्र ग्रंथ नव्हता. तो व्हावा अशी अनेकांची इच्छा होती. माझे सद्गुरू योगी-राज श्रीसंत वामनरावजी गुळवणी महाराज यांच्या असीम कृपेने शक्ति-पातयोगविद्येचे एक मोठे केंद्र "श्रीवासुदेवनिवास" योगाश्रमाच्या रूपाने

पुण्यात निर्माण झाले. येथे श्रीसद्गुरुमहाराजांच्या चरणी जेव्हा या साधनमार्गाची दीक्षा मागण्यास साधक येतात तेव्हा मात्र त्यांना या विषयाची माहिती सुलभतेने व सहजतेने देता येईल असा एकही मराठी ग्रंथ नव्हता. ती अडचण या ग्रंथाने पुष्कळ अंशाने दूर होईल असा विश्वास वाटतो. ज्या ज्ञानसाधनशास्त्राच्या अपरंपार महितीचा महिमा सुदूरपर्यंत पसरला आहे त्या ज्ञानसाधनशास्त्रावर म्हणजे शक्तिपात-योगावर एक पुस्तक असावे अशी श्रीवासुदेवनिवास या संस्थेचे एक महनीय विश्वस्त विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडित श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांची फार प्रबळ इच्छा होती. त्यांच्या इच्छेने "शक्तिपात-योगरहस्य' या ग्रंथरूपाने आकार घेतला असे म्हटले तर सर्वार्थाने शोभून दिसेल. त्यांच्या इच्छेप्रमाणे हा ग्रंथ या संस्थेला पोषक, आधार व साहाय्यक ठरावा अशी श्रीसद्गुरुमहाराजांच्या चरणी प्रार्थना आहे.

"शक्तिपातयोगरहस्य हा ग्रंथ हे श्रीसद्गुरुमहाराजांच्या कृपामृताचे फल आहे. त्यांची अपार कृपाच या ग्रंथरूपाने फलद्रुप झाली आहे. "**तुका म्हणे आले समर्थांच्या मना । तरी होय राणा रंक त्याचा ॥**" असे श्रीसंत तुकाराममहाराजांनी म्हटले आहे. तेच या ग्रंथाबाबत खरे आहे. नाहीतर माझ्यासारख्या सामान्य माणसाचे हे काम नव्हे. "**संतांनी सरता केलो तैशापरी । चंदनी ते बोरी व्यापियेली ॥**" हेच माझ्याबाबतीत खरे आहे. "**पायांच्या प्रसादे । काही बोलिलो विनोदे ॥ १ ॥ मज क्षमा करणे संती । नव्हे अंगभूत युक्ति ॥ २ ॥ नव्हे हा उपदेश । तुमचे बडबडलो शेष ॥ ३ ॥ तुमचे कृपेचे पोसणे । जन्मोजन्मी तुका म्हणे ॥ ४ ॥**" असे जे श्रीसंत तुकाराममहाराजांनी म्हटले आहे ते या ग्रंथाच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे. इतकेच नव्हे तर संतांची उच्छिष्टे बोलतो उत्तरे व "**फोडिले भांडार धन्याचा हा माल । मी तव हमाल भारवाही ॥ आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥**" हे या ग्रंथाचे खरे स्वरूप आहे यात माझे काहीही नाही. "**काय मी पामर जाणे अर्थभेद । निमित्त मापासी बैसविलो आहे ॥**" अशी खरी स्थिती आहे.

शेवटी श्रीसद्गुरुमहाराजांचे चरणी एकच प्रार्थना आहे की "**पायीचीवहाण पायी बरी ।**" अशी त्यांनी माझी वृत्ती सतत ठेवून पुढील प्रार्थना मान्य करून घ्यावी.

पाईकीचे सुख पाईकासी ठावे । म्हणोनिया जीवे केली साटी ॥१॥
येता गोळ्या बाण साहिले भडमार । वर्षता अपार वृष्टी वरी ॥ २ ॥

स्वामीपुढे व्हावे पडता भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ॥ ३ ॥ पाईकांनी सुख भोगिले अपार । शूर आणि धीर अंतर्बाही ॥ ४ ॥ तुका म्हणे या सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शहाणा करी तो भागी ॥ ५ ॥

– केशव रामचंद्र जोशी

ऋणनिर्देश : –

शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र हा ग्रंथ लिहिताना ज्या ग्रंथांचे मला अमोलिक साहाय्य झाले त्यांचा प्रथम अत्यंत आदरपूर्वक निर्देश करतो. श्रीगुरुमहाराजांनी लिहिलेल्या " शक्तिपातयोगाने आत्मसाक्षात्कार " हा लेख या ग्रंथाचा आधारस्तंभ आहे. त्याचप्रमाणे प.प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज यांनी लिहिलेला "योगवाणी किंवा सिद्धयोगोपदेश," श्री योगेंद्र विज्ञानी यांनी लिहिलेला "देवात्मशक्ती कुंडलिनी " व म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी लिहिलेले " भारतीय संस्कृति और साधना" खंड १ व २ या सर्व ग्रंथांचे अपूर्व साहाय्य हा ग्रंथ लिहिताना सर्वार्थाने लाभले आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामांचा गाथा, कुलार्णव तंत्र, पुराणे, श्रीमद्भागवत याही सर्व ग्रंथांचा मला खूप मोठा उपयोग झाला. या सर्वांचा मी अत्यंत आदराने येथे फक्त निर्देश केला आहे. त्यांचे ऋण फेडणे मला कधीही शक्य नाही. किंबहुना हे ऋण वागविण्यातच मला अत्यंत धन्यता वाटेल.

माझे मित्र श्री गोविंद आत्माराम उर्फ श्यामराव गोखले यांचे या ग्रंथाला लाभलेले साहाय्य हे तर या ग्रंथाचे वैभव आहे असे मी समजतो. हा ग्रंथ सर्व अंगोपांगांनी सजवून व छापून प्रसिद्ध करण्यात त्यांचा वाटा फार मोठा आहे. अखंड उत्साहाने त्यांनी हे काम केले. मित्राचे सहकार्य हा अमूर्त गुण हा ग्रंथ छापून श्री श्यामराव गोखले यांनी समूर्त केला असे म्हटले म्हणजे पुरे.

श्रीनाथ प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री रामचंद्र शंकर नेलेकर व तेथील सर्व कामगार यांचे सहकार्य फारच उत्तम लाभले. माझे मित्र श्री सालकर यांनी या पुस्तकाच्या वेष्टनावरील चित्र काढून देऊन सजावट उत्तम केली आहे. केसरीने व के. जोशी यांनी चित्रांचे ठसेही त्वरित काढून दिले. त्यामुळे ग्रंथ वेळेवर प्रसिद्ध होऊ शकला. या सर्वांच्या साहाय्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद !


श्री मधुकरराव अत्रे व श्री राजाभाऊ अत्रे यांचा नामनिर्देश

करणे फार आवश्यक आहे. त्यांचे या ग्रंथालाच काय परंतु सर्व कार्याला फार मोलाचे साहाय्य असते.

या सर्व साहाय्यात काही अनामिकांचा वाटा फार मोठा आहे. ते अनामिक माझ्याशी समरसून गेल्यामुळे त्यांचे येथे नाव नाही. त्यामुळे त्यांचे ऋणही नाही व निर्देशही नाही. त्यांना ते सहन होणार नाही. या ग्रंथाच्या रूपाने तेच आहेत अशी माझी नितांत श्रद्धा व विश्वास आहे.

– केशव रामचंद्र जोशी





प.प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज

[आधार पहिला]

★ मनुष्य जन्माचे ध्येय ★

१) प्रास्ताविक
२) अभ्युदय व निःश्रेयस सुख
३) तत्त्वज्ञान म्हणजे काय ?
४) जीवाचे स्वरूप
५) जगताचे स्वरूप
६) ईश्वराचे स्वरूप
७) शक्तिजागृतीची आवश्यकता



प्रास्ताविक –

मनुष्य अनादी कालापासून संसारात सापडून एखाद्या धुळीच्या कणाप्रमाणे अणुरूपाने नानाविध शरीरे धारण करीत कालचक्रामध्ये फिरत असतो. ही गती थांबून ज्याप्रमाणे नदी सागराला मिळाल्यावर कृतार्थ होते त्याप्रमाणे या अविरत प्रवाहात वाहात असताना जीवाची सुटका होऊन त्याला आपले मूळचे स्वसंवेद्य व चैतन्ययुक्त आत्मस्वरूप प्राप्त होऊन चिरकाल आत्मशांती केव्हा प्राप्त होईल हे सांगणे व जाणणे मोठे कठीण आहे.

मनुष्याचे बहिर्मुख चित्त आपापल्या पूर्व कर्माच्या संस्कारानुसार बाहेरील जगामध्ये सुखाचा शोध घेत भटकत असते. या प्रयत्नात त्याला पुनःपुन्हा अपयशच पदरी घ्यावे लागते. असे झाले तरी तो माघारी वळत नाही. त्यामुळे जन्मानंतर मृत्यू व मृत्यूनंतर जन्म याप्रमाणे जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये विषयसुखाचा शोध घेत घेत त्याचे चित्त निरंतर भटकत राहाते. यालाच प्रवृत्तीचा प्रवाह म्हणतात. जोपर्यंत या प्रवाहाचा वेग मंद होत नाही तोपर्यंत जीवाला या प्रवाहात वाहात जाणे भाग पडते.

जीवाच्या या अपरिहार्य गतीचे व त्याच्या अंतिम ध्येयाचे वर्णन करताना म. म. श्री. गोपीनाथ कविराज "मनुष्यत्व" या लेखात म्हणतात, "आत्माच संकुचित होऊन जीवाच्या रूपाने मनुष्य देह धारण करून जन्म घेतो. मग भोग घेता घेता भोगाकांक्षा वृद्धिगत होत होत क्रमशः ती वाढत जाते. अशा प्रकारे अनेक जन्म गेल्यावर एक वेळ अशी येते की ज्यावेळी भोगाकांक्षा हळूहळू शिथिल होत जाते. याचे खरे कारण असे आहे की ज्यावेळी माणसाच्या हे लक्षात येते की अनेकानेक प्रकारच्या भोग्यवस्तूंचा अनंत प्रकारे उपभोग घेऊन सुद्धा भोगाची इच्छा काही शमत नाही, तेव्हा मनामध्ये एक प्रकारची ग्लानी

उत्पन्न होऊन अत्यंत अल्पप्रमाणात निर्वेद व वैराग्याचा भाव जागृत होतो. त्यावेळी प्रवृत्तीच्या गतीचा वेग हळूहळू कमी होऊ लागतो. मग चित्त निवृत्तीकडे वळून त्याच्या आश्रयाने क्रमशः अंतर्मुख होण्याची इच्छा करू लागते. कोणत्या जीवाला ही अवस्था केव्हा प्राप्त होईल हे सांगणे कठीण असले तरी ज्यावेळी ही अवस्था जीवाला प्राप्त होईल त्यावेळी त्याच्या अभिनव जीवनाचा सूत्रपात होतो यात शंकाच नाही.

असा सूत्रपात झाला की विश्वाच्या आतबाहेर एका महाशक्तीचे प्रचंड कार्य चालू आहे याची जाणीव जीवाला होऊ लागते. त्या शक्तीलाच प्रकृती म्हणतात. या प्रकृतीमुळेच जगतातील सर्व कार्ये घडून येतात. प्रकृतीच्या जाळ्यात सापडल्यामुळे अविवेकाने आपणच या सर्व कार्याचे कर्ते आहोत असे जीव समजू लागतो. मात्र त्यामुळे त्याला संसारी बनून नाना प्रकारची सुखदुःखे भोगावी लागतात. या सर्व गोष्टींचे ज्ञान कोणाकोणाला वैराग्याबरोबर आतूनच जागृती आल्याने आभासरूपाने होते. त्यावेळी जीवाला पक्की जाणीव व खात्री होते की या विराट विश्वाच्या अफाट चक्रामध्ये जन्मजन्मांतरी आपण आनंदाचा शोध घेत भटकत आहोत.

मात्र उपरोक्त आनंद कोणत्याही काळी, कोणत्याही देहात व कोणत्याही लोकलोकांतरामध्ये आपणास मिळणार नाही अशी माणसाची पक्की खात्री झाली की या आनंदासाठी बाहेर फिरून दमून जाण्याची त्याची इच्छा नाहीशी होते. परंतु हा आनंद खरोखरच कोठे आहे याचा ठावठिकाणा मात्र त्याला माहीत नसतो उपरोक्त विचारामुळे कालांतराने अत्यंत पुसटपणे ह्या आनंदाचा संवाद त्यांच्या हृदयात होऊ लागतो. अशा प्रकारे आनंद स्वतःमध्येच आहे याची जाणीव झाली तरी त्याच्या प्राप्तिकरिता कोणता मार्ग स्वीकारावा व पुढे कसे जावे हे त्याला कळत नाही. त्यामुळे प्रत्येक दिवशी त्याची व्याकुळता वाढत जाते व वैराग्यही तीव्र होते. त्याबरोबरच या अखंड विश्वामध्ये आपले स्थान किती क्षुल्लक आहे याचाही त्याला अनुभव येतो. इतके झाले तरी जोपर्यंत मार्गाची उपलब्धी होत नाही तोपर्यंत जीव कोणत्याही प्रकारे पुढे सरकू शकत नाही."

हा आनंदच मनुष्याचे खरे स्वरूप आहे. तो प्राप्त करणे हेच त्याचे वास्तविक ध्येय आहे. त्याची प्राप्ती व्हावी म्हणून आपले सर्व जीवन त्यासाठी वेचले पाहिजे असे त्याला वाटू लागते.

जीवाच्या अशा या अद्भुत गतीचा अगदी असाच उल्लेख श्रीसंत

ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात पुढील प्रमाणे केला आहे. ते म्हणतात –

पै त्यामोहाचिये शेजे। बळिया अविद्या निद्रितु होइजे। ते वेळी दुःस्वप्न हा भोगिजे। जन्ममृत्यूंचा ॥ ६८ ॥ पाठी अवसांत ये चेवो। तैं ते अवघेंचि होय वावो। ऐसा उपजे नित्य सद्भावो। तोहि आपणपांचि ॥ ६९ ॥

मनुष्य भ्रांतीरूप शय्येवर प्रबळ अज्ञानामुळे गाढ झोपलेला असतो. त्यावेळी जन्ममरण परंपरेची दुष्ट स्वप्ने तो वारंवार भोगीत असतो. नंतर जेव्हा तो अकस्मात जागा होतो तेव्हा ही जन्ममरणाची सर्वच स्वप्ने व्यर्थ होतात. मग आपणच नित्य, निरंतर, निरंजन, अमृतस्वरूप, अखंड, अद्वय, आनंदरूप, अमर आहोत असा सद्भाव त्याला स्वतःला स्वतःच्या ठिकाणीच जाणवू लागतो. परंतु मिथ्या देहाभिमानामुळे जीवाला खरा मार्ग सापडत नाही. देहच मी आहे असे वाटत राहिल्याने जीव स्वतःचा घात करून घेतो.

जीवाच्या स्वस्वरूप विस्मरणामुळे तो भवनदीत गटांगळ्या कशा खातो व आपले ध्येय कसे विसरून जातो याचे ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी अत्यंत काव्यमय वर्णन केले आहे. ते म्हणतात, " गाईच्या कासेमध्ये अत्यंत पवित्र व गोड असे दूध असते. परंतु कासेच्या त्वचेच्या पडद्याच्या आड दडलेले हे दूध सेवन न करता गोचीड रक्ताचेच सेवन करीत असतो. कमलाचा कांदा व बेडूक एकाच तळ्यात असले तरी बेडूक कधीही कमलकंदातील परागांचे सेवन करीत नाही. परंतु भ्रमर मात्र परागांचेच सेवन करतो आणि बेडूक चिखलातच लोळतो. दुर्दैवी पुरुषाच्या घरी हजारो मोहरा पुरलेल्या असल्या तरी त्याला त्यांचे नक्की ठिकाण माहीत नसल्यामुळे तो दारिद्र्यात दिवस काढून उपाशी राहातो अगदी याच प्रमाणे मनुष्याला खऱ्या सुखाचा ठेवा माहीत नसल्यामुळे तो विषयसुखाच्या इच्छेने जन्ममरण परंपरा भोगीत असतो. वास्तविक सर्व सुखाचा ठेवा असलेला परमात्मा त्याच्या हृदयामध्ये निरंतर वास करीत असतो. परंतु त्याचे या ठेव्याकडे लक्षच जात नाही. अहंममता वृत्ती जीवाच्या ठिकाणी अखंड उठत राहात असल्याने जीव तेथेच तद्रूप होतो. त्यामुळे अंतर्यामी असलेल्या स्वसंवेद्य सुखाला तो आचवतो. ही निद्रा त्याला खऱ्या आनंदापासून वंचित करते. " **देहयोगाद्वा सोऽपि** " (**ब्र. सू. ३–२–६**) या सूत्रावर भाष्य करनाना आचार्यांनी म्हटले की जीव मुळात ब्रह्म-

स्वरूप म्हणजे ज्ञानऐश्वर्यादी संपन्न आहे पण देह व इंद्रियादिकांचे ठिकाणी अत्यंत अहंकार व ममता असल्यामुळे त्याची ब्रह्मरूपता झाकली जाते. ही जीवाची अहंममतारूपी मुख्य उपाधी दूर झाली की तो पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो. ही ब्रह्मस्वरूपता प्राप्त करणे हेच मनुष्य जन्माचे खरे ध्येय आहे.

अभ्युदय व निःश्रेयस सुख –

सर्व प्राण्यात मानव हा श्रेष्ठ आहे कारण त्याचे अंतिम ध्येय व त्याचे साधन शास्त्रांनी सांगितलेले असते. जन्मास आलेला प्रत्येक मनुष्य जन्मभर अहोरात्र सुखासाठी धडपड करीत असतो. त्यामुळे सर्व मनुष्यांचे अंतिम ध्येय सुख हेच असते. ते सुख कृमिकीटकांपासून सर्वश्रेष्ठ अशा सार्वभौम राजापर्यंत जसे त्याचे पुण्य असेल त्या प्रमाणात या लोकात मिळत असते. तसेच राजाच्या जीवापासून हिरण्यगर्भापर्यंतच्या जीवांना त्यांच्या अधिकारानुरूप धर्माच्या तरतमतेमुळे परलोकात मिळते. या सुखास अभ्युदय असे नाव आहे.

अभ्युदय सुख हे वैषयिक असल्याने ते साधनपरतंत्र, क्षय पावणारे, मर्यादित व दुःखमिश्रित असे असते. हे अभ्युदय सुख जरी मिळाले तरी मानव हा कृतकृत्य होत नाही व पुढे काय? हा प्रश्नही सुटत नाही. याकरताच विद्वान लोक अभ्युदय सुखाचा दोषदृष्टीने त्याग करतात व यापेक्षा स्वयंसिद्ध, अविनाशी, निरतिशय व दुःखरहित अशा निःश्रेयस सुखासाठी म्हणजे मोक्षासाठी प्रयत्न करतात.

तत्त्वज्ञानाने मोक्ष प्राप्त होतो कारण **"तत्त्वज्ञानान्निश्रेयसाधिगमः"** असे शास्त्रवचन आहे. जीव हा मूळचा ब्रह्मस्वरूप आहे. पण त्याला आपल्या स्वरूपाचे अज्ञान झाल्याने तो जीवभावास प्राप्त होऊन बद्ध झाला आहे. त्या अज्ञानाची निवृत्ती स्वस्वरूपाचे अपरोक्षज्ञान झाल्याशिवाय इतर कोणत्याही उपायांनी होत नाही. अज्ञान हे तमोरूप असल्याने प्रकाशाशिवाय अंधःकाराचा विनाश ज्याप्रमाणे इतर कोणत्याही साधनांनी होत नाही, त्याप्रमाणे तत्त्वज्ञानाशिवाय अज्ञानाची निवृत्ती होत नाही. सारांश अज्ञानाच्या व पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्त होण्याकरिता जीवाला तत्त्वज्ञानप्राप्ती हा एकच उपाय आहे व हे सर्व जग परमात्मस्वरूप आहे अशी जाणीव होणे हेच त्या तत्त्वज्ञानाचे रूप आहे.

तत्त्वज्ञान म्हणजे काय?

जीव, जगत आणि ईश्वर यांचे खरे स्वरूप काय आहे हे कळून येणे याला तत्त्वज्ञान म्हणतात. ज्यावेळी सद्गुरुकृपेने शक्तिपात होऊन

तत्त्वज्ञान प्राप्त होते त्यावेळी जीव, जगत व ईश्वर ही भिन्न नसून एकरस व परिपूर्ण आहेत असा बोध होऊन द्वैत प्रपंचाचा बाध होतो. असे झाले म्हणजे ब्रह्म सत्य आहे, जगत् मिथ्या आहे व जीव आणि परमात्मा एक आहेत असा अनुभव येऊन वेदांताचा परम सिद्धांत सिद्ध होतो. शेवटी एक अद्वितीय, निष्प्रपंच व सच्चिदानंद अशी जी परब्रह्म वस्तू तीच शिल्लक राहाते. यालाच अद्वैतावस्था म्हणतात.

जीवाचे स्वरूप –

चैतन्य म्हणून सर्व ठिकाणी एकच आहे. या चैतन्याला आत्मा असे म्हणतात. ह्या आत्म्याचे उपाधीच्या योगाने ईश्वर, जीव व साक्षी असे तीन प्रकार झाले आहेत. जेव्हा चैतन्याला पूर्व संस्कार चिकटतात तेव्हा त्यास जीव म्हणतात. चैतन्य हे व्यापक असल्यामुळे जीवही व्यापक असतो. परंतु अज्ञानामुळे आपण व्यापक आहोत हे जीव विसरून जातो. सुषुप्ती अवस्थेत असताना जीवाला प्राज्ञ असे नाव देतात. जेव्हा जीव अंतःकरण वगैरे उपाधींशी संयुक्त होऊन लिंग-शरीराचा अभिमान धरतो व स्वप्नावस्थेमध्ये संचार करतो तेव्हा त्या जीवाला तैजस असे म्हणतात. जेव्हा जीव स्थूलशरीररूप उपाधींशी संयुक्त होऊन जाग्रद्वस्थेमध्ये संचार करतो तेव्हा त्याला विश्व असे म्हणतात. वरील सर्व उपाधी सद्गुरूंनी शक्तिपात केल्याने व कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर जेव्हा नाहीशा होतात तेव्हा जीव चैतन्य-रूप होतो.

जगताचे स्वरूप –

जगतातील सर्व वस्तूंना व्यवहारदृष्टीनेच खरेपणा आहे, परमार्थ-दृष्टीने नाही. परमार्थदृष्टीने खरेपणा एका ब्रह्मालाच आहे. ज्याप्रमाणे स्वप्नातील वस्तू स्वप्नात खऱ्या वाटतात परंतु तो खरेपणा जागेपणी टिकत नाही. त्याप्रमाणे ह्या सर्व वस्तू व्यवहारात खऱ्या भासतात परंतु तो खरेपणा आत्म्याचे तत्त्वज्ञान झाल्यावर टिकत नाही. सारांश जड व विनाशी जग खोटेच आहे. त्याचा फक्त अज्ञानामुळे व कल्पनेमुळे भास होत असतो.

ईश्वराचे स्वरूप –

सर्व जगाचे मूलकारण जे अज्ञान ते चैतन्यात शिरून आत्म्याला ईश्वर बनविते. सत्त्व, रज व तम या एकेक गुणाच्या प्राबल्याने या ईश्वरास अनुक्रमे ब्रह्मा, विष्णू आणि शंकर असे म्हणतात. ब्रह्मा जग उत्पन्न करतो. विष्णू त्याचे पालन करतो व शंकर ते लयास नेतो.

मत्स्य, कूर्म वगैरे अवतार ह्या ईश्वराचेच अवांतर भेद होत.

शक्तिजागृतीची आवश्यकता –

सारांश गुरुकृपेने तत्त्वज्ञानाची प्राप्ती करून घेऊन परिपूर्ण अद्वैत स्थिती व पूर्णत्व म्हणजेच मोक्ष प्राप्त करणे हेच मनुष्य जन्माचे ध्येय आहे. जीव, जगत व ईश्वर या सर्व मिथ्याभूत पदार्थांची उभारणी झाल्याचा जो भास होतो किंवा जी कल्पना होते तिची संहारणी होऊन आपण चैतन्यरूप, आत्मरूप किंवा ब्रह्मरूप आहोत याची प्रचीती येणे हेच मनुष्याचे खरे कर्तव्य आहे. मात्र शक्तिपात होऊन कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय ब्रह्मप्राप्तीच्या महान मार्गाच्या वाटचालीला सुरवातही होत नाही व ब्रह्म स्वरूपाची प्रचीती घेणे कदापीही शक्य होत नाही. मग प्रत्यक्ष ब्रह्म- ज्ञानाची गोष्ट तर फार दूरची आहे. "**आता ब्रह्मज्ञानाची किल्ली । सांगेन ऐक्याची बोली । जयाची कल्पना निमाली । ते प्राप्त पुरुष ।।**" असे जे श्रीसंत एकनाथमहाराजांनी "**स्वात्मसुख**" या प्रकरण ग्रंथात म्हटले आहे त्याचा अर्थच असा आहे की आपण जन्माला आलो आहो, मरणार आहो, जगत सत्य आहे, पिंडब्रह्मांडादी अनंत विश्वरचना झाली आहे, इत्यादी कल्पना ब्रह्मज्ञानाची किल्ली असलेला शक्तिपातयोग प्राप्त झाल्याशिवाय नाहीशा होत नाहीत. ही किल्ली प्राप्त झाली म्हणजे शक्ती जागृत झाली की अद्वैत स्थिती प्राप्त होऊन साधक ब्रह्मप्राप्त होतो. यासाठी शक्ती जागृत होण्याला अग्रस्थान द्यावे लागते कारण त्याशिवाय ब्रह्मप्राप्तीचे द्वार खुले होत नाही व वाट मोकळी होऊन मार्गही सुकर होत नाही.

ज्या शक्तीमुळे उपरोक्त नामरूपात्मक रचना झालेली दिसते व तशी जीवाची कल्पना होते ती शक्ती मुळातच चैतन्ययुक्त शिवस्वरूप आहे. श्रीशंकराचार्यांनी "**चिन्मात्राश्रयमायायाः शक्त्याकारे द्विजोत्तमः। अनुप्रविष्टा या संवित् निर्विकल्पा स्वयंप्रभा**" असे जे म्हटले आहे त्याचा अर्थच असा आहे की शक्तिस्फुरणात निर्विकल्प स्वयंप्रभा संवित् म्हणजे चैतन्यच असते. "**संविदेव पराशक्तिः**" संवित् किंवा चैतन्य हीच मूळ शक्ती होय असे सूतसंहितेत म्हटले आहे. केनोपनिषदात "**विद्यामारूपिणी प्रादूरभूत् स्त्रीरूपा**" असे म्हटले आहे. म्हणजे शंकराची शक्ती स्त्रीरूप उमा विद्यारूप म्हणजे चैतन्यरूपच मानली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवात ज्ञानदृष्टीनेच शक्तीचे रूप वर्णन केले असल्यामुळे ज्ञानदृष्टी प्राप्त झालेल्या ज्ञानी पुरुषाला परमेश्वराची शक्ती विद्यारूप म्हणजे ज्ञानरूपच दिसते. देवीभागवतातही देवीने आपले

स्वरूप सांगताना "**रूपं मदियं ब्रह्मैतत् सर्वकारणकारणम्। मायाधिष्ठान-भूतं तु सर्वसाक्षि निरामयम्**" सर्व कारणाचे कारण जे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप तेच माझे स्वरूप होय. ते माझे स्वरूप शुद्ध साक्षिस्वरूप असून मायेला म्हणजे ज्ञानाने निवृत्त होणाऱ्या जीवाच्या विपरीत कल्पनेला अधिष्ठानभूत आहे असे म्हटले आहे. म्हणजे माया व ब्रह्म किंवा शिव व शक्ती हे सच्चिदानंदरूप आहेत.

असे हे एकरूपत्व असले तरी ज्ञानरूप शिव जेव्हा विसरला जातो तेव्हा शक्तीला दोनपणा येतो व ती विश्वरूप संसार निर्माण करते. हा संसार नाहीसा होऊन जीव ब्रह्मरूप व्हावा म्हणून शक्तीची जागृती हाच एकमात्र उपाय आहे हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात "**जया दोघामाजी एखादे। विपाये उमजले होय निदे। तरी घरवाते गिळोनी नुसुधे। काही ना करी॥**" म्हणजे शिवशक्ती या दोघांमध्ये जर एकाची जागृती झाली तर प्रपंच गिळला जाऊन साधक ब्रह्मरूप होतो. एखादे म्हणजे जर व विपाये म्हणजे कदाचित असा अर्थ आहे. मी म्हणजे वृत्तिरूपशक्तिस्फुरणाने आपले शुद्धज्ञानस्वरूप ओळखून आधारभूत शुद्ध ज्ञानस्वरूप शिवाशी ऐक्य करणे हे शक्तीचे जागे होणे होय. ही शक्ती जागी झाली म्हणजे शिवाशी तिचे ऐक्य होते. तेव्हा "**अहं ब्रह्मास्मि**" हा ऐक्यानुभव येतो आणि शिवाचे जागेपण म्हणजे "**ब्रह्मैवेदं सर्वं**" आपले सर्वात्मत्व ओळखणे होय किंवा शिवाने शक्तीच्या सर्वरूप आविष्काराशी ऐक्य करणे ही शिवाची जागृती होय. असे दोघेही जण जागे झाले असता सर्व प्रपंचच गिळला जातो.

सारांश शिव आणि शक्ती हे दोन्ही एकरूप असल्याने शक्ती जागृत झाली की साधक आपोआप शिवरूप होतो. "**सदाकारा परानंदा संसारोच्छेद कारिणी। सा शिवा परमादेवी शिवाभिन्ना शिवंकरी॥**" म्हणजे शिवाची शक्ती शिवा ही परमदेवी असून ती सत्स्वरूप, परमानंदरूप, संसाराचा उच्छेद करणारी, शिवाशी एकरूप असणारी व आत्यंतिक कल्याण करणारी आहे. ज्याला ज्याला आपण शिवरूप व्हावे व जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून आपली सुटका होऊन आपणास कैवल्य प्राप्त व्हावे असे वाटते त्याने सर्व वासना निवृत्त करून कैवल्य प्राप्त करून देणाऱ्या शक्तिजागृतीला अग्रस्थान देऊन तोच एकमेव उद्देश डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. कारण जोपर्यंत आपली भगवत्शक्ती पूर्णपणे जागृत होत नाही तोपर्यंत मनुष्य जीवनाचे खरे सार्थक होत नाही. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय जड व चैतन्य यातील

संघर्षही समाधानकारकपणे संपत नाही. इतर शेकडोशे साधने व यज्ञ-यागादी अनुष्ठाने यांचा ब्रह्मप्राप्तीसाठी काडीमात्र उपयोग होत नाही. कारण कामनापूर्ती हे ध्येय जोपर्यंत असते तोपर्यंत अंतःकरण अंधकार-मय राहाते. शास्त्रीय ज्ञान, पांडित्य, तप, जपादी सर्व गोष्टी वृत्ती जोपर्यंत बहिर्मुख आहे तोपर्यंत व्यर्थ ठरतात. म्हणून श्री. प. प. विष्णुतीर्थस्वामीमहाराज यांनी सौंदर्य लहरीच्या टीकेत म्हटले आहे की —" ज्यावेळी कुंडलिनी शक्ती जागृत होऊन सुषुम्नेच्या मार्गातील सहाही चक्रांचा वेध करीत करीत शिवसायुज्यपदावर आरूढ होण्यासाठी मार्गस्थ होते त्यावेळी ती प्रतिप्रसवक्रमाने सर्व इंद्रियांना अंतर्मुख करते. तिची गती ऊर्ध्व झाली की ती मनाचे सर्व पडदे फाडून टाकते. बुद्धीच्या जगतासंबंधीच्या बाह्य चिंतनाला ती विश्रांती देते. तिच्या वाटचाली-मुळे अंतरात्म्यरूपी सूर्याला झाकून टाकणारे ढग एकएक या क्रमाने आपोआप विलीन होऊ लागतात. हृदयाकाश निर्मल व स्वच्छ होते. ज्ञानाचा प्रकाश अंतरात्म्यामध्ये पूर्ण तेजाने भरून जाऊन चमकू लागतो. अविद्येचा दाट अंधकार दूर होतो. या अंधारात वास करणारी वासनेची गिधाडे किंवा कामक्रोधादी घुबडे यांना राहावयास स्थानच शिल्लक उरत नाही. इतकेच नव्हे तर ते बसल्या बसल्याच ज्ञानरूपी सूर्याच्या तेजाने नाहीसे होऊन जातात या अर्थानेच भगवत् पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी म्हटले आहे की भगवती कुंडलिनी शक्ती अविद्या-अंधकार नाहीसा करण्यासाठी ज्ञानरूपी सूर्याला उद्दीपित करते. याचा दुसरा अर्थ असा आहे की अधोमुखी सूर्यशक्ती जागृत होऊन उन्मुख झाल्यावर ती सूर्यमंडलात अमृताचा स्राव करू लागते याचा परिणाम म्हणून बहिर्विषयांकडे धावणाऱ्या वासना आपोआप शांत होतात. याचे फल असे मिळते की कर्मानुष्ठानांमध्ये निमग्न असलेल्या व अविद्येच्या अंधकारामध्ये बुडून गेलेल्या कर्मकांडी लोकांना बाह्यानुष्ठानाचा तिरस्कार वाटू लागून ते अंतर्यागामध्ये निमग्न होतात. भगवती माँ कुंडलिनी शक्तीच्या चिन्मयी वाटिकेतील पुष्पांतून प्रवाहित झालेल्या मधुर मकरंदाच्या स्रोतांचे झरे जड लोकांच्या जडतेला सुद्धा द्रविभूत करण्यास समर्थ असतात. भगवतीची चिन्मयी सत्ता नाना प्रकारच्या भेदरूपी सृष्टीची स्थूल व सूक्ष्म जगताच्या रूपाने कल्पना करून उभारणी करते व संहारणीच्या वेळी सर्व नामरूपांना आपल्यामध्ये विलीन करून शिवाच्या निष्कल रूपाला सायुज्यतेचे आलिंगन देऊन स्वतः शिवस्वरूप होऊन जाते. जीवाचे जडत्व पाणी होऊन वाहून जाते व जीव चैतन्य गंगेमध्ये आनंदाने स्नान करू लागतो."

[आधार दुसरा]

✱ पिंडब्रह्मांडाची उभारणी व संहारणी ✱

१) विश्वाची उभारणी

२) विश्वाची संहारणी

३) उभारणीसंहारणीरहस्य



मागील आधाराच्या शेवटी सांगितल्याप्रमाणे भगवतीची चिन्मयी सत्ता नाना प्रकारच्या भेदरूपी सृष्टीची स्थूल व सूक्ष्म जगताच्या रूपाने कल्पना करून उभारणी कशी करते व संहारणीच्या वेळी सर्व नामरूपांना आपल्यामध्ये विलीन करून ती शिवस्वरूप कशी होते याचा विचार आता करावयाचा आहे.

विश्वाची उभारणी –

ब्रह्म सत् स्वरूप आहे. जगाच्या उत्पत्तीपूर्वी तेच एकमात्र ब्रह्म होते हे सांगताना छांदोग्य उपनिषदात असे म्हटले आहे की " **सदेव सोम्येदमग्र आसिदेकमेवाद्वितियम्** ।। (छां. ६, २) जगाच्या उत्पत्तीचे पूर्वी एक अद्वितीय असे सत् मात्र होते. " **तदैक्षत् बहुस्यां प्रजायेयेति** " त्या सत् ब्रह्माला मी अनेक व्हावे अशी इच्छा झाली. या इच्छेबरोबर ब्रह्माची सत् शक्ती प्रवृत्त होऊन विश्वाची उभारणी झाली.

परब्रह्म हे निष्कल, निष्क्रिय, शांत, निरंजन, अव्यय, अक्षर व स्पंदरहित आहे. परंतु धुराने आकाश आच्छादून गेल्यामुळे ज्याप्रमाणे मलीन दिसू लागते त्याप्रमाणे निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी सृष्टीच्या प्रारंभी मायेच्या तमोमयी मलीनतेचा प्रादुर्भाव होतो. या मायेलाच सत् शक्ती, अविद्याशक्ती, अज्ञानशक्ती, प्रकृती किंवा आकाश म्हणतात. ही माया परमेश्वराच्या स्वाधीन आहे. आकाशाला इयत्ता (दर्जा) नाही. आणि अज्ञानरूप शक्तीलाही इयत्ता नाही. या सारखेपणामुळे या शक्तीला आकाश असे गौण रीतीने म्हटले जाते.

या अनादी अविद्येचे स्वरूप मोठे विलक्षण आहे. ज्याप्रमाणे मायावी लोक आपल्या मायेच्या योगाने विचित्र वस्तू उत्पन्न करतात त्याप्रमाणे या अज्ञानरूप शक्तीच्या योगाने परमेश्वर हे विचित्र जग उत्पन्न करतो म्हणून या शक्तीला माया असे म्हणतात. ही शक्ती ब्रह्म-रूपच आहे कारण कोणत्याही वस्तूची शक्ती त्या वस्तूहून निराळी आहे

असें दृष्टोत्पत्तीस येत नाही. ज्याप्रमाणे पृथ्वीचा उदकामध्ये लय होतो त्याप्रमाणे या अव्यक्ताचा (मायेचा) ब्रह्मामध्ये लय होतो. अक्षर या शब्दाचा अर्थ अविनाशी असा आहे. ही अज्ञानशक्ती ज्ञान होईपर्यंत शिवस्वरूप होत नाही म्हणजेच तिचा नाश होत नाही. म्हणून त्या शक्तीला अक्षर म्हणतात. अक्षर म्हणजे अज्ञानरूपी बीजशक्ती ती आकाश वगैरे सर्व प्रपंचाचे कारण असल्यामुळे ती आकाश वगैरेहून श्रेष्ठ आहे. तिच्याहून परमात्मा श्रेष्ठ आहे कारण ती परमात्म्याच्या आधीन आहे. याचे वर्णन करताना भगवान श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र-शांकरभाष्याच्या अध्याय १ पाद ४ सूत्र ३ वर टीका करताना असे म्हटले आहे की " ही बीज-शक्ती अविद्यात्मक आहे. तिला अव्यक्त ही संज्ञा आहे. परमेश्वर हा तिचा आश्रय आहे. माया हे तिचे स्वरूप आहे. तिच्यामध्ये सर्व संसारी जीव आपले खरे स्वरूप काय आहे हे न समजता स्वस्थपणे घोरत पडतात. अशी ही महानिद्रा आहे."

या मायेपासून म्हणजे परमात्मशक्तीपासून मिथ्याभूत पदार्थांच्या उत्पत्तीचा भास होतो. सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी अविद्या त्रिगुणात्मक आहे. प्रलयकाल संपल्यानंतर अविद्या आणि जीवांनी केलेली पूर्व कर्मे यांच्या साहाय्याने अमुक प्रकारचे जग उत्पन्न करावे असा परमात्मा संकल्प करतो. त्या संकल्पानुसार परमात्मशक्ती प्रथम आकाश बनते. त्यानंतर आकाशापासून वायू, वायूपासून तेज, तेजापासून उदक व उदकापासून पृथ्वी अशा क्रमाने सूक्ष्म पंचमहाभते उत्पन्न होतात. आकाशामध्ये शब्द; वायूमध्ये शब्द व स्पर्श; तेजामध्ये शब्द, स्पर्श व रूप; उदकामध्ये शब्द, स्पर्श, रूप व रस; आणि पृथ्वीमध्ये शब्द, स्पर्श रूप, रस व गंध; असे वाढत्या प्रमाणाने गुण असतात.

या पंचमहाभूतांचे मूलकारण जी परमात्मशक्ती ती त्रिगुणात्मक असल्यामुळे ही भूतेही त्रिगुणात्मक आहेत. पंचमहाभूतांमध्ये असणारा सत्त्वगुण एकवटून त्यापासून एक वस्तू उत्पन्न होते. तिला मन, बुद्धी, अहंकार आणि चित्त अशी नावे आहेत. आकाशाच्या सात्त्विकांशापासून श्रोत्रेंद्रिय आणि राजसांशापासून वाग्रिंद्रिय, वायूच्या सात्त्विकांशापासून त्वगिंद्रिय आणि राजसांशापासून हस्तेंद्रिय, तेजाच्या सात्त्विकांशापासून चक्षुरिंद्रिय आणि राजसांशापासून पादेंद्रिय, जलाच्या सात्त्विकांशापासून रसनेंद्रिय आणि राजसांशापासून पायुंद्रिय, पृथ्वीच्या सात्त्विकांशापासून घ्राणेंद्रिय आणि राजसांशापासून उपस्थेंद्रिय, अशी निरनिराळी ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये उत्पन्न होतात. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान

असा पाच प्रकारचा वायू पंचमहाभूतांच्या रजोगुणापासून उत्पन्न होतो.

तमोगुणाने युक्त अशा त्या सूक्ष्म पंचमहाभूतांचे "पंचीकरण" झाले म्हणजे ती भूते स्थूल होतात. प्रत्येक महाभूताचे दोन भाग करून त्यापैकी एक भाग कायम ठेवावा व दुसऱ्या भागाचे चार भाग केल्यावर एक एक भाग इतर भूतांच्या कायम ठेवलेल्या भागामध्ये मिळवावा. या विधीला पंचीकरण म्हणतात. तमोगुणाने युक्त अशा स्थूल पंचमहाभूतांपासून हे सर्व ब्रह्मांड उत्पन्न होते. ब्रह्मांडामध्ये सात ऊर्ध्वलोक व सात अधोलोक असे एकंदर चौदा लोक आहेत. भूमी, अंतरिक्ष, स्वर्ग, मह, जन, तप आणि सत्य हे सात ऊर्ध्व लोक आहेत. अतल, पाताल, वितल, सुतल, तलातल, रसातल आणि महातल हे सात अधोलोक होत. मनुष्य वगैरे प्राण्यांचे जरायुज शरीर, पक्षी वगैरेंचे अंडज शरीर, उवा लिखा वगैरेंचे स्वेदज शरीर आणि लता वृक्ष वगैरेंचे उद्भिज शरीर अशी चार प्रकारची शरीरे तमोगुणाने युक्त अशा स्थूल भूतांपासूनच होतात.

या सर्व प्रकारच्या शरीरांमध्ये प्रविष्ट झालेल्या चैतन्याला जीव म्हणतात. चैतन्य व्यापक असल्यामुळे जीवही अर्थात् व्यापकच असतो. जरी जीव सदोदित आत्मचैतन्यरूपीच असला तरी जेव्हा अज्ञानामुळे त्याला सुखदुखांचा भास होतो तेव्हा त्याला बद्ध म्हणतात. तो भास ज्ञानाच्या योगाने दूर झाला म्हणजे मुक्त असे म्हणतात. म्हणून विदेह मुक्ती हाच परम पुरुषार्थ होय.

विश्वाची संहारणी –

येथपर्यंत भगवतीची चिन्मयी सत्ता नाना प्रकारच्या भेदरूपी सृष्टीची स्थूल व सूक्ष्म जगताच्या रूपाने कल्पना करून उभारणी कशी करते हे पाहिले. ब्रह्मांडाची रचना केल्यावर जी अनंत शक्ती शिल्लक राहाते ती अणुस्वरूप धारण करण्याकरिता जणू काही चक्राकार फिरू लागते. तिच्या चक्राकार स्वरूपामुळे तिला सर्पाची उपमा देण्यात येते. अथर्ववेदामध्ये या शक्तीला उच्छिष्ट ब्रह्म असे म्हटले आहे. या शक्तीलाच पुराणामध्ये नारायणाची शय्या तयार करणारी शक्ती या अर्थाने शेष असे म्हटले आहे. तिलाच अनंत या नावानेही संबोधले जाते. या शेष किंवा उच्छिष्ट शक्तीचा ब्रह्मांड धारण करण्याला उपयोग होतो. ती आपल्या हजार फण्यांवर ब्रह्मांडाला धारण करते.

ब्रह्मांडाप्रमाणेच पिंड शरीराची रचना केल्यावर जी शक्ती शिल्लक राहाते ती मूलाधारात शरीराला धारण करीत निद्रा घेत पडून राहाते. यामुळे या शक्तीला आधारशक्ती असेही म्हणतात. तिचे दुसरे नाव

कुंडलिनी असे आहे. ही शक्ती जेव्हा गुरुकृपेने जागृत होते तेव्हा प्रति-प्रसवक्रमाला म्हणजे संहारणीला आरंभ होतो. जेथून तिने प्रारंभ केलेला असतो त्या आत्मतत्त्वात विलीन होऊन ती उपसंहार करते म्हणजे ती सर्व तत्त्वांचा लय करून शेवटी ब्रह्मस्वरूप होऊन जाते.

भारतात प्राचीन कालापासून चालत आलेल्या सर्व संप्रदायांनी उपासना, कर्म, भक्ती, ज्ञान. जप, तप, नेम, यंत्र, मंत्र, तंत्र इत्यादी जे काही करावयास सांगितले आहे ते सर्व हा उपसंहार किंवा ही संहारणी सुलभतेने घडून येऊन ज्या मूल अज्ञानामुळे जीव सुखदुःखाच्या चक्रात सापडला आहे ते अज्ञान नाहीसे होऊन त्याला ज्ञानप्राप्ती होऊन तो ब्रह्मस्वरूप व्हावा म्हणून सांगितले आहे. मात्र कोणत्या सहज उपायाने किंवा कोणत्या सुलभ मार्गाने ही संहारणी होईल हा खरा प्रश्न आहे.

उभारणी संहारणी रहस्य –

श्रीसंत गुलाबराव महाराजांनी योगरहस्य या पुस्तकात "**कुंडलिनी जगदंबा**" हे प्रकरण लिहून कुंडलिनीमुळे विश्वाची उभारणी व संहारणी कशी होते याचे रहस्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे. ते त्यांच्याच शब्दात पाहाण्यासारखे आहे.

आता सकल योगाधारू। जो शक्तिधरित्रीचा मेरू। जो योग-मंदिरमंदारू। गोपीकुचदुर्गविहारु हरी ॥ १ ॥ जो भुजगहारहृदयरत्न। जो फलीभूतनिष्कंचनयत्न। जो धैर्यशीलाचा प्रयत्न। श्रीभगवंत ॥ २ ॥ जो राधिकाहृदयपद्मभृंग। सकल सोडोनी उमारंग। जेथ रंगवी अंतरंग। भक्तजनभवभंग जो ॥ ३ ॥ जो वैकुंठविहारी करुणाकरु। जो वेदवेत्ता प्राचीन गुरु। जो भक्तप्रतिपालन दुर्जनहरु। विश्वाकारु मन्मथा ॥ ४ ॥ तो सच्चिदानंद नारायण। पाहोनी अर्जुनाचे अंतःकरण। योगरहस्य उघडोन। नेटके भाषण आरंभी ॥ ५ ॥ सकल योगाचिया शक्ती। पार्था जेथ एकवटती। जियेते ब्रह्मवेत्ते वेदांती। स्तवने बोलती शुद्धबुद्धी ॥ ६ ॥ मांत्रिक बोलती अलौकिक शक्ती। जन्मसिद्ध अलोट बुद्धी म्हणती। जी प्रणवाची जन्मदाती। कुंडलिनी म्हणती योगी तिये ॥ ७ ॥ कुंडलाकार जिचे शयन। यालागी कुंडलिनी अभिधान। कुंडल म्हणजे वर्तुळ पूर्ण। प्रणवाकार सिद्ध तो ॥ ८ ॥ प्रणवाची आद्यरेषा। ती कुंडलाकार वीरेशा। तेवी कुंडलिनीचा ठसा। जाण विशेषा आदि पुरुषी ॥ ९ ॥ प्राणप्रतिष्ठा करिता पूर्ती। जैसे देव आविर्भवती। की शून्य दाखवावया निश्चिती। बिंदु उपाधि करणे पडे ॥ १० ॥ की रूप दाखवावया जाण। पदार्थाचा आकार पूर्ण। उपाधि होय संपूर्ण।

जयापरी ॥ ११ ॥ का शब्द जरी व्यक्त होवावा। तरी मुख उपाधि लागावा। उपाधीवाचोनी आघवा। शक्ति समुदायो व्यक्त नव्हे ॥१२॥ की अग्नि जरी व्यक्त करणे। तरी इंधनाची उपाधी घेणे। त्यावीण एवढा तेवढा म्हणणे। अग्निसी न लगे ॥ १३ ॥ तैसी हृदयाची सत्त्व-शक्ती। ते सूक्ष्म असे निश्चिती। ती आणावया अभिव्यक्ती। एका नाडीची आकृती घेतली ॥ १४ ॥ कंदावरी कुंडलाकार। नाडीचा असे आकार। तोचि तेथ करुनि ज्ञानप्रकार। शक्ति साचार व्यक्त करिती ॥ १५ ॥ जैसे काष्ठ तव आधी श्वेत। परी अग्निसंगे होत आरक्त। तेवी नाडीच पै ते निश्चित। ध्यानसंगे कनकमय ॥ १६ ॥ जी नाडीमय होती पूर्वीची। ती ध्याने जाहली सुवर्णाची। सत्त्वगुणे चैतन्याची। अभिव्यक्ती ही ॥ १७ ॥ सूर्यकांता माजी जाण। प्रतिबिंबे अदितिनंदन। तेवी नाडीच सत्त्वमय होता जाण। श्रीपरमात्मा प्रतिबिंबे ॥ १८ ॥

पद :– सुंदर कनकसमान। अंबा। सुंदर कनकसमान ॥ ध्रु ॥ योगी सांडुनि विषय कचाटे। ध्याती गत अभिमान ॥ अंबा ॥ प्रणव जपुनि निज अंतरी। मिळविती प्राणापान ॥ अंबा ॥ माया कुंडलिनी ही नांवे। केवळ शब्द प्रमाण ॥ अंबा ॥ ज्ञानेश्वरगुरुचरणप्रसादे। कीजे अमृतपान ॥ अंबा ॥

एवं आदि पुरुषाची माया। जिच्या योगे धनंजया। तो अवतार घेवोनिया। जन उद्धरी ॥ १९ ॥ आता पौराणिक मते। जे पृथिवी शेषावरी वसते। आणि म्हाता ज्योतिषमते। पृथिवी उभी आकाशी ॥ २० ॥ पृथिवीस धर्ता सहस्रफणी। ऐसे बोलिले असे पुराणी। आणि सिद्धांत शिरोमणी। नान्याधार म्हणोनि सांगे ॥ २१ ॥ येथे दोघांचा समन्वय। म्हणाल कोण्या रीति होय। तरी ऐका तेही सोय। निश्चितपणें ॥ २२ ॥ कटी-स्थानी असे धरणी। कंदस्थानी कुंडलिनी। ती जेवी का सहस्रफणी। तेवीच असे ॥ २३ ॥ म्हणोनि शेषावरी धरणी। ऐसे बोलिले पुराणी। किंवा उपपत्ति व्याख्यानी। दुसरीही असे ॥ २४ ॥ व्यष्टी पृथ्वीचा शेष कुंडलिनी। समष्टी पृथिवीचा सहस्रफणी। ती ही जाणिजे कुंडलिनी। महाशक्ती ॥ २५ ॥ व्यष्टी देहात कुंडलिनी सर्पिणी। विराट देहात कुंडलिनी सहस्रफणी। एवं गुप्तरूपे ज्ञान पुराणी। दृश्य ज्ञान सिद्धांत शिरोमणी बोलला ॥ २६ ॥ ऐशी ती कुंडलिनी विश्वजननी। विश्व बिजाचिया कडसणी। विश्ववृक्षउभारणी। निकी करीं ॥ २७ ॥ परीं विश्ववृक्ष हा अफाटु। फळातूनि अमृताचा पाटु। पुढले अध्यायी अचाटु। तोचि रस ॥ २८ ॥

[आधार तिसरा]

★ पिंडब्रह्मांडाचे ऐक्य ★

१) पिंडब्रह्मांडाची एकता
२) सुषुम्ना म्हणजे महातीर्थ
३) शक्तिजागृती हाच सुलभमार्ग



अनादी अज्ञानाच्या निवृत्तीशिवाय व आत्मज्ञान झाल्याशिवाय मनुष्याला परमशांती कधीही मिळत नाही हे नितांत सत्य आहे. हे ज्ञान प्राप्त करण्याचे शरीर हे एक साधन असून ईश्वराने विश्वाची रचना करताना ब्रह्मांडाची प्रतिकृती किंवा नमूना म्हणून शरीराची रचना केली. एवढेच नव्हे तर त्याने शरीरात ज्ञानाचा समावेशही करून ठेवला आहे. ज्यावेळी शक्तिपात दीक्षा होऊन गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत होते तेव्हा हे अंतर्निहित ज्ञान जागृत होऊन साधकाचे सर्व अज्ञान, शुभाशुभकर्मे इ. सर्व भस्म करून त्याला गतव्य स्थानापर्यंत ती सहज पोहचवून देते.

पिंडब्रह्मांडाची एकता :–

शिवसंहितेच्या द्वितीय पटलामध्ये पिंडब्रह्मांडाची एकता पुढील-प्रमाणे दाखविली आहे. श्रीमहेश्वर म्हणतात, " वेद, पुराण इत्यादी शास्त्रांनी तीर्थांचे अत्यंत मोठे माहात्म्य सांगितले आहे. ही तीर्थे सर्व पापांपासून मनुष्याला मुक्त करतात. ती आपले आपले अभीष्ट जे धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही प्राप्त करून देतात. त्या ठिकाणी साक्षात परमेश्वर विराजमान असतो. असे ज्या तीर्थांचे माहात्म्य असते ती सर्व तीर्थस्थाने व ब्रह्मांडाच्या लोकलोकांतरामध्ये जे काही आहे ते सर्व या शरीरात आहे. यामुळेच शरीरामध्येच सप्त द्वीपांनी वेष्टिलेला सुमेरू पर्वत, नद्यांचे समूह, सागर, पर्वत, क्षेत्र, क्षेत्रपाल, ऋषी, मुनी, ग्रह, उपग्रह, नक्षत्र समूह, सर्व पवित्र तीर्थे, सिद्धपीठ व पीठांच्या देवता इत्यादींचा निवास असतो. सृष्टीच्या स्थितीला व संहाराला साहाय्य करणारे चंद्र व सूर्य या शरीरातच भ्रमण करीत असतात. आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी इत्यादी त्रैलोक्यामध्ये जे जे काही आहे ते ते सर्व या शरीरात विद्यमान आहे. या त्रैलोक्यातील चराचर सर्व वस्तू शरीरातील सुमेरूचा आश्रय घेऊन राहातात व आपापला व्यवहार

उत्तम रीतीने करतात. याप्रमाणे जी जी वस्तू बाहेर ब्रह्मांडात आहे ती ती या पिंडरूप शरीरात आहे हे दिसून येते. जो साधक पिंडब्रह्मांडाची एकता आपल्या शरीरात पाहातो तो निस्संदेह ज्ञानी, महात्मा व योगी होतो.

या शरीरातच गंगा, यमुना, सरस्वती इत्यादी ७२ हजार नद्या नाड्यांच्या रूपाने वाहात असतात. जो साधक इडारूपी गंगा, पिंगलारूपी यमुना व सरस्वतीरूप सुषुम्णा या तीन नाड्यांच्या संगमावर मनाने स्नान करतो तो अत्यंत सहजतेने मुक्तीचा लाभ प्राप्त करून घेतो. या संगमालाच शिवतीर्थ म्हणतात. ज्यावेळी गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत होते तेव्हाच या तीर्थावर दिव्य असे मानसिक स्नान घडून येते. त्यावेळी जीव सत्त्वगुणयुक्त होऊन सर्व सिद्धी प्राप्त करून घेऊन जीवन्मुक्त होतो.

सुषुम्ना म्हणजे महातीर्थ :–

शरीरातील ७२ हजार नाड्या जरी तीर्थरूप असल्या तरी सुषुम्ना नाडी ही महातीर्थ आहे. योगशिखोपनिषदात ह्या नाडीचे महत्त्व सांगितले आहे. या नाडीतच परमेश्वराचे वास्तव्य असते. ह्या नाडीला शांभवी शक्ती असेही नाव आहे. या नाडीच्या आधारानेच परमेश्वराची प्राप्ती होते. कारण या मार्गाने गेल्याने निरामय अशा ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती सुलभतेने होते. या नाडीच्या दरवाजावर मूलाधारात कुंडलिनी शक्ती निद्रा घेत असते. गुरुकृपेने शक्ती जागृत होऊन हे द्वार जोपर्यंत उघडत नाही तोपर्यंत जीवाचे शिवाशी ऐक्य होत नाही. अज्ञान निवृत्त होऊन मोक्ष मिळत नाही. द्वैतभाव जाऊन अद्वैत स्थिती प्राप्त होत नाही. जगताच्या उभारणीचा जो भास झाला आहे तो संपत नाही. यासाठी शक्ती जागृत व्हावी लागते. ही जागृती एकदा झाली की अनायासे सर्व घडून येते.

या सहज सुलभ मार्गाचे ज्ञान नसल्यामुळे व ज्ञान असले तरी या मार्गाची महती न कळल्यामुळे कुतार्किक लोक "मी ब्रह्म आहे जगत् मिथ्या आहे" या तत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव न घेता विचार करता करता मृत्यू पावतात. ज्या सुषुम्णा नाडीत परमेश्वराचे वास्तव्य असते तिकडे हे लोक ढुंकूनही पाहात नाहीत. यासाठी प्रकृति-पुरुष, आत्मा-परमात्मा किंवा जीव-जगत् इत्यादींच्या निर्णयाच्या वादविवादात न पडता साधकाने आपल्याला आपल्या गंतव्य स्थानापर्यंत सुखाने नेऊन पोहोच-

विणाऱ्या मार्गाची कास धरली पाहिजे. याकरिताच सद्गुरुकृपेची पहाट केव्हा होईल यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

शक्ति जागृती हाच सुलभ मार्ग :–

एकदा का सद्गुरुकृपा झाली की जागृत शक्ती साधकाला स्वतः गंतव्य स्थानापर्यंत घेऊन जाते. ज्याप्रमाणे एखाद्या मोठ्या दरवाजाचे कुलूप परिश्रमाशिवाय किल्लीने सहज उघडले जाते व आत जाण्याचा मार्ग मोकळा होतो त्याप्रमाणे ज्यावेळी गुरुकृपेने कुंडलिनीशक्तीचे उद्-बोधन होते तेव्हा मोक्षाचा दरवाजा मोकळा होऊन परब्रह्म प्राप्ती सुलभ होते. भगवंताच्या प्राप्तीचा हाच एकमात्र सरळ व सोपा मार्ग आहे. मात्र इतर सर्व साधने व मार्ग मनुष्याला अनंत जन्माच्या फेऱ्यात अडकवून भटकत ठेवतात यात शंका नाही.

सारांश ब्रह्मांडाशी तुलना केली तर पिंडाची गणना नाममात्र सुद्धा होऊ शकणार नाही. असे असले तरी ईश्वराने मनुष्याच्या या पांचभौतिक शरीरामध्ये सर्व ज्ञानाचा समावेश करून ठेवला आहे. यासाठी पिंडाच्या संहारणीचा मार्ग स्वीकारला की ब्रह्मांडाची संहारणी आपोआप होते. ही संहारणी झाली की जीव आत्मस्वरूप होऊन जातो. ही पिंडाची संहारणी कोणत्या सोप्या उपायाने घडते व जीव ब्रह्मस्वरूप कसा होतो ते आता पाहावयाचे आहे.

[आधार चवथा]

★ शक्तिपातयोगाचा महिमा ★

१) सोपे साधन आहे कां ?

२) पंथराज

३) योगशिखोपनिषदातील सिद्धमार्गाचे महिमान

४) कूर्मपुराणातील महायोगाचा महिमा

५) लिंगपुराणातील महायोगाचे श्रेष्ठत्व

६) ज्ञानेश्वरीतील पंथराजाचे माहात्म्य

७) दासबोधातील शक्तिपातयोगाचे स्तवन



सोपे साधन आहे कां ? :–

पिंडाची संहारणी होऊन मोक्षाचे ध्येय हे ज्ञानानेच साधत असल्यामुळे "**ऋते ज्ञानान्न मुक्तिः**" असे शास्त्रकारांनी आवर्जून सांगितले आहे. याचा अर्थ असा आहे की ज्ञानाशिवाय मोक्षप्राप्त होत नाही. "**ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पाहावे आपणासी आपण ।।**" असे श्रीसमर्थ रामदास स्वामीमहाराजांनी सांगितले आहे. या आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीच हठयोग, राजयोग, तारकयोग, मंत्रयोग, यंत्रयोग, लययोग, भक्तियोग व ज्ञानयोग असे निरनिराळे योगमार्गाचे संप्रदाय पुरातन काळापासून भारतवर्षात चालत आलेले आहेत.

या सर्व संप्रदायांचा म्हणजेच मार्गांचा हेतू माणसाला ज्ञानप्राप्ती करून देणे हाच असतो. या ज्ञानप्राप्तीमुळे "**यो वै भूमा तत्सुखम्**" असे मोठे सुख प्राप्त होते. सुखाचे ऐहिक, पारलौकिक व अध्यात्मिक असे तीन प्रकार प्रसिद्ध आहेत. ऐहिक म्हणजे या लोकातील सुख व पारलौकिक म्हणजे परलोकातील सुख होय. या दोन्ही सुखांना विषयाची अपेक्षा असते. मात्र अध्यात्मिक सुख हे विषयनिरपेक्ष असते. अध्यात्मिक सुख आत्मभूत असल्याने ते सर्व सुखात उत्तम मानले जाते. ऐहिक व पारलौकिक सुखापेक्षा अध्यात्मक सुख श्रेष्ठ आहे कारण ते नित्य असून त्यास कोणत्याही दुःखाचा संबंध नाही. हे अध्यात्मसुख म्हणजेच निःश्रेयस होय. हे जे निःश्रेयस त्यालाच मोक्ष म्हणतात. मोक्ष हा परमपुरुषार्थ आहे. तो प्राप्त झाल्याशिवाय जन्ममरण सुटत नाही व मनुष्य कृतकृत्य होत नाही.

जीवन कृतकृत्य व्हावे, आत्मज्ञान प्राप्त व्हावे व मोक्ष मिळावा म्हणून सर्वजण म्हणत असतात. परंतु प्रत्यक्षात माणसाची कृती मोक्ष-प्राप्तीची असलेली दिसून येत नाही. याचे खरे कारण असे आहे की जीव अनित्य सुखाच्या वासनारूप मायाजालात गुंतून गेल्याने खूप दुःख

भोगतो. पुनःपुन्हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडतो. कालचक्राच्या गतीत सापडून तो सतत फिरत असतो. यातून आपण सुटावे म्हणून प्रत्येक माणसाची जाणिवेने अगर नेणिवेने धडपड चालू असते. त्यासाठी वरीलपैकी एखाद्या मार्गाचा तो आपल्याला झेपेल त्याप्रमाणे अवलंब करीत असतो.

सुख, ज्ञान किंवा मोक्षप्राप्तीच्या हेतूने ज्यावेळी मनुष्य वाटचाल करू लागतो त्यावेळी वैषयिक सुख व आत्मीय सुख यांची रस्सीखेच सुरू होते. "**न संसारात्परो रिपुः,**" म्हणजे संसारा इतका दुसरा कोणताही मोठा शत्रू नाही हे ध्यानात येते. पण तो सुटत नाही व सोडवत नाही. मोक्षासाठी केलेले मानवी प्रयत्न अपुरे पडतात. स्वतःच्या प्रयत्नांना मर्यादा उत्पन्न होते. आपण आपल्या बळावर अहंता, ममता, काम, क्रोध, मोह, मत्सरादी शत्रूंवर मात करून संसारसागर ओलांडून जाऊ शकू असे वाटत नाही.

अशावेळी असे वाटते की ऐलथडीलाच मायाजळ संपवून टाकणारे व बोधाचा तारा जोडून निवृत्तीच्या पैलतीराला झेपावून नेणारे असे एखादे दिव्य साधन आपल्याला मिळावे की जे आपणहून आपल्याला या वासनांपासून व कामक्रोधादी विकारांपासून लवकरात लवकर सोडवून मुक्त करील. दिव्य सुखाचा अनुभव देईल. जीवन कृतकृत्य होईल. मनुष्य जीवनाचे ध्येय जे मोक्षप्राप्ती ते अनायास सिद्ध होईल. कलियुगात असे सोपे साधन आहे का ?

पंथराज :–

कलियुगामध्ये सोपे, सहज व सर्वांना करता येण्यासारखे दिव्य असे साधन आहे. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी हे जे सोपे साधन आहे त्यालाच पंथराज म्हटले आहे. पंथराज म्हणजे सर्व अध्यात्मिक साधनांच्या पंथाचा राजा. अगदी सोपे व सहज असे साधन !

सिद्धमार्ग, सिद्धयोग, महायोग, शक्तिसंचारयोग, शक्तिपातयोग, श्रीगुरुदत्तयोग, वेधदीक्षायोग, कुंडलिनी जागरणयोग, क्रियायोग, सहजयोग, इत्यादी अनेक नावे या पंथराजाला आहेत. ज्याला जीवन कृतकृत्य करावयाचे असेल, दिव्य सुखाचा अनुभव घ्यावयाचा असेल व मोक्षप्राप्ती करून घ्यावयाची असेल त्याने पंथराजाचाच अवलंब करणे श्रेयस्कर आहे. कारण या मार्गाइतका दुसरा सोपा मार्ग नाही. तात्काळ अनुभव देणारा पंथराज एकमेव असा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. या कलियुगात सर्व दोषांचा परिहार करणारा, चित्तशुद्धी अविलंब घडवून आणणारा,

साधकांच्या चित्तवृत्तींचा निरोध आपोआप घडवून आणणारा, जीवन दिव्य, भव्य व अलौकिक बनविणारा व जीवाला सर्व मोहपाशातून मुक्त करून मोक्षाप्रत नेणारा असा हा एकमात्र सहजसुंदर पंथराज आहे.

योगशिखोपनिषदातील सिद्धमार्गाचे महिमान –:

पंथराजाचा महिमा अत्यंत अद्भुत आहे. योगशिखोपनिषदात या सिद्धमार्गाचे माहात्म्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे. आत्यंतिक दुःखनिवृत्तीचा उपाय मानवाला कळावा या इच्छेने ब्रह्मदेवाने एकदा महादेवांना पुढील प्रश्न केला.

सर्वे जीवा : सुखैर्दुःखैर्मायाजालेन वेष्टिताः । तेषां मुक्तिः कथं देव कृपया वद शंकर ।। १ ।। सर्वं सिद्धिकरं मार्गं मायाजालनिकृन्तम् । जन्ममृत्युजराव्याधि नाशनं सुखदं वद ।। २ ।।

हे शंकरा ! सर्व जीव सुखदुःखाच्या मायाजालात गुरफटून गेले आहेत. त्यापासून त्यांची मुक्ती कशी होईल हे कृपाकरून सांगावे. ज्या मार्गाने सर्व सिद्धी प्राप्त होतील, मायाजाल तुटून जाईल, जन्म, मृत्यू, जरा, व्याधी इत्यादी सर्वांचा नाश होईल व ज्यापासून मोठे सुख प्राप्त होईल असा मार्ग दाखवा.

यावर श्रीशंकरांनी ब्रह्मदेवाला सांगितले की–

नानामार्गैस्तु दुष्प्राप्यं कैवल्यं परमं पदम् ।
सिद्धिमार्गेण लभते नान्यथा पद्मसंभव ।। ३ ।।

हे ब्रह्मदेवा, परमपद कैवल्यरूप आहे. ते निरनिराळ्या प्रकारच्या मार्गाने मोठ्या कष्टाने प्राप्त होते. मात्र सिद्धमार्गामुळे ते कैवल्यपद सहज प्राप्त होते. इतक्या सहजतेने अन्य दुसऱ्या कोणत्याही मार्गाने कैवल्यपद मिळत नाही.

कूर्मपुराणातील महायोगाचा महिमा :–

कूर्मपुराणाच्या उत्तरार्धातील अकराव्या अध्यायात श्रीमहेश्वरांनी या महायोगाचे माहात्म्य कथन केले आहे.

अतः परं प्रवक्ष्यामि योगं परम दुर्लभम् । येनात्मानं प्रपश्यंती भानुमंतमिवेश्वरम् ।। १ ।। योगाग्निर्दहते क्षिप्रमशेषं पापपंजरम् । प्रसन्नं जायते ज्ञानं साक्षान्निर्वाण सिद्धिदम् ।। २ ।। योगात्संजायते ज्ञानं ज्ञानाद्योगः प्रवर्त्तते । योगज्ञानाभियुक्तस्य प्रसीदति महेश्वरः ।। ३ ।। एक कालं द्विकालं वा त्रिकालं नित्यमेव च । ये युंजंति महायोगं ते वज्ञेया महेश्वरः ।। ४ ।।

महेश्वर म्हणाले आता मी अत्यंत दुर्लभ अशा महायोगाचे (माहात्म्य) सांगतो. या महायोगामुळे सूर्यासारख्या अत्यंत प्रकाशमान अशा आपल्या आत्मस्वरूपरूप ईश्वराला योगी लोक पाहातात. या महायोगरूप अग्नीमुळे लवकरात लवकर सर्व पापांचा समूह जळून नाश पावतो. त्यामुळे मोक्ष प्राप्त करून देणारे निर्मल ज्ञान प्रकट होते. योग-साधनेमुळे ज्ञान उत्पन्न होते व ज्ञानामुळे योगसाधना करण्याची प्रवृत्ती होते. म्हणजे ज्ञान व योग या दोन गोष्टी परस्पर पोषक आहेत. योगाचे लक्ष्य मोक्षप्राप्ती हेच आहे. त्या मोक्षप्राप्तीला ज्ञान साहाय्यक होते. जो साधक योग व ज्ञान यांनी युक्त होऊन साधन करीत असतो अर्थात ज्याच्या ठिकाणी योगाचा व ज्ञानाचा शुभ योग झाल्याचे दृष्टीस पडते त्याच्यावर महेश्वर प्रसन्न होतात. याकरिता जो साधक दिवसातून एकदा दोनदा, तीनदा किंबहुना नित्यनियमाने व सातत्याने महायोगाचा अभ्यास करतो तो महेश्वरस्वरूप आहे असे म्हटले पाहिजे.

योग दोन प्रकारचा असून त्यात महायोग श्रेष्ठ आहे असे सांगताना महेश्वर म्हणतात,

योगस्तु द्विविधोज्ञेयो ह्यभावः प्रथमो मतः । अपरस्तु महायोगः सर्व योगोत्तमोत्तमः ॥ ५ ॥ शून्यं सर्वनिराभासं स्वरूपं यत्र चिन्त्यते । अभावयोगः स प्रोक्तो येनात्मानं प्रपश्यति ॥ ६ ॥ यत्र पश्यति चात्मानं नित्यानंदं निरंजनम् । मयैक्यं स महायोगो भाषितः परमः स्वयम् ॥ ७ ॥

योग दोन प्रकारचा आहे. पहिल्या योगाचे नाव अभाव योग असे आहे. दुसऱ्या योगाचे नाव महायोग असून तो सर्व योगामध्ये उत्तमातील उत्तम असा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. अभावयोगामध्ये शून्य व वेदांताने सांगितलेल्या सर्व प्रकारच्या निराभास स्वरूपाचे चिन्तन साधक करीत असतो. या योगात आत्म्याला निर्गुण शून्य मानून साधक ध्यान करीत असल्यानें त्याला ध्यानाच्या योगाने साक्षात्कार होतो. (या योगात स्व-प्रयत्नाला विशेष स्थान आहे) दुसऱ्या योगाचे नाव महायोग असून तो मी स्वतः सांगितला व प्रवर्तित केला आहे. या योगात साधक सद्गुरु-कृपाश्रित राहून साधन करीत असतो. सद्गुरुकृपेने शक्तिसंक्रमण होऊन साधन करीत असल्याने ध्यानाने नित्यानंद आत्मस्वरूप व निरंजन ब्रह्म तो पाहात असतो, एवढेच नव्हे तर समाधीमध्ये तो मत्स्वरूपाचा लाभ करून ऐक्य पावतो.

केवळ एकमात्र महायोगच इतर दुसऱ्या कोणत्याही योगापेक्षा कसा श्रेष्ठ आहे हे सांगताना पुराणकार पुढे म्हणतात,

ये चान्ये योगिनां योगाः श्रूयन्ते ग्रंथ विस्तरे । सर्वे ते ब्रह्म योगस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥ ८ ॥ यय साक्षात्मपश्यंति विमुक्ता विश्व-मीश्वरम् । सर्वेषामेव योगानां स योगः परमो मतः ॥९॥ सहस्त्रशो ऽथ बहुशो ये चेश्वर बहिष्कृताः । न ते पश्यंति मामेकं योगिनो यत-मानसाः ॥ १० ॥

इतर अनेक योग लोकांसाठी योगी लोकांनी सांगितले आहेत. त्यांची वर्णने विस्ताराने ग्रंथामध्ये वाचावयास मिळतात. हे जे इतर सर्व योग आहेत त्यांची योग्यता ब्रह्मयोगाच्या सोळाव्या कलेबरोबर सुद्धा होऊ शकणार नाही. याचे खरे कारण असे आहे की इतर योग हे योगी लोकांनी प्रचलीत केले आहेत. मात्र महायोग मी स्वतः सांगितला आहे. त्याची सुरवात माझ्यापासून झाली आहे. मी स्वतः त्याचा प्रवर्तक आहे. याकरिता महायोगाशी इतर कोणत्याही योगाची कदापीही तुलना होऊ शकणार नाही. या योगाच्या साहाय्याने जीवनमुक्त योगीजन विश्व व ईश्वराला साक्षात् पाहातात. या परम पावन महायोगाच्या प्रभावाने ब्रह्मांडातील यच्चयावत तत्त्वे संपूर्ण जाणली जाऊ शकतात. या महा-योगापुढे काहीही लपून राहू शकत नाही. याकरिता या भूतलावर जितके योग प्रचलीत आहेत त्या सर्व योगात माझ्याकडून प्रवर्तित झालेला महायोग हा ईश्वरप्राप्तीचा सर्वोत्तम मार्ग आहे. अनेकानेक असे जे हजारो योग आहेत ते ईश्वराला यत्किंचितही मान्य नाहीत. त्या योग-मार्गांच्या साहाय्याने मनुष्य ईश्वराची प्राप्ती करून घेऊ शकत नाही. त्या योगाची साधना करणारे योगी माझे दर्शन घेऊ शकत नाहीत. मला पाहू शकत नाहीत. केवळ एकमेव महायोगानेच जीवमात्र माझी प्राप्ती करून घेऊन मत्स्वरूप होऊ शकतो यात तिळमात्र शंका नाही.

शक्तिपातयोग :–

हा सर्व वेदांचे सार आहे व सर्व बंधनातून मनुष्याला मुक्त करणारा हे सांगताना भगवान आशुतोष म्हणतात–

एषः पाशुपतोयोगः पशुपाशविमुक्तये । सर्व वेदान्तसारो ऽ यं यत्याश्रम इति श्रुतिः ॥ ११ ॥ एतत्परतरं गुह्यं मत्सायुज्यप्रदायकम् । द्विजातीनां तु कथितं भक्तानां ब्रह्मचारिणाम् ॥ १२ ॥

मी हा पाशुपत महायोग सांगितला आहे. त्याचे आचरण जे जे करतात ते सर्व जीव पशुपाशातून म्हणजे सर्व बंधनातून मुक्त होतात. हा महायोग जीवाची सर्व बंधने तोडण्यासाठीच आहे. हा संपूर्ण वेदान्ताचे सार असून यतींचे आश्रयस्थान आहे असे वेदांचे सांगणे आहे. याकरिता

माझ्या या महायोगाचे ज्ञान परमश्रेष्ठ आहे. हे गोपनीय ज्ञान जीवाला सायुज्य मुक्ती प्राप्त करून देते. हा महायोग मी द्विजातीकरिता, भक्तांसाठी व ब्रह्मचारी साधकांसाठी सांगितला आहे.

लिंगपुराणांतील महायोगाचे श्रेष्ठत्व–

लिंगपुराणांतही श्रीमहादेवांनी गिरिजा भगवती जगदंबेला महायोग कसा श्रेष्ठ आहे हे ११० व्या अध्यायात फारच सुंदररीतीने वर्णन करून सांगितले आहे.

एवं पुरा महादेवी भगवन्नीललोहितः । गिरिपुत्र्यांबया देव्या भगवत्यैकशय्यया ॥ ५ ॥ पृष्टा कैलासशिखरे हृष्टपुष्टतनूरुहः । योगः कतिविधः प्रोक्तस्तत्कथं चैव कीदृशम् ॥ ६ ॥ ज्ञानं च मोक्षदं दिव्यं मुच्यते येन जंतवः । प्रथमो मंत्रयोगश्च स्पर्शयोगो द्वितीयकः ॥ ७ ॥ भावयोगस्तृतीयः स्यादभावश्च चतुर्थकः । सर्वोत्तमो महायोगः पंचमः परिकीर्तितः ॥ ८ ॥

भगवान श्रीशंकर कैलास पर्वतावर प्रसन्नपणें विराजमान झाले होते. गिरिजा भगवती पार्वतीदेवी त्यांच्या अर्ध्या आसनावर बसली होती. त्यावेळी श्रीदेवीने विचारले हे प्रभो ! दिव्य असे ज्ञान देऊन मोक्ष देणारे व जीवाला सर्व बंधनातून सोडविणारे योग किती प्रकारचे आहेत व त्यांचे स्वरूप कसे आहे ते मला आपण कृपा करून सांगावे. श्रीभगवान शंकर म्हणाले, हे पार्वती, पहिला मंत्र योग असून दुसऱ्याचे नाव स्पर्शयोग आहे. तिसऱ्याचे नाव भावयोग असून चवथ्याचे नाव अभाव योग आहे. पाचव्या योगाचे नाव महायोग असून तो सर्व योगांमध्ये अत्युत्तम असा योग आहे.

यानंतर इतर योगांचे वर्णन करून श्रीशंकरांनी महायोगाचे निर्विवाद श्रेष्ठत्व स्पष्ट केले आहे.

नीरूपः केवलः शुद्धः स्वच्छंदं च सुशोभनः । अनिर्देश्यः सदालोकः स्वसवेद्य समंततः ॥ १५ ॥ स्वभावो भासते यत्र महायोगः प्रकीर्तितः । नित्योदितः स्वयंज्योतिः सर्वचित्तसमुत्थितः । निर्मलः केवलो ह्यात्मा महायोग इतिस्मृतः ॥ १६ ॥

श्रीमहादेव म्हणतात. आत्मस्वरूप हे शून्य, अद्वितीय, निर्मल, स्वछंदतेसहित व परम सुशोभित म्हणजेच अत्यंत रमणीय असे आहे. श्रुतीला सुद्धा त्याचा निर्देश करता येत नाही. नेती नेती म्हणून स्वस्थ बसावे लागते. हे आत्मस्वरूप अप्रमेय असून नेहमी प्रकाशमान असते. ते स्वतःच स्वतःला जाणू शकते. ते सर्वव्यापी असून समानतेने भरलेले आहे.

असे हे स्वरूप स्वभावतःच ज्या योगाने कळून येते त्याला महायोग म्हणतात. नित्यप्रकाशमान, स्वयमेव, प्रकाशमान, संपूर्ण चित्ताला उत्थापित करणारा व केवळ निर्मल आत्म्याचे दर्शन घडविणारा असा हा महायोग आहे.

ज्ञानेश्वरीतील पंथराजांचे माहात्म्य :–

शक्तिपातयोगमार्ग हा सर्व योगमार्गाचा राजा असल्यामुळे श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी या मार्गाला पंथराज म्हटले आहे. ' मी ब्रह्मरूप व्हावे अशी माझी इच्छा आहे. ब्रह्मस्थिती प्राप्त होण्याकरिता जे काही केले पाहिजे म्हणून सांगाल त्याचा अभ्यास मी करीन ' अशी अर्जुनाने श्रीकृष्णांना विनम्रभावाने प्रार्थना केली. त्यावेळी श्रीकृष्णांनी अर्जुनाला या शक्तिपातयोगमार्गाच्या साधनाची म्हणजेच पंथराजाची महती वर्णन करून सांगितली. ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात या मार्गाचे माहात्म्य सांगताना श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

ऐसे विवरोनिया श्रीहरि। म्हणितलें तिये अवसरी । अर्जुना हा अवधारी । पंथराजु ॥ ६.१५२ ॥ तेथ प्रवृत्तितरूचिया बुडी । दिसती निवृत्ती फळाचिया कोडी । जिये मार्गीचा कापडी । महेश आझुनी ॥ १५३ ॥ पै योगिवृंदे वहिली । आडवी आकाशी निघाली । की तेथ अनुभवाच्या पाउली । धोरणु पडिला ॥ १५४ ॥ तिही आत्मबोधाचेनि उजुकारे । धाव घेतली एकसरे । की येर सकळ मार्ग निदसुरे । सांडूनिया ॥१५५॥ पाठी महर्षि येणे आले । साधकांचे सिद्ध जाहाले । आत्मविद थोरावले । येणेचि पंथे ॥ १५६ ॥ हा मार्गु जै देखिजे । तै तहान भूख विसरिजे । रात्रिदिवसु नेणिजे । वाटे इये ॥१५७॥ चालता पाऊल जेथ पडे । तेथ अपवर्गाची खाणी उघडे । आव्हांटलिया तरी जोडे । स्वर्गसुख ॥१५८॥ निगिजे पूर्वेलिया मोहरा । की येइजे पश्चिमेचिया घरा । निश्चळपणे धनुर्धरा । चालणे एथिचे ॥१५९॥ येणे मार्गे जया ठाया जाइजे । तो गाव आपणचि होइजे । हे सांगो काय सहजे । जाणसी तू ॥ १६० ॥

अशाप्रकारे त्यावेळी श्रीकृष्णांनी मनात विचार करून म्हटले अर्जुना आम्ही जो योगमार्ग तुला सांगणार आहोत तो सर्व मार्गांचा राजा आहे. या राजमार्गाचे माहात्म्य किती मोठे आहे ते तुला सांगतो. तू ते श्रवण कर.

साधक या योगमार्गाने जाऊ लागला व साधन करू लागला की त्याला कोटयावधी मोक्षफले दृष्टीस पडतात म्हणजे मोक्षप्राप्ती अगदी सुलभ होते. या मार्गावरून श्रीशंकर हे अद्यापपावेतो यात्रा करीत आहेत.

श्रीशंकरांनी हा साधनमार्ग प्रवर्तीत केलेला असल्यामुळे इतर साधकानी या मार्गाचा प्रवास कसा करावा हे दाखविण्यासाठी ते सतत प्रवास करीत असतात. श्रीशंकरांना काहीही प्राप्तव्य शिल्लक राहिलेले नाही. परंतु सिद्ध झाल्यावरही आत्मस्वरूपाचे अखंड ध्यान व्हावे हे इतरेजनांना दाखविण्यासाठी ते साधन अभ्यास करीत असतात

योगीजन प्रथम मार्ग न मिळाल्याने आडव्या तिडव्या मार्गाने चालले होते. परंतु पुढे महेशांच्या कृपेने त्यांना पंथराजाचे साधन मिळून ते या मार्गाला लागले. महेशांनी हा मार्ग आधीच सिद्ध करून ठेवला होता. त्याच मार्गावरून हे योगीजन अनुभव घेत घेत ब्रह्मस्वरूपापर्यंत जाऊन पोहोचले.

एकदा हे सोपे व सहज साधन मिळाल्यावर ते दुसरे अज्ञानाचे सर्व आडमार्ग सोडून देऊन निःसंशयपणे आत्मबोध करून देणाऱ्या पंथराजाच्या सरळ मार्गाने वाट चालत गेले. खरे पाहता त्यांनी या मार्गाने अक्षरशः धावतच घेतली. नंतरचे ऋषी, मुनी व महर्षी हेही याच मार्गानें ब्रह्मस्वरूप झाले.

या पंथराजाच्या मार्गानेच साधकांचे सिद्ध झाले. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान व आत्मज्ञानी पुरुष हे देखील याच पंथाने श्रेष्ठत्वास चढले.

पंथराजाचा हा मार्ग जेव्हा गुरुकृपेने दृष्टीस पडतो तेव्हा तहान व भूक हरपून जाते. या मार्गाची वाट चालत असताना (साधन करताना) रात्र व दिवस यांची आठवण होत नाही. साधकाला रात्रंदिवस साधन करावेसे वाटते. साधकाचे पाऊल जसजसे पुढे पुढे पडत जाते तसतसे त्याला मोक्षसुख अनुभवावयास मिळते. यदाकदाचित भोगाकांक्षेमध्ये साधक लिप्त होऊन साधनगतीत अडथळा आला तर त्याला स्वर्गसुख भोगायला मिळते. या पंथराजाच्या साधनामुळे साधक पूर्वेकडील मार्गाने निघून पश्चिमेकडील मार्गाला सहजतेने येतो. शरीरातील पुढील भागातील गुह्यस्थान, बेंबी, हृदय, कंठ व नाकाच्या द्वारा जो प्राणप्रवाह वाहात असतो त्याला पूर्वपथ असे म्हणतात. या पूर्वेकडील मार्गाची प्राणगती बहिर्मुख असते. या मुखातून श्वासप्रश्वासाची क्रिया होत असल्याने जीवाची वृत्तीही बहिर्मुख राहाते. हे श्वासप्रश्वासाचे कार्यच जीवाच्या जागृतीचे महत्त्वाचे चिन्ह आहे. या बाह्य जागृतीमुळेच जीवाला द्वैताची म्हणजे अभिन्नतेची जाणीव किंवा बोध होतो. मात्र या मार्गामुळे ऐक्यतेचा, एकतेचा म्हणजे अद्वैताचा बोध कधीही होत नाही. कारण पश्चिममार्ग नेहमीच बंद असतो. हा मार्ग बंद असल्याने जीवाला

आपल्या स्वस्वरूपाचे ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान होत नाही. त्याचा जन्मजन्मांतरी निरंतर अभाव राहातो. हठयोग प्रदीपिकेत याचे कारण सांगताना म्हटले आहे की, "**येन मार्गेण गंतव्यं ब्रह्मस्थानं निरामयम् । मुखेनाच्छाद्य तद्द्वारं प्रसुप्ता परमेश्वरी ॥ ३,१०६ ॥** सुषुम्णा मार्गाचा अवलंब करूनच साधक सहस्रारातील निरामय ब्रह्मस्थानी पोहचू शकतो. जोपर्यंत हे ब्रह्मद्वार उघडत नाही तोपर्यंत साधक ब्रह्म किंवा आत्मसाक्षात्काराच्या प्राप्तीपासून वंचित राहातो. हे ब्रह्मद्वार न उघडण्याचे खरे कारण असे आहे की या ब्रह्मद्वाराला अडवूनच म्हणजे झाकूनच कुंडलिनी शक्ती झोपलेली असते. ही सुप्त शक्ती श्रीसद्गुरुकृपेने जोपर्यंत जागृत होत नाही, तोपर्यंत मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही. या अर्थानेच योगशिखोपनिषदात लिहिले आहे की "**नाकृतं मोक्षमार्गं स्यात् प्रसिद्धं पश्चिमं विना**" (१-१४५) पश्चिम म्हणजे पाठीतील सुषुम्णामार्ग मोकळा झाल्याशिवाय मोक्षमार्गात साधकाची कधीही गती होत नाही. पूर्वेकडील मार्ग टाकून म्हणजे बहिर्मुखी गती टाकून देऊन या पंथराजामुळेच साधक अंतर्मुखी गतीचा होतो म्हणजे तो पश्चिमेकडील सुषुम्णेच्या घरात येतो. या घरात जीवाने प्राणरूपाने प्रवेश केला की त्याला अपूर्व निश्चलता प्राप्त होऊन त्याची गती निश्चित होऊन तो ऊर्ध्वमुखाने वाटचाल करू लागतो. मुलाधारापासून निघून सहस्रारापर्यंत म्हणजे संसारादी वासनांपासून मुक्त करून मोक्षापर्यंत निश्चित पोहचविणारा असा हा मार्ग आहे. अत्यंत दृढ श्रद्धा ठेवल्याशिवाय हे साधन होऊच शकत नाही. या मार्गावरून चालणे याचा अर्थच दृढ श्रद्धा ठेवून साधन करणे असाच आहे. ब्रह्मपदाच्या गावाला साधकाला पोहोचावयाचे असते. पण हे साधन इतके सोपे आहे की साधन करता करता साधक ब्रह्मरूप होऊन जातो. ही ब्रह्मप्राप्ती अनायास होते हे सांगितले तर तुला नवल वाटेल. परंतु तू अभ्यासाला लागलास की तुला हे आपोआप कळून येईल.

दासबोधातील शक्तिपातयोगाचे स्तवन :–

श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांनी आपल्या स्वतःचे प्रत्यक्ष रूप असलेल्या दासबोध या महान् ग्रंथात शक्तिपात योगाचे स्तवन गुप्तपणे केले आहे. समर्थांनी मूळ सिद्धांत असा मांडला आहे की–

मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाही चंचळाचा वळसा । निवांती निवांत कैसा । निर्विकारी ॥ १५. १०. १६ ॥

समर्थांच्या दृष्टीने शक्तिपाताचे महत्त्व असे अनन्य साधारण

आहे. या दृष्टीनेच त्यांनी परमार्थाचे म्हणजे शक्तिपात योगाचे स्तवन पहिल्या दशकाच्या दहाव्या समासात केले आहे. हा मार्ग समर्थामध्ये समर्थ आहे हे सांगताना समर्थ म्हणतात–

आता स्तवू हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।
नातरी समर्थांमध्यें समर्थ । योग हा ॥ १.१०.१ ॥
आहे तरी परम सुगम । परि जनासि जाहला दुर्गम ।
का जयाचे चुकले वर्म । सत्समागमाकडे ॥ २ ॥

समर्थ म्हणतात आता ईश्वरप्राप्तीच्या साधनाची म्हणजेच परमार्थाची-शक्तिपात योगाची-स्तुती करतो. त्याचे माहात्म्य सांगतो. हा मार्ग म्हणजे साधकांचा अपूर्व ठेवा असून त्यांचे स्वतःचे हित करणारा आहे. हे स्वहित सगळ्यात श्रेष्ठ व बलवान अशा योगाच्या आश्रयाने होते. या योगालाच शक्तिपातयोग किंवा पंथराज म्हणतात. हा योग समर्थ योगांमध्ये समर्थ आहे. वास्तविक पाहाता तो अगदी सुगम आहे. सहज आहे. सोपा आहे. परंतु लोकांना मात्र तो कठीण वाटतो. हा योग कठीण वाटण्याचे खरे कारण एकच आहे. सत्पुरुषांच्या संगतीचे मर्म लोक विसरून गेले आहेत. त्यांच्या संगतीमुळेच शक्तिसंक्रमण घडून येत असते.

रोकडा ब्रह्मसाक्षात्कार घडविणारा हा अत्यंत गुप्त मार्ग आहे हे सांगताना समर्थ म्हणतात–

नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार । वेदशास्त्री जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥ आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टीस न पडे । उदास परी एकीकडे । पाहतां दिसेना ॥ ४ ॥ आकाशमार्गी गुप्तपंथ । जाणती योगिये समर्थ । इतरांस हा गुह्यार्थ सहसा न कळे ॥ ५ ॥

परमेश्वरप्राप्तीची इतर अनेक साधने आहेत. परंतु इतर साधनांमुळे साधकाला केव्हातरी कालांतराने प्रचीती येते. इतर साधनात सर्व हिशेब उधारीचाच असतो. परंतु सद्गुरू समागमामुळे सिद्धमार्गाची प्राप्ती झाल्यावर तत्क्षणीच ब्रह्मप्राप्ती होते. या साधनमार्गात उधारीचा हिशेब नाही. रोकडा ब्रह्मसाक्षात्कार, तत्कालस्वरूपप्राप्ती व प्रत्यक्ष अनुभव हेच या मार्गाचे खरे वैशिष्ट्य आहे. परब्रह्मप्राप्ती हे वेदशास्त्राचे सार आहे. शक्तिपात होताक्षणीच ते अनुभवास येते.

परब्रह्म सर्वत्र आहे. परंतु त्याची थोडीशीही प्रचीती येत नाही. ते अलिप्त असे तत्त्व आहे. परब्रह्म सर्वव्यापी असल्यामुळे ते एकीकडेच आहे व दुसरीकडे नाही असे म्हणता येणार नाही. सहस्ररूपी आकाशात

जाण्याचे म्हणजेच शिवाशी समरस होण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यातील सिद्धमार्ग हा अत्यंत गुप्तमार्ग आहे. तो समर्थ योगीच जाणतात. इतर सामान्य जनाला या सिद्धमार्गाचा गुह्यार्थ सहसा कळत नाही.

परब्रह्म कसे आहे व ते गुरुकृपेच्या शक्तिपातरूप अंजनाशिवाय कळणे कधीही शक्य नाही हे समर्थ पुढे सांगतात.

साराचेही निजसार । अखंड अक्षय अपार । नेऊ न शकती तस्कर । काही केल्या ॥ ६ ॥ तयासी नाही राजभय । अथवा नाही अग्निभय । अथवा श्वापदभय । बोलोचि नये ॥ ७ ॥ परब्रह्म ते हालवेना । अथवा ठावही चुकेना । काळांतरी चलेना । जेथिचे तेथे ॥ ८ ॥ ऐसे ते निज ठेवणे । कदापि पालटो नेणे । अथवा नव्हे अधिक उणे । बहुता काळे ॥ ९ ॥ अथवा ते घसटवेना । अथवा ते अदृश्य होईना । नातरी पाहता दिसेना । गुरुअंजनेविण ॥ १० ॥ मागा योगिये समर्थ । त्याचाही निजस्वार्थ । त्यासी बोलिजे परमार्थ । परम गुह्य म्हणोनि ॥ ११ ॥ ज्याही शोधून पाहिला । त्यांसीच अर्थ सांपडला । येरा असोनि अलभ्य जाहला । जन्मोजन्मी ॥ १२ ॥

परब्रह्म हे साराचे सार आहे ते अखंड, अक्षय व अपार आहे. ते कोणताही चोर केव्हाही चोरून नेऊ शकणार नाही. त्याला राजा, अग्नी किंवा श्वापद यापैकी कशाही पासून भय नाही. हे परब्रह्म कोणालाही उचलून नेता येत नाही किंवा हलविताही येत नाही. त्याची जागा चुकली असे होत नाही. कालांतरीही त्यात फरक होत नाही. ते जेथल्या तेथेच असते. हे परब्रह्म म्हणजे स्वतःची ठेव आहे. त्यात कधीही पालट किंवा बदल होणे शक्य नाही. कालांतराने त्यात काही अधिक व काही उणे असे होत नाही. त्यात घट होत नाही किंवा ते अदृश्यही होत नाही. असे हे जे परब्रह्म आहे ते गुरुकृपेच्या अंजनाशिवाय कळून येत नाही. ही गुरुकृपा म्हणजेच शक्तिपात होय. मागे जे समर्थ समर्थ योगी होऊन गेले त्यांचाही हा साधन मार्ग म्हणजे एक अपूर्व ठेवाच होता. असा हा शक्तिसंक्रमणाचा सिद्धमार्ग हाच खरा परमार्थ आहे. मात्र हा मार्ग अत्यंत गुह्य आहे. सद्गुरूची प्राप्ती होऊन शक्तिपात दीक्षा मिळाल्यावर जे साधक अभ्यास दीर्घकाल खंड न पडता अगदी आदरपूर्वक दृढावस्थेला प्राप्त होईपर्यंत करतात त्यांनाच खरे तत्त्व सापडते. इतरांना सुद्धा ही तत्त्वप्राप्ती करणे शक्य असते. परंतु सद्गुरु-प्राप्तीशिवाय व प्रयत्नाभावी ही तत्त्वप्राप्ती त्यांना जन्मोजन्मी होत नाही.

या साधनाची अपूर्वता कशात आहे व या साधनामुळे कोणता परिणाम होतो हे समर्थ सांगतात.

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाही जन्ममृत्यूची । आणि पदवी सायुज्यतेची । सन्निधचि लाभे ॥ १३ ॥ माया विवेके मावळे । सारासार विचार कळे । परब्रह्म तेहि निवळे । अंतर्यामी ॥ १४ ॥ ब्रह्म भासले उदंड । ब्रह्मी बुडाले ब्रह्मांड । पचभूतांचे थोतांड । तुच्छ वाटे ॥ १५ ॥ प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका । शुद्धआत्मा विवेका । अंतरी आला ॥ १६ ॥ ब्रह्मस्थिती बाणता अंतरी । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी । दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाहली ॥ १७ ॥ ऐसा हा परमार्थ । जो करील त्याचा निजस्वार्थ । आता या समर्थासि समर्थ । किती म्हणोनि म्हणावे ॥ १८ ॥ या परमार्थाकरिता । ब्रह्मादिकांसि विश्रामता । योगी पावती तन्मयता । परब्रह्मी ॥ १९ ॥ परमार्थ सकळास विसावा । सिद्ध साधु महानुभावा । सेखी सात्त्विक जड जीवा । सत्संगे करूनी ॥ २० ॥ परमार्थ जन्माचे सार्थक । परमार्थ संसारी तारक । परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥ २१ ॥ परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार । परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥ २२ ॥

या साधनमार्गाची हीच अपूर्वता व हेच आश्चर्य आहे की इतर कोणत्याही साधनात न सापडणारा असा गुण यात आहे. या साधनामुळे जन्ममृत्यूची वार्ताच नाहीशी होते आणि सायुज्य मुक्ती तत्काल प्राप्त होते. नित्यानित्यविवेक उत्पन्न होऊन माया मावळून जाते. संसार असार असून परब्रह्मच सार आहे हा विचार अंतःकरणात बिंबून जातो. हृदयामध्ये परब्रह्म आपणहून प्रकट होऊन स्थिर होते. सर्वत्र ब्रह्म भरून राहिले आहे असा साक्षात्कार होतो. सर्व ब्रह्मांड ब्रह्मात बुडून गेले आहे असे वाटते. पंचमहाभूतांमुळे भासणारा संसार तुच्छ व असार आहे असे वाटते. प्रपंच खोटा वाटतो. माया ही व्यर्थ पोकळ व मिथ्या आहे असे अनुभवास येते. विवेकज्ञान आपोआप उत्पन्न होऊन शुद्ध आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होऊन ते अंतरात ठसून जाते. या साधनाने ब्रह्मज्ञान अंतःकरणात बाणून जाते. त्यामुळे संशय पूर्णपणे नाहीसा होऊन ब्रह्मांडाबाहेर जातो. या साधनामुळे जगरूपाने दिसणारी जुनीपुराणी गोधडी फाटून तुटून नाश पावते व सर्व दोषांची निवृत्ती होऊन निखळ ब्रह्मतत्त्व उरते.

असे हे साधन आहे. जो हे साधन करतो त्याला अपूर्व ठेवा प्राप्त होतो. या करिता हे साधन सर्व समर्थ साधनात समर्थ आहे. या साधनाची महती व थोरवी कितीही गायिली तरी थोडीच आहे.

या साधनमार्गामुळेच ब्रह्मादिदेवांना विश्रांती मिळते व योगी लोकांना परब्रह्माशी तद्रूपता प्राप्त होते. असा हा साधनमार्ग सकळांना विसावा देणारा व मनाला शांती देणारा आहे. या साधनाच्या जोरावर सिद्ध, साधू व महानुभाव आपल्या निजपदावर आरूढ होऊन समाधानी झाले. एवढेच नव्हे तर जे सात्त्विक परंतु जडमूढ आहेत असे अनेक जीव सत्संगाने अनुग्रह प्राप्त होऊन तरून जातात.

सद्गुरुकृपेने शक्तिसंक्रमण होऊन साधनाने परब्रह्मप्राप्ती होणे हेच खरे जन्माचे सार्थक आहे. या साधनामुळे साधक संसार तरून जातो. धार्मिक लोकांना उन्नतीचा मार्ग या साधनामुळेच प्राप्त होतो. तपस्वी लोकांचा व साधकांचा हे साधन हाच एकमेव आधार व थारा असतो. कारण या साधनामुळेच भवसागराच्या पैलतीराला जाता येते.

या साधनामुळे जन्म सार्थक होतो हे सांगताना समर्थ शेवटी म्हणतात–

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी । या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥ २३ ॥ अनंत जन्मींचे पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे । मुख्य परमात्मा आतुडे । स्वानुभवासी ॥२४॥ जेणे परमार्थ वोळखिला । तेणे जन्म सार्थ केला । येर तो पापी जन्मला । कुळक्षयाकारणे ॥ २५ ॥

असे साधन ज्या साधकांना मिळते ते खरोखर स्वानंदरूपी राज्याचे चक्रवर्ती राजेच होत असे म्हटले पाहिजे. ज्यांना अशा रीतीने गुरुकृपा-दृष्टियुक्त साधन मिळत नाही ते खरोखरी भिकारी होत. असे असल्याने या साधनाची बरोबरी इतर दुसऱ्या कोणत्याही साधनास करता येणार नाही.

अनंत जन्मींचे पुण्य असेल तरच हे साधन मिळून भगवत्प्राप्ती होते. गुरुकृपा झाल्याशिवाय भगवत्प्राप्तीचा वाटचालही सुरू होत नाही. मग प्राप्ती तर दूरची गोष्ट आहे. गुरुकृपा ही स्वानुभवाची व प्रचीतीची गोष्ट आहे. ती प्राप्त झाल्यावर परमात्म्याच्या प्राप्तीला उशीर लागत नाही हे अगदी सत्य आहे.

जो मनुष्य या साधनाची किंमत जाणतो व जीवेप्राणे हे साधन करतो त्यानेच आपला जन्म सार्थक केला असे म्हणता येते. बाकीच्या

साधन न करणाऱ्या लोकांचे जन्म फुकट होत. अशी जी साधन न करणारी पापी माणसे जन्माला येतात ती कुलक्षयालाच कारणीभूत होतात.

येथपर्यंत शक्तिपातयोगाचे माहात्म्य काय आहे ते पाहिले. साधकाने वरील सर्व विवेचन ध्यानात घेऊन श्रीकृष्णांनी अर्जुनाचे निमित्त करून हा जो अपूर्व साधनमार्ग सांगितला आहे त्यावरून मार्गक्रमण करण्यास सुरवात केली पाहिजे. कारण शक्तिपात झाल्याशिवाय म्हणजेच कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाची वाटचाल सुरू होत नाही. सारांश शक्तिपातयोगाचा स्वीकार करून शक्तीची साधना करीत करीत शिवभावाची प्राप्ती करून घेऊन जीवन कृतकृत्य करणे यातच मनुष्य जीवनाची सार्थकता आहे.

[आधार पाचवा]

★ शक्तिपातयोगाच्या विविध नावांचे रहस्य ★

१) सिद्धमार्ग
२) सिद्धयोग
३) महायोग
४) सहजयोग
५) शक्तिपातयोग
६) भक्तियोग
७) क्रियायोग
८) श्रीगुरुदत्तयोग



मनुष्य जीवनाचे सार्थक करणारा एकमेवाद्वितीय अ ा जो शक्तिपातयोगमार्ग आहे त्याची विविध नावे मागील आधारात आपण पाहिली. त्या नावातील रहस्य समजले म्हणजे शक्तिपातयोग कशाला म्हणतात ते सहज समजून येईल.

सिद्धमार्ग :–

शक्तिपातयोग हा सिद्धमार्ग आहे. सिद्धमार्ग म्हणजे सिद्ध असा मार्ग. राजमार्गासारखा अगदी तयार असा रस्ता. राजमार्गावरून चालताना माणसाला कष्ट पडत नाहीत. त्रास होत नाही. तो इच्छीतस्थळी सुखकारकपणे पोहोचतो. एकदा राजमार्ग मिळाला की इतर आडवेतिडवे फाटे फुटत नाहीत. मार्ग चुकण्याची भीती नाहीशी होते. चालण्याच्या गतीतील फरकामुळे मुक्कामाला पोहोचण्याची वेळ जरी निश्चित नसली तरी सुद्धा आपण इष्टस्थळी खचित पोहोचणार ही खात्री असल्यामुळे मन समाधानी व शांत असते.

जी गोष्ट राजमार्गाची तीच सिद्धमार्गाची. ज्याप्रमाणे राजमार्ग सामान्यापासून असामान्यापर्यंत इष्ट, सुखकारक व फलदायी ठरतो त्याचप्रमाणे सिद्धमार्गही ठरतो. सिद्धमार्गाने जाताना साधकाच्या मनाला एक अपूर्व निश्चितता असते. वाट चुकण्याची भीती मनाला कधीही शिवत नाही. कारण " **इये अभ्यासी जे दृढ होती। ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती ।।** " असे आश्वासन श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी दिले आहे. या मार्गाने विनासायास योगाची प्राप्ती होते. योग प्राप्त झाला की ज्ञान मिळते. ज्ञानामुळे मुक्ती मिळते.

श्रीशंकरांनी हा मार्ग स्वतः सिद्ध करून ठेवला आहे. मुलाचे सर्वदृष्टीने कल्याण व्हावे, त्याची उन्नती व्हावी व तो खूप मोठा व्हावा म्हणून आई लहानपणापासून त्याची सर्वतोपरी काळजी घेते. प्रत्येक गोष्ट त्याच्यासाठी सिद्ध ठेवते. मुलाला स्वतःला काहीही करावे लागत

नाही. तो आईने तयार करून ठेवलेल्या गोष्टींच्या साहाय्याने पुढे जात असतो. त्याचप्रमाणे श्रीशंकरांनी जीवाच्या उद्धारासाठी, त्याच्या उन्नतीसाठी व त्याला स्वतःचे साम्य मिळावे म्हणून हा योगमार्ग सिद्ध करून ठेवला आहे. त्यामुळे हा मार्ग मिळाला की साधकाला स्वतःला काहीही करावे लागत नाही.

जीवाला कर्मसाम्यदशा प्राप्त झाली की श्रीशंकर श्रीसद्गुरू रूपाने साधकाला आपोआप भेटून त्याला हा सिद्धमार्ग प्राप्त होतो. श्रीशंकरांच्यापासून परंपरेने प्राप्त झालेली ही सिद्धविद्या, हे सिद्धज्ञान किंवा हा सिद्धमार्ग श्रीसद्गुरू शिष्याला देतात त्यामुळे शक्तिसंचार होऊन तात्काळ कुंडलिनीशक्ती जागृत होते. त्यानंतर क्रमशः उन्नती होऊन योगाची, ज्ञानाची व मोक्षाची प्राप्ती होते.

हा योगमार्ग आपोआप कसा प्राप्त होतो हे पुढील उदाहरणावरून अधिक स्पष्ट होईल. एखादा मनुष्य भुकेने व्याकूळ झालेला असतो. स्वतः परिश्रम करून जेवण करण्याची त्याला शक्यता नसते. अशावेळी एखाद्या अन्नदात्याच्या कृपेने त्याला आयते जेवण मिळाले तर निरतिशय आनंद होतो. कारण त्याला कसलीही तयारी करावी लागत नाही. ताटात वाढलेले जेवणे एवढेच त्याचे काम असते. त्याला स्वतःला स्वयंपाक तयार करण्याचे श्रम करावे लागत नाहीत. डाळ, तांदूळ, भांडी, पाणी, अग्नी इत्यादीबद्दलचा विचार करण्याचे त्याला कारणही पडत नाही. तो निश्चितपणे जेवण करून क्षुधानिवृत्ती करतो. कोणत्याही प्रकारच्या परिश्रमाची अवश्यकता त्याच्या बाबतीत राहात नाही.

अगदी याच प्रमाणे सिद्धमार्ग प्राप्त झाल्यावर होते. श्रीसद्गुरू सिद्ध असा योग साधकाला देतात. साधकाचे काम एवढेच की त्याने डोळे मिटून स्वस्थ बसावयाचे. त्यावेळी जप, नामस्मरण, मनन, चिंतन, पठण, ध्यान, मन मुद्दाम एकाग्र करणे, चित्तवृत्तीचा निरोध करणे इत्यादी काहीही करावयाचे नाही. जे काही होईल ते फक्त साक्षी होऊन पाहावयाचे. अशाप्रकारे साधकाने आत्मनिवेदन केल्याबरोबर श्रीसद्गुरुकृपेने मूलाधारात निवास करणाऱ्या आधाररूपी कुंडलिनी शक्तीचे उद्बोधन म्हणजेच जागरण घडून येते. त्यामुळे हठयोग, मंत्रयोग, लययोग इत्यादी सर्व योग स्वाभाविक रीतीने आपोआप साधू लागतात. हे योग मुद्दाम स्वतंत्ररीतीने व अस्वाभाविकपणे करण्याचे कारणच उरत नाही. आसन, मुद्रा, प्राणायाम, जप, अनुष्ठान, ध्यान धारणा, इत्यादी कोणतीही क्रिया स्वतःहून करण्याचे कारण उरत नाही. सर्व प्रकारच्या योगांचा व उपा-

सनांचा अंतिम हेतू कुंडलिनी शक्ती जागृत करणे हाच असतो. हा हेतू केवळ गुरुशक्तीच्या प्रभावाने कुंडलिनी शक्ती जागृत होऊन आपोआप साध्य होतो व साधकाला अगदी स्वाभाविक रीतीने योगमार्गाचा लाभ होतो.

सिद्धमार्गाचा दुसरा अर्थ सिद्धांचा मार्ग किंवा सिद्ध होण्यासाठी मार्ग असा आहे. या दृष्टीने शक्तिपातयोग हाच एकमेव सर्वश्रेष्ठ असा मार्ग आहे असे म्हणण्याचे कारण "**आत्मविद थोरावले। येणेची पंथे।।**" असे श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांनी अगदी निक्षून सांगितले आहे. त्यामुळे ज्या साधकाला सिद्ध होण्याची इच्छा आहे त्याला या मार्गाची कास धरण्याशिवाय गत्यंतर नाही. विवेकानंदानी आपल्या राजयोग ग्रथांच्या चवथ्या प्रकरणात या दृष्टीने अत्यंत उद्‌बोधक विवेचन केले आहे. त्याचा शेवट करताना ते म्हणतात, "संपूर्ण ज्ञान व संपूर्ण चैतन्य यांची प्राप्ती करून घेण्याकरिता कुंडलिनी जागृत करणे हा एकच उपाय आपणास उपलब्ध आहे.... सर्व सुखाची जननी प्राणशक्ती कुंडलिनी तुमच्या जवळच आहे. तिची आराधना करा. तिला आळवा. तिचे दूध तुम्हास मिळाले तर अनंत काळापासून तुम्हास लागलेली क्षुधा तत्क्षणीच शांत होईल !"

सिद्धयोग :–

ज्या अर्थाने शक्तिपातयोगाला सिद्धमार्ग म्हटले जाते त्याच अर्थाने त्याला सिद्धयोग म्हटले जाते. हा योग मुळात सिद्ध करून ठेवलेला असल्यामुळे त्याच्या प्राप्तीत सर्व साधनांच्या साराची प्राप्ती आहे याचा साधन करताना साधकाला पदोपदी अनुभव येतो. या दृष्टीने अनुभवामृतातील श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांची एक ओवी बोधप्रद आहे.

जो भेटलिया सवे। पुरती उपायांचे धावे।
प्रवृत्तीगंगा स्थिरावे। सागरी जिये ।। २–८ ।।

श्रीसद्‌गुरूची भेट झाली की त्यांच्या कृपेने शक्तिपातयोगाची दीक्षा मिळते. त्यामुळे ब्रह्मप्राप्तीच्या इतर उपायांकडे धावण्याची किंवा त्यासाठी नानाप्रकारची साधने करण्याची प्रवृत्ती बंद पडते. नदी सागराला मिळाली की तिचे वाहाणे आपोआप बंद पडते. त्याचप्रमाणे श्रीसद्‌गुरूंची प्राप्ती झाल्यावर शक्तिसंक्रमण होऊन शक्ती जागृत होते. एकदा ही प्रक्रिया घडून आली की त्यामुळे इतर सर्व साधने आटून जातात. या दृष्टीने श्री गोपीनाथ कविराज यांनी भारतीय संस्कृती और

साधना या ग्रंथाच्या पहिल्या खंडात 'कुंडलिनी तत्त्व' या लेखात मोठे उद्‌बोधक विचार मांडले आहेत.

"कुंडलिनी शक्तिके उद्‌बोधनके बिना जीव की ऊर्ध्वगति नहीं हो सकती। अरणि–मंथन करनेसे जिस प्रकार अग्नि प्रज्वलित की जाती है, अर्थात् अरणिस्थ सुप्त अग्नि जिस प्रकार संघर्षणसे उद्दीप्त होती है, उसी प्रकार साधन-प्रणाली द्वारा प्रसुप्त कुंडलिनी को जगाना पडता है। अग्नि जिस प्रकार प्रकट होते ही इंधन (काष्ठादि) को दग्ध करती है, उसी प्रकार कुंडलिनीके चैतन्य होनेपर साधना विलुप्त हो जाती है। बाह्य साधनामात्रा अर्थात् विचार, भक्ति या हठ किंवा मंत्रयोगादि यह संपूर्ण उपासना पुरुषाकारसापेक्ष अथवा कर्तृत्वाभिमान–जन्य है। यह कर्तृत्वबोध क्रमसे कुंडलिनी चैतन्यके समयमें लुप्त हो जाता है। और कर्तृत्व-बोध के लुप्त होनेसे कुंडलिनी अधिक जागृत होती है। जिस समय एक बार कुंडलिनी चेतन होने लगती है, उस समय स्वभाव के नियमसेही सब कार्य स्वयं ही होते जाते हैं। जिस प्रकार अनुकूल स्रोत में नौका छोड देने पर उसको समुद्रमें पहुँचानेकी अन्य प्रयत्न करनेकी आवश्यकता नहीं होती, उसी प्रकार कुंडलिनीके जगानेसे और उसके प्रवाहमें प्राण वा मनको डाल देनेसे जीवको ब्रह्मावस्था प्राप्त करनेके लिये पृथक् उपाय करनेकी आवश्यकता नहीं रहती। संचारित शक्तिकी न्यूनाधिकता एव संचित वासनादिकोंकी गाढता के तारतम्य के कारण अवश्य स्रोत-आपन्न अवस्था नाना प्रकारकी होती है। (लेकिन) संकोच शक्ति अथवा उर्ध्वबिंदुस्थित आकर्षण-शक्तिके प्रभावमें अंतर्मुखगति क्रमशः वृद्धिगत होती है, और अंतमें साम्यावस्था स्थिर हो जाती है।"

कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय जीवाची ऊर्ध्वगती कधीही सुरू होत नाही. अरणी मंथन करून सुप्त असलेला अग्नी प्रज्वालित केला जातो. अर्थात् घर्षण करून अरणीमध्ये सुप्त असलेला अग्नी उद्दीप्त केला जातो. त्याचप्रमाणे साधन–प्रणालीच्या द्वाराने झोपलेल्या कुंडलिनी शक्तीला जागृत करणे आवश्यक ठरते. अग्नी प्रगट झाल्यावर तो काष्ठादीइंधन संपूर्णपणे जाळून टाकतो त्याचप्रमाणे कुंडलिनी चैतन्यमयी झाल्यावर सर्व साधना आपोआप संपुष्टात येते. विचार, भक्ती, हठ, मंत्रयोग इत्यादी सर्व बाह्य साधना किंवा संपूर्ण उपासना इत्यादी ती करणाऱ्या साधकावर अवलंबून असून त्यामध्ये आपण अमुक प्रकारची साधना करतो असा कर्तृत्वाचा अभिमान असतो. हा जो कर्तृत्वाचा अभिमान,

अहंकार व जाणीव आहे ती कुंडलिनी शक्ती चैतन्यमयी झाल्यावर क्रमाक्रमाने लोपून जाते आणि जसजसा कर्तृत्वाचा अहंकार लुप्त होत जाईल तसतशी शक्तीची जागृती अधिकाधिक होत जाईल. एकदा का ही कुंडलिनी शक्ती जागृत होऊ लागली की अगदी स्वाभाविक नियमाप्रमाणे सर्व कार्य स्वतः आपोआप होऊ लागते. ज्याप्रमाणे नदीच्या अनुकूल प्रवाहात नौका सोडल्यावर ती समुद्रात पोहोचण्यासाठी अन्य कोणतेही प्रयत्न करण्याची आवश्यकता राहात नाही, त्याचप्रमाणे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर व तिच्या प्रवाहात मन किंवा प्राण सोडून दिल्यावर जीवाला ब्रह्मावस्था प्राप्त करण्यासाठी निराळा उपाय करण्याची कोणतीही आवश्यकता राहात नाही. संचारित शक्ती कमी-जास्त झाल्याने व संचित वासनांची दृढता निरनिराळी दिसून येत असल्याने या शक्तिपातयोगप्रवाहातून वाहात जाणाऱ्या प्रत्येक साधकाची अवस्था निरनिराळ्या प्रकारची दिसून येते. असे असले तरी संकोच-शक्तीच्या किंवा ऊर्ध्वबिंदूमध्ये असलेल्या आकर्षण शक्तीच्या प्रभावामुळे जीवाची–मनाची–अंतर्मुखता हळू हळू क्रमाक्रमाने वाढत जाते आणि शेवटी साम्यावस्था प्राप्त होते.

महायोग :–

शक्तीपातयोगाला महायोगही म्हणतात. महायोग म्हणजे सर्व योगातील सर्वश्रेष्ठ असा योग होय या भूतलावर या योगापेक्षा दुसरा श्रेष्ठ योग नाही कारण या एकाच योगात इतर सर्व योगांचा व उपासनांचा समावेश झाला आहे. एवढेच नव्हे तर इतर कोणत्याही साधनात शक्ती जागृत होऊन अनुभव येण्यास व फलप्राप्ती होण्यास खूप वेळ लागतो. महायोगामुळे मात्र कुंडलिनीशक्तिजागृतीचे फल तत्काळ मिळून नाना तऱ्हेचे दिव्य अनुभव साधकाला येऊन ब्रह्मप्राप्ती अगदी सुलभ व सुकर होते. मनुष्य जीवनाची जेवढी अंगे आहेत तेवढी सर्व या महायोगामुळे संपन्न झालेली दिसून येतात हे खरे असले तरी वैराग्य, शमदमादी साधनसंपत्ती, विचार, संतोषादी दैवीगुण, नित्यानित्यवस्तु-विवेक व प्रातिभ ज्ञान हे जसजसे साधन तीव्र होत जाईल तसतसे आतून प्राप्त होते हे या महायोगाचे सर्वात मोठे वैभव आहे.

योगशिखोपनिषदात महायोग कशाला म्हणतात हे सांगताना म्हटले आहे की–

मंत्रो लयो हठो राजयोगोऽन्तर्भूमिकाः क्रमात् ।
एक एव चतुर्धाऽयं महायोगोऽभिधीयते ॥ १२९ ॥

मंत्र, लय, हठ व राजयोग या एकाच योगाच्या चार आंतर-

भूमिका आहेत. वरील चार प्रकारात विभक्त असला तरी तो एकच योग आहे. शक्तिपातयोगामध्ये या चारही योगांचा समावेश होत असल्याने त्याला महायोग असे म्हणतात. महेश्वरांनी हा स्वतः सांगितला म्हणून याला महायोग हे नाव मिळाले.

सर्व साधारण मनुष्य हठयोग, मंत्रयोग, लययोग व राजयोग हे चारही योग भिन्नभिन्न आहेत असे समजतो. परंतु वास्तविक स्थिती अशी नाही. कारण कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर हे चारही योग साधकाला स्वतः होतात. हे सर्व योग ज्या अपूर्व योगाने आपोआप होऊ लागतात त्यालाच महायोग म्हणतात.

ज्यावेळी साधकाला एखाद्या अत्यंत शक्तिमान गुरूचा अनुग्रह होतो किंवा त्याचे पूर्वपुण्य उदयाला येऊन संचित पापाचा नाश होतो व सदीच्छा जागृत होते तेव्हा साधकाला कल्पनातीत विषयाचा अनुभव येऊ लागतो. मात्र जोपर्यंत बुद्धी मंद असते, मनावर अनेक दुष्ट संस्कारांचा थर असतो, अनेक वासनांनी चित्त लिडबिडलेले असते, अज्ञानाधंकाराची तीव्रता असते व संसारचक्राच्या प्रवाहात युगानुयुगे वाहात जाण्यातच बरे वाटते तोपर्यंत प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आला तरी तो माणसाचे काहीही कल्याण करू शकत नाही मात्र ज्यावेळी पुनः पुन्हा भोग भोगता भोगता एक वेळ अशी येते की भोगाचे सामर्थ्य नाहीसे होते व इच्छाही नाहीशी होते. निसर्गाचा नियमच असा आहे की अशा प्रकारे ज्यावेळी भोगाची वृत्ती पूर्ण होते त्यावेळी स्वाभाविकपणेच मन अंतर्मुख होण्याला सुरवात होते. ही खरी निवृत्तीची सुरवात असते. अनंत जन्म भोगविलास इत्यादी भोगून झाल्यावर प्रत्येक मनुष्याच्या जीवनात असा एक दिवस उजाडतो की त्यावेळी निवृत्ती मार्गाचे द्वार उघडून त्याच्या अध्यात्म जीवनाच्या वाटचालीचा मार्ग मोकळा होतो. हा मार्ग त्याला सद्गुरुकृपेनेच मिळतो. या मार्गालाच महायोग म्हणतात.

सहजयोग :–

शक्तिपातयोगाला सहजयोग असेही म्हटले जाते. सहजयोग म्हणजे सोपा असा योग किंवा सहजपणे साधणारा योग. या योगात अवघड असे काहीही नाही. जे काही या योगात आहे ते सर्व सोपे, साधे, सरळ व स्वाभाविक असे आहे. या योगात अस्वाभाविक असे काहीही नाही. मुद्दाम बलपूर्वक एकही गोष्ट या योगात करावी लागत नाही. शक्तिजागृतीमुळे प्रत्येक गोष्ट स्वभावतःच होऊ लागते. त्यामुळे हा

योग अनायास साध्य होतो. सर्व क्रियादी गोष्टी आपोआप होत असल्याने हा योग सर्व योगात सुखकर आहे याचा अनुभव येतो.

सहजयोगामध्ये साधकाला कोणत्याही आपत्तीची शंका नसते. शक्ती जागृत झाली की सर्व शरीर किंवा मान गोलाकार फिरणे, मागे पुढे डोलणे, तोंडातून नाना तऱ्हेचे शब्दोच्चार होणे, हसणे, रडणे, निद्रा येणे, शरीर कंप पावणे, मूर्च्छा येणे, शरीर मागे अथवा पुढे पडणे, घाम येणे, रोमांच येणे, मन अत्यंत प्रसन्न व आनंदित होणे, निरनिळ्या तऱ्हेची आसने, बंध, मुद्रा प्राणायाम होणे, प्रकाश दिसणे, निरनिराळ्या देवतांची व दृष्यांची दर्शने होणे इत्यादींपैकी कोणतीही क्रिया होऊ लागली तर ती होऊ देणे इष्ट ठरते. कारण ती सहजपणे व स्वाभाविक रीतीने होत असते. या क्रिया होऊ लागल्यावर त्यांना रोखता कामा नये. किंवा या व इतर दुसऱ्या कोणत्याही क्रिया झाल्या तरी घाबरण्याचे कारण नाही. झोप आल्यावर झोपणे, भूक लागल्यावर जेवणे व शौचमूत्राचा वेग आल्यावर त्यापासून निवृत्त होणे ह्या गोष्टी प्रकृतीला हितकारकच ठरतात. त्याचप्रमाणे वरील गोष्टी केल्याने मनाला आनंद होतो. चित्ताला सुख लाभते.

मात्र वरील गोष्टी वेळच्या वेळी केल्या नाही तर त्यापासून त्रास झाल्याशिवाय राहात नाही. कारण स्वाभाविक होणाऱ्या गोष्टीत अडथळा आणला की त्याची प्रतिक्रिया उमटल्याशिवाय राहाणार नाही. झोपणे, जेवणे मलमूत्र त्याग करणे इत्यादी स्वाभाविक गोष्टी वेळच्या वेळी न केल्यास त्यामुळे अनिष्ट घडून येण्याचा संभव असतो. एखाद्या माणसाला खूप दुःख झाल्यावर त्याला रडू देणेच इष्ट असते. त्याच्यावर दडपण आणून त्याचे दुःख व रडणे दाबून टाकले तर त्याची मानसिक स्थिती बिघडण्याचा संभव असतो. मात्र शोक झाल्यावर मनसोक्त रडण्याने माणसाचे दुःख हलके होऊन त्याला खूप मोकळे वाटते.

वरील सर्व विवेचन सहजयोगाला पूर्णांशाने लागू पडते. गुरुशक्तीचे संक्रमण झाले की शक्ती ऊर्ध्वगामी होते. त्यामुळे वर वर्णन केलेल्या नाना प्रकारच्या क्रिया होतात. त्या अगदी स्वाभाविक असतात. त्या उत्पन्न झालेल्या क्रियांना साधकाने अडथळा आणला तर त्याचे मन अशांत होते. चित्त अस्वस्थ बनते. अशावेळी साधकाने क्रियांना मोकळेपणी वाव देणे हेच सर्वोतोपरी इष्ट व हितकारक असते. साधनाला बसल्यावर शक्ती-कडून आतून जे आपोआप होईल ते निःशंकपणे होऊ देणे व त्या क्रियांना शरीर समर्पण करणे यातच सहजयोगाचे सार आहे.

सहजयोगाचे हे वैशिष्ट्य आहे की सद्गुरुकृपेने एकदा साधन सुरू झाले की विशेष कष्ट व प्रयत्न करावे लागत नाहीत. श्रीसद्गुरू-जवळ राहून आसन, मुद्रा, प्राणायाम इत्यादी गोष्टी स्वतंत्रपणे शिकण्याचे कारण उरत नाही. या योगात शक्तीकडून सर्व क्रिया होत असल्यामुळे साधकाला कधीही चुकण्याची व त्रास होण्याची भीती राहात नाही.

सहजयोगाचे हे वैशिष्ट्य श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

परी मने वाचा देहे । जैसे जो व्यापार होये । तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे ।। ११७ ।। करणे कां न करणे । हे आघवे तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ।। ११८ ।। उणेयापुरेयाचे कांहीं । उरे नेदी आपुलिया ठायीं । सजातचि करूनि घेई । जीवत्व हें ।। ११९ ।। माळिये जेउतें नेले । तेउतें निवांतचि गेले । तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ।। १२० ।। म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ति । इयें वोझीं नेघें मती । अखंड चित्तवृत्ति । माझ्या ठायीं ।। १२१ ।। येन्हवी तरी सुभटा । उजू का अव्हांटा । रथ काई खटपटा । करीत असे ।। १२२ ।। आणि जें जें कर्म निपजे । ते थोडें बहु न म्हणिजे । निवांतचि अर्पिजे । माझ्या ठायीं ।। १२३ ।। ऐसिया मद्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्य-सदना । माझिया येसी ।। १२४ ।।

साधन करताना मन, वाणी व शरीर यांच्याकडून जसा व जो व्यापार होईल तो मी करीत आहे असे साधकाने म्हणता कामा नये कारण या क्रिया अगदी सहज होत असतात. परमात्मा या विश्वाचा चालक आहे. त्याच्या इच्छेने विश्वातील सर्व घडामोडी होत असतात. म्हणून कर्म करणे किंवा न करणे हे त्यालाच माहीत असते. साधनात कोणत्या क्रिया व्हाव्या व कोणत्या होऊ नयेत हे परमेश्वरच ठरवीत असतो. त्यामुळे त्या सर्व क्रियात सुसूत्रता व सहजता असते. अमुक क्रिया कमी झाली किंवा अमुक क्रिया जास्ती झाली या विषयी साधकाने काही एक मनात राहू देता कामा नये किंवा त्याविषयी मनात खेदही बाळगता कामा नये. ज्याप्रमाणे माळी नेईल तिकडे पाणी हे निवांतपणे जाते त्याप्रमाणे मनातील कर्तृत्वाभिमान टाकून साधन सहजपणे होऊ दिले पाहिजे. असे झाले म्हणजे प्रवृत्तीनिवृत्तीचे ओझे बुद्धीवर पडत नाही. अमुक चांगले किंवा अमुक वाईट हा भेद उरत नाही. त्यामुळे चित्तवृत्ती माझ्याठायी अखंड राहाते. वाट सरळ आहे किंवा वाकडी आहे याविषयी रथाला काही काळजी आहे का ? जिकडे त्यास

न्यावे तिकडे तो जातो. त्याप्रमाणे ज्या ज्या क्रिया होतील, जे जे कर्म होईल ते थोडे किंवा पुष्कळ आहे असे न म्हणता एकनिष्ठेने मला अर्पण कर साधनाचा अभिमान धरू नकोस. याप्रमाण भावना करून साधन करीत राहिले असता देहपातानंतर तू माझ्या ऐक्यरूपी मंदिरात प्राप्त होशील. अशा रीतीने कर्तृत्व सोडून साधन केले असता भोक्तृत्वही नाहीसे होऊन जीव कर्तृत्व-भोक्तृत्वरहित असा ब्रह्मस्वरूप होतो.

शक्तिपातयोग :—

सिद्धमहायोगाला योगाच्या परिभाषेत शक्तिपातयोग म्हणतात. शक्तिपात म्हणजे शक्तीचा न्हास नव्हे, तर श्रीसद्गुरूंच्या द्वारे भगवंताचा अनुग्रह किंवा कृपा याला शक्तिपात म्हणतात. श्री.प.प.श्रीविष्णूतीर्थस्वामी महाराजांनी आपल्या शक्तिपात या पुस्तकात " **तत्पातः शिष्येषु** ॥७॥ " व " **ततःशक्त्युद्बोधनम्** " ॥८॥ या दोन सूत्रांनी ही शक्तिपाताची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. शिष्यावर शक्तीचा पात होतो असा पहिल्या सूत्राचा अर्थ आहे. गुरुजन शिष्याच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी, कल्याणासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी व कैवल्यप्राप्तीसाठी आपल्या जवळील दिव्य शक्तीचा शिष्यावर पात करतात. त्यामुळे शिष्याची शक्ती जागृत होते असा दुसऱ्या सूत्राचा अर्थ आहे. प्रत्येक मनुष्याची अध्यात्मिक शक्ती सुप्तच असते. ती जागृत झाल्यावर तिचे स्वरूप कसे आहे याचा अनुभव येऊ लागतो. शिष्याची शक्ती जागृत करणे यालाच शक्तिपात म्हणतात.

जीवनमुक्तिविवेक या ग्रंथावर श्री. अमृतराय मोडक यांनी जी टीका लिहिली आहे त्यात शक्तिपातासंबंधीचे उत्कृष्ट विवेचन केले आहे. ते म्हणतात—

" शिष्याचे कर्मसाम्य असले तरच शांभवी शक्ती तेथे संक्रांत होते. श्रीमन्माधवाचार्यांनी आपल्या टीकेतही हे सप्रमाण सांगितले आहे. प्राणिमात्राचे पूर्वजन्मातील कर्म (धर्माधर्मरूप) समान असताना एका क्षणात सर्वपाशच्छेदक शांभवी-शक्तिपात-दीक्षा गुरूच्या फक्त दयार्द्र दृष्टीने होते. आगमातही असेच सांगितले आहे. अधर्म व धर्माचे समत्व असताना शंभूची ज्ञानात्मिका श्रेष्ठ शक्ती शिष्य देहात संक्रात होते. येथील अर्थ खरा असा आहे की गुरू व शिष्य यांचे धर्माधर्म समान झाले की शिवाची परमशक्ती अधिकारी शिष्याच्या ठिकाणी चाक्षुष्यादी दीक्षा साधन द्वारा परमेश्वराचे ज्ञान करून देण्यासाठी प्रेरिली जाते. हाच शक्तिपात होय.

इथे एक शंका घेतली जाईल की शक्ती शब्दाने तर केवल अद्वैत चैतन्य हेच अभिप्रेत आहे. ते स्वरूपभूत, अनंत व अमूर्त आहे. त्यामुळे तिचा पात-पतन अशक्य व असंभव आहे. आणि जर शक्ती ही स्वस्वरूपाहून भिन्न व दुसरीच गोष्ट असेल तर तिला ज्ञानात्मिका व परा ही विशेषणे लावणे व्यर्थ होय.

परंतु ही शंका योग्य नाही. कारण शक्ती म्हणजे चैतन्य शक्तीच होय. ती अद्वैतरूप, परमेश्वरस्वरूपभूत व सर्वगत आहे. असे शक्तीचे स्वरूप असल्यामुळे तिचे पतन होते हे म्हणणे अगदी औपचारिक आहे. शक्तीचा पात ही गोष्ट अगदी असंभव आहे. परंतु शिष्याचे चैतन्य नानाविध पाशजालाने झाकलेले असते. ते आवरण दीक्षासंस्काराने दूर करून चिच्छक्ती प्रकट करणे यालाच पात म्हणतात. वरून खाली येणे म्हणजे पतन हे या चिच्छक्तीला संभवत नाही म्हणून आगमात असे वर्णिले आहे.

व्यापिनी परमा शक्तिः पतितेत्युच्यते कथं ?
ऊर्ध्वादधोगतिः पातो मूर्तस्यासर्वगतस्य च ।।
सत्यं सा व्यापिनी नित्या सहजा शिववत् स्थिता ।
किन्त्वियं मलकर्मादि पाशबद्धेषु संवृता ।।
पक्वदोषेषु सुव्यक्ता पतितेत्युपचर्यते ।।

ती परमशक्ती सर्वव्यापिनी आहे. मग तिला पतित होते किंवा पडते असे का म्हटले जाते ? साकार व परिच्छिन्न पदार्थच वरून खाली पडू शकतो. म्हणजे जो पदार्थ एकदेशीय व मूर्तिमान असून सर्वव्यापक नाही तो वरून खाली पडला म्हणजे त्या पदार्थाच्या पडण्याला पात किंवा पतन म्हणतात. परंतु ती शक्ती सर्वव्यापिनी आहे. ती शिवाप्रमाणे सर्वत्र राहाणारी व सहजा आहे. परंतु शक्ती मलकर्मादी पाशबंधामुळे झाकलेली आहे. जेव्हा मलकर्मपाशबंधादी दोष नष्ट होतात म्हणजे पक्व होऊन गळून पडण्याच्या मार्गावर असतात तेव्हा ती शक्ती व्यक्त होते. ह्या शक्तीच्या प्रकटीकरणालाच पतित म्हणजे शक्तिपात म्हटले जाते.

असा हा शक्तिपात होणे अगदी नितांत, आवश्यक व अपरिहार्य आहे हे सांगताना " भगवत् कृपा का रहस्य " या आपल्या लेखात म. म. श्री गोपीनाथ कविराज म्हणतात, " इससे सिद्ध होता है कि शिष्य कितनाही भोगलोलुप क्यों न हो पर भगवानकी संचारित शक्ति व्यर्थ नहीं जाती । निम्न मात्राका शक्तिपातभी अंतमें अवश्य शिवत्वदायक होता है । इससे यह भी सिद्ध हुआ कि शक्तिपात निरपेक्ष है अर्थात कर्मादिके अधीन नहीं है । कर्मादि अणुको याने जीवको मायामें प्रविष्ट

कराते हैं, वे मायासे जीवका उद्धार नहीं कर सकते । जितने शुद्धात्मा अथवा रुद्राणू माया के मध्यमें हैं और जितने मायाके ऊपर हैं सब अपना अपना अधिकार समाप्त होतेपर हठात् अर्थात कर्मादिकी अपेक्षाके बिना भगवत् शक्तिपातके प्रभावसे शिवत्वको प्राप्त होते है और जो लोक मायासे आकांत नहीं हैं वे कर्मादि निरपेक्ष हैं । वे केवलमात्र शक्तिपातसे भोग और मोक्ष दोनोंको प्राप्त करते हैं । "

यावरून हे सिद्ध होते की, शिष्य कितीही विषयांध व भोगलोलुप असला तरी ज्यावेळी सद्गुरू त्याच्यावर कृपा करून शक्तिपात करतात त्यावेळी त्याच्या ठिकाणी संचारित झालेली शक्ती कधीही व्यर्थ जात नाही. अगदी सामान्य मात्रेचा शक्तिपातही शेवटी साधकाला शिवत्वाची प्राप्ती निश्चितपणे करून देतो यात तिलःप्राय शंका नाही. यावरून असे निश्चित दिसून येते की, शक्तिपात हा निरपेक्ष असून तो कर्म इत्यादी कशाच्याही स्वाधीन नाही. कर्म वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या जीवाला मायेमध्ये प्रविष्ट करतात. त्यामुळे कर्मामुळे किंवा तत्सम गोष्टींमुळे जीवाचा मायेपासून उद्धार होऊ शकत नाही. जेवढे शुद्धात्मा किंवा रुद्राणू मायेमध्ये आहेत व जितके मायेच्या वर आहेत ते सर्व आपापला अधिकार संपल्यावर आपोआप म्हणजे कर्मादींची वगैरे कशाच्याही अपेक्षेशिवाय भगवत् शक्तिपाताच्या प्रभावाने शिवत्व प्राप्त करतात. जे लोक मायेने गुरफटलेले नसतात ते कर्मादी निरपेक्षच असतात. ते तर केवळ शक्तिपातानेच भोग व मोक्ष दोन्हीही प्राप्त करून घेतात."

" जीवन का लक्ष्य " या आपल्या निबंधातही म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी अज्ञाननिवृत्ती होण्यासाठी शक्तिपात होणे किती आवश्यक आहे व त्याशिवाय अन्य सर्व साधने अगदी निरुपयोगी कशी ठरतात हे सांगताना म्हटले आहे की, " अज्ञानाच्या प्रभावाने आत्म्याला मायेच्या अधीन होऊन देह धारण करणे भाग पडते. त्या अज्ञानाची निवृत्ती जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आत्म्याचा नैसर्गिक असा शिवत्वरूप धर्म प्रकट होत नाही. या मूळ अज्ञानालाच पौरुष अज्ञान म्हटले जाते. या अज्ञानाची निवृत्ती व्हावी म्हणून जे जे अत्यंत आवश्यक उपाय व मार्ग आहेत ते ते सर्व निरर्थक आहेत. मग कर्म व ज्ञान हे मार्गच काय परंतु भक्तीचा मार्गही निरर्थक ठरतो. या सर्वांची उपायांमध्ये गणना होत असली तरी हे सर्व मार्ग म्हणजे केवळ बुद्धीचा व्यापार आहेत. बुद्धी उत्पन्न होण्यापूर्वी जी गोष्ट घडली, उत्पन्न झाली किंवा उभारली गेली

तिची निवृत्ती किंवा संहारणी करण्याची पात्रता वरीलपैकी एकाही उपायामध्ये नाही. यासाठी जोपर्यंत मनुष्याच्या आत्म्याचे मूळ अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत मनुष्य जीवनाचा सर्वात श्रेष्ठ असा आदर्श म्हणजे मोक्ष कधीही प्रत्यक्षपणे प्राप्त होत नाही. आत्म्याने आपल्या इच्छेने आत्मसंकोच केला त्यालाच मूळ अज्ञान म्हणतात. मूळ अज्ञान म्हणजे आत्मसंकोचाशिवाय दुसरे तिसरे काही नाही. वास्तविक सम्यक विचार केला तर हे स्पष्टच आहे की शिवरूप आत्मा हा सर्व प्रकाराने संकोच-रहित आहे. त्याच्या ठिकाणी कालाचा संकोच नसल्याने तो नित्य आहे. देशाचा संकोच नसल्याने तो विभू म्हणजे व्यापक आहे. क्रियेचा संकोच त्याच्या ठिकाणी नसल्याने तो सर्वकर्ता आहे. ज्ञानाचा संकोच नसल्याने तो सर्वज्ञ आहे व आनंदाचा संकोच नसल्याने आत्मा नित्यतृप्त आहे. हेच आत्म्याचे शिवत्व होय. परंतु लीला करण्याच्या बहाण्याने आत्मा स्वेच्छेने आपल्याला संकुचित करतो व अभिनय करण्यासाठी जीवभाव ग्रहण करतो. असे झाले म्हणजे त्याचे सर्व स्वाभाविक धर्म संकुचित होणे अपरिहार्य ठरते. अशा प्रकारे परिच्छिन्न शक्ती-मुळे क्षुद्र झालेला आत्मा मायेच्या अधीन होऊन आपणच कर्ता आहोत असे मानू लागतो. अर्थात तो कर्म जगतामध्ये प्रवेश करतो. कर्म करणे व केलेल्या कर्माचे फळ भोगणे या दोन व्यापारात गुंतून जाऊन एका योनीतून दुसऱ्या योनीत जाऊन भिन्न भिन्न शरीरे धारण करून भटकत राहातो. संकुचित आत्म्याच्या म्हणजे जीवाच्या संसार-चक्राच्या परि-भ्रमणाचा हा संक्षिप्त इतिहास आहे. देहसंपन्न असलेल्या आत्म्याच्या अभिमानसामग्रीमध्ये बुद्धी हे अत्यंत प्रधान अंग आहे. ज्ञान व अज्ञान हे दोन्हीही बुद्धीचेच धर्म आहेत. शाब्दिक ज्ञानाने शाब्दिक अज्ञान नष्ट होते हे खरे आहे. परंतु ही अत्यंत सामान्य गोष्ट आहे. अशा प्रकारे होणाऱ्या शाब्दिक ज्ञानाने मूल अज्ञान नाहीसे होण्याचा संभव तिळमात्र असत नाही.

याकरिता सर्वात प्रथम मूळ अज्ञान कसे नाहीसे होईल याचा विचार केला पाहिजे. यापूर्वीच पहिल्याप्रथम अज्ञान दूर होण्यासाठी कर्म, शब्द-ज्ञान किंवा बाह्य-भक्ती यांचा कोणत्याही प्रकारे अज्ञान संपण्याच्या दृष्टीने उपयोग होत नाही हे जे सांगितले ते त्रिकालाबाधित सत्य आहे; कारण हे सर्व मार्ग किंवा साधने मुळाला स्पर्शही करू शकत नाहीत. एकमात्र भगवंताच्या कृपाशक्तीच्या द्वारेच या मूळ अज्ञानाची निवृत्ती होऊ शकते. अन्य कोणत्याही उपायाने हे घडून येऊ शकत नाही.

भगवत्कृपा ही स्वभावसिद्ध आहे व तो अहेतुक असली तरी आधाराच्या म्हणजे साधकाच्या पात्रतेनुसार तिची कार्यक्षमता प्रतिबिंबित झालेली दिसते. कृपाशक्ती जरी नित्य असली, तरी जोपर्यंत जीवात्म्यावरील मूळ आवरणरूप मल पक्व होत नाही म्हणजे गळून पडण्याच्या मार्गावर असत नाही तोपर्यंत शक्तिपात होऊन कृपाशक्ती साधकात संचारित होऊ शकत नाही. परंतु मल परिपक्व झाल्यावर मलपाकाच्या तारतम्यानुसार कृपा संचारित झाल्याशिवाय राहात नाही. लौकिक जगतात ज्याला दीक्षा म्हणतात ते त्याचेच फल आहे. ही शक्तिपात दीक्षा स्थूल व सूक्ष्म अशा दोन्ही रीतीने होऊ शकते. दीक्षेचा प्रकार कोणता आहे यापेक्षाही ती होणे हे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत शक्तिपातयोगाची दीक्षा होत नाही तोपर्यंत साधकावर कोणत्याही साधनाचा परिणाम जितका व्हावयास पाहिजे तितका होत नाही."

उत्तम, मध्यम व कनिष्ठ अधिकाऱ्यावर संतमहात्मे शक्तिपात कसा करतात व अंतर्निहीत महाशक्ती जागृत करून साधकाला शिवरूप कसे करतात हे सांगताना "संत परिचय" या आपल्या लेखात म. म. श्री. गोपीनाथ कविराज म्हणतात, " ज्यांना सत्याचा साक्षात्कार झाला आहे ते जर समर्थ असले व त्यांना जर आवश्यकता वाटली तर ते दुसऱ्यांनाही उपदेश देऊ शकतात. जो साधक श्रेष्ठ अधिकारी असतो त्याला प्रातिभ ज्ञानाच्या रूपाने हा उपदेश दिला जातो. हे प्रातिभ ज्ञान आपोआप हृदयामध्ये उत्पन्न होते. हे ज्ञान अनौपदेशिक असले तरी एक प्रकारे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संक्रमित होत असल्याने उपदेशरूपच आहे. मात्र बाह्य शब्दाचा आश्रय घेऊन त्या ज्ञानाचा श्रेष्ठ अधिकाऱ्याच्या बाबतीत संचार करण्याचे कारण पडत नाही. अशा प्रकारे विशुद्ध ज्ञानानेच हृदयातील संशय सम्यकपणे नाहीसे होतात. " **गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यः संछिन्नसंशयः** " या वाक्याचा अर्थच केवळ कृपेने शक्तिपात करून शिष्याच्या ठिकाणी ज्ञान संचारित करून शिष्याचा उद्धार करणे हा आहे.

मध्यम अधिकारी साधकाला संत लोक विशुद्ध चेतनाबरोबर शब्दाचा वापर करून शक्तिपाताने उपदेश देतात. या चेतन शब्दामध्ये इतके सामर्थ्य असते की, जेव्हा हा शब्द साधकाच्या कानामध्ये प्रवेश करतो तेव्हा तो मर्मस्थानापर्यंत जाऊन भिडतो. ज्यावेळी ही प्रक्रिया घडते त्यावेळी अत्यंत असाधारण, असामान्य व अलौकिक आंदोलने साधकाच्या हृदयात उपस्थित होतात. साधकाचे हृदय अशा प्रकारे आंदोलित झाले की त्याची स्थिती बदलून जाते. साधकाने शब्द ऐकल्या-

बरोबर त्याचे बाह्य जगताचे आकर्षणच नाहीसे होते. मन, प्राण व इंद्रिये ही सर्व एकत्रित होऊन अत्यंत प्रचंड व प्रबल वेगाने एखाद्या उद्दाम प्रवाहाप्रमाणे अन्तरात्म्याला भेटून त्याच्याशी समरस होण्यासाठी धावत सुटतात श्रीकृष्णाची बासरी ऐकल्याबरोबर राधेची किंवा गोपिकांची स्थिती व भाव अगदी असेच होत. तंत्रशास्त्रामध्ये मंत्र चैतन्ययुक्त व्हावा म्हणून जी व्यवस्था केलेली दिसते त्याचे कारण हेच आहे शब्द चेतन केल्याशिवाय त्या शब्दाच्या साहाय्याने परब्रह्माचा साक्षात्कार होणे ही गोष्ट कालत्रयीही असंभवनीय व दुष्कर आहे. जो शब्द अचेतन असतो त्याला शब्दब्रह्म म्हणता येत नाही. मात्र अचेतन शब्दाचा वारंवार जप करण्याची एक विशेष प्रक्रिया आहे. तिचा अवलंब केला असता खूप परिश्रमाने शब्दाला चेतनता येऊन शक्ती जागृत होते. संत-महात्म्यांना इच्छा झाली की अगदी प्रत्यक्षपणे ते चेतन शब्दाच्या प्रयोगाने शक्ती जागृत करतात.

जे साधक अगदी अधम अधिकारी असतात त्यांना संत लोक अचेतन शब्दाच्या द्वारा उपदेश करतात. परंतु त्याबरोबरच ते साधकाला अशी काही विशेष क्रिया सांगतात की त्यामुळे अचेतन शब्द क्रमशः चेतन शब्दात रूपांतरित होत जातो. साधकाच्या अवस्थातील फरकामुळे साधक दीर्घकालपर्यंत विचार व नामस्मरण करीत राहिला तर त्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणाने तीव्र संघर्षामुळे अचेतन शब्द चेतन होऊन शक्ती जागृत होते.

सारांश, जोपर्यंत कुंडलिनीरूपी महाशक्ती सत्यमार्गावर आवरण घालून घोरतम निद्रेत निमग्न असते तोपर्यंत जीवाची जडता दूर होत नाही व शिव शवरूप होऊन निष्क्रिय अवस्थेतच असतो. इतकेच नव्हे तर या स्थितीत मिथ्या गोष्टींचे अवडंबर माजते. मायेचे तीव्र प्रलोभन असते व विचित्र अशा प्रपंचाची मोहिनीशक्ती सतत प्रकट होत राहाते. शक्तिपाताने कुंडलिनी जागृत झाली की जीवाची घोर निद्रा संपून तो आपले स्वरूपदर्शन घेण्याला समर्थ होतो. ज्यावेळी जागरण पूर्णपणे घडून येते त्यावेळी जीवाचे जडत्व निःशेषपणे नाहीसे होऊन तो शिवत्वाची प्राप्ती करतो. याचा अर्थच असा आहे की, शक्तिपातयोगाची दीक्षा मिळाली की अंतर्निहित महाशक्ती जागृत व गतिमान होऊन नित्य जागृत असलेल्या श्रेष्ठ अशा शिवस्वरूपाशी समरस होण्यासाठी धावू लागते."

भक्तियोग :–

शक्तिपातयोगाची दीक्षा मिळाल्यावर भक्तियोग संपन्न होऊ लागतो. कारण शक्तिपातयोगाचे मुख्य लक्षण भगवद्भक्तीचा उन्मेश हें आहे. मालिनी विजयोत्तरतंत्रामध्ये शक्तिपात झाल्यावर कोणकोणती फले मिळतात हे सांगताना अगदी प्रथम पुढील लक्षण सांगितले आहे.

सति तस्मिंश्च चिन्हानि तस्यैतानि विलक्षयेत् ।
तत्रैतत्प्रथमं चिन्हं रुद्रे भक्ति सुनिश्चला ॥ १ ॥

गुरूकडून तीव्र शक्तिपात झाल्यावर कोणताही प्रयत्न न करता अकस्मात शिष्यामध्ये अनेक उत्तम लक्षणे प्रकाशित होतात. श्रीमहेश्वरांच्या ठिकाणी अत्यंत दृढ भक्ती होणे हे अगदी पहिले लक्षण साधकामध्ये दिसून येते. अशा प्रकारे भक्तिभाव साधकाला प्राप्त झाला की कधी कधी बेहोश होऊन नृत्य करावे, गावे इत्यादी इच्छा त्याला होऊ लागतात. कधी कधी भक्तीच्या आवेशाने साधक जोरजोराने हसू व रडूही लागतो. आतून होणाऱ्या भक्तीच्या वेगामुळे शरीर कंप पावून घाम येऊ लागतो. एकदा का शक्ती जागृत झाली की साधनकालामध्ये भक्तीची एक एक लक्षणे साधकामध्ये आपोआप प्रगट होऊ लागतात. कारण गुरुपरंपरेने चालत आलेले हे शक्तिपाताचे साधन साधक जन्मजन्मांतरी करीत आलेला असतो. त्याला जरी स्मृती नसली तरी ही साधना काही न वीन नसते. श्रीमत् चैतन्य महाप्रभूंचे परमभक्त शिष्य श्रीमत् रूपगोस्वामी यांनी आपल्या भक्तिरसामृतसिंधूमध्ये या साधनात भक्तीच्या स्रोतामुळे पुढील क्रिया उत्पन्न होतात म्हणून वर्णन केले आहे.

अनुभावस्तु चित्तस्थभावानामवबोधकाः ॥ ते बहिर्विक्रियाप्रायाः प्रोक्ता उद्भास्वराख्यया ॥ नृत्यं विलूठितं गीतं क्रोशनं तनुमोटनम् । हुंकारो जृंभणं श्वास भूमा लोकानपेक्षिता ॥ लारास्रावो ऽ ट्टहासाश्च घूर्णाहिक्का दयोऽपिच । ते शीताः क्षेपणाश्चेति यथार्थाख्या द्विधोदिताः ॥

या साधनामध्ये चितस्थ भावांच्या सूचना देणाऱ्या या बाह्य क्रियांचा अनुभव साधकाला येत असतो. नृत्य, गीत, भूमीवर लोळणे, जोरजोराने ओरडणे, शरीराच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या हालचाली करणे, हुंकार देणे, हूं हूं करणे, जांभई देणे, दीर्घश्वासप्रश्वास करणे, लोकांच्या निंदेची किंवा प्रशंसेची पर्वा न करणे, लाळ वाहाणे, जोरजोराने हसणे, घूर्णा म्हणजे शरीर डोलणे, उचकी लागणे, थंड लागणे, हातपाय आपटणे इत्यादी गोष्टी भक्तीचा उद्रेक आतून आला की दृग्गोचर होत असतात.

या ग्रंथातच भक्तीच्या उद्रेकाची लक्षणे सांगताना पुढे म्हटले आहे की–

चित्तं सत्वौभवत्प्राणे न्यस्यत्यात्मानमुद्भट । प्राणस्तु विक्रियां गच्छन् देहं विक्षोभयत्यलम् ।। तदा स्तंभादयो भावाः भक्तदेहे भवन्त्यमी । ते स्तंभस्वेदरोमांचाः स्वरभेदोऽथ वेपथुः ।। वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टै सात्विकाः स्मृताः ।।

हे साधन करू लागले म्हणजे चित्त सत्त्वयुक्त बनत जाऊन प्राण लीन होऊ लागतो. भक्ती आतून उफाळून आली की प्राणाच्या नाना प्रकारच्या आंतरिक क्रिया घडून येतात. या क्रियांमुळे साधकाचा देह विशेष रूपाने क्षुब्ध झालेला दिसला तरी त्यामुळे शक्तीचा आतून सतत विकास होत असतो. भक्तीमुळे प्रक्षुब्ध झालेल्या प्राणामुळे साधक-भक्ताच्या शरीरात स्तंभादी अष्टसात्त्विक भावसमूह प्रकट होतो. स्तंभ म्हणजे खांबाप्रमाणे देहाची जडवत् स्थिती. घाम, रोमांच, स्वरभेद म्हणजे कंठस्वराची नाना प्रकारची विकृती, कंप, शरीर पांढरट होणे, अश्रू व निद्रा हे आठ भाव भक्तीने उसळून येतात. "मी तुला दिव्य दृष्टी देतो. तू योगाचे ऐश्वर्य पाहा," असे म्हणून श्रीकृष्णांनी अर्जुनावर शक्तिपात केल्याबरोबर त्याच्या ठिकाणी हे आठही सात्त्विक भाव भक्तिप्रेमामुळे उसळून आले. त्याचे वर्णन श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

आंतुला महानंदा चेइरे जहालें । बाहेरी गात्रांचे बळ हारपोनि गेलें । आपाद पां गुंतलें । पुलकांचले ।। ११.२४६ ।। वार्षिये प्रथमदशे । वोहळलया शैलांचें सर्वांग जैसें । विरुढें कोमलांकुरी तैसें । रोमांच जाहाले ।। २४७ ।। शिवतला चंद्रकरी । सोमकांत द्रावो धरी । तैसियां स्वेदकणिका शरीरीं । दाटलिया ।। २४८ ।। माजी सांपडलेनि अलिकुळें । जळावरी कमळकळिका जेंवि आंदोळे । तेंवि आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरी कांपे ।। २४९ ।। कर्पूरकर्दळीची गर्भपुटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटे । पुलिका गळती तेवि थेंबुटे । नेत्रौनि पडती ।। २५० ।। उदयलेनि सुधाकरे । जैसा भरलाचि समुद्र भरे । तैसा वेळोवेळा उर्मि भरें । उचंबळत असें ।। २५१ ।। ऐसा सात्विकांहीं आठां भावां । परस्परें वर्ततसे हेवा । तेथ ब्रह्मानंदांची जीवा । राणीव फावली ।। २५२ ।।

श्रीकृष्णांनी अर्जुनावर कृपा केल्यावर त्याच्या ठिकाणी आतील महानंद प्रकट झाला. अर्जुनाच्या ठिकाणी मूळ आनंद होताच. त्यावरील आवरण श्रीकृष्णांच्या सामर्थ्याने दूर झाल्याबरोबर तो आतून प्रकट

झाला व अर्जुन आनंदसागरात बुडून गेला. त्याच्या शरीराच्या अवयांचे ठिकाणी जे बळ होते ते नाहीसे होऊन अवयव ढिले पडले. आनंदातिरेकामुळे पायापासून मस्तकापर्यंत सर्व शरीरावर रोमांच उभे राहिले. वर्षाऋतूच्या आरंभी ज्याप्रमाणे पर्वताच्या अंगावरून पावसाचे पाणी वाहून गेल्यावर गवताचे कोवळे अंकुर फुटतात त्याप्रमाणे ते रोमांच दिसत होते. चंद्राच्या किरणांचा स्पर्श झाल्यावर सोमकांतमणी जसा पाझरतो त्याप्रमाणे अर्जुनाच्या सर्व शरीरावर घामाचे बिंदू दाटून आले. पाण्यावरील कमळाच्या कळीत भुंगा सापडला म्हणजे ती जशी हेलकावे खाऊ लागते त्याप्रमाणे आत उठणाऱ्या सुखाच्या ऊर्मीमुळे व लहरींमुळे अर्जुनाचे शरीर बाहेर कापू लागले. कापूर उत्पन्न करणाऱ्या कापुरकेळीत कापूर दाटला असता ज्याप्रमाणे त्या कापूरकेळीची सोपटे उकलली जाऊन त्यातून कापराचे कण गळू लागतात; त्याप्रमाणे अर्जुनाच्या डोळ्यातून आनंदाश्रूंचे थेंब पडू लागले. पौर्णिमेला पूर्ण चंद्राचा उदय झाल्यावर भरलेल्या समुद्रालाही भरती येते. याप्रमाणेच श्रीकृष्णांनी कृपा केल्यावर आत वेळोवेळी उठत असलेल्या आनंदाच्या ऊर्मीमुळे अर्जुन वारंवार उचंबळू लागला व अंतर्यामीच्या सुखाच्या लाटांनी तो वरचेवर डोलू लागला. याप्रमाणे अर्जुनाच्या ठिकाणी प्रकट झालेल्या अष्टसात्त्विक भावांची एकमेकांत स्पर्धा होऊ लागून त्याला ब्रह्मानंदाचे राज्य प्राप्त झाले.

शक्तिपाताशिवाय खरी भक्ती प्राप्त होत नाही व भक्तीशिवाय चित्त शुद्ध होत नाही. चित्तशुद्धीसाठी अष्टसात्त्विक भाव उत्पन्न होण्याची नितांत आवश्यकता आहे. हे सांगताना श्रीमद् भागवताच्या एकादश स्कंदाच्या चौदाव्या अध्यायात श्रीव्यास महर्षी म्हणतात,

कथं विना रोमहर्ष द्रवता चेतसा विना । विनाऽऽनन्दाश्रुकलया शुध्येद्भक्त्या विनाऽऽशयः ।।

अंगावर रोमांच उत्पन्न झाल्यावाचून, चित्त द्रवल्यावाचून किंवा नेत्रातून आनंदाश्रू आल्यावाचून भक्ती सिद्ध होत नाही. आणि भक्तीवाचून चित्तही शुद्ध होत नाही. या श्लोकावर टीका करताना श्रीसंत एकनाथ महाराजांनी भक्ताच्या ठिकाणी भक्तीची जी चिन्हे दिसतात त्याचे वर्णन केले आहे.

तेणेंची उपजे माझी भक्ती । माझ्या भजनाच्या अतिप्रीती । आवडीं माझीं नामें गाती । रंगी नाचती सद्भावे ।।३०८।। पोटातूनिया उल्हासता । रंगी रंगता पै नाचता । अंतरी द्रवो झाला चित्ता । ते

अवस्था बाह्य दिसे ॥ ३०९ ॥ अंतरी सुखाची झाली जोडी । बाह्य रोमांची उभिली गुढी । त्या स्वानुभवसुखाची गोडी । नयनी रोकडी प्रवाहे ॥ ३१० ॥ माझे भक्तिचिया आवडी । अहं सोहं दोनी कुडी । तुटली अभिमानाची बेडी । विषय गोडी निमाली ॥ ३११॥ ते काळीचे हेचि चिन्ह । पुलकांकित देहो जाण । नयनीं आनंद जीवन । हृदयी परिपूर्ण स्वानंदू ॥ ३१२ ॥ पुंजाळले दोनी नयन । सदा सर्वदा सुप्रसन्न । स्फुरेना देहाचे भान । भगवंती मन रंगले ॥३१३॥ ऐसी नुपजता माझी भक्ती कैची होय विषय विरक्ती । विरक्तीवीण माझी प्राप्ती । नव्हे निश्चिती उद्धवा ॥ ३१४ ॥ माझी शुद्धभक्ती तत्त्वता । साचार आली जयाचे हाता । ऐक त्याच्या चिन्हांची कथा । आणि पवित्रता तयाची ॥ ३१५ ॥ माझे भक्तीसी जो लागला । तो तात्काळ पवित्र झाला । त्याणें त्रिलोक पुनीत केला । हे गर्जोनी बोलिला श्रीकृष्णू ॥

शक्तिपाताने भक्तीची तीव्रता उत्पन्न झाली की भक्ताची स्थिती कशी होते याचे वर्णन करताना श्री व्यासमहर्षी म्हणतात :

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च । विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ।

भक्ताची वाणी सद्गदीत होते. चित्त आर्द्र होते. तो वारंवार रडतो. एखाद्या वेळी हसतो. लज्जारहित होऊन मोठ्याने नाचतो व गातो. याप्रमाणे माझा भक्त सर्व भुवनाला पवित्र करतो. यावर श्री एकनाथ महाराजांनी फार सुंदर टीका केली आहे—

अंगी रोमांच रवरवित । स्वेदबिंदू डळमळित । चित्त चैतन्य द्रवत । तेणे सद्गदित पै वाचा ॥ ३१७ ॥ हर्ष वोसंडता पोटी । अर्धोन्मीलित होय दृष्टी । जीवशिवा पडली मिठी । ध्यानत्रिपुटी मावळली ॥ ३१८ ॥ नयनी अश्रूंचा पूर लोटी । उभंडू न संटेची पोटी । होत जीवभावाची तुटी । पडे सृष्टी मूर्च्छित ॥ ३१९ ॥ आक्रंदे थोर आक्रोशे । वारंवार रडता दिसे । रडण्यामाजी गदगदा हांसे । जेवी लागले पिसे बहुग्रहो ॥ ३२० ॥ रडणे हांसणे न सांडी । त्याहीमाजी नवल आवडी । अर्थावबोधें गाणे मांडी । निजात्मगोडीचेनि योगे ॥ ३२१ ॥ विसरोनि माझे तुझे । सांडोनिया लोकलाजे । हरिखे प्रेमाचेनि भोजे । तेणे नाचिजे निःशंक ॥ ३२२ ॥ गाणे नाचणे हासणे । तो रडे कासया कारणे । ऐक तीही लक्षणे । तुज कारणे सांगेन ॥३२३॥ माउली वेगळे बाळक पडे । जननी पाहता कोठे नातुडे । भेटता ओरडूनि रडे । मिठी पडे सप्रेम ॥३२४॥ जीव परमात्मा दोनी । चुकामुकी

झाली भ्रमपट्टनी। त्यासी एकाएकी होता मिळणी। रडे दीर्घस्वरे स्फुंदत। ॥ ३२५ ॥ बहुकाळ झाली भेटी। ऐक्यभावे पडली मिठी। तेणे उभंडू न संटे पोटी। रुदन उठी सप्रेम ॥ ३२६ ॥ देवो लाघवी नानापरी। मायावी नातुडे निर्धारी। तो सापडला घरीच्या घरी। तेणे विस्मय करी टवकारे ॥ ३२७ ॥ देव सदा जवळीच असे। त्यालागी जन कैसे पिसे। पाहो जाती देशोदेशे। ते देखोनि हासे गदगदा ॥ ३२८ ॥ देव सर्वांसी अजितू। तो म्या जिंकिला भगवंतू। धरोनि राखिला हृदयांतू। यालागी गात नाचतू उल्हासे ॥ ३२९ ॥ निवटूनि दुजयांची मातू। अंगे जीतिला भगवंतू। जगी झाला यशवंतू। यालागी गात नाचतू उल्हासे ॥ ३३० ॥ पाहता दुसरे न दिसे मज। यालागी धरू विसरला लाज। जगी झाला तो निर्लज्ज। निर्लज्जतेची बोज हे त्याची ॥३३१॥ यापरी भक्तियुक्त। होऊनिया माझे भक्त। निजानंदे गात नाचत। तेणे केले पुनीत लोकत्रय ॥३३२॥ जयाचे देखिता चरण। जडजीवा उद्धरण। ज्याचे लागता चरणरेण। पशुपाषाण उद्धरती ॥ ३३३ ॥ कीर्तनाचेनि महाघोके ॥ नाशिली जगाची सर्व दुःखे। अवघे विश्वचि हरिखे। भरिले महासुखे उचंबळत ॥ ३३४ ॥ दर्शने स्पर्शने वचने। एक तारिले कीर्तने। एक तारिले नामस्मरणे। यापरी जग उद्धरणे उद्धवा ॥ ३३५ ॥ अविद्या युक्त जीव मलिन। त्यासी शुद्ध व्हावया जाण। माझी भक्तीचि प्रमाण। हेचि श्रीकृष्ण स्वये सांगे ॥ ३३६ ॥

श्री चैतन्य महाप्रभूंना श्रीपुरीजी महाराजांकडून शक्तिपातयुक्त नामस्मरणाची दीक्षा मिळाल्याबरोबर त्यांच्या ठिकाणी प्रेमाचा उन्माद प्रकट झाला. प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी त्यांच्या उन्मेषाचे वर्णन केले आहे. ते लिहितात, "उनकी हृदय कंदारसे जो भक्ति-भावका भव्य स्रोत उदित हो गया, वह फिर सदा उत्तरोत्तर बढाता ही गया। उनकी दशा भी विचित्रसी हुई। वे भोजन करते-करते सहसा बीचमें ही उठकर रुदन करने लगते थे। रास्ता चलते चलते पागलोंकी भाँती नृत्य करते थे। शय्यापर लेटे लेटे सहसा उठकर बैठ जाते थे और "हा कृष्ण! हा कृष्ण!" कहकर जोरसे चिल्लाते थे। कभी कभी लोगोंसे बाते करते करते बीचमेंही जोरोंसे ठहाका मारकर हँसते थे। लम्बी लम्बी साँसे लेते रहते थे। कभी कभी अधीर होकर अत्यंत विरहीकी भाँति हिचकियाँ भरते रहते थे। उनके नेत्रोंसे इतना जल निकलता था कि संपूर्ण वस्त्र गीले हो जाते थे।" शक्तिपातामुळे भक्ताची अशी स्थिती अगदी स्वाभाविकपणे होते असे श्रीमद् भागवतात व्यासांनीही सांगितले आहे.

यदाग्रहग्रस्त इव क्वचिद्धसत्याक्रन्दते ध्यायति वंदते जनम् ।
मुहुः श्वसन् वक्ति हरे जगत्पते नारायणेत्यात्मगतिर्गतत्रपः ।।

प्रेमी भक्त प्रेमाच्या भावावेशामध्ये पिशाचाने पकडलेल्या माणसाप्रमाणे कधी कधी खळखळून हसू लागतो. कधी जोराने ओरडू लागतो. कधी भगवंताच्या मंजुळ मूर्तीचे ध्यान करतो. कधी लोकांचे पाय पकडून त्यांना वंदन करतो. कधी पुन्हःपुन्हा दीर्घ श्वासोच्छ्वास करू लागतो. काही वेळेस तर लोकलज्जेची थोडी सुद्धा पर्वा न करता जोरजोराने हे हरे ! हे जगत्पते ! हे नारायण ! याप्रमाणे उच्चारण करीत असतो. यावरून हे स्पष्ट दिसते की,शक्तिपातयोगाची अमूर्त प्रक्रिया भक्तियोगाच्या रूपाने साकार झालेली दिसते. भक्तियोग हे शक्तिपातयोगाचे मूर्त व दृश्य स्वरूप आहे. अष्टसात्त्विक भावांची प्राप्ती शक्तिपातामुळे फार त्वरित घडून येते हे आपण वर पाहिलेच. ही प्रक्रिया कशी घडते याचे वर्णन भक्तिरसामृतसिंधूत पुढीलप्रमाणे केले आहे –

चत्वारि क्ष्मादि भूतानि प्राणो जात्ववलंबते । कदाचित् स्वप्रधानः संदेहे चरति सर्वतः ।। स्तंभंभूमिस्थितः प्राणस्तनोत्यश्रुं जलाश्रयः । तेजस्थः स्वेदवैवर्ण्ये प्रलयं वियदाश्रितः ।। स्वस्थ एव क्रमान्मंदमध्यतीव्रत्व भेदभाक् । रोमांचकंपवैस्वर्यान्यत्र त्रीणि तनोत्यसौ ।।

शक्तिपातामुळे भक्तीचा उद्रेक होऊन प्राणाच्या गतीत बदल होतो. त्यामुळे प्राण देहाला विशेष रीतीने क्षुब्ध करतो. प्राण कधी पृथ्वीतत्त्व, कधी जलतत्त्व, कधी तेजतत्त्व व कधी आकाशतत्त्व यापैकी एका तत्त्वाचा अवलंब करून शरीरात वावरू लागतो. काही वेळेस तो स्वप्रधान होऊन देहात सर्वत्र फिरू लागतो. जेव्हा प्राण भूमितत्त्वाचे अवलंबन करतो तेव्हा शरीर खांबासारखे निश्चल होऊन साधकाला स्तंभभाव प्राप्त होतो. जलतत्त्वाशी प्राण निगडित झाला की अश्रुपात होऊ लागतो. तेजतत्त्वाशी प्राण संबद्ध झाला की घाम येऊ लागतो व शरीराचा रंग पालटून जातो. यालाच वैवर्ण्य किंवा वर्ण विकृती म्हणतात. जेव्हा प्राणाचा आकाशतत्त्वाशी संयोग होतो तेव्हा प्रलय म्हणजे भावसमाधी, मूर्च्छा, तंद्रा अगर निद्रा हे भाव प्रकट होतात. जेव्हा प्राण स्वस्थ होतो म्हणजे आपल्या वायुरूपतत्त्वामध्ये राहू लागतो तेव्हा मंद, मध्य किंवा तीव्रतेने रोमांच, कंप व स्वरविक्रिया हे तीन भाव प्रकट होतात.

आपल्या देहामध्ये मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत व विशुद्ध ही पाच चक्रे पृथ्वी, जल, तेज, वायू व आकाश या पाच

महाभूतांची स्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. मूलाधारात पृथ्वीतत्त्व, स्वाधिष्ठानात जलतत्त्व, मणिपुरात तेजतत्त्व, अनाहतामध्ये वायुतत्त्व व विशुद्ध चक्रामध्ये आकाशतत्त्व असते. वर जे प्राणाच्या गतीसंबंधी सांगितले त्याचा अर्थ असा आहे की, प्राण ज्या ज्या वेळी ज्या ज्या चक्रांचा आश्रय करतो त्या त्या वेळी तो ती ती भूततत्त्वांची लक्षणे प्रगट करीत असतो.

खरी भगवद्भक्ती प्राप्त होण्यासाठी शक्तिपाताची नितांत आवश्यकता असते.हा शक्तिपात महापुरुषांकडून म्हणजेच सद्गुरूंकडून होत असतो. महर्षी नारदांनी आपल्या भक्तिसूत्रात पुढील दोन सूत्रात महापुरुषांकडून होणाऱ्या शक्तिपाताचे अलौकिकत्व प्रकट केले आहे. पहिले सूत्र असे आहे : " **मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा** ॥ ३८ ॥ शक्तिपानाने भक्तियोग कसा साधतो हे सांगताना भगवंताच्या अखंड भजनाने शक्ती जागृत होऊन ते भक्तिसाधन फलद्रूप होते असे प्रथम नारदांनी सांगितले आहे. त्यानंतर लोकांमध्ये भगवंताचे गुणश्रवण व कीर्तन केल्याने शक्ती जागृत होऊन भक्तीचे फल मिळते असे स्पष्ट केले आहे. परंतु या दोन्ही गोष्टींनी शक्ती जागृतीची प्रक्रिया केव्हा घडून येईल हे सांगता येत नसल्याने व त्यामध्ये उशीर लागत असल्याने महापुरुषांच्या कृपेला नारद महर्षींनी अग्रस्थान दिले आहे. त्यामुळे शक्तिपात मुख्यत्वेकरून संतमहात्म्यांच्या कृपेने अगर भगवंताच्या कृपालेशाने प्राप्त होऊन भक्तियोग साधतो असे त्यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे जो शक्तिपात होतो तो अलौकिक असतो. नारद महर्षी आपल्या पुढील सूत्रात म्हणतात : " **महत्संगस्तु दुर्लभो ऽगम्यो ऽमोघश्च** ॥ ३९ ॥ परंतु संतमहात्म्यांचा संग अत्यंत दुर्लभ आहे. कारण तो अगम्य म्हणजे सहजासहजी न कळणारा आहे. पण जर का तो लाभला तर तो अचूक फल देणारा आहे. याचा अर्थ असा आहे की, शक्तिपात करणारे महापुरुष हे अत्यंत दुर्लभ असतात. त्यामुळे त्यांची संगती व कृपा प्राप्त होणे हे त्याहून कठीण असते. असे असले तरी ते जेव्हा कृपा करून शक्तिपात करतात, तेव्हा आपल्याला कोणती गोष्ट मिळत आहे हे कळण्याची पात्रता लागते. शक्तिपात झाल्यावर नाना तऱ्हेच्या क्रिया होऊ लागतात व अनुभव येऊ लागतो. त्यावेळी ह्या क्रिया पैशाचिक कशावरून नसतील, सद्गुरूंनी संमोहन, मायाजाल किंवा जादूटोणा तर केला नसेल, ज्ञानेश्वरादी ब्रह्मनिष्ठांच्या दीक्षेहून ही दीक्षा निराळी आहे, अशी सहजासहजी कुंडलिनी शक्ती जागृत होणे शक्य नाही, इत्यादी नाना तऱ्हेचे विकल्प मनात येऊन त्याचे माहात्म्य कळेनासे होते. म्हणून ही कृपा

अगम्य आहे असे नारद म्हणतात. एकदा शक्तिपात झाला की तो अचूक फल देतो, कारण "**इयें साधनीं जें दृढ होती। ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती ॥**" असा निर्वाळा श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनी दिला आहे.

अशा प्रकारे महापुरुषांकडून शक्तिपात झाल्यावर जी दिव्य भक्ती साधकाचे ठिकाणी उत्पन्न होते त्याचे वर्णन नारद महर्षींनी पुढील सूत्रामध्ये केले आहे. "**सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा** ॥२॥ म्हणजे शक्तिपात झाल्यावर अंतरात्म्याचे ठिकाणी जी भक्ती उत्पन्न होते ती परमप्रेमाच्या स्वरूपाची असते. पूर्वजन्मीचे काही सुकृत असेल तरच माणसाला परमेश्वराच्या प्राप्तीची इच्छा होते. अशी इछा झाल्यावर सद्गुरू भेटतात व ते शक्तिपात करतात. त्यामुळे परमप्रेमस्वरूप पराभक्ती प्राप्त होते.

परमेश्वरप्राप्तीचा शेवटचा टप्पा गाठेपर्यंत सामान्य साधक जी भक्ती करतो तिला अपराभक्ती म्हणतात. या भक्तीत द्वैत असल्याने अनन्यता व सर्वात्मभाव प्राप्त होत नाही आणि अंतरातून दिव्य प्रेमही उत्पन्न होत नाही. मात्र परमेश्वराचा साक्षात्कार झाल्यावर परमेश्वराशी एकरूप होऊन आनंदमय अवस्थेत ठेवणारी जी भक्ती होते ती पराभक्ती होय. या अवस्थेत भक्ती करावी लागत नाही. ती आपोआप होते. स्वस्वरूपानुसंधानात लाभणारे दिव्य प्रेम व अलौकिक आनंद हा आतून उत्पन्न होतो. हेच पराभक्तीचे खरे स्वरूप आहे. हीच परम-प्रेमरूपा भक्ती होय. शक्तिपात झाल्यावर ही अवस्था आपोआप प्राप्त होते. जोपर्यंत शक्तिपात होत नाही, कुंडलिनी शक्ती जागृत होत नाही व अनादी निद्रेचा भंग होत नाही तोपर्यंत ही परमप्रेमस्वरूप भक्ती उत्पन्न होत नाही हे नितांत सत्य आहे.

महर्षी नारदांनी "**अमृतस्वरूपाच**" ॥ ३ ॥ व "**अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम्** ॥ ५१ ॥" म्हणजे ही पराभक्ती अमृतस्वरूप अर्थात मोक्ष स्वरूप व भगवंताच्या प्रेमाचे स्वरूप, अनिर्वचनीय म्हणजे शब्दातीत आहे, असे सांगून पुढील सूत्रात या भक्तीचा साधकावर कोणता परिणाम दिसून येतो हे स्पष्ट केले आहे. "**यल्लब्ध्वा पुनाम् सिद्धो भवति, अमृतो भवति, तृप्तो भवति**" ॥ ४ ॥ "**यत्प्राप्य न किंचिद्वांच्छति, न शोचति, न द्वेष्टि, न रमते नोत्साहि भवति**" ॥ ५ ॥ "**यज्ज्ञात्वा मत्तो भवति, स्तब्धो भवति, आत्मारामो भवति**" ॥ ६ ॥ महात्म्याची कृपा झाली व शक्तिसंक्रमण घडले की ती पराभक्ती अंतरात्म्याचे ठिकाणी भगवंता-बद्दलच्या परमप्रेमाच्या रूपाने साकार होते. निर्हेतुक व निरतिशय प्रेम अशा भक्तीत अंतर्भूत असते. या भक्तीत निष्काम व निरंतर अशा

प्रेमाचा प्रवाहच अंत:करणात उत्पन्न होतो. अशी ही भक्ती ज्याला प्राप्त होते तो मानव पूर्णतेला पोहोचतो. अमर होतो. सर्वार्थाने तृप्त होतो. या भक्तीचा उद्रेक एकदा का आतून झाला की साधकभक्त कशाचीही किंचित्सुद्धा इच्छा करीत नाही. कोणत्याही गोष्टीबद्दल तो शोक करीत नाही. कोणाचा द्वेष करीत नाही. कोणत्याही इतर गोष्टीत रममाण होणे त्याला आवडत नाही. त्याला कोणत्याही कर्माचा उत्साह नसतो. ज्याला अशा अमृतासारख्या दिव्य भक्तीचे पान अंतरातून घडते तो त्या अनुभवाने वेडा होऊन जातो. भक्तिप्रेमाने धुंद व मस्त होतो. शांत होतो व आत्मस्वरूपात रममाण होऊन अगदी आत्मरूप होतो. असे हे शक्तिपातयोगाचे वैभव आहे. शक्तिपातयोगाच्या अमोलिक हिऱ्याचे कर्म, लय, हठ, राज, तारक, यंत्र, भक्ती, ज्ञान, सूक्ष्म, असंप्रज्ञात, अखंड, अस्पर्श, हे सर्व योग भिन्न भिन्न पैलू आहेत. त्यातील भक्तियोग हा सर्वात अमोलिक, सर्वांगसुंदर व अलौकिक असा पैलू आहे समर्थ गुरूकडून शक्तिपात झाला की पराभक्ती प्राप्त होऊन हा पैलू सर्वार्थाने झळकू लागतो.

हा भक्तियोग नामस्मरणाने सहजसाध्य आहे असे सांगून संतांनी तो सोपा व सहजसुलभ केला आहे. परंतु गुरुकृपेशिवाय म्हणजे शक्ति-संक्रमण झाल्याशिवाय खरी भक्ती उदय पावत नाही. कारण पराभक्ती किंवा निर्गुण भक्तीत गती होण्यास त्याशिवाय दुसरा मार्गच उपलब्ध नाही. श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी शक्तिपाताची अपरिहार्यता पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. समर्थ म्हणतात–

जेणे बहुतास घडे भक्ती । ते हे रोकडी प्रबोधशक्ती ॥ १२, १०, ३७ ॥

प्रबोधशक्ती म्हणजे प्रकर्षत्वाने बोध करण्याची शक्ती. अशा प्रकारे शक्तीचा समावेश शिष्यात केल्याशिवाय खरी भक्ती उत्पन्न होऊ शकत नाही. अनेकांना जर भक्तियोगसंपन्न करावयाचे असेल, त्यांना रोकडा साक्षात्कार घडवावयाचा असेल व बहुतांचे मनोगत हातात घेतले पाहिजे असे वाटत असेल तर सद्गुरूंच्या ठिकाणी शक्तिपात करण्याचे सामर्थ्य अत्यंत आवश्यक आहे असे समर्थ अगदी निक्षून सांगतात. शक्ति-पाताशिवाय भक्ती संपन्न होऊ शकत नाही हा सिद्धांत समर्थांनी अगदी स्पष्टपणे मांडला आहे. प्रबोधशक्तीमुळे निर्गुणभक्ती व आत्मनिवेदन भक्ती कशी साधते हे सांगताना समर्थ म्हणतात–

निर्गुणी अनन्य असता । तेणे होय सायुज्यता । सायुज्यता म्हणजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ॥ ४.१०.३० ॥ सगुण भक्ती ते चळे । निर्गुण

भक्ती ते न चळे । हे अवघे प्रांजळ कळे । सद्‌गुरु केलिया ॥ ४.१०.३१.॥
जाणता जाणता जाणीव जाते । आपली वृत्ती तद्रूप होते । आत्मनिवेदन
भक्ति ते । ऐसी आहे ॥ १३.२.२८ ॥

अशी भक्ती प्राप्त झाली की साधक साम्यावस्थेला प्राप्त होतो. या अद्वितीय अवस्थेचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अपूर्व वर्णन केले आहे. ते म्हणतात, "माझी जी सहजस्थिती तिलाच भक्ती असे म्हणतात. त्याचप्रमाणे विश्वाचा उदय व लोप ज्या प्रकाशाने होतो त्या परमेश्वराच्या सहज प्रकाशालाच उत्तम भक्ती असे म्हणतात. ही भक्ती एकदा का उसळून आली की ती अज्ञान, भेद, द्वैत व इतर सर्व किडाळ नाहीसे करते. अशा प्रकारे या भक्तीचे सामर्थ्य असल्याने हा भक्तियोग दृश्यमार्गाहून भिन्न आहे. ज्ञानी लोक या भक्तीला स्वतःची ज्ञानकला मानतात. शैवलोक हिला शक्ती म्हणतात. आम्ही आपली परमभक्ती असे म्हणतो."

"या भक्तियोगामध्ये साधक माझे स्वरूप होऊन कोणतीही क्रिया न करता भजन करतो. मौनानेच माझे स्तवन करतो. त्याच्या सर्व क्रिया आत्मस्वरूप झाल्यामुळे त्या सर्व क्रियांना न करणेच म्हणावे लागेल. हीच खरी माझी पूजा होय. म्हणून तो ज्या ज्या यथासांग क्रिया करतो त्या न केल्याप्रमाणे होऊन तीच माझी महापूजा होते."

ही भक्ती अर्जुनाला प्राप्त व्हावी म्हणूनच श्रीकृष्णांनी अर्जुनाला आलिंगन दिले आणि शक्तिपात करून त्याच्या ठिकाणी ती भक्ती संक्रमित केली.

सारांश, खरा भक्तियोग साधण्यासाठी कुंडलिनी शक्ती जागृत होणे नितांत आवश्यक आहे हे सांगताना म. म. श्री. गोपीनाथ कविराज आपल्या "कुंडलिनी तत्त्व" या लेखात म्हणतात की, "मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ प्रभृती हठयोग प्रवर्तक नाथ आचार्यगण व आगमांच्या जाणकारांचे असे मत आहे की, मूलाधारातील प्रसुप्त कुंडलिनी शक्तीला जागृत केल्याशिवाय कर्म, ज्ञान किंवा भक्ती आदी कोणतेही साधन मुक्ती किंवा अनर्थ निवृत्तीच्या उपायाच्या दृष्टीने उपयोगी ठरत नाही. कर्म, भक्ती किंवा ज्ञान यांपैकी जी कोणती गोष्ट शक्ती जागृतीला साहाय्यता करते तीच यथार्थ कर्म, ज्ञान किंवा भक्ती म्हणजेच कर्मयोग, ज्ञानयोग किंवा भक्तियोग या पदाला सार्थ ठरते. जी गोष्ट शक्तीच्या जागरणाला साहाय्यक होत नाही ती व्यर्थ प्रयासाला कारण होते. कारण त्यापासून कधीही सिद्धी–मोक्ष–प्राप्त होत नाही. कुंडलिनीची निद्रा भंग झाल्याशिवाय आत्मा किंवा परमात्म्यामध्ये जीव मिळून जाऊ शकत नाही."

"कुंडलिनीचे एक नाव आधारशक्ती असे आहे. ती सर्व पदार्थांचा आश्रय असून सर्व पदार्थांच्या मूळ सत्तारूपाने विद्यमान राहाते. ती चैतन्यमयी झाल्याबरोबर निराधार म्हणजे निरालंब होऊन शुद्ध चित्स्वरूपात स्थिर होते. ज्यावेळी ती आधाररहित होते त्यावेळी संसारातील सर्व वस्तू निराधार होतात. त्याचप्रमाणे ती ज्यावेळी जागृत होऊन चिन्मयी बनते तेव्हा सर्व विश्व चैतन्यरूप धारण करते. कुंडलिनीचे जागरण किंवा सर्वत्र ब्रह्मसाक्षात्कार अगर चैतन्यमयतेचा अनुभव घडवून आणणारी "**सर्वं खल्विदं ब्रह्माची**" श्रुतिनिष्ठ साधना या दोन्ही गोष्टी निश्चितपणे एकाच स्वरूपाच्या आहेत. हे जागरण क्रमाक्रमाने होते. म्हणून कर्म, ज्ञान, भक्ती इत्यादी कुंडलिनी जागृतीच्या भिन्न क्रमिक अवस्था आहेत. ज्यावेळी शक्ती चे जागरण पूर्ण होते तेव्हा निद्रा लेशमात्र सुद्धा शिल्लक राहात नाही. त्यावेळी परिपूर्ण अद्वैतसिद्धी म्हणजेच आत्मनिवेदन भक्ती होते.

क्रियायोग :–

शक्तिपातयोगाला क्रियायोगही म्हणतात. क्रिया म्हणजे शक्तीची गती. या गतीमुळेच विश्वाची उभारणी व संहारणी होत असते. क्रियाशक्ती जेव्हा बहिर्मुख होऊन कार्य करते तेव्हा पिंडब्रह्मांडाची रचना होते. तिची गती जेव्हा अंतर्मुखी होते, तेव्हा पिंडब्रह्मांडाची निवृत्ती होते. क्रियाशक्ती जेव्हा बहिर्मुख होते तेव्हा भेदरूपी सृष्टी निर्माण होऊन स्वस्वरूपावर आवरण येते. यासाठी शक्तीची अंतर्मुख गती उत्पन्न होणे आवश्यक असते कारण अशी अंतर्मुख गती उत्पन्न झाल्याशिवाय अज्ञान व विक्षेप यांची निवृत्ती होऊ शकत नाही. हे कार्य घडून यावे यासाठीच क्रियाशक्तीचा उन्मेष व विकास होणे आवश्यक असते. या क्रियाशक्तीलाच गुरुशक्ती किंवा चित्शक्ती असे म्हटले जाते. जेव्हा शक्तिपात होऊन ही चित् शक्ती जागृत होते तेव्हा अंतःशक्तीच्या क्रियांचा सूत्रपात होतो. तेव्हा ही शक्ती निरंतर कार्यरत होते. तिचा क्रमिक विकास सुरू झाला की साधकाला हळू हळू अंतर्मुख गती प्राप्त होत जाते. मन, वायू, बुद्धी, बिंदू इत्यादी सर्वांवर या गतीचा परिणाम होतो. शक्ती शरीरातील प्रत्येक कणातून प्रवाहित होऊ लागते. त्यामुळे शक्तीचे कार्य सुरू होते. जडता कमी होते व ही शक्ती क्रमाक्रमाने मनुष्याचे चैतन्यस्वरूप प्रगट करीत जाते. महामायाशक्तीकडून होणारी क्रियारूप साधना म्हणजे गुरुशक्तीचा क्रमाक्रमाने होणारा विकास आहे.

यादृष्टीने "अद्वयतत्त्व के प्रकार–भेद" या निबंधात श्रीगोपीनाथ

कविराज यांनी फार सुंदर विवेचन केले आहे. ते म्हणतात, "क्रियाशक्तीमुळे म्हणजेच क्रियेची गती अंतर्मुखी झाली की तिचा शरीरात संचार होतो. जोपर्यंत शक्तीची अंतर्मुखी गती उत्पन्न होत नाही तोपर्यंत शक्तीच्या बाह्यगतीमुळे जो देह निर्माण झालेला असतो त्यात तिचा प्रवेश होऊ शकत नाही. भेदज्ञान हे अचित्शक्तीचे कार्य आहे हे प्रथमच सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे अभेद-दर्शन हे चित्शक्तीचे कार्य आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. यासाठी क्रियारूपाने प्रकट होणारी गुरुशक्ती शिष्याला अभेद–ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून सतत कार्य करीत असते. हे अभेदज्ञान पुष्ट होता होता क्रमाक्रमाने सर्व देहाला व्यापून टाकते. या प्रक्रियेलाच दुसऱ्या शब्दात देहभेद असे नाव दिले जाते. मनाची, प्राणाची व बिंदूची जसजशी अंतर्मुखी गती होत जाते तसतसा अभेदज्ञानाचा क्रमिक विकास होत जातो. या ज्ञानाचा पूर्ण विकास झाल्यावर म्हणजेच क्रियाशक्तीचे कार्य पूर्ण झाल्यावर आत्मा परमात्मास्वरूप होतो. साधकाचा व्यष्टिदेह समष्टिदेहरूपी विश्वरूपात परिणत होतो. यालाच योगावस्था म्हणतात. क्रियाशक्तीच्या उन्मेशाने म्हणजेच कुंडलिनीच्या जागरणाने या योगावस्थेची सूचना मिळते. त्याचप्रमाणे क्रियाशक्तीचा विकास म्हणजेच कुंडलिनी शक्तीचा पूर्ण विकास होय. आत्म्याच्या ठिकाणी जेव्हा क्रियाशक्तीचा पूर्ण विकास होतो तेव्हा आत्म्याला परमात्मस्वरूप म्हटले जाते. क्रियाशक्ती ही वस्तुतः चैतन्यशक्तीच आहे. कारण या क्रियाशक्तीपासून अगदी प्रथम ज्ञानशक्ती उत्पन्न होत असते. अशी ज्ञानशक्ती जर पहिल्या प्रथम उत्पन्न झाली नाही तर क्रियाशक्तीचा उन्मेषच संभवत नाही. ज्ञानशक्तीच्या विकासाने द्रष्टा किंवा साक्षीभाव उत्पन्न होतो. या साक्षीभावाच्या जोडीने क्रियाशक्तीचा विकास झाला नाही तर आत्मा क्रमशः परमात्म्याकडे सरकू शकत नाही. अशी स्थिती प्राप्त झाली नाही तर नुसती गती म्हणजे संसाराचेच दुसरे नाव ठरेल. म्हणजे आत्म्याचे स्वरूप आवरणयुक्त राहून त्याच्या आश्रयाने जर गती उत्पन्न झाली तर तिला भेदज्ञान असेच नाव द्यावे लागेल. जेव्हा स्वरूपावरील आवरण दूर होते त्यावेळी अनावृत आत्म्याच्या आधाराने जी गती उत्पन्न होते तीच अभेद ज्ञानाची क्रीडा असते. तिलाच चित्शक्तीचा विलास म्हणतात."

गुरुशक्तीरूपी क्रियाशक्ती क्रमशः देहभेद करीत राहाते. योगदीक्षेच्यावेळी शिष्य गुरूकडून चिन्मयता प्राप्त करून घेत असतो. यालाच जागृत कुंडलिनी म्हटले जाते. प्रत्येक साधकाची पूर्वजन्माची जितकी तयारी असेल, त्याच्या देहाची जशी स्थिती असेल व मनाची जशी धारणा

असेल त्या मानाने क्रियाशक्तीचे प्रयोजन निश्चित होत जाऊन विकास होतो. यामुळे देहात काहीतरी बदल होत राहातो. अयोगी साधक सुद्धा दीक्षेच्या फलामुळे चैतन्यशक्ती प्राप्त करून घेऊ शकतो. मात्र तिचा विकास होणे आवश्यक असते. असा विकास होत राहिला म्हणजे हळूहळू अज्ञान जाऊन ज्ञान प्रकट होऊ लागते. कुंडलिनीच्या जागृतीमुळे हा विकास व ज्ञानप्राप्ती आपोआप घडून येते.

साधना सुरू झाली की साधकाचा विकास सुरू होतो. या विकासात नाना प्रकारच्या वासना, पूर्वजन्मीचे संस्कार, भोगासक्ती व जीवनासक्ती यांच्यामुळे मायेचे जाळे रचले जाते. हे मायेचे जाळे तुटणे मोठे दुष्कर असते. अशावेळी आपणास मिळालेल्या साधनाच्या निर्दिष्ट मार्गाचा साधकाने अवलंब केला तर या जाळ्याचा भेद अवश्य होतो. इतर कशानेही ही माया दूर होणे शक्य नसते. यासाठी गुरुप्रदत्त शक्तीवर पूर्ण विश्वस ठेवून तिचा विकास होण्यास साधकाने नियमित साधन करून वाव दिला पाहिजे. असे झाले म्हणजे गुरुशक्तीच्या जोरावर माया-जालाचा भेद अवश्य होतो. गुरुशक्तीचे मुख्य कार्यच जीवाला मायेच्या जाळ्यातून सोडवून ज्ञानप्राप्ती करून देणे हे असल्यामुळे साधक शक्ती-वर पूर्ण निर्भर राहिला तर त्याला आणखी दुसरा कोणताही स्वप्रयत्न करण्याची आवश्यकता उरत नाही.

क्रियाशक्तीचा विकास व परमात्मभावाची अभिव्यक्ती या दोन्ही गोष्टी एकच आहेत. क्रियाशक्तीचा पूर्ण विकास झाल्याशिवाय हृदयात मन स्थिर होत नाही. क्रियाशक्तीच्या उन्मेशाबरोबर जी अंतर्मुखी गती सुरू होते ती क्रियाशक्तीचा पूर्ण विकास होऊन परमात्मरूपाने हृदयात स्थिर झाल्यावर समाप्त होते. याचे स्पष्टीकरण करताना म. म. श्रीगोपीनाथ कविराज म्हणतात. "वास्तविकपणे हृदयामध्ये शाश्वत स्थिती मूलतःच असते. परंतु जीवाला बहिर्मुखता प्राप्त झाल्याने तिचे भान होत नाही. योगी आपल्या अंतरंगातील चित्‌शक्तीच्या साहाय्याने मायेला काबूत आणतो. ज्यावेळी माया पूर्णपणे ताब्यात येते त्यावेळी योगी-साधक-परमात्मरूपात स्थिर राहातो. क्रियाशक्तीच्या पूर्ण विकासा-शिवाय ही अवस्था साधकाला प्राप्त होत नाही. यालाच व्याप्तीची अवस्था म्हणतात. आत्मा जेव्हा हृदयात प्रवेश करतो तेव्हा त्याला साक्षीभाव प्राप्त होतो. त्यावेळी साधक समस्त जगत अर्थात विश्व हे दृश्यरूप आहे हे एकावेळी पाहू शकतो. यालाच सर्वज्ञत्व म्हणतात. सर्व जगताविषयीच्या अपरोक्ष ज्ञानाचा हा विकास आहे. परंतु हे ज्ञान

अपरोक्ष असून सुद्धा पूर्ण असत नाही कारण जगत हे आभास आहे हे कळून सुद्धा त्याची अनुभूती येत नाही. अनुभूतीची प्रत्यक्ष प्राप्ती केवळ एकमात्र क्रियायोगानेच होते. क्रियायोगाची प्राप्ती झाली नाही तर केवळ ज्ञानामुळे शाश्वत कैवल्यप्राप्ती कधीही मिळत नाही. ज्ञानामुळे जे तत्त्व सूक्ष्मरूपाने दिसते ते क्रियायोगाच्या द्वारे साधकाच्या बरोबर अभिन्नरूपाने वास करू लागते. क्रिया पूर्ण झाली की सर्व व्यवधाने पूर्ण होतात. त्यावेळी एकही वस्तू अप्राप्य आहे असे वाटत नाही. यालाच आत्म्याच्या व्याप्तीचे विभुत्व म्हणतात. जेव्हा क्रियाशक्तीचे कार्य पूर्ण होते तेव्हा आत्मा परमात्मस्वरूपात सिद्ध होतो. त्यावेळी तो सर्व पदार्थांचा केवळ द्रष्टाच राहातो असे नाही तर सर्व पदार्थरूप होऊन त्याला अभेदभाव प्राप्त होतो ''

ही शक्तिपातयोगाची उपासना हृदयामध्ये परमात्म्याचा साक्षात्कार घडविणारी एकमात्र व अद्वितीय उपासना आहे. कारण एकदा का गुरुकृपेने क्रियाशक्तीचा उन्मेश झाला की तिचा क्रमशः जसजसा विकास होत जातो तसतसा साधक चित्कलासंपन्न बनत जातो. त्यावेळी परमेश्वराबद्दल अधिकाधिक प्रेम वाटू लागून परमात्माच एक उपास्य आहे याची दृढतर जाणीव होऊन उपासना गाढ बनत जाते. अशावेळी चित्कलेच्या वृद्धीच्या प्रभावाने परमात्मा आपल्या अधिक जवळ आहे याची साधकाला जाणीव होते.

सारांश म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी म्हटल्याप्रमाणे '' उपासनेची खरी सुरवात क्रियाशक्तीच्या उन्मेषानेच होते आणि उपासनेची खरी समाप्ती क्रियाशक्तीच्या पूर्ण विकासाने होते. उपासनेलाच योग म्हणतात. दोन वस्तू समभावसंपन्न होणे हे योगशब्दाने सूचित होते. या दोन वस्तूमध्ये एक मुक्त पुरुष आहे. त्याच्या ठिकाणीच प्रथम क्रियाशक्तीची जागृती होते. दुसरी वस्तू परम पुरुष आहे. त्याच्या ठिकाणी क्रियाशक्तीचा विकास समाप्त होतो. याप्रकारे जीवात्म्याचे परमात्म्याशी जे मिलन होते त्याला योग म्हणतात. जितक्या प्रमाणात क्रियाशक्तीचा विकास होईल तितक्या प्रमाणात योग स्थापित होत असतो. योगावस्थेत जीवात्म्यामध्ये क्रमशः परमात्मभाव जागृत होऊ लागतो. जीवात्मा जेव्हा स्वतःला परमात्मस्वरूप प्राप्त करून घेतो तेव्हा योग पूर्ण होतो. परमात्म्याशी सायुज्य पावणे यालाच पूर्ण योग म्हणतात.''

श्रीगुरुदत्तयोग :–

श्रीगुरुदत्तयोग हे शक्तिपातयोगाचे एक अर्थपूर्ण नाव आहे. श्रीगुरूने दिलेला योग म्हणजे श्रीगुरुदत्तयोग होय. या नावातच श्रीगुरूंचा व त्यांच्याकडून दान होणाऱ्या योगाचा महिमा अनुस्यूत आहे. याचा अर्थच असा आहे की गुरुकडून शक्तिसंक्रमण होऊन योग म्हणजेच साधन मिळाल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. नुसत्या स्वबलाने व स्वप्रयत्नाने काहीही साधणे शक्य नाही. तत्त्वप्राप्तीसाठी सद्गुरू शिवाय इतर सर्व साधने व्यर्थ होत हे सांगताना मनाच्या श्लोकात श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज म्हणतात.

नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें । समाधान कांही नव्हे तानमानें । नव्हे योग योगें नव्हे भोग त्यागें । समाधान ते सज्जनाचेनि योगें ॥१५५॥

सद्गुरूंच्या कृपेशिवाय इतर साधने अगदी व्यर्थ होतात, कारण त्याशिवाय आपल्याला आपला लाभ घडून येणारे व आदीअंती स्वतः सिद्ध स्वरूप असलेले परम दुर्लभ ज्ञान होत नाही. बंधनाची भ्रांतीही फिटत नाही. असे हे श्रीगुरुदत्तयोगाच्या साधनामुळे ऋषीमुनींपासून सदाशिवांपर्यंत ज्ञान कसे झाले हे सांगताना समर्थ म्हणतात–

व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानी । जनकादि महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ ५.५.२३ ॥ वामदेवादिक योगीश्वर । वाल्मीक अत्री ऋषीश्वर । शौनकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥२४॥ सनकादिक मुख्य करूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी । आणि बोलता वचनी । अगाध असती ॥ २५ ॥ सिद्ध मुनि महानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव । जेणे सुखे महादेव । डुल्लत सदा ॥ २६ ॥

श्रीगुरुदत्तयोगाने ज्ञान प्राप्त झाल्यावर साक्षात् श्रीमहादेवही डोलतात हा या मार्गाचा अद्भुत महिमा आहे यात शंकाच नाही. आपल्याला जसा आनंदाचा डोल आला तसा सर्वांना प्राप्त व्हावा म्हणून त्यांनी या सिद्धयोगाचा सूत्रपातही केला. या सिद्धयोगामुळेच आपले समाधान झाले असून इतर सर्व साधने गुरुकृपाप्राप्त योगापुढे व्यर्थ आहेत हे सांगताना समर्थ म्हणतात–

साधुसंत आणि सज्जन । भूत भविष्य वर्तमान । सर्वत्रांचे गुह्यज्ञान । ते सांगिजेल आतां ॥ २८ ॥ तीर्थे व्रते तपें दानें । जे न जोडे धूम्रपानें । पंचाग्नि गोरांजनें । जे प्राप्त नव्हे ॥२९॥ सकळ साधनांचे फळ । ज्ञानाची शीगच केवळ । जेणे संशयाचे मूळ । निःशेष तुटें ॥३०॥ छप्पन्न भाषा तितुके ग्रंथ । आदिकरूनि वेदांत ॥ या इतुक्याचा गहनार्थ । एकचि असे ॥३१॥ जे नेणवे पुराणी । जेणें

शिणल्या वेदवाणी । तेचि आता येच क्षणी । बोधीत गुरुकृपे ॥३२॥ पाहिले नसता संस्कृती । रीग नाही महाराष्ट्र ग्रंथी । हृदयी वसल्या कृपामूर्ती । सद्गुरु स्वामी ॥ ३३ ॥ आता नलगें संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदयी वसे ॥ ३४ ॥ न करिता वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास । प्रयत्नेविण सुरस । सद्गुरू कृपा ॥ ३५ ॥ अरे गहनाचेंहि गहन । तें तू जाण सद्गुरुवचन । सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥३६॥ सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत । सद्गुरुवचन तो धादांत । सप्रचीत आता ॥३७॥

इतके सांगून झाल्यावर समर्थांनी शक्तिपातयोगाची प्रक्रिया आत्मनिवेदन होऊन कशी घडते व त्यामुळे ज्ञानवन्ही प्रकट होऊन दृश्याचा केर कसा नाहीसा होतो हे सांगितले आहे,

ऐक शिष्या येथींचें वर्म । स्वयें तूंचि आहेस ब्रह्म । ये विषयीं संदेह भ्रम । धरूच नको ॥ ५-६-४५ ॥ नवविध प्रकारें भजन । त्यांत मुख्य आत्मनिवेदन । ते समग्र प्रकारें कथन । कीजेल आता ॥ ४६ ॥

शिष्या तू स्वतः ब्रह्मच आहेस असे गुरूने म्हणता क्षणीच शक्तिपात होऊन आत्मनिवेदन घडून येते. यामुळे शिष्याला आत्मज्ञान होऊन सर्व बंधने दूर होतात. समर्थ म्हणतात,

निर्माण पंचभूतें इथें । कल्पांती नासती यथान्वयें । प्रकृति पुरुष जियें । तेहि ब्रह्म होती ॥ ४७ ॥ दृश्य पदार्थ आटता । आपणहि नुरे तत्त्वता । ऐक्यरूप ऐक्यता । मुळीच आहे ॥ ४८ ॥ सृष्टीची नाही वार्ता । तेथे मुळीच ऐक्यता । पिंड ब्रह्मांड पाहो जाता । दिसेल कोठे ॥ ४९ ॥ ज्ञानवन्ही प्रकटे । तेणे दृश्य केर आटे । तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचे ॥ ५० ॥ मिथ्यत्वे वृत्ति फिरे । तो दृश्य असतांच वोसरे । सहजचि येणें प्रकारें । झाले आत्मनिवेदन ॥ ५१ ॥

यानंतर समर्थांनी श्रीगुरुदत्तयोगाचा गाभा उकलून दाखवून आत्मज्ञानासाठी सद्गुरुभजनच केले पाहिजे असे सांगितले आहे.

असो सद्गुरुचे ठायी अनन्यता । तरी तुज कायसी रे चिंता । वेगळेपण अभक्ता । उरोचि नको ॥ ५२ ॥ आता हेचि दृढीकरण । व्हावया करी सद्गुरूभजन । सद्गुरूभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३ ॥ या नांव शिष्या आत्मज्ञान । येणे पाविजे समाधान । भवभयाचे बंधन । समूळ मिथ्या ॥ ५४ ॥

अशा प्रकारे गुरू शक्तिपातपूर्वक ज्ञान देऊन साधकाला आपण जडापासून निराळे आहोत याची प्रचीती देऊन दुःखमय कालचक्रातून

कायमचे मुक्त करतात. या शक्तिजागरणामुळेच साधक ऐश्वर्यसंपन्न होतो. त्याची सर्व संकुचितता दूर होते व सर्व त्रुटी नाहीशा होतात. कोणत्याही प्रकारचा अभाव शिल्लक राहात नाही. या दृष्टीनेच श्री. म. म. गोपीनाथ कविराज यांनी आपल्या भारतीय संस्कृती और साधना खंड दोन यातील "सहजयान और सिध्दमार्ग" या लेखात म्हटले आहे की,

"योगाशिवाय श्रेष्ठ अवस्था प्राप्त होणे कधीही शक्य नाही. आदिनाथांनी म्हटले आहे की– "**योगमार्गात् परो मार्गो नास्ति नास्ति श्रुतौ स्मृतौ**" विवेकमार्तंड ग्रंथातसुध्दा शब्दात बदल करून हाच भाव व्यक्त केला आहे. "**योगशास्त्रं पठेनित्यं किमन्यैः शास्त्रविस्तरैः**" सर्व साधारण सटरफटर गुरूच्या मुखातून बाहेर पडणारा उपदेश किंवा शास्त्रचर्चा हे केवळ नाना तऱ्हेचे विकल्प उत्पन्न करणारे एक जाळेच आहे असे म्हटले पाहिजे. कारण अशा प्रकारचा उपदेश किंवा चर्चा जीवाला लेशमात्र सुध्दा बंधनापासून मुक्त करू शकत नाही अगर त्यादृष्टीने काही साहाय्यही करू शकत नाही. निर्विकल्प अशा परमपदापर्यंत जाऊन पोहोचावयाचे असेल तर इतर अनेक विकल्पाप्रमाणेच शास्त्राध्ययन-रूपी विकल्पाचाही पूर्णपणे त्याग करणे आवश्यक ठरते. केवळ बाह्य इंद्रियांनाच जाणवतील असे शब्द ऐकून कोणीही मनुष्य इंद्रियातीत अशा निष्कंप किंवा चिन्मय स्वरूपात कधीही स्थिर होऊ शकत नाही. जीवनातील जो वेळ शास्त्राध्ययन किंवा निरनिराळे विकल्प ज्यामुळे उत्पन्न होतील अशा बडबडण्यामध्ये खर्च केला जातो तो अक्षरशः वाया जातो. जीव विकल्पामध्ये पडल्याने आपले नित्यसिद्धरूप विसरून गेला आहे. अविद्येच्या प्रभावामुळे असत्याला सत्य मानून तो तृषित हृदयाने वाळवंटात भटकणाऱ्या वाटसरूप्रमाणे मृगजळाच्यामागे धावत जातो. सिद्धगणांच्या म्हणण्याप्रमाणे विकल्पाची शांती व अगदी अनादी कालापासून वाहाणारा भ्रांतीचा प्रवाह थांबल्याशिवाय कोणत्याही उपयाने जीवाचे परम कल्याण होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आंधळा मनुष्य दुसऱ्या आंधळ्याला मार्ग दाखवून वाटचाल करू शकत नाही त्याप्रमाणे विकल्पांनी वेढलेला जीव केवळ विकल्पांच्या साहाय्याने निर्विकल्प पदावर आरूढ होऊ शकत नाही.

याकरिताच सद्गुरूची नितांत आवश्यकता असते. गुरुकृपेशिवाय अगर गुरुशक्तीचा आधार घेतल्याशिवाय जीवाला मोहातून तरून जाण्याचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नाही. जलप्रवाहामध्ये

तरंगणाऱ्या गवताच्या काडीप्रमाणे जीव संसार सागरात सतत खालीवर हेलखावे खात असतो. अशा असहाय्य जीवाला सद्गुरू आपल्याला परंपरेने प्राप्त झालेला व स्वत: आचरलेला सन्मार्ग दाखवून त्याची भ्रांती दूर करून आत्मसामर्थ्य संपादनाच्या कार्यात मदत करण्यास समर्थ असतात. अशा प्रकारे जे महात्मे जीवाला आत्मस्वरूपाची प्राप्ती करून देऊन अखंड विश्रांतीचा लाभ करून देतात त्यांनाच सद्गुरू म्हणणे योग्य ठरते. असे सद्गुरू जो मार्ग दाखवितात त्या मार्गावरून चालल्याने स्वसंवेद्य अशा आत्मवस्तूचे दर्शन होऊन त्याची हमखास प्राप्ती होते. याशिवाय आत्मसाक्षात्काराचा दुसरा कोणताही उपाय नाही. केवळ उपदेशामुळे, बडबडीमुळे व्याख्यानबाजीने, वाक्जालाने किंवा प्रवचनांच्या अवडंबरामुळे आत्मस्वरूपाचा साक्षात् अनुभव कदापीही येऊ शकत नाही किंवा त्याच्या आधारावर कोणी करूही शकत नाही. याचे कारण असे आहे की आत्मस्वरूप हे मन, वचन व इंद्रियादी सर्व गोष्टींच्या पलीकडचे असून स्वयंप्रकाश आहे. या करिताच "**गुरोस्तु मौनं व्याख्यानम्**" आहे. जठर संहितेमध्ये म्हटले आहे की–

"**परंपराप्राप्तसन्मार्गदर्शने यस्य योग्यता। स गुरुभवंति श्रीमानात्म-विश्रांतिकारणम्। तेन संदर्शिते मार्गे स्वसंवेद्य दर्शनम्। भवतीति गुरु देवभावेन परिचिन्तयेत्॥**"

सारांश एकमेव श्रीगुरूच्या कृपाकटाक्षाच्या दृष्टिक्षेपानेच जीवाच्या उत्थान दशेचा उदय होत असतो. या उत्थानदशेमुळेच जीवाला आत्मसंवेद्य अवस्था प्राप्त होऊन तो परमपदाशी समरस होऊन जातो. या आवेशामुळे किंवा ह्या आत्मस्मृतीमुळे एका निरतिशय अशा महान आनंदमय अवस्थेचे स्फुरण होऊ लागते. यामुळे ज्या प्रकाशाचा अविर्भाव किंवा उद्दीपन होते त्याची अनुभूती आल्याने सर्व भेद नाहीसे होऊन जातात.

[आधार सहावा]

★ शक्तिपातयोगाची वैशिष्ट्ये ★

१) सर्व मार्गांचा राजा
२) साधकाच्या योग्यायोग्यतेची अनावश्यकता
३) सर्वार्थाने शरणागती
४) सद्गुरुकृपा
५) स्वतः होणारा योग
६) आपत्तिरहित साधन
७) इतर साधनांची अनावश्यकता
८) स्वप्रयत्नशून्य साधन
९) सर्वांना मुक्त साधन
१०) एक दिव्याने दुसरा दिवा लावावा असे साधन
११) प्रारब्ध जय व ज्ञानप्राप्ती



सिद्धमहायोग सर्वार्थाने व सर्वांगाने वैशिष्टचपूर्ण आहे. त्याची अपूर्वता कशाकशात सामाविली आहे ते पाहिले म्हणजे संत, महंत, ऋषी, मुनी, साधू, सज्जन यांनी मुक्तकंठाने या मार्गाची प्रशंसा करून कास का धरली याचा उलगडा होतो.

सर्व मार्गांचा राजा–

शक्तिपातसिद्धमहायोग हा सर्व मार्गांचा राजा आहे. कारण यात सर्व योगांचा समावेश होतो. राज्यातील सर्व रस्ते जसे शेवटी राजधानीला व अगदी शेवटी राजवाड्याला जाऊन मिळतात त्याप्रमाणे साधन राज्यातील सर्व साधने शेवटी महायोगाला येऊन मिळतात व महायोगाची परिणिती ज्ञानप्राप्तीत होऊन मनुष्य मुक्त होतो. राजा सिंहासनाधिष्ठित झाला म्हणजे ज्याप्रमाणे मंत्री, सेनापती इत्यादी सर्व अंगे आपोआप उपस्थित होऊन कार्यरत होतात त्याप्रमाणे महायोगाची दीक्षा होऊन शक्ती जागृत झाली की हठ, लय, मंत्र, राज, भक्ती इ. सर्व योग आपोआप घडून येतात. **" म्हणोनि निःशकें येणें महायोगें । मज मीनला मनाचेनि आंगे । एथ संशय करणें न लगे । तो त्रिशुद्धी जाहला ।। १०–१०८ ।।** अशी प्रशंसा या महायोगाची श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनी केली आहे.

म. म. श्री. गोपीनाथ कविराज यांनी शक्तिपातयोगामुळेच शक्ती जागृत होऊन साधक ज्ञानप्राप्तीने धन्य कसा होतो हे " देह और कर्म " या निबंधात प्रकर्षाने सांगितले आहे. ते पाहिले म्हणजे हा मार्ग सर्व मार्गांचा राजा कसा आहे याची प्रतीती अंतःकरणात उत्पन्न होते.

" शक्तिपातयोगाच्या साधनानेच साधकाला ज्ञानाची प्राप्ती होते व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाग्नीने अशुद्ध वासनांना जाळून मायिक उत्पत्तीचे मूळ बीज जाळण्यास हा अग्नी समर्थ होतो. यामुळे त्याचे

फल म्हणून जन्ममृत्यूच्या पलीकडे असलेली कैवल्यावस्था त्याला प्राप्त होते. या ज्ञानप्रदानाच्या प्रक्रियेत कुंडलिनी शक्तीच्या प्रबोधनाचा फार घनिष्ठ संबंध आहे. सद्गुरू शक्तिपात करताना साधकावर फक्त इतक्याच प्रमाणात शक्तिसंचार करतात की त्यामुळे त्याची कुंडलिनी शक्ती जागृत होऊन ती ऊर्ध्वगतीचे अवलंबन करून अग्रेसर होण्यात समर्थ होईल. ज्या अशुद्ध वासना साधकात मूलतःच असणाऱ्या ज्ञानशक्तीला झाकून ठेवतात त्या गुरुकृपेने कुंडलिनीशक्तीच्या जागृतीबरोबरच हळूहळू जळून जातात. यामुळे साधकाचा अंतरात्मा शुद्ध होऊन गुरुदत्त चिन्मय शक्ती इष्ट असा आकार धारण करते म्हणजे शिवस्वरूप होते. हे क्रमाक्रमाने घडून येते. यामुळे साधकाची दीक्षा झाल्यावर त्याच्याकडून यथाविधी केल्या गेलेल्या कर्माच्या प्रभावाने प्रबुद्ध झालेल्या कुंडलिनी शक्तीचा क्रमशः विकास होऊन ती चैतन्य रूपामध्ये आपला विस्तार करते व हळूहळू संपूर्ण देह, इंद्रिये, मन इत्यादी सर्वांना चिन्मयत्व प्राप्त करून देते. अशुद्ध वासना संपूर्णपणे नाहीशा करणे हे चित्शक्तीचे खरे कार्य आहे हे कार्य जसजसे होत जाईल त्या त्या प्रमाणात चित्शक्तीद्वारा अगदी अभिन्नपणे असलेले इष्टस्वरूप क्रमशः अभिव्यक्त होत जाते. परंतु हे कार्य साधकाच्या लक्षात येत नाही व दृष्टिगोचरही होत नाही. याचे खरे कारण असे आहे की, जोपर्यंत अशुद्ध वासनेचा थोडासुध्दा अंश राहातो तोपर्यंत शुद्ध वस्तूचा साक्षात्कार होऊ शकत नाही ज्यावेळी निर्विकल्प ज्ञानाचा उदय होतो त्यावेळीच साधकाला आत्मसाक्षात्कार होतो."

साधकाच्या योग्यायोग्यतेची अनावश्यकता –

शक्तिपातयोगमार्गाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्टय हे आहे की, या साधनात साधकाच्या योग्यायोग्यतेचा विचार केला जात नाही. भारतीय संस्कृती और साधना प्रथम खंड पृष्ठ २३७ वर श्री. म. म. गोपीनाथ कविराज यांनी 'शक्तिपात रहस्य' या लेखात शक्तिपातयोगमार्गाचे हे वैशिष्टय सांगताना असे म्हटले आहे की–

यहाँ तक जो कुछ कहा गया है, उससे स्पष्ट जान पड़ता है कि शक्तिपात अथवा श्री भगवान की कृपा के बिना कोई जीव पूर्णत्व लाभ नहीं कर सकता–यहाँ तक कि पूर्णत्व के मार्ग में भी प्रवेश नहीं कर सकता। शक्तिपात का तारतम्य जीव के आधार (धारणा शक्ति) के भेद से होता है। परंतु यह भी सत्य है कि जीव चाहे कितने ही निम्न अधिकार का हो और कितना ही भोगाकांक्षा-युक्त हो, एक बार शक्तिपात होने पर

वह कभी न कभी परम पद में अवश्य पहुँच जायगा । भोगाकांक्षादि अन्तराय रहने से उसकी गति में विलंब होगा. नहीं तो शीघ्रातिशीघ्र–यहाँ तक कि क्षणमात्र में भी (जैसे तीव्र तीव्र की मात्रा में) हो सकता है । शक्तिपात के समय योग्यता का विचार नहीं होता, परंतु स्वभावतः योग्यता के अनुसार ही शक्तिपात की मात्रा निर्दिष्ट होती है । परंतु मात्रा कुछ भी हो, भगवत् शक्ति की ऐसी ही महिमा है कि इसका एक बार पात होने पर यह जीवको भगवद्धाम में पहुँचाये बिना शांत नहीं होती इसमें संदेह नहीं ॥ "

येथपर्यंत जे काही सांगितले त्यावरून हे स्पष्ट होते की, शक्तिपाताशिवाय म्हणजे भगवंताची कृपा झाल्याशिवाय कोणताही जीव पूर्णत्व प्राप्त करू शकत नाही. इतकेच काय, तो पूर्णत्व प्राप्त करण्याच्या मार्गात देखील प्रवेश करू शकत नाही. जीवनच्या धारणाशक्तीच्या भेदानुसार शक्तिपाताचे कमीजास्त प्रमाण किंवा भिन्नता दिसून येते. मात्र हेही तितकेच खरे आहे की, जीव कितीही सामान्य कोटीतील असला आणि भोग, वासना, आकांक्षा इत्यादींनी कितीही गुरफटलेला असला, तरी एकदा त्याच्यावर शक्तिपात झाला की तो श्रेष्ठ अशा ब्रह्मपदाला अवश्य पोहोचतो. मात्र भोगाकांक्षादी विक्षेपांमुळे जीवाच्या परमपदाला जाण्याच्या गतीला अडथळा उत्पन्न होतो. जर शक्तिपाताची मात्रा तीव्रातितीव्र असेल व हे आडवे येणारे विक्षेप जर नसतील, तर अत्यंत शीघ्र गतीने म्हणजे क्षणभरातसुद्धा जीव परमपदाला जाऊ शकतो. शक्तिपात दीक्षेच्या वेळी योग्यायोग्यतेचा विचार केला जात नाही. मात्र (जीवाच्या) मुळातील योग्यतेनुसारच शक्तिपाताचे प्रमाण स्वाभाविकपणे निश्चित होत जाते. परंतु प्रमाण काहीही असले तरी भगवंताच्या शक्तीचा महिमा इतका मोठा आहे की, एकदा का होईना, (सिद्धगुरूकडून) ही शक्ती साधकात संक्रमित झाली की ती त्या जीवाला भगवंताच्या घरी (ब्रह्मपदाला) पोहोचविल्याशिवाय शांत होत नाही हे अगदी निःसंशय.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनुभवामृतात श्रीगुरू शिष्याच्या योग्यायोग्यतेचा विचार शक्तिपाताच्या वेळी करीत नाहीत हे सांगताना म्हटले आहे की,

कैवल्यकनकाचेया दाना । न कडसी थोर साना ।
द्रष्टेयाचेया दर्शना । पाढाउ जो ॥ २५ ॥

या ओवीवर टीका करताना श्री निरंजन रघुनाथांनी अत्यंत

सुंदर स्पष्टीकरण केले आहे. कवल्य, मोक्ष तल्लक्षण हेच कोणी एक सुवर्ण. त्याचे दान करण्याविषयी (श्रीगुरू, शिष्य हा) साधनचतुष्टयसंपन्न अथवा अनधिकारी आहे, हे कडसणी म्हणजे शोध करीत नाही. जो शरण येईल त्यास श्रीगुरू मोक्ष देतो. कारण जे, गुरू तो जो परमात्मा होय, तो जे करील ते होईल म्हणून आता श्रीगुरू जो तो शून्यरूपा माया जे तिचा पार दाखविणारा होय ऐसे वर्णितात. जसे बद्रीनारायणाचे दर्शनास पहाडी लोक जे ते यात्रेकऱ्यास शिक्यात बसवून दुर्लंघ्य दरीपार करून देतात, तैसे स्वशरण ब्रह्मजिज्ञासू जें त्यास शून्यरूपा माया हेचि कोण्ही एक सखोल दरी, तिजमध्ये न पडू देता शक्तिपातसामर्थ्यप्रभावे द्रष्टा जो त्याचे वास्तविक स्वरूप निर्विशेष ब्रह्म जे त्याचे चरण वृत्तीने दर्शन करून देतो, म्हणून हा गुरू जो तो पाढाऊ होय, अलाग ब्रह्मी पावविण्याविषयी तेथील माहितगार होय.

ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनी या योग्यायोग्यतेचा फारच सुंदर विचार केला आहे. शक्तिपातयोगमार्गाची सर्व माहिती सांगून झाल्यावर अर्जुनाने श्रीकृष्णांना विचारले–

आतां कृष्णा तुवा सांगितला योग । तो मना तरी आला चांग । परि न शके करू पांग । योग्यतेचा ॥ सहजे आंगिक जेतुले आहे । तेतुलियाचि जरी सिद्धी जाये । तरी हाचि मार्ग सुखोपाये । अभ्यासीन ॥ ना तरी देव जैसे सांगतील । तैसे आपणपे जरी न ठकेल । तरी योग्यतेवीण होईल । तेचि पुसो ॥ हा हो जी अवधारिले । हे जे साधन तुम्ही निरोपिले । तें आवडतयाहि अभ्यासिले । फावो शके ॥ की योग्यतेवीण नाही । ऐसे हन आहे काही ॥

अर्जुन म्हणाला कृष्णा ! आता तुम्ही जो मला योग सांगितला, तो माझ्या मनाला फार आवडला. परंतु माझी योग्यता कमी असल्याकारणाने माझ्या हातून काही तो होणार नाही. माझ्या अंगात जेवढी शक्ती आहे तेवढी खर्च करून जर हा अभ्यास शेवटास जाणार असेल तर मी मोठ्या समाधानाने व आनंदाने या योगमार्गाचाच अभ्यास करीन. सहजपणे जेवढे अंगचे सामर्थ्य आहे, तेवढ्या सामर्थ्याने जर अभ्यास सिद्ध होत असेल तर या योगमार्गाचाच मी आनंदाने अभ्यास करीन. किंवा हे श्रीकृष्णा ! आपण जसे सांगितले तसे माझ्याकडून होण्याजोगे नसेल तर योग्यतेची आवश्यकता नाही असेच एखादे साधन विचारीन. तुम्ही हे जे योगसाधन सांगितले ते माझ्या पूर्ण लक्षात आले. परंतु वाटेल

त्याने याचा अभ्यास केला तर या योगाची प्राप्ती होईल काय ? किंवा हे योग्यतेशिवाय होणारच नाही असे आहे की काय ?

अर्जुनाने हा योग्यायोगतेचा प्रश्न उत्पन्न केल्यावर त्याला श्रीकृष्णांनी पुढील उत्तर दिले.

तेथ श्रीकृष्ण म्हणती काई । धनुर्धरा ।। हे काज कीर निर्वाण । परि जाणिकही जे काही साधारण । तेही अधिकाराचे वोडवेविण । काय सिद्धी जाय ।। पै योग्यता जे म्हणिजे । ते प्राप्तीचि अधीन म्हणिजे । का जे योग्य होऊनि कीजे । ते आरंभिले फळे ।। तरी तैसी एथ काही । साविया ची केणी नाहीं । आणि योग्यतेची काई । खाणी असे ।। नावेक विरक्त । जाहला देहधर्मी नियत । तर तोची नव्हे व्यवस्थित । अधिकारिया ।। मग म्हणे पार्था । ते हे ऐसी व्यवस्था । अनियतासि सर्वथा योग्यता नाही ।।

तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना ! हे तू काय विचारतोस ? हा शक्तिपात योगाभ्यास जर म्हणशील तर खरोखर मोक्ष देणारा आहे. हे अंतिम-प्राप्तीचे साधन आहे. पण याशिवाय दुसरी साधारण जरी गोष्ट असली, तरी ती सुद्धा अधिकाराच्या योग्यतेशिवाय सिद्धीस जाईल काय ? आणि योग्यता म्हणून जिला म्हणतात ती तरी प्राप्तीवरूनच जाणली जाते. आपण योग्य होऊन कार्याला आरंभ केला की ते सफल होतेच. म्हणून या योगमार्गात खरोखर तसा काही प्रकार नाही आणि योग्यतेची एखादी खाण असते की काय ? जो थोडासा विरक्त किंवा विहित धर्म आचारण्यात नियमित झाला आहे इतकेच नव्हे, तर सामान्यतः व्यवस्थेशीर वागणारा जो आहे तो देखील अधिकारी होतो. मग श्रीकृष्ण म्हणाले, पार्था ! या योगप्राप्तीची अशी व्यवस्था आहे. परंतु अव्यवस्थित मनुष्याला त्याची प्राप्ती होण्याचा कधीही संभव नाही.

महामहेश्वराचार्य उत्पलदेव भगवंताची स्तुती करताना म्हणतात,

शक्तिपातसमये विचारणं प्राप्तमीश न करोषि कर्हिचित् ।
अद्य मां प्रति किमागतं यतः स्वप्रकाशनविधौ विलंबसे ।।

हे भगवन् ! शक्तिपात करण्याच्या वेळी म्हणजेच जीवावर कृपा करण्याच्या वेळी योग्ययोग्यतेचा विचार करणे न्यायतः खरे असले तरी आपण पात्रापात्रतेचा विचार करीत नाही. मग आजच माझ्या बाबतीत अशी कोणती नवी गोष्ट आड आली आहे की जी मला आत्मप्रकाशाची प्राप्ती होण्यास विलंब करीत आहे.

स्थावरान्तमपि देवस्य स्वरूपोन्मीलनात्मिका ।
शक्तिः पतंति सापेक्षा न क्वापि ।।

ब्रह्मदेवापासून गवताच्या काडीपर्यंत देवाच्या स्वरूपाला प्रकट करणारी शक्ती शिष्याच्या ठिकाणी संक्रमित होताना कसलीही अपेक्षा करीत नाही. ती निरपेक्ष आहे.

योग्य शिष्याचा उद्धार करणे व अयोग्य शिष्याला योग्य करून तारणे हे सद्गुरूंचे कार्य असते. बोधसार ग्रंथात श्रीनरहरी यांनी असे म्हटले आहे की,

तत्तद्विवेकवैराग्ययुक्त वेदांतयुक्तिभिः ।
श्रीगुरुः प्रापयत्येव न पद्ममपि पद्मताम् ।
प्रापय्य पद्मतामेनं प्रबोधयति तत्क्षणात् ।।

अर्थात् श्रीगुरु विवेकवैराग्ययुक्त वेदांतयुक्तीच्या योगाने अयोग्य शिष्याला योग्यता प्राप्त करून देतात आणि नंतर त्याच्यावर शक्तिपाताचा अनुग्रह करून त्याला त्याच क्षणी जागृत करतात.

ललिता सहस्रनामाच्या भाष्यात देखील श्री भास्करराय यांनी असे स्पष्ट म्हटले आहे की, "अयोग्येऽपि योग्यतामापाद्य श्रीगुरुसूर्यो बोधयति ।" म्हणजे श्रीगुरुरूपी सूर्य अयोग्य शिष्याला योग्य करून प्रबुद्ध करतात.

पात्रापात्रतेचा विचार श्री मुकुंदराजांनी विवेकसिंधूत फारच उत्कृष्ट रीतीने केला आहे. ते म्हणतात,

परोपकाराचेनी संतोषें । पात्र कुपात्र एसें न देखे । गुरुमेघु सर्वत्र वरुषे । उदारपणे ।। तथापि पात्रताविशेषें । स्थिर होये सखोल भूमिके । थेंबू न राहे उटंके । जाये निरसौनियां ।। तैसे पात्रतावीण । स्थिर नोहे ब्रह्मज्ञान । येथ दृष्टान्तु सांघैन । तो आइकै पां ।। जैसे पुत्र विटाळले । ते पितृधनासि मुकले । शुद्ध जालेया विभागु पावले । जियापरी ।। तैसे जगजनक ईश्वराचे । ब्रह्मचि धन निज साचे । शुद्ध जीव विभागिये तेथिचे । तद् औंश म्हणौनियां ।। चित्तासी न संडे विषयसंगु । तंव जीवासि नव्हे ज्ञानाचा धनभागु ।। म्हणौनि हा प्रसंगु । आम्हीं विस्तारिला ।।

दुसऱ्यावर उपकार करण्यात जो योग्यअयोग्य हा विचार करीत नाही तो गुरुरूपी मेघ आपल्या कृपेची वृष्टी सर्वांवर मोठ्या उदारपणे करतो. तरीपण योग्यता विशेष असेल तर नम्र, सौजन्यशील व पात्रता असलेल्या शिष्यात गुरुकृपेचा वर्षाव रुजून खोल जाऊन बसतो. मात्र जो

उद्धट, गर्विष्ठ व अहंकारी असतो ह्यावर केलेली कृपा, उंचवटयावर पडलेला पाऊस टिकून न राहाता ज्याप्रमाणे निरसून जातो, त्याप्रमाणे निरुपयोगी होते. योग्यतेशिवाय ब्रह्मज्ञान हे स्थिर होत नाही. याबाबत एक उदाहरण सांगतो ते ऐक. जे मुलगे भ्रष्ट झालेले असतात ते वडिलांच्या संपत्तीस अंतरतात. ते चांगले शुद्ध झाल्यावर ज्याप्रमाणे त्यांना आपला वाटा मिळतो, त्याप्रमाणे जगाचा पिता जो परमेश्वर त्याचे ब्रह्म हे खरे धन आहे त्याचे अंश म्हणून शुद्ध जीव हेच त्या धनाचे हिस्सेदार. चित्ताला जोपर्यंत विषयाची आवड सुटत नाही, तोपर्यंत जीवाला ज्ञानधनाचा वाटा मिळत नाही.

सर्वार्थाने शरणागती :-

शक्तिपातयोगाचे तिसरे वैशिष्टय हे आहे की, शिष्याने सर्वार्थाने सद्गुरूला शरण गेले पाहिजे. कारण महायोगाचा हा मार्ग मुख्यतः समर्पणाचा मार्ग आहे. पुरुषार्थाचा, प्रयत्नाचा व स्वबलोपायाचा हा मार्ग नाही. श्रीकृष्णांनी अर्जुनाला हेच सांगितले. ते म्हणाले,

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८.६६ ॥

तू सर्व धर्म टाकून मला एकटयालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू शोक करू नको. या श्लोकावर टीका करताना श्रीज्ञानेश्वर महाराजांनी प्रथम शरण येण्याचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे की,

पैं आपले भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ १८.१३९८ ॥ जैसें घटाचेनि नाशें । गगनीं गगन प्रवेशे । मज शरण येणें तैसें । ऐक्य करी ॥ १३९९ ॥ सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळु जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ १४०० ॥

आपलेपणाचा भेद न ठेवता माझे एकत्व जे जाणणे, त्याचेच नाव मला शरण येणे होय. घटाचा नाश झाला म्हणजे त्यातील आकाश आकाशामध्ये शिरते तसे मला शरण आलास म्हणजे माझ्याशी ऐक्य पावशील. सुवर्णाचा मणी सुवर्णाशी जसा एकरूप असतो, अथवा पाण्याची लाट जशी पाण्याशी एकरूप असते तशा रीतीने हे धनंजया ! तू मला ऐक्यत्वेकरून शरण ये.

अर्जुनाला श्रीकृष्णांनी इतक्या आग्रहाने शरण येण्यास सांगितले,

कारण त्यामुळे त्याची अहंबुद्धी जाऊन तो अनुग्रहास योग्य व्हावा. पापपुण्य, धर्माधर्म इत्यादी द्वंद्वातून बाहेर पडण्यास शरण जाण्यासारखा दुसरा मार्ग नाही हे अर्जुनाच्या मनावर बिंबावे म्हणून श्रीकृष्ण म्हणतात,

मग ताकौनिया काढिले । लोणी मागौते ताकी घातले । परी न घेपे काही केले । तेणे जीवी ॥ १८.१४०६ ॥ तैसें अद्वयत्वे मज । शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥७॥ लोह उभे खाय माती । ते परिसाचिये संगती । सोने जालया पुढती । न शिविजे मळे ॥ ८ ॥ हे असो काष्ठापासोनी । मथूनि घेतलिया वन्ही । मग काष्ठेही कोंडोनी । न ठके जैसा ॥ ९ ॥ अर्जुना काय दिनकरू । देखत आहे आंधारू । की प्रबोधी होय गोचरू । स्वप्नभ्रमु ॥ १० ॥ तैसें मजसीं येकवटलेया । मी सर्वरूप वाचोनिया । आन काही उरावया । कारण असे ॥ ११ ॥ म्हणौनि तयाचे काही । चिंती ना आपल्या ठाई । तुझे पापपुण्य पाही । मीचि होईन ॥ १२ ॥ तेथ सर्व बंधलक्षणे । पापे उरावे दुजेपणे । ते माझ्या बोधी वायाणे । होऊनि जाईल ॥ १३ ॥ जळी पडिलिया लवणा । सर्वहि जळ होय विचक्षणा । तुज मी अनन्य शरणा । होईन तैसा ॥ १४ ॥ येतुलेनी अपैसया । सुटलाचि आहासी धनंजया । घेई मज प्रकाशोनियां । सोडवीन तूते ॥ १५ ॥ या कारणे पुढती । हे आधि न वाहे चित्तीं । भज एकासि ये सुमती । जाणोनि शरण ॥१४१६॥

मंथन करून ताकातून लोणी वेगळे काढल्यावर पुन्हा जरी ताकात घातले, तरी ते काही केल्याने त्यात मिसळत नाही. त्याप्रमाणे अद्वितीय बोधाने तू मला शरण आल्यावर तुला धर्माधर्माचा स्पर्श होणार नाही. लोखंड उभे अलग असले तरी त्याला तांब चढते, पण तेच परिसाच्या स्पर्शाने सोने झाल्यावर मळ त्याला शिवत नाही. फार काय काष्ठ मंथून काढलेला अग्नी जसा काष्ठांनी कोंडून राहात नाही, सूर्याला जसा अंधार दिसत नाही किंवा जागे झाल्यावर स्वप्न दृष्टीस पडत नाही तसे माझ्याशी ऐक्य पावल्यावर सर्वरूप असा जो मी, त्या माझ्या वाचून दुसरे काही उरण्यास कारण आहे काय ? याकरिता पापपुण्याची किंवा धर्माधर्माची चिंता तू करू नकोस. तुझे पाप व पुण्य मीच होईन. सर्व बंध देणारे असे जे पाप त्याचे हेच लक्षण होय की माझ्याहून भिन्नपणाने उरणे. ते पाप माझ्या ज्ञानाने नाश पावेल. हे विचारशील अर्जुना ! उदकात मीठ पडले म्हणजे ते आपण नाहीसे होऊन सर्व जलरूप होते, त्याप्रमाणे तू अनन्यभावाने मला शरण आलास म्हणजे

मद्रूपच होशील. हे धनंजया! या योगाने तू आपोआप सर्व बंधनापासून सुटशील. याकरिता मला जाणून तू माझी प्राप्ती करून घे. (मला आपलासा करून घे.) म्हणजे मग मी तुला सर्व बंधनांपासून मुक्त करीन. म्हणून हे सुमते ! धर्माधर्माची चिंता मनात ठेवू नको. एक अद्वितीय जो मी, त्या मला जाणून शरण ये.

ज्या कारणाकरिता श्रीकृष्णांनी अर्जुनाला शरण येण्यास सांगितले त्याच कारणाकरिता श्रीपांडुरंगांनी श्रीनामदेवास श्रीविसोबा खेचरांना शरण जाण्यास सांगितले. सद्गुरूला शरण गेल्याशिवाय त्यांच्या मनात शिष्याविषयी करुणा उत्पन्न होत नाही. एकदा का शिष्य शरण गेला की, सद्गुरूंच्या मनात शिष्याविषयी करुणा उत्पन्न होते व तो शक्ति-संक्रमण करून शिष्यास मुक्त करतो. पुढील दोन अभंग या दृष्टीने पाहाण्यासारखे आहेत –

देव आणि नामा उभे भीमातीरा । प्रेमे येरयेरां आळविती ॥ १ ॥
देव म्हणे नाम्या ऐके गुह्य गोष्टी । संसाराची तुटी जेणें होय ॥ २ ॥
श्रीगुरूवांचुनी मुक्ति तुज नाहीं । भवनदीडोहीं नुतरसी ॥ ३ ॥
शरण गुरूसी झालिया सप्रेमें । संसाराचा श्रम उतरूनी ॥ ४ ॥
गुरूवांचुनियां कैंचा मुक्ति ठाव । संसार हा वाव कैसा होय ॥ ५ ॥
म्हणूनि नाम्या तुवां गुरूसि जावें शरण । तेणें भवबंधनें मुक्त होती ॥६॥
ऐसें ऐकूनियां नामा थरारिला । मूर्च्छागत झाला भूमीवरी ॥ ७ ॥
भूमी लोळे नामा कंठ सद्गदित । डोळियां स्रवत अश्रुजळ ॥ ८ ॥
इतुकें देखोनियां द्रवला पुरुषोत्तम । नाम्यासि सप्रेम उचलिलें ॥९॥
नाम्या तुज काय वाटतसे दुःख । संसाराचे सुख तुज झाले ॥ १० ॥
नामा म्हणे देवा तुजऐसा दाता । मज भवव्यथा कवणेपरी ॥ ११ ॥

पांडुरंगासारखा दाता आपल्याला भेटला असताना तोच श्री विसोबा खेचरांना आपल्यास शरण जाण्यास सांगतो याचे नामदेवांना फार वाईट वाटले. ते म्हणतात–

अनाथांचा नाथ तुझी ब्रिदावळी । मज कां रे जाळी भवव्यथा ॥ १ ॥
देव म्हणे नाम्या गुरूवांचूनियां । मुक्ति पावावया आन नाहीं ॥ २ ॥
आन नेणें काहीं करिसी विपत्ती । नव्हे माझी प्राप्ती गुरुवीण ॥ ३ ॥
जाई नाम्या जाई गुरूसी शरण । तुटे भवबंधन तुझे वेगीं ॥ ४ ॥
नामा म्हणे देवा कवणा शरण जाऊं । कोणा मी होऊं शरणागत ॥५॥
देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावें वेगीं ॥ ६ ॥

श्रीपांडुरंगाच्या सांगण्याप्रमाणे श्रीनामदेवराय श्रीविसोबा खेचरांना शरण गेले व त्यांच्याकडून शक्तिपातदीक्षा मिळवून कृतार्थ झाले.

श्रीमद् भागवताच्या एकादश स्कंधातील बाराव्या अध्यायातील पंधराव्या श्लोकावर टीका करताना श्रीकृष्णांनी उद्धवाला शरणागतीचे रहस्य सांगितले आहे. श्रीकृष्ण हे उद्धवाचे गुरू असल्याने ज्यावेळी ते उद्धवाला, तू मला शरण ये असे म्हणतात त्यावेळी सद्गुरूला हा अर्थच साधकाने ध्यानात घेतला पाहिजे. ते म्हणतात, "वेदशास्त्राचे कर्मविधान हे अविद्यायुक्त साधन आहे. ती अविद्या घालविण्यासाठी सद्गुरूला साधकाने शरण गेले पाहिजे. स्त्रीपुत्रादी सर्व विषयांचा ध्यास सोडून योग, योग्यता, कर्मठपणा व कर्माभिमान टाकून सद्गुरूला शरण जावे. वेदाध्ययन, शास्त्रश्रवण, प्रवृत्ती, निवृत्ती हे सर्व सोडून शरण जावे. धन व मान यांच्या चेष्टा सोडून विद्वत्ता व प्रतिष्ठा दूर सारून आणि अनेक प्रकारच्या निष्ठा बाजूला ठेवून साधकाने सद्गुरूला शरण गेले पाहिजे. वैदिक, लौकिक, तांत्रिक, पुराणोक्त व पांचरात्रागमात सांगितलेले मंत्र, तंत्र इत्यादी सर्व टाकून जर साधक सद्गुरूला शरण गेला तरच तो त्याच्या कृपेने आत्मसुखाला प्राप्त होतो. आपल्या कुळाचा मोठेपणा टाकून, जातीचा अभिमान सोडून व चार आश्रमांपैकी स्वतःच्या आश्रमाचे श्रेष्ठपण विसरून मला शरण यावे. ज्ञान-ध्यान, विधिविधान व देहाभिमान टाकून मला शरण यावे. माझे नावच अंतर्यामी आहे. हृदयातील जाणणारा मुख्य मीच आहे. शब्दांनी मी माझ्या स्वरूपापासून च्युत होत नाही. निर्ममत्वानेच परब्रह्मावरील श्रद्धा दृढ होते. सर्व अभिमान सोडून मला शरण आल्यास तुझी जन्ममरण परंपरा नाहीशी होईल. मग तू माझ्या प्रभावाने सहज तरून जाशील. मला शरण येण्यासाठी पर्वताच्या गुहेत, दरीत किंवा दशदिशात भटकण्याचे कारण नाही. हा एका जागी राहात नाही. याला गाव नाही. तेव्हा शरण जावे तरी कोठे असे तुला वाटेल. पण मी तुझ्या हृदयातच सद्गुरुरूपाने आहे. त्या हृदयस्थालाच शरण जावे. अशा प्रकारे सर्वस्वी सर्वभावाने जर तू मला शरण येशील तर सर्व भूतांच्या हृदयात मी वास करीत असल्याने तू सर्वव्यापकतेस प्राप्त होशील. परंतु तू मनात तिळमात्र जरी अभिमान ठेवून मला शरण आलास तरी माझी प्राप्ती होणार नाही. कारण माझ्या प्राप्तीला अभिमान हे फार मोठे विघ्न आहे. याकरिता सद्गुरूला अभिमान टाकून शरण गेले पाहिजे.

तू मला शरण आलास म्हणजे कळीकाळही तुझ्या पाया पडेल.

मग संसाराचे भय तर क्षुल्लकच आहे. तुला माझे सामर्थ्य प्राप्त होईल. याकरिता हृदयस्थालाच शरण जा. नाम, रूप व अभिमान टाकल्यावर जे उद्धवपण स्फुरते तेच हृदयस्थाचे रूप आहे असे लक्षात ठेव. त्यालाच तू शरण जा. नाम-रूप-गुण ही वस्तुतः माया आहे. तिला सोडून जी सत्ता स्फुरते तेच माझे म्हणजे हृदयस्थाचे रूप आहे. अशा प्रकारे हृदयस्थाची प्राप्ती केल्यावर मग सर्व भूतांमध्ये देवच दिसू लागतो. साधकाला निराळे राहाण्यासाठी रिकामी जागा उरत नाही. याप्रमाणे सद्गुरुकृपेने साधक हृदयस्थाला शरण गेला म्हणजे मला येऊन मिळतो."

इतके सांगून श्रीकृष्णांनी उद्धवाची पाठ थोपटली. त्याबरोबर त्याने त्यांच्या पायांना मिठी घातली. त्यानंतर श्रीकृष्णांनी त्याला उठविले तरी तो काही केल्या उठेना.

सदगुरुकृपा :–

सद्गुरुकृपेचे अनन्यसाधारण महत्त्व हे या शक्तिपातयोगमार्गाचे चवथे वैशिष्ट्य आहे. अनन्यशरण आलेल्या शिष्याला श्रीगुरू शक्तिपातदीक्षा देऊन कृतार्थ करतात. म्हणून सद्गुरूंचे व त्याच्या कृपेचे महत्त्व श्रीज्ञानेश्वर महाराजांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । जैसे मूळसिंचनें सहजे । शाखापल्लव संतोषती ॥ हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरू माथा पारुखे ॥ तो जीवचि परी तुके । महेशेसी ॥ जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे ॥ अनवरत आनंदे । वर्षतिये ॥ विषयव्याळे मिठी । दिधलिया नुठी ताठी ॥ ते तुझिये गुरुकृपादृष्टि । निर्विष होय ॥ तरी कवणाते तापु पोळी ?। कैसेनि वो शोकु जाळी ?। जरी प्रसादरसकल्लोळीं । पूरे यैसि तूं ॥ योगसुखाचे सोहळे । सेवका तुझे स्नेहाळे । सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तू ॥ आधारशक्तीचिये अंकी । वाढविसी कौतुकी । हृदयाकाशपल्लकी । परिये देसी निज ॥ प्रत्यक्ज्योतीची वोवाळणी । करिसी मनपवनाची खेळणी । आत्मसुखाचीं बाळलेणी । लेववसी ॥ सतराविये चे स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी । समाधि बोधे निजविसी । बुझाउनी ॥ म्हणोनि साधका तू माउली । पिके सारस्वत तुझिया पाउली । या कारणे मी साउली । न संडी तुझी ॥

म्हणून जे शहाणे आहेत त्यांनी श्रीगुरूची सेवा करावी म्हणजे त्यांच्या मनातील सर्व हेतू सिद्धीस जातील. झाडाच्या मुळाशी पाणी घातले म्हणजे फांद्या व पाने आपोआप टवटवीत होतात. ज्या व्यक्तीवर श्रीगुरूची कृपादृष्टी होते किंवा ज्याच्या मस्तकावर त्याचा वरदहस्त

पडतो तो जीव जरी असला तरी तो शंकरासमान होतो. म्हणजे व्यक्ती कितीही कनिष्ठ किंवा यःकश्चित असली तरी श्रीगुरुकृपेने तिला तत्क्षणी जगच्चालक परमेश्वराचा दर्जा प्राप्त होतो. हे सदगुरू आई ! तू शुद्ध म्हणजे अखंड अज्ञानादिदोषरहित आहेस. तू एक अत्यंत उदार म्हणून प्रसिद्ध आहेस व तू निरंतर आनंदस्वरूप किंवा प्रेमरूप असून शिष्याचे ठिकाणी अखंड परमानंदाचा वर्षाव करणारी किंवा परमानंदरूप प्रेमाची प्राप्ती करून देणारी आहेस. विषयरूपी भयंकर सर्पाने जीवाच्या ठिकाणी मिठी मारल्यामुळे जी त्याला आत्मविस्मृतिरूप मूर्च्छा आली आहे, ती कशानेही नाहीशी होत नाही. पण हे श्रीगुरो ! एक तुमच्या कृपा-दृष्टीनेच विषयरूपी सर्पाचे विष उतरून ती मूर्च्छा नाहीशी होते. तुझ्या अंतःकरणात ज्याच्याविषयी कृपाप्रेमाचा पूर येऊन त्याच्या लाटा उसळू लागल्या असता, संसारातील त्रिविध तापाने कोण पोळला जाईल ? व त्याला प्रिय वस्तूचा वियोग व अप्रिय वस्तूचा संयोग यांच्याविषयीचा शोक कसा जाळू शकेल ? सेवकांना तुझ्याच कृपेने योगसुखाचे सोहळे भोगावयास मिळतात व मी ब्रह्म व्हावे अशी जो सेवकाची हौस, तीही तू पूर्ण करतेस. आधारशक्तीच्या मांडीवर कुंडलिनीशक्ती जागी करून तिच्या साहाय्याने आपल्या सेवकाला कौतुकाने वर नेतेस आणि हृदया-काशरूपी पाळण्यात त्याला आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाच्या ऐक्याचे झोके देतेस. तू आपल्या सेवकाला चैतन्याची ओवाळणी करून मनपवनाची खेळणी करून देतेस व आत्मसुखाची बाळलेणी लेवतेस. तसेच त्याला जीवनकलेचे अमृतपान देऊन अनाहताचे गाणे गातेस आणि ऐक्यज्ञानाच्या उपदेशाने त्याचे समाधान करून त्याला समाधिसुखाचा बोध करून निजवतेस. म्हणून हे सद्गुरू आई ! तू साधकाची सतत कृपादृष्टीने सांभाळ करणारी आई आहेस. तुझे चरण ज्या साधकाच्या हृदयात राहतील, त्याला सर्व प्रकारच्या विद्या प्राप्त होतात. यास्तव मी तुझ्या कृपेची सावली सोडीत नाही.

श्रीसद्गुरूंच्या या अनन्यसाधारण कृपेचे महत्त्व वर्णन करताना भगवान श्रीशंकराचार्य यांनी शतश्लोकीच्या पहिल्याच श्लोकात शक्ति-पातपूर्वक होणाऱ्या ज्ञानदानाचे सुंदर वर्णन केले आहे.

दृष्टान्तो नैव दृष्टास्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः । स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारम् ।। न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये । स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमस्तेन वा लौकिकोऽपि ।।

या त्रिभुवनामध्ये ज्ञानदान करणाऱ्या सद्गुरूला देता येईल असा कोणताही योग्य दृष्टान्त सापडत नाही. जर त्याला परिसाची उपमा दिली तर तीही योग्य ठरत नाही. कारण परीस लोखंडाचे सोने करतो. मात्र तो लोखंडाचा परीस करू शकत नाही. परंतु जो शिष्य सद्गुरु-चरणांचा आश्रय घेतो त्याला श्रीगुरू शक्तिपातपूर्वक ज्ञानदान करून निजसाम्य देऊन कृतार्थ करतात. याकरिता सद्गुरूला कोणतीही उपमा देता येत नाही.

शतश्लोकीच्या ९१ व्या श्लोकात श्रीसद्गुरू आपली कृपापूर्ण दृष्टी शिष्यावर टाकून शक्तिपातद्वारा कसा बदल करतात त्याचे उत्कृष्ट वर्णन केले आहे..

तद् ब्रह्मैवाहमस्मीत्यनुभव उदितो यस्य कस्यापि चैद्दै। पुंसः श्रीसद्-गुरुणामतुलितकरुणापूर्णपीयूषदृष्ट्या । जीवन्मुक्तः स एव भ्रमविधुरमना निर्गते नाप्युपाधौ । नित्यानंदैकधाम प्रविशति परमं नष्टसंदेहवृत्तिः ॥

श्रीसद्गुरूच्या अतुलनीय अशा करुणापूर्ण अमृतदृष्टीमुळे जर कोणाला 'मी ब्रह्म आहे' हा अनुभव प्राप्त झाला, तर त्याचे मन भ्रमरहित होऊन जाते. त्याच्यामुळे त्याचे सर्व संशय व मोह नष्ट होतात आणि तो जीवनमुक्त होतो. त्याची अनादी उपाधी नष्ट झाल्यामुळे तो चिरंतन आनंदाच्या साम्राज्यात प्रवेश करतो.

श्रीदत्तात्रेयांनी यदुराजाला आलिंगन देऊन व आपले गुरू श्री जनार्दनस्वामी यांच्या मस्तकावर हात ठेवून स्पर्शदीक्षा देऊन कृपा कशी केली व आत्मबोध कसा केला यांचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन श्रीसंतएकनाथ महाराजांनी श्रीनाथभागवताच्या 'यदु-अवधूत' संवादात पुढीलप्रमाणे केले आहे.

याहीपरी पाहता। माझा गुरु एकुलता। एक तेथे दुजेपणाची वार्ता। नाही सर्वथा यदुराया ॥ ऐशी सद्गुरुकथा। तुज सांगितली परमार्था ॥ हरिखे आनंदला नृपनाथा। दोघा ऐक्यता निजबोधे ॥ जीवी जीवा पडली मिठी। आनंदे ओसंडणे सृष्टी। तेणे वाचेसी पडली बेलवटी। बोलो उफराटी विसरली ॥ हरिखु न संटवे हृदयभवनी। बाहेर वोसंडे स्वेदेजोनी। आनंदघन वोळला नयनी। स्वानंदजीवनी वर्षतु ॥ तुटली अहंकाराची बेडी। पावलो भवार्णवपरथडी। म्हणौनि रोमांची उभविली गुढी। जिंतली गाढी अविद्या ॥ समूळ देहभावो पळाला। यालागी गात्रकंपू चळचळा। संकल्पविकल्प निमाला। मनेसी बुडाला मनोरथू ॥ जीवभावो उखिता। यदूने अर्पिला गुरुनाथा। ते

चिन्ह बाहेरी तत्त्वता । दावी सर्वार्था निजांगी ।। तो अवधूत जाण दत्तात्रेया । तेणें आलिंगूनि यदुराया । निजरूपाचा बोधु तया । अनुभवावया दीधला ।।

हे यदुराजा ! अशा रीतीने पाहिले म्हणजे माझा गुरू एकुलता एकच आहे. तेथे दुजेपणाची वार्ताही नाही. सदगुरूची कथा मी तुला परमार्थप्राप्तीसाठी सांगितली. असे बोलून अवधूताने आनंदाने राजाला आलिंगन दिले. आत्मज्ञानामुळे ते दोघेही तद्रूप झाले. सृष्टीला आनंदाचे भरते आले. त्यामुळे वाचा बंद पडली व उलट पक्ष घेऊन बोलण्याचे विसरली. अंतःकरणात आनंद न मावल्यामुळे तो घामाच्यारूपाने बाहेर वाहू लागला म्हणजे आनंदातिशयामुळे त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहून घाम सुटला. आनंदरूपी मेघ डोळ्यात भरून आला व तो प्रेमाश्रूंचा वर्षाव करू लागला. अहंकाररूपी बेडी तुटली. आम्ही भवसमुद्राच्या परतीराला जाऊन पोहोचलो म्हणून रोमांचरूपी पताका उभारली. अविद्येला पार जिकले. देहभाव पळून गेला म्हणून शरीर चळचळा कापू लागले. संकल्पविकल्प नाहीसा झाला व मनोरथ मनासह बुडाला. यदुराजाने सर्व जीवभाव सद्गुरूला अर्पण केला व त्याचे चिन्ह तत्त्वतः आपल्या देहावर दाखवू लागला. तो अवधूत साक्षात् दत्तात्रेय होता असे जाण. त्याने यदुराजाला आलिंगून त्याला आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचा अनुभव दिला.

विवेकसिंधू या ग्रंथात शिष्य सद्गुरूला अनन्यभावाने शरण गेल्यावर शक्तिपात दीक्षा देऊन श्रीगुरू त्याला कसे कृतार्थ करतात याचे अत्यंत रेखीव वर्णन श्रीमुकुंदरायांनी केले आहे.

तंव शिष्यु तापत्रयी संतप्तु । शमदमसाधनी संयुक्तु । गुरूते शरणागतु । विनविता जाला ।। जी मी संसार सागरी बुडालो । तापत्रये वडवानळी पोळलो । क्रोधादि जळचरी विसंचिलो । जालो अतिशोच्यु ।। ज्ञानाचिया तारुवी बैसउनि । कृपेचिये सुवाये पेलौनि । देवेचि तारक होवौनि । उतरावे माते ।। संसाराचिये बंदिशाळे । बांधलो अज्ञानसांखळे । तिये बंधनें तोडावी स्वामी सकळे । ज्ञानशस्त्रेकरौनिया ।। भवार्क माध्यान्ह तापवेळे । तापलो तापत्रये दावानळे । जी कृपाजळधरा ज्ञानजळे । निववावे माते ।। ऐसी कृपा उपजवौनि । विनवी शिष्यशिरोमणी । मस्तकु श्रीगुरुचरणी । न्यासिता जाला ।। तव बोलिला श्रीगुरुराजा । बारे तू शिणलासि कवणीये काजा । कैसे बंधन तोडिजैल वोजा । हें चोज पाही रोकडेंचि ।। ऐसी प्रतिज्ञा स्वीकारौनि । शिष्याते

सन्मुख बैसवौनि । ज्ञानसमावेश करौनि ।गुरुसंप्रदायक्रमे।। तेथे ज्ञानशक्तीचा प्रकाशु । अज्ञानशक्तीचा निरासु । बोध उठिला स्वयंप्रकाशु । शिष्य चैतन्यी ।। तेवेळी कंपस्वेदादिक । उठिले भाव सात्त्विक । जैसे साम्राज्य पावे रंक । तैसे वर्तते जाले ॥ या नाव शक्तिपातु बोलिजे । जेथे स्वानुभवुचि अनुभविजे । निःशेष तेही विसरिजे । स्मरण सांसारिक ।। स्तंभ स्वेद रोम-उभारण । स्वरभंगादि कंपायमान । वैवर्ण्य अश्रु प्रलपन । अष्ट सात्त्विक भाव हे ।। चित्त चाकाटले आंतु घेत । वाचा पांगुळली जेथिच्या तेथ । आपाद कंचुकित । रोमांच आले ।। वर्षतातो आनंदजळे।आंतुला सुखोर्मिचेनि बळे । बाहीर कापे थरथरा ।। तंव आनंदाचा पूरू । शिष्यसरिते आला थोरू । तेथ अविवेक पोहणारू । बुडौनि जाये ।। अहंकारद्रुम उन्मूळिला । तृष्णेपक्षिणीचा कुरुठा मोडला । इंद्रियेग्रामु बुडाला । तिये आनंदजळी ।। असो हे सुखाचिये शेजारी । तेथ स्वानुभूती अंतुरी ।। तिया आलंगिला सुंदरी । तो योगीराजु ।। तियेचेनि आंगमेळे । नुठती इंद्रियांचे डोहाळे । तेथ आसकेचि केवळे । स्वस्वरूप ।। तेथ नेणीव ना जाणीव । सरले भावाभाव । जेथ एकछत्र राणीव । तया योगीराजासी ।। जेथ स्वर्ग-सुखाची कुरवंडी । वोवाळोनि सांडिजे फुडी । तेया ब्रह्मसुखाची गोडी । केवि बोलावी ।। जेथ मनाचे जाणणे । खुंटले वाचेचे बोलणें । हे जयाचे तोचि जाणे । येरा टकमकचि ।। तैसे वैराग्यवन्ही तातले । ज्ञानाधिकारू पातले । अवधातुही ब्रह्म जाले । गुरुचरणस्पर्शे ।। पाहाता श्रीगुरूचेया महिमाना । परिसुहि होये ठेंगणा । तो लोहाते करी सुवर्णा । परी तो परिसु नोहेचि ।। परिससन्निधी वेधले । लोहो सुवर्ण होऊन ठेले । परि तेथ अवधातु लागले । ते कनक नोहेचि की ॥ तैसा नोहे गुरुकृपेचा वेधु । जो सद्यस्वरूपावबोधु । शिष्यचि ब्रह्म होये हा विनोदु । नवल तेथिचा ।। कल्पतरूसी उपमा द्यावी । तरी तो कल्पिलिया अर्थाते पुरवी । कल्पनातीत भेटवी । श्रीगुरुनाथु ।। कामधेनू आणि चिंतामणी । इये पुरवू न सकती आयणी । चिंतिलेया अर्थाची दानी । म्हणौनिया ।। जीये जननीजनके । तीये संसारदायके । परि नव्हेति भवबंधछेदके । येके श्रीगुरूवाचौनि ।। जे चिंतनासि अतीत । सकळ कल्पनाविरहित । ते ब्रह्म निजानंदभरित । देता श्रीगुरुनाथु ।। म्हणौनि श्रीगुरूसी उपमा । यैसी कवणासी असे महिमा । प्रपंचचि होये परब्रह्म । प्रसादे जयाचेनि ।।

त्रिविध तापांनी गांजलेला व शमदम वगैरे साधनांनी युक्त असलेला असा शिष्य गुरूला शरण येऊन नम्रतेने त्याने विनंती केली की महाराज, मी भवसागरात बुडालो आहे. त्रिविध तापांच्या वडवाग्नीने

पोळलो आहे. क्रोध वगैरे जलचर प्राण्याकडून ग्रासलो गेलो आहे. त्यामुळे अतिशोकाकुल झालो आहे. गुरुदेवांनी ज्ञानाच्या तारवात बसवून कृपेच्या चांगल्या वाऱ्याने त्याला चालवून माझे तारक होऊन मला पैल उतरावे संसाराच्या कैदखान्यात अज्ञानरूपी बेडयांनी जखडून गेलो आहे. स्वामींनी ज्ञानरूपी हत्याराने त्या सर्व बेडया तोडून टाकाव्या. संसाररूपी सूर्याच्या प्रखर मध्यान्हीच्या वेळेला तापत्रयाच्या दावानळाने त्रासून गेलेल्या मला हे कृपारूपी मेघराजा, ज्ञानरूपी जलाने शांत करावे. अशी करुणा भाकून शिष्यश्रेष्ठ विनवू लागला.

त्याने गुरूंच्या चरणावर डोके ठेविले. तेव्हा श्रीगुरू म्हणाले, " काय म्हणून तू दमून गेलास बाबा ! हे बंधन स्वसामर्थ्याने कसे तोडले जाते हेच आश्चर्य तू प्रत्यक्ष पाहा." अशी प्रतिज्ञा करून शिष्याला समोर बसवून आपल्या गरूच्या संप्रदायाप्रमाणे त्याच्या ठिकाणी ज्ञानाचा समावेश केला. त्याच्या ठिकाणी ब्रह्मज्ञानशक्तीचा प्रवेश केला व अज्ञान शक्तीचा निरास केला. त्याबरोबर शिष्यरूप चैतन्याला आपल्या ब्रह्मतेजाचे ज्ञान झाले. त्यावेळी कंप, घाम वगैरे सात्त्विक भाव शिष्यामध्ये उत्पन्न झाले. एखाद्या दरिद्र्यास साम्राज्य मिळाले म्हणजे तो जसा वागतो तसा तो शिष्य बागू लागला. या अवस्थेलाच शक्तिपात म्हणतात. तो झाला म्हणजे आपण ब्रह्म आहोत असा अनुभव अनुभवावयाला मिळतो व संसाराचे स्मरण निःशेष नाहीसे होते. शरीर निश्चल होणे, घाम येणे, रोमांच येऊन केस उभे राहाणे, आवाजात बदल होणे, शरीर कंप पावणे, फिकटपणा येणे व अश्रुपात होणे हे अष्टसात्त्विक भाव शक्तिपात झाल्यामुळे उत्पन्न होतात. चित्ताची बाहेरची ओढ संपून ते आतच स्थिर होऊ लागते. वाचा जेथल्या तेथेच पांगळी होऊन जाते. सर्व शरीरभर रोमांच येतात. आनंद आत न मावल्यामुळे तो अश्रूंवाटे बाहेर पडतो. हृदयात सुखाच्या ऊर्मी इतक्या बलवान होऊन उसळत असतात की त्यामुळे शरीर सतत कंप पावते. त्यावेळी शिष्यरूपी नदीला आनंदाचा मोठा पूर आला. त्यात अविवेकी पोहणारा बुडूनच जावयाचा. त्या आनंदाच्या पुरात अहंकाररूपी वृक्ष मुळासकट उपटून गेला. वासनारूपी पक्षिणीचे घरटे मोडून पडले. इंद्रियसमूह बुडून गेला. या सुखात सहभागी म्हणून स्वतःची अनुभूती ही स्त्री होती. तिने त्या योगीराजाला आलिंगन दिले. तिच्या अंगस्पर्शाने विषयसुखाच्या इच्छाच उत्पन्न होत नाहीत. तेथे तात्काळ केवळ स्वस्वरूपाचे ज्ञानच होते. त्या स्थितीत जाणीव नसते-नेणीव नसते. भावाभाव उरत नाहीत. योगीराज त्या स्थितीत एकछत्री

साम्राज्यपद भोगतो. स्वस्वरूप हे सुखाने पूर्ण भरलेले असते. तेथे कोणताच भाव स्फुरत नाही. ही योगनिद्रा त्या योगीराजाची कधीही नाहीशी होत नाही. या सुखावरून स्वर्गातील सर्व सुखे निरर्थक म्हणून ओवाळून टाकावीत. असल्या ब्रह्मसुखाची गोडी कशी सांगावी ? त्याच्यापुढे मनाचे जाणणे व वाचेचे बोलणे खुंटून जाते. हे ज्याचे तोच जाणतो. इतरांनी नुसते टकमक पाहातच राहावे. त्याचप्रमाणे निकृष्ट धातूसारखे असलेले वाईट शिष्यही वैराग्यरूपी अग्नीने तापल्यामुळे ज्ञानाचे अधिकारी होऊन गुरुचरणाच्या स्पर्शाने ब्रह्मरूप होतात. श्रीगुरूचा मोठेपणा पाहाता परीससुद्धा त्याच्यापुढे कमी दिसतो. तो लोखंडाचे सोने करतो परंतु ते लोखंड परीस होत नाही. परिसाला लोह चिकटले तर लोखंडाचे सोने होते. परंतु तेथे दुसरा निकृष्ट धातू आणला तरी त्याचे सोने होत नाही. गुरूच्या कृपेचा वेध तसा नाही. त्याने एकदम स्वरूपाचा बोध होतो. तेथील आनंददायक आश्चर्य हेच की, त्याने शिष्य प्रत्यक्ष ब्रह्म होतो. गुरुकृपेच्या वेधाला जर कल्पवृक्षाची उपमा द्यावी, तर कल्पवृक्ष मनात आणलेल्या इच्छा पुरवितो. परंतु श्रीगुरुनाथ कल्पनेच्या पलीकडचे जे ब्रह्म ते भेटवितो. कामधेनू काय किंवा चिंतामणी काय, कोणीच ब्रह्मप्राप्तीची इच्छा पुरवू शकत नाही. कारण ते इच्छिलेल्या वस्तूचेच दाते आहेत. आईबाप खरे, पण ते संसारच मागे लावून देतात. परंतु एका गुरुशिवाय कोणीही संसाराची बंधने तोडू शकत नाही. चिंतनाच्याही जे पलीकडचे व सर्व कल्पनांच्याही पलीकडचे स्वानंदपूर्ण ब्रह्म ते प्राप्त करून देणारा श्रीगुरुनाथच ! म्हणून श्रीगुरूला उपमा देण्याइतका मोठेपणा कोणात आहे ? त्याच्या प्रसादाने संसार हाच प्रत्यक्ष परब्रह्म होतो.

सारांश, गुरुकृपेशिवाय सर्व गोष्टी तुषकंडनवत् व्यर्थ होत. निपट-निरंजन म्हणतात–

जोगजुगत कर देखें । ध्यानकूं कर देखे । करमकूं कर देखे । कुबभी भयो नहीं ।। १ ।। स्नानसंध्या कर देखे । देवपूजा कर देखे । पवन शीस चढा देखे । बालभी उखाडो नहीं ।। २ ।। काशीरामेसर फिर देखे । द्वारका जगन्नाथ देखे । अजोध्या मथुरा देखे । देव तो मिला नहीं ।। ३ ।। तनमो खाक चढाई । जटादाढीभी बढाई । नींबकी पात खाई । इयांट भी भयो नहीं ।। ४ ।। कहे निपटनिरंजनलाल । मिले जब सद्गुरु दयाल । तब एक पलखमो उजाल । सब खलकभर अलख दिखायो ।। ५ ।।

स्वतः होणारा योग :–

शक्तिपातयोगमार्गाचे पाचवे वैशिष्टच हे आहे की, गुरुकृपेने शक्ती जागृत झाल्यावर शिष्य स्वतःच या योगमार्गाची वाट चालू लागतो. कारण शक्तिपात योग हा स्वतः होणारा योग आहे. एकदा का गुरूने आपल्या शिष्यावर शक्तिपात करून दैवी शक्ती संक्रमित केली की शिष्य आपोआप आसन, प्राणायाम, मुद्रा, प्रत्याहार, धारणा व ध्यान या गोष्टी सहजपणे आत्मसात करतो. यासाठी त्याला कोणाचेही मार्गदर्शन घेण्याचे कारण पडत नाही. कारण जागृत झालेली शक्तीच साधकाला सतत आतून मार्गदर्शन करीत असते. त्यामुळे डोळे मिटून बसण्यापलीकडे साधकाला कोणत्याही प्रकारची विशिष्ट मेहनत किंवा त्रास करून घ्यावा लागत नाही.

दीक्षा झाल्याबरोबर साधकाचे शरीर, मन, बुद्धी, व वासना यांचे शुद्धीकरण सुरू होते. ज्याला त्याला त्याच्या संस्काराप्रमाणे अनुभव येऊ लागतात. कोणाला घूर्णा म्हणजे शरीर गरगर फिरणे होते. तर कोणाला योगासने होतात. ज्याला योगासनांचा गंधही नाही असा अशिक्षित साधकही योगमुद्रा, शीर्षासन, जालंधर बंध, दीर्घ कुंभक, भ्रामरी इत्यादी करू लागतो. हसणे, रडणे, जमिनीवर लोळण घेणे, शरीरावर आघात करून घेणे, जोराने गाणे, ओरडणे, भजन म्हणणे, नाम घेणे, ओंकाराचा दीर्घ उच्चार करणे, जमिनीवर निश्चेष्ट पडणे, झोप लागणे इत्यादी क्रिया होऊ लागतात.

शक्ती जागृत झाली की मूलाधारात कंपन सुरू होते. शरीर थरथर कापू लागते. श्वासप्रश्वास जोराने चालू होतात. आत्यंतिक आनंद होतो. नाचावेसे वाटते. शरीराचा तोल सांभाळता येत नाही. अंगावर रोमांच उभे राहातात. रड़ू येते. मुखातून चमत्कारिक शब्द निघू लागतात. अतिशय भीती उत्पन्न होते. घाम फुटतो. मूत्रोत्सर्ग होतो. क्वचित वीर्यपात होतो. केवल कुंभक होतो. मन बाह्यज्ञानरहित होते. उड्डीयान, जालंधर मूलबंध आपोआप होतात. खेचरी मुद्रा होते. दृष्टी भ्रुकुटीमध्ये, नासाग्री किंवा हृदयस्थानी स्थिर होते. मन शून्य होते. प्रणवजप आपोआप होतो. सुषुम्नेतून प्रवाह वरवर चढल्यासारखा वाटतो. मनाला निरतिशय सुख प्राप्त होते. सर्वत्र शून्य भासते. भयानक काळोख किंवा प्रखर उजेड दिसतो. नेत्र उघडण्याचा प्रयत्न केला तरी उघडत नाहीत. शरीर शून्य होऊन नाना प्रकारचे अनाहत नाद ऐकू येऊ लागतात. शरीर खेचले जाते.

वरवर तरंगत आहे असे वाटते. शरीराला विजेचे झटके बसत आहेत असे वाटते.

काही वेळा शरीर जमिनीवर निश्चेष्ट पडते. नाड्या आतल्या आत खेचल्यासारख्या वाटतात. शरीरातून प्राण बाहेर चालले आहेत असा भास होऊन प्राण कासावीस होतात. शरीर बेडकासारखे उड्या मारते, डोलते व हाताने रगडले जाते. बुक्क्या मारून घ्याव्याशा वाटतात. टाळ्या व चुटक्या वाजवून साधक गाऊ लागतो

मनात आवेश येतो. शरीरात कोणत्यातरी अद्‌भुत शक्तीचा संचार झाला आहे असे वाटते. कितीही आसने व क्रिया झाल्यातरी थकल्यासारखे वाटत नाही.

साधनाच्या वेळी शक्ती शरीराचा ताबा घेते. त्यावेळी आतून उसळून येणाऱ्या क्रिया केल्याशिवाय त्याला बरेच वाटत नाही. त्यावेळी मन आनंदात मग्न होऊन मस्त बनल्यामुळे परिस्थितीचे भान राहात नाही. भांगेसारख्या पदार्थांचे सेवन केल्यासारखी धुंदी येते. स्थळ-काळाचे भान हरपून जाते. शरीर हलके होते. हवेतून चालल्यासारखे वाटते. मन नेहमी प्रसन्न व प्रफुल्लित राहाते. इष्ट-अनिष्ट गोष्टी घडल्या तरी मन विचलित होत नाही.

साधक कविता करू लागतो. ग्रंथलेखन करतो त्याच्या वाणीत अद्‌भुत तेज येते. त्याला भूत, भविष्य व वर्तमान कळते. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचे दिव्य अनुभव येतात. वेदवेदांताचे मर्म लक्षात येते. कोणत्याही शास्त्रात गती प्राप्त होते.

साधनात साधकाला देवतांची दर्शने होतात. मंत्र स्फुरतात. रोगांना औषधी मिळते. आतले शरीर किंवा सूक्ष्म शरीर आपल्या दृष्टीपुढे दिसू लागते. स्थूल शरीराचे अस्तित्व संपून जाते. डोळे उघडल्यावरही काही वेळ सर्वत्र शून्यतेचा भास होतो.

सकाळसंध्याकाळ ठराविक वेळ झाली की साधनाला बसल्याशिवाय साधकाला चैनच पडत नाही. काही वेळेस साधकाला स्वप्नात अगर साधनाच्या वेळी भयंकर आकृती व रूपे दृष्टीस पडतात. देवता, गुरू किंवा पितरांचे दर्शन होते. राम, कृष्ण, शिवलिंग आदी दर्शने होतात. पुस्तक, वस्त्र, स्त्रिया, बालक, सूर्य, चंद्र, तारे, ज्योती, नदी, समुद्र, तलाव, पर्वत, वृक्ष, जल, गाय, घोडा, सिंह, वाघ, पशू, पक्षी, सर्प, अन्न, पुष्प, फल, दूध या गोष्टीही ध्यानात दिसतात. वेदध्वनी ऐक येतो. आपण मृत्यू पावलो आहोत असे दिसू लागते.

अशा प्रकारे शरीर, मन, बुद्धी व प्राण यांच्या शुद्धीसाठी ज्याला ज्या आसनांची आवश्यकता असते ते आपोआप सुरू होते. साधकाला दोष घालविण्यासाठी स्वतः काहीही करावे न लागता शक्ती साहाय्य करते. शिष्य निरोगी, तरुण, मन व इंद्रिये यांवर ताबा असलेला, वर्णाश्रमधर्माचे नियम पाळणारा, देव, ब्राह्मण व गुरू यांच्यावर पूर्ण श्रद्धा असलेला असेल, तर अशा साधकावर शक्तिसंक्रमणाचा ताबडतोब परिणाम होतो.

वरील सर्व क्रिया ज्याच्या त्याच्या पूर्वसंस्काराप्रमाणे घडून येतात. अमुक क्रिया होतील किंवा होणार नाहीत हे सांगता येत नाही. त्याचप्रमाणे अमुक क्रिया आपणास झाल्या पाहिजेत व अमुक नको असाही साधकाला आग्रह धरता येत नाही. साधकाच्या प्रगतीसाठी ज्या क्रिया आवश्यक असतील त्या होत राहातील व नको असलेल्या होणार नाहीत किंवा थांबून जातील.

आपत्तिरहित साधन :–

शक्तिपातयोगमार्गाचे सहावे वैशिष्टय हे आहे की, या साधनात साधकाला कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा इजा होण्याची भीती नसते. साधक शारीरिक, मानसिक व सांस्कारिक दृष्टीने ज्या अवस्थेत असेल त्या अवस्थेतून शक्ती त्याला पुढे नेत असते. अशा वेळी ज्या क्रियादी गोष्टी घडून येतात. त्या साधकाला पेलतील व कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही इतक्याच तीव्र, मध्यम किंवा मंद असतात. गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय आसने, प्राणायाम वगैरेचा अभ्यास करीत असताना धोका उत्पन्न होण्याचा खूप संभव असतो. **"अयुक्ताभ्यासयोगेन सर्वरोगसमुद्भवः।"** असे हठयोग प्रदीपिकेमध्ये या धोक्याचे वर्णन केले आहे. म्हणजे हठयोगातील अभ्यासातील चुकांमुळे वाटेल त्या तऱ्हेच्या शारीरिक व्याधी उत्पन्न होऊ शकतात. परंतु शक्तिपातयोगमार्गाच्या सांप्रदायातील साधना ही एक नैसर्गिक साधना आहे. ही साधना इतकी श्रेष्ठ आहे की, ती नरदेह सर्व प्रकारच्या व्याधींपासून मुक्त व शुद्ध करते, इतकेच नव्हे तर असाध्य रोगही नाहीसे करते.

संसारी मनुष्यही या साधनेपासून मिळणाऱ्या लाभांनी आपले कल्याण करून घेऊ शकतो. परमानंद व मनःशांती हे दोन महान लाभ या साधनेमुळे अनायासे पदरात पडतात.

जो साधक इतर कोणत्याही प्रकारच्या साधनाचा अवलंब करून योगाचा अभ्यास करतो, त्याला निरनिराळ्या आपत्तींना तोंड द्यावे

लागते व परम कल्याण होईपर्यंत अतिशय शिस्तबद्ध जीवन जगावे लागते. परंतु या साधनात इतर साधनांइतके शिस्तबद्ध जीवन जगता आले नाही तरी परमानंद प्राप्त होतोच. शिवाय साधकातील कुंडलिनी शक्ती जागृत होताच ती त्याला आत्मप्रचीतीपर्यंत घेऊन जाते. साधक परमोच्च ब्राह्मी-स्थितीस पोहोचेपर्यंत शक्तीचे कार्य अव्याहत चालू असते. मध्यंतरी जर साधन अपूर्ण राहिले, मृत्यू आला, अनेक जन्म घ्यावे लागले तरी जागृत झालेली शक्ती झोपी न जाता तशीच जागृत राहाते व आपले उद्दिष्ट पूर्ण करते.

इतर साधनांची अनावश्यकता :–

शक्तिपातयोगमार्गाचे सातवे वैशिष्ट्य हे आहे की, एकदा का सद्गुरुकृपेने शिष्याची योगशक्ती जागृत झाली, की इतर साधनांचे महत्त्व शिल्लक राहात नाही. "हे नामदेवा ! तुला गुह्य ज्ञान सांगितले व निजस्वरूपाचा प्रत्यय आणून दिला. तेव्हा तुला अन्य साधनांच्या खट-पटीची काय आवश्यकता आहे ?" असे श्रीनामदेवांचे गुरू श्रीविसोबा खेचरराय यांनी नामदेवास बजावून सांगितले त्याचे कारण हेच आहे. आसन, प्राणायाम, मुद्रा, ध्यान, धारणा व इतर योगाचे प्रकार यांनाही काही महत्त्व उरत नाही. कारण या सर्व गोष्टी शक्तिजागृतीसाठीच कराव्याच्या असतात. अर्थात श्रीगुरुकृपेने शक्ती आधीच जागृत झाल्याने इतर योगक्रियांची व साधनांची आवश्यकताच संपून जाते.

शक्तिपातमार्गाद्वारे साधकास एकदा दीक्षा मिळाली की मग तो स्वत: योगाच्या कोणत्याही मार्गाचा अवलंब करू शकत नाही. इतकेच नव्हे तर त्याने तसा प्रयत्न केला असता त्याला सुखही लाभत नाही.

साधकानेही मनातून नानाविध साधनांतून व मंत्रतंत्राच्या जालातून स्वत:ला निश्चयाने मुक्त करून व इतर अवडंबरांचा त्याग करून हे साधनच आपल्याला तारील असा निश्चय ठामपणे मनात बाणवून अभ्यास केला पाहिजे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनुभवामृतात सद्गुरुकृपेनंतर इतर साधनांचे महत्त्व कसे शिल्लक राहात नाही हे सांगताना म्हटले आहे की –

जो भेटलियाचि सवे। पुरती उपायांचे धावे। प्रवृत्तिगंगा स्थिरावे। सागरी जिये ॥ २–८ ॥

यावर टीका करताना श्रीनिरंजन रघुनाथ म्हणतात –

जो भूमास्वरूप गुरू भेटला असता, अपरोक्षत्वेकरून अनुभविला असता, मोक्षाविषयी श्रवणमननादी नाना उपायांचे धावे पुरती, यत्न सरतात, का जे शिष्य जो तो आपणचि होतो म्हणून. आणखी प्रवृत्ती म्हणजे प्राक्प्रवणवृत्ती हेचि कोण्ही एक गंगा जे ती अपारावार गुरु तल्लक्षण सागर जो त्याचे ठायी स्थिरावे, विलयाते पावते.

स्वप्रयत्नशून्य साधन :–

शक्तिपातयोगमार्गाचे आठवे वैशिष्टय हे आहे की, सकाळ संध्याकाळ साधकाने नियमितपणे ठराविक वेळी डोळे मिटून आसनावर बसले पाहिजे. या मार्गातील स्वप्रयत्नाचा भाग एवढाच आहे. एकदा साधक डोळे मिटून आसनावर बसला की डोळे उघडीपर्यंत त्याने आतून ज्या क्रिया होतील त्यांना अगदी मुक्तपणे वाव दिला पाहिजे. ज्या ज्या क्रिया आतून होतील त्यांना कसलाही विरोध न करता व मध्ये अडचण न आणता साधकाने फक्त निरीक्षकाची भूमिका घेऊन त्या क्रिया नियंत्रित करण्याचा प्रयत्न कधीही करता कामा नये. साधनाच्या वेळी घडणाऱ्या क्रिया दवी शक्तीकडून विवेकबुद्धीने आतून चालविल्या जातात. ज्या ज्या क्रिया घडून येतात त्यामुळे साधकाला अतिशय समाधान लाभते.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी या मार्गातील प्रयत्नाचे व त्याच्या फलाचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे –

"या मार्गातील प्रयत्नाचा भाग एवढाच आहे की, निश्चलपणे बसून राहाणे होय. या साधनाच्या नियमित अभ्यासाने विषयांचा विसर पडतो. इंद्रियाचे चांचल्य व तळमळ नाहीशी होते. मनाचे मनपण व हाव संपून ते हृदयात विलीन होऊन जाते. नियमित अभ्यास केल्याने निरनिराळ्या क्रिया होऊन अभ्यासाचा कृपाप्रसाद घडून येतो. अभ्यासाच्या सातत्याने मनाची गती कमी होते व मनोविकार आपोआप बंद पडून सर्व मनोधर्माचे अस्तित्वच नाहीसे होते. कल्पना खुंटते. संकल्प विकल्प मावळून विचार संपतात व अनिर्वचनीय असे महासुख प्राप्त होते.

जे कोणी दृढनिश्चयाने शेवटपर्यंत या योगाचा अभ्यास करतात ते स्वतःच ते अनिर्वचनीय सुख बनतात. हे साधन जे कोणी आपले शरीर झिजवून करतात ते शुद्ध होऊन परमेश्वराच्या योग्यतेस पोहोचतात. ब्रह्मानुभवाचा अंतरंगात उदय झाल्याबरोबर साधकाला विश्व भासेनासे होते. हा अभ्यास जे पराकाष्ठेच्या दृढतेने करतात ते निश्चितपणे ब्रह्मपदाला पोहोचल्याशिवाय राहात नाहीत. साधकाने अभ्यासाचे पाऊल

उचलून मार्गक्रमण केले तरच तो आयुष्य संपण्यापूर्वी मोक्षप्राप्तीच्या गावाला पोहोचू शकतो. एरवी दृढ अभ्यासाशिवाय हे शक्य नाही."

महर्षी पतंजलीनी सांगितलेली पुढील तीन सूत्रे या दृष्टीने लक्षात ठेवण्यासारखी आहेत. "**तीव्रसंवेगानामासन्नः ॥**" म्हणजे जो फार प्रयत्नशील असतो त्याला या योगात लवकर यश मिळते. "**मृदुमध्याधिमात्रत्वात् ततोऽपि विशेषः ॥**" साधनेतील मंद प्रयत्न, मध्यम प्रयत्न व उत्कट प्रयत्न यांच्या अनुसार साधकांना प्राप्त होणाऱ्या यशामध्येही फरक पडतो "**स तु दीर्घकालनैरन्तर्य्यसत्कारासेवितो दृढभूमिः ॥**" अभ्यास दीर्घकाल, खंड न पडता व अत्यंत श्रद्धाभक्तिआदरपूर्वक केला म्हणजे तो अभ्यास दृढ होतो (व परमपदाची प्राप्ती होते)

श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी देखील नित्यनियमित साधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे ते अवश्य लक्षात ठेवले पाहिजे.

कांहीं तरी एक कारण। कैसे घडे यत्नेंविण । ब्रह्मज्ञान परम कठीण। साधनावाचूनि ॥ नित्यनेम दृढ चित्तीं। तेणें शुद्ध चित्तवृत्ती। होवोनि भगवंतीं। माग फुटे ॥ नित्यनेमे भ्रांती फिटे। नित्यनेमे संदेह तुटे। नित्यनेमे लिगटे। समाधान अंगी ॥ नित्यनेमे अंतर शुद्ध। नित्यनेमे वाढे बोध। नित्यनेमे बहुखेद । प्रपंची तुटती ॥ नित्यनेमें सत्त्व चढे। नित्यनेमे शांति वाढें। नित्यनेमे थारा मोडे। देहबुद्धीचा ॥ नित्यनेमे दृढभाव। नित्यनेमे भेटे देव। नित्यनेमे पुसे ठाव। अविद्येचा।

श्रीशंकरांचे उदाहरण देऊन साधन का व कसे केले पाहिजे तेही समर्थांनी सांगितले आहे.

जो सिद्धाचाहि सिद्ध । ज्ञानवैराग्य प्रसिद्ध। सामर्थ्यासिधु अगाध कैलासराणा ॥ तो सिद्ध करी साधन । सर्वकाळ रामचिंतन। ध्यान धारणा अनुष्ठान। चुको नेदी ॥ ऐसे अपार महामती। झाले ते साधन करिती। तरी ते मानव किती। बापुडे किंकर ॥ म्हणोनि साधनासी जो सिद्ध। तोचि ज्ञाता परम शुद्ध। येर जाणावे अबद्ध। अप्रमाण ॥ साधनेंविण बाष्कळता ॥ तीच जाणावी बद्धता। तेणें अनर्गळता। आसक्तरूपें ॥

• कपिल महामुनींनी सांख्यसूत्रात सांगितल्याप्रमाणे "**कृतनियमलंघनादानर्थक्यं लोकवत् ॥**" मूळ नियमांचे उल्लंघन केल्यास, इतर व्यावहारिक गोष्टीप्रमाणे येथेही ध्येयसिद्धी अशक्य होऊन बसते. म्हणून नियमादिकांचे पालन उत्तम रीतीने करून साधन करीत राहिले पाहिजे.

सर्वांना मुक्त साधन :—

शक्तिपातयोगमार्गाचे नववे वैशिष्ट्य हे आहे की, जगातील सर्व लोकांना हा मार्ग मोकळा आहे. स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध, तरुण, आस्तिक नास्तिक, स्वकीय, परकीय, रोगी, निरोगी, पापी, पुण्यवान इत्यादी सर्वांना हा मार्ग खुला आहे. काही ठराविक बंधने व नियम पाळल्यानंतर सर्वांना आत्मशक्ती जागृत झाल्यानंतर त्यांच्या त्यांच्या संस्कारा-प्रमाणे अनुभव येऊ लागतात. प्रत्येक मनुष्य हा ईश्वरी ज्ञानाचा अधिकारी असल्यामुळे देश, काल, धर्म, जाती इत्यादी कशाचेही बंधन या योगमार्गात आडवे येत नाही.

कर्म, जाती, अवस्था आणि आश्रम या गोष्टी योगसाधनाच्या किंवा तपस्येच्या आड येत नाहीत. चंदन व विष्ठा अग्नीत टाकल्यावर अग्नी दोन्ही गोष्टी ज्याप्रमाणे दग्ध करून शुद्ध करतो त्याप्रमाणे योगाग्नीत चांगले व वाईट सर्व नाहीसे होऊन मनुष्य ब्रह्मरूप होऊन जातो.

मनुष्यमात्राला दुःखनिवृत्तीचा उपाय कळावा व त्याला निरतिशय सुख प्राप्त व्हावे म्हणून ब्रह्मदेवाने एकदा महादेवांना पुढील प्रश्न केला. "हे शंकरा ! सर्व जीव सुखदुःखाच्या मायाजालात गुरफटून गेले आहेत. त्यापासून त्यांची मुक्ती कशी होईल हे कृपा करून सांगावे. ज्या मार्गाने सर्व सिद्धी प्राप्त होईल, मायाजाल तुटून जाईल, जन्म, मृत्यू, जरा, व्याधी इत्यादी सर्वांचा नाश होईल व ज्यापासून मोठे सुख प्राप्त होईल, असा मार्ग दाखवा.

त्यावर श्रीशंकरांनी ब्रह्मदेवाला सांगितले की, "हे ब्रह्मदेवा, परमपद कैवल्यरूप आहे. ते निरनिराळ्या प्रकारच्या मार्गांनी मोठ्या कष्टाने प्राप्त होते. मात्र सिद्धमार्गामुळे म्हणजेच शक्तिपातयोगमार्गा-मुळे ते कैवल्यपद सहज प्राप्त होते. इतक्या सहजतेने अन्य दुसऱ्या कोणत्याही मार्गाने कैवल्य मिळत नाही."

म्हणून अशा प्रकारे शक्तिपाताची दीक्षा देणारे सिद्धगुरू हे या भूतलावरील साक्षात् शंकरच होत हे निःसंशय.

एका दिव्याने दुसरा दिवा लावावा असे साधन :—

शक्तिपातयोगमार्गाचे दहावे वैशिष्ट्य हे आहे की एका दिव्याने दुसरा दिवा प्रज्वलित करावा असे हे साधन आहे. एकदा का गुरूने शिष्याची चैतन्यशक्ती जागृत केली, की ती स्वतः प्रज्वलित राहाते. पूर्वजन्माची शिदोरी व या जन्मीचे प्रयत्न यांच्या तेलाने हा दीप सतत

प्रज्वलित राहातो. एकदा जागृत अथवा प्रज्वलित झालेला हा दिवा कधीही विझत नाही.

जीवाची बहिर्मुख वृत्ती, शारीरिक रोग, मानसिक चिंता, शोक, भय, वृद्धावस्था, अशुद्धी, श्रद्धाहीनता, मनाचे जडत्व, पूर्वजन्मीचे दुष्ट संस्कार, पाप, संशय, प्रमाद, आळस, चित्ताची विषयाकडे ओढ इत्यादी अनेक गोष्टी साधनाच्या आड येऊन दिवा विझला आहे असे वाटावयास लावतात. त्यामुळे उदासीनता प्राप्त होते. परंतु नियमित सकाळ संध्याकाळ साधन केल्याने श्रीसद्गुरुकृपेने सर्व दोषांची निवृत्ती होऊन साधक परतीराला जाऊन पोहोचतो. रत्नमाला आगमामध्ये असे लिहिले आहे की,

यस्मिन्काले तु गुरुणा निर्विकल्पं प्रकाशितम् ।
तदैव किल मुक्तोऽसौ यंत्रं तिष्ठति केवलम् ॥

ज्यावेळी गुरूकडून निर्विकल्पाचा बोध शिष्याला प्रकाशित करून दिला जातो त्याचवेळी तो मुक्त होतो. त्यानंतर मात्र तो केवळ यंत्रवत होऊन राहातो.

ज्योत प्रज्वलित झाल्यावर शिष्याने फक्त साक्षीभावाने तिच्याकडे पाहावयाचे. ती स्वतः कार्यरत होऊन महाज्योतीत विलीन होईल.

म. म. गोपीनाथ कविराज यांनी म्हटल्याप्रमाणे " शक्तिपात होऊन कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय ब्रह्मप्राप्तीच्या महान मार्गाच्या वाटचालीला सुरुवातही होत नाही. मग ब्रह्मप्राप्तीची गोष्ट तर फारच दूरची आहे. शक्ती जागृत होणे हाच मनुष्य जीवनाचा खरा उद्देश आहे. केवळ अपूर्ण कैवल्य प्राप्त करून जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडून वरच्या दर्जाचे स्थान प्राप्त करणे हे मनुष्यजीवनाचे ध्येय असूच शकत नाही. आपली सुप्त भगवत्शक्ती जोपर्यंत पूर्णपणे जागृत होत नाही. तोपर्यंत मनुष्य जीवनाचे खरे सार्थक होत नाही. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय जड व चैतन्य यातील संघर्ष समाधानकारकपणे संपत नाही. विवेकज्ञानाचा उपयोग हा या मार्गाची वाटचाल सुरू करण्यास पहिली पायरी म्हणून ठीक आहे. परंतु शक्तीची साधना केल्याशिवाय शिवभावाची प्राप्ती होणे अत्यंत कठीण आहे."

प्रारब्ध जय व ज्ञानप्राप्ती:-

शक्तिपातयोगाचे अकरावे वैशिष्टय असे आहे की या योगमार्गाच्या अभ्यासानेच पिंडसिद्धी म्हणजे प्रारब्ध जय होऊन ज्ञानप्राप्ती होते. योगी लोक यामुळेच असे म्हणतात की शुष्क अशा ज्ञानमार्गापेक्षा हा

सिद्धमहायोगमार्ग श्रेष्ठ आहे. ज्ञानमार्गात देह परिपक्व होत नसल्याने प्रारब्धाचा जय होऊ शकत नाही. परंतु ज्याच्या ठिकाणी योगाग्नी उत्पन्न झालेला असतो त्याचा देह प्रारब्धाधीन राहात नाही. विद्यारण्य-स्वामींनी जीवन्मुक्तिविवेकात योगप्राबल्याचा विचार मांडताना असे म्हटले आहे की, **"प्रारब्धं कर्म यथा तत्त्वज्ञानात्प्रबलं तथा तस्मादपि कर्मणे योगाभ्यासः प्रबलोऽ स्तु । तथा च योगिनामुद्दालकवीतहव्यप्रभृतीनां स्वेच्छया देहपरित्याग उपपद्यते"** म्हणजे प्रारब्धकर्म हे तत्त्वज्ञानापेक्षा प्रबल आहे व प्रबल प्रारब्धकर्मापेक्षा योगाभ्यास प्रबल आहे. अशा प्रकारे योगाभ्यास श्रेष्ठ आहे असे स्वीकारले म्हणजे उद्दालक व वीत-हव्यप्रभृती योग्यांनी स्वेच्छेने देहपरित्याग केला हे जुळते. नाही तर त्यांना देहपरित्यागाकरिता प्रारब्धाधीन राहावे लागले असते. आपण अल्पायुषी आहोत, कमी आहोत व आपणास उद्दालकासारखा हा योग जमणार नाही असे साधकाने कधीही मनात आणता कामा नये. जन्म-जन्मांतरी केलेल्या साधनाचे फल म्हणून उपरोक्त योग्यांना महायोगाची प्राप्ती होऊन ते प्रारब्धजयी झाले. त्याप्रमाणे पुढे आपणासही असा उपयोग होईल व या जन्मात यावच्छक्य कामक्रोधलोभादींचा निरोध होईल असा विचार करून साधकाने योगाभ्यास केला पाहिजे. साधकाने या उलट विचार केला व शास्त्रीय प्रयत्न हे प्रबल नाहीत असे म्हटले तर वैद्यशास्त्रापासून मोक्षशास्त्रापर्यंतची सर्व शास्त्रे व्यर्थ होतील. शक्तिपातयोगाची दीक्षा होऊनही, या ग्रंथात पुढे जी फले सांगितली आहेत, ती क्वचित प्रसंगी आढळली नाहीत व एखाद्या साधकाला त्याचा अनुभव आला नाही तरी शास्त्रीय प्रयत्न म्हणजे शक्तिपात योगसाधन हे प्रबलच आहे हे त्याने पक्के ध्यानात ठेऊन साधन केले पाहिजे.

शास्त्रामध्ये असे सांगितले आहे की जन्म अथवा स्थूलदेहसंबंध, आयुष्य अथवा जीवनकाळ व भोग किंवा सुखदुःखबोध ही सर्व प्रारब्ध-कर्माची फले आहेत. प्रारब्धकर्माला ओलांडून जाणे, तोडणे किंवा त्याचे खंडन करणे शक्य नसल्यामुळे जात, जन्म, आयुष्य, भोग इत्यादी कोणत्याही गोष्टीत परिवर्तन होऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर ज्ञानाचा उदय झाल्यावरही जेव्हा सर्व संचित कर्मे जळून जातात व क्रियमाण कर्मे शिल्लक राहात नाहीत तेव्हा प्रारब्ध मात्र शिल्लक राहाते. या प्रारब्धकर्माचा केवळ भोगूनच क्षय होतो. प्रारब्ध कर्म शिल्लक राहात असल्यामुळे ज्ञानोदयाबरोबर देह पडत नाही. हे -

न्मुक्ती व विदेहमुक्तीत जो फरक आहे त्याचे हेच खरे कारण आहे. यामुळे जीवन्मुक्त पुरुषही प्रारब्धरहित होत नाहीत. सौभरीमुनी, चंद्र, मांडव्यमुनी शिखिध्वज, कवी, हरी इत्यादी योगी, नारद, ध्रुव, वामदेव, ऋषभदेव अगस्ती इत्यादी सर्व लोकांच्या चरित्राकडे पाहिले म्हणजे हे लक्षात येते की तत्त्वज्ञानाने प्रारब्धाचा क्षय होत नाही.

यासाठीच सिद्धमहायोगाचा महिमा मोठा आहे. सर्वसिद्धांतसंग्रहामध्ये शंकराचार्यांनी अगदी स्पष्टपणे असे म्हटले आहे की केवळ ज्ञानानेच साधकाला मुक्ती मिळत नाही. सद्गुरूंच्या उपदेशाने विद्यालाभ होऊन अविद्येची निवृत्ती होते. परंतु देहशुद्धी झाल्याशिवाय देहरूपी आरशाचे दोष नष्ट होत नाहीत. योगाभ्यास हा देहशुद्धीचा एकमात्र उपाय आहे. यामुळे ज्या लोकांना ज्ञानप्राप्ती झालेली असते त्यांच्यामध्येही कधी कधी देहामुळे दोष उत्पन्न होऊन व ते प्रबल होऊन त्यांची बुद्धी भ्रांत झालेली दिसते. यासाठी ज्ञान व वैराग्य प्राप्त झाले तरी सुध्दा दोषक्षयासाठी साधकाने योगमार्गाचा अवलंब करणे अपरिहार्य ठरते. गुळाची किंवा अन्य पदार्थांची चव माहीत असूनही ताप आल्यावर रोग्याच्या जिभेला त्या पदार्थाच्या चवीचा अनुभव तापामुळे येत नाही. त्याचप्रमाणे आत्म्याचे शब्दद्वारा सम्यक ज्ञान झाले तरी योगाच्या शिवाय अपरोक्षानुभूती होत नाही.

ज्ञान परोक्ष व अपरोक्ष असे दोन प्रकारचे आहे. गुरूने शिकविल्यावर व शास्त्राचे वाचन झाल्यावर जे ज्ञान होते त्याला परोक्ष ज्ञान असे म्हणतात. ज्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो त्याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात. हे अपरोक्ष ज्ञान साधनावरच अवलंबून असल्यामुळे हठयोगप्रदीपिकेच्या ४ थ्या प्रकरणात असे म्हटले आहे की—

यावन्नैव प्रविशाति चरन् मारुतो मध्यमार्गे । यावद्बिंदुर्न भवति दृढप्राणवातप्रबंधात् ॥ यावद्ध्याने सहजसदृशं जायते नैव वत्त्वं । तावज्ज्ञानं वदति तदिदं दंभमिथ्याप्रलापः ॥ ११४ ॥

जोपर्यंत सुषुम्णामार्गामध्ये प्राणवायूचा संचार होऊन सहस्त्रारामध्ये असलेल्या ब्रह्मरंध्रामध्ये तो प्रवेश करीत नाही, जोपर्यंत केवलकुंभकसाधन आपोआप घडून येऊन बिंदू म्हणजे वीर्य स्थिरभाव धारण करीत नाही व जोपर्यंत सहजासहजी चित्त वृत्ती ध्येयाकार व निर्विषय होऊन तत्त्वज्ञान उत्पन्न होत नाही तोपर्यंत शब्दामुळे झालेल्या व शास्त्रवाचनाने कळलेल्या शाब्दिक ज्ञानाचे कथन या गोष्टी अक्षरशः दांभिक व खोटचा ठरतात.

अखंड वस्तूलाच वास्तविक तत्त्व म्हणतात. ह्या अखंड वस्तूच्या म्हणजे चैतन्याच्या संबंधी जे ज्ञान असते त्याला तत्त्वज्ञान म्हणतात. या तत्त्वालाच भक्त लोक भगवान, ज्ञानी लोक ब्रह्म व योगी लोक परमात्मा म्हणतात. या अखंड तत्त्वाची प्रत्यक्ष अनुभूती येणे हे फार महत्त्वाचे आहे. दिवा लावला की अंधार आपोआप नाहीसा होतो. मात्र नुसते दिवा, दिवा असे ओरडले किंवा गोंधळ घातला तरी अंधकार नाहीसा होत नाही. या प्रकारेच आत्मा, परमात्मा, ब्रह्म इत्यादी व त्यासंबंधी नुसते बोलून, सांगून किंवा आरडाओरडी करून आत्मस्वरूपाचे दर्शन होत नाही. एकमात्र साधनानेच आत्मस्वरूपाचे किंवा ब्रह्मस्वरूपाचे दर्शन होते. " सच्चिदानंदरूपी आत्मा व ब्रह्म आहे " असे म्हणणे याला परोक्ष ज्ञान म्हणतात आणि " मीच सच्चिदानंद स्वरूप आत्मा किंवा ब्रह्म आहे " अशा प्रकारच्या साक्षात् अनुभूतीला अपरोक्ष ज्ञान म्हणतात. पंचदशी-मध्ये या दोन्ही ज्ञानांची व्याख्या करताना असे म्हटले आहे की –

अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्षज्ञामेनवेतत् ।
अहं ब्रह्मेति चेद्वेद अपरोक्षं तदुच्यते ।।

नुसते ब्रह्म आहे असे म्हणून परोक्ष ज्ञान होण्यापेक्षा मी साक्षात् ब्रह्म आहे अशी अपरोक्षानुभूती येणे हे खरे ज्ञान आहे. कारण योग-शिखोपनिषदात असे म्हटले आहे की –

पतिताः शास्त्रजालेषु प्रज्ञया तेन मोहिताः ।
स्वात्मप्रकाशरूपं तत् किं शास्त्रेण प्रकाश्यते ।।

जे लोक न्याय व्याकरणादी शास्त्रांच्या जाळ्यामध्ये गुरफटलेले असतात ते त्यातील प्रमेयादिकांनी मोहित होऊन अगदी मुग्ध होऊन जातात. त्यांची बुद्धी शास्त्रांच्या पलीकडील तत्त्व पाहाण्यास व त्या तत्त्वाचे आकलन करण्यास अगदी असमर्थ ठरते. किंबहुना त्याच्या पलीकडे काही आहे व असू शकते याची जाणीव त्यांना होत नाही. त्यामुळे केवळ शास्त्राध्ययनाने आत्मस्वरूपाची प्राप्ती म्हणजे अनुभूती त्यांना येऊ शकत नाही. स्वतःच प्रकाशस्वरूप असलेल्या आत्म्याला शास्त्र प्रकाशित करू शकत नाही.

उपरोक्त अपरोक्षानुभूतीसाठी शक्तिपातयोगाचीच कास धरली पाहिजे हे सांगताना शास्त्रकारांनी म्हटले आहे की –

दुर्लभो विषयत्यागो दुर्लभं तत्त्वदर्शनम् ।
दुर्लभा सहजावस्था सद्गुरोः करुणांविना ।।

जोपर्यंत सद्गुरू आपली कृपापूर्ण दृष्टी शिष्यावर टाकून शक्तिपाताने आदिमाया कुंडलिनी शक्तीची जागृती करीत नाहीत तोपर्यंत विषयत्याग, तत्त्वदर्शन व सहजावस्था या तीनही गोष्टी घडून येणे कदापीही शक्य नाही. हे जर घडून यावे असे वाटत असेल तर साधकाला शक्तिपातयोगाचे साधन मिळालेच पाहिजे.

नासिकेत पुराणामध्येही योगाचा महिमा सांगताना म्हटले आहे की –

अग्निहोत्रमिदं तात संसारस्य तु बंधनम्। जन्ममृत्युमहामोहाः संसारे पततां ध्रुवम् ॥ योगाभ्यासत्परं नास्ति संसारार्णवतारणम्। ब्रह्माद्या देवताः सर्वे इंद्राद्याः कश्यपात्मजाः ॥ सर्वे योगवशात्सिध्दा गतास्ते परमां गतिम् ॥

अग्निहोत्रादी कर्मकांड हे संसाराचे बंधनच आहे. या महामोहरूपी संसारात जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडून जीव अनंत कालपर्यंत भटकत राहातो हे अगदी ध्रुवसत्य आहे. या संसाररूपी समुद्रातून पार होण्याला योगाशिवाय दुसरा उपाय नाही. ब्रह्मदेव, कश्यपाचे पुत्र व इंद्रादिक सर्व देवता योगाच्या प्रभावानेच सिद्ध होऊन श्रेष्ठ गतीला गेल्या. इतके सांगण्याचे कारण असे आहे की जो मनुष्य योगाची कास धरीत नाही त्याची स्थिती "**स्वर्गं गत्वा पुनर्जन्म संसारे भवति ध्रुवम्**" म्हणजे स्वर्गात जाऊन जीव पुन्हा भूतलावर जन्म घेतो अशी होते. यासाठी शास्त्र सांगते की "**योगाभ्यासात्परं नास्ति न भूतो न भविष्यति**" या भूतलावर सिद्धमहायोगासारखे साधन झाले नाही व पुढे होणारही नाही.

योगबीज नावाच्या सिद्धमार्गाच्या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की कामादी नानाविध दोषांनी झाकलेला जीव केवळ ज्ञानाने मुक्तीचा लाभ करू शकत नाही. योगशिखोपनिषदाच्या पहिल्या अध्ययातही असेच म्हटले आहे की–

ज्ञाननिष्ठो विरक्तोऽपि धर्मज्ञो विजितेंद्रिय ॥ २४ ॥
विना देहेन योगेन न मोक्षं लभते विधे ॥

शंकर ब्रह्मदेवांना सांगतात की हे ब्रह्मदेवा ! साधक जरी ज्ञाननिष्ठ, विरक्त, धर्मज्ञ व जितेंद्रिय असला तरीसुद्धा योगाशिवाय म्हणजे योगाच्याद्वारा चित्तशुद्धी झाल्याशिवाय सामान्य देहाने मुक्तीचा लाभ करू शकत नाही. ज्याप्रमाणे मातीच्या कच्च्या घडग्यात भरलेले पाणी हळूहळू गळून जाऊन शेवटी ते मातीचे भांडे नष्ट होते त्याप्रमाणे

योगहीन देहावर नानातऱ्हेच्या रोगांचे आक्रमण होऊन चित्त चंचल होते व देह अकालीच मृत्युमुखी पडतो. पक्व व अपक्व असे देहाचे दोन प्रकार आहेत. योगाग्नीच्या शिवाय देहाला परिपक्व करण्याचा दुसरा कोणताही उपाय नाही आणि शक्तिपात झाल्याशिवाय म्हणजे कुंडलिनी जागृत झाल्याशिवाय हा योगाग्नी उत्पन्न होऊ शकत नाही. योगाग्नी उत्पन्न झाला की साधकाचा अपक्व देह हळहळू पक्व होऊ लागतो. त्यामुळे जडता, शोक, शीत, उष्ण, सुख, दुःख, मानसिक व्याधी, दुश्चिता इत्यादी सर्वांपासून तो विमुक्त होतो. जे योगी नसतात त्यांचा देह अपक्व, जड, पार्थिव व दुःखप्रद असतो. " योगबीज " या ग्रंथात अगदी स्पष्टपणे असे सांगितले आहे की योगाशिवाय ज्ञान, वैराग्य, जप इत्यादी सर्व गोष्टी अगदी अर्थशून्य व विफल ठरतात. जे लोक योगाचा आश्रय घेऊन त्याच्या बलावर देहाला परिपक्व करण्यास असमर्थ ठरतात ते ध्यानस्थ बसले तरी सुद्धा इंद्रियांना आपल्या ताब्यात ठेवू शकत नाहीत. त्यांनी तीव्र निग्रह केला तरी कामक्रोधादी शत्रूंचे दमन ते करू शकत नाहीत. इतकेच नव्हे तर मानसिक दुःखामध्ये ते अविचलित राहू शकत नाहीत. अग्नी, वायू, जल, शस्त्र इत्यादींच्या प्रभावाने अपक्व देहाला त्रास होतो व चित्तामध्ये क्षोभ उत्पन्न होतो. अपक्व देहामध्ये प्राण व अपान यांचा साम्यभाव राहात नाही. त्यामुळे वायूच्या चांचल्याने चित्त चंचल होऊन नाना प्रकारच्या दुःखांचा मनात उदय होतो. जोपर्यंत चित्त जय होत नाही तोपर्यंत साधकाच्या मनाला शांती मिळत नाही. यासाठी साधकाला स्वाधीनता, परिपक्वता व चित्तशांती प्राप्त करावयाची असेल तर सिद्धमहायोग हाच एकमेव मार्ग आहे. शक्तिपातयोगाचा त्याग करून शास्त्राध्ययन, विचार, आचार, कर्मकांड, भजन इत्यादी कोणताही मार्ग साधकाने स्वीकारला तरी यापैकी कशानेही त्याला स्वस्वरूप व स्वसंवेद्य अशा आत्मस्वरूपाची प्राप्ती होऊ शकत नाही. देह, बुद्धी, मन, इंद्रिये इत्यादी सर्वांचे आक्रमण तोडून जर पुढे जावयाचे असेल तर सिद्धयोगसोपानाची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही असेच म्हणावे लागते.

असे हे योगाचे माहात्म्य असल्याचे कूर्मपुराणातही सांगितले आहे.

योगाग्निर्दहति क्षिप्रमशेषं पापपंजरम् ।
प्रसन्नं जायते ज्ञानं ज्ञानान्निर्वाणमृच्छति ।।

योगरूप अग्नी अत्यंत शीघ्रतेने पापांचे डोंगरच्या डोंगर जाळून टाकतो. मग ज्ञान प्राप्त होते व त्या ज्ञानामुळे मोक्ष प्राप्ती होते.

अत्रीसंहितेमध्येही योगानेच ज्ञानाची प्राप्ती होते हे सांगताना असे म्हटले आहे की –

योगात्सम्प्राप्यते ज्ञानं योगाद्धर्मस्य लक्षणम्। योगः परं तपोज्ञेय-स्तस्माद्युक्तः समाभ्यसेत् ।। न च तीव्रेण तपसा न स्वाध्यायैर्न चेज्यया। गतिं गंतुं द्विजाः शक्ता योगात्संप्राप्नुवंतियाम् ।।

योगानेच ज्ञानाची प्राप्ती होते. योगानेच धर्म प्राप्त होतो. योग हेच परम तप आहे. याकरिता योगाचा सतत अभ्यास करणे हेच उचित ठरते. शक्तिपातयोगाच्या अभ्यासाने साधकाला जी गती प्राप्त होते अशी गती उग्र तपाने, मंत्रजपाने किंवा यज्ञाच्या अनुष्ठानाने ब्राह्मण लोकसुद्धा प्राप्त करण्यास समर्थ होऊ शकत नाहीत.

योगाची ही महती पाहिली म्हणजे मनात असा प्रश्न येतो की शास्त्राने तर ज्ञान हेच मुक्तीचे साधन आहे असे आवर्जून सांगितले आहे. मग ते खोटे आहे कां ? ज्ञानाने मुक्ती होते की नाही ? जो कोणी साधक योग सोडून केवळ ज्ञानानेच साधन करतो त्याचे परिश्रम राखेमध्ये तूप ओतल्याप्रमाणे व्यर्थ जातात का ? अगदी हाच प्रश्न, योगबीज ग्रंथात पार्वतीने शंकराला विचारले आहे. ती म्हणते–

ज्ञानादेवहि मोक्षं च वदंति ज्ञानिनः सदा।
न कथं सिद्धयोगेन योगः किं मोक्षदो भवेत् ॥

हे शंकरा ! ज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाने मोक्षप्राप्ती होत नाही असे ज्ञानी लोक निक्षून सांगत आले आहेत. अशा वेळी आपण तर म्हणता की साधकाला सिद्धयोगानेच मोक्षप्राप्ती होईल. तेव्हा हे कसे शक्य आहे ? त्यावेळी शंकर म्हणाले,

ज्ञानेनैवहि मोक्षश्च तेषां वाक्यं तु नान्यथा। सर्वे वदंति खड्गेन जयो भवति तर्हि किम्। विना युद्धेन वीर्येण कथं जयमवाप्नुयात्। तथा योगेन रहितं ज्ञानं मोक्षाय नो भवेत् ।। रूपलावण्यसंपन्ना यथा स्त्री पुरुषं विना। तथा योगेन रहितो ब्रह्मज्ञानरतोऽपि वा ।।

हे पार्वती ! शास्त्राचे वचन खोटे नाही. ज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाने मोक्षप्राप्ती होत नाही हे अगदी खरे आहे. परंतु ज्ञान हे खड्ग, योग हे युद्ध व मोक्ष हा विजयलाभ आहे. मात्र खड्गानेच विजयाची प्राप्ती होते असे जे सर्व लोक म्हणतात त्यात काहीही अर्थ नाही. कारण तरवारीने विजयाची प्राप्ती होते यात कुठलाही संशय नसला तरी सुद्धा युद्ध केल्याशिवाय किंवा वीर्य म्हणजे पराक्रमाशिवाय

नुसत्या तरवारींच्या जोरावर एखादा योद्धा विजय प्राप्त करू शकेल अशी आशा करणे ही केवळ दुराशा आहे. कारण अशी गोष्ट घडणे कालत्रयीही शक्य नाही. त्याचप्रमाणे सिद्धयोगाच्या प्राप्तीशिवाय साधकाला केव्हाही मोक्षप्राप्ती होणे शक्य नाही. रूपलावण्यसंपन्न स्त्री असली तरी पुरुषाशिवाय तिला शोभा नाही व त्याच्याशिवाय पुत्रोत्पत्तीही होत नाही. त्याचप्रमाणे साधक ज्ञानरत असला तरी सुद्धा योगाशिवाय त्याला मोक्षाप्राप्ती होत नाही व त्याच्या ज्ञानाला शोभाही येत नाही.

सारांश, मोक्षप्राप्तीच्या साधनांमध्ये ज्ञानाला व योगाला प्राधान्य असले तरीसुद्धा उपरोक्त विवेचनावरून सिद्धयोगाचे साधनच श्रेष्ठ आहे हे मान्य करणे भागच पडते. योगशिखोपनिषदाच्या पहिल्या अध्यायात योगाचा हा महिमा अतिव सुंदरतेने स्पष्ट केला आहे.

देहान्ते ज्ञानिभिः पुण्यात् पापाच्च फलमाप्यते । ईदृशं तु भवेत् तत्तद् भुक्त्वा ज्ञानी पुनर्भवेत् ॥४९॥ पश्चात् पुण्येन लभते सिद्धेन सह संगतिम् । ततः सिद्धस्य कृपया योगी भवति नान्यथा ॥ ५० ॥ ततो नश्यति संसारो नान्यथा शिवभाषितम् । प्रविचार्य चिरं ज्ञानं मुक्तोऽहमिति मन्यते । किमसौ मननादेव मुक्तो भवति तत्क्षणात् ॥५४॥ पश्चाज्जन्मान्तरशतैर्योगादेव विमुच्यते । न तथा भवतो योगाज्जन्ममृत्यू पुनः पुनः ॥५५॥ योगेन रहितं ज्ञानं न मोक्षाय भवेद्विधे ॥५१॥ ज्ञानेनैव विना योगो न सिद्धति कदाचन । जन्मांतरैश्च बहुभिर्योगो ज्ञानेन लभ्यते ॥५२॥ ज्ञानं तु जन्मनैकेन योगादेव प्रजायते । तस्मायोगात् परतरो नास्ति मार्गस्तु मोक्षदः ॥ ५३ ॥

जेव्हा ज्ञानसाधन करणाऱ्या साधकाला मृत्यू येतो तेव्हा तो पापपुण्याचे फल भोगून पुन्हा जन्म घेतो. अशा प्रकारे पुष्कळ जन्मग्रहण केल्यावर त्या जन्मांमध्ये ज्ञानचर्चेमुळे जे पुण्य तो साठवितो त्यामुळे त्याला सिद्धाची संगती प्राप्त होते. त्याच्या कृपेमुळे साधकाला सिद्धयोगाची प्राप्ती होते. त्यामुळ तो योगसंपन्न होतो. सिद्धयोगाच्या साधनाशिवाय इतर कोणत्याही उपायाने हे घडून येऊ शकत नाही. सिद्धयोगाच्या साधनप्राप्तीमुळे त्याचा संसार असून नसल्याप्रमाणे होतो कारण या योगप्राप्तीमुळे त्याची अविद्या नाहीशी होते. या अविद्या नाशामुळे स्वयंप्रकाशरूप आत्मा प्रकाशित होतो. ही गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे असे शंकरांनी ब्रह्मदेवाला बजावून सांगितले आहे. ते पुढे म्हणतात की योगरहित ज्ञान साधकाला कधीही मोक्षसिद्धी देऊ

शकत नाही. जो ज्ञानी साधक शेकडो जन्म ज्ञानाभ्यास करतो त्याला सिद्धयोग प्राप्त होतो. मात्र सिद्धयोगाचे साधन मिळालेला साधकयोगी या साधनाच्या जोरावर एकाच जन्मात ज्ञानप्राप्ती करून घेऊन मुक्ती प्राप्त करू शकतो. यासाठी हा सिद्धयोग सोडून मोक्ष किंवा मुक्ती देणारा दुसरा कोणताही उपाय श्रेष्ठ नाही.

ज्ञानमार्गावरील साधक दीर्घकाल पर्यंत विचार करीत राहिला म्हणजे त्याच्या ठिकाणी ज्ञानाचा उदय होऊन " मी ब्रह्म आहे, " मी मुक्त आहे," अशा प्रकारचा बोध जागृत होतो व मी मुक्त आहे असे तो मानतो. अशा प्रकारे मनन करून साधकाला मुक्ती कशी प्राप्त होईल ? कारण अशा प्रकारची अनुभूती ही परोक्ष असल्याने शाब्दिक, आभासात्मक, अभिमानाने भरलेली व अहंकारयुक्त असते. वास्तविक पाहाता ज्ञानमार्गाने जाणाऱ्या साधकाला हजारो जन्मानंतर सिद्धयोगाची प्राप्ती होऊन तो मुक्त होतो. या प्राप्तीमुळे शाब्दिक कसरती व चर्चा संपतात. आभास, अभिमान व अहंकार गळून पडतात. विशुद्ध चित्तात आत्मज्ञान स्वभावतः साधकाच्या ठिकाणी अपरोक्षानुभूतीच्या रूपाने उदयाला येते. शक्तिपातयोगाच्या साधनाचा हा अपूर्व विशेष आहे. या साधनाच्या बलावरच साधकाला प्रारब्धावर मात करता येऊन ज्ञान-प्राप्तीने मोक्षसिद्धी गाठता येते.

श्रीकृष्णानीही गीतेत सिद्धयोगाचे माहात्म्य सांगताना " **जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते** " असे म्हटले आहे. म्हणजे योगाचे स्वरूप जाणण्याची इच्छा ज्याला होते त्याला पूर्व पुण्याईच्या बळाने सिद्धयोगाची प्राप्ती होऊन तो शब्दब्रह्म म्हणजे वेदांनी सांगितलेल्या कर्मफळाला उल्लंघून पलीकडे जातो. याचा अर्थ असा की या कर्मफळा-पेक्षा श्रेष्ठ फळ त्याला प्राप्त होते. सिद्धयोगाचे असे कोणते अपूर्व फल मिळते हे सांगताना या श्लोकाचा पुढील भावार्थ श्रीसंत ज्ञानेश्वरमहा-राजांनी सांगितला आहे. ते म्हणतात,

बळियें इंद्रियें येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजे गगना मिळोचि लागे ॥ ४६० ॥ ऐसें नेणों काय अपैसें । तया तेचि की जे अभ्यासे । समाधि घर पुसे । मानसाचे ॥ ४६१ ॥

ज्यावेळी सद्गुरुकृपेने साधकाला शक्तिपातयोगाची प्राप्ती होते त्यावेळी इंद्रिये बलवान असली तरी ती आपोआप मनाच्या स्वाधीन होतात. मन प्राणाशी एकरूप होते व मग तो प्राण चिदाकाशात मिळू लागतो. या सिद्धयोगाची ही अपूर्व विशेषता आहे की असे आपोआप

कसे होते हे सांगता येत नाही. पण योगाभ्यास साधकाकडून आपणहून केला जातो आणि समाधी साधकाच्या मनाच्या घराचा शोध करीत येते. श्रीकृष्णांनी यामुळेच अर्जुनाला अगदी आवर्जून उपदेश केला आहे की–

तपस्विभ्योधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ।। ६.४६ ।।

तपस्वी, ज्ञानी व कर्म करणाऱ्या सर्व लोकांपेक्षा वर सांगितलेले सिद्धयोगाचे साधन करणारा योगीच श्रेष्ठ आहे. म्हणून हे अर्जुना, तू योगी हो.

[आधार सातवा]

★ शक्तिपातयोगाचे स्वरूप ★

१) कल्पनातीत साधन
२) तत्काल प्रचीती देणारे साधन
३) सर्वतंत्रस्वतंत्र साधन
४) राधाकृष्णस्वरूप साधन
५) शिवशक्तिस्वरूप साधन
६) आत्मनिवेदनयोग साधन
७) मायानिरपेक्ष साधन
८) भक्तियोगाचा योगमार्ग



शक्तिपातयोगाचे स्वरूप लक्षात आले म्हणजे हे अपूर्व साधन कोणत्याही कक्षेत बसणारे नाही व मानवी मनाच्या साधनाच्या ज्या ज्या कल्पना व कक्षा आहेत त्या सर्वांना ओलांडून पलीकडे जाणारे व नेणारे हे साधन आहे हे लक्षात आले म्हणजे मन स्तिमित होऊन जाते.

कल्पनातीत साधनः–

ब्रह्म हे कल्पनातीत तत्त्व आहे. त्यामुळे त्याची व्याख्या करता येत नाही. वेदही "नेति नेति" म्हणून त्याबद्दल गप्प बसले आहेत. असे असल्यामुळे कल्पनांतर्गत येणाऱ्या साधनांनी ब्रह्मप्राप्ती होणे केवळ अशक्य आहे. वास्तविक पाहाता कल्पनेच्या कक्षेपलीकडे कोणतेही साधन नाही. परंतु शक्तिपातयोगात गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत झाली की कल्पनातीत शक्ती जागृत होते. ती स्वतः ज्या क्रिया करविते त्याची कल्पना कोणताही साधक करू शकत नाही. ही कुंडलिनी शक्ती सर्व शक्तिमान शक्तीतील ज्ञानयुक्त अशी श्रेष्ठ शक्ती आहे. कोणत्या साधकाला कोणत्या पद्धतीने पुढे नेणे आवश्यक आहे हे ती पूर्णपणे जाणते. श्वेताश्वतर उपनिषदात "**परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते। स्वाभाविकी ज्ञान बल क्रिया च** ॥ ६–८ ॥ असे म्हटले आहे. परमेश्वराची पराशक्ती नाना प्रकारची आहे असे कानावर येते. ती स्वभातःच ज्ञानक्रिया व बलक्रिया या रूपाने दिसून येते.

चित्ताशी तादात्म्य झाल्याने जीवाचे जीवत्व मिथ्या आहे. आत्मतत्त्वाचे कशाशीही तादात्म्य होत नाही. चित्त सूक्ष्म आहे. याकरिता जीव कर्तृत्वाभिमानाच्या आधीन असल्याने सर्व साधने प्रयत्नसाध्य आहेत. म्हणूनच कष्टसाध्य सर्व साधनांना सूक्ष्म अशा ब्रह्मतत्त्वप्राप्तीबद्दलच्या उपायांतर्गत मानले गेले आहे. तसे शक्तिपातयोगाचे साधन नसल्याने ते अलौकिक व अपूर्व ठरते.

या अर्थानेच श्रीसंत एकनाथमहाराजांनी स्वात्मसुख या प्रकरण ग्रंथात हे साधन कल्पनातीत आहे हे सांगताना म्हटले आहे की,

सुमने सांडूनि सकळे । गुणेवीण गुंफिजे परिमळे ।
तैसे आत्मसाधन केवळे । स्वात्मसिध्दीचे ।। ४२ ।।

फुले एकत्र गुंफण्याकरिता ज्याप्रमाणे दोऱ्याची आवश्यकता असते त्याप्रमाणे जी इतर अनेक साधने ब्रह्मप्राप्तीसाठी सांगितली आहेत त्यासाठी कशाचे तरी आलंबन आवश्यक असते. परंतु शक्तिपातयोग साधन हे कल्पनातीत असल्याने त्याला कोणत्याही आलंबनाची किंवा आधाराची आवश्यकता लागत नाही. या अर्थानेच श्रीएकनाथमहाराजांनी असे म्हटले आहे की सर्व फुले टाकून देऊन ती दोऱ्याशिवाय फक्त सुगंधाने गुंफावीत म्हणजे सुगंधाने सुगंध गुंफावा त्याप्रमाणे सर्व-अशेष-साधनांचा त्याग करून फक्त आत्मसाधनाचाच आश्रय साधकाने केला पाहिजे. कारण हे एकच साधन असे आहे की, जे साधकाला आपल्या गंतव्य स्थानापर्यंत स्वत: पोहोचविल्याशिवाय कधीही थांबत नाही. एकदा का साधक गुरुकृपेने या कल्पनातीत साधनाला समर्पित झाला की त्याचे जीवत्व संपून तो स्वत:सिद्ध अशी कल्पनातीत वस्तू होऊन जातो.

श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांनीही आपली उपासना ही कल्पनातीत उपासना असून ती गुरुकृपेने शक्तिपात होऊन कशी प्राप्त झाली हे स्पष्ट करून सांगितले आहे. समर्थ म्हणतात–

नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी । याकारणे तोषवावी । कोणी तरी काया ।। १५.९.२५ ।। उपासना शोधून पाहिली । तो ते विश्वपाळिती झाली । नकळे लीला परिक्षिली । न वचे कोणा ।। २६ ।। देवाची लीला देवेविण । आणिक दुसरा पाहे कोण । पाहणे तितुके आपण । देवचि असे ।। २७ ।। उपासना, सकळा ठायी । अंतरात्मा कोठे नाही । याकरणे ठायी ठायी । रामे आटोपिले ।। २८ ।। ऐसी माझी उपासना । आणिता नये अनुमाना । नेऊनि घाली निरंजना । पैलीकडे ।। २९ ।।

जो साधक असेल त्याने आपल्या देहाचे सार्थक व्हावे म्हणून अखिल विश्वात भरून राहिलेल्या नारायणाचा आपणास अनुभव येऊन आपण नारायणस्वरूप व्हावे यासाठी त्याची उपासना केली पाहिजे. मी जेव्हा स्वत:ला आत्मरूप करणारी एखादी उपासना आहे का असे म्हणून शोध घेतला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की सद्गुरूने आपणास शक्तिपातपूर्वक जी उपासना दिली आहे तीच विश्वपालन करणारी

आहे. ब्रह्मांड चालिनी जी शेषकुंडलिनी शक्ती तीच विश्वाचे पालन करते. उत्पत्ती व लय तिच्यावरच अवलंबून आहे. तीच जीवाला आत्मरूप करते. कितीही परोक्षा केली तरी या शक्तिरूप उपासनेची परीक्षा कोणालाही करता येणे शक्य नाही व सांगताही येणे शक्य नाही कारण ही कल्पनातीत उपासना आहे. ही उपासना देवाची एक लीलाच आहे. ती देवाशिवाय कोणालाही कळणे शक्य नाही व दुसरा कोणी पाहणेही शक्य नाही. मात्र या कल्पनातीत अशा उपासनेचा आश्रय घेऊन पाहिला की आपण देवस्वरूप व आत्मस्वरूप होऊन जातो. ही उपासना साधकाने सुरू केली की सर्वत्र अंतरात्मा भरून राहिला आहे याची जाणीव होते. आतबाहेर, रोमारोमात आत्माराम भरून राहिला आहे याची अनुभूती येते. अशा प्रकारची सर्वत्र आत्मस्वरूपाचे दर्शन घडविणारी माझी उपासना आहे. तिची तर्काने किंवा बुद्धीने कल्पना करता येणे शक्य नाही कारण ही उपासना कल्पनातीत आहे. ही उपासना शुद्ध सत्त्वांश जो ईश्वर त्याच्या पलीकडे नेणारी व ब्रह्मस्वरूप करणारी आहे.

तत्काल प्रचीती देणारे साधन :–

शक्तिपातयोगसाधन हे तत्काल प्रचीती देणारे साधन आहे. सद्गुरूकडून दीक्षाप्राप्ती झाल्यावर साधकाला प्रत्यक्ष अनुभूती येत असल्याने त्याला प्रमाणाची आवश्यकता देण्याचे कारण नाही. जे तत्काल प्रचीती देते ते खरे साधन होय. दासबोधात या दृष्टीने समर्थांनी जे विवेचन केले आहे ते अपूर्व आहे.

श्रीसमर्थ म्हणतात, मला सद्गुरुकृपेने प्राप्त झालेली उपासना ही नुसती अनुमानाने जाणण्यासारखी नाही. माझी उपासना ही प्रत्यक्ष अनुभव देणारी दिव्य उपासना आहे. समर्थांनी हे अगदी आग्रहपूर्वक व निक्षून सांगितले आहे कारण त्यांच्या लेखी अनुमानाला काही महत्त्व नाही. "**जितुके अनुमानाचे बोलणे । तितुके वमनप्राय त्यागणे । निश्चयात्मक बोलणे । प्रत्ययाचे**" ॥ ९.५.३९ ॥ उपासना अनुभव देणारीच पाहिजे. परब्रह्मप्राप्ती करून देणारी पाहिजे. नुसत्या अनुमानाला, बोलण्याला किंवा तर्काला किंमत शून्य आहे. नुसते अनुभवशून्य पांडित्य हे ओकारीप्रमाणे त्याज्य आहे. बोलणे प्रत्ययाचे व निश्चयात्मक पाहिजे. अशी उपासना आपण केली म्हणून श्रीसमर्थ सांगतात, "**आत्माराम उपासना । तेणे पावलो निरंजना । निःसदेह, अनुमाना । ठावचि नाही** ॥ २०.६.३० ॥ माझी उपासना ही आत्मारामाची उपासना आहे.

त्यामुळेच मी निरंजनपद पावलो आहे. या माझ्या अनुभवात कसलाही संदेह नाही. तर्काला व शंकेला येथे वावच नाही.

समर्थांच्या दृष्टीने अनुमानाचे बोलणे खोटे असते. प्रत्यय हाच खरा आहे. प्रत्ययाशिवाय सर्व व्यर्थ ठरते. " **उगीच बोलणें अनुमानाचे। अनुमानाचे कोण्या कामाचे। येथे सगट विचाराचे। काम नाही**।। २०. ७. २९ ।। यामुळे अनुभव किंवा प्रचीती हीच सर्वश्रेष्ठ आहे. सरसकट विचार करून काहीतरी गोलमाल किंवा अद्वातद्वा बोलणे हे निरुपयोगी आहे असे ते म्हणतात. प्रचीती देणारे साधन व त्यामुळे होणारे ज्ञान हेच खरे श्रेष्ठ आहे, त्यामुळे समर्थांना प्रचीतीचे ज्ञान श्रेष्ठ वाटते. प्रचीती नाही म्हणजे खरे साधन नाही व खरे साधन नाही तोपर्यंत खरी ज्ञान प्राप्ती नाही. " **प्रचीतीविण जे ज्ञान। ते अवघचि अनुमान । तेथे कैचे परत्रसाधन । प्राणियांसी** ।। १४. ७. १८ ।। प्रचीतीशिवाय खरे ज्ञानच होत नाही. खऱ्या अनुभवाशिवाय किंवा प्रचीतीशिवाय जे ज्ञान होते असे वाटते तो फक्त तर्कच आहे. त्यामुळे जीव हा संसार सागर ओलांडून जाऊ शकत नाही व परत्राची म्हणजे परब्रह्माची प्राप्तीही घडत नाही.

प्रचीतीशिवाय काहीही खरे मानू नये असे समर्थ म्हणतात. **जे प्रचीतीस आले खरे । तेचि घ्यावे अत्यादरे। अनुभवाविण जी उत्तरे। ती फलकटे जाणावी** ।। १८.५.२१ ।। साधन करताना अनुभव पाहिजे. प्रचीती हवी. नुसती बडबड किंवा अनुभवाशिवाय जे बोलणे असते ते फोलकटे जशी टाकाऊ असतात त्याप्रमाणे टाकाऊ गोष्ट ठरते. इतकेच नव्हे तर " **प्रचीतीवीण जे केले । ते अवघे व्यर्थ गेले। प्राणी कष्टकष्टोचि मेले । कर्मकचाटे** ।। १८.८.२० ।। असे निक्षून सांगून समर्थ साधकाला पुढील इषारा देण्यास विसरत नाहीत. " **अवघी भ्रांतीची ठकाठकी । प्रचीतीवीण गोष्टी लटकी । वेड लागले जें बटकी। तो भलतेचि बोले** ।। १७. ४. २९ ।। **प्रत्यये ज्ञाता सावधान । त्याचे एकावे निरूपण । आत्मसाक्षात्काराची खूण । तात्काळ बाणे**।। १७. ४. ३० ।। असा प्रत्यय देणारा व साधन देऊन आत्मसाक्षात्कार घडविणारा सद्गुरू हवा.

अशा प्रकारे शक्तिपाताने कुंडलिनी जागृत करून प्राणांची गती ऊर्ध्व करणारा महायोगी शोधून काढून त्याच्या कडून साधन प्राप्त करून घेऊन प्रचीती घेऊन आत्मज्ञानप्राप्ती साधकाने प्रयत्नपूर्वक केली पाहिजे असे समर्थ अगदी कळकळीने सांगतात.

अधोमुखे भेद वाढतो । ऊर्ध्वमुखे भेद तुटतो । निःसंगपणे निर्गुणी तो । महायोगी ॥ २०–३–२२ ॥ माया मिथ्या ऐशी कळली । तरी मग भीड का लागली । मायेचे भिडेने घसरली । स्वरूपस्थिती ॥ २३ ॥ लटके मायेने दडपावे । सत्य परब्रह्म सांडावे । मुख्य निश्चये हिंडावे । कासयासी ॥ २४ ॥ पृथ्वीमध्ये बहुत जन । त्यांमध्यें असती सज्जन । परी साधूस वोळखतो कोण । साधू वेगळा ॥ २५ ॥ म्हणोन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा । फिरफिरों ठायी पाडावा । साधुजन ॥ २६ ॥ उदंड हुडकावे संत । सापडे प्रचीतीचा महंत । प्रचीतीवीण स्वहित । होणार नाही ॥ २७ ॥ प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीविण अवघे व्यर्थ । प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्ये ॥ २८ ॥

असा महायोगी जेव्हा साधकाला भेटतो तेव्हा तो शक्तिपात-योगदीक्षा देऊन त्याला कृतार्थ करतो. ही प्रचीती देणारी उपासना म्हणजे एकमात्र शक्तिपात आहे हे वर्णन करताना समर्थ म्हणतात.

अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली । वृत्तिशून्य कैशी झाली । स्थिति पाहा ॥ १५–१०–१२ ॥ मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाही चंचळाचा वळसा । निवांती निवांत कैसा । निर्विकारी ॥ १३ ॥

सर्वतंत्र स्वतंत्र साधनः–

शक्तिपातयोगसाधनेचा सूत्रपात शंकरांनी कसा केला व हे अपूर्व साधन भूमंडलावर कसे प्रकट झाले हे सांगताना सौन्दर्य-लहरी या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात श्रीमान् भगवान् शंकराचार्य म्हणतात,

चतुःषष्टया तंत्रैः सकलमतिसंधान भुवनं स्थितस्तत्तत्सिद्धि–प्रसव-परतंत्रैः पशुपतिः । पुननस्त्वान्निर्बंधादखिल-पुरुषार्थैक-घटना-स्वतंत्रं ते तंत्रं क्षितितलमवातीतरदिदम् ॥ ३१ ॥

शंकरांनी चौसष्ट तंत्रांची रचना करून ज्या ज्या लोकांना सिद्धीची व काम्य फलांची इच्छा होती ती पूर्ण करण्याची सोय केली. केवळ मोक्ष प्रतिपादन करणारा वेदांतही सांगितला आणि ते स्वस्थ बसले. परंतु ज्या योगे धर्म, अर्थ आणि काम यांच्यासह परम पुरुषार्थाचा लाभ होईल असे साधन प्रकट होणे आवश्यक होते. जगज्जननीने शंकरांना असे साधन प्रकट करण्याचा आग्रह केला. तेव्हा त्यांनी इतर पुरुषार्थासह प्रामुख्याने परमपुरुषार्थ जो मोक्ष त्याचा लाभ होईल अशा योग्यतेचे एक स्वतंत्रच तंत्र या भूमंडलावर प्रकट केले. या साधनाची प्रशंसा व वंदन श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या अमृतानुभव या ग्रंथात पुढीलप्रमाणे केले आहे.

गरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शांकरी ।
जयत्याज्ञानमस्तस्यै दयाद्रायै निरंतरम् ।।

या इहलोकामध्ये सर्व विद्यांमध्ये ही शांकरी म्हणजे शक्तिपातयोगरूप ब्रह्मविद्या श्रेष्ठ आहे. ही साक्षात् आनंद करून देणारी, दयाळू व अत्यंत ज्ञानरूप आहे. या साधनेचा–विद्येचा जयजयकार असो. तिला मी वंदन करतो.

जगात जेवढ्या म्हणून विद्या आहेत त्या सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या ही भगवत् विभूती आहे असे गीतेमध्ये भगवान् श्रीकृष्णांनी सांगितले आहे. ही ब्रह्मविद्या सकलदुःखनिवृत्ती व निरतिशयानंदप्राप्ती करून देणारी आहे. म्हणून या विद्येला किंवा साधनाला गुरू म्हणजेच श्रेष्ठ अशी संज्ञा आहे. ब्रह्मविद्येप्रमाणेच या शक्तिपातयोगविद्येला शांकरी विद्या असेही म्हणतात. कारण शं म्हणजे सुख आणि कर म्हणजे करून देणारा म्हणजे सुखाची प्राप्ती करून देणारा असा शंकर ह्या शब्दाचा अर्थ आहे. त्या शंकररूप परमात्म्याच्या एका अंशाचे ठिकाणी ही विद्या राहाते म्हणून या शक्तिपातयोगविद्येला शांकरी विद्या असे म्हणतात.

या शक्तिपातयोगरूपी ब्रह्मविद्येचा गुरुरूपाने अवतार कसा झाला याची कथा केनोपनिषदात आली आहे. एकदा देव व असुर यांचे युद्ध झाले. युद्धात देवांचा जय झाला. जगताची राहाटी उत्तम चालावी म्हणूनच ईश्वराने देवांचा जय व असुरांचा पराजय घडवून आणला होता. परंतु आपण असुरांना जिंकले असा अभिमान देवांना झाला. देव विवेकी व देहाहंकारी नसूनही ही चूक घडली. सात्त्विक देवांना असा अभिमान होणे बरे नव्हे, तो त्यांना देवत्वापासून भ्रष्ट करणारा आहे, असे भगवंताला वाटले. त्यांना सर्व जगच्चालक आत्मवस्तूची जाणीव करून देऊन झालेला अभिमान घालविण्याच्या दृष्टीने भगवंतानी आपल्या शुद्धसत्त्वात्मक मायाशक्तीने अत्यंत विस्मयकारक स्वरूप धारण करून ते देवांसमोर आले. देवांना आपल्या समोर कोण आले आहे हे समजले नाही. इंद्रादी देवांनी ते कोण आहेत हे समजून घेण्याकरिता अग्नी व वायू यांना क्रमाने भगवंताकडे पाठविले. भगवंताने प्रथम अग्नीला तू कोण आहेस म्हणून विचारले. त्यावर अग्नी म्हणाला, " मी अग्नी असून मला जातवेद म्हणतात. " भगवंताने विचारले तुझे सामर्थ्य काय आहे ? अग्नी म्हणाला, " या पृथ्वीवरील कोणतीही गोष्ट जाळण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे. " भगवंताने त्याच्यापुढे एक गवताची काडी ठेवली व ही तू जाळ असे

अग्नीला सांगितले. अग्नीने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी काडी जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु तो काडी जाळू शकला नाही. त्यामुळे तो परत आला. इंद्रादी देवांनी अग्नीनंतर वायूला भगवंताकडे पाठविले. भगवंताने त्याचा परिचय विचारला. वायूने, मी वायू आहे, मला मातरिश्वा म्हणतात, असे सांगून या पृथ्वीवरील सर्व पदार्थ मी उडवून लावू शकतो, असे आपले सामर्थ्य असल्याचेही सांगितले. भगवंताने अग्नीप्रमाणेच त्याच्यापुढे एक काडी ठेवून ती उडवून देण्यास सांगितले. परंतु आपल्या सर्व सामर्थ्यांचा उपयोग करूनसुद्धा वायू गवताची काडी अणुमात्रसुद्धा हलवू शकला नाही. या पराभवामुळे तोही लज्जीत होऊन परत गेला.

शेवटी देवांनी इंद्रालाच भगवंताकडे जाण्यास सांगितले. इंद्र भगवंताकडे आला. परंतु भगवान तेथेच अंतर्धान पावले. अग्नी व वायू यांना दर्शन होऊन बोलण्यासही मिळाले पण आपल्याला मात्र दर्शन देखील झाले नाही असे मनात येऊन इंद्राला फार वाईट वाटले. इंद्र अशा रीतीने शोकाकुल झाला असता त्याला भगवंताचे ज्ञान करून देण्याकरिता भगवान शंकराची विद्याशक्ती उमा अतिशय सुंदर स्वरूप धारण करून प्रकट झाली. इंद्राने सुवर्णभूषणांनी विभूषित झालेल्या पार्वतीस्वरूपी ब्रह्मविद्येला विचारले की आता या ठिकाणी कोण येऊन गेले याची तुला माहिती आहे काय ? तेव्हा ती शक्ती इंद्राला म्हणाली, " ते ब्रह्म होते. तुम्हाला जो विजय प्राप्त झाला तो परब्रह्मामुळेच झाला. तुम्ही येथे निमित्त आहा. "

या कथेवरून हेच सिद्ध होते की जोपर्यंत शक्ती जागृत होऊन मार्गदर्शन करीत नाही तोपर्यंत साधकाला ब्रह्मप्राप्ती होऊ शकत नाही.

राधाकृष्णस्वरूप साधनः–

शक्तिपातयोगाचे साधन राधाकृष्णस्वरूप आहे. मूलतः कृष्ण व राधा यांचे स्वरूप कोणते आहे आणि त्यांचे मिलन कसे होते हे पाहिले की या साधनाचे स्वरूप स्पष्ट होईल.

परमात्मारूपी श्रीकृष्णाचे सहस्रदल पद्मात स्थान आहे. त्यांच्या या स्वरूपाचे वर्णन करताना ब्रह्मसंहितेत म्हटले आहे की :–

ईश्वरः परमः कृष्णः सच्चिदानंदविग्रहः । अनादिरादिर्गोविंदः सर्वकारणकारणम् ।।

अनादी वस्तू- परब्रह्म–हीच सच्चिदानंदस्वरूप श्रीकृष्ण रूपाने नटलेली आहे. ते लीलेसाठी सर्वप्रथम पुरुषाकार रूपाने प्रकट झाल्यामुळे त्यांना आदी म्हणतात. ते पृथ्वीचे रक्षक असून सर्व कारणांचे

कारण आहेत. ब्रह्मांड प्रकरणातही श्रीकृष्णाचे व श्रीराधेचे स्वरूप वर्णन केले आहे.

परं प्रधानं परमं परमात्मानमीश्वरम् । सर्वाद्यं सर्वपूज्यं च निरीहं प्रकृतेः परम् ॥ स्वेच्छामयं नित्यरूपं भक्तानुग्रहविग्रहम् । तस्य प्राणाधिका राधा बहुसौभाग्यसंयुता । महाविष्णोः प्रसूः सा च मूलप्रकृतिरीश्वरी ॥

श्रीकृष्ण हे सर्वात प्रधान, परामात्मा, परमेश्वर, सर्वांचे आदिकारण, सर्वपूज्य, निरीह व प्रकृतीच्या पलीकडे विराजमान असलेले तत्त्व आहे. त्यांचे स्वरूप स्वेच्छामय असून नित्य आहे. श्रीराधा त्यांना प्राणाहून अधिक प्रिय असून ती परम सौभाग्यशालिनी आहे. तीच महाविष्णूची जननी असून ईश्वराची मूल प्रकृती आहे.

श्रीकृष्णांनी आपल्या मुखाने राधाशक्ती आपली परमाराध्या व साक्षात् आत्मशक्ती कशी आहे हे सांगताना म्हटले आहे की :—

यथा क्षीरे च धावल्यं दाहिकाच हुताशने । भूमौ गंधो जले शैत्यं तथा त्वयि मम स्थितिः । धावल्यदुग्धयोरैक्यं दाहिकानलयोर्यथा । भूगंधजलशैत्यानां नास्ति भेदस्तथाऽऽ वयोः ॥ मया विना त्वं निर्जीवा चादृश्योऽहं त्वया विना ॥

दूध व दुधाची शुभ्रता, अग्नी व त्याची दाहकशक्ती, भूमी व गंध आणि पाणी व शीतलता यामध्ये जसे अंतर असत नाही त्याप्रमाणे माझ्यात व मत्स्वरूप असलेल्या राधाशक्तीरूप आत्मस्वरूपात कोणतेही अंतर नाही. शुभ्रता व दूध अभिन्न आहे. दाहकशक्ती व अग्नी भिन्न नाहीत. भूमी व गंध एक आहेत. जल व शीतलता यात फरक नाही. या प्रमाणेच आम्ही दोघे एक आहोत. आमच्या दोघात कोणताही भेद नाही. माझ्याशिवाय तू निर्जीव आहेस. कारण मीच तुझे जीवन आहे. मात्र हे सत्य आहे की तुझ्याशिवाय मी प्रकट होऊ शकत नाही.

राधा ही भगवान् श्रीकृष्णांची अभिन्न अशी चित्शक्तीच आहे. ज्यावेळी ही चित्शक्तिस्वरूपिणी राधा चैतन्यरूपी श्रीकृष्णांबरोबर अभेद रूपाने विराजमान असते त्यावेळी उत्पत्ती, स्थिती किंवा संहार यापैकी कोणतीही लीला होऊ शकत नाही. परंतु ज्यावेळी दिव्य लीलेचा रसभोग आपण आपल्याच ठिकाणी करावा अशी इच्छा भगवान् श्रीकृष्णांना होते तेव्हा ते आपल्या चित्शक्तीला राधारूपाने प्रकट करतात. ही राधा संधिनी, संवित् किंवा आल्हादिनी शक्ती या नावाने ओळखली जाते. यामुळे राधा म्हणजेच चित्शक्ती किंवा कुंडलिनी शक्ती होय हे

स्पष्ट होते ही कुंडलिनीशक्ती साधकाला आनंदाचे दान करते म्हणून हिला आल्हादिनी शक्ती म्हणतात. ही आल्हादिनी शक्ती जागृत झाल्या शिवाय साधकाला आनंदाची प्राप्ती कदापीही होऊ शकत नाही. श्रीचैतन्य चरित्रामृतामध्ये म्हटले आहे की :–

एकई चिच्छक्ति ताँर धरे तिन रूप। आनंदांशे ल्हादिनी सदंशे संधिनी। चिदंशे संवित् यारे ज्ञान करि मानि ।। संधिनीर सार अंश शुध्द सत्त्व नाम। भगवानेर सत्ता हय याहाते विश्राम ।। ल्हादिनीर सार प्रेम प्रेमसार भाव। भावेर परमकाष्ठा नाम महाभाव ।। महाभाव स्वरूपा श्रीराधा ठाकुराणी। सर्वगुणखानि कृष्ण कांतशिरोमणि ।। किंवा प्रेमरसमय कृष्णेर स्वरूप। ताँर शक्ति ताँर सह हृदय एकरूप ।। कृष्ण-वांच्छापूर्तिरूप करे आराधने। अतएव राधिका नाम पुराणे बाखाने ।। राधा पूर्णशक्ति कृष्ण पूर्णशक्तिमान्। दुई वस्तु भेद नाइ शास्त्र परिमाण।।

एकच चित्शक्ती तीन रूपे धारण करते. जेव्हा ती आनंद अंशाने प्रकट होते तेव्हा तिला आल्हादिनी म्हणतात. सत् अंशाने प्रकट झाल्यावर या चित्शक्तीलाच संधिनी व चित् अंशाने प्रकट झाल्यावर संवित् असें म्हणतात. संधिनी शक्तीचा जो साररूप अंश आहे त्याला शुद्ध सत्त्व म्हणतात. या ठिकाणीच भगवंताची सत्ता आनंदाने विश्राम घेत असते. आल्हादिनी शक्तीचे सार प्रेम आहे. प्रेमाचे सार भाव म्हणजे भक्ती हे असून महाभावामध्येच प्रेमाची पराकाष्ठा झालेली दिसून येते. श्रीराधा ठाकुराणी ही महाभावस्वरूप आहे. सर्व गुणांची खाण असलेले श्रीकृष्ण कांतशिरोमणी असल्यामुळे त्यांच्या स्वरूपाला प्रेमरसमय म्हटले जाते. त्यांची शक्ती त्यांच्याबरोबर एकरूप होऊनच नेहमी राहात असते. आराधना करू लागल्यावर श्रीकृष्ण इच्छापूर्ती करून प्रसन्न होतात. राधा पूर्ण शक्ती असून श्रीकृष्ण पूर्ण शक्तिमान् आहेत. त्या दोघांमध्ये कसलाही भेद नाही. याचे प्रमाण एक शास्त्रच आहे. सहस्रारामधून म्हणजे मूलस्वरूपापासून धारा म्हणजे शक्ती खाली तोंड करून वाहू लागते त्यावेळी जगदुत्पत्ती होते. यालाच अनुलोम क्रम म्हणतात. परंतु ज्यावेळी गुरुकृपा होते त्यावेळी तिचा अनुलोम क्रम लुप्त होऊन ती विलोमक्रमाने ऊर्ध्वगामिनी होऊन वाहू लागते. तिचे "धारा" स्वरूप बदलून ती राधास्वरूप होते. एकदा का ही कुंडलिनीराधा जागृत झाली की ती परमात्मरूपी श्रीकृष्णाला आलिंगन देऊन त्याच्याशी एकरूप होईपर्यंत शांत होत नाही. ऊर्ध्वगामिनी शक्तीच्या ज्या दिव्य लीला घडून येतात त्यालाच रासलीला असे म्हटले आहे. ही ऊर्ध्वगामिनी

शक्तीच साधकाला परमानंदाचा अधिकारी बनविते. यामुळे सर्व साधनांचे अंतिम सार हेच आहे की धाराचे राधेमध्ये रूपांतर व्हावे. शक्तिपातयोगाने ही गोष्ट सहजसाध्य होत असल्याने शास्त्रकारांनी, संतांनी, महंतांनी, मुनींनी, ऋषींनी व साधूंनी या गुरुकृपाप्राप्त साधनेचा डिंडिम आपापल्या ग्रंथांमध्ये आपापल्या सांप्रदायिक पद्धतीने व क्रमाने नानाविध प्रकारे करून या साधनाचा महिमा पटविण्याचा प्रयत्न केला आहे.

आकाशातून पडलेले पावसाचे पाणी नदीनाल्यातून वाहात वाहात शेवटी ज्यावेळी सागराला जाऊन मिळते त्यावेळी ते आपल्या नामरूपाचा त्याग करून सागराशी एकरूप होऊन जाते. त्याचप्रमाणे जीव, जगत् व ईश्वर यांच्या रूपाने साकार झालेली ही शक्ती परमात्म्याशी एकरूप होते त्यावेळी आपल्या सर्व नामरूपात्मक प्रपंचाची संहारणी व पूर्ण त्याग करून टाकते. नाम व रूप ही लीला आहे. नाम व रूपाची कल्पना करूनच जप, तप, पूजा अर्चना, प्रार्थना इत्यादीला आरंभ होत असतो. मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे की सर्व नामे व सर्व रूपे ही शक्तीचीच आहेत तद्भिन्न काहीही नाही. याकरिता शक्तीची साधना केल्याशिवाय व कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही साधनाने केव्हाही साधक नामरूपातीत अशा निर्गुण चैतन्याची प्राप्ती करू शकत नाही.

ज्याप्रमाणे नामरूप बाहेर भासित होते त्याप्रमाणे ते अंतरंगातही अनुभवास येते. प्रकाश हे परमेश्वराचे रूप असून अनाहत नाद हे त्याचे नाम आहे. साधनात अनाहत नादाचे चित्र प्रकाशयुक्त अशा ॐकाराच्या नामाने साकार झालेले दिसून येते. "**घोषाच्या कुंडी । नादचित्रांची रूपडी । प्रणवाचिया मोडी । रेखिली ऐसी ॥ ६–२७६ ॥** असे याचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केले आहे. परंतु साधकाला याही नामरूपाचा त्याग करून पुढे जावे लागते. याचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी पुढील प्रमाणे केले आहे.

ते ओंकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पश्यंतीचिये पाउठी । मागा घाली ॥ ६–३०३ ॥ पुढे तन्मात्रा अर्धवरी । आकाशाच्या अंतरी । भरती गमे सागरीं । सरिता जेवी ॥ ३०४ ॥ मग ब्रह्मरंध्री स्थिरावोनी । सोहंभावाच्या बाह्या पसरोनी । परमात्मलिंगा धांवोनी । आंगा घडे ॥ ३०५ ॥ तंव महाभूतांची जवनिक फिटे । मग दोहींसि होय झटें । तेथ गगनासकट आटे । समरसी तिये ॥ ३०६ ॥ पैं मेघाचेनि

मुखी निवडला । समुद्र का वोघी पडिला । तो मागुता जैसा आला । आपणपया ॥ ३०७ ॥ तेवीं पिंडाचेनि मिषे । पदीं पद प्रवेशे । ते एकत्त्व होय तैसे । पंडुकुमरा ॥ ३०८ ॥

निर्गुण चैतन्यावरच अंतर्बाह्य नामरूप भासित होत असते. पाण्यावर तरंग खेळताना दिसतात पण ते पाण्याहून निराळे नसतात. त्याप्रमाणे नामरूपांचाही निराळेपणा असू शकत नाही. ज्यावेळी गुरुकृपेने शक्ती जागृत होऊन दीर्घकालपर्यंत निरंतर सत्काराने गुरूपदिष्ट साधन क्रिया घडून येऊन शक्ती ब्रह्मरंध्रामध्ये लीन होते तेव्हा निर्गुण सच्चिदानंदरूपाची प्राप्ती होते. त्यावेळी साध्य व साधक एकरूप होतात. साधकाची निजसत्ता संपुष्टात येऊन ती भगवत्सत्तेमध्ये विलीन होऊन जाते. यालाच महाभाव म्हणतात. रासलीलेमध्ये श्रीकृष्ण ज्यावेळी अदृष्य होतो त्यावेळी गोपी त्याला शोधून काढण्यासाठी तडफडत असतात. या तडफडीमुळे त्यांना प्राणरूपातच रमणारा असा प्राणाराम श्रीकृष्णच सर्वत्र दिसू लागतो. गोपींप्रमाणे असलेल्या साधकांची " **अहंब्रह्मास्मि** " या विचारापासून सुरू झालेली साधना ' **सर्वं खल्विदं ब्रह्म** " या महाभावामध्ये परिणत होऊन अहं ममतादी सर्व गोष्टींचा नाश होऊन आपणच श्रीकृष्णस्वरूप आत्माराम आहोत असा अनुभव येतो.

शिवशक्तिस्वरूप साधन :–

शक्तिपातयोगाचे साधन शिवशक्तिरूप आहे. शिव व शक्ती हे अभिन्न असून वरवर फक्त निराळे भासतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी शिवशक्तीचे ऐक्य अनादी असते असे सांगितले आहे.

सार्धकेन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छालान्मुहुः ॥ ३ ॥

द्वैतामुळे एकाच सच्चिदानंदरूपाने असणारे ब्रह्म व माया किंवा शिव व शक्ती हे भिन्न आहेत असे भासते. परंतु त्यांच्यामध्ये कोणाच्या योगमने कोण अर्ध्यासह आहे, कोण कोणाचा अर्ध आहे व त्याचप्रमाणे त्यांचे ऐक्य केव्हा होते हे दोघेही पूर्ण एकरूप असल्यामुळे कोणी जाणू शकत नाही.

या दोघांमुळेच नामरूपात्मक असे जग उत्पन्न होते. शिवशक्तीची सत्ता एक असून दोघांचा प्रकाशही एकच असतो. म्हणूनच सूतसंहितेत " **संविदेव पराशक्तिः** " संवित् किंवा चैतन्य हीच मूळ शक्ती होय असे म्हटले आहे. केनोपनिषदात " **विद्योमारूपिणी प्रादुरभूत स्त्रीरूपा**

(केन ३।१२) शंकराची शक्ती स्त्रीरूप उमा विद्यारूप म्हणजे चैतन्य-रूपच मानिली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवात ज्ञानदृष्टीनेच शक्तीचे रूप वर्णन केले आहे. ज्ञानदृष्टी प्राप्त झालेल्या ज्ञानी पुरुषाला परमेश्वराची शक्ती विद्यारूप म्हणजे ज्ञानरूपच दिसते. देवी भागवतातही देवीने आपले स्वरूप सांगताना " **रूपं मदीयं ब्रह्मतत् सर्वकारणकारणम् । मायाधिष्ठानभूतं तु सर्वसाक्षि निरामयम् ।।** " सर्व कारणांचे कारण जे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप तेच माझे स्वरूप होय. ते माझे स्वरूप शुद्ध साक्षिस्वरूप असून मायेला म्हणजे ज्ञानाने निवृत्त होणाऱ्या जीवाच्या विपरीत कल्पनेला अधिष्ठानभूत आहे असे म्हटले आहे.

जीवाची विपरीत कल्पना निवृत्त होण्याचे कार्य हेच खरे महत्त्वाचे कार्य आहे. त्यासाठीच सर्व साधनादिकांचा खटाटोप आहे. हे कार्य शक्ती करते. सूत संहितेत म्हटले आहे,

" **सदाकारा परानंदा संसारोच्छेदकारिणी ।**
सा शिवा परमादेवी शिवाभिन्ना शिवंकरी ।। "

शिवाची शक्ती शिवा परमदेवी ही परमानंदरूप, संसाराचा उच्छेद करणारी, शिवाशी एकरूप असणारी व आत्यंतिक कल्याण करणारी आहे. या श्लोकावरील आपल्या टीकेत विद्यारण्य म्हणतात, " **तथाच शिवशक्त्योर्भेदावभास एव मिथ्या न तु प्रपंचवत्स्वरूपमपीत्यर्थः** " शिवशक्ती हे दोन भिन्न आहेत असे मानणे हेच खोटे आहे. शिवशक्तीचे स्वरूप जडविनाशी प्रपंचाप्रमाणे खोटे नाही. शक्तीचे खरे स्वरूप असे आहे की :–

एषा सा साक्षिणी शक्तिः शंकरस्यापि शंकरी ।
शिवाभिन्ना तयाहीनः शिवः साक्षात् निरर्थकः ।।

अशी शंकराची साक्षात शंकरी शक्ती आहे. ती शिवापासून अभिन्न आहे. तिच्याशिवाय शिव हा निरर्थक किंवा शवरूपच आहे.

शिवशक्तीचे एकरूपत्व अनुभवास येणे हेच साधकाचे ध्येय आहे. असा अनुभव जे देते तेच खरे साधन होय. " **उमाशंकरयोरैक्यं यः पश्यति स पश्यति** " असे शास्त्रकारांनी यासाठीच सांगितले आहे.

वस्तू व वस्तूची शक्ती ही दोन नावे असली तरी वस्तू एकच असते. म्हणून वस्तू व वस्तूची शक्ती यांचे सदा अद्वैतच असते. वस्तूची शक्ती स्फुरण पावत नाही तोपर्यंत वस्तू व शक्ती अत्यंत एकरूप असतात, यात शंकाच नाही. पण शक्तीचे स्फुरण झाले असताही, ते शक्तीचे स्फुरण वस्तूवरच होत असते. त्या स्फुरणात मूळ वस्तूच स्फुरत

असल्यामुळे, वरकरणी वस्तू व शक्ती असा दोनपणा दिसून येतो. परंतु वस्तू व शक्ती दोन निरनिराळ्या वस्तू होऊन त्या परस्पराहून भिन्न होत नाहीत. वस्तू व वस्तूची शक्ती यांचे दोनपण नेहमीच अव्यक्त असते. मात्र शक्तिस्फुरण झाले असता ते व्यक्त होते. व्यक्तदशेत दोघांना दोन नावे येतात, मात्र वस्तू एकच राहाते. स्फुरणापूर्वी जी वस्तू होती, तीच स्फुरणदशेतही एकच राहाते. म्हणून वस्तू व वस्तूची शक्ती यांचे द्वैत कधीही उत्पन्न होत नाही. अशा रीतीने वस्तू व शक्ती ही परस्परात मिळून राहून आपले अद्वैत तत्त्व सारखे दाखवीत असतात. शिवशक्तीही याच नियमानुसार एकरूपच असतात व एकरूपानेच स्फुरतात. या त्यांच्या दोनपणाच्या स्फुरणात जगाचा प्रत्यय येतो व स्फुरणाच्या लोपात जगाचा लय दिसून येतो.

शिवशक्तीचा दोनपणा जाऊन एकरूपत्व अनुभवास कसे येते ? ह्यासाठी एखादे साधन आहे काय ? असा प्रश्न जेव्हा साधकाला पडतो त्यावेळी शक्ती व शिव यांची जागृती झाल्याशिवाय हे घडून येत नाही असे स्पष्ट दिसते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हे शिवशक्ती जागृतीचे साधन अमृतानुभवात सांगितले आहे :–

जया दोघांमाजी एखादे । विपाये उमजले होय निदे ।
तरी घरवाते गिळोनि नुसुधे । कांहीं ना करी ।।

या दोघांमध्ये एखादे कदाचित निद्रेपासून जागृतीस म्हणजे स्वरूपस्थितीस आले तर सर्व स्वरूपमात्र असते ; दुसरे काही राहात नाही. याचा अर्थ असा आहे की शिव व शक्ती या दोघांमध्ये एखाद्या तत्त्वास जागृती आली की प्रपंच गिळला जातो. शिवशक्तीचे ऐक्यज्ञान म्हणजे शिवरूप होणे. हे शिवरूपत्व विसरले की सर्वत्र जडरूपत्वाचा अनुभव येतो. मूळ शक्ती चेतन असताना सुद्धा अज्ञानामुळे हा द्वैताचा किंवा जड प्रपंचाचा भास होतो. परंतु ज्ञानरूप शिव व वृत्तिरूप शक्ती या दोघांमध्ये जर त्यांचे अद्वैतस्वरूपाचे ज्ञान प्रकट झाले तर विश्व-प्रपंचाचा भास उरत नाही.

येथे एखादे या शब्दाचा अर्थ जर असा आहे. त्यामुळे गुरुकृपेने जर कदाचित दोघांमध्ये एकाचे किंवा दोघांचेही यथार्थ स्वरूपाचे म्हणजे अद्वैताचे ज्ञान स्फुरले म्हणजे जीवाचे खरे कल्याण होते. मी म्हणजे वृत्तिरूपशक्ती स्फुरणाने आपले शुद्धज्ञानस्वरूप ओळखून आधारभूत शुद्धज्ञानस्वरूप शिवाशी ऐक्य करणे हे शक्तीचे जागे होणे होय. ही शक्ती जेव्हा गुरुकृपेने शक्तिपात होतो तेव्हा जागी होते. त्यामुळे शिवाशी

ऐक्याची जाणीव होते. तेव्हा " अहंब्रह्मास्मि " हा एक्यानुभव येतो. शिवाचे जागेपण म्हणजे " ब्रह्मैवेदं सर्वं " आपले सर्वात्मत्व ओळखणे होय. शिवाने शक्तीच्या सर्वरूप आविष्काराशी ऐक्य करणे ही शिवाची जागृती आहे. असे दोघेहीजण जागे झाले असता सर्व प्रपंचच गिळला जातो.

आत्मनिवेदन योग :–

शक्तिपातयोग हा खऱ्या अर्थाने आत्मनिवेदन योग आहे. आत्मनिवेदन म्हणजे आपण आपले स्वतःचे सर्व काही अर्पण करणे होय. आत्म्याला सर्व काही अर्पण केल्याशिवाय साधक आत्मस्वरूप होऊच शकत नाही. शक्तिपातयोगात ही निवेदनाची म्हणजे अर्पणाची क्रिया शक्तीकडून घडून येत असल्याने हा खऱ्याखुऱ्या अर्थाने आत्मनिवेदन योग आहे. एकवीस समासी या आपल्या जुन्या दासबोधात श्रीसमर्थ म्हणतात :–

आत्मा साधावया जात । तो साधकाचाचि होय घात । तेणे गुणे निवांत । निःशब्द राहे ॥ २१.४३ ॥ व्हावया वस्तूची प्राप्ती । साधन साधक करिती । तंव तंव वस्तु आहुती । साधकाचीच मागे ॥ ४४ ॥ जेव्हां विवेके आपुली । वस्तूसी आहुती दीधली । तयांसीच वस्तु लाधली । येरां अप्राप्त ॥ ४५ ॥ येथींचा विपरीत विचार । करिता आपुला संहार । तेणे अक्षय्य अपार । सुख लाहे ॥ ४६ ॥ जेणे जीवावरी उठावे । तेणे आनंदासीं लुटावे । आनंदभोग लुटोनि असावे । कल्पकोटी ॥ ४७ ॥ जो का आपुली कुरवंडी । ओवाळूनि परती सांडी । तयासीच वस्तूची जोडी । इतरा न घडे ॥ ४८ ॥ येथे मोठा लाभ होतो । आपुल्यासाठी राम मिळतो । साठी केलिया मग तो । रामचि होय ॥ ४९ ॥ जो रामरूपी झगटे । तो उभय अंगे पालटे । आशंका मात्र तुटे । स्वस्वरूपी ॥ ५० ॥ जो रामरूपी मिळाला । तो परतोनि नाही आला । जैसा लोह परिसे पालटला । तो लोहखंड न होय ॥ ५१ ॥ आत्मनिवेदनाच्या अंती । जे कां घडली अभेदभक्ती । त्या नाव सायुज्यमुक्ती । जाण शिष्या नेमस्त ॥ ५२ ॥ जो सद्गुरूसी शरण गेला । अद्वैत निरूपणे बोधला । मग जरी वेगळा केला । तरी होणार नाही ॥ ५३ ॥

जेव्हा साधक सद्गुरूला शरण जातो तेव्हा सद्गुरु अत्यंत कृपाळूपणे साधकाला शक्तिपातयोगाचे साधन देतात. मग आत्मप्राप्तीसाठी साधक साधन करू लागतो. त्यामुळे साधकाची देहात्मबुद्धी कमी होऊ लागून तो निवांत व निःशब्द अशा ब्रह्मस्वरूपात स्थिर होऊ लागतो.

ब्रह्मवस्तूची प्राप्ती होण्याकरिताच साधक साधन करीत असतात. मात्र ज्या ज्या प्रमाणात शक्ती जागृत होत जाते त्या त्या प्रमाणात ब्रह्मवस्तू साधकाची आहुती मागू लागते. म्हणजे जागृत शक्ती साधकाच्या एकेक गोष्टीचा ग्रास करून पिंड ब्रह्मांडाची रचना गिळून शेवटी शिवस्वरूप होते. अशाप्रकारे जेव्हा विवेकाने इतर सर्व साधने व इतर सर्व बाह्य गोष्टींचा त्याग करून साधक शक्तिस्वरूप शिवाच्या आधीन होऊन साधन करून शक्तीला वाट मोकळी करून देऊन आहुती देतो तेव्हाच त्याला परब्रह्मवस्तूची प्राप्ती होते. जो अशा प्रकारे आपल्या सर्वस्वाचे निवेदन करीत नाही, तोपर्यंत त्या साधकाला आत्मस्वरूपाची उपलब्धी होऊ शकत नाही.

खरोखर शक्तिपातयोगरूप आत्मनिवेदनाचे हे साधन काही निराळेच आहे. कारण या साधनाचा विचार केला म्हणजे या साधनात सर्व काही विपरीतच आहे असे दिसून येते. हे साधन सुरू होऊन शक्ती जागृत झाली की साधकाचा संहार होऊ लागतो. दोष दूर होतात. शरीराची आसक्ती कमी होते. कल्पना शेवटास येतात. षट्कांचा वेध होतो. पंचमहाभूतांची आटणी होते. मनाचे मनपण नाहीसे होते. विषयांचा विसर पडू लागतो. अर्थात जसजसे हे घडत जाते तसतसे साधकाचे सुख वाढत जाते व शेवटी त्याला अक्षय्य व अपार सुख प्राप्त होते.

अशा प्रकारे जो साधक प्राणाची पर्वा न करता जीवावर उदार होऊन साधन करतो त्यालाच खरा ब्रह्मानंद प्राप्त होतो. या रीतीने साधन करणारा साधक खूप आनंद लुटत असतो व तो ब्रह्मस्वरूप झाल्यामुळे कोटी कोटी कल्पपर्यंत आनंद लुटीत असतो. मात्र यासाठी त्याला सर्वस्वाचा त्याग करावा लागतो. प्राणांची कुरवंडी करावी लागते. अशा रीतीने प्रयत्न करणाऱ्या साधकालाच वस्तू प्राप्त होते. इतरांना प्राप्ती होत नाही.

एकदा का आपण आपल्याला जागृत शक्तीच्या प्रवाहात झोकून दिले की मग स्वत:ला काहीही करावे लागत नाही. सर्व काही शक्ती करते. या साधनामुळे खूप मोठा लाभ होतो. आपण आपल्याला दिले की आपण रामरूप होतो. शक्तीच्या आधाराने जीव सुषुम्णेच्या प्रवाहात शिरला की तो आपोआप आत्माराम होतो. यासाठी रामाची संगती हवी. आत्मनिवेदन हवे. हे घडले की जीव रामस्वरूप होतो. त्याच्या सर्व शंका नाहीशा होऊन तो स्वस्वरूपी लीन होतो. तो परत जीव

दशेला येत नाही. परिसामुळे लोखंडाचे सोने होते, मात्र पुन्हा सोन्याचे लोखंड होत नाही.

असे आत्मनिवेदन घडले म्हणजे जीवाला सायुज्यमुक्ती मिळते. मात्र यासाठी सद्गुरूला शरण जाऊन साधकाला साधनप्राप्ती होऊन अद्वैतानुभव येणे आवश्यक असते. हा अनुभव आला की साधक ब्रह्मरूप होतो. मग त्याला त्या स्थितीपासून कोणीही वेगळे करू शकत नाही.

आत्मनिवेदन योगालाच समर्थांनी नवविधा भक्तीत मुख्य भक्ती असे म्हटले आहे." **ऐक शिष्या येथीचे वर्म। स्वयें तूचि आहेसि ब्रह्म। येविषयी संदेह भ्रम। धरूच नको ॥ ५.७.४५ ॥** असे सांगून सद्गुरूने शक्तिपात केला की सर्व साधनयोगातील आत्मनिवेदनाचे भजन घडून येऊन काय काय घडते हे सांगताना समर्थ म्हणतात :–

नवविध प्रकारें भजन। त्यात मुख्य आत्मनिवेदन। ते समग्र प्रकारे कथन। कीजेल आतां ॥ ५.७.४६ ॥ निर्माण पंचभूते इयें। कल्पांती नासती यथान्वये। प्रकृतीपुरुष जियें। तेहि ब्रह्म होती ॥४७॥ दृश्य पदार्थ आटता। आपणही नुरे तत्त्वता। ऐक्यरूपे एक्यता। मुळीच आहे ॥ ४८ ॥ सृष्टीची नाही वार्ता। तेथे मुळीच ऐक्यता। पिंड ब्रह्मांड पाहो जाता। दिसेल कोठे ॥ ५० ॥ ज्ञानवन्ही प्रकटे। तेणे दृश्य केर आटे। तदाकारे मूळ तुटे। भिन्नत्त्वाचे ॥५१॥ मिथ्यात्वें वृत्ति फिरे। तों दृश्य असताचि वोसरे। सहजचि येणे प्रकारें। झाले आत्मनिवेदन ॥५२॥

नवविध प्रकारच्या भजनात आत्मनिवेदन योगामुळे जे भजन म्हणजे साधन घडते तेच महत्त्वाचे आहे. ते आता समग्र सांगतो. निर्माण झालेली पंचमहाभूते कल्पांत झाला म्हणजे जशी परब्रह्मात मिळून जातात त्याचप्रमाणे हे साधन सुरू झाले म्हणजे त्यांची आटणी होते. इतकेच नव्हे तर प्रकृती व पुरुष ही मूळ तत्त्वेही ब्रह्मरूप होऊन जातात. अशा प्रकारे सर्व दृष्य पदार्थ आटून गेल्यामुळे जीवाचे जीवपण संपून तो तत्त्वतः ब्रह्मरूप होतो. ही एकरूपता मुळचीच असते. परंतु मध्ये झालेला द्वैताचा भास साधनाने नाहीसा होतो. या आत्मनिवेदनयोग साधनाचा महिमा अद्भुत आहे. त्यामुळे सृष्टीची वार्ताच नाहीशी होते. कारण सृष्टीची जननी जी कल्पना ती शक्तीचे व शिवाचे ऐक्य झाल्याने आपोआपच मावळून जाते. म्हणून सृष्टीचा लय होतो. अशा स्थितीत पिंड व ब्रह्मांड शोधूनही सापडणे शक्य नसते कारण या लयावस्थेत एका ब्रह्माशिवाय दुसरे काहीही असत नाही.

या शक्तिपातयोग साधनामुळे ज्ञानरूप अग्नी प्रकट होऊन दृष्याचा

पसारा त्यात जळून जातो. जीव आत्म्याशी तदाकार झाल्याने भिन्नत्वाचे मूळच तुटून जाते. वृत्तीचे भटकणे मिथ्या दर्शनामुळेच होत असते. परंतु या आत्मनिवेदनयोगाच्या साधनमार्गाने साधक जाऊ लागला की दृश्य प्रपंच विलीन होऊ लागून साधक ब्रह्मरूप होतो.

मायानिरपेक्ष साधन :–

शक्तिपातयोगाचे साधन सर्वार्थाने मायानिरपेक्ष आहे कारण ज्या मूळ अज्ञानामुळे आत्मा संकुचित होऊन जीवभाव धारण करतो त्या अज्ञानाची निवृत्ती कर्म, ज्ञान, भक्ती इत्यादी कोणत्याही उपयांनी होत नाही. हे सर्व उपाय मायांतर्गत बुद्धीचे व्यापार ठरतात. त्याचप्रमाणे मूळ अज्ञान जाळून टाकण्याचे सामर्थ्य या उपयांमध्ये नसल्याने त्यांचा तितकासा उपयोगही होत नाही. यासाठी मायानिरपेक्ष साधनच उपयोगी पडते. या दृष्टीने शक्तिपातयोग हेच एकमेव साधन मायानिरपेक्ष मूळ अज्ञान निवृत्ती करण्यास समर्थ ठरते. भगवंताची कृपाशक्ती जेव्हा सद्गुरूंच्या द्वारे साधकामध्ये संचारित होते तेव्हा निद्रित कुंडलिनी शक्ती जागृत होऊन या मायानिरपेक्ष साधनाला सुरवात होते. श्रीसमर्थ रामदास-स्वामीमहाराज म्हणतात वेदादी सर्व गोष्टी व साधने मायांतर्गत असल्याने त्यांच्या ठिकाणी ब्रह्मप्राप्ती करून देण्याचे सामर्थ्य असत नाही. ते केवळ संतकृपेतच असते.

वेदे प्रकाशिले सर्वही । वेदविरहित काही नाही । तो वेद कोणासही । दाखवू शकेना ।। १-५-१२ ।। तेचि वस्तु संतसंगे । स्वानुभवे कळों लागे । त्याचा महिमा वचनी सांगे । ऐसा कवण ।।१३।। विचित्र कळा ये मायेची । परी ओळखी न सांगवे वस्तूची । मायातीत अनंताची। संत सोय सांगती ।।१४।।

संतलोक आपल्या कृपेने साधकावर शक्तिपात करून त्याला मायातीत अनंताची सोय सांगतात. संत जी भगवत्कृपा करतात ती स्वभावसिद्ध असून अहेतुक असते हा तिचा सर्वात मोठा विशेष आहे. मोठमोठ्या शास्त्रकारांनी, संतांनी, महात्म्यांनी एकमुखाने मान्य केले आहे की जोपर्यंत साधकामध्ये भगवत्कृपेचा संचार होत नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ ठरते. ही भगवत्कृपा ज्ञानाने, कर्मसाम्यामुळे, मलपाकामुळे अगर भगवंताच्या इच्छेने प्राप्त होते, असे दृष्टिभेदाने शास्त्रकारांनी सांगितले आहे.

ज्ञानामुळे शक्तिपात होतो असे जे शास्त्रकार म्हणतात त्यांचे मत असे आहे की अज्ञानामुळे संसार उत्पन्न होतो. पण ज्ञानोदय झाल्यावर

अज्ञानाची निवृत्ती होऊन शक्तिपात होतो. ज्ञानरूपी अग्नी सर्व प्रकारच्या कर्मांना जाळून टाकून शक्तिपाताची भूमी तयार करतो.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी कर्मसाम्यामुळे शक्तिपात होतो असे म्हटले आहे. ते म्हणतात–

ऐसी कर्मे साम्यदशा । होय तेथ वीरेशा । मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ॥ १८-९६ ॥

ज्यावेळी कर्माची साम्यावस्था प्राप्त होते तेव्हा श्रीगुरू आपणहून सहजच साधकाला खात्रीने भेटतात. त्यावेळी शक्तिपान होतो.

काही शास्त्रकारांचे असे मत आहे की मलपाक झाल्याशिवाय शक्तिपात होऊ शकत नाही. मलपाक म्हणजे अनादी मल हळूहळू पक्व होत असतो. तो जेव्हा पूर्ण परिपक्व होतो तेव्हा तो दूर करण्याची वेळ येते. मोतीबिंदू पूर्ण पिकल्याशिवाय त्यावर शस्त्रक्रिया करणे योग्य ठरत नाही कारण त्यामुळे अपाय होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणे अपक्व मलही जबरदस्तीने दूर करण्याचा प्रयत्न केला तर जीवाचा सर्वनाश होण्याचा संभव असतो. ज्यावेळी मलाचा परिपाक होतो त्यावेळी ईश्वर सद्गुरूरूपाने दीक्षा देऊन शक्तिपात करतात व मल दूर करतात.

निरपेक्ष शक्तिपातवादी आचार्यांच्या मते ज्ञान, कर्मसाम्य किंवा मलपाक यापैकी एकही गोष्ट शक्तिपाताला कारण नसून कर्मादी निरपेक्ष भावाने केवळ एकमात्र भगवंतांच्या कृपेनेच शक्तिपात अनुग्रह होतो. कर्मसाम्य, मलपाक, ज्ञान इत्यादी कशाच्याही अधीन शक्तिपात नसून तो निरपेक्ष व स्वतंत्र आहे. पुराणातही **"तस्यैव तु प्रसादेन भक्तिरुत्पद्यते नृणाम्"** असा पुरावा याबाबतीत मिळतो.

शक्तिपात कसाही होत असला तरी तो होणे आवश्यक आहे व त्याच्याशिवाय श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे मायापार होणे शक्य होत नाही हे त्रिकालाबाधित आहे. शक्तिपातयोगाचे जे साधन उपरोक्त प्रक्रियेने प्राप्त होते ते सर्वार्थाने मायानिरपेक्ष असते कारण हे साधन करीत असताना शक्तिपात होऊन जो ईश्वरभाव साधकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे मिळालेला असतो किंवा त्याच्या ठिकाणी उद्भुत झालेला आढळतो तो क्रमशः वृद्धिंगत होत जातो. आत्मस्वरूप मायातीत असल्याने ते जप, ध्यान, एकाग्रता पूजा, पाठ, मंत्र इत्यादी कशाच्याही कक्षेत बसत नाही. त्यामुळेच दीक्षा देताना इतर कोणत्याही मायिक व्यापारांना अवसर न देता सद्गुरू साधकाला सांगतात की डोळे मिटून स्वस्थ बस. शरीर शिथिल ठेव. साधी मांडी घाल. शरीरावर कोणत्याही प्रकारे

मुद्दाम ताबा ठेवू नको व शरीर सैल ठेवून स्वस्थ बसून काय होते ते पाहा. त्यावेळी जप, नामस्मरण, ध्यान, मनन, चिंतन, पठण, मनाची मुद्दाम एकाग्रता, चित्तवृत्तींचा निरोध इत्यादी काहीही करू नको. असे केले म्हणजे श्रीकृपेने शक्तिसंचार होईल.

शक्ती ही मायातिरपेक्ष वस्तूशी संलग्न व्हावी म्हणून अशाप्रकारे सद्गुरू मायांतर्गत सर्व गोष्टींचा त्याग करावयास लावून आतूनच चालणाऱ्या साधनाला प्रवृत्त करतात. जे स्वतः होते ते साधन. जे मुद्दाम केले जाते ते साधन नव्हे. ती क्रिया आहे. जप, ध्यानादी सर्व या क्रियेचा व कर्माचा भाग आहे. तो सर्व मायांतर्गत असल्याने वेदही हे स्वरूप दाखवू शकत नाहीत असे श्रीसमर्थ म्हणतात. यासाठी संतांना सर्वभावे शरण गेले म्हणजे ते शक्तिपात करून मायानिरपेक्ष साधन देतात.त्यामुळे ज्या चित्शक्तीने अनैक्याचा आभास पिंडब्रह्मांडाच्या रूपाने उत्पन्न केलेला असतो ती सर्व संकोच, बंधने, मल, विक्षेप, आवरण इत्यादींचा नाश करून आपल्या स्वस्वरूपाचा विकास करीत करीत श्रीनामदेवांनी म्हटल्याप्रमाणे "नाही कुळ याती। नाही दिनराती" असलेल्या एका अनिवर्चनीय अवस्थेप्रत साधकाला घेऊन जाते. त्या विशुद्धरूपात साधक प्रतिष्ठित झाला म्हणजे मुक्त होऊन निरतिशय आनंदात डुंबत राहातो.

भक्तियोगाचा योगमार्गः–

शक्तिपातयोगाच्या साधनाला श्रीसंत एकनाथमहाराजांनी "भक्तियोगाचा योगमार्ग" असे सार्थ नाव देऊन गौरविले आहे. इतकेच नव्हे तर शक्तिपातयोगमार्गाचे विवरण म्हणजे भागवताचे निरूपण आहे. हा मार्ग म्हणजे पंचम पुरुषार्थ आहे एवढेच नव्हे तर हा योग म्हणजे मुक्तीवरील भक्ती आहे असे या मार्गाचे श्रेष्ठत्व सांगितले आहे. इतकेच नव्हे तर या योगाची श्रीकृष्णांच्या मुखातून महती सांगताना नाथ म्हणतात, "हे उद्धवा ! हा भक्तियोगाचा योगमार्ग अर्थात शक्तिपातयोगमार्ग ज्याला कळत नाही त्याला संसार दुःखरूप होतो. हा योग अखंड माझ्यापाशी आहे. त्यामुळे मी संसारात असूनही अखंड सुखस्वरूप आहे. हा शक्तिपातयोग एक तर सदाशिव जाणतो किंवा मी नारायण जाणतो. हा मार्ग अगम्य असल्यामुळे इतरांचा त्यात सहजासहजी प्रवेश होत नाही.

भक्तियोगाचा हा योगमार्ग "**गुरुगम्यता अगम्य**" असण्याचे खरे कारण सांगताना नाथ म्हणतात, "**कां शिष्यासी स्वानुभव देणें। हे स्वयें जाणे सदगुरु ॥ २९–४९२ ॥** ज्याला आपण घेतलेला स्वानुभव

शिष्याला दान करता येतो तो खरा सद्गुरू. अशा प्रकारे ज्ञानदानदीक्षा होऊन शिष्याला स्वानुभव मिळाला की सद्गुरूंना निरतिशय आनंद मिळतो. **शिष्य साचार अनुभव लाहे। तेणे सदगुरू सुखाचा मेरू होयें। जेवी तानयाची धणी माये। सुखावली राहे स्वानंदें ॥ २९–४९० ॥**

अशा ज्ञानदान करणाऱ्या दीक्षेची अनिवार्यता श्रीकृष्णांच्या मुखातून पटविताना ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्ययात श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की " हे अर्जुना ! ज्यावेळी माझी तुझ्यावर कृपा होईल तेव्हा अभेदरूपी सेवेने तुझे चित्त भरून जाईल म्हणजे तू मद्रूप होशील. अशी ही माझी कृपा तुझ्यावर झाली म्हणजेच तुझ्यावर माझा पूर्ण प्रसाद झाला असे समज. जन्म व मृत्यू ही तर सर्व दुःखाची निवासस्थाने आहेत. ही दुःखे जीवमात्रांकडून भोगली जातात. त्यांचा नाश होणे अती दुर्घट असते. असे असले तरी माझ्या शक्तिपातयोगाच्या प्रसादप्राप्तीमुळे तुला ही दुःखे सुखकारक व सोपी होतील. जेव्हा सूर्यप्रकाशाची साह्यता डोळ्यांना मिळते तेव्हा त्यांना अंधाराची किंमत वाटत नाही. त्याचप्रमाणे सद्गुरूच्या साहाय्याने माझा हा शांभवी विद्येचा प्रसाद मिळून ज्याची जीवपणाची हीन दशा जाऊन विभुदशा म्हणजे ब्रह्मप्राप्ती होते, तो संसाररूपी बागुलबुवाच्या भीतीने घाबरणे कधीही शक्य नाही. म्हणून हे धनंजय ! माझा हा शक्तिपातयोगदीक्षाप्रसादच ज्ञानोपलब्धी झाल्याने या संसाररूपी दुर्गतीपासून तुला तारून नेईल. मात्र अशा प्रकारच्या दीक्षाप्रसादाची अहंकाराने व अभिमानाने तू अवहेलना करशील व अशा प्रकारच्या ज्ञानदानानेच जीव संसारसागर तरून जातो हे तू नुसते आपल्या कानामनाला स्पर्शही करून देणार नसशील तर तू वस्तुतः जरी नित्यमुक्त व अव्यय असलास तरी अशी कृपादीक्षा न मिळाल्याने सर्व व्यर्थ होईल. देहतादात्म्यसंबंधाचे घाव तुझ्या अंगावर आदळून ते तुला सोसावेच लागतील. कारण शक्ती जागृत झाल्याशिवाय ती ज्ञानाचा उदय घडवून आणीत नाही व देहतादात्म्यसंबंधाचा विच्छेद होत नाही. तो व्हावा हाच या साधनाचा खरा हेतू आहे."
(ज्ञानेश्वरी १८.१२६९ ते १२७५)

[आधार आठवा]

★ कुंडलिनी शक्तीचे स्वरूप ★

१) एक अद्भुत आत्मानुभव
२) चित्शक्ती, पराशक्ती
व शब्दब्रह्मात्मिका स्फूर्ती
३) सर्व वृत्तींचे बीज
४) चैतन्याचा निरनिराळा आविर्भाव
५) प्राणपंचकरूपाने स्फुरणारी
अत्युत्तम जीवशक्ती
६) लक्ष्मी व स्पंदधर्मिणी
७) प्रणवादी सर्व मंत्रांची निर्माती
८) दोन मुखांनी युक्त
९) सूर्यासारखी व विजेसारखी तेजस्वी
१०) आधारशक्ती
११) चैतन्याची परमप्रेमरूप शक्ती
१२) सार्वभौम चैतन्याचे ऐश्वर्य
व जीवाची सावली



एक अद्‌भुत आत्मानुभव

ज्या कुंडलिनी शक्तीच्या साहाय्याने साधक ब्रह्मरूप होतो त्या शक्तीचे स्वरूप कसे आहे हे पाहाणे अत्यंत आवश्यक व उद्‌बोधक आहे. अगदी सुरवातीलाच एका साधकाचा अनुभव पाहून मग शास्त्रीय चिकित्सा करू. साधक म्हणतो,

" प्रत्यक्ष अनुभवाविना नुसते शास्त्रीय ज्ञान आंधळेच होय. एखादी बहुमोल जोड-दुर्बीण आंधळ्याच्या हाती दिली तर त्याला त्या दुर्बिणीचा स्पर्श जाणवेल. तिचा जाडजूडपणा त्याला समजेल. तो आंधळा त्या दुर्बिणीवरून हात फिरवील पण त्या जोड-दुर्बिणीच्या भिंगातून दूरच्या वस्तूंना पाहण्याची दृष्टी मात्र त्याला असणार नाही. मनाची तयारी व मानसिक सिद्धता ज्ञानाच्या कोणत्याही शाखेचे ज्ञान संपादन करण्यासाठी आवश्यक असते हे खरे आहे. पण केवळ एवढीच तयारी असून भागत नाही. विशेषतः शक्तिपातयोगात अनुभवाला सर्वात मोठे स्थान आहे हे निखलास खरे आहे.

एके दिवशी मीलित नेत्र होऊन मी ध्यानस्थ बसलो असता अंतःसृष्टीत म्हणजे माझ्या अंतर्यामात जे काही घडत होते ते पाहाण्यात मी गढून गेलो होतो. इतक्यात एक विचित्र व अनपेक्षित खळबळ माझ्या अंतरंगात उसळली. एकाएकी बहिःसृष्टीत अनुभव घेत असल्याप्रमाणे ऐन दुपारचा सूर्यप्रकाश मला दिसला. या लख्ख प्रकाशात उंच उंच आणि अजस्र अशा पर्वतास मी निरखून पाहातो आहे असे मला दिसले. नंतर हा पर्वत हळूहळू माझ्या जवळजवळ आला. थोड्या वेळाने त्याचा पायथा माझ्या दृष्टिपथात आला. हा पर्वत अगदी उघडा-बोडका होता.

काळ्याकभिन्न कठीण प्रस्तरांनी तो घडला होता. त्या पर्वतावर गवताचे एखादे वाळलेले पान सुद्धा दृष्टीस पडत नव्हते. मग हिरवळीची गोष्ट तर दूरच राहिली. हा पर्वत आकाशात इतका उच गेला होता की त्याचा शिखराकडील भाग तर पूर्णपणे माझ्या नजरेच्या टप्प्याबाहेर होता. एका भव्य शिलाखंडासारखे महाअजस्र असे त्या पर्वताचे स्वरूप होते. त्या पर्वताच्या दर्शनाने मी दिङ्मूढ झालो.

इतक्यात छायेसारखी एक मानवी आकृती त्या पर्वताच्या रोखाने माझ्या समोरून चाललेली मला दिसली. ती आकृती एका स्त्रीची आहे हे थोड्याच वेळात माझ्या लक्षात आले. त्या स्त्रीच्या कडेवर एक मूल होते.

थोड्या वेळाने ती स्त्री पर्वताच्या पायथ्याशी पोहोचली. तेथे जाताच तिने आपल्या कडेवरील अर्भकाला तो उंचच उंच पर्वत चढून जाण्यास सांगितले. " नाही, नाही. अगदी अशक्य ! " असे त्या अर्भकाने उच्चारलेले शब्द मला अगदी स्पष्ट ऐकू आले. मुलाने नकार दिल्यावर लगेच त्या स्त्रीने त्या बालकासह तो उंचच उंच पर्वत चढायला आरंभ केला. आश्चर्याची गोष्ट अशी की पावले रोखून बसविण्यास त्या उंच व सरळ अशा चढणीवर कोठेही काही खुणा दिसत नव्हत्या. त्या पर्वताच्या चढणीवर खाचा केलेल्या नव्हत्या किंवा खडक फोडून पावले टेकायला जागाही केलेली नव्हती. अशा परिस्थितीत ही स्त्री ही खडी चढण चढणार तरी कशी याचे मला आश्चर्य वाटू लागले. तोच माझी दृष्टी तिच्या पावलांशी खिळली. ती स्त्री अनवाणी नव्हती. तिच्या पायात काहीतरी पादत्राण होते आणि पादत्राण घालूनच ती चढण चढून जात होती. हे सर्व कशाचे द्योतक आहे व यातून कोणता अर्थ सूचित होत होता हे मात्र मला काही कळत नव्हते.

त्यानंतर हळूहळू त्या स्त्रीने त्या पर्वताची खडी चढण चढण्यास आरंभ केला. वळणावळणाच्या नागमोडी पाऊलवाटेने तिचे हे गिर्यारोहण चालू झाले. पर्वताची चढण उभी खडी असली तरी तिला त्याचा अडथळा झाला नाही. प्रथम ती उजवीकडे वळली. नंतर डावीकडे वळली. पुन्हा उजवीकडे आणि मग डावीकडे अशा प्रकारच्या नागमोडी वळणाने तिचे चढणे चालले होते.

माझी एकाग्र दृष्टी तिचे अनुसरण करीत होती. पुढे थोड्या वेळाने ती एका सपाट मैदानावर उभी राहिली आहे असे मला दिसले. डोंगरांच्या रांगाच्या रांगा ओलांडून ती त्या सपाट मैदानावर केव्हा आली

याचा पत्ताच लागला नाही. मैदान लागल्यावर ती थांबेल असे वाटले. परंतु क्षणभरही विश्रांती न घेता तिने आपले चालणे तसेच पुढे चालू ठेवले. तिची चालण्याची गती कल्पनातीत होती. मानसिक दृष्टया मी पाठीमागे राहात नव्हतो हे जरी खरे असले तरी शारीरिक दृष्टया तिच्या चालण्याचा वेग मी सांभाळू शकत नव्हतो हे अगदी उघड होते. माझी अहंभावाची अथवा मीपणाची जाणीव त्या स्त्रीचे अनुसरण करीत होती हेच खरे !

त्या स्त्रीने खूप अंतर पार केल्यावर दुतर्फा झाडींच्या मधील एक नवीनच देखावा प्रगट झाला. भव्य भव्य मंदिरांच्या दोन रांगांमधून एक रुंद रस्ता पसरलेला दिसत होता. त्या रस्त्यावर यात्रिकांच्या रूपाने जमलेला खूप मोठा जनसंमर्द दिसत होता. सर्व प्रकारच्या वयाचे यात्रिक व यात्रिका त्या जनसंमर्दात दिसून येत होत्या.

कडेवर अर्भकाला घेऊन चालणाऱ्या त्या स्त्रीने त्या यात्रिकांना एकाएकी गाठले. त्या गर्दीतूनही तिने अगदी झपाटयाने वाट काढली. तिच्या वेगवान गतीमुळे अगदी अग्रेसर यात्रिकही जेव्हा मागे पडला तेव्हा ती त्या अर्भकाला म्हणाली, " पाहा ! आपण त्या सर्वांना कसे सहजासहजी गाठले आणि त्यांना खूपच मागे टाकले. हे मागे पडलेले लोक कोणकोण आहेत हे तुला नंतर कळेलच ! "

त्या स्त्रीचे हे शब्द मला अगदी स्पष्टपणे ऐकू आले. हे शब्द उच्चारल्यावर त्या स्त्रीने आपले चालणे तसेच पुढे चालू ठेवले. शेवटी ती मुक्कामावर आल्याप्रमाणे थांबली. तिने त्या अर्भकाला एका उंच व खडया अशा सुळक्यासमोर उभे केले. त्या सुळक्याचा पृष्ठभाग चकाकणारा व प्रकाश परावर्तीत करणारा होता. अशा त्या सुळक्यासमोर बालकाला उभे करून ती स्त्री त्या अर्भकाच्या पाठीशी उभी राहिली. त्यानंतर ती स्त्री त्या बालकाला म्हणाली ' माझ्या छकुल्या ! मी तुला ब्रह्मासमोर आणून उभे केले आहे. येथे तू आणखी शिकशील शेवटी तू ब्रह्मरूप होशील. तोपर्यंतच्या या मधल्या काळात मी तुझ्या पाठीशी उभी असेन आणि तुझ्या प्रगतीकडे लक्ष देईन.

त्याक्षणी एक विलक्षण प्रकार घडून आला. एखाद्या चलच्चित्रपटाचा चित्रखेचक एखाद्या नामांकित घटनेच्या मागे चित्रे घेत घेत दौडत असतो त्याप्रमाणे मागे मागे जाणारा माझा देहाभिमानी आत्मा वितळत व विरत चाललेला दिसला आणि त्या अर्भकामध्ये तो पुढे येऊन डोकावू

लागला. त्यावेळी माझ्या लक्षात आले की ते अर्भक म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून मीच आहे.

माझी ही समजूत पटते न पटते तोच ते अर्भक आवेशाने ओरडून म्हणाले, " माते ! तू कोण आहेस हे आता मला समजले ! दुर्लंघ्य पर्वतावर नागमोडी वळणावळणाने तुझे सहज चढत राहाणे, मोठ्या कष्टाने पुढे गेलेल्या व रडतखडत चाललेल्या यात्रिकांना किंवा साधकांना एकदम गाठून लीलेने मागे टाकणे आणि मला इतक्या हळुवार हाताने घेऊन येऊन या ज्ञानलिंगासमोर बसविणे या सर्व गोष्टींचा मला आता उलगडा झाला. आई ! तू कुंडलिनी शक्ती आहेस. ज्ञानशक्ती आहेस. माझी तुझ्या चरणी अनन्यभावाने प्रार्थना आहे की माझे सारे अज्ञान वितळून जाऊ दे आणि आत्मानुभूतीच्या प्रांतात माझा प्रवेश होऊन दिव्य आनंदात मला विहार करू दे "

कुंडलिनी शक्तीचे खरे स्वरूप काय व ती कोणते कार्य करते याचा उलगडा या अनुभवावरून फारच चांगल्या रीतीने होतो. आता या कुंडलिनी शक्तीचे शास्त्रीय स्वरूप काय आहे हे पाहू.

चिच्छक्ती, पराशक्ती व शब्दब्रह्मात्मिका स्फूर्ती:-

कुंडलिनी म्हणजे चिच्छक्ती, पराशक्ती व शब्दब्रह्मात्मिक स्फूर्तीच आहे. योगवासिष्ठातील निर्वाण प्रकरणाच्या पूर्वार्धातील ८० व्या सर्गात कुंडलिनी शक्तीचे विवेचन करताना वसिष्ठ म्हणतात, " शरीरात सुषुम्ना म्हणून एक नाडी आहे. ती सभोवार पसरलेल्या शाखांनी परिवेष्टित झालेली असल्यामुळे परिमंडलिताकार आहे. त्या शाखानाड्यांनी आत-ड्यांना वेढलेले असल्यामुळे आंत्रवेष्टनिका असे तिचे नाव आहे. तिने मर्मस्थानांचा आश्रय केला आहे. तिच्यापासून शंभर नाड्या निघाल्या आहेत. वीणादंडाच्या मूलभागी असलेला जो तारा जोडण्याचा आवर्त किंवा पाण्याचा भोवरा असतो त्यासारखी ही नाडी आहे. ॐकाराच्या शेवटच्या ८ अशा अर्ध्या भागाच्या आकारासारखा तिचा आकार आहे. किंवा कुंडलाच्या आवर्तासारखी तिची रचना आहे. देव, असुर, मनुष्य, पशू, नक्र, पक्षी इत्यादिकात कीटकापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व प्राण्यांमध्ये ही उदय पावली आहे. थंडीने व्याकुळ होऊन पडलेल्या मोठ्या सर्पाच्या वेटोळ्याप्रमाणे तिने मंडल केले आहे. ती शुभ्र आहे. कल्पाग्नीने विर-घळून जाणाऱ्या चंद्राप्रमाणे तिने आपला वलय आकार केला आहे- गुदापासून भ्रूमध्यापर्यंत जी रंध्रे आहेत त्यात अनुवृत असलेली, मनो

वृत्तीच्या योगाने आत अतिशय चंचल झालेली व बाहेर प्राणवायूच्या योगाने एकसारखी स्पंदन करणारी अशी ती सुषुम्ना नाडी आहे. तिच्या मुळाशी आत साडेतीन वलयांच्या आकाराची कुंडलिनी या नावाची चिच्छक्ती आहे. वीणेच्या मूलप्रदेशी तार जशी वेगाने झणत्कार करीत असते त्याप्रमाणे मूलाधारात अत्यंत सूक्ष्म अशी पराशक्ती स्फुरण पावते. तीच शब्दब्रह्मात्मिका स्फूर्ती आहे. तीच प्राणाच्या संगतीने नाभी, हृदय, कंठ या स्थानी उत्तरोत्तर अधिकाधिक व्यक्त होत जाऊन पश्यन्ती, मध्यमा, वैखरी इत्यादी भेदास प्राप्त होते.

केळीच्या गाभ्याप्रमाणे कोमल असलेल्या त्या मूलाधारातील ती पराशक्ती कुंडलिनी या नावाने प्रसिद्ध आहे. कारण ती कुंडलासारखा आकार धारण करते. ती प्राण्यांची पराशक्ती आहे. ती प्राण, इंद्रिये, बुद्धी इत्यादी सर्वांच्या शक्तींना सत्ता व स्फूर्ती देऊन त्यांची प्रवृत्ती करते. अतिशय रागावलेल्या नागिणिप्रमाणे ती एकसारखी आपल्या तोंडाने प्राणाला वर फेकते व अपानाला खाली ओढते. याप्रमाणे ती सदा निःश्वासरूप होऊन राहिली आहे. जेव्हा हृदयात स्थित असलेला प्राण कुंडलिनीने आकर्षण केला असता अपानवृत्तीने कुंडलिनीपदास प्राप्त होतो त्यावेळी अंपचीकृत तन्मात्राच ज्याचे उपादान आहे अशा अंतःकरणात असलेली जीवसंविद् स्मरण, संकल्प, निश्चय, अभिमान, राग इत्यादी वृत्तिभेदांनी आत उदय पावते. कमलात जशी भ्रमरी त्याप्रमाणे कुंडलिनी देहात स्फुरण पावते.

सर्व वृत्तींचे बीज :–

कुंडलिनी शक्ती सर्व वृत्तींचे बीज असल्याने प्राणामध्ये क्रियाशक्ती व बुद्धीमध्ये ज्ञानशक्ती उत्पन्न करते. नंतर देहात ज्याचा मृदुस्पर्श–विषयसंनिकर्ष आहे अशा चक्षुरादिकांचा उदय करून ती देहात जीवाच्या पूर्व कर्मानुसार जशी जशी सामग्री वैचित्र्याने स्फुरण पावते तशी तशी त्या त्या इंद्रियांनी विशेष विषयाची स्फूर्ती व त्यांचा फलभोग इत्यादी आकाराची संवित् बनते. कुंडलिनी पुढील प्रमाणे आकार धारण करते. मृदु चक्षुरादिकांच्या योगाने विषयस्पर्शन प्रथम उदय पावते. नंतर वृत्तीच्या द्वारा बाहेर निघालेल्या प्रमात्याचा बाह्य विषयाशी संसर्ग होतो. त्यावेळी ती कुंडलिनी विषय व विषयी यांच्या दृष्टीने एकरस व एकरूप होते. वृत्तिव्याप्तीमुळे तिची व्याप्ती उदय पावते. मूलाधारात स्थित असलेल्या तिच्यापासून चक्षुरादी इंद्रियांची प्रवृत्ती होण्यास हृदयकोशात असलेल्या नाड्या हे द्वार आहे. कारण त्या सर्व नाड्या तिच्याशी

संबद्ध आहेत. त्या तिच्यापासून विस्तार पावतात. महासागरात जशा नद्या विलय पावतात त्याप्रमाणे तिच्यामध्ये सर्व नाड्या विलय पावतात. प्राणरूपाने ऊर्ध्वगमन करण्यास उत्सक झालेल्या व अपानरूपाने अधोगमन करण्यास उत्सुक झालेल्या नाड्यांचा तिच्या योगाने विस्तार व संकोच होतो. ती एक कुंडलिनीच सर्व वृत्तींचे बीज आहे. तिला 'सामानी' म्हणजे सर्वांना साधारण असलेली असे म्हटले आहे.

चैतन्याचा निरनिराळा आविर्भाव :–

कल्पाच्या आरंभापासून कल्पाच्या अंतापर्यंत एकच अपरिछिन्न असे चैतन्य अस्तित्वात असते. परंतु हे चैतन्य मूलाधारात परिच्छिन्न, परिमित होऊन कुंडलिनी या नावाने राहाते. हे कसे घडते हा खरा प्रश्न आहे. खरे पाहिले असता सर्वत्र, सर्वदा व सर्वरूपाने चित्संविद्च विद्यमान आहे. परंतु भूततन्मात्रांच्या योगाने कुंडलिनीचा उदय होतो. ती संविद् सर्वत्र विद्यमान जरी असली तरी ती देहामध्ये बुद्धीने अवच्छेद व प्रतिबिंब यांच्या योगाने द्विगुणित होऊन प्रवेश केल्यामुळे विस्तार पावते. अर्थात् बुद्धिचांचल्यामुळे जलातील चंद्राप्रमाणे ती चंचल होते. सूर्याचे उन सर्व आकाशाला व्यापीत असले तरी ते भित, डोंगर, झाडे, घरे इत्यादिकांवरच व्यक्त होते. अर्थात उपाधीच्या योग्यतेप्रमाणे व्यापक वस्तूची न्यूनाधिक अभिव्यक्ती होते. चिद्वस्तू माती, दगड इत्यादिकात व्यक्त होत नाही. तर त्यातील जाड्यामुळे तिचा अभिभव होतो. म्हणून त्या जड पदार्थात तापलेल्या पाण्यातील शीतत्वाप्रमाणे चित् दिसत नाही. पण ती देव-मनुष्यादी लिंग शरीरात स्पष्ट अभिव्यक्त होते. वृक्षादिकांच्या लिंगात अगदी गुप्त अशी असते. ती बाहेर व्यक्त होत नाही. पण आतल्या आत अनुभव घेते. पण चिदंशामध्ये हा तारतम्यभाव जसा दिसतो तसा सत्ता या अंशी दिसत नाही. तर त्या सर्व उपाधीत सत्ता त्या त्या रूपाने व्यक्त झालेली दिसते.

प्राणपंचकरूपाने स्फुरणारी अत्युत्तम जीवशक्ती:–

मनुष्याच्या स्थूलदेहरूप पंचकाच्या आत मूलाधारी कुंडलिनीत या लिंगात्मक पंचकाचे बीज म्हणजे उपादानरूप सूक्ष्म भूत प्रथम प्राणपंचकरूपाने सर्वदा स्फुरण पावते. ती प्राणरूपाने आत स्फुरण पावलेली कुंडलिनी वायुधर्माने व स्वधर्माने स्पंद, स्पर्श व संविद् अशी त्रिरूप शुद्ध कल्पना बनते. तिला कल्पनेमुळे कला, चेतनेमुळे चित् व मननामुळे मन म्हणतात. संकल्पामुळे ती संकल्परूप झाली आहे. बोधामुळे बुद्धी झाली

आहे. 'अहं' अशा अभिमानामुळे अहंकार झाली आहे. ती पुर्यष्टक या नावाची आहे. ही कुंडलिनीच देहात अत्युत्तम जीवशक्ती होऊन राहिली आहे. ती अपानत्वास प्राप्त होऊन सतत अधोभागी वाहाते. समानरूप होऊन नाभीमध्ये स्थित होते. उदान नावाने ती ऊर्ध्वभागी स्थित आहे. तिला खाली अपानवृत्ती व वर उदानवृत्ती जरी ओढीत असल्या तरी ती स्वत: निश्चलच राहाते. आणि मधल्या समानवृत्तीने घट्ट धरून ठेवल्यामुळेच ऊर्ध्ववृत्ती जरी अत्यंत बलाढ्य असली तरी ती उदानरूपच बनून स्वस्थ राहाते लिंग शरीराला बाहेर घालवीत नाही.

कुंडलिनी म्हणजे लक्ष्मी व स्पंदधर्मिणी–

मूलाधारात कुंडलिनी राहाते. ती सर्व शरीरेंद्रिय समुदायाला प्राण देणारी असल्यामुळे लक्ष्मी आहे.जप करताना फिरविल्या जाणाऱ्या रुद्राक्षादी फळांच्या माळेप्रमाणे ती प्राण व अपान यांच्या ऊर्ध्व व अधोगतीने कंपित होऊन अव्यक्त शब्द उत्पन्न करते. ती दंडाचा प्रहार केलेल्या नागिणीप्रमाणे ऊर्ध्वमुख होऊन उलटणारी आहे. स्वर्ग व पृथ्वी या दोन लोकांमध्ये प्राण्यांची ऊर्ध्वगती व अधोगती होण्यास विहित व निषिद्ध क्रिया जशी कारण होते, त्याप्रमाणे ती प्राण व अपान यांच्या ऊर्ध्व व अधोगमनास कारण होते. त्यामुळे ती स्पंदधर्मिणी आहे. ती चक्षुरादी इंद्रियांच्या द्वारा होणारा जो रूपादी विषयांचा अनुभव व त्याचा विकास करविणारी आहे. अर्थात कमलांचा विकास करणाऱ्या सूर्यासारखी ती स्थित आहे.

प्रणवादी सर्व मंत्रांची निर्माती :––

प्राणशक्तिस्वरूप मूलाधारस्थ कुंडलिनीपासूनच प्रणवादी सर्व मंत्रांची उत्पत्ती होते. प्रपंचसार तंत्रामध्ये प्रकृतीचे वर्णन करताना असे म्हटले आहे की–

प्रकृतिः निश्चला परावाग्रूपिणी परप्रणवात्मिका कुंडलिनी शक्तिः।

याचा अर्थ असा आहे की प्रकृती ही अत्यंत निश्चल आहे. परावाणी हे तिचे स्वरूप आहे. पर-प्रणवाची उत्पत्ती तिच्यापासून होत असल्याने ही प्रकृती श्रेष्ठ स्वरूपाच्या ओंकारमंत्राशी एकरूप झालेली कुंडलिनी शक्तीच आहे.

गायत्री मंत्राची उत्पत्ती कुंडलिनीपासून होते हे सांगताना योगचूडामणी उपनिषदात असे म्हटले आहे की,

कुंडलिन्यां समुद्भूता गायत्री प्राणधारिणी । प्राणविद्या महाविद्या यस्तां वेत्ति स वेदवित् ॥३५॥

कुंडलिनी ही प्राणशक्तियुक्त अशा गायत्रीचे उत्पत्तिस्थान आहे. प्राणविद्यारूपाने ज्या गायत्रीची उपासना केली जाते ती खरोखर कुंडलिनीच्या रूपाने साकार झालेली महाविद्याच आहे. जो या महाविद्येला जाणतो तोच खरे वेदविद्येचे रहस्य जाणतो.

" सा देवी वायवी शक्तिः " म्हणजे ती कुंडलिनी देवी ही वायवी म्हणजे प्राणशक्ती आहे असे रुद्रयामल तंत्रात म्हटले आहे प्राणशक्ती म्हणजे जीवाचा जीवनीशक्तीच होय. या शक्तिपासूनच अकारापासून क्षकारापर्यंत सर्व अक्षरांची आणि अक्षरयुक्त मंत्रांची शक्तिसह उत्पत्ती होते, असे योगशिपनिषदाच्या तिसऱ्या अध्यायात सांगितले आहे.

मूलाधारगता शक्तिः स्वाधारा बिंदुरूपिणी ॥२॥ तस्यामुत्पद्यते नादः सूक्ष्मबीजादिवांकुरः । तां पश्यंतीं विदुर्विश्वं यथा पश्यंति योगिनः ॥३॥ हृदये व्यंज्यते घोषो गर्जत्पर्जन्यसंनिभः । तत्र स्थिता सुरेशान मध्यमेत्यभिधीयते ॥४॥ प्राणेन च स्वराख्येन प्रथिता वैखरी पुनः । शाखापल्लवरूपेण तालवादिस्थानघट्टनात् ॥५॥ अकारादि क्षकारान्ता-न्यक्षराणि समीरयेत् । अक्षरेभ्यः पदानि स्युः पदेभ्यो वाक्यसंभवः ॥६॥ सर्वे वाक्यात्मका मंत्रा वेदशास्त्राणि कृत्स्नशः । पुराणानि च काव्यानि भाषाश्च विविधा अपि ॥७॥ सप्तस्वराश्च गाथाश्च सर्वे नादसमुद्भवाः । एषा सरस्वती देवी सर्वभूतगुहाश्रया ॥८॥

मूलाधारात दुसऱ्या कोणाचाही आधार नसलेली व स्व म्हणजे फक्त आत्म्याचाच आधार असलेली बिंदुरूपाने राहाणारी कुंडलिनी नावाची शक्ती आहे. या कुंडलिनीच्या आधारानेच जीवात्मा राहात असतो. सूक्ष्म बीजापासून ज्याप्रमाणे अंकुराची उत्पत्ती होते त्याप्रमाणे कुंडलिनीच्या रूपाने राहाणाऱ्या सूक्ष्म अशा प्राणशक्तीतून नादाची उत्पत्ती होते. योगी लोक या नादाच्या द्वारेच नादाच्या विश्वरूप अवस्थेचे दर्शन घेतात. नादाच्या या अवस्थेचे नाव पश्यंती असे आहे. मेघासारखा गर्जना करणारा जो नाद हृदयात व्यक्त होतो त्या नादाला हे विधात्या मध्यमा असे म्हणतात. प्राणवायूमुळे कंठातून जो स्वर, आवाज किंवा शब्द ध्वनीच्या रूपाने बाहेर येतो त्याला वैखरी अशी संज्ञा आहे. शाखा व पर्णपुष्पादिकांमुळे वृक्ष जसा फोफावतो त्याप्रमाणे तालुदंतादी संबंधामुळेही वैखरी

वाणी विस्तारलेली दिसते. 'अ' पासून 'क्ष' पर्यंतच्या ध्वनीला अक्षरे म्हणतात. अक्षरांपासून पदे व पदांपासून वाक्ये होतात. सर्व मंत्र वेद, शास्त्र, पुराणे, काव्ये, नाना प्रकारच्या भाषा, सप्तस्वर, कथा वगैरे सर्व या नादापासून उत्पन्न झाल्या आहेत. सर्व प्राण्यांच्या हृदयरूप गुहेमध्ये वास करणारी ही देवी साक्षात् सरस्वतीच आहे.

जाग्रत (स्थूल), स्वप्न (सूक्ष्म), सुषुप्ती (कारण) व तुरीय ह्या आत्म्याच्या चार अवस्था आहेत. त्याचप्रमाणे नादाच्याही चार अवस्था आहेत. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशी त्यांची नावे आहेत. मूलाधारात बिंदुरूपाने पराशक्ती कुंडलिनी असते. तिलाच "परा" असे म्हटले जाते. ही परा नादाची तुरीयावस्था आहे याच्यापुढे नाद जेव्हा स्वाधिष्ठानामध्ये उपस्थित होतो तेव्हा त्याची जी अवस्था होते त्याला पश्यंती असे म्हणतात. ही पश्यन्ती नादाची सुषुप्ती किंवा कारणावस्था आहे. जेव्हा हा नाद हृदयापर्यंत पोहोचतो तेव्हा त्याला मध्यमा म्हणतात. ही नादाची स्वप्न किंवा सूक्ष्मावस्था होय. शेवटी नाद जेव्हा कंठात पोहोचतो तेव्हा त्याचा स्पष्ट शब्दरूपाने उच्चार होतो. यावेळी त्याला वैखरी म्हणतात. वैखरी ही नादाची जाग्रत किंवा स्थूलावस्था आहे. मध्यमा नादाला अनाहतनाद असेही म्हटले जाते. याचे कारण असे आहे की हृदयप्रदेशामध्ये कोणत्याही आघाताशिवाय हा नाद स्वतःच प्रकट होत असतो. नादाच्या परा व पश्यंती या दोन अवस्था योग्यांनाच अनुभवास मिळतात. जे योगमार्गात पुढे जातात त्यांना मध्यमा अवस्थेचे अनुभव येत असतात. म्हणजे अनाहत ध्वनी ऐकावयास मिळतो.

दोन मुखांनी युक्त :–

सर्पाला जशी दोन तोंडे असतात त्याप्रमाणे कुंडलीनीला अंतर्मुख व बहिर्मुख अशी दोन मुखे आहेत.

"द्विवक्त्रा कुंडलिन्यभिधा नित्यानंदस्वरूपा परमा कला प्रकृति वर्तते ।

कुंडलिनी नावाची नित्यानंद स्वरूपाची परमप्रकृती आहे. तिला दोन मुखे आहेत. ती एका मुखाने म्हणजे एका बाजूने ब्रह्मद्वार किंवा ब्रह्मविवराला अडवून निद्रा घेते. दुसऱ्या मुखाने ती श्वास-प्रश्वास करते. हाच जीवाचा श्वासोश्छवास होय. या मुखाने ही कुंडलिनी शक्ती नेहमी जागृत असते. या जागृतीमुळेच जीवाला बा ह्यज्ञान किंवा चेतना चांगल्या

रीतीने होते. कुंडलिनीच्या या बहिर्मुख गतीमुळेच एकत्वाची जाणीव न होता जीवाला भिन्नतेची जाणीव होते. कुंडलिनी शक्तीचे अंतर्मुख सुप्त किंवा बद्ध असल्यामुळे जीवाला आपण खरोखरी कोण आहोत हे कळत नाही. त्याच्या ठिकाणी अंतर्ज्ञान, आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान याचा कायम अभाव असतो. हठयोग प्रदीपिकेमध्ये याबद्दल असे म्हटले आहे की,

येन मार्गेण गंतव्यं ब्रह्मस्थानं निरामयम् । मुखेनाच्छाद्य तद्द्वारं प्रसुप्ता परमेश्वरी ॥३-१०६॥

साधक सुषुम्नामार्गाने गेला म्हणजे निरामय अशा ब्रह्मस्थानी जाऊन पोहोचतो व आत्मसाक्षात्कार करून घेतो. या सुषुम्नेच्या शिखेकडील टोकामध्ये परमात्मा असतो असे श्रुतीतही म्हटले आहे "**तस्याः शिखायामध्ये परमात्मा व्यवस्थित**" असे वेदांनीच म्हटले आहे. या सुषुम्नानाडीच्या मुखापाशीच म्हणजे ब्रह्मद्वारापाशीच ते द्वार अडवून ही परमेश्वरी शक्ती कुंडलिनी निद्रा घेत असते.

सूर्यासारखी व विजेसारखी तेजस्वी :–

अद्वयतारकोपनिषदात कुंडलिनीचे वर्णन करताना ऋषींनी म्हटले आहे की, "**देहमध्ये ब्रह्मनाडी सुषुम्ना सूर्यरूपिणी पूर्ण चंद्रभा वर्तते । सा तु मूलादारभ्य ब्रह्मरंध्रगामिनी भवति । तन्मध्ये तटित्कोटिसमानकान्त्या मृणालसूत्रवत् सूक्ष्मांगी कुंडलिनीति प्रसिद्धास्ति । तां दृष्टवा मनसैव नरः सर्वपापविनाशद्वारा मुक्तो भवती ॥५॥**

देहामध्ये सूर्यासारखी तेजस्वी रूप असलेली व पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे शीतल असलेली सुषुम्ना नावाची ब्रह्मनाडी आहे. तिचा आरंभ मूलाधारापासून होऊन ती ब्रह्मरंध्रापर्यंत जाते. या नाडीमध्ये कोटी कोटी विजेप्रमाणे तेजस्वी व कमलाच्या तंतूप्रमाणे सूक्ष्म असलेली कुंडलिनी नावाची प्रसिद्ध अशी शक्ती वास करते. मनाने ह्या शक्तीचे दर्शन घेतले असता मनुष्य सर्व पापापासून सुटून मुक्त होतो.

महानारायण उपनिषदामध्ये कुंडलिनीचे फारच सुंदर वर्णन आले आहे.

तस्यमध्ये वन्हिशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थितः । नीलतोयदमध्यस्था विद्युल्लेखेव भास्वरा । निवारशूकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा ॥ १३-२॥

ही कुंडलिनी शक्ती दोन ढगांमध्ये प्रकट होणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणे तेजस्वी आहे. विजेपेक्षाही ही शक्ती अत्यंत बलवान अशी आहे. तिचे

कार्य खनिज, वनस्पती, पशू, पक्षी, इत्यादींकामध्येही थोडे थोडे दिसून येते.

आधारशक्ती :–

एका कुंडलिनीचे ज्ञान झाले की ब्रह्मांडातील यच्चयावत तत्त्वांचे ज्ञान होते. योगशास्त्राच्या दृष्टीने कुंडलिनी, मन, प्राण, नाद व बिंदू या पाच विषयांमुळे सर्व पिंड ब्रह्मांडाच्या तत्त्वांचा उलगडा स्पष्ट रीतीने होतो. शेवटचे चार विषय कुंडलिनीच्या आधीन असल्यामुळे तिच्या संबंधी ज्ञान झाले की साधक कृतकृत्य होतो. हे ज्ञान होणे याचा अर्थच तीं गुरुकृपेने जागृत होणे होय. हठयोगप्रदीपिकेमध्ये या अर्थानेच असे म्हटले आहे की–

सशैलवनधात्रीणां यथाधारोऽहिनायकः ।
सर्वेषां योगतंत्राणां तथाधारो हि कुंडली ॥ १ ॥

वन, पर्वत, नदी, सरोवर आणि समुद्रासहित सर्व पृथ्वीचा शेष नाग म्हणजे ब्रह्माची शक्ती हीच आधार आहे. त्याचप्रमाणे सर्व योगाचा व सर्व तंत्रांचा आधार कुंडलिनी शक्तीच आहे.

योगशिखोपनिषदाच्या ६ व्या अध्यायात या आधाररूप कुंडलिनी शक्तीचा महिमा पुढीलप्रमाणे वर्णन केला आहे.

आधाराज्जायते विश्वं विश्वं तत्रैव लियते । तस्मात् सर्वप्रयत्नेन गुरुपादं समाश्रयेत् ॥ २३ ॥ आधारं यो विजानाति तमसः परमश्नुते । तस्य विज्ञानमात्रेण नरः पापैः प्रमुच्चते ॥ २५ ॥ आधारचक्रमहसा विद्युत्पुंजसमप्रभा । तदा मुक्तिर्न संदेहो यदि तुष्टः स्वयं गुरुः ॥ २६ ॥ केचिद्वदंति चाधारं सुषुम्ना च सरस्वती ॥ २२ ॥ महामाया महालक्ष्मीर्मम्हादेवी सरस्वती । आधारशक्तिरव्यक्ता यया विश्वं प्रवर्तते ॥ ११-२ ॥

या आधारशक्तीच्या सामर्थ्यानेच सर्व विश्व उत्पन्न होते व तेथेच ते लीन होते. हे सर्वविषयक ज्ञान होण्यासाठी सर्वप्रयत्नाने गुरुचरणाची सेवा करून गुरुकृपेचा आश्रय प्राप्त केला पाहिजे. आधारशक्ती झोपली की सर्व विश्वही निद्राधीन होते. ती जागृत झाली की त्रैलोक्य जागे होते. जो या आधारशक्तीला विशेष रूपाने जाणतो तो अज्ञानरूपी अंधकाराच्या पलीकडे जाऊन ज्योतिर्मय चिदात्म्याला जाणून ज्ञानवान होऊन परमसुखी व कृतार्थ होतो. केवळ आधारशक्तीच्या ज्ञानाने मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो. मूलाधारकमलात राहाणाऱ्या विद्युल्लतेच्या पुंजाप्रमाणे तेजस्वी असलेल्या प्रकाशमान अशा आत्मशक्तीच्या केवळ

ज्ञानाने अगर अवलोकनाने मोक्ष निःसंशय मिळतो जर गुरू संतुष्ट झाले तर मुक्तीबाबत कसलाही संदेह बाळगण्याचे कारण नाही. हिलाच कोणी आधार, कोणी सुषुम्ना, कोणी कुंडलिनी, सरस्वती किंवा आधार-शक्ती असे म्हणतात. हीच महामाया, महालक्ष्मी, महादेवी, सरस्वती किंवा अव्यक्त आधारशक्ती आहे. या शक्तीमुळेच मन, प्राण, शरीर इत्यादींच्या क्रिया होत असतात. इतकेच काय सर्व विश्व या शक्तीमुळे प्रवृत्त झालेले दिसते.

इतका महिमा सांगून झाल्यावर योगशिखोपनिषदात पुढे असे सांगितले आहे की –

आधारशक्तिनिद्रियां विश्वं भवति निद्रया ।। २३ ।। तस्यां शक्ति-प्रबोधेन त्रैलोक्यं प्रतिबुध्यते ।। सृष्टिधारमाधारमाधारे सर्वदेवताः ।। आधारे सर्ववेदाश्च तस्मादाधारमाश्रयेत् ।। २९ ।। आधारे पश्चिमे भागे त्रिवेणी संगमो भवेत् । तत्र स्नात्वा च पीत्वा च नरः पापात् प्रमुच्चते ।।३०।। आधारे पश्चिमं लिंगं कवाटं तत्र विद्यते । तस्योद्घाटनमात्रेण मुच्यते भवबंधनात् ।। ३१ ।।

आधार म्हणजे कुंडलिनी शक्ती झोपली की सर्व विश्वही निद्राधीन होते. ज्यावेळी ती जागृत होते त्यावेळी त्रैलोक्य जागे होते. ही शक्ती मूलाधारात निवास करते. तिच्या अस्तित्त्वामुळेच सृष्टीचा आधार मूलाधार आहे. या आधाराच्या म्हणजे शक्तीच्या ठिकाणीच सर्व देवता राहातात. या आधाराच्या पश्चिम भागात इडा, पिंगला व सुषुम्ना यांचा संगम होतो. ज्यावेळी गुरुकृपेने शक्ती जागृत होते त्यावेळी मन व प्राण एकत्र होऊन साधकाला दिव्य स्नान व पान घडते. असे घडले म्हणजे साधक सर्व पापांपासून मुक्त होतो. आधाराच्या पश्चिम भागामध्ये स्वयंभू लिंग असून तेथेच सुषुम्नेचा प्रवेशमार्ग म्हणजे ब्रह्मद्वार आहे. हा मार्ग जेव्हा मोकळा होतो तेव्हा साधक सर्व प्रकारच्या संसारबंधनातून विमुक्त होतो.

चैतन्याची परमप्रेमरूपशक्ती :–

वस्तूची शक्ती वस्तूशी समव्याप्त असते. पण ज्याप्रमाणे जलाशयातील पाणी वाहू लागले असताना मर्यादित होते त्याप्रमाणे वस्तूची शक्तीही कार्यरूप होताना मर्यादित होते. तशीच जीवाची शक्ती जेव्हा कार्यरूप होते तेव्हा ती मर्यादित होते. वाहाणारे पाणी मर्यादित होण्याचे कारण जसा जमिनीचा बांध असतो त्याप्रमाणे जीवाची शक्ती सूक्ष्म

नाड्यातून वाहात असल्यामुळे मर्यादित होते. या नाड्या मांसमय नसल्यामुळे मन ज्याप्रमाणे शस्त्राने तुटत नाही त्याप्रमाणे या नाड्या शस्त्राने तुटत नाहीत व अग्नीने जळतही नाहीत. प्रेत जाळल्यावरही त्या जळत नाहीत. या नाड्यांच्या योगाने जीव सर्व लोकात गमनागमन करीत असतो. या नाड्यांची साडेतीन वेढ्यांची जी गुंडाळी आहे तिला कुंडलिनी म्हणतात. ही कुंडलिनी केवळ योगाभ्यासानेच दृश्य होणारी आहे.

या भगवच्छक्ती कुंडलिनीचे साडेतीन वेढे आहेत. ॐकाराच्या अ, उ, म व अर्धमात्रा अशा साडेतीन मात्रांच्या मूळ स्थितीप्रमाणे आहेत. ॐकार मूळस्थितीत कुंडलिनी शक्तीशी एकरूप असतो. शक्ती ही परमेश्वराप्रमाणे शुद्ध चैतन्यरूपच आहे. पण " मी " या वृत्तीरूपाने स्फुरण पावून अज्ञानभ्रमाने ती आपले चैतन्यस्वरूप विसरली म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणें. " **तैसी अज्ञानांगीकारे । निघाली वृत्ति विखुरे । ते सत्त्वरजद्वारें । तमहि होय ।।** (**अ. १४-१४४**) त्रिगुणात्मक होते. सत्त्वगुणाने ती शक्ती प्रकाशरूप असते, रजोगुणाने क्रियारूप होते व तमोगुणाने जड पदार्थरूप होते. अशा या शक्तीपासून शब्दद्वारा स्थूल, सूक्ष्म व कारणरूप सृष्टी उत्पन्न होते. कुंडलिनी निजलेली असते म्हणजे आपले चैतन्यस्वरूपाशी असलेले ऐक्य विसरलेली असते. अधोमुख असते म्हणजे सृष्टीचे कारण जो परमात्मा त्याला विसरून नामरूपात्मक कार्यरूप सृष्टीच्या अभिमुख असते. सारांश शक्ती अधोमुख असते तेव्हा जगत् प्रसवते व ऊर्ध्वमुख झाली असता जगाचा नाश करून ब्रह्मरूप होते.

शक्ती जागी झाली म्हणजे ती तेजोमय होते. अशी ही परमप्रेमरूप चैतन्याची शक्ती परमप्रेमरूप असते. चैतन्याचे ठिकाणी तिच्याशी ऐक्य पावण्याची प्रेमोत्कंठा व शक्तीचे ठिकाणी आपल्या स्वरूपभूत चैतन्याशी ऐक्य पावण्याची प्रमोत्कंठा साहजिकच असते. जेव्हा गुरुकृपेनें शक्तिपात होतो तेव्हा शक्ती जागृत होऊन जो शिवाला मिळण्यासाठी विलास होतो त्यालाच रासलीला म्हटले जाते व ती राधाकृष्णांच्या रूपाने साकारलेली दिसते.

सार्वभौम चैतन्याचे ऐश्वर्य व जीवाची सावली :–

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्ययात कुंडलिनीचे अपूर्व वर्णन केले आहे. ते म्हणतात–

नागिणीचें पिलें । कुंकुमें नाहलें । वळण घेऊन आले । सेजे जैसे ।। ६–२२२ ।। तैसीं ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख

सर्पिणी। निदेली असे ॥ २२३ ॥ विद्युल्लतेची विडी। वन्हीज्वाळांची घडी। पंधरेयाची चोखडी। घोटीव जैसी ॥२२४॥ ते कुडलिनी जगदंबा ॥ जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा। जया विश्वबिजाचिया कोंभा। साऊली केली ॥ २७२ ॥ जे शून्य लिंगाची पिंडी। जे परमात्मया शिवाची करंडी। जे प्रणवाची उघडी। जन्मभूमी ॥ २७३ ॥ हे असो ते कुंडलिनी बाळी। हृदयाआत आली। तंव अनाहताची बोली। चावळे ते ॥ २७४ ॥ तया हृदयाच्या परिवरीं। कुंडलिनिया परमेश्वरी। तेजाची शिदोरी। विनियोगिली ॥ २८१ ॥ बुद्धिचेनि शाके। हातबोनें निके। द्वैत तेथ न देखे। तैसे केले ॥ २८२ ॥ निजकांती हारविली। मग प्राणचि केवळ जाहाली। ते वेळीं कैसी गमली। म्हणावी पां ॥ २८३ ॥ हो का जे पवनाची पुतळी। पांधुरली होती सोनेसळी। ते फेडूनिया वेगळी। ठेविली तिया ॥२८४ ॥ ना तरी वायूचेनि आंगे झगटली। दीपाची दृष्टी निमटली। का लखलखोनि हारपली। वीज गगनी ॥ २८५ ॥ तैसी हृदयकमळवेन्ही। दिसे जैसी सोनियाचि सरी। ना तरी प्रकाशजळाची झरी। वाहात आली ॥ २८६॥ मग ते हृदयभूमि पोकळे। जिराली कां एके वेळे। तैसे शक्तीचे रूप मावळे। शक्तीचिमाजी ॥ २८७ ॥ तेव्हा तरी शक्तीचि म्हणिजे। येन्हवी तो प्राण केवळ जाणिजे। आता नादबिंदु नेणिजे। कळाज्योती ॥ २८८ ॥

कुंकवानें किंवा केशरानें न्हालेले नागीणसर्पाचे पिलू वेटोळे घालून निजलेले असावे त्याप्रमाणे मूलाधारात ती लहानशी सर्पासारखी कुंडलिनी साडेतीन वेढे घालून खाली तोंड करून निजलेली असते. ती विजेच्या कंकणाप्रमाणे किंवा अग्निज्वालेच्या घडीप्रमाणे अथवा घोटून चकचकीत केलेल्या सोन्याच्या वेढ्याप्रमाणे नाभिस्कंदात नीट घट्ट व संकोचून साडेतीन पुटात दाटून बसलेली असते. ती कुंडलिनी जगदंबा आहे. जगाची माता आहे. सार्वभौम चैतन्याची ती एश्वर्यरूप शोभा आहे. ती जगद्बीजाचा अंकुर जो जीव त्याच्यावर सावली धरते. ती निराकार ब्रह्माची साकार मूर्ती, परमात्मा शिवाची संबळी व ओंकाराची जन्मभूमीच आहे असो. ही कुंडलिनी बाला हृदयाचे ठिकाणी आली म्हणजे अनाहत नाद साधकाला ऐकू येऊ लागतो.

कुंडलिनी शक्ती जेव्हा हृदयापाशी येते तेव्हा ती आपल्या तेजाची शिदोरी चैतन्याला अर्पण करते म्हणजे ती हृदयस्थ प्राणरूप आत्म्याशी आपल्या तेजासकट एकरूप होते. अर्थात कुंडलिनी आपली तेजरूप कांती टाकून जेव्हा प्राणवायूरूप होऊन राहाते त्यावेळी तिचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिसून येते. एखाद्या वायूच्या केलेल्या बाहुलीला सोन्याचा पितांबर

पांघरावा व तो सोडून मग तिला वेगळे करून ठेवावे त्याप्रमाणे ती दिसते. वाऱ्याची झुळुक लागून दिव्याची ज्योत विझली जावी किंवा वीज चमकून एकदम आकाशात नाहीशी व्हावी त्याप्रमाणे हृदयकमळापर्यंत जाऊन ती सोन्याच्या सरीसारखी किंवा प्रकाशरूप पाण्याच्या तेजाचा झरा वाहात आल्याप्रमाणे दिसते. तो शक्तिरूप तेजाचा झरा हृदयरूपी भूमीच्या पोकळीत एकदम जिरतो व शक्तीचे रूप शक्तीतच मावळते. शिवाशी एकरूप झाल्याने ती प्राणरूपानेच जाणली जाते. त्या अवस्थेत नाद, बिंदू, कला व ज्योती हे प्रकार किंवा भेद त्या समरसतेच्या अवस्थेत शिल्लक राहात नाही.

शक्तिपातयोगाची दिव्य व अलौकिक
★ वैदिक परंपरा ★

१) वेदातील शक्तीचे माहात्म्य व दीक्षेने मुक्तता
२) कूर्मपुराणातील महायोगाची परंपरा
३) वसिष्ठांकडून श्रीप्रभुरामचंद्रांची दीक्षा
४) शंखस्पर्शद्वारा ध्रुवाला महाविष्णूंकडून शक्तिपात
५) श्रीदत्तात्रेयांची यदुराजाला आलिंगन देऊन स्पर्शदीक्षा
६) हनुमंतांची शक्तिपाताने कृतार्थता
७) अंगिरस ऋषींच्या कृपेने श्रीकृष्णांना तृष्णाहीनता
८) श्रीकृष्णांकडून मिळालेल्या शक्तिपात दीक्षेने उद्धवाची स्वानंदनिमग्नता
९) अर्जुनाला शक्तिपाताने स्वरूपप्राप्ती
१०) शक्तिपातामुळे श्रीचैतन्यमहाप्रभूंना भक्तीचा उन्मेष
११) शंकरांकडून हरिनाथांना शक्तिपाताने निजानंद
१२) सिद्धपंथाच्या दीक्षेने ज्ञानेश्वरांची कृतार्थता
१३) शक्तिपाताने नामदेवांना कृपेची सावली
१४) जनार्दनस्वामींना दत्तात्रेयांकडून शक्तिपाताने आत्मबोध
१५) एकनाथांना गुरुकृपेने परिपूर्ण ब्रह्मप्राप्ती
१६) महर्षी व्यासांकडून श्रीराघवचैतन्यांना शक्तिपात-दीक्षा

१७) केशवचैतन्यांना शक्तिपात प्रभावाने
आत्मसाक्षात्कार
१८) संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराजांची शक्तिपाताने
खेदरहित स्थिती
१९) निळोबांना तुकारामांकडून शक्तिपातदीक्षेने
निजात्मस्थिती
२०) सोहिरोबानाथ अंबिये यांना गोरक्षनाथांकडून
शक्तिपातदीक्षा
२१) निरंजनांना रघुनाथांकडून चैतन्यघनस्वरूपप्राप्ती
२२) श्रीप्रभुरामचंद्रांकडून श्रीसमर्थ रामदासस्वामी
महाराजांना शक्तिपाताने स्वसुखधनप्राप्ती
२३) शिवाजीमहाराजांना शक्तिपातदीक्षेने श्रीसमर्थां-
कडून आत्मारामप्राप्ती
२४) श्रीरघुनाथस्वामींकडून आनंदमूर्ती ब्रह्मनाळकरांना
शक्तिपाताने अद्वयस्थिती
२५) तुकामाईंकडून गोंदवलेकरमहाराजांना
शक्तिपाताने ब्रह्मचैतन्यप्राप्ती
२६) नारायणतीर्थदेवांना श्रीगंगाधरतीर्थांची
सिद्धयोगदीक्षा
२७) श्रीनारायणतीर्थांकडून श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थांना
शक्तिसंक्रमण
२८) श्रीगुळवणीमहाराजांना श्री प.प.श्रीलोकनाथतीर्थ
स्वामीमहाराजांकडून स्वप्न व प्रत्यक्ष दीक्षा

भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीची जी अनेक वैशिष्टचे आहेत त्यात शक्तिपातयोगाचे स्थान अनुपमेय आहे. कारण आध्यात्माच्या वाटचालीत सर्व मार्गांचे मूर्धन्यस्थान या मार्गाला लाभले आहे. या अपूर्वतेमुळच श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी या मार्गाला पंथराज म्हटले आहे. दिव्य अशा परमेश्वरी–शांभवी-शक्तीचा ब्रह्मप्राप्तीसाठी शिष्यावर केलेला अनुग्रह म्हणजे शक्तिपात होय. भगवद्स्वरूप गुरूच्या अनुग्रहाशिवाय म्हणजेच शक्तिपात होऊन कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय आध्यात्मजीवनाची खरी वाटचाल सुरू होऊ शकत नाही.सुप्त भगवत्शक्ती जोपर्यंत पूर्णपणे जागृत होत नाही तोपर्यंय मनुष्यजीवनाचे खरे सार्थकही होत नाही. याकरिता वेदकालापासून तो आजपर्यंत अवतारी पुरुष, ऋषी, मुनी, संत, महंत इत्यादी सर्वांनी या मार्गाची कास धरलेली दिसून येते. या सर्वांनी आपल्याला परंपरेनी प्राप्त झालेल्या या विद्येचा साधकांवर अनुग्रह करून त्यांना परमेश्वर प्राप्तीसाठी मार्गस्थ केले. परंपरा व पद्धत कोणतीही असली तरी साधकात शक्तिसंक्रमण घडून येणे हे खरे मूळ तत्त्व होय. भक्ती, कर्म, उपासना, जप, तप, नेम, यंत्र, मंत्र, तंत्र, ज्ञान इत्यादी मूळ तत्त्वाचा तपशील होय. तपशीलात न शिरता शक्तिपातयोगाचा प्रवाह युगानुयुगे कशा रीतीने वाहात आला व त्याने देव, ऋषी, मुनी, संत, महंत, साधू, तापसी, संन्यासी व शेकडोशे साधकांना कसे धन्य केले हे पाहिले म्हणजे भारताच्या आध्यात्मिक संपन्नतेची कल्पना येऊन मन कृतार्थ होते. शक्तिपातयोगाच्या दिव्य व अलौकिक परंपरेचा इतिहास पाहिला म्हणजे आपणही या प्रवाहात स्नान करून धन्य व्हावे अशी इच्छा झाल्यास नवल नाही. तशी इच्छा व्हावी हाच या पुस्तकाचा खरा हेतू आहे.

वेदातील शक्तीचे माहात्म्य व दीक्षेने मुक्तता:–

"**सदाकारा परानंदा संसारोच्छेदकारिणी।**" अशा शक्तीचे माहात्म्य ब्रह्मप्राप्तीच्या मार्गात फार मोठे आहे. अथर्ववेदाच्या १० व्या कांडातील ८ व्या सूक्तात ऋषी म्हणतात–

एषा सनत्नी सनमेव जातैषा पुराणी परि सर्वं बभूव।
मही देव्युषसो विभाती सैकेनैकेन मिषता विचष्टे॥

"ही शक्ती सनातन आहे. सनातन काळापासून ती विद्यमान आहे. तीच फार प्राचीन शक्ती सर्व होऊन राहाते. हीच महान शक्तिदेवी उषःकालांना प्रकाशित करते. ती एकेकटचा प्राण्यांच्या बरोबर दिसते."

अशी ही सनातन शक्ती प्रत्येक मनुष्यप्राण्याच्या ठिकाणी असूनही ती निद्रिस्त स्वरूपात असते. ज्ञानी व शक्तियुक्त पुरुष शक्तिजागृतीची दीक्षा देऊन लोकांचा उद्धार करतात. अथर्ववेदातील कांड २ सूक्त ३४ मध्ये मुक्तीच्या सरळ मार्गाचे वर्णन करताना शक्तिपातदीक्षेने ज्ञानी पुरुष बद्धांना कसे मुक्त करतात याचे वर्णन आले आहे. ऋषी म्हणतात–

ये बध्यमानमनु दीध्याना अन्वैक्षन्त मनसा चक्षुषा च।
अनिष्टानग्रे प्र प्रमोक्तु देवो विश्वकर्मा प्रजया संरराणः॥

तेजस्वी व ज्ञानी पुरुष स्वतःच्या मनाने व डोळयांनी बद्ध स्थितीत असलेल्या प्राण्यांकडे दयादृष्टीने पाहातात. (त्यांच्या पाहाण्यामुळे शक्ति-संक्रमण घडून येते.) त्यांना विश्वास व आनंद निर्माण करणारा देव सर्व-प्रथम मुक्त करो. (अशा प्रकारे शक्तिसंक्रमणाचे कार्य करणारे पुरुष स्वतः मुक्त होतातच; पण त्यांच्यामुळे साधक व बद्धजीवही मुक्तीची वाटचाल करू लागतात. याशिवाय दुसरा सोपा मार्ग नाही.)

अथर्ववेदातील ब्रह्मा प्रकरणातील १९ व्या कांडातील ४३ व्या सूक्तात दीक्षेचे व तपाचे माहात्म्य वर्णन करताना ऋषी म्हणतात–

यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपया सह।
ब्रह्मा मा तत्र नयतु ब्रह्मा ब्रह्म दधातु मे॥

दीक्षा आणि तपासह जेथे ब्रह्मज्ञानी जातात तेथे ब्रह्मा मला घेऊन जावो आणि ब्रह्मा मला ज्ञान देवो.

ऋग्वेदाच्या प्रथम मंडलातील १६४ व्या सूक्तात शक्तिपात दीक्षेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

यत्रा सुपर्णा अमृतस्य भागमनिमेषं विदथाभिस्वरन्ति।
इनो विश्वस्य भुवनस्य गोपाः स मा धीरः पाकमत्राविवेश॥

ज्या स्थानावर महान पुरुष ब्रह्मतेजाचा प्रकाश नेहमी पसरवीत असतात तेथे माझ्यासारख्या व्यग्रचित्त माणसात सर्व भुवनांचा स्वामी व दक्ष अशा सर्वज्ञ ईश्वराने प्रवेश केला.

सामान्य माणूस नेहमीच व्यग्रचित्त असतो. त्याची व्यग्रचित्तता जाऊन त्याला मनःशांती मिळावी म्हणून सिद्धपुरुष ब्रह्मतेज साधकात संक्रमित करून शक्ती जागृत करतात. त्यामुळे अज्ञान दूर होऊ लागते. शरीर व मन शुद्ध होते. अशा साधकाच्या अंतःकरणात ईश्वराचा निवास होतो व शेवटी साधक ईश्वरस्वरूप होऊन मुक्त होतो.

याशिवाय वेदात कितीतरी ठिकाणी या शक्तिपातयोग साधनेचा उल्लेख केलेला आढळून येतो. महापुरुषांनी आपल्या दिव्य शक्तीचा पात करून बद्धांना जीवनमुक्त करण्याची ही परंपरा वेदकालापासून सुरू झालेली दिसून येते. अनेक धारांनी ही परंपरा आजतागायत वाहात आली आहे. या परंपरेतील काही महान विभूतींच्या जीवनातील दीक्षेचे प्रसंग पाहिले म्हणजे शक्तिपातयोगाचे दिव्यत्व व अलौकिकत्व सहज ध्यानात येईल.

कूर्मपुराणातील महायोगाची परंपरा :–

प्रथम कूर्मपुराणाच्या उत्तरार्धातील अकराव्या अध्ययात महायोगाची परंपरा सांगितली आहे ती पाहाणे इष्ट ठरेल.

हा परम पावन सर्वोत्तम महायोग प्रथम श्रीमहेश्वर शंकरांनी भगवान नारायणांना दिला व सांगितले की ब्रह्मवादी लोकांना देण्यासाठी हा महायोग मी आपल्याला दिला आहे. यासाठी जे शिष्य शांतचित्त असतील त्यांनाच या योगाची दीक्षा दिली पाहिजे. असे सांगून झाल्यावर शंकरांनी भगवान वासुदेवांना दिव्यालिंगन दिले. त्यामुळे संसारबंधन नाहीसे करणारे दिव्यज्ञान नारायणांना झाले.

नारायणांपासून प्राप्त झालेल्या या महायोगाचे दान महामुनी भगवान् सनत्कुमारांनी संवर्तांना दिले व त्यांनाही त्या ज्ञानाचा अनुभव आला. अशा प्रकारे योगींद्र सनंदनांनी महादेवांपासून चालत आलेल्या या महायोगाचे दान महर्षी पुलहांना ज्ञान देऊन केले. हाच महयोग प्रजापती पुलहांनी गौतमांना दिला, अंगिरा ऋषींनी वेदज्ञाते भारद्वाज ऋषींना दिला व हेच ज्ञान योगीराट् सिद्ध कपिल मुनींनी योगी गैगीषव्यांना व पंचशिखाचार्यांना दिला.

भगवान वेदव्यास पुढे म्हणतात, श्रीमहेश्वरांनी सांगितलेल्या या महायोगाचे ज्ञान ऋषी मुनींनी आपापसात चर्चा करून एकमेकांना दिले व घेतले. माझे वडील पराशर ऋषी हे सर्व तत्त्वांचे ज्ञाते होते. त्यांना

हे परम पावन ज्ञान भगवान सनकमुनींनी दिले. त्यांच्यापासून वाल्मीकी ऋषींना त्याची प्राप्ती झाली. अगदी प्रथम हा महायोग परमश्रेष्ठ ज्ञानी अशा शंकराच्या तेजापासून व सतीच्या देहापासून प्रकट झालेल्या भगवान् वामदेवांनी मला दिला. भगवान् नारायण देवकीपुत्र श्रीकृष्णांनीही स्वतः साक्षात या महायोगाचे परमश्रेष्ठ ज्ञान अर्जुनाला दिले. अशा तऱ्हेनी ही परंपरा चालू झाली.

वसिष्ठऋषींकडून श्रीरामचंद्रांची दीक्षा :–

एकदा श्रीरामांचे मन संसार असार आहे असा बुद्धीचा पूर्ण निश्चय झाल्याने अत्यंत उद्विग्न झाले. त्यांना कशातही गोडी वाटेना. सर्व गोष्टींबद्दल त्यांना अनास्था वाटू लागली. जीवनाची सार्थकता तरी कशात आहे असा त्यांना प्रश्न पडला. श्रीरामांची ही स्थिती पाहून दशरथाने वसिष्ठऋषींना बोलावून आणले. श्रीरामांना ज्ञानोपदेश करून त्यांचे मन शांत करण्याबद्दल दशरथाने वसिष्ठऋषींना विनंती केली. रामांनी वसिष्ठांना आत्मसमाधान होण्यासाठी अनेक प्रश्न विचारले. त्याची उत्तरे वसिष्ठ देत होते. ही तत्त्वज्ञानाची चर्चा ऐकण्यासाठी अनेक ऋषीमुनी तेथे जमा झाले होते. त्यामध्ये भरद्वाज ऋषीही होते. त्यांनी वाल्मीकीऋषींना प्रश्न केला की—

इति वरमुनीनोक्तंज्ञानसारं पुराणं । सकलमनुनिशम्य श्रीरघुणां कुलाग्रयः ।। विमलमतिपृच्छतिंकचिदन्यत्स्वयं वा । समसुखपरिपूर्णः पूर्णबोधस्थितोऽसौ ।।

हे गुरो, राम हा रघूच्या कुलातील अत्यंत श्रेष्ठ व शुद्धबुद्धी असलेला महापुरुष आहे. त्याला वसिष्ठऋषींनी ब्रह्मादी महर्षींच्या संप्रदायाने प्राप्त झालेले ज्ञानसार अनेक प्रकारांनी सांगितले. परंतु ते ऐकूनही राम वसिष्ठांना जिज्ञासेने पुनःपुन्हा प्रश्न विचारीत होता. कारण तेवढ्या उपदेशाने त्याचे पूर्ण समाधान झाले नव्हते. एवढे तत्त्वज्ञान ऐकूनही त्याचा संदेह गेला नव्हता. मोह दूर होऊन मनाला शांतता प्राप्त झाली नव्हती. अशा वेळी रामाला आत्मसुख कसे मिळाले ? पूर्ण बोध कशाने झाला ? त्याचे सर्व संशय व व्यामोह दूर होऊन तो अखंड आत्मानंदात कोणत्या उपायाने राहू शकला, ते मला सांगा.' त्यावर महामुनी वाल्मीकींनी भरद्वाजऋषींना सांगितले की–

इति श्रुत्वा वसिष्ठस्य वाक्यं वेदांतसंग्रहम् । विदिताखिलविज्ञानो रामः कमललोचनः ।। शक्तिपातवशोन्मेषप्रकटामलचिद्घनः । मुहूर्तमासीदुब्दुद्धश्चैतन्यानंदसागरः ।। प्रश्नोत्तरविभागादिपरिपाटीविवर्जितः।

आनंदामृतपूर्णासू रोमकंटकितांगकः ।। महासामान्यरूपत्वाच्चिद्व्यापकतया स्थितः । नित्यमष्टगुणैश्वर्यतृणप्रायमनोरथः ।। न किंचिदूचे संपन्नः शिवे परिणतः पदे । श्रीभरद्वाज उवाच । अहो खलु ममाश्चार्यं रामः प्राप्तो महत्पदम् ।।

" सर्व वेदांताचे सार ज्यात साठविलेले आहे असा वसिष्ठांचा उपदेश ऐकून कमलनयन रामाला सर्व विज्ञान ज्ञात झाले. (इतके झाले तरी) रामाची अविद्या शक्तिपातयोगानेच दूर झाली. शक्तिपातामुळे रामाला उन्मेष प्राप्त होऊन त्याचे शुद्ध स्वरूप प्रकट झाले. स्वस्वरूपाचा विकास होऊन त्यात पूर्ण जागृती आली. तो चैतन्यानंद सागरच झाला. त्याची प्रश्नोत्तरे संपली. मन, बुद्धी व इंद्रियांचे व्यापार जागच्याजागी स्थगित झाले. त्याचे प्राण आनंदामृताने पूर्ण झाले. शरीरावर रोमांच उभे राहिले. आपण सामान्य जीव नसून ब्रह्मच आहो व चैतन्यरूपाने आपण सर्वत्र भरून राहिलेले आहोत असा अनुभव त्याला आला. तो अणिमादी अष्टसिद्धींना तृणाप्रमाणे तुच्छ समजू लागला. तो निरतिशय अशा ब्रह्मानंदात निमग्न झाल्याने काहीही बोलला नाही. त्यावर भरद्वाजऋषी म्हणाले, "खरोखर राम केवळ या शक्तिपातयोगानेच मोठ्या पदाला पोहोचला या गोष्टीचे मला मोठे आश्चर्य वाटते, "

त्यावेळी जे अनेक ऋषी जमले होते त्यात विश्वामित्र ऋषीही बसले होते. शक्तिपातयोगाने रामाचे चित्त ब्रह्माकार होऊन तो आपल्या स्वरूपात रममाण झाल्याचे पाहून त्यांना फारच समाधान वाटले. तेव्हा विश्वामित्र ऋषिश्रेष्ठ वसिष्ठांची व शक्तिपातयोगाची स्तुती करताना म्हणाले --

हे वसिष्ठ महाभाग ब्रह्मपुत्र महानसि । गुरुत्वं शक्तिपातेन तत्क्षणादेव दर्शितम् ।। दर्शनात्स्पर्शनाच्छब्दात्कृपया शिष्यदेहके । जनयेद्यः समावेशं शांभवं स हि देशिकः ।।

हे महाभाग ब्रह्मपुत्र वसिष्ठा ! तू फार थोर आहेस. वर सांगितल्याप्रमाणे अनुग्रहयुक्त दृष्टी टाकून शक्तिपाताने शिष्याला ब्रह्मरूप करून तू आपले गुरुत्व, शिष्योद्धारसामर्थ्य, आताच्या आताच आम्हाला दाखविले आहेस. दर्शन, स्पर्श, शब्द किंवा केवळ कृपादृष्टी यांच्या योगाने जो शिष्याच्या देहात शंभूचा समावेश करतो व स्वशरीरातून न निघताच शिष्याची कुंडलिनी जागृत करून षट्चक्रांचा भेद करून ब्रह्मरंध्रात राहणाऱ्या परशिवाशी शक्तीचे ऐक्य घडवून आणून जीवाचे जीवत्व नाहीसे करून त्याला ब्रह्मत्व प्राप्त करून देणारा शक्तिपात करतो तोच खरा गुरू होय.

योगवासिष्ठात स्थिती प्रकरणात श्रीरामाला महायोगाचे माहात्म्य सांगताना स्वतः वसिष्ठऋषी म्हणतात—

सुजनेन वितृष्णेन विदुषा महता सह। प्रविचार्य महायोगात्पदमाद्यते परम् ।।

आतील व बाहेरील द्वंद्वे सहन करणाऱ्या महाबुद्धिमान् आणि विवेकी पुरुषाने विद्वान् आणि सुजन म्हणजे शिष्यापराध पोटात घालणाऱ्या महात्म्याला शरण जाऊन शास्त्रविचार करावा. कारण सुजन, निरीच्छ, विद्वान आणि उदार मनाच्या ब्रह्मनिष्ठांच्या सहवासात श्रवणमननादी साधनांचा आश्रय करून महायोगाचा अभ्यास करीत गेले म्हणजे परमपदाची प्राप्ती होते.

शंखस्पर्शद्वारा ध्रुवाला महाविष्णूंकडून शक्तिपात :–

ध्रुवाच्या गालाला महाविष्णूनी शंखाचा स्पर्श करून शक्तिपात दीक्षा कशी दिली याचे वर्णन महर्षी वेदव्यासांनी श्रीमद् भागवत महापुराणात चतुर्थ स्कंधाच्या नवव्या अध्यायात रोचकतेने केले आहे.

स वै धिया योगरिपाकतीव्रया हृत्पद्मकोशे स्फुरितं तडित्प्रभम्। तिरोहितं सहसैवोपलक्ष्य बहिःस्थितं तदवस्थं ददर्श ।। तद्दर्शनेनागतसाध्वसः क्षितावववन्दतांगं विनमय्य दंडवत्। दृग्भ्यां प्रपश्यन् प्रपिबन्निवार्भकश्चुम्बन्निवास्येन भुजैरिवाश्लिन् ।। स तं विवक्षन्तमतद्विदं हरिर्ज्ञात्वास्य सर्वस्य च हृद्यवस्थितः। कृतांजलिं ब्रह्ममयेन कंबुना पस्पर्श बालं कृपया कपोले ।। स वै तदैव प्रतिपादितां गिरं दैवीं परिज्ञातपरात्मनिर्णयः। तं भक्तिभावोऽभ्यगृणादसत्वरं परिश्रुतोरुश्रवसं ध्रुवक्षितिः।।

त्यावेळी ध्रुव तीव्र योगाभ्यासाने एकाग्र झालेल्या बुद्धीने भगवंताचे विजेसारख्या देदीप्यमान मूर्तीचे आपल्या हृदयकमलामध्ये ध्यान करीत होता. ती मूर्ती त्याच्या हृदयातून एकाएकी नाहीशी झाली. त्यामुळे घाबरून जाऊन त्याने डोळे उघडले. त्याबरोबर हृदयात ध्यान करीत असलेली भगवंताची साक्षात् मूर्ती आपल्यासमोर उभी असलेली त्याने पाहिली. प्रभूचे प्रत्यक्ष दर्शन मिळाल्याने ध्रुवाला अत्यंत कुतूहल वाटले. तो प्रेमाने अगदी अधीर झाला. त्याने भगवंताला साष्टांग नमस्कार घातला. अत्यंत प्रेममय दृष्टीने तो भगवंताकडे पाहू लागला. भगवंताला नेत्रांनी पिऊन टाकावे, मुखाने त्यांचे चुंबन घ्यावे व त्यांना दृ आलिंगन द्यावे असे त्याला वाटू लागले. तो हात जोडून प्रभुसमोर उभा होता. भगवंताची स्तुती करावी असे त्याला मनापासून वाटत होते. परंतु स्तुती कशा प्रकारे करावी हे त्याला माहीत नव्हते. सर्वांतर्यामी हरीने

त्याच्या मनातील गोष्ट ओळखली. भगवंताने अत्यंत कृपापूर्वक आपल्या वेदमय शंखाचा त्याच्या गालाला स्पर्श केला. ध्रुवाला पुढे अविचलपद प्राप्त होणार होते. या वेळी शंखाचा स्पर्श झाल्याबरोबर त्याला वेदमयी दिव्य वाणी प्राप्त झाली. जीव व ब्रह्माच्या स्वरूपाचाही निश्चय झाला. अत्यंत भक्तिभावाने व धैर्याने तो विश्वविख्यात श्रीहरीची स्तुती करू लागला.

श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांनी या प्रसंगाचे एका ओवीत वर्णन केले आहे.

ना तरी मधुवनी ध्रुवासी केले । जैसे कपोल शंखे शिवतले । आणि वेदांचियेही मती ठेले । तें लागला बोलो ।।

श्रीदत्तात्रेयांची यदुराजाला आलिंगन देऊन स्पर्शदीक्षा:–

श्रीदत्तात्रेयांनी यदुराजाला आलिंगन देऊन स्पर्शदीक्षा कशी दिली व आत्मबोधाचा अनुभव कसा केला याचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन श्रीसंत एकनाथमहाराजांनी श्रीनाथभागवताच्या यदु-अवधूत संवादात पुढीलप्रमाणे केले आहे.

याहीपरी पाहतां । माझा गुरु एकुलता । एक तेथे दुजेपणाची वार्ता । नाही सर्वथा यदुराया ।। ऐशी सद्गुरुकथा । तुज सांगितली परमार्था । हरिखें आनंदला नृपनाथा । दोघां ऐक्यता निजबोधे ।। जीवीं जीवा पडली मिठी । आनंदे ओसंडणें सृष्टी । तेणें वाचेसी पडली बेलवटी । बोलों उफराटी विसरली ।। हरिखु न संटवे हृदयभवनीं । बाहेर वोसंडे स्वेदेजोनी । आनंदघन वोळला नयनीं । स्वानंदजीवनीं वर्षतु ।। तुटली अहंकाराची बेडी । पावलो भवार्णव परथडी । म्हणौनि रोमांचीं उभविली गुढी । जिंतली गाढी अविद्या ।। समूळ देहभावो पळाला । यालागी गात्रकंपू चळचळा । संकल्पविकल्प निमाला । मनेंसीं बुडाला मनोरथू । जीवभावो उखिता । यदूनें अर्पिला गुरुनाथा । ते चिन्ह बाहेरी तत्त्वता । दावी सर्वार्था निजांगी ।। तो अवधूत जाण दत्तात्रेया । तेणें आलिंगुनि यदुराया । निजरूपाचा बोधु तया । अनुभवावया दीधला ।।

हे यदुराजा ! अशा रीतीने पाहिले म्हणजे माझा गुरू एकुलता एकच आहे. तेथे दुजेपणाची वार्ताही नाही. सद्गुरूची कथा मी तुला परमार्थप्राप्तीसाठी सांगितली. असे बोलून अवधूताने आनंदाने राजाला आलिंगन दिले. आत्मज्ञानामुळे ते दोघेही तद्रूप झाले. सृष्टीला आनंदाचे भरते आले. त्यामुळे वाचा बंद पडली व उलट पक्ष घेऊन बोलण्याचे विसरली. अंतकरणात आनंद न मावल्यामुळे तो घामाच्या रूपाने बाहेर

वाहू लागला. म्हणजे आनंदातिशयामुळे त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहून घाम सुटला. आनंदरूपी मेघ डोळ्यात भरून आला व तो प्रेमाश्रूंचा वर्षाव करू लागला. अहंकाराची बेडी तुटली. आम्ही भवसमुद्राच्या परतीराला जाऊन पोहोचलो म्हणून रोमांचरूपी पताका उभारली. अविद्येला पार जिंकले. देहभाव पळून गेल्याने शरीर चळचळा कापू लागले. संकल्पविकल्प नाहीसा झाला. मनोरथ मनासह बुडाला. यदुराजाने सर्व जीवभाव सद्गुरूला अर्पण केला. त्याचे चिन्ह तत्त्वतः आपल्या देहावर तो दाखवू लागला. तो अवधूत साक्षात् दत्तात्रेय होता असे जाण. त्याने यदुराजाला आलिंगून त्याला आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचा अनुभव दिला.

हनुमंतांची शक्तिपाताने कृतार्थता :–

प्रभूरामचंद्रांनी मारुतीरायांना शक्तिपातानुग्रहाने कृतार्थ केले. तामीळ महाकवी कंबन यांनी आपल्या रामायणात या प्रसंगाचे फार सुरेख वर्णन केले आहे. महाकवी लिहितात–रामाला राज्याभिषेक झाला. त्यानंतर त्याने सर्व वानरांना व हनुमंताला परत किष्किंधेला पाठविण्याचे ठरविले. प्रत्येक वानराच्या कामगिरीप्रमाणे त्याला बक्षीस देण्यात आले. परंतु हनुमंताला काय द्यावे हा रामापुढे प्रश्न पडला. हनुमंताच्या अजोड व्यक्तिमत्वामुळे व कामगिरीमुळे निरोप देताना रामाचे डोळे भरून आले. अंतःकरण प्रेमाने उचंबळून आले. त्या अवस्थेत रामाने हनुमंताला आलिंगनाची अपूर्व भेट दिली. या आलिंगनद्वारा शक्तिसंक्रमण करून रामाने हनुमंताला आपले सर्वस्व दिले. रामाने उभ्या आयुष्यात सीतेशिवाय कुणाला आलिंगन दिले नव्हते. ऋषींना सुद्धा हे भाग्य लाभले नाही. हनुमंताला ते मिळाले. रामाच्या आलिंगनाने शक्तिपात होऊन हनुमंत कृतार्थ झाला.

मूळ वाल्मीकी रामायणात महर्षी वाल्मीकींनी हा प्रसंग पुढीलप्रमाणे वर्णिला आहे. हनुमंत सीतेचा शोध लावून आल्यावर राम म्हणाले :–

अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च महाबलः । वैदेह्या दर्शनेनाद्य धर्मतः परिरक्षिताः । इदं तु मम दीनस्य मनो भूयः प्रकर्षति ।यदिहास्य प्रियाख्यातुर्न कुर्मि सदृशं प्रियम् ।।१२।। एष सर्वस्वभूतस्तु परिष्वंगो हनूमतः । मया कालमिमं प्राप्य दत्तस्तस्य महात्मनः ।।१३।। इत्युक्त्वा प्रीतिहृष्टांगो रामस्तं परिषस्वजे । हनूमन्तं कृतात्मानं कृतकार्यमुपागतम् ।।१४।।

आज हनुमंत सीतेचा शोध लावून परत आला. त्याने तिला

आपल्या डोळ्यांनी समक्ष पाहिले. त्यामुळे धर्मानुसार त्याने समस्त रघुवंशाचे, माझे व महाबली लक्ष्मणाचे रक्षण केले आहे. त्याने माझ्या-करिता जी मोठी कामगिरी केली. याबद्दल बक्षीस देण्यायोग्य वस्तू आज माझ्याजवळ नाही. ज्याने मला अत्यंत प्रिय गोष्ट सांगितली त्याच्या करिता मी कोणतेहीं प्रिय कार्य करू शकत नाही याचा माझ्या मनाला अतिशय खेद होत आहे. तेव्हा यावेळी या महात्मा हनुमंताला मी केवळ माझे प्रगाढ आलिंगनच देऊ शकतो. कारण तेच माझे सर्वस्व आहे. (आलिंगनामुळे शक्तिसंक्रमण होऊन रामाचे सर्वस्व जे आत्मस्वरूप ते हनुमंताला प्राप्त होऊन तो रामस्वरूप होणार हा भावार्थ) असे म्हणता म्हणता श्रीरामाचे अंगप्रत्यंग प्रेमाने पुलकित झाले. आपल्या आज्ञेप्रमाणे वागून सफलता प्राप्त करून आलेल्या हनुमंताला त्यांनी दृढ आलिंगन देऊन कृतार्थ केले.

अंगिरसऋषींच्या कृपेने श्रीकृष्णांना तृष्णाहीनता :–

श्रीकृष्ण तृष्णाहीन कसे झाले याचे वर्णन छांदोग्य उपनिषदातील अध्याय ३ खंड १७ मंत्र ६ मध्ये पुढील प्रमाणे आले आहे.

तध्दैतद्घोर अंगिरसः कृष्णाय देवकीपुत्रायोक्त्वोवाचापिपास एव स बभूव ।

घोरअंगिरसऋषीने देवकीपुत्र कृष्णाला हे ज्ञान सांगितले.त्यामुळे श्रीकृष्णांच्या आशा, आकांक्षा व विषयांची ओढ संपून ते तृष्णाहीन झाले व त्यांना परम शांती प्राप्त झाली.

श्रीकृष्णांकडून मिळालेल्या शक्तिपातदीक्षेने उद्धवाची स्वानंदनिमग्नता:–

श्रीसंत एकनाथमहाराजांनी एकनाथी भागवतात २९व्या अध्यायात उद्धवाला शक्तिपात दीक्षा देऊन स्वानंदनिमग्नता कशी प्राप्त करून दिली व हेच एकमेव साधन कसे श्रेष्ठ आहे याचे अनुपम वर्णन केले आहे.

उद्धवा जे मज अनन्यशरण । त्यांचा धर्म अर्थ मी आपण त्यांचा काम तोही मीचि जाण । मोक्ष संपूर्ण मी त्यांचा ॥ ४००॥ अभक्ता भोगक्षये पुनरावृत्ती । भक्तांसी भोग भोगिता नित्यमुक्ती । एवढी माझ्या भक्तीची ख्याती । जाण निश्चती उद्धवा ॥४०१॥ ऐशी ऐकता देवाची मात । उद्धव प्रेमे वोसंडला अद्भुत । तेणे प्रेमें लोधला कृष्णनाथ । हर्षे बोलत तेधवा ॥२॥ उद्धवा तुझे चारी पुरुषार्थ । तो मी प्रत्यक्ष श्रीभगवंत । ऐसे बोलोनि हर्षयुक्त । हृदया आत आलिंगी ॥३॥ हर्षे देता आलिंगन । कृष्ण विसरला कृष्णपण । उद्धव स्वानंदनिमग्न । उद्धवपण विसरला ॥४॥ कैसे अभिनव आलिंगन । दोघांचे गेले दोघेपण ।

पूर्ण चैतन्यपरिपूर्ण । स्वानंदघन स्वयें झाले ॥५॥ तेथ विरोनि गेला हेतू। वेदेसहित बुडाली मातू। एकवटला देवी भक्तू। एकीं एकांतू एकत्वें॥६॥ तेथ मावळले धर्माधर्म । क्रियेसहित उडाले कर्म । भ्रम आणि निर्भ्रम । दोहींचे नाम असेना ॥७॥ भेद घेऊनि गेला अभेदा । बोध घेऊनि गेला निजबोधा । आनंद लाजला आनंदा । ऐशिया निजपदे उद्धव पावे ॥८॥ मी जाहलो परब्रह्म । हाही मुख्यत्वे जेथ भ्रम । कृष्णालिंगनाचा हा धर्म । जाहला निरुपम निजवस्तू ॥९॥ यावरी कृष्ण सर्वज्ञ । सोडोनिया आलिंगन। ऐक्यबोधें उद्धवासी जाण । निजभक्तपण प्रबोधी ॥१०॥ तेव्हा उद्धव चमत्कारिला । अतिशयें चाकाटाला । परम विस्मयें दाटला । तटस्थ ठेला ते काळी ॥

अर्जुनाला शक्तिपाताने स्वरूपप्राप्ती :–

जे ज्ञान श्रीकृष्णांना घोरअंगिरसऋषींकडून मिळाले तेच ज्ञान श्रीकृष्णांनी अर्जुनाला आलिंगन देऊन संक्रमित केले. त्यामुळे अर्जुनाला स्वरूपप्राप्ती झाली. श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांनी अर्जुनाला मिळालेल्या दीक्षेचे अत्यंत भावस्पर्शी वर्णन केले आहे.

मग सावळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु । आलिंगनला स्वशरणु । भक्तराजु तो ॥ न पवता जयातें । कांखे सूनि बुद्धितें । बोलणें मागौतें । ओसरलें ॥ ऐसे जें कांहीं एक । बोलाबुध्दीसीही अटक । ते द्यावया मिष । खेवाचें केले ॥ हृदया हृदय एक जाले । ये हृदयीचें तें हृदयीं घातलें । द्वैत न मोडता केलें । आपणाऐसे अर्जुना ॥ दीपें दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत न मोडता केला । आपणपें पार्थु ॥ तेव्हां सुखाचा मग तया । पूरू आला तो धनंजया । तेथ वाडु तन्ही बुडोनियां । ठेला देवो ॥ सिंधू सिंधूतें पावों जाये । तें पावणे ठाके दुणा होये । जरी रिगे पुरवणिये । आकाशही ॥ तैसें तया दोघांचे मिळणे । दोघां नावरे जाणावे कवणें । किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें ॥

कंकणांनी युक्त असलेला आपला शामवर्णाचा उजवा हात पुढे करून आपल्यास शरण आलेल्या भक्तराज अर्जुनाला श्रीकृष्णांनी आलिंगन दिले. बुद्धीला व शब्दाला आकलन न झाल्याने जेथे बोलणे खुंटून जाते ते स्वरूप अर्जुनाला देण्याकरिता देवांनी आलिंगनाचे निमित्त केले. श्रीकृष्णाचे हृदय व अर्जुनाचे हृदय एकमेकांना भिडले. श्रीकृष्णांनी आपल्या हृदयातील ज्ञान अर्जुनाच्या हृदयात घातले व देवभक्तांचे द्वैत न मोडता अर्जुनाला आपल्यासारखे करून सोडले. एका दिव्याने दुसरा दिवा

लावल्यावर जसे द्वैत कायम राहून ऐक्य मोडत नाही तसाच प्रकार या आलिंगनाचा होऊन द्वैत न मोडता श्रीकृष्णांनी पार्थाला आपलेपणा दिला. मग त्यावेळेस अर्जुनाला त्या आनंदाच्या सुखाचा पूर आला. त्या पुरात भगवान सर्वव्यापक असूनही ते बुडून गेले. समुद्राला समुद्र मिळाल्यावर पाणी दुप्पट वाढते. त्या वाढीमुळे आकाशही व्यापून जाते तसे श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या आलिंगनाचे प्रेम दोघांनाही आवरेना ते कोणी जाणावे? फार काय सांगावे ! सर्व विश्व नारायणरूप होऊन गेले.

ध्रुवाला ज्याप्रमाणे शंखस्पर्शद्वारा महाविष्णूंकडून शक्तिपात-दीक्षेचा अनुग्रह मिळाला तसाच अनुग्रह अर्जुनाला श्रीकृष्णांनी दिला. या अनुग्रहाच्या परिणामाचे चित्र श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या ११ व्या अध्यायात अपूर्वपणे रेखाटले आहे.

नातरी मधुवनी ध्रुवासि केलें । जैसें कपोल शंखे शिवतलें । आणि वेदांचियेही मती ठेलें । तें लागला बोलों ॥ ११.१८४ ॥ तैसा अनुग्रह पैं राया । श्रीहरी केला धनंजया । आता कवणेकडेही माया । ऐसी भाष नेणेचि तो ॥ १८६ ॥ एकसरें ऐश्वर्य तेजें पाहिलें । तया चमत्काराचे एकार्णव जाहाले । चित्त समाजी बुडोनि ठेलें । विस्मयाचिया ॥ १८६ ॥ जैसा आब्रह्म पूर्णोदकीं । पोहे मार्कंडेय एकाकी । तैसा विश्वरूप कौतुकीं । पार्थ लोळें ॥ १८० ॥ म्हणे केवढें गगन एथ होतें । तें कवणें नेले पां केउतें । तो चराचरें महाभूतें । काय जाहली? ॥ १८८ ॥ दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाहलें । चेइलिया स्वप्न तैसे गेले । लोकाकार ॥ १८९ ॥ नाना सूर्यतेज प्रतापें । सचंद्र तारांगण जैसें लोपे । तैसी गिळिली विश्वरूपें । प्रपंचरचना ॥ १९० ॥ तेव्हां मनासी मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे ॥ इंद्रियांचे रश्मी माघारे । हृदयवरी भरले ॥ १९१ ॥ तेथ ताटस्था ताटस्थ्य पडलें । टकासी टक लागले । जैसें मोहनास्त्र घातलें । विचार जातां ॥ १९२ ॥ तैसा विस्मित पाहे कोडें । तवं पुढां होते चतुर्भुज रुपडें । तेंचि नानारूप चंहुकडे । मांडोनि ठेले ॥ १९३ ॥ जैसे वर्षकाळीचे मेघौडे । कां महाप्रलयींचे तेच वाढे । तैसें आपणावीण कवणीकडे । नेदीचि उरों ॥१९४॥

देवाचे दर्शन व्हावे म्हणून ध्रुव मधुवनात तपश्चर्या करीत होता. त्याला देवाचे जेव्हा दर्शन झाले तेव्हा देवाची स्तुती करावी अशी उत्कट इच्छा त्याला उत्पन्न झाली. परंतु स्तुती कशी करावी हे त्याला माहीत नव्हते. तेव्हा भगवंताने स्तुती करू इच्छिणाऱ्या ध्रुवाच्या गालाला आपल्या हातातील शंखाच स्पर्श केला. त्याबरोबर वेदांनाही जी स्तुती

करता आली नाही तो करू लागला. (शक्तिपात अनुग्रह जाला की अशी दिव्य वाणी स्फुरू लागते.) संजय म्हणाला, हे राजा धृतराष्ट्रा ! भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनावर तशीच कृपा केली. या कृपेमुळे माया कोणीकडे गेली तिचा पत्ताही लागला नाही. एकसारखे जिकडे तिकडे ऐश्वर्यतेजच प्रकाशमान झालेले दिसू लागले. आश्चर्यचा समुद्रच सर्वत्र पसरलेला आहे असे अर्जुनाला वाटू लागले. त्याचे चित्त त्या आश्चर्याच्या समुद्रात बुडून गेले. ब्रह्मलोकापर्यंत संपूर्ण ब्रह्मांड जलमय झाले असता ज्याप्रमाणे एकटे मार्कंडेय ऋषीच त्या जलात पोहत असतात, त्याप्रमाणे विश्वरूपाच्या दर्शनाने झालेल्या विस्मयसमुद्रावर अर्जुनही लोळू लागला. अर्जुन म्हणतो, मी विश्वरूप पाहाण्यापूर्वी येथे खूप मोठे आकाश होते. ते आता कोणी कोठे नेले समजत नाही. आणि त्या आकाशात दिसणारी ती भूतसृष्टीही काय झाली कोणाला माहीत ? दिशांचा पत्ता, ठावठिकाणा राहिला नाही. आकाश व पाताळ कोणीकडे गेले हे समजेना. ज्याप्रमाणे स्वप्नात पाहिलेले पदार्थ दृष्टीस पडत नाहीत; त्याप्रमाणे एवढा वेळ दृष्टीस पडणारी सृष्टी नाहीशी झाली. सूर्य उगवल्याबरोबर त्याच्या प्रखर तेजाने ज्याप्रमाणे चंद्रासह सर्व नक्षत्रे त्याच्यात लोपून जातात, त्याप्रमाणे शक्तिपात योगदीक्षेमुळे विश्वरूपदर्शनाचा दिव्य अनुभव येऊन सर्व प्रपंचभाव नाहीसा झाला. या अवस्थेत अर्जुनाला मनाचे मनपण स्फुरत नव्हते. म्हणजे मनाचा बाह्य विषयाविषयी होणारा संकल्पविकल्पात्मक व्यापार बंद पडला. बुद्धीचे स्वतःला सावरण्याचे सामर्थ्य नाहीसे झाले. इंद्रियांच्या प्रवृत्ती मागे फिरून हृदयामध्ये विलीन झाल्या. या अवस्थेत स्तब्धतेला स्तब्धता प्राप्त झाली म्हणजे ताटस्थ्यही तटस्थ राहिले. अर्थात् साक्षित्वही आठवेनासे झाले. एकाग्रतेस एकाग्रता आली. मोहिनी अस्त्र घातल्याप्रमाणे सर्व विचार बंद पडले. आश्चर्यचकित होऊन अर्जुन कौतुकाने पाहू लागला. तेव्हा त्याला असे दिसले की, आपल्यासमोर भगवान श्रीकृष्णाची जी चतुर्भुज मूर्ती होती तीच सर्वत्र अनेक नामरूपाने शोभू लागली. ज्याप्रमाणे वर्षाऋतूत जिकडे तिकडे मेघच दिसतात किंवा महाप्रलयकालचे तेज एकदम चहूकडे पसरते त्याप्रमाणे भगवंताने आपल्याशिवाय कोणीकडेही दुसरे काही उरू दिले नाही.

शक्तिपातामुळे श्रीचैतन्यमहाप्रभूंना भक्तीचा उन्मेष :–

श्रीचैतन्य महाप्रभूंनी आपले सद्गुरू श्रीपुरीजी महाराज यांना हात जोडून अनन्य शरण होऊन प्रार्थना केली की, " भगवान्, अब तो हमें

बहुत दिन इन बाह्य वृत्तिके जीवनको बिताते हुए हो गयें, अब हमें अपने चरणोंकी शरण प्रदान कीजिये।"

या प्रार्थनेला होकार देऊन श्रीपुरीजी महाराजांनी श्रीचैतन्यांना मंत्रदीक्षा दिली. या दीक्षेमुळे शक्तिसंक्रमण कसे झाले याचे बहारदार वर्णन श्रीप्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी श्रीचैतन्य चरितावली खंड एक मध्ये पुढीलप्रमाणे केले आहे.

"नियत तिथि आ गयीं। निमाई पंडित नवीन उल्हास और आनंदके साथ मंत्रदीक्षा लेनेके लिये तैयार हो गये। इनके सभी साथियोंने उस दिन दीक्षोत्सवके उपलक्ष्यमें खूप तैयारियाँ की थीं। नियत समयपर पुरी महाशय आ गये। उनकी पदधूली इन्होंने मस्तकपर चढाई और स्वस्त्ययनके पुण्यश्लोक पढकर और भगवानके मधुर मंजुल नामोंका संकीर्तन करनेके अनंतर पुरी महाशय नें इनके कानमें–गोपीजनवल्लभाय नमः–इस दशाक्षर मंत्रका उपदेश कर दिया। मंत्रके श्रवणमात्रसेही ये मूर्छित होकर पृथ्वीपर गिर पडे और इन्हें अपने शरीरका बिलकुल होश नहीं रहा।

साथियोने भाँति-भाँतीके उपचार करके इन्हें सावधान किया। बहुत देरके अनंतर उन्हें कुच्छ होश हुआ। अब तो इनकी विचित्रही दशा हो गयी। कभी तो खूब जोरोंके साथ हँसते, कभी रोते और कभी हा कृष्ण! हा पिता! ऐसा कहकर जोरोंसे रुदन करते। कभी यह कहते हुए कि "मैं तो श्रीकृष्णके पास व्रजमें जाऊँगा" व्रजकी ओर भागते। इनके साथी इन्हें पकड पकड लाते। किंतु ये पागलोंकी भाँति उनसे अपने शरीरको छुडाछुडाकर भागते। कभी फिर उसी भाँति जोरोंसे प्रलाप करने लगते। रोतेरोते कहते प्यारे मुझे छोडकर तुम कहाँ चले गये? मेरे कृष्ण! मुझे अपने साथ ही ले चलों। इतना कहकर फिर जोरोंसे रोने लगते।"

शंकरांकडून हरिनाथांना शक्तिपाताने निजानंद :–

मुकुंदराजाचे आजेगुरू श्रीहरिनाथ यांना प्रत्यक्ष शंकरांकडून शक्तिपाताची दीक्षा मिळाली. मुकुंदराजांनी विवेकसिंधूत याचे सुंदर वर्णन केले आहे. श्रीहरिनाथांनी ईश्वरी अनुग्रहासाठी खूप उग्र तपश्चर्या केली. त्यामुळें शंकर प्रसन्न होऊन प्रकट झाले व त्यांनी श्रीहरिनाथांवर कृपा केली.

असो हे तिथे ज्वाळेसी आतु। शंभू प्रकटला ना भी म्हणतु। जो भक्तांचा वेळाइतु। करुणासिंधू ॥ १८.५८ ॥ तिन्ही देव गुणमूर्ति। जेया

देवांचिया शक्ति । तो देखिला स्वयंज्योति । श्री आदिनाथु ॥ ५९ ॥ मग हरीसी गाढालिंगण । दीधले जगदीश्वरें आपण । मग क्षणु येकू दोघै जालै लीन । आनंदसागरीं ॥ ६० ॥ सुखासी महासुख भेटले । किं स्वानुभवासी पडप जोडलें । तैसा दोघै आनंदे फुंजो लागले । हरिशंकर ते ॥ ६१ ॥ जैसा जालेया विद्युत्पातु । जनु होये विव्हळतु । तैसा रुद्राचेंनि तेजें मूर्छितु । ऋत्विजगणु ॥ ६२ ॥ मग सदाशिवें वरु माग म्हणितले । तंव श्रीहरीनें विनविलें । जी प्रेम देई आपुले । कैवल्यदानी ॥ ६४ ॥ तुझीये कृपेचेनि लवलेंशे । जीवाचे फिटे अज्ञान पिसें । कैवल्यपदीचे साम्राज्य आपैसे । गीवसीत पावे ॥ ६५ ॥ बुडाले संसारवारिधी । जीवु नेणति आपली बुद्धी । जी स्वामी करुणानिधी । तुवां तारावे ॥७५॥ तरी ज्ञान देयावें स्वानुभाव । जेणे चुकती भविंचे पराभव । भेटे निराकार निर्वेव । परब्रह्म जे ॥ ७६ ॥ ऐसें श्रीहरीये विनविले । तंव महेशें हास्य केलें । हें सिद्धचि कायि मागितले । सर्वज्ञाराया ॥ ७७ ॥ तथापि तुझा विनोदु । तरी देयिजैल निजबोधु । आणिकही वरू सीधु । तू मागसील जो ॥ ७८ ॥ संप्रदायाची उंडी । पडैल जयाचेया मुखी फुडी । तेयासी ज्ञानाची सांकडी । न पडे देहांतिही ॥ ७९ ॥ तुझिये मार्गी जे धरीति विश्वासु । तेयांसि नव्हैल गर्भवासु । तेथींचा अभिमानी मी महेशु । म्हणौनिया ॥ ८० ॥ माझिये तेज प्रगटैल । तुझिये मुखीं प्रवेशैल । ते शिष्यदेहीं संक्रमैल । गुरुकृपाद्वारें ॥ ८१ ॥ ऐसे आदिनाथे बोलिले । तंव हरीये श्रीमुख पसरिले । तेथ तेजोमय प्रवेशले । जगदीश्वरें ॥ ८२ ॥ तेथ तेज शंभूचेनि कृपावशें । शांभवतेजाचेनि समावेशें । तेवेळी चित्त समरसे । श्रीहरीचे परब्रह्मी ॥ ८३ ॥ निर्विकल्प समाधी प्रवर्तली । दृष्टी अर्धोन्मिलित जाली । अहंता निःशेष विराली । परमानंदसागरीं ॥८४॥ प्राणाचियेनि परिस्पंदन । मनासरीसे जाले लीन । तेथीचेया आनंदाते कवण । निवडी कैसा ॥ ८५ ॥

हे असो. त्या ज्वाळेतून भक्तांचा ऋणाईत व कृपासागर शंकर भिऊ नकोस असे म्हणत प्रकट झाला. सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी बनलेला व देवांना शक्ती देणारा स्वयंप्रकाशी आदिनाथ हरीने पाहिला. मग त्या जगदीश्वराने आपण होऊन हरीला गाढ आलिंगन दिले आणि एक क्षण ते दोघे आनंदसागरात लीन होऊन गेले. सुखाला जसे महासुख भेटले किंवा स्वानुभवाला जसा दुसरा स्वानुभव जोडला तसे हे दोघे हरिनाथ व शंकर आनंदाने पूर्ण भरून गेले. विद्युत्पात झाल्यावर ज्याप्रमाणे लोक विव्हळ होतात, त्याप्रमाणे रुद्राच्या प्रखर तेजाने सर्व ऋत्विज

मंडळी मूर्च्छित झाली. मग शंकर त्याला म्हणाले की, तू वर माग. तेव्हा श्रीहरीने विनंती केली की, हे कैवल्यदात्या ! मला आपले प्रेम द्या. तुझ्या कृपेच्या एवढ्याशा लवलेशाने देखील जीवाचे अज्ञानाचे वेड नाहीसे होते. कैवल्याचे साम्राज्य त्याला आपोआप हुडकत येते. संसार सागरात जीव बुडून गेल्यामुळे त्यांना आपल्या बुद्धीची जाणीव नाहीशी झाली. हे करुणानिधेस्वामी ! तुम्ही त्यांना तारावे. त्यांना स्वानुभवाचे ज्ञान प्राप्त करून द्यावे त्यामुळे त्यांचे संसारातील पराभव चुकतील व निराकार निरवयव असे परब्रह्म त्यांना प्राप्त होईल. अशी हरीनाथाने प्रार्थना केली. तेव्हा शंकर हसले व म्हणाले, "अरे सर्वज्ञा ते तर आहेच आहे. यात तू काय मागितलेस ? तथापी तुझ्यावर प्रसन्न होऊन मी तुला निजबोधाने परब्रह्मप्राप्ती करून दिली. आणखीही एखादा वर मागितलास तरी तो तुला दिला आहे असे समज. तुझ्या संप्रदायाचा ठेवा ज्याच्या मुखात पडेल त्याला ज्ञानाची अडचण कधी देहांतानंतरही पडणार नाही. तुझ्या उपदेशमार्गावर (या शक्तिपातयोगमार्गावर) जे विश्वास ठेवतील, त्यांना कधीही गर्भवास सोसावा लागणार नाही. कारण मी महेश त्याचा अभिमानी आहे. माझे तेज प्रकट होऊन ते तुझ्या मुखात प्रवेश करील व गुरूच्या कृपेने ते शिष्यांमध्ये संक्रमित होईल." आदिनाथ असे बोलल्यानंतर हरिनाथांनी आपले तोंड उघडले. त्यात जगदीश्वर शंकर तेजोमय होऊन शिरले. शंभूच्या कृपेमुळे श्रीहरिनाथांमध्ये तेज आले. त्या शांभवतेजाच्या प्रवेशाने श्रीहरिनाथांचे चित्त परब्रह्माशी तन्मय झाले. त्यांची निर्विकल्प समाधी लागली. दृष्टी अर्धोन्मीलित झाली. अहंता तर परमानंद सागरात पार बुडून गेली. प्राणाचे स्फुरण पावणे तर मनाबरोबरच लयास गेले. त्या तेथील आनंदाला कोण कसा निवडणार ?

सिद्धपंथाच्या दीक्षेने ज्ञानेश्वरांची कृतार्थता :–

श्रीसंत निवृत्तीनाथांना गैनीनाथांनी शक्तिपाताची दीक्षा देऊन कृतार्थ केल्यावर निवृत्तीनाथांनी ज्ञाननाथांना दीक्षा देऊन कृतार्थ केले. या सिद्धयोगाचे माहात्म्य त्यांनी स्वत: पुढीलप्रमाणे सांगितले आहे–

महेशें शिवेसी निजखूण दाविली । हंसें लाधविली कमलासना ॥ १ ॥
सनकादिक नृप्त ज्या सुखेसि जाले । योगी आनंदले, युगायुगी ॥ २ ॥
तेचि मज केले करतळामळ । निवृत्ति कृपाळ काय वानू ॥ ३ ॥

शिवशंकर महेशांनी शक्तिसंक्रमण करून पार्वतीला स्वात्मप्रचीती दाखविली व मीच ते परमतत्त्व आहे असा आत्मसाक्षात्कार त्यांनी ब्रह्म

देवास प्राप्त करून दिला. हेच ज्ञान शक्तिपात परंपरेने सनकादिकांना प्राप्त झाल्याने, त्यांना निरतिशय सुख प्राप्त होऊन ते तृप्त झाले. याच मार्गाने अनेकानेक योगी युगायुगामध्ये परमतत्त्वाची प्राप्ती करून घेऊन आनंदित झाले. निवृत्तीनाथांनी अत्यंत कृपाळूपणे शक्तिपात दीक्षा देऊन हेच बोधरहस्य तळहातावरील आवळ्याइतके स्पष्टपणे मला प्राप्त करून दिले त्याची महती मी काय वर्णन करू? असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

हे ज्ञान सिद्धयोगमार्गाच्या परंपरेने आपल्याकडे कसे आले याचे वर्णन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

अदिनाथे बीज सांगितले कानी। सोहं हे शिराणी कैवल्याची॥१॥ मच्छेंद्र गोरक्ष पावले या सुखा। उजळिल्या आशंका ज्ञानाचिया ॥ २ ॥ निवृत्तीने गूज स्वतंत्र ओतिलें। अपार पावले सिद्धपंथें ॥ ३ ॥ सोहं या मंत्राचा वेदाचा गव्हर। म्हणे ज्ञानेश्वर राजयोगी ॥ ४ ॥

आदिनाथ शंकरांनी सोहं हा शक्तिसंक्रमणाचा बीजमंत्र कैवल्याचीं खूण म्हणून सांगितला. आदिनाथांकडून मत्स्येंद्रनाथांना व मत्स्येंद्रनाथांकडून गोरक्षनाथांना शक्तिपातदीक्षा मिळाली. त्यामुळे ते सुखरूप झाले. या दीक्षेमुळे त्यांच्या ठिकाणी असलेल्या सर्व शंका मावळून आत्मज्ञानाचा प्रकाश उत्पन्न झाला. निवृत्तीनाथांनी माझ्यावर कृपा करून हे परंपराप्राप्त शक्तिपातरहस्य मला स्वतंत्रपणे सांगून कृतार्थ केले. या सिद्धयोगाच्या पंथाने हजारो योगी कृतकृत्य झाले आहेत. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " सोहं हा मंत्र संपूर्ण वेदांचे हृद्गत असून मी याचमुळे राजयोगी बनलो आहे. "

शक्तिपातयोगाने आपणांस शाश्वत सुख प्राप्त होऊन आपण आत्मज्ञानी कसे झालो याचे वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनी केले आहे.

जे अगम्याचे ध्यान। जे मननाचे मनन। जे पुण्याचे पावन वस्तुरूप ॥ १ ॥ कैसें वरिष्ठांचे सार। जो आदिअंती विचार। हें जाणले अवतार। मानव होती ॥२॥ जें गुह्याचे मौन्यमाळा। तें मज केले करतळमळा। अचळादि अचळा। सुख असें ॥ ३ ॥ ऐसाचि सत्शिष्यें उदय जाला। कैसे अवयव प्रकाशे फावला। की माझेचि घरिचा जाला। ठेवणाइत ॥ ४ ॥ जागृति स्वयंभ दिसे। निजलिया प्रकाशें। कैसा समाधिचा विलासे। संपादिला ॥ ५ ॥ निवृत्ति सुखाचा टेका। पावोनि आलो आपुल्या मठा। ज्ञान येकला निका। ज्ञानदेव ॥ ६ ॥

शक्तिपाताने नामदेवांना कृपेची सावली :–

श्रीनामदेवराय संत विसोबा खेचरांना शरण गेल्यावर त्यांनी नामदेवांना शक्तिपात दीक्षा देऊन कृतार्थ केले व त्यांच्यावर अखंड कृपेची साउली केली. त्याचे वर्णन नामदेवांनी पुढील अभंगात केले आहे.

श्रवणी सांगितली मात मस्तकीं ठेवियेला हात । पदपिंडाविवर्जित केला नामा ॥ १ ॥ खेचरू विसा प्रेमाचा पिसा । तेणे नामा कैसा उपदेशिला ॥ २ ॥ सांगितले गुज दाखविले निज । आता पाल्हाळी तुज काय चाड ॥ ३ ॥ खेचरू म्हणे मज ज्ञानराज हेच गुरु । तेणे अगोचरू केला नामा ॥ ४ ॥

संत विसोबा खेचरांनी नामदेवांच्या कानामध्ये मात म्हणजे तत्त्वमसी महावाक्याचा उपदेश केला व त्यांच्या डोक्यावर हात ठेवून शक्तिपात दीक्षा दिली. पद म्हणजे ब्रह्म व पिंड म्हणजे जीव होय. शक्तिपाताने नामदेवांचे हे जीवभाव व ब्रह्मभाव दोन्ही घालवून विसोबांनी त्यांना केवळ ब्रह्मरूप केले. त्यांना विदेहस्थिती प्राप्त करून देऊन कैवल्यपदावर बसविले. प्रेमाने धुंद असलेल्या स्थितीत संत विसोबा खेचरराय यांनी नामदेवरायांना हा अद्‌भुत उपदेश सांगितला. हे नामदेवा ! तुला गुह्य ज्ञान सांगितले व आत्मस्वरूपाचा प्रत्यय आणून दिला आहे. तेव्हा (शक्तिपातयोगाचे अपूर्व साधन तुला मिळाल्याने) आता अन्य साधनाच्या खटपटीची तुला काय आवश्यकता आहे ? हे नामया, ज्ञानराज हेच माझे गुरू आहेत. त्यांनीच मला सिद्धयोगपंथाची दीक्षा देऊन ही अतींद्रिय अवस्था प्राप्त करून दिली असे खेचरराय म्हणतात.

जनार्दनस्वामींना दत्तात्रेयांकडून शक्तिपाताने आत्मबोध :–

श्रीदत्तात्रेयांनी आपले गुरू श्रीजनार्दनस्वामी यांच्या मस्तकावर हात ठेवून स्पर्शदीक्षा कशी दिली व आत्मबोध कसा प्राप्त करून दिला याचे भावस्पर्शी वर्णन संत श्रीएकनाथ महाराजांनी श्रीनाथभागवताच्या यदुअवधूत संवादात पुढीलप्रमाणे केले आहे.

दत्तात्रेय शिष्यपरंपरा । सहस्त्रार्जुन यदु दुसरा । तेणें जनार्दन तिसरा । केला खरा कलियुगी ॥ गुरुप्राप्तीलागी सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता । विसरला तिन्ही अवस्था । सद्‌गुरु चिंतिता चिंतनीं ॥ देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनी अवस्था । येणें झाले श्रीदत्ता । तेणे हातु माथां ठेविला ॥ हातु ठेवितांची तात्काळ । बोधू आकळिला सकळ । मिथ्या प्रपंचाचे मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥ कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु झाला देता । देहीं असोनि विदेहता । तेही तत्त्वता आक-

ळली ॥ गृहाश्रमू न सांडिता । कर्मरेखा नोलाडितां । निजव्यापारीं वर्ततां । बोधू सर्वथा न मैळे ॥ तो बोधू आकळता मना । मन मुकलें मनपणा । अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥ त्यासी सावध करुनि तत्त्वता । म्हणे प्रेम राहे सत्त्वावस्था । तोहि गिळोनि सर्वथा । होई वर्तता निजबोधें ॥ पूजाविधी करोनिया । जंव जनार्दनु लागला पायां । तंव अदृश्य जाला दत्तात्रेया । योगामायेचेनि योगें ॥

दत्तात्रेयांची शिष्यपरंपरा अशी आहे. पहिला सहस्रार्जुन, दुसरा यदू व या कलियुगांत जनार्दनाला तिसरा शिष्य केले. गुरुप्राप्तीसाठी जनार्दनाला मोठी चिंता लागून राहिली होती. पण सद्गुरूच्या चिंतनात तो जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्था विसरला. देव भावाचा भुकेला आहे. त्याची स्थिती जाणून साक्षात् दत्तात्रेयच त्याच्यापाशी आले. त्यांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. हात ठेवताक्षणीच त्याला आत्मज्ञान झाले. त्या आत्मज्ञानानेच त्याने प्रपंचाचे मूळ मिथ्या केले. दत्तात्रेय कर्म करून अकर्ता होता. तोच आपला आकर्तेपणाचा बोध त्याने जनार्दनाला दिला. देहवान असून विदेह अवस्था त्याने तत्त्वतः स्वीकारली. गृहस्थाश्रम न सोडता, कर्ममर्यादेचे उल्लंघन न करता आपल्या व्यवहारात वागत असता त्याचे आत्मज्ञान मलीन झाले नाही. ते ज्ञान मनाने जाणताच त्याचे मनपण नाहीसे झाले. ती अवस्था जनार्दनाला आवरता न आल्याने तो मूर्च्छित होऊन पडला. तेव्हा त्याला सावध करून दत्तात्रेय म्हणाले की, " सत्त्वावस्थेत प्रेम राहाते. यास्तव तेही टाकून तू आत्मज्ञानाने वागत जा. " त्यानंतर जेव्हा जनार्दनाने यथाविधी पूजा करून त्यांच्या पायावर मस्तक ठेवले तेव्हा दत्तात्रेय योगमायेने अदृश्य झाले.

एकनाथांना गुरुकृपेने परिपूर्ण ब्रह्मप्राप्ती :–

श्रीजनार्दनस्वामींना श्रीदत्तात्रेयांकडून जी परंपरा व शक्ती मिळाली ती त्यांनी एकनाथांच्या ठिकाणी संक्रमित केली. नाथ म्हणतात–

आदिनाथ ठेवणे सिद्ध परंपरा । जनार्दनी वेव्हारा एकनाथी ॥

आदिनाथांचे ठेवणे म्हणजे शक्तिपातयोग होय. तो सिद्ध परंपरेने जनार्दनांकडून एकनाथांना प्राप्त झाला. ही परंपरा सांगतांना नाथ म्हणतात–

जनार्दनाचा गुरु । स्वामी दत्तात्रेय दातारु ॥ १ ॥ त्यांनी उपकार केला । स्वानंदाचा बोध दिला ॥ २ ॥ सच्चितसुखाचा अनुभव । दाखविला स्वयमेव ॥ ३ ॥ एका जनार्दनी दत्त । वसो माझ्या हृदयात ॥४॥

शक्तिपातयोगदीक्षेने आपली स्थिती काय झाली व आपल्याला कोणते अनुभव आले याचे वर्णन नाथांनी फारच सुंदर केले आहे. सकल-संतगाथा, भाग २ पृष्ठ २०८ वर पुढील वर्णन आले आहे.

सांगा स्वामी मज कृपा हो करूनी। शिष्य विनवणी करी ऐशी ॥ ८२ ॥ करी ऐशी दया मज गुरुराया । लागतसे पाया शिष्यराज ॥ ८३ ॥ शिष्यराजा झाली अष्टभाव प्राप्ती । सद्गुरूनीं हातीं धरियेला ॥ ८४ ॥ धरियेला करी नेला एकांतात । अंकी बैसवीत सद्गुरुराव ॥८५॥ सद्गुरुराव बोलती त्या क्षणी । लागली उन्मनी तयां लागीं ॥ ८६ ॥ तयालागीं नाही देहींचा आठव । स्थूल सूक्ष्म भाव मावळले ॥ ८७ ॥ मावळले चारी देह चारी अवस्था । शिष्य तो तत्त्वता ब्रह्म झाला ॥८८॥ ब्रह्म झाला त्याचा देह आत्मस्थिती । द्वैताद्वैतप्रतीति नाही जया ॥ ८९ ॥ नाही जया सुखदुःखाची भावना । समूळ वासना निरसली ॥ ९० ॥ निरसली त्याची अहंकार कल्पना । सुखदुःख यातना नाही तया ॥ ९१ ॥ नाही तया जीव शिव भेदाभेद । समूळ हे वाद मिथ्या झाले ॥ ९२ ॥ मिथ्या झाले ज्ञान आणि ज्ञाना । भोज्य भोग भोक्ता मावळला ॥ ९३ ॥ मावळला तेव्हां सद्वैत प्रपंच । एक ब्रह्म साच अनुभविले ॥ ९४ ॥ अनुभविले तेणे अनुभव वेडावला । विचार निमाला जिये ठायी ॥ ९५ ॥ जिये ठायीं गती नाही षटप्रमाण। साधन लक्षणा ठाव कैचा ॥ ९६ ॥ ठाव कैचा तेथे परादिका वाचा । जेथे त्या शब्दाचा लाग नाही ॥ ९७ ॥ लाग नाही तेथे उपपत्ति युक्ति । अपरोक्ष प्रतीति लया गेली ॥ ९८ ॥ लया गेली तया स्थानी मज ठेविले । सद्गुरुदयाळे दीनानाथे ॥९९॥ दीनानाथें तया ठायीं निजविले । नवजाती वर्णिले गुणतया ॥ १०० ॥ एका जनार्दन गुरूपायीं लीन । ब्रह्म परिपूर्ण अनुभविले ॥ १०१ ॥

महर्षी व्यासांकडून श्रीराघवचैतन्यांना शक्तिपातदीक्षा :—

श्रीनिरंजनरघुनाथांनी केशवचैतन्यकथातरू या प्रकरण ग्रंथात संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराज यांचे आजेगुरू श्रीराघवचैतन्य यांना महर्षी व्यासांकडून शक्तिपातयोगदीक्षा कशी मिळाली याचे अत्यंत मनोज्ञ वर्णन केले आहे.

श्रीविष्णू जो वैकुंठवासी । तो चतुश्लोके ब्रह्मयासी । भागवतमिसें उपदेशी । आत्मतत्त्वालागी पैं ॥ अध्याय १–२१ ॥ ब्रह्मयानें नारदा कथिले । नारदें व्यासासि बोधिले । पुढे कलियुग प्राप्त जाले । तंव शिष्य न मिळे अधिकारी ॥ २२ ॥ व्यास चिंतिती मानसी । जे सर्व सुखाची राशी । ते आत्मतत्त्व कोणासी । सांगू आता या काळी ? ॥ २३ ॥ तंव

राघव नामें द्विजसत्तम । जो उत्तमामाजी उत्तम । अनुष्ठनांतो अति निस्सीम । व्रतालागी आचरे ॥ २४ ॥ उत्तम नाम नगरी । मांडवी पुष्पावतीचे तीरी । राहोनिया बहुकालवरी । तप आचरता जाहला ॥ २५ ॥ व्हावे व्यासांचे दर्शन । हेचि इच्छा धरुनी पूर्ण । वातांबु पर्णाशन । करूनि देह शुष्क केला ॥ २६ ॥ जाल्या नखांच्या चुंबळी । आंगावरी वाढली धुळी । जटा लोंबती भूतळीं । देह शुष्क जाहला ॥ २७ ॥ तंव सत्यवती हृदयानंदन । श्रीव्यास येऊनि आपण । देऊनिया अभयदान । मस्तकीं हस्त ठेविला ॥ २८ ॥ जो तत्त्वज्ञानाचा उपाय । नमो भगवते वासुदेवाय । प्रणवयुक्त हा मंत्रराय । कर्णामाजी सांगितला ॥ २९ ॥ परमहंसदीक्षा देऊन । बोधिते जाले तत्त्वज्ञान । तेणे मूळ अविद्या निरसुन । परमानंद जाहला ॥ ३० ॥ उठले अष्ट सात्त्विक भाव । चंचळ मनाची मोडली धांव । कल्पनेने सांडिली हाव । ब्रह्मवस्तु अनुभवितां ॥ ३१ ॥ अष्टांगयोगाच्या कळा । द्वैपायने कथिल्या सकळा । अगोचरी मुद्रा डोळा । आखंडित बाणली ॥ ३२ ॥ मावळोनि गेली बुद्धि । जाली निर्विकल्प समाधि । गेल्या सर्वही आधिव्याधी । सुखसमृद्धि जालिया ॥३३॥ मग जयजयकार बोलुन । केले श्रीगुरूचे स्तवन । करुनिया साष्टांग वंदन । चरणी मस्तक ठेविले ॥ ३४ ॥ शिष्य पाहुनी परम धन्य । नाम ठेविले राघवचैतन्य । संपूर्ण जगीं होशील मान्य । ऐसा वर दिधला ॥३५॥

केशवचैतन्यांना शक्तिपातप्रभावाने आत्मसाक्षात्कार :—

राघवचैतन्यांनी केशवचैतन्यांना शक्तिपात दीक्षा देऊन आत्मसाक्षात्कार कसा घडविला याचे वर्णन श्रीनिरंजन रघुनाथांनी फार रसाळपणे केले आहे –

वैराग्ये चित्त शुद्ध जाले । स्त्रीचे ऋणही फिटले । ऐसें पाहुनि प्रसन्न झाले । राघवचैतन्य ते काळी । अध्याय–२–४८ ॥ संन्यासपद्धतीचे प्रकारें । माझे नामाचेनि अनुसरे । केशवचैतन्य नाम बरे । विचार करुनि ठेविले ॥ ४९ ॥ मग शिष्याते सन्मुख बैसवून । करिती महावाक्याचे बोधन । शक्तिपातप्रभाव करुन । साक्षात्कार केला पै ॥ ५० ॥ होता ब्रह्माकार वृत्ती । मनाची मोडली प्रवृत्ती । मावळून गेली देहस्मृती । जीवभ्रांती उडाली ॥ ५१ ॥ जाली निर्विकल्प समाधी । विलया गेली चित्तशुद्धी । सुख पावले निरवधि । केशवचैतन्य ते काळी ॥ ५२ ॥ ऐसे बहुत दिवस गेले । कोणाते ठाऊके नाही जाले । पुनरपि स्मृति विसरले । करू आदरिले स्तवनासी ॥ ५३ ॥

संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराजांची शक्तिपाताने खेदरहित स्थिती :–

श्रीनिरंजनरघुनाथ यांनी लिहिलेल्या केशवचैतन्यकथातरू या प्रकरण ग्रंथात संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराजांना शक्तिपात दीक्षा कशी झाली याचे अत्यंत सुंदर वर्णन आले आहे.

आपणास घडावे आचार्य सेवन। यास्तव गुरु करावा कोण। हे पुसावे देवालागुन। म्हणुनी गेला पंढरीसी॥ अध्याय ६–७३॥ करुनि साष्टांग नमस्कार। उभा राहिला जोडून कर। विनंती करी वारंवार श्रीविठ्ठलमूर्तीस॥ ७४॥ देवा तूचि माझी माता। आणि तूचि माझा पिता॥ तूं माझा बंधु चुलता। आप्त सोईरा तू सर्व॥ ७५॥ देवा! तू परम गुरु। करावा माझा अंगिकारु। मज उपदेश करुनि परिकरु। जन्म-मरण चुकवावे॥ ७६॥ मग बोले रुक्मिणीकांत। माझेच स्वरूप असे ओतुरात। तेथे केशवचैतन्य साक्षात। उपदेश करतील तुजलागी॥ ७७॥ म्यां वेदवाणी करून। मर्यादा केलीं असे जाण। जावे महानुभावासी शरण। माझे स्वरूप समजावया॥ ७८॥ म्यां रामावतारचे ठायीं। वसिष्ठ गुरु केला पाही। तैसा कृष्णावतारांचें समयी। संदिपन गुरु केला॥ ९७॥ माझी वेदआज्ञापालन। मीयाची केली असे जाण। गुरुरूपही मीच होऊन। उद्धार करी जगताचा॥ ८०॥ नामया माझा भक्त पाही। तयासी मी सांगितले लवलाही। विसोबा खेचरास जाई। शरण गुरूपदेशा॥ ८१॥ ऐसे देवें सांगितल्यावरी। तुकया येता जाला ओतुरीं। बाजारांत जानु तेल्याचे द्वारी। बखळेमध्यें राहिला॥ ८२॥ हा वेडा आहे म्हणून। तयासी कोणा न देती ठिकाण। मुखे करितो नामस्मरण। अन्य भाषण न करिता॥८३॥ रात्रौ तेथे करिता शयन। स्वप्नीं येऊनि एक ब्राह्मण। पावशेर तूप भोजनालागुनि। मागता जाला तुकयासी॥ ८४॥ मग उठोनिया प्रातःकाळीं। जाऊ लागला समाधीजवळी। तंव मागे भेटले तयेवेळी। केशवचैतन्य आपण॥ ८५॥ जात होते मांडवीस्नाना। तेव्हा तुकयाने केले साष्टांगनमना। आणि करिता जाला प्रार्थना। उपदेश करावा म्हणउनि॥ ८६॥ तुकयाचा उत्तम अधिकार। पाहुनि मस्तकीं ठेविला कर। रामकृष्णहरि हा मंत्र तयालागी सांगितला॥ ८७॥ त्या मंत्राचा अर्थ सांगुन। तुकयासी ठसविले पूर्ण ज्ञान। जेथें मायेचे नसे आवर्ण। तेचि स्वरूप दाखविले॥ ८८॥ तुकयाते जाला परमानंद। सरला देवभक्ताचा भेद। साध्यसाधनाचा खेद। सर्वापरि मावळला॥ ८९॥

निळोबांना तुकारामांकडून शक्तिपातदीक्षेने निजात्मस्थिती :–

तुकाराम महाराजांना परंपरेने मिळालेली शक्तिपातदीक्षा त्यांनी निळोबारायांना देऊन कृतार्थ केले. निळोबाराया म्हणतात –

येऊनिया कृपावंते । तुकयास्वामी सद्गुरुनाथे ॥ १ ॥ हात ठेविला मस्तकीं । देऊनि प्रसाद केलें सुखी ॥ २ ॥ माझी वाढविली मती । गुणवर्णाविया स्फूर्ती ॥ ३ ॥ निळा म्हणे मी बोलता । दिसे परि हे त्याची सत्ता ॥ ४ ॥

दीक्षा झाल्यावर आपल्याला कोणते अनुभव आले व आपली स्थिती कशी झाली याचे वर्णन करतांना निळोबाराय म्हणतात–

डोळियाचाही डोळा बुद्धी । माझी उघडूनिया कृपानिधी । देखणी करूनियां त्रिशुद्धी । निजात्मपदीं स्थापिली ॥ १ ॥ तेणें दिसती ठाया ठाव । हृदय सकळांचे भाव । संत दावी जे अनुभव । आणखीही सर्व मायाकृत ॥ २ ॥ नवल कृपेची हे जाती । फिटली मोह ममता भ्रांती । उत्पत्ती स्थिती प्रलय होती । ते ते निगुती आटले ॥३ ॥ देखणें झालें नयनानयन । देखती आपुलेंही वर्तन । राहिले ठायींच ते जडोन । अभेद होऊन देखती ॥ ४ ॥ निळास्वामी सद्गुरुनाथा । देखणा तूंचि मी नाही आता । तोडूनि मी हे माझी ममता । आपण आतौता मेळविलो ॥ ५ ॥

सोहिरोबानाथ अंबिये यांना गोरक्षनाथांकडून शक्तिपात दीक्षा :–

प्रसिद्ध संत श्रीसोहिरोबानाथ अंबिये यांना सद्गुरुकृपेचा लाभ शक्तिपातपूर्वक कसा झाला याचे मोठे चित्तवेधक वर्णन श्रीराजाराम प्रासादी यांनी भक्त मंजिरीमाला या ग्रंथांत त्यांचे चरित्र कथन करीत असताना पुढीलप्रमाणे केले आहे.

ऐसे प्रकारे ब्रह्मनिष्ठ । सोहिरोबा आंबे साधु श्रेष्ठ । जगरीती वर्तती स्पष्ट । भावनिष्ठ सद्गुरुपदा ॥ १ ॥ नित्य शेताकडे जावें । येईल त्याचे आतिथ्य करावें । सर्वाभूतीं आत्मत्व पाहावे । भोजन द्यावें क्षुधार्था ॥ २ ॥ कोणे एके दिनी अरण्यांत । बैसले एका वृक्षाखालते । जवळी असती शेतें भातें । उदक वाहत निर्मळ पै ॥ ३ ॥ प्राप्तोवेळ समय आला । अद्भुत वर्तली तेथ लिळा । योगींयांचा स्वामी पातला । गोरक्ष ज्याला म्हणती पै ॥ ४ ॥ आकाशपंथें दैदिप्यमान । नाथजींचें जालें आगमन । मूर्ति पाहातां झांकले नैन । तेज पूर्ण दाटलें ॥ ५ ॥ सडपातळ दिव्य पुरुष । भस्मोद्धूलित अंगी प्रकाश । प्रसन्नवदन मुद्रा विलसे । आले योगेश त्या ठाया ॥ ६ ॥ एकत्र होता उभय दृष्टी ।

हारपोनी गेली सहजत्रिपुटी । मंत्रोपदेश कर्णपुटीं । कृपादृष्टी नाथजीची ॥ ७ ॥ पद्मकर तो पडता शिरीं । देहभान कैंचे शरीरीं । ताटस्था वरिली बरी । नाही सरी दुजी तया ॥ ८ ॥ घेरिला सोयरा महद्भुताने । अचेतन पडला सहजी जाण । अलक्ष मुद्रा बाणली पूर्ण । कोण जाणे तया सुखे ॥ ९ ॥

निरंजनांना रघुनाथांकडून चैतन्यघनस्वरूपप्राप्ती :–

महान दत्तोपासक व स्वप्रयत्नाने दत्तात्रेयांचे गिरनार पर्वतावर प्रत्यक्ष दर्शन घेतलेल्या श्रीनिरंजन अवधूतांनी रघुनाथवास्मींकडून शक्तिपातदीक्षा झाल्यावर जे अनुभव आले त्याचे वर्णन स्वात्मप्रचीती या आपल्या आत्मचरित्रात पुढील प्रमाणे केले आहे–

मग मी बहु नम्र होऊन । पुसता लागलो गुरू लागून । सच्चिदानंद हे ध्यान । सर्वी कै पहावे ॥ अ. ४–४० ॥ ऐसे देता प्रत्युत्तर । सद्गुरु चातुर्यरत्नाकर । मग होऊन बहु उदार । आनंदलहरी प्रसवले ॥ ४१ ॥ म्हणे एक वो चातुर्यभरिता । सोडुनी पश्चात्तापव्यथा । मनइंद्रियांचा करोनि लोथा । वचन माझे परियेसी ॥ ४२ ॥ मग मी तैसाच पाहू गेलो । पाहता तदाकारचि जालों । देहस्फूर्तीनें विसरलों । कोठे आहे नेणवे ॥ ४५ ॥ कवण ध्याता कवण ध्यान । कोण श्रोता वक्ता करून । पाहता हारपुनी गेले मन । तीव्र ध्यान लागले ॥ ४६ ॥ शरीरामाजी आकाश भरले । वाटे मस्तक भेदुनी गेले । ब्रह्मकटाहामाजी मीनले । स्वरूप माझे सर्वही ॥ ४७ ॥ अंतरीं एकचि जाला गोळ । वाटे हृदयींच आहे भूगोळ । खालीं वरी मध्यें निर्मळ । मीच अवघा व्यापलो ॥५०॥ स्वरुपीं नाही देहभान । गुरूसी न बोलवे वचन । ऐसे वृत्तीतें पाहून । सद्गुरु जाले बोलते ॥ ५१ ॥ हेंचि ब्रह्म निराकार । निरंजन निराधार । निःप्रपंच निर्व्यापार । हेंचि तुझें स्वरूप पै ॥ ५२ ॥ निर्मळ निष्कलंक निर्गुण । अनादि स्वरूप चैतन्यघन । स्वप्रकाश आत्मा आनंदघन । तें हें स्वरूप तुझे पै ॥ ५३ ॥ तुझें स्वरूप निराकार । तुझेंचि रूप अजरामर । तुज जन्ममृत्यूचा घोर । येथून आता नसेचि ॥ ५ ॥ आता निर्भय होय अंतरी । सांडी द्वैताची कर्तरी । नांदे एकपणाचे घरीं । स्वानंदेसी सर्वदा ॥ ५५ ॥ ऐसें ऐकुनि गुरुवचन । हर्षयुक्त जाले मन । मोठ्यानें हास्य करून । प्रेमटाळी पीटिली ॥ ५६ ॥ तेथे गुरुशिष्यांचे भाषण । निघाले ब्रह्मनिरूपण । एकाग्र चित्तीं करिता श्रवण । उन्माददशा पैं झाली ॥ ८४ ॥ नेत्रे भ्रूकुटी एकचि जाली । मस्तकाप्रती कळ लागली । आकाशमय वृत्ति जाहली । भान नाही देहाचे ॥ ८५ ॥ वाटे आकाशींच

उडावें । कीं समुद्रपलीकडे जावें । कीं ब्रह्मांडचि गिळावें । तोंड पसरून आवघें ॥ ८६ ॥ जैं वीर निघे युद्धाप्रती । भाट सवाया बोलती । स्फुरण चढे वीराप्रती । बाहु उडती तटतटा ॥ ८७ ॥ तैसे झाले मजलागून । वाटे मीच ब्रह्म निर्गुण । शास्त्र वेद आणि पुराण । माझे गुण वर्णिती ॥ ८८ ॥ ऐकुनि ब्रह्मींचा सोहळा । हास्य येतसे वेळोवेळा । कंठ दाटून आला सगळा । नेत्रांलागीं दिसेना ॥ ८९ ॥ आपुलें न दिसेचि शरीर । अवघे दिसे निर्विकार । सृष्टी जाहली धूम्राकार । नाही आकार कोठेंही ॥ ९२ ॥ क्षणक्षणिं नेत्र उघडुनि पाहे । तंव ते तैसेंचि दिसताहे । भूमीवरी पाय न राहे । वाटे उडुनि चालिलो ॥ ९३ ॥ स्फुंद स्फुंद असे रडत । पोटांत तिडिक उठती बहुत । वायू उर्ध्वपथे चालत । शेंबूड येतसे बहुतला ॥ ९४ ॥ एक घटिकापर्यंत । अंतरी होऊनि भयाभित । उठूनि भूमीसी पडत । उभा राहात क्षणक्षणीं ॥ ९९ ॥ तंव गुरु पहाती कृपादृष्टी । म्हणती जाहली संतुष्टी । आता उघडुनिया पाहे दृष्टी । देहावरी येई का ॥ १०० ॥ ऐकुनि ऐसें कृपावचन । सवेंचि केले हास्य-वदन । सर्वशरीर शीतळपण । होऊनिया राहिले ॥ १०१ ॥ तंव नेत्रीं बहुत निद्रा आली । मग तेथेंचि क्षणेक शय्या केली । गाढ समाधि लागली । तुर्या म्हणती जियेसी ॥ १०२ ॥ ऐसा गुरुप्रसाद जाला । राज्यीं अभागी स्थापिला । किं रोगिया जीवन्मुक्त केला । तैसें मजला जहाले ॥ १०३ ॥

श्रीप्रभू रामचंद्राकडून श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांना शक्तिपाताने स्वसुखधामप्राप्ती :–

श्रीप्रभू रामचंद्रांनी शक्तिपाताने श्रीसमर्थांना स्वसुखधामप्राप्ती कशी करून दिली याचे वर्णन राजारामप्रासादीकृत भक्तमंजिरीमाला या ग्रंथातील श्रीसमर्थचरित्रात आले आहे.

पुढे कांही दिवसानंतर । नारायणानि केला विचार । परब्रह्म निर्विकार । श्रीरघुवीर भेटावया ॥ १.७६ ॥ येतद्विषई स्वग्रामात । जागृतस्थान श्रीहनुमंत । जाउनि तेथे देवालयात । अनुष्ठानाचे आरंभिले ॥ करुणापर अभंग करूनि । पठण करिता मधुरध्वनि । तयेवेळी कोदंडपाणि । प्रगटले वनीं श्रीराम ॥ मग जगद्गुरुश्रीरामराया । उंचबळले प्रेम हृदया । नारायणाची कवळोनि काया । सुचविली कराया प्रश्नाते ॥ सावध म्हणता सावध जाहला । श्रीचरणीं मस्तक ठेविला । बोलवेना कंठ दाटला । बळावला पश्चाताप ॥ नंतर सावरोनि निजप्रेमा । प्रश्न केला श्रीरामा । मेळवावे स्वसुखधामा । करपद्मा ठेवुनि शिरीं ॥ ऐकूनि ऐसें

कैवल्य दानी । हासिनलें चापपाणि ।। मग सांप्रदायकमें करुनि । मंत्रकर्णी उपदेशिला ।। दासा म्हणती सावध होई । आपआपणा तूचि पाही । अणुपासून ब्रह्मांड गेही । दुजा ठाई नसे पै ।। येकात्मता सर्व भूती । गर्जता हे वेदश्रुती । वशिष्ठ कृपे जे आत्मप्रचीति । तेचि युक्ति निरोपिली ।। आत्मस्तुति ऐशा प्रकारें । सांगताचि श्रीरघुवीरें । जाहली वृत्ति तदाकार । अखंडकार ब्रह्मरूप ।। उदकिं उदक जेवि मिळता । नये कदापि ते निवडतां । तयापरी एकात्मता । बाणली साम्यता सहजी तें ।।

शिवाजीमहाराजांना शक्तिपातदीक्षेने श्रीसमर्थांकडून आत्मारामप्राप्ती :–

छत्रपती शिवाजीमहाराज आपणास अनुग्रह व्हावा म्हणून मुद्दाम शिंगणवाडी येथे श्रीसमर्थांना भेटले. त्यावेळी समर्थांनी त्याना दीक्षा देऊन कृतार्थ कसे केले याचे अत्यंत रसाळ वर्णन भक्तमंजिरीमालेत पुढीलप्रमाणे आले आहे. –

तों शिंगणवाडीत आहे समर्थ । ऐसा कळळाराजासी वृतांत । शिवाजी पायउतारा तेथे । गेले चालत अनुग्रहासी ।। ५.३७ ।। कल्याणस्वामी समर्था जवळी । अष्टौप्रहर असती सर्वकाळीं । अनुग्रहार्थ विनंती केली । गुरुमाऊली दाखवी म्हणुनि ।। अधिकार पाहुनी कल्याणस्वामी । कळवळले बहु अंतरयामीं । बैसले होते जेथें स्वामी । प्रार्थिले सप्रेमी जाऊनि तेथे ।। हास्य करूनि श्रीरामदासें । म्हणति कल्याणा सांगतोसि पै । ते कळले असे येऊ द्या येथे । शिवाजीस आज्ञा असे आमुचि पै ।। असो सांप्रदायक्रमे करूनि । अनुग्रह दिधला शिवाजी लागोनि । मंत्र सांगतां निजकर्णी । लाधली उन्मनि राजासी ।। जैसा स्फुलिंग दारूत पडता । आवाज उठे तो तत्त्वता । नातरि सूर्य प्राप्त होता । आंधार सर्वथा न उरेचि ।। असो फार काय दृष्टांत घेणे । अधिकारी शिवाजी मुळींचा पूर्ण । रामदासस्वामी सद्गुरु जाण । जीवन सकळ संताचे ।। मस्तकी ठेवितां वरदपाणि । वरिले सहजी तेणे उन्मनि । प्रकट जाले स्वरूप नैनिं । अंतःकरणीं निर्द्वंद्व द्वैताद्वैत सरला भ्रम । अन्वय व्यतिरेक कैचा नेम ।। आपुला आपण आत्माराम । लाधले वर्म गुरुकृपें ।।

श्रीरघुनाथस्वामींकडून आनंदमूर्ती ब्रह्मनाळकरांना शक्तिपाताने अद्वयस्थिती :–

श्रीरघुनाथस्वामींची परीक्षा पाहावी म्हणून समर्थपंचायतनातील आनंदमूर्ती त्यांच्याकडे गेले होते. परंतु पुढे त्यांनी स्वतः स्वामींकडे दीक्षेची याचना " श्रीगुरुमाय करुणाघन, शिरी हस्त ठेविजे, या शब्दात

केली. रघुनाथस्वामींनी त्यांची इच्छा पूर्ण केली. स्वामींनी आनंदमूर्तींना शक्तिपात दीक्षा दिली. त्यावेळी आनंदमूर्तींची स्थिती कशी झाली याचे वर्णन राजाराम प्रासादी यांनी भक्तमंजिरीमालेत केले आहे.

रघुनाथस्वामीसी पाहाता नैनीं । आनंदमूर्ती पडिले मेदिनी। दृष्टीपात तत्क्षणीं धरिलें उन्मनी । नयन ते ॥ २२.२१ ॥ कैचि डांग कैचे भाषण । विरोनि गेले देहभान । ठाईच गळाला अभिमान । मी तूं पण न दिसे तें ॥ कर्पूर वन्ही येकवटला । अवघाचि जादला बंबाळा । तैसी गती आनंदमूर्तिला । साधले स्थितीला गुरुदर्शने ॥ नातरी दारूचा पर्वत । अग्निस्पर्शे उडोनि जात । किंबहुना पिशाच्च पळत । पडता श्रवणात हरिनाम ॥ पश्चात्ताप बळावला । विरक्तीनें घातली माळा । कोण वर्णि त्या वैभवाला । संशय पळाला दिगंतरी ॥ मग संप्रदायक्रमें श्रीगुरुनाथें । उपदेश केला आनंदमूर्तिते ॥ ते वांच्यांशद्वारे ग्रंथाते । लेखन केउते करु मी ॥ श्रवणें पेरिलें निजबीज । नैनिं उगवले सतेज ॥ अंतर्बाह्य फाकले सहज । नवल चोज गुरुकृपेचे ॥ सहज समाधि अद्वय स्थिती । नसेचि तेथे दिवारात्री । नित्योदय आनंदमूर्ती । अद्वयस्थिती भोगीली ते ॥ पिंड ब्रह्मांड विसरले । तत्त्वीं तत्त्व विभागले । जीवशीव मावळले । तया सोज्वळ चिद्गगनीं ॥ अहंसोहं भेदभाव । आनंदीं विराले निजस्फुरण । उमस खाऊ नेंदी क्षण । वृत्ती लीन परब्रह्मीं ॥ ऐसा होता स्वरुपानुभव । कर्म धर्म जाहले वाव । आपीं आप स्वयमेव । वासुदेव परमात्मा ॥ प्रवृत्ति भाग राहिला । देहस्मृती नसे ज्याला । स्वइच्छा वर्ते योगीमला । परम-पदाला मीनला तो ॥

तुकामाईंकडून गोंदवलेकरमहाराजांना शक्तिपाताने ब्रह्मचैतन्यप्राप्ती :–

"श्रीगोंदवलेकर महाराज चरित्र व वाङ्मय" या ग्रंथात प्रा. के. वि बेलसरे यांनी पृ. ५६ वर तुकामाईकडून श्रीगोंदवलेकर महाराजांना शक्तिपातदीक्षा कशी झाली याचे अत्यंत हृद्य वर्णन आले आहे.

श्रीमहाराज देहाभिमानशून्य झाले आहेत अशी तुकामाईची खात्री झाली. येहळेगावला येऊन श्रीमहाराजांना नऊ महिने झाले होते. या कालामध्ये त्यांना गोंदवल्याची किंवा आपल्या मातापित्यांची आठवण झाली नाही. गुरूच्या अखंड सेवेमध्ये ते स्वतःचे भान विसरले. त्यांच्या मनाचे व्यापार स्तब्ध झाले. भूक, तहान, झोप वगैरे देहधर्म सुटले. अंतःकरण पूर्ण निर्वासन झाले. आणि खऱ्या चित्तशुद्धीचे तेज त्यांच्या शरीरावर झळकू लागले. लवकरच श्रीरामनवमी आली. आपल्या बरोबरच्या

इतर मंडळीना तुकामाईंनी उत्सवासाठी उमरखेडला पाठवून दिले. रामनवमीच्या दिवशी भर उन्हात दोघे गुरु-शिष्य रानात गेले. जवळच्या एका शेतामध्ये दोघांनीही स्नाने केली. एका अशोकवृक्षाखाली तुकामाईंनी श्रीमहाराजांना हात धरून आपल्यासमोर बसविले आणि बोलले, मी तुला आजपर्यंत फार कष्ट दिले. पण पूर्वी वसिष्ठांनी रामचंद्राला जे दिले ते मी तुला आज या क्षणी देतो ! असे सांगून त्यांनी श्रीमहाराजांच्या डोक्यावर हात ठेवला. श्रीमहाराजांना तत्काळ समाधी लागली. पुष्कळ वेळानंतर जेव्हा समाधी उतरली तेव्हा ब्रह्मचैतन्य असे त्यांचे नाव ठेवले आणि त्यांना अत्यंत प्रेमाने आलिंगन दिले. श्रीराम जयराम जय जय राम – हा त्रयोदशाक्षरी मंत्र जपून रामोपासना करावी असे सांगून तुकामाईंनी श्रीमहाराजांना रामदासी दीक्षा दिली व अनुग्रह देण्याचा अधिकार दिला.

नारायणतीर्थदेवांना श्रीगंगाधरतीर्थांकडून सिद्धयोग दीक्षा :–

श्रीनारायणतीर्थस्वामी महाराजांचे नांव संन्यास घेण्यापूर्वी कालीकिशोर असे होते. त्यांना शक्तिपात दीक्षा कशी झाली याचे वर्णन श्रीनारायण उपदेशामृत या पुस्तकात श्रीस्वामी शिवोम् तीर्थमहाराज (विद्यमान शक्तिपातदीक्षाधिकारी, नारायणकुटी, संन्यासाश्रम, देवास म. प्र. येथे वास्तव्य) यांनी केले आहे.

कालीकिशोर का स्वामीजीके दर्शनार्थ नित्य नियमित आना-जाना आरंभ हो गया। एक दिन कालीकिशोरने निवेदन किया कि महाराज मुझे कुछ सिखलाइये। श्रीस्वामीजीने जपपर बल देते हुअे कहा कि मंत्र-जपसे सब कुछ हो जाता है। कालीकिशोरने कहा कि मैंने बहुत मंत्रजप किये है परंतु कोई प्रत्यक्ष फल अनुभव नहीं हुआ। तब श्रीस्वामीजीनें एक छोटीसी पुराणी गीतामेंसे कुछ श्लोक पढवाये और फिर एक साधूसे छोटीसी दूसरी गीता मंगवाकर कालीकिशोरको पढनेको दी। इन्होंने एक महिनेमें कितनेही श्लोक याद कर लिये ! तब इन्होंनें एक दिन राजयोग ब्रह्मविद्याके लिये श्रीस्वामीजी महाराजसे प्रार्थना की। किंतु कुछ उत्तर न मिला।

एकदिन फिर प्रार्थना करनेपर श्रीस्वामीजी बोले – क्या मांगता है रे। हम तुमको हमारे माफक कर देंगे। सर्व प्रकारके साधनोंके लिए यह गीता सबसे मुख्य है। इसमें कर्म, ज्ञान, भक्ति, योग सब वर्णित है।

सन १८८९ इसवी की अक्षयतृतिया को शुक्रवार था। स्वामीजीने कालिकिशोर को क्षौर तथा स्नानादि करवाया और कुछ पुष्प लेकर आनेको कहा। हाथोके पुष्प श्रीस्वामीजीनें दक्षिणारूपमें ग्रहण करके कहा कि तुमको मंत्रसहित योगकी दीक्षा देते हैं। योग, ज्ञानकी विभिन्न भेद पूर्ण बातें बतलाते हुये कहा – यह जो कुछ देखता हूँ, मैं ही हूँ यह भाव तेरेमें प्रस्फुटित हो गया है। जब यह भाव मनमें परिपक्व अवस्थामें आ जाय तो समझना की तेरेमें ज्ञानकी पराकाष्ठा आ गई। ज्ञानका यह लक्षण है। तत्काल कालीकिशोरके अंदर मंत्रजप होने लगा तथा श्रीस्वामीजीके ज्ञान भरे शब्द उनके अंदर ज्ञानशक्तिका संचार करने लगे। वे एक अपूर्व अनिर्वचनीय आनंदका अनुभव करने लगे। उनके मन और शरीरमें बडा बल संचारित हो गया। तथा हृदय आनंदसे परिपूर्ण हो गया और एक सहज अव्यक्त ज्ञान उत्पन्न हुआ।

श्रीनारायणतीर्थांकडून श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थांना शक्तिसंक्रमण :–

श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थांचे पूर्वाश्रमीचे नांव रोहिणीकुमार होते. त्यांना श्रीनारायणतीर्थमहाराजांकडून दीक्षा कशी झाली व अनुभव काय आले याचे वर्णन योगविभूतीं या पुस्तकांत स्वामींशिवोम्तीर्थमहाराजांनी केले आहे.

सन १९१० के मार्गशीर्ष द्वितीयाको रोहिणीकुमार की दीक्षा हुई। पहले दिन उन्हें मूलाधारमें वामावर्त घुमावटमें एक पेच खुलतासा प्रतीत हुआ। आगे घर जाकर कमरेमें आसनपर बैठकर जप करनें लगे। शीघ्रही बाह्य ज्ञान लुप्त हो गया। किंतु अंर्तज्ञान बना रहा। जिसप्रकार बांस कीं नलीमें कोई वस्तु ऊपर नीचे चलती है ऐसेहीं प्राणशक्तिका चालन नीचेसे ऊपर और ऊपरसे नीचे अनुभवमें आने लगा। जब शक्ति ऊपरसे नीचे उतरती तो मुलाधार में खट् सा शब्द होता और फिर कुछ ऊपर चढता हुआसा प्रतीत होता। शक्तिके इस प्रकार चढने उतरनेकी क्रिया पर आपका मन एकाग्र हो गया। साथही साथ श्वास-प्रश्वास प्रक्रिया भी अंदर बाहर न होकर अंदरही अंदर हो रहीं थीं। थोडीही देरमें फिर बाह्य ज्ञान लुप्त हो गया। और अंतमें स्वतः जप होने लगा। देखा, एक अपूर्व ज्योति नभसे भूतक फैली हुई है। और फिर उसीके अंदर अपनी मंत्रप्रतिपादित शक्ति प्रकट हो गई। दर्शन करके शरीर पुलकित हो गया और रोमांच हो उठा – "अहा! कैसा दिव्य रूप और अपूर्व ज्योति है।"

थोडी देरके बाद आप उसी भावावस्थामें उठ बैठें और बाहर निकल आये। ऐसा अनुभव हुआ कि सकल दृश्यमान् जगत् मधुमय है। जिधर जिधर और जहाँ जहाँ दृष्टि जाती सब मधुमयही प्रतीत होता। मंदिरके सामने आमका पेड, बगीचेमें लगे नानाविधी पुष्प, मकान, खेत, सब मधुमय जीवन धारण किये दिखाई दे रहे थे। कौएकी आवाज भी मधुर सुनाई दी। ऐसा लग रहा था जैसे सर्वत्र आनंद की धारा प्रवाहित हो रही हो।

याचप्रकारे श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराजांकडून श्रीलोकनाथ-तीर्थस्वामीमहाराजांना व त्यांच्याकडून माझे गुरुदेव परमपूजनीय श्रीगुळवणी महाराज यांना शक्तिपात महायोगाची दीक्षा मिळाली. गुरुदेवांनी हिंदुस्थानांतील हजारो साधकांना ही दीक्षा देऊन परमेश्वर-प्राप्ती सुलभ करून दिली आहे व आजही देत आहेत.

श्रीगुळवणीमहाराजांना श्री प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराजांकडून स्वप्न व प्रत्यक्षदीक्षा :–

माझे सद्गुरू योगीराज श्रीसंत गुळवणी महाराज यांना श्री प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज यांच्याकडून स्वप्नात व मागाहून प्रत्यक्ष रीतीने शक्तिपातयोगदीक्षा कशी झाली याचे वर्णन श्री अच्युत सिद्धनाथ पोटभरे यांनी स्वामींच्या "चैतन्य चक्रवर्ती" या चरित्रात पुढीलप्रमाणे मोठ्या रसाळ व आकर्षक पद्धतीने केले आहे.

"१९२२ साली श्रीगुरुदेव प्राणायामाने कुंडलिनी शक्ती जागृत करण्यासाठी हुशंगाबाद येथे जाऊन राहिले होते. तेथेच त्यांची स्वामींशी भेट झाली. त्यांनी स्वामींना योगदीक्षा मागितली. त्यावेळी स्वामी म्हणाले, "वेळ आल्यावर दीक्षा जरूर होईल." त्यामुळे स्वामींच्या कृपेची वाट पाहाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. परंतु त्यांना फार दिवस वाट पाहावी लागली नाही.

"१९२२ सालातील कार्तिक कृष्ण एकादशीस पहाटेच्या वेळी श्रीगुरुदेवांना एक स्वप्न पडले. हुशंगाबादेच्या निवासस्थानात श्रीगुरुदेव बसले आहेत. स्वामीजी पलंगावर बसलेले आहेत. स्वामीजी एकदम उभे राहिले आणि हळूहळू श्रीगुरुमहाराजांकडे येऊ लागले. स्वामींच्या मुखावरील तेज तळपू लागले. भगव्या वस्त्रांनी व भस्मांकित भालप्रदेशाने संपूर्ण घरभर दिव्यतेज पसरले होते. स्वामी श्रीगुरुमहाराजांच्या जवळ येऊन एकटक रोखून पाहात म्हणाले, "वामन! बैस तुला आताच येथे दीक्षा होईल. बघ तुझी कुंडलिनी शक्ती जागृत होते की नाही!

स्वामींचे बोलणे संपते न संपते तोच श्रीगुरुमहाराजांचे भान हरपले. तेवढ्यात स्वामींचे आणखी एक वाक्य त्यांच्या कानावर पडले. ते म्हणाले, "डोळे मिट." असे म्हणता म्हणताच स्वामीनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. आज्ञाचक्राला अंगुलीस्पर्श केला. मेरुदंडावरून खालून वर हात फिरविला. मुलाधारापासून सहस्त्रारा-पर्यंतचा मार्ग मोकळा केला. श्रीगुरुमहाराजांना खूप मोकळे वाटले. हळूहळू त्यांना क्रिया सुरू झाल्या. क्रियांचा वेग जेव्हा खूप वाढला तेव्हा झोप आपोआप संपून डोळे उघडले गेले. पुढे पाहातात तो स्वामी समक्षच पलंगावर ध्यानमग्न अवस्थेत बसलेले दिसले. उत्तररात्रीची वेळ होती. स्वप्न चांगले होते. चांगले स्वप्न पडले की झोपू नये असे शास्त्र असल्याने श्रीगुरुमहाराज झोपले नाहीत. या स्वप्नाची प्रचीती आपल्याला प्रत्यक्षात येऊन जीवित धन्य व्हावे अशी ओढ लागून त्यांच्या मनात खूप विचार मंथन झाले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी स्वामीजी फिरून आल्यावर पंलगावर बसले. श्रीगुरुदेव त्यांच्या समोरच बसले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे मित्र व आईही तेथे होती. त्यावेळी स्वमीजींनी श्रीगुरुदेवांची विचारपूस सुरू केली. स्वामीजीनी प्राणायामाच्या अभ्यासाने काही लाभ होतो का? व कुंडलिनीशक्तीची जागृती व्हावी या उद्देशाने प्राणायामाचा अभ्यास सुरू केला होता त्याचे काय झाले? असे विचारले. त्यावर श्रीगुरुमहाराज म्हणाले, शरीर हलके वाटते, यापेक्षा सांगण्यासारखा विशेष लाभ जाणवत नाही व अजून शक्तीची जागृती काही झाली नाही. हे उत्तर ऐकून स्वामी म्हणाले, किती कष्ट पडतात हे! हे कष्ट पाहूनच मला तुझी दया येते. तू फार सहनशील आहेस हे खरे. पण असे कष्ट किती दिवस करीत बसणार? त्यावर श्रीगुरुमहाराज म्हणाले, आपली कृपा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत असे कष्ट करणे भागच आहे. आपल्या कृपेने मला काही अनुभव येईल का? हे ऐकल्याबरोबर स्वामीजी एकदम म्हणाले, अरे! अनुभव का येणार नाही? सूर्य पाहाण्यासाठी दिवटी का न्यावी लागते? हातातल्या कांकणासाठी आरसा थोडाच लागतो? तुला अनुभवच घ्यावयाचा आहे ना? मीट डोळे नि घे अनुभव!

स्वामींनी सांगितल्याप्रमाणे श्रीगुरुदेवांनी डोळे मिटले. त्याबरोबर शक्तिसंचार सुरू झाला. त्या आदिमाया कुंडलिनीच्या जागृतीने त्यांना बेभान करून टाकले. विद्युल्लतेनें मेघपंक्तीना चिरून टाकावे व जणू काही आकाश फाडून टाकावे असा प्रचंड शक्तिसंचार गुरुदेवांच्या ठिकाणी

झाला. मुसळधार जलवृष्टीने व झंझावाती वाऱ्याने प्रलय करावा तसा तो शक्तिसंचार होता. पर्वतप्राय उसळणाऱ्या सागरी लाटांनी आकाश-पाताळ एक करून टाकावे असे त्याचे रौद्रस्वरूप होते. साऱ्या त्रिभुवनाला घुसळून टाकणारी महानशक्ती जागृत झाली होती.

प्राणायामाने शुद्ध झालेल्या शरीरात नानातऱ्हेच्या क्रियांचा तीव्र आवेश होत होता. शरीर इकडून तिकडे उसळून पडत होते. उंच उंच उसळत होते. अक्षरशः जमिनीपासून दीडदीड फूट उंच सर्व शरीर एखाद्या चेंडूसारखे उसळत होते. काही वेळाने ही क्रिया कमी झाल्यावर बंधत्रय लागला आणि भस्त्रिका सुरू झाली. श्वासोच्छवासाचा वेग वाढत चालला. श्वासांच्या क्रियांनी पुन्हा सर्व शरीराला घुसळून काढले. श्रीगुरुमहाराजांचे अशाप्रकारे एकतास साधन झाले. स्वप्नाप्रमाणे प्रत्यक्ष दीक्षानुभव आल्याने त्यांना समधान वाटले.

येथपर्यंत जी उदाहरणे दिली आहेत. त्यावरून हे स्पष्ट होते की, शक्तिपात योग ही वैदिक साधना आहे. तत्काल अनुभव देणारे व ब्रह्म-प्राप्ती सुलभ करणारे इतके प्रभावी साधन दुसरे नाही. भगवद्भक्तीचा उन्मेश हे शक्तिपाताचे मुख्य लक्षण आहे. नुसत्या पौरुषप्रयत्नाने भगवत्-प्राप्ती होणे शक्य नाही. यासाठी शक्तिपात हा झालाच पाहिजे. यालाच भगवंताचा अनुग्रह किंवा कृपा असे म्हणता येईल.

[आधार दहावा]

★ शक्तिपातयोगाची साधनसंपत्ती ★

१) साधनसंपत्तीचा महिमा

२) साधनसंपत्तीच्या समुच्चयाची अपरिहार्यता

३) गुरुभक्ती– अ) गुरू शब्दाचा अर्थ
ब) गुरुतत्त्व म्हणजे काय ?
क) गुरूचे खरे स्वरूप व कार्य—
श्री) अनुग्रह करणे
ना) आनंदाची मंगलमय अनुभूती
रा) योग्यशिष्याचा उद्धार व
अयोग्याला योग्य करणे
य) समभावसंपन्नता
णा) दुःखनिवृत्ती
य) शक्तिजागरण
न) ज्ञानदान
मः) दिव्यचक्षूंचे उन्मीलन
ड) आदर्श गुरूची लक्षणे
द) अनुभूतीची प्राप्ती
त्त) विविध गुण
इ) सत् शिष्याची लक्षणे
रा) शरणागती
म) विविध गुण

ई) गुरुभक्तीचा उच्च आदर्श

भ) पादुकापूजन

वा) सेवा

नी) साधनरतता

उ) गुरुशिष्यसंबंधाची परिणिती

४) साधनचतुष्टय- ए) नित्यानित्यवस्तुविवेक

ऐ) वैराग्य

ओ) शमादिषट्संपत्ती

श्री) शम

कृ) दम

ष्णा) उपरती

य) तितिक्षा

न) श्रद्धा

मः) समाधान

औ) मुमुक्षुता

५) यम व नियम–श्री) अहिंसा

गो) सत्य

पी) अस्तेय

ज) आर्जव

न) क्षमा

व) धृती

ल्ह) अपरिग्रह

भा) दया

य) शौच

न) आहार

मः) ब्रह्मचर्य

नियम–द) संतोष

त्ता) तप

त्रे) साधनाभ्यास

य) ईश्वरप्रणिधान

६) विविधगुणयुक्त साधनसंपत्ती

श्री) शास्त्रावर निष्ठा

पा) साधनावर विश्वास

द) साधनातील विघ्ने



शक्तिपातयोगसाधनेने आध्यात्ममार्गाची वाटचाल करणाऱ्या किंवा करू इच्छिणाऱ्या प्रत्येक साधकाला असे वाटत असते की आपले मन लवकरात लवकर एकाग्र व्हावे. विषयांचा विसर तत्काल पडावा, इंद्रियांचे चांचल्य त्वरित नाहीसे व्हावे. मनाचे मनपण अविलंब संपावे व त्याची हाव शीघ्र नाहीशी होऊन ते हृदयात विलीन होऊन जावे. काही काही साधकाना तर असे वाटते की साधन सुरू झाल्याबरोबर मनातील सर्व विचार संपून अत्यंत शीघ्रतेने मन एकाग्र व्हावे व ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन अनिर्वचनीय सुखाचा लाभ व्हावा. शक्ती जागृत झाल्यावर ती एकदम सहस्त्रारात पोहोचावी व समाधी लागावी. परंतु प्रत्यक्षात असे एकदम घडत नाही. हे असे का होते ? याचे कारण असे आहे की साधकाजवळ पुरेशी साधन संपत्ती नसते. जर शास्त्राने सांगितलेली फले पूर्णांशाने मिळावी असे वाटत असेल तर तितक्याच दर्जाची साधकाची तयारीही अपेक्षित असते.अन्यथा परिणामात साधनसंपत्तीच्या न्यूनाधिक्याने तफावत दृष्टीस पडते. या दृष्टीने प्रथम साधनसंपत्तीचा महिमा पाहून मग प्रत्यक्ष साधनसंपत्तीकडे वळू.

साधनसंपत्तीचा महिमा : –

साधनसंपत्तीचे पहिले वैशिष्टय हे आहे की ही संपत्ती जर साधकाजवळ नसेल तर त्याची एखाद्या भिकाऱ्यासारखी स्थिती होते. श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांनी एकवीस समासीच्या पाचव्या अध्यायात असे म्हटले आहे की –

" अथवा गुरु पूर्ण कृपा करी । शिष्य जाहला अनधिकारी । भाग्य पुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ५ ॥ तैसे एकाविण एक । होतसे निरर्थक । परलोकीचे सार्थक । ते तरी दुरावे ॥ ६ ॥ म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथे न लागती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे एक सरा ॥ ७ ॥

गुरू आपली शक्ती शिष्याच्या ठिकाणी संक्रमित करून त्याच्यावर पूर्ण कृपा करतात. परंतु साधनसंपत्तीच्या अभावी शिष्याचा अधिकार कमी पडल्याने त्याची स्थिती श्रीमंत माणसाच्या भिकारी मुलासारखी होते. गुरू शिष्यावर कृपा करताना पूर्ण कृपाच करतात. परंतु शिष्याच्या योग्यतेनुसारच कृपास्वीकृतीचे प्रमाण स्वाभाविकपणे निश्चित होत जाते. ज्या जीवाचा जसा अधिकार असतो तसा त्याला लाभ होतो. सद्गुरूंच्या कृपारूप गंगेचा प्रवाह वाहात असूनही साधकाचे भांडे लहान असल्याने, त्याची झोळी फाटकी असल्याने व त्याची पूर्वजन्माची तितकी तयारी नसल्याने त्याला पूर्ण समाधान मिळत नाही. अधिकारी गुरू व अधिकारी शिष्य असल्याशिवाय संपूर्णांशाने फलनिष्पत्ती होत नाही व सर्व गोष्टी निरर्थक होतात. शिष्याची इच्छा तयारी अभावी अपूर्ण राहाते. जीवनाचे सार्थक घडले नाही असे त्याला वाटते. परंतु ज्यावेळी सद्गुरू व सच्छिष्य एकत्र येतात त्यावेळी कसलेही श्रम पडत नाहीत. त्रास होत नाही. आपल्याला चांगला अधिकारी शिष्य मिळून परंपराप्राप्त ज्ञानाचे संक्रमण होऊन बोधाची अतुट परंपरा सिद्ध व्हावी ही सद्गुरूंची इच्छा पूर्ण होते व आपल्याला सद्गुरूंकडून ब्रह्मज्ञान प्राप्त व्हावे ही शिष्याची आकांक्षा सफल होते. यावरून हे स्पष्ट दिसते की शक्तिपातयोगाचे जे फल शास्त्राने सांगितले आहे ते प्राप्त होण्यासाठी शिष्य हा साधनसंपत्तीचा अधिकारी पाहिजे.

साधनसंपत्तीच्या समुच्चयाची अपरिहार्यता :–

विमलज्ञानप्राप्तीसाठी साधनसंपत्तीच्या समुच्चयाची उपस्थिती नितांत आवश्यक आहे असे श्रीसमर्थांनी दासबोधाच्मा पाचव्या दशकाच्या तिसऱ्या समासात पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

म्हणोनि साधन अभ्यास आणि सद्गुरु । सच्छिष्य आणि सच्छास्त्र विचारु । सत्कर्म आणि सद्वासना पारु । पाववी भवाचा ॥ १२ ॥ सदुपासना आणि सत्कर्म । सच्छिष्य सत्क्रिया आणि स्वधर्म । सत्संग आणि नित्यनेम । निरंतर ॥ १३ ॥ ऐसे हे अवघेचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे । नाही तरी पाषांड संचरे बळे । समुदायी ॥ १४ ॥

श्रीसंत तुकाराम महाराजांनीही ज्ञानप्राप्तीसाठी, गुरुकृपेसाठी व त्रिगुणातीत होण्यासाठी साधनसमुच्चयाची नितांत आवश्यकता आहे हे दोन अभंगात सांगितले आहे.

साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाही ॥१॥ लोलुप्यता काय निद्रेसी जिंकावे । भोजन करावे परिमित ॥ २ ॥ एकांती

लोकांती स्त्रियांशी भाषण । प्राण गेल्या जाण करु नये ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ४ ॥

अभंग दुसरा –

निर्वाहापुरते अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा ॥१॥ कोठेही चित्तासी नसावे बंधन । हृदयी नारायण साठवावा ॥ २ ॥ नये बोलो फार बैसो जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रिये दमी ॥ ३ ॥ तुका म्हणे घडी घडीने साधावी । त्रिगुणाची गोवी उगवोनि ॥ ४ ॥

हठयोगप्रदीपिकेतही योगाभ्यास प्रतिबंधक गोष्टींचा उल्लेख करून साधनसंपत्तीचा महिमा सूचित केला आहे.

अत्याहारः प्रयासश्च प्रजल्पो नियमग्रहः । जनसंगश्च लौल्यंच षड्भिर्योगो विनश्यति ॥ वर्जयेद् दुर्जनप्रांतं वन्हीस्त्रीपथिसेवनम् । प्रातःस्नानोपवासादि कायक्लेशविधिं तथा ॥

भूकेपेक्षा जास्त भोजन करणे, व्यायामादी खूप श्रम करणे, अतिशय बोलणे किंवा बडबडणे, प्रातःकालचे स्नान, फलाहार, नक्त इत्यादी नियम व बंधने स्वतःवर लादून घेणे, लोकांच्या संगतीत राहाणे व लोलुपता असणे या सहा गोष्टी घडल्या की योगाचा नाश होतो. यासाठी साधकाने उपरोक्त निषेधादी गोष्टी टाळून साधन केले पाहिजे.

साधकाने दुःसंगती टाळावी. दुर्जनाशी प्रीती करू नये. वाईट जागी जाऊ नये. अग्नीपाशी बसून सतत शेक घेऊ नये. अत्यंत कामासक्त व स्त्रीसक्त असू नये. फार चालू नये. प्रातःस्नान करू नये. अत्यंत कडक उपवास करू नयेत. फार कष्टाचा व्यायाम करू नये. अर्थात आपापल्या वर्णाश्रमधर्माशी, शरीरप्रकृतीशी, स्वभावाशी प्राप्तपरिस्थितीशी व देशकाल वर्तमानाशी मेळ घालून नियमांचे पालन करावे.

श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनीही **"परी हे तरीच घडे । जरी संयमाची अखंडे । सर्वद्वारी कवाडे । कळासती ॥ ८.११२ ॥ हे सर्वस्व आमुचे गूढ । परि दाविले तुज उघड । आता इंद्रिया देऊनी कवाड । हृदयी भोगी ॥ ९.१३५ ॥ हा दशु जव न ये हाता । तंव माझे साचोकारपण पार्था । न संपडे गा सर्वथा । जेंवि तुषी कणु ॥ १३६ ॥** असे सांगून साधनसंपत्तीचा महिमा गायिला आहे.

गुरुभक्ती : –

शक्तिपातयोगाच्या साधनसंपत्तीत गुरुभक्तीला अनन्यसाधारण

महत्त्व आहे. कारण गुरुभक्ती हा साधनसंपत्तीच्या सर्व गुणातील सर्वश्रेष्ठ गुण आहे. श्रुती, स्मृती, पुराणे, अवतारी पुरुष, ऋषी, मुनी, संत, महंत यांनी शेकडोशे प्रकारे व अनंत पद्धतीने गुरुभक्ती या एकाच विषयाचे माहात्म्य सांगितले आहे. गुरुभक्तीच्या असामान्य महिम्याने, श्रेष्ठत्वाने, भव्यत्वाने, दिव्यत्वाने व अलौकिकत्वाने प्राप्त झालेल्या अनुभूतीच्या वैभवाने या सर्वांना इतकी मोहिनी घातलेली दिसून येते की या विषयाचे वर्णन करताना त्यांच्या प्रतिभेचे जे नवनवीन उन्मेष प्रकट झालेले दिसतात त्यामुळे मन स्तिमित होऊन जाते. गुरुभक्तीचे सामर्थ्य ज्यांनी ओळखले व यांच्या कृपेच्या वर्षावात जे न्हाऊन निघाले त्या त्या सर्वांनी गुरुभक्ती या एकाच विषयाला अत्युच्च स्थान देऊन आपले वाङ्मयकौशल्य पणाला लावल्याचे दृष्टिगोचर होते. भारतीय वाङ्मयाच्या कानाकोपऱ्यात या दिव्य विषयाचे वैभव आपला रंग उधळीत असल्याचे पाहिले की याचे अपरंपार महत्त्व लक्षात आल्यावाचून राहात नाही. या विषयाच्या रंगामध्ये खूप विविधता आहे. त्या विविधतेचे दर्शन साधकाला होणे जरूर आहे. कारण हा सद्गुरुमहिमा अंतरंगात बिंबला म्हणजे " **ऐसा माझा सद्गुरुस्वामी । तोडोनि टाकिली माझी मी मी । आपुलिया निजपदयुग्मी । ऐक्यता केली ॥** ह्या समर्थोक्तीप्रमाणे धन्योद्गार निघून जीवन सर्वार्थाने कृतार्थ होते.

सद्गुरूचा हा महिमा भारतीय संकृति और साधना या ग्रंथातील मनुष्यत्त्व या लेखात म. म. श्रोगोपीनाथ कविराज यांनी फार सुंदर वर्णन केला आहे. ते म्हणतात, " भगवान् शंकराचार्यांनी देखील महापुरुषांच्या आश्रयाचा महिमा मुक्तकंठाने गायिला आहे. ते महापुरुष म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून सद्गुरूच होत. असे हे मानव देहधारी सद्गुरूच भ्रांत जीवांना आपल्या मूळ स्वरूपाकडे पोहोचते करून त्यांना चैतन्यरूप करणारे खरे अधिकारी असतात. एखाद्या साधकाला दुर्लभ असे तीव्र वैराग्य, तीव्रतर निवृत्तीभाव व मुक्तीची तीव्रतम आकांक्षा पूर्वपुण्याईने उत्पन्न झाली तरीसुद्धा त्याने अत्यंत दुर्लभ अशा सद्गुरुकृपेची प्राप्ती करून घेणे अगदी अपरिहार्य व आवश्यक ठरते. भ्रांत जीवांना ब्रह्मानंद प्राप्त करून देण्याचा हा अधिकार देवतांनाच काय! परंतु मुक्त पुरुषांनाही असत नाही. एकमात्र सद्गुरूच हे कार्य करू शकतात."

साधकाला सद्गुरूचा शोध करीत फिरावे लागत नाही. मात्र कधी कधी आपल्या कर्मक्षयासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. मग वेळ आली की सद्गुरू स्वतः मुमुक्षू जीवांना दर्शन देतात. (**ऐशी कर्म-**

साम्यदशा । होय तेथ वीरेशा । मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ।। **ज्ञानेश्वरी १८-९६६ ।।**) सद्गुरूशिवाय कोणताही जीव मार्गप्राप्ती करू शकत नाही. मग मार्गक्रमण करणे तर फार दूर राहिले. त्यांच्या आश्रयाशिवाय मार्गावर चालण्याची शक्ती कोणाही जीवामध्ये नसते. इतकेच नव्हे तर महालक्ष्मीचा साक्षात् परिचय त्यांच्याशिवाय इतरांना असत नाही. जीव अल्पज्ञ असल्याने मायेमुळे मोहित होऊन दिग्भ्रांत झाल्यामुळे अनंत जन्म भटकतच राहातो. त्यामुळे सद्गुरूची प्राप्ती होणे मोठे दुष्कर ठरते. सद्गुरू हे वास्तविक श्रीभगवानच असतात. श्रीगुरूंच्या अनुग्रहशक्तीलाच गुरुपद म्हणतात. ते उपेय आहेत, म्हणजे उपायांच्या सहयोगाने त्यांची प्राप्ती होते. परंतु सद्गुरूच प्रत्यक्ष उपाय आहेत. त्यांनी भ्रांत जीवांना आपल्याकडे येण्याचा मार्ग जर दाखविला नाही तर त्यांना शोधून काढणे केवळ अशक्य असते. सद्गुरूच मार्ग आहेत व त्या मार्गावरून जाताना शेवटचे पोहोचावयाचे ठिकाणही तेच आहेत. हा मार्ग मोठा आहे का लहान हे सुद्धा तेच, फक्त तेच, एकमात्र जाणू शकतात. त्यांचा अनुग्रह झाला की अत्यंत मोठा मार्गही छोटा होतो. त्यांचा अनुग्रह जर झाला नाही तर अत्यंत लहान मार्गही मोठा आहे असे वाटू लागते. मात्र ज्यावेळी साधकावर महान अनुग्रह होतो त्यावेळी एका क्षणात सर्व मार्ग अदृश्य होतो. मग एकमात्र स्वयंप्रकाश सद्गुरूच अखंड भावाने विराजमान होतात"

गुरू शब्दाचा अर्थ :–

सरस्वती गंगाधराने लिहिलेल्या श्रीगुरुचरित्र या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात गुरू शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

कली विनवी ब्रह्मयासी । गुरु शब्द म्हणजे आहे कैसी । कवण गुरु स्वरुप कैसी । विस्तारावे मजप्रती ।। २.१२८ ।। ऐकोनी कलीचे वचन । ब्रह्मा सांगतसे आपण । ग कार म्हणजे सिद्ध जाण । रेफः पापस्य दाहकः ।। १२९ ।। उ कार विष्णू अव्यक्त । ब्रह्मरुद्र गुरु निश्चित । त्रितयात्मक श्रीगुरु सत्य । म्हणोनी सांगे कलीसी ।। १३० ।।

कलीने ब्रह्मदेवास विनंती केली की आपण मला गुरू शब्दाचा अर्थ समजावून सांगावा. त्यावेळी ब्रह्मदेवाने सांगितले की गुरू या शब्दातील 'ग' ह्या शब्दाने गुरू हा सिद्ध असतो हे सूचित केले आहे. दुसऱ्या 'र' ह्या शब्दाने असे सूचित केले आहे की शक्तिपात करून शिष्याच्या पापाचे दहन करण्याचे अद्भुत सामर्थ्य गुरूच्या ठिकाणी असते. अव्यक्त ब्रह्म विष्णू, ब्रह्मदेव व रूद्र यांच्या रूपाने साकार

झालेले दिसते. त्या तिघांचेही सामर्थ्य गुरूमध्ये सामावलेले असते असे 'उ' कार या तिसऱ्या शब्दाने सूचित होते.

गुरुगीतेमध्ये गुरू या शब्दाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

गुकारस्त्वंधकारस्य रुकारस्तेज उच्यते । अज्ञानग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः ॥ २३ ॥ गुकारः प्रथमो वर्णो मायादिगुणभासकः । रुकारो द्वितीयो ब्रह्म मायाभ्रांतिविनाशनम् ॥ २४ ॥

'गु' कार म्हणजे अज्ञानरूपी अंधकार होय, 'रू' कार म्हणजे प्रत्यक्ष तेज किंवा सूर्य होय. स्वयंप्रकाश तेजासमोर एक क्षणभरसुद्धा अंधार टिकू शकत नाही. त्याप्रमाणेच गुरूच्या पुढेही अज्ञान टिकू शकत नाही. म्हणून गुरू हे अज्ञान नाहीसे करणारे ब्रह्मस्वरूप असे आहेत यात तिळमात्र शंका नाही. मायादी गुण दाखविणारा 'गु' हा प्रथम शब्द असून 'रू' हा दुसरा शब्द ब्रह्मानंद निदर्शक असून तो मायेचा नाश करणारा आहे.

गुरू शब्दाचा अर्थ आपण पाहिला. त्या शब्दाचे सामर्थ्य श्रीश्रीगुरुतत्रम् या पुस्तकात पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

गकारोच्चारमात्रेण ब्रह्महत्या विनश्यति । उकारोच्चारतोदेवि मुच्यते जन्मपातकात् ॥ ३२ ॥ रेफोच्चारमात्रेण उकारोच्चारणात्पुनः । विसर्गोच्चारणात् कोटिजन्मगं पातकं हरेत् ॥ ३३ ॥

'ग' काराच्या उच्चारानें ब्रह्महत्येचे पाप नष्ट होते. 'उ' काराच्या उच्चाराने जन्मभर केलेल्या पापापासून मनुष्य मुक्त होतो. रेफ, उकार व विसर्ग या तीन वर्णांच्या उच्चाराने कोटीकोटी जन्मांची पापे नाश पावतात.

गुरुतत्त्व म्हणजे काय :—

गुरुतत्त्व म्हणजे ईश्वरी तत्त्वच होय. या ईश्वरीतत्त्वाचा साक्षात्कार गुरुरूपाने कसा होतो हे कुलार्णव तंत्राच्या १३ व्या उल्लासात पुढीलप्रमाणे सांगितले आहे. "परमात्मा शिव, अनंत, अव्यय, अज, निष्कल, व्योमाकार, मनरहित व सर्वत्र सूक्ष्म रूपाने असतो. त्यामुळे त्याची पूजा करणे शक्य होत नाही. यासाठी साक्षात् शिवच गुरुरूपाचा आश्रय करून भूलोकावर वावरतो. त्यामुळे भक्तिद्वारा त्याचे पूजन करता येते. या भक्तीमुळे तो संतुष्ट होऊन भुक्ती व मुक्ती देतो. परमेश्वरी तत्त्वाने युक्त असलेली शिवरूप आकृती मनुष्याला दृष्टिगोचर होऊ शकत नाही. यासाठी शिवशंकर स्वत: गुरुरूप धारण करून युगायुगात शिष्यांचे रक्षण व उद्धार करतात.

साक्षात् परशिवच स्वतः आपल्या शिष्यांवर अनुग्रह करण्याकरिता मनुष्यरूपाच्या आवरणाखाली पृथ्वीवर संचार करीत असतात. हे परम शिवतत्त्व अत्यंत निरामय असूनसुद्धा सद्भक्तांचे व साधकांना मार्गदर्शन करण्याकरिता व शक्तिपातयोगाची दीक्षा देण्याकरिता गुरुरूपाने साकार होऊन आपल्या कृपेचा साठा मुक्त हस्ताने देत एखाद्या संसारी माणसाप्रमाणे राहाताना दृष्टोत्पत्तीस येते. जे लोक पापी असतात ते गुरुतत्त्वाला समजू शकत नाहीत. त्यांची दृष्टीच अगदी संकुचित असते परंतु जे लोक पुण्यवान असतात त्यांना गुरुतत्त्वाच्या रूपाने साकार झालेले शिवतत्त्व ज्ञात होते.

ज्याप्रमाणे आंधळा मनुष्य उगवलेल्या सूर्याला पाहू शकत नाही त्याप्रमाणे साक्षात् परमतत्त्वस्वरूप श्रीगुरू दृष्टिसमोर वावरत असूनसुद्धा भाग्यहीन माणसांना त्यांचे खरे स्वरूप कळत नाही. हे अगदी नितांत व त्रिकालाबाधित सत्य आहे की गुरू अगदी साक्षात् सदाशिवस्वरूपच असतात. याबद्दल कसलीही शंका बाळगण्याचे कारण नाही. सद्गुरू हे अशाप्रकारे सदाशिवतत्त्वस्वरूप नसते तर त्यांच्यात भुक्ती व मुक्ती देण्याचे सामर्थ्य आले नसते याकरिता सदाशिव व श्रीगुरू या दोघांमध्ये कोणताही भेद असत नाही. ते तत्त्वतः एकच असतात. या अर्थानेच शास्त्रात असे म्हटले आहे की –

यस्मान्महेश्वरः साक्षात् कृत्वा मानुषविग्रहम्। कृपया गुरुरूपेण मग्नाः प्रोध्दरति प्रजाः॥

प्रत्यक्ष महेश्वरच मनुष्यरूप धारण करून गुरुरूपाने मायामग्न जीवांवर कृपावर्षाव करून त्यांचा उद्धार करतो. ही गोष्ट अन्यथा दुसऱ्या कोणालाही शक्य नाही कारण एक बद्धजीव दुसऱ्या बद्धजीवाचा उद्धार करू शकत नाही.

गुरूचे खरे स्वरूप :–

गुरूचे खरे स्वरूप काय असते हे आता पाहावयाचे आहे. गुरूच्या वास्तविक कार्यावरून त्याचे स्वरूप, महिमा व अध्यात्म जीवनातील त्याच्या स्थानाची निश्चिती होणार असल्याने गुरूच्या खऱ्या कार्याचा परिचय करून घेऊ.

अनुग्रह करणे –

शरण आलेल्या शिष्यावर शक्तिपातयुक्त दीक्षानुग्रह करणे हे सद्गुरूचे खरे कार्य आहे. असा दीक्षानुग्रहयुक्त शिष्य साधनसंपन्न होऊन

कृतकृत्य होतो. या अनुग्रहामुळेच आनंदाची मंगलमय अनुभूती, योग्य-शिष्याचा उद्धार व अयोग्याला योग्यता देऊन उद्धार, समभावसंपन्नता दु:खनिवृत्ती, ज्ञानदान, शक्तिजागरण, भाव-भक्तिदान, दिव्यचक्षूंचे उन्मीलन इत्यादी सर्व कार्ये आपोआप घडून येतात. एका अनुग्रहातच ही कार्ये अनुस्यूत असतात. ही कार्ये म्हणजे सद्गुरूंनी शिष्यावर केलेल्या दिव्य दीक्षानुग्रहाचे एकएक अलौकिक व अद्भुत पैलूच आहेत. त्यांचे स्वतंत्र दर्शन आपण क्रमश: घेणार असलो तरी शक्तीच्या जागृती शिवाय ही कार्ये कधीही घडून येणे शक्य नाही हे विसरता कामा नये. या अर्थानेच कुलार्णवतंत्राच्या १४ व्या उल्लासात अगदी निक्षून सांगितले आहे की –

शक्तिपातानुसारेण शिष्योऽनुग्रहमर्हती । यत्र शक्तिर्न पतति तत्र सिध्दिर्न जायते ॥ ८ ॥

शक्तिपाताच्या मार्गानेच शिष्याला खराखुरा अनुग्रह होत असतो. ज्या अनुग्रहामध्ये शक्तीचा पात म्हणजे शक्तिसंक्रमण होऊन शक्ती जागृत होत नाही त्या ठिकाणी मोक्षसिद्धी कदापीही होऊ शकत नाही. त्याचप्रमाणें उपरोक्त कार्येही संपन्न होत नाहीत. यामुळे ज्याच्याजवळ शक्तिपातानुसार शिष्याला अनुग्रह देण्याचे सामर्थ्य असत नाही त्या गुरुकडून शिष्याचे मंगल होणे कधीही शक्य नाही. कुणी कितीही सांगितले व शब्द जंजाळाने भुलविले तरी त्या अनुग्रहात अनुभूती देण्याचे सामर्थ्य नसते. असा अनुग्रह हा कवडीमोल किंमतीचा ठरतो. यासाठी उपासनेचा मार्ग व दीक्षेचा प्रकार कोणताही असला तरी ज्यावेळी परंपराप्राप्त सामर्थ्याने सद्गुरू शिष्यावर शक्तिपात करतात तेव्हा आत्माज्ञानाची प्राप्ती होऊन शिष्य मोक्षाधिकारी होतो.

हा शक्तिपातानुग्रह ईश्वर, गुरुरूपाने शिष्यावर करून त्याच्या सर्व बंधनांचा नाश कसा करतात हे कुलार्णवतंत्राच्या १४ व्या उल्लासात पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. " गुरूच उपदेश करणाऱ्याचे रूप ग्रहण करून जीवाच्या बंधनांना अगदी मुळापासून उखडून तोडून टाकून परमपद प्राप्त करून देतो. याचे कारण असे आहे की सर्वांवर अनुग्रह करणारा करुणानिधी ईश्वरच आचार्यरूप धारण करून दीक्षेच्या द्वारा जीवांना मुक्तीचा मार्ग मोकळा करून देतो.

श्रीगुरुच्या या अनुग्रहरूप मूळ कार्याचा महिमा 'अध्यात्मजीवनमें गुरूका स्थान' या लेखात श्री गोपीनाथ कविराज यांनी विस्तृतपणे वर्णन केला आहे. त्याचा सारांश पाहू. " अनादी कालापासून अनंत जीव

मुक्तीची प्रतीक्षा करीत आले आहेत. मात्र जीवावर असे एक आवरण आहे की ते अनादी कालापासून विद्यमान असल्यामुळे जीव मुक्त होऊ शकत नाही. या आवरणालाच जीवत्व किंवा पशुत्व म्हटले जाते. याचेच नाव मल आहे. हे आवरण किंवा मल जर जीवावर राहिला नसता तर जीवाला शिवरूपत्वच प्राप्त झाले असते व त्याचे पशुरूपत्व नाहीसे झाले असते. जीव, शिव व्हावा म्हणून श्रीगुरूचा जेव्हा अनुग्रह होतो तेव्हा शक्ती सक्रिय होते व हा भेद मिटावा म्हणून प्रवृत्त होते. ही शक्ती किंवा पराशक्ती परशिवाची स्वतःची शक्ती आहे. शिव अर्थात गुरू सच्चिदानंदमयस्वरूप असतात. त्यांच्या ठिकाणी जी नित्य शक्ती किंवा पराशक्ती अभिन्नरूपाने विराजमान असते तीही सच्चिदानंदस्वरूपच असते. ही शक्तीच गुरुकृपेने सक्रिय झाली की अखंड अनुग्रहरूप किंवा विशाल करुणारूप धारण करून जीवाला शिवत्व प्राप्त करून देण्याच्या कार्यात अग्रेसर होते. ही महाकरुणा म्हणजेच भगवंताचे महाप्रेम आहे. भगवंत प्रेमाने व करुणेने भिजून जेव्हा अनुग्रहरूपाने पाझरू लागतो तेव्हा तो कुंडलिनी शक्तीच्या सक्रिय रूपाने अनादी कालापासून बद्धजीवांना मुक्त करून आपल्या बरोबर पूर्णपणे मिसळून टाकतो. भगवंत निष्क्रिय राहूनही अशाप्रकारे निरंतर क्रिया करीत राहातात. ज्यावेळी शक्तिपातानुग्रह होऊन शक्तीच्या क्रिया बाह्यरूपाने जरी निरनिराळ्या तऱ्हेच्या होताना दिसल्या तरी त्या क्रियांचे मूळ रूप एक व अभिन्न आहे. हाच मूळरूपातील अनुग्रह आहे. ही शक्ती परम अनुग्रहरूप असल्यामुळे तिला सर्वमंगला असे म्हटले जाते. सृष्टी, स्थिती व संहार या अवस्था म्हणजे या शक्तीचा आत्मप्रकाश किंवा विलास या शिवाय दुसरे काही नाही. शास्त्र म्हणते की अनुग्रहशक्तीच गुरूचे खरे स्वरूप आहे. परमशिव हेच गुरू आहेत व अनुग्रहशक्ती ही त्यांची पराशक्ती आहे. ही अनुग्रहशक्तीच अणुरूपी जीवांना मुक्त करून त्यांना आपल्या मूळच्या शिवस्वरूपात पुनः प्रतिष्ठित करते."

आनंदाची मंगलमय अनुभूती :–

जो शक्तिसंचार करतो तो गुरू व ज्याच्यामध्ये शक्तिसंचार होतो तो शिष्य होय. असे जेथे घडत नाही तेथे सर्व खटपट व्यर्थ जाते. याचे खरे कारण असे आहे की ज्याच्याजवळ परंपरेने प्राप्त झालेली शक्ती नसते तो स्वसामर्थ्याने शिष्याला आनंदाची मंगलमय अनुभूती शक्तिसंचाराने देऊ शकत नाही. नुसता उपदेश व शास्त्रचर्चा करीत राहातो. परंतु त्याचा काडीमात्रही उपयोग होत नाही. यासाठीच योगवासिष्ठाच्या

निर्वाणप्रकरणाच्या पूर्वार्धातील १२८ व्या प्रकरणात पुढीलप्रमाणे गुरूची व्याख्या केली आहे.

दर्शनात् स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्यदेहके। जनयेद्यः समावेशं शांभवं स हि देशिकः॥

जे दर्शनाने, स्पर्शाने, शब्दाने व कृपापूर्वक शिष्याच्या देहामध्ये शिवभावाची मंगलमय अनुभूती करू शकतात त्यांनाच गुरू म्हणतात. अशाप्रकारे शिष्याचा उद्धार करण्याची जी अद्भुत शक्ती गुरूजवळ असते तीच त्याचे खरे लक्षण आहे. सत्यसंकल्प गुरू केवळ एकवार कृपापूर्ण दृष्टिक्षेप करताच उपरोक्त महान कार्य परिपूर्ण होते. कारण त्यांच्या दृष्टिपाताबरोबर कुंडलिनी शक्ती जागृत होऊन शिष्याला आनंदावेशाची मंगलमय अनुभूती प्राप्त होते.

परमानंदप्राप्तीचा महिमा असा असल्याने कुलार्णवतंत्राच्या १३ व्या उल्लासात शंकरांनी पार्वतीला असा उपदेश केला आहे की –

गुरोर्यस्यैव संस्पर्शात् परानंदोऽभिजायते। गुरुं तमेव वृणुयात् नापरं मतिमान्नरः॥ ११०॥ यस्यानुभवपर्यंतं बुद्धिस्तत्र प्रवर्तते। तस्यालोकनमात्रेण मुच्यते नात्र संशयः॥१११॥

ज्याची बुद्धी आत्मज्ञानापर्यंत पोहोचली आहे, ज्याची कृपादृष्टी शिष्याला मुक्त करणारी आहे व ज्याचा करस्पर्श परमानंद देणारा आहे असा मनुष्यच गुरू होण्याला योग्य आहे. बुद्धिमान शिष्याने अशाच गुरूची कास धरावी.

आनंदाची मंगलमय अनुभूती देणे हे गुरूचे कार्य किती महत्त्वाचे आहे हे सांगताना श्रीगोपीनाथ कविराज भारतीय संस्कृती और साधना या आपल्या ग्रंथातील अध्यात्मजीवनमें गुरुका स्थान या लेखात म्हणतात – "मनुष्य अनादी कालापासून संसारात पडलेला असून कालचक्राबरोबर फिरत राहातो. त्याचे बहिर्मुख चित्त आपल्या कर्मांच्या संस्काराप्रमाणे बाह्य जगतामध्ये सुखप्राप्तीसाठी वारंवार धडपड करते. परंतु त्याच्या धडपडीला यश येत नाही. त्याची सर्व मनोरथे धुळीला मिळतात. पण असे होऊनही संसाराची विरक्ती मात्र त्याला येत नाही. जन्ममृत्यूच्या चक्रामध्ये सापडून विषयसुखाचा शोध घेत घेत त्याचे चित्त सतत भटकत राहाते. यालाच प्रवृत्तीचा प्रवाह म्हणतात. जोपर्यंत प्रवाहाचा वेग मंद होत नाही तोपर्यंत त्याबरोबर वाहात जाणे माणसाला भाग पडते.

अशा जीवांना हात देऊन प्रवृत्तीच्या प्रवाहातून बाहेर काढून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे आवश्यक असते. दुःखी, कष्टी, थकलेल्या, भागलेल्या व निराश झालेल्या जीवांना जेव्हा असा आधार मिळतो तेव्हा त्यांच्या भाग्याला सीमा राहात नाही. या अर्थानेच श्रीगोपीनाथ कविराज म्हणतात की, " आनंदापासून वंचित झालेल्या हताश मनुष्याला नित्य आनंदाचा मार्ग दाखविणे हे गुरूचे खरे कार्य आहे. जो त्रितापदग्ध जीव अनन्यभावाने गुरूला शरण जातो त्याला ते अभयदान देऊन त्याच्या इष्टप्राप्तीचा उपायही सांगतात. इष्ट याचा अर्थ संसारातील सर्व दुःखाची निवृत्ती असाच घेतला पाहिजे. इतकेच नव्हे तर परमानंदाची अभिव्यक्तीसुद्धा इष्ट या शब्दात अभिप्रेत आहे. वास्तविक निर्मल व अपरिच्छिन्न आनंदाची प्राप्ती करणे हेच मनुष्याचे इष्ट असते. कारण प्रत्येक मनुष्य त्याची आकांक्षा करीत असतो. दुःख-निवृत्ती हे त्याचे फक्त आनुषंगिक फल आहे. जाणतेपणाने किंवा अजाण-तेपणाने का होईना पण आनंद प्राप्ती व्हावी ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असते. माणसाच्या सर्व अभिलाषा व इच्छांचे आनंद हेच एकमात्र लक्ष्य असते. गुरू जो उपाय सांगतात व जे साधन देतात त्याचा दृढ आश्रय करून संपूर्ण आनंदाची प्राप्ती करून घेणे हे शिष्याचे कर्तव्य असते." ही आनंदाची प्राप्ती सद्गुरू करून देत असल्याने त्यांचे वर्णन करताना दासबोधाच्या सातव्या दशकातील पहिल्या समासात समर्थ म्हणतात–

आता आठवीन समर्था । सद्गुरूसी । ११ ॥ जयाचेनि कृपादृष्टी । होय आनंदाची वृष्टी । तेणें गुणें सर्व सृष्टी । आनंदमय ॥ १२ ॥ कीं तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक । कैवल्यपददायक । अनाथ बंधू ॥ १३ ॥ मुमुक्षुचातकीं सुस्वर । करुणा पाहिजे अंबर । वोळे कृपेचा जळधर । साधकावरी ॥ १४ ॥ कीं तें भवार्णवीचें तारूं । बोधे पाविजे पैलपारू । महा आवर्तीं आधारू । भाविकांसी ॥ १५ ॥ कीं तो काळाचा नियंता । नानासंकटी सोडवितां । कीं ते भाविकाची माता । परम स्नेहाळ ॥ १६ ॥ कीं तो परत्रीचा आधारू । कीं तो विश्रांतीचा थारू । नातरी सुखाचे माहेरू । सुखरूप ॥ १७ ॥ ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी । देहेविण लोटांगणीं । तया प्रभूसी ॥ १८ ॥

योग्य शिष्याचा उद्धार व अयोग्याला योग्य करणे :–

योग्य शिष्याचा उद्धार करणे व अयोग्य शिष्याला योग्य करून तारणे हे सदगुरूंचे दुसरे महत्त्वाचे कार्य आहे. बोधसार या ग्रंथामध्ये

असे लिहिले आहे की " श्रीगुरू विवेकवैराग्ययुक्त वेदांतयुक्तीच्या साहाय्याने अयोग्य शिष्याला योग्यता प्राप्त करून देतात आणि नंतर त्याच्यावर शक्तिपाताचा अनुग्रह करून त्याला त्याच क्षणी जागृत करतात. ललिता सहस्रनामाच्या भाष्यात श्रीभास्करराय यांनी असे म्हटले आहे की खरे सद्गुरूरूपी सूर्य अयोग्य शिष्याला योग्य करून आपल्या अमोघ अशा शक्तिपाताच्या सामर्थ्याने त्याला प्रबुद्ध करतात.
या दृष्टीनेच नवचक्रेश्वर तंत्रामध्ये सद्गुरूंची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

पिंडं पदं तथा रूपं रूपातीतं चतुष्टयम् ।
यो वा सम्यग् विजानाति स गुरुः परिकीर्तितः ।।

जो पिंड, पद, रूप व रूपातीत या चारही गोष्टी सम्यक्रीतीने जाणतो तोच खरा गुरू होय.

गुरुगीतेमध्ये उपरोक्त चार गोष्टींचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

पिंडं कुंडलिनीशक्तिः पदं हंसः प्रकीर्तितः ।।
रूपं बिंदुरिति ज्ञेयं रूपातीतं निरंजनम् ।।

पिंड म्हणजे कुंडलिनी शक्ती होय. पदाला हंस म्हणतात. बिंदू म्हणजे रूप व निरंजन म्हणजे रूपातीत ब्रह्म होय.

समभावसंपन्नाता :–

शिष्याला स्वतःच्या भावासारखी व अनुभूतीसारखी संपन्नता सद्गुरू दीक्षारूप कार्याने प्राप्त करून देतात. सद्गुरूंचे हे तिसरे अलौकिक कार्य आहे. कुलार्णव तंत्राच्या १४ व्या उल्लासामध्ये यादृष्टीने पुढील वर्णन आले आहे.

गुरुपदिष्ट मार्गेण वेधं कुर्याद्विचक्षणः । पापमुक्तः क्षणाच्छिष्यश्छिन्नपाशस्तथा भवेत् ।। १ ।। बाह्यव्यापारनिर्मुक्तो भूमौ पतिति तत्क्षणात् । संजात दिव्यभावो ऽ ऽ सौ सर्वं जानाति शांभवी । यदास्ति वेधकं तत्तत्स्वयमेवानुभूयते ।। २ ।।

श्रीमहेश्वरांपासून परंपरेने प्राप्त झालेल्या गुरूपदेशाच्या म्हणजे शक्तिपातयोगाच्या अर्थात् शक्तिसंक्रमणाच्या मार्गानुसार जेव्हा ज्ञानी पुरुष वेधदीक्षा देतात तेव्हा शक्तिपातामुळे शिष्य पापरहित व पापमुक्त होतो. या दीक्षेमुळे बाह्य व्यापार विसरून तो तत्काल भूमीवर पडतो. त्याला दिव्यभाव प्राप्त होतात. तो या शांभवी शक्तीच्या आधाराने

सद्गुरू ज्या दिव्य भावाने संपन्न असतात त्याचा तो स्वतः अनुभव घेतो. अशाप्रकारे निजबोधरूपच स्वशक्तीच्या संचाराच्या द्वारा शिष्याला आपल्या बरोबरीची समभावसंपन्नता प्राप्त करून देणे हे अनुग्रहाचे खरे लक्षण आहे.

तं ये पश्यंति तादृरूप्यक्रमेणामलसंविदः ।
तेऽपि तद्रूपिणस्तावत्येवास्यानुग्रहात्मता ।।

दुःखनिवृत्ती :–

शिष्यरूपी जीवाची दुःखनिवृत्ती करणे हे सद्गुरूचे फार महत्त्वाचे असे चौथे कार्य आहे. कारण संपूर्ण योगशास्त्रच यासाठी प्रवृत्त झालेले आहे. योगशिखोपनिषदाच्या सुरवातीलाच ब्रह्मदेवांनी महादेवांना असा प्रश्न केला की, "हे शंकरा ! सर्व जीव सुखदुखःच्या मायाजालात गुरफटून गेले आहेत. त्यापासून त्यांची मुक्ती कशी होईल हे कृपा करून सांगावे. ज्या मार्गाने सर्व सिद्धी प्राप्त होतील, मायाजाल तुटून जाईल, जन्म, मृत्यू, जरा, व्याधी इत्यादी सर्व दुःखांचा नाश होईल व ज्यापासून मोठे सुख होईल असा मार्ग दाखवा.

यासाठी दुःख निवृत्ती होणे नितांत आवश्यक आहे. "अध्यात्म-जीवनमें गुरुका स्थान" या लेखात श्री गोपीनाथ कविराज म्हणतात, "शिष्यरूपी जीवाच्या दुःखाच्या निवृत्तीची व्यवस्था करणे हे सद्गुरूचे पहिले काम आहे. या मायिक जगात द्वैतज्ञानाने, कर्मसंस्काराने व कर्तृत्वाभिमानाने भरलेला जीव अनादी कालापासून कर्म करीत व त्याचबरोबर केलेल्या कर्मांची फळे भोगीत आलेला असतो. जन्मजन्मांतरापासून संसाराचा हा प्रवाह असाच वाहात आलेला दिसून येतो. भेदज्ञान व कर्तृत्वाभिमान जोपर्यंत नष्ट होत नाही तोपर्यंत या संसारलीलेचा कधीही अंत होत नाही. इतकेच नव्हे तर जन्ममृत्यूच्या व कालचक्राच्या आवर्तना. तूनही जीवाची निवृत्ती होत नाही. जीव चिदात्मक आहे यात काहीही शंका व संदेह नाही. परंतु मायेच्या प्रभावामुळे जीव जडसत्तेलाच आपली चित्सत्ता मानून भयंकर चूक करीत आलेला आहे. वरच्या देवलोकापासून खालच्या तिर्यक् व स्थावर योनी पर्यंत असंख्य प्रकारचे जीव आहेत. हे सर्व जीव दुःखमय संसाराच्या येरझाऱ्यात सापडून भ्रमण करीत असतात. तात्पुरती ऊर्ध्वगती झाली किंवा अधोगती झाली तरी त्यामुळे खरा मार्ग कोणता हे बिलकुल कळत नाही. जोपर्यंत चेतन आत्मा "मी जडाहून वेगळा आहे" हे जाणणार व अनुभवणार नाही तोपर्यंत या दुःखमय कालचक्रातून निसटण्याची व उद्धार होण्याची आशाच नाही. अनुग्रहपूर्वक

जे ज्ञानदान करून अनादी अज्ञानापासून जीवाला मुक्त होण्याला साहाय्यता करतात तेच खरे गुरू होत." ज्यावेळी ही दुःखनिवृत्ती व्हावी म्हणून सद्गुरू शक्तिपातपूर्वक कृपानुग्रह करतात त्यावेळी साधकाची पूर्वी अनुभवलेली सर्व दुःखे नाहीशी होतात व त्याच्या ठिकाणी मूलतःच असलेला अपार आनंद उसळून येऊन त्याचो उत्तम अभिव्यक्ती होते. अशाप्रकारे झालेल्या शक्तीच्या जागृतीमुळे साधक ऐश्वर्य संपन्न होतो व त्याची सर्व कमतरता, अपूर्णता, अभाव, त्रुटी इत्यादी कायम दूर होते.

शक्तिजागरण :–

सद्गुरू शिष्यावर अनुग्रह करतात म्हणजे शक्तिपात करून शक्ती जागृत करतात. सद्गुरूंकडून होणाऱ्या या शक्तिजागरणच्या कार्याला तोड नाही कारण मोक्ष हे मनुष्य जीवनाचे वास्तविक लक्ष्य त्याशिवाय प्राप्त होऊ शकत नाही. इतकी या शक्तिजागरणाची अपरिहार्यता आहे. ती पटविताना "जीवनका लक्ष्य" या लेखात श्री गोपीनाथ कविराज म्हणतात, "ज्या अज्ञानाच्या प्रभावाने आत्मा मायेच्या अधीन होऊन त्याला अपरिहार्यपणे देह ग्रहण करावा लागतो, त्या अज्ञानाची निवृत्ती जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आत्म्याचा शिवत्वरूप धर्म प्रकट होत नाही. या मूळ अज्ञानालाच पौरुष अज्ञान म्हटले जाते. या अज्ञानाचो निवृत्ती व्हावी म्हणून जो अत्यंत आवश्यक उपाय आहे त्यामध्ये कर्म व ज्ञान या उपायांचो गणना तर होत नाहीच परंतु भक्तीचीही गणना होत नाही. अज्ञान दूर करण्याच्या उपायांमध्ये यांची गणना केलेली दिसली तरी हे उपाय म्हणजे केवळ बुद्धीचे व्यापार आहेत यात शंकाच नाही. जी गोष्ट बुद्धीच्या आधी झाली ती दूर करण्याची क्षमता यापैकी कोणत्याही उपायात तिलप्राय असत नाही. याकरिता जोपर्यंत मनुष्याचे मूळ अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत मनुष्य जीवनाचा परम आदर्श कदापीही प्रत्यक्षपणे प्राप्त होऊ शकत नाही."

"यासाठी मळ अज्ञान कसे मिटेल याचाच विचार केला पाहिजे. मी हे प्रथमच सांगितले आहे की अज्ञान दूर करण्याचे जे जे मार्ग आहेत त्यापैकी कर्म, ज्ञान व भक्ती यांची कोणत्याही प्रकारे तशी उपयुक्तता दिसत नाही. कारण ही सर्व साधने मूळाला स्पर्शही करू शकत नाहीत. एकमात्र भगवंताच्या कृपाशक्तीच्या द्वारा मनुष्याच्या मूळ अज्ञानाची निवृत्ती होऊ शकते. अन्य कोणत्याही उपायांनी हे शक्य नाही. भगवत्कृपा स्वभावसिद्ध असून तो अहेतुक असल्यामुळे आधाराच्या योग्यतेप्रमाणे तिची कार्यक्षमता दिसून येते".

" यावरून शक्तीचे जागरण करणे हे अनुग्रहात अनुस्यूत असून सद्गुरूंच्या कार्याची महत्ता त्यात सामावलेली असते कारण कैवल्य, मुक्तीलाभ अगर महेश्वरत्व प्राप्तीसाठी अंतर्निहित अनंत शक्तीच्या परिपूर्ण जागृतीची नितांत आवश्यकता असते. ही शक्ती जोपर्यंत जागृत होत नाही तोपर्यंत आत्मा शुद्ध असला तरी त्याची योग्यता शवा इतकीच असते. शिवाची नसते. याचे कारण असे आहे की शिव कधीही शक्तिहीन असत नाही. खरे पाहिले तर शिव व शक्ती अगदी अभिन्न आहेत. त्यामुळे शिवाच्या व्यक्त व अव्यक्त भावात पृथकता दिसत नाही. एका दृष्टीने शिव महाप्रकाशात्मक असल्याने नित्य व्यक्त आहेत. परंतु शक्ती जोपर्यंत अव्यक्तता सोडून व्यक्त भाव धारण करीत नाही व आपला व्यक्त भाव क्रमाक्रमाने अगर क्रमाशिवाय जोपर्यंत पूर्णरूपाने प्रकट करीत नाही तोपर्यंत शक्ती शिवाशी एकरूप असूनसुद्धा त्याच्या बरोबर एकाच आसनावर बसू शकत नाही. मग प्रत्यक्ष एकरूपतेची प्राप्ती होणे ही अत्यंत दूरची गोष्ट म्हटली पाहिजे. जेव्हा अध्यात्म जीवनाचा संपूर्ण विकास होतो तेव्हा शिवशक्तीचे ऐक्य होते यात शंकाच नाही. त्यावेळी शिव व शक्ती आणि जीव व शिव यांच्यात भेद राहात नाही. त्यावेळी एकच अभिन्न व अखंड आत्मस्वरूप व्यक्त होते. या परमस्थितीमध्ये पुन्हा प्रतिष्ठित होण्याला जे साहाय्यता देतात तेच खरे सद्गुरू होत. खरे पाहाता आत्माच सद्गुरू आहे. तोच सद्गुरूच्या रूपाने मायांध जीवाला मायेपासून सोडवून त्याच्या ठिकाणी असलेल्या सुप्त शक्तीला अत्यंत उत्तमप्रकारे जागृत करून आपल्या स्वरूपामध्ये म्हणजेच शिवस्वरूपामध्ये घेऊन येतो. यालाच संकोचरहित पूर्ण स्वातंत्र्य म्हणतात."

शक्ती जागृतीची नितांत आवश्यकता पटवून देताना "कुंडलिनी तत्त्व" या लेखात श्री गोपीनाथ कविराज म्हणतात, " जीव स्थूल तत्त्वांच्या आवरणाने वेष्टिलेला असल्यामुळे सूक्ष्म अशा सुषम्नामार्गात त्याचा प्रवेश होऊ शकत नाही. पूर्वसंस्कार किंवा वासना, अभिमान किंवा कर्तृत्वबोध, आणि फलाकांक्षा किंवा जिला कामना म्हणतात ती भोगाभिलाषा या तीनही आवरणांमुळे जीवाला स्थूलत्व प्राप्त होते. विषय व इंद्रियादी रूप स्थूलावरणयुक्त जीवाला आपल्या मूळ स्वरूपास परत जाऊ देत नाहीत. प्रत्येक जीव ज्ञान, आनंद व अमरत्वाची इच्छा करीत असतो. इतकेच नव्हे तर आपल्याला ब्राह्मी स्थिती प्राप्त व्हावी अशी त्याला तीव्र आकांक्षा असते. हे सर्व घडावे म्हणून जरी त्याला

वाटत असले तरी ते सर्व मनात ठेवून तो विषयांमध्ये अगदी दंग होऊन जातो. वास्तविक पाहाता विषयप्राप्ती हे काही त्याचे ध्येय असत नाही. ध्येय असते आनंदाची प्राप्ती. या आनंदाच्या प्राप्तीसाठीच मनुष्य गौण साधना करून विषयादींची इच्छा आकांक्षा करीत असतो. परंतु युग-युगांतरात व कल्पकल्पांतरात भ्रमण करून सुद्धा जीव आपल्या आकाक्षांची तृप्ती करू शकत नाही. याचे खरे कारण असे आहे की तो सर्व जन्मां-मध्ये आपली वासना व कर्तृत्वाचा अभिमान यांना न सोडताच परिभ्रमण करीत राहातो. वास्तविकपणे एक पळभरही जोपर्यंत वासनेचा नाश होत नाही तोपर्यंत जीवाला सुषुम्नेमध्ये प्रवेश मिळू शकत नाही. कारण स्थूल वस्तू सूक्ष्म मार्गामध्ये प्रवेश करू शकत नाही. भूतशुद्धी व चित्त-शुद्धीसाठी साधनात ज्या ज्या क्रिया होतात त्यांचा खरा हेतू किंवा तात्पर्य हेच असते की स्थूलतेचे विसर्जन व्हावे. ज्यावेळी पंचभूतांचे शुद्धीकरण होते तेव्हा पंचीकरणाची स्थिती राहात नाही. इतकेच नव्हे तर पंचबिंदू सुद्धा एकबिंदूच्या रूपात परिणत होतात. त्यानंतर चित्त-शुद्धी होते. एकबिंदू शुद्ध झाला की ज्ञानचक्षूंचे म्हणजेच तृतीय नेत्राचे उन्मीलन होते. या अवस्थेतून पुढे जात जात जीवाला ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन सर्वश्रेष्ठ अशी साम्यावस्था प्राप्त होते. हे सर्व घडून येण्यासाठी कुंडलिनी शक्तीचे उद्‌बोधन होणे नितांत आवश्यक असते कारण त्याशिवाय अन्य कोणत्याही प्रकाराने जीवाची ऊर्ध्वगती होऊ शकत नाही."

ज्ञानदान :–

सद्‌गुरूंचा शक्तिपातयुक्त कृपाप्रसादरूप अनुग्रह म्हणजे ज्ञानदान होय. जीवाला मुक्तीसाठी हे ज्ञानाचे दान सदगुरूंकडून मिळालेच पाहिजे कारण **ऋते ज्ञानन्न मुक्तिः** असा शास्त्राचा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. ज्ञान ही दानाची वस्तू आहे हे मागे सांगितलेच आहे. हे महान कार्य सद्‌गुरूंकडून मिळणाऱ्या दीक्षानुग्रहाने सुसंपन्न होत असल्यामुळे ज्या प्रक्रियेद्वारा असे ब्रह्मज्ञानाचे दान केले जाते व सर्व पाश आणि कर्म-बंधनांचा नाश केला जातो त्या प्रक्रियेला तत्त्वचिंतन करणाऱ्या विभूतींनी व ज्ञानी लोकांनी दीक्षा असे म्हटले आहे.

अशाप्रकारे ज्या दीक्षेत ज्ञानाचे अपूर्व दान शिष्याला मिळते त्या दीक्षेला वेदांतात शांभवी दीक्षा म्हणतात. शिवपुराणात शास्त्रकार म्हणतात —

गुरोरालोकमात्रेण भाषणात्स्पर्शनादपि ।
सद्यः संजायते ज्ञानं सा दीक्षा शांभवी मता ।।

परम कृपाळू गुरुदेव दृष्टिक्षेपाने, भाषणाने म्हणजे मंत्राने, तत्त्वमसि वाक्याने अथवा स्पर्शद्वारा शक्तिपातयोगाची दीक्षा देतात. त्यामुळे गुरूची शक्ती शिष्यामध्ये संक्रमित होते. ही प्रक्रिया झाल्याबरोबर तत्काळ शिष्याच्या ठिकाणी दिव्य ज्ञान उत्पन्न होते. ज्ञानदानाचे हे कार्य कसे घडते व त्याची अपरिहार्यता किती आहे हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्ययात म्हणतात की–

तरी अविद्येचिया निदा । विश्वस्वप्नाचा हा धांदा । भोगीत होता प्रबुध्दा । अनादि जो ।।४०३।। तो महावाक्याचेनि नांवें । गुरुकृपेचेनि थांवें । माथां हातु ठेविला नव्हे । थापटिला जैसा ।। ४०४ ।। तैसा विश्वस्वानेंसी माया । नीद सांडूनि धनंजया । सहसा चेइला अद्वया । नंदपणे जो ।। ४०५ ।।

हे प्रबुद्धा ! अर्जुना ! जीव अविद्यारूपी निद्रेत विश्वरूपी स्वप्नव्यवहाराचा अनुभव अनादी काळापासून घेत असतो. ज्यावेळी त्याला सद्गुरू भेटतात तेव्हा ते शक्तिपातपूर्वक तत्त्वमसि महावाक्याचा उपदेश करतात. यालाच शब्ददीक्षा म्हणतात. ते त्याच्यावर कृपादृष्टी टाकतात. याला कृपादीक्षा म्हणतात. किंवा सद्गुरू शिष्याच्या मस्तकावर नुसता हात ठेवीत नाहीत तर प्रत्यक्ष थापटी मारून ते आत्मशक्तिस्वरूप कुंडलिनी शक्ती जागृत करून ज्ञानदान करतात. अशाप्रकारे ज्ञानदान घडले की माया म्हणजे अनादी शक्ती जगद्रूपी स्वप्नासह अज्ञानरूपी निद्रा टाकून देते. ही प्रक्रिया घडली की या शक्तीच्या सामर्थ्याने आपण अद्वयानंदादी निजस्वरूप आहोत असा यथार्थबोध साधकाला होतो.

यासाठी सद्गुरूंकडून ज्ञानदानाचे कार्य दीक्षाद्वारा झालेच पाहिजे हे सांगताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " हे अर्जुना ! या चारही प्रकारांनी तुझ्यावर माझी कृपा होईल तेव्हा अभेदरूपी सेवेने तुझे चित्त भरून जाईल म्हणजे तू मद्रूप होशील. असे झाले म्हणजेच तुझ्यावर माझा पूर्ण प्रसाद झाला असे समज. जन्म व मृत्यू ही तर दुःखाची निवासस्थाने आहेत. ती जीवमात्रांकडून भोगली जातात. या अनादी कालचक्ररूप परंपरेचा नाश होणे अतिशय दुर्घट असते. परंतु माझ्या या शक्तिपातयोगाच्या प्रसादप्राप्तीमुळे तुला ही दुःखे सुखकारक व सोपी होतील. जेव्हा सूर्यप्रकाशाची साह्यता डोळ्याला मिळते तेव्हा त्यांना अंधाराची

किंमत वाटत नाही. त्याचप्रमाणे सद्‌गुरूच्या साहाय्याने माझा हा शांभवी विद्येचा प्रसाद मिळून ज्याची जीवपणाची हीन दशा जाऊन विभुदशा म्हणजे ब्रह्मप्राप्ती होते तो संसाररूपी बागुलबुवाच्या भीतीने घाबरणे कधीही शक्य नाही. म्हणून हे धनंजया ! माझा योगदीक्षा प्रसादच ज्ञानोपलब्धी झाल्याने या संसाररूपी दुर्गतीपासून तुला तारून नेईल. मात्र अशा प्रकारच्या दीक्षाप्रसादाची अहंकाराने व अभिमानाने तू अवहेलना करशील व अशाप्रकारच्या ज्ञानदानानेच जीव संसारसागर तरून जातो हे तू नुसते आपल्या कानामनाला स्पर्शही करू देणार नसशील तर तू वस्तुतः जरी नित्यमुक्त व अव्यय असलास तरी अशी कृपादीक्षा न मिळाल्याने तें सर्व व्यर्थ होईल. मग देहतादात्म्यसंबंधीचे घाव तुझ्या अंगावर आदळून ते तुला सोसावेच लागतील. कारण शक्ती जागृत झाल्याशिवाय ती ज्ञानाचा उदय घडवून आणीत नाही व देहतादात्म्यसंबंधाचा विच्छेदही होत नाही. (१८. १२६९ ते १२७५)

असा ज्ञानदानाचा महिमा आहे. आत्मस्वरूपाची उपलब्धी ज्ञानाने होते. वास्तविक पाहाता हा आत्माच एकमात्र गुरू आहे " **आत्मा वै गुरुरेकः** व तो प्राचीन गुरूंचाही गुरू आहे. कारण तो कालाने मर्यादित नाही. " **स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्** "

(पातंजल योगसूत्र १–२६) असे शास्त्रकारांचे मत आहे. त्या आत्म्याचे तत्त्व व स्वरूप जाणण्यासाठीच मनुष्य गुरू करावा लागतो. अर्थात जर एका मनुष्य गुरूकडून तत्त्वपिपासा शमली नाही तर अन्य गुरूचा आश्रय करण्यात अपराध, दोष किंवा आपत्ती नाही हे सांगताना कुलार्णव तंत्राच्या १३ व्या उल्लासामध्ये असे म्हटले आहे की –

अनभिज्ञं गुरुं प्राप्य संशयच्छेदकारकम् । गुर्वन्तरं तु गत्वा स नैतद्दोषेण लिप्यते ॥ मधुलब्धो यथा भृंगः पुष्पात् पुष्पांतरं व्रजेत् । ज्ञानलुब्धस्तथा शिष्यो गुरोर्गुर्वन्तरं व्रजेत् ॥

अज्ञानी गुरूच्यामुळे जर संशयाचा नाश झाला नाही तर जो आपल्या संशयाचा नाश करील अशा समर्थ गुरूपाशी शिष्य गेल्यास त्यात त्याला कोणताही दोष लागत नाही. ज्याप्रमाणे मध मिळावा म्हणून मधमाशी एका फुलावरून दुसऱ्या फुलावर जाते त्याप्रमाणे जो ज्ञानार्थी शिष्य आहे तो ज्ञाकप्राप्ती होईपर्यंत एक गुरू सोडून दुसरा गरू करू शकतो.

शिवपुराणातही शंकरांनी हाच नियम सांगितला आहे.

यत्रानंदः प्रबोधो वा नाल्पमप्युपलभ्यते ।
संवत्सरादपि शिष्येण सोऽन्यं गुरुमुपानयेत् ।।

दीक्षा झाल्यानंतर जर शिष्याला अल्पमात्रही आनंद व प्रबोध प्राप्त झाला नाही तर दीक्षेनंतर एक वर्षभर वाट पाहावी. गुरूने सांगितल्याप्रमाणे साधन करूनही जर एका वर्षात आनंद व प्रबोध प्राप्त झाला नाही तर दुसऱ्या गुरूचा अवश्य आश्रय करावा.

श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांनी दासबोधाच्या पाचव्या दशकाच्या दुसऱ्या समासात "ज्ञानदान करतो तोच खरा सद्गुरू होय" असे वर्णन केले आहे.

जो ब्रह्मज्ञान उपदेशी । अज्ञान अंधार निरसी । जीवात्मया परात्मयाशी । ऐक्यता करी ।।९।। विघडे देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत । तया देवभक्ता एकांत । करी तो सद्गुरु ।। १० ।। भवव्याघ्रे घालूनि उडी । गोवत्सास ताडातोडी । केली देखोनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ।।११।। वासनानदी महापुरी । प्राणी बुडता ग्लानी करी । तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ।। १२ ।। प्राणी मायाजाली पडले । संसारदुःखे दुखविले । ऐसें जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ।। १३ ।। गर्भवास अतिसांकडी । इच्छाबंधनाची बेडी । ज्ञान देऊनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ।। १४ ।। जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियदमन प्रतिपादी । तोचि सद्गुरु जाणावा ।। १५ ।।

इतके सांगून झाल्यावर जो ज्ञानप्राप्तीने साधन देऊ शकत नाही त्या गुरूचा त्याग करावा हे सांगताना श्रीसमर्थ म्हणतात.

शिष्यासी न लावितो साधन । न करवितो इंद्रियदमन । ऐसें गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ।। २१ ।।

दिव्यचक्षूंचे उन्मीलन :–

खऱ्या सद्गुरूंच्या अनुग्रहाची परिणिती दिव्यचक्षूंच्या उन्मीलनात होऊन शिष्य खऱ्या अर्थाने कृतार्थ होत असल्याने गुरुगीतेत या सद्गुरूंच्या अलौकिक कार्याच्या दृष्टिकोनातूनच अपूर्व प्रार्थना केलेली आढळते

अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरुवे नमः ।

अज्ञानरूपी तिमिराने अंध झालेल्या व्यक्तीचे नेत्र ज्ञानरूपी अंजनशलाकेच्या द्वारे जो उघडतो तोच खरा गुरू होय. अशा गुरुदेवांना

नमस्कार असो. आपण देहस्वरूप आहो, जग सत्य आहे, आपले मूळ स्वरूप काय आहे याचे स्मरण नाही व कल्पना हे अज्ञानाचे स्वरूप आहे. या अज्ञानामुळे मनुष्य संसाराला प्रवृत्त करणाऱ्या अवगुणांच्या समुदायात गुरफटून गेल्यामुळे अंध बनतो. त्याची नित्यानित्यविवेकाची बुद्धी नाहीशी होते. अनादी कालापासून या संसारात रमल्यामुळे विशुद्ध शक्तीचे स्फुरण जीवाला कधी जाणवतच नाही. जीव नित्य शुद्ध, बुद्ध व मुक्त असूनही तो आपण स्वतः अल्पज्ञ व अल्पशक्ती आहो अशी कल्पना करतो. संसाराचे सोंग घेऊन तो मायिक जगतात आपापल्या अधिकाराप्रमाणे वावरत असतो. त्यामुळे चैतन्यशक्ती वास्तविक जागृत असूनही ती जणू काही लुप्त झाली आहे असे वाटते. अशा या अवस्थेलाच अज्ञानतिमिरांधत्व किंवा कुंडलिनीची निद्रावस्था असे म्हणतात. जीवाची ही घोरतम निद्रावस्था ज्ञानांजनशलाकेने दूर होते. ज्ञानांजनशलाका म्हणजे ज्ञानरूपी अंजन शिष्याच्या डोळ्यात घालणारे साधन. हे साधन, ही शलका म्हणजेच शक्तिपात होय. वेदांतज्ञान अनुभवगम्य होण्यासाठी शक्तिपाताशिवाय दुसरा मार्ग नाही. शक्तिपात करून सद्गुरू शिष्याला ज्ञानचक्षू प्राप्त करून देतात. म्हणून भगवंताने गीतेत म्हटले आहे –

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा। भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥ १३.३४ ॥

जड, विकारी, क्षणिक व नाशवंत गोष्टीला क्षेत्र म्हणतात. नित्य चेतन, अविकारी व अविनाशी गोष्टीला क्षेत्रज्ञ म्हणतात. या दोन गोष्टींमधील भेद व अंतर लक्षात आले पाहिजे. तसेच भूतमात्रांची मूळ प्रकृती जी अविद्या तिच्यापासून सुटण्याचा मार्ग जाणला पाहिजे. जड व चैतन्य यातील अंतर कळून मुक्तीचा उपाय हा ज्ञानचक्षूंमुळेच प्राप्त होतो.

सन्मार्ग प्रदर्शक : –

सन्मार्ग दाखविणे हे गुरूचे फार मोठे कार्य आहे. सिद्धसिद्धांतसंग्रहकार बलभद्रांनी श्रीगुरूच्या या कार्याचा परिचय देताना असे म्हटले आहे की, " जो परंपरेने प्राप्त झालेला सन्मार्ग दाखविण्यात अत्यंत समर्थ असतो तोच वास्तविक गुरू म्हणण्यास पात्र आहे. आत्मविश्रांतीचे दान साधकाला करण्याचे सामर्थ्य अशा सद्गुरुमध्येच असते. ते जो मार्ग दाखवितात त्याचा अवलंब करून निष्ठेने जो साधक वाटचाल करतो त्यालाच स्वसंवेद्याचे दर्शन होते. याकरिताच श्रीगुरूचे देवस्वरूपात चिंतन केले पाहिजे. अशा प्रकारे सद्गुरूंच्या कृपादृष्टीनेच मुनी लोक

सर्व सिद्धींच्या फलाचा त्याग करून स्वतःच स्वतःला जाणणाऱ्या स्वरूपापासून पुन्हा निरुत्थान दशेमध्ये येतात तेव्हा कृतार्थ होतात. एवढेच नव्हे तर पिंडाला समरस करण्यात समर्थ होतात."

आदर्श गुरूची लक्षणे :–

गुरुभक्ती ही सर्वश्रेष्ठ अशी साधनसंपत्ती असल्याने गुरुभक्तीचाच आश्रय सर्वश्रेष्ठ होय हे श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंदावरील २१ व्या श्लोकाच्या पूर्वार्धात सांगून, आदर्श गुरू कसा असावा हे श्रीव्यासांनी उत्तरार्धात कथन केले आहे.

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् । शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥

ज्याला परमश्रेयाला जाणण्याची इच्छा असेल त्याने वेदाख्य ब्रह्मामध्ये व शक्तिपातयोगाने परब्रह्माचा साक्षात्कार घडविणाऱ्या कलेमध्ये प्रवीण असलेल्या व निवृत्तीमार्गाचा आश्रय असलेल्या गुरूला शरण जावे.

अनुभूतीची प्राप्ती :–

उपरोक्त श्लोकावर टीका करताना एकनाथी भागवतामध्ये श्रीनाथांनी अनुभूतीची प्राप्ती करून देणे हे आदर्श गुरूचे सर्वश्रेष्ठ लक्षण आहे असे स्पष्ट केले आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात, "जो गुरू पूर्ण अनुभवी असतो तोच सच्छिष्याला सद्भावाने तारू शकतो. आदर्श सद्गुरूंच्या लक्षणाबद्दल जगामध्ये नानाप्रकारची मतमतांतरे आहेत. परंतु जो शिष्याला अनुभवाची प्राप्ती करून देतो त्यालाच सद्गुरुस्वामी म्हणतात. ज्याच्या वाक्याने शक्तिसंक्रमण घडून आल्याने शिष्याची मिथ्या जगद्भावना तत्त्वतः निःशेष मावळते त्यालाच सद्गुरुत्व आहे असे वेद व शास्त्रे यात प्रतिपादन केले आहे. जे मंत्रतंत्राचा उपदेश करतात तेही फार थोर व पूज्य होत. परंतु पूज्य व पूजक हा विकार मावळून टाकणारे साधन जो देतो तोच खरा सद्गुरुस्वामी होय."

अशा प्रकारची दुसऱ्याला अनुभूती देणारा सद्गुरू स्वतः पूर्णपणे आत्मानुभवी असतो. त्याचे ब्रह्मज्ञान शुद्ध असते. ब्रह्मवस्तूला पाहून त्याचे मन विरून गेलेले असते. त्याचे द्वैताचे भान मावळून गेलेले असते. त्याच्या चारही वाणींना मौन पडते. सर्व इंद्रिये तटस्थ होतात. परम अद्भुत वस्तूच्या अनुभूतीने त्याचे प्राण पांगळून त्याच्या देहभावाला ताटस्थ प्राप्त झालेले असते. अशा आत्मानुभवी गुरूला जेव्हा शिष्य

सद्भावाने अनुग्रहार्थ प्रार्थना करतो तेव्हा असला गुरू त्या शिष्याला काही विचारीत नाही व काही समजून सांगत नाही. तर तो अगदी तटस्थपणे मौन धरून बसतो. त्याच्या या मौनानेच सर्व कार्य घडून येते. शिष्याचे कल्याण व्हावे असा भाव सद्गुरूच्या मनात उत्पन्न झाल्याबरोबर त्याच्या कृपानुग्रहरूप शक्तिपाताने शिष्याला ब्रह्मानुभव प्राप्त होऊन त्याचा बाध्यबाधकतेचा भ्रम निवृत्त होतो. द्वैतभावाचे कर्म थांबते. जगातील विषमभाव जातो. अशाप्रकारे कोठेही आसक्त न होता जगात राहून दुसऱ्या कोणालाही करता येणार नाही असे अनुभूती दानाचे कार्य सद्गुरू करतात."

अशाप्रकारे सद्गुरू दीन शिष्यावर शरीर, वाणी व मन यांनी अतिशय कृपा करतात. ते शिष्याची सर्व बंधने तोडतात व अहंकार नाहीसा करतात.

ब्रह्मानुभूतीची प्राप्ती शिष्याला करून देणे हे सद्गुरूचे असामान्य, एकमेवाद्वितीय, अपूर्व आवश्यक लक्षण कसे आहे हे श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी दासबोधात जागोजागी पुनःपुन्हा प्रतिपादन केले आहे.

जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणि स्थूळ क्रियेचे साधन । तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळा ॥ ५.२.२८ ॥ सद्गुरुकृपेचेनि बळे । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळे । मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥५.३.४८॥ ब्रह्मदृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना । ब्रह्म साधुविण येईना । अनुभवासी ॥७.२.५॥ आता मनासि जे अप्राप्त । ते कैसेनि होईल प्राप्त । ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्गुरुविण नाही ॥ ७.२.१२ ॥ भांडारगृहें भरलीं । परी असतीं कडसलीं । हातास न येंता किल्ली । सर्व अप्राप्त ॥ ७.२.१३ ॥ तरी ते किल्ली ते कवण । मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्त्यासी ॥ १४ ॥ सद्गुरुकृपा तेचि किल्ली । जेणें बुद्धी प्रकाशिली । द्वैतकपाटें उघडली । एकसरा ॥ १५ ॥

विविध गुणलक्षणे–

अनुभूतीची प्राप्ती करून देणे या सद्गुरूच्या अनन्यसाधारणत्वाबरोबरच त्याच्या ठिकाणी इतरही नानाविध गुणांचा साठा असावा म्हणून शास्त्रकारांनी परोपरीने सांगितले आहे. कुलार्णव तंत्राच्या १३ व्या उल्लासात सद्गुरूंच्या विविध गुणलक्षणांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. " श्रीशंकर पार्वतीला म्हणाले की, योगदीक्षा देणाऱ्या सामर्थ्यसंपन्न गुरूची लक्षणे मी तुला सांगतो. सद्गुरूचा वेश चांगला असतो. त्याची

वस्त्रे शुद्ध व सुशोभित असतात. त्यामुळे त्याला मनोहरत्व प्राप्त होते. त्याचे सर्व शारीरिक अवयव सुंदर व सर्व शुभ लक्षणांनी युक्त असतात. तो सर्व शास्त्रांचे खरे सार व तत्त्व जाणत असतो. त्याचप्रमाणे शास्त्रांनी कथन केलेल्या क्रियाकर्मादींची व्यवस्था व विधान यांचेही त्यास ज्ञान असते. सद्गुरूवर लोक मोहित होतात. त्याचे दर्शन सर्वांना अत्यंत प्रिय असते. त्याच्याकडे येणाऱ्या सर्वांना तो अत्यंत प्रसन्न व आनंदित करतो. सद्गुरूंचा चेहराही नेहमी प्रसन्न असतो. शास्त्राचे जे सिद्धांत असतात त्याबद्दल अनुकूल व प्रतिकूल विचार करण्यात ते मोठे विचक्षण असतात. ते नुसत्या इशारतीने तत्त्व समजून देऊ शकतात. एखादा अत्यंत कठिणातील कठीण विषयसुद्धा ते समजावून देऊ लागले की सोपा होऊन साधकाचा संशय व भ्रम दूर होतो. अशी लक्षणे ज्याच्या ठिकाणी आढळतात तोच पुरुष तत्त्वज्ञानाची दीक्षा देण्याला योग्य असतो. ''

'' सद्गुरूची दृष्टी बाहेर असली तरी त्याचे सर्व लक्ष अंतरंगात असते. तो सर्वज्ञ असून देशकालादींचा त्रिकालदर्शी ज्ञाता असतो. सिद्धी त्याच्या आज्ञेत असतात. तो ज्या कोणाला जशी आज्ञा देतो ती त्याच प्रकारे फलद्रूप होऊन सिद्धीला जाते. तो कृपा व दण्ड करण्यात समर्थ असतो. सद्गुरू आपले सामर्थ्य स्वेच्छेने देऊन परतही घेऊ शकतात. ते षड्रिपू जिंकून जितेंद्रिय झालेले असतात. सर्व कार्यात ते अग्रगण्य राहातात. त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असते पात्र कोण व अपात्र कोण हे ते विशेषत्वाने जाणतात. शिव, विष्णू इत्यादी सर्व देवतांच्याबद्दल त्यांची बुद्धी सम असते. असे सद्गुरू सद्गुणांनी विभूषित झालेले असल्याने साधूंचे भूषणच असतात. त्यामुळेच योगदीक्षा देण्यास ते योग्य असतात ''

सद्गरू अंतस्थपणे अक्षरशः ममतारहित असतात. ते नेहमी संतुष्ट, स्वतंत्र व अनंत शक्तिशाली असतात. जेव्हा सद्भक्त सद्गुरूंपाशी येतात तेव्हा ते त्यांना प्रेम, धीर, कृपा देऊन व हास्यपूर्ण सुखप्रद बोलून संतुष्ट करतात. राग, द्वेष, भय, क्लेश, दंभ, अहंकार इत्यादींपासून अलिप्त असलेले सद्गुरू नेहमी नित्य नैमित्तिक व आनंदित अशा काम्यकर्मांत रत असतात. ते आपल्या विद्यानुष्ठानामध्ये निमग्न राहून धर्म व ज्ञानदानाचे कार्य सतत करतात. गुणदोषादी भेदांचे ज्ञान त्यांच्या ठिकाणी विशेषप्रकारे दिसून येते. जे काही दैवाने मिळेल त्यातच ते संतुष्ट असतात. अशा उत्तम लक्षणांनी संपन्न असलेला महापुरुषच ब्रह्मज्ञानाची दीक्षा देण्याला योग्य असतो.''

" सद्गुरू स्त्री व धन इत्यादींमध्ये कधीच आसक्त होत नाहीत. दुःसंगती व दुर्व्यसन यापासून ते नेहमी दूर असतात. ते निर्द्वंद्व, नियत, व्रतधारी व संयमी असून आपल्यामध्येच संतुष्ट असतात. ते तृष्णारहित, संकल्पशून्य, अपक्षपाती, विचक्षण, संगरहित, विकल्पशून्य, आत्मतत्त्व-साक्षात्कारी, अत्यंत धार्मिक, निंदास्तुती समान मानणारे व मननशील असतात. ते कोणाची व कशाचीही अपेक्षा करीत नाहीत. आपल्या आत्मबलाने ते दुसऱ्यांना सहजासहजी नियंत्रित करू शकतात. अशा शुभलक्षणांनी जो युक्त असतो तो सद्गुरूच आत्मज्ञानदीक्षा देण्यास योग्य ठरतो. "

श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनीही दासबोधात खऱ्या, ज्ञानी व सामर्थ्यसंपन्न सदगुरूची लक्षणे फार अपूर्व पद्धतीने वर्णन केली आहेत. श्रीसमर्थ म्हणतात, " अनादी इच्छेमुळे माणूस बंधनात पडून जन्म-मरण परंपरादी तीव्रतर दुःखे सोसत असतो. अशाप्रकारे अनंत जन्म दुःख भोगल्यावर जेव्हा ईश्वरकृपेने तो अनन्यभावाने सद्गरूला शरण जातो तेव्हा सद्गरू आपल्या शक्तिपातयोगाच्या सामर्थ्याने शिष्याला ज्ञान देऊन तात्काळ सोडवितात. हे कार्य जो करतो तोच सद्गुरू होय. सद्गुरू नुसती वाचिक बडबड करीत नाहीत तर ते आपल्या सामर्थ्याने तत्त्वमस्यादी महावाक्यांचा खरा अर्थ व मर्म ज्यामध्ये दडलेले असते ते आत्मतत्त्व किंवा ती ब्रह्मवस्तू शिष्याला दाखवून अनुभवगम्य करून देतात. अशी अलौकिकता ज्यांच्या ठिकाणी असते तोच अनाथांचे माहेर मायबाप असा सद्गुरू होय. एकदेशीपणाच्या म्हणजे आपण शिव नसून जीव आहोत, विभू नसून अणू आहोत व ब्रह्मासारखे सर्वव्यापी नसून अल्पव्यापी आहोत अशा कल्पनेने माणूस दीन होतो. परंतु सद्गुरू शक्तिपातयोगाने साधकाला तात्काळ साक्षात् ब्रह्मरूप करून टाकतात. त्यामुळे संसार खरा आहे असे वाटल्यामुळे त्याला जे दुःख होत असते ते या शब्ददीक्षेने नाहीसे होते. वेद, शास्त्रे व संत या तिघांचा अनुभव एकच असतो. या अनुभवाशी जो ऐक्य करून देतो तो गुरुराज होय. सद्गुरू संशय अजिबात जाळून टाकतात. ते स्वतः स्वधर्माचे प्रतिपालन आदरपूर्वक करतात आणि वेदबाह्य आचरण करून बाष्कळपणा करीत नाहीत. इतके सांगून झाल्यावर समर्थ म्हणतात–

मुख्य सद्गुरूचे लक्षण । आधी पाहिजे विमळ ज्ञान । निश्चयाचे समाधान । स्वरूपस्थिती ॥ ५.२.४५ ॥ याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति

उदासीन केवळ। विशेष आचरें निर्मळ। स्वधर्माविषयी ॥ ४६॥ याहीवरी अध्यात्मश्रवण। हरिकथानिरूपण। जेथे परमार्थविवरण। निरंतर ॥ ४७ ॥ जेथे सारासारविचार। तेथे होय जगदुद्धार। नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी ॥ ४८ ॥ म्हणोनि नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिले साधन। हें सद्गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे ॥ ४९ ॥ अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन। तेथे बहुत भक्तजन। विश्रांति पावती ॥ ५० ॥ नाही उपासनेचा आधार। तो परमार्थ निराधार। कर्मेविण अनाचार। भ्रष्ट होती ॥ ५१ ॥ म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि भजन। कथानिरूपण श्रवणमनन। नीति न्याय मर्यादा ॥ ५२ ॥ यामध्ये एक उणे असे। तेणें तें विलक्षण दिसें। म्हणोनि सर्वहि विलसें। सद्गुरूंपाशी ॥ ५३ ॥

एकनाथी भागवताच्या तिसऱ्या अध्यायात नाथांचीही सद्गुरूची विविध लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत. " आता सद्गुरूची जी स्वाभाविक लक्षणे असतात ती मीं तुला सांगतो. ती ऐकून तुझे अंतःकरण सद्भावाने सुखी होईल. सद्गुरू दीनांवर शरीराने स्पर्शदीक्षा देऊन, वाणीने शब्ददीक्षा देऊन व मनाने कृपादीक्षा देऊन अत्यंत कृपा करतात. ते शिष्यांची संसारबंधने तोडतात व अहंकार समूळ नाहीसा करतात. ते शब्दज्ञानामध्ये पारंगत असतात. ब्रह्मानंदाने सदा डुलत असतात आणि शिष्याला आत्मभावाने अधिकाराप्रमाणे बोध करण्यास समर्थ असतात. ज्याचा जसा भाव असतो तशीच प्रतीती शिष्याला सद्गुरू आणून देतात. ते गुरुत्वाचा अहंभाव अणुमात्रही धरीत नाहीत. शिष्यापासून सेवा करून घेण्याची कल्पना कधी स्वप्नातही त्यांच्या चित्तात उद्भवत नाही. उलट स्वतः शिष्याची सेवा करणे व आपल्या शिष्याला पूज्यत्वाने पाहाणे हा सद्गुरूंचा स्वभावच आहे. " शिष्याला पुत्रासमान पाहाणे " हे स्मृतिवाक्य याविषयी प्रमाण आहे. त्यामुळे शिष्याला कमी समजणे हे त्यांना ठाऊकच नसते. त्याला ते पूर्ण ब्रह्मभावाने पाहातात. शिष्य आपल्या भावनेनेच सद्गुरूंची सेवा करतो. पण सद्गुरू त्याला आपला सेवक म्हणत नाहीत. कारण ज्यांना सर्व भूते भगवद्रूप झालेली असतात. त्यांना शिष्य हा सेवक आहे ही भावनाच राहात नाही. मी हा असा एक महायोगी आहे असेही ते जगात मिरवीत नाहीत. ते आपल्या अंगी सद्गुरूत्वाचा ताठा केव्हाही भरू देत नाही व आपल्या चरितार्थाचा भार स्वप्नातही शिष्यावर घालीत नाहीत. उलट शिष्याचे अत्यंत

मोठे संकटही ते स्वतःच निवारण करतात. मी एक अकर्ता आत्मयोगी आहे अशा अभिमानाने ते विषयांचा भोग घेत नाहीत व स्वतः त्याचा त्यागही करीत नाहीत. असे सद्गुरू प्रारब्धाच्या अनुसार जे प्राप्त होईल ते देहाकडून करवून परब्रह्मचिंतनात निमग्न असतात देह पालखीत बसला किंवा विष्ठेत पडला तरी त्या दोहोंचेही सुखदुःख त्यांच्यापुढे ' मी ' म्हणून कधीच उभे राहात नाही. देहात असूनही त्यांना अहंकार व गृहासक्ती असत नाही. उलट ते व्यवहारात लौकिक स्थितीला अनुसरून लोकांप्रमाणे सुखाने वागतात. सद्गुरूची पत्नी त्यांना हा माझा पती असे म्हणते, पुत्र हे माझे वडील आहेत असे म्हणतो व शिष्यं हे माझे गुरू आहेत असे म्हणतो. परंतु सद्गुरू हे तत्त्वतः त्या सर्वांपासून अलिप्त राहून त्यांच्यात असतात. अशाप्रकारे आपल्या पूर्ण प्रतीतीने ते ईश्वराची भक्ती करून दाखवितात आणि सर्व भूतांमध्ये हरीचे भजन करावे असाच शिष्यांना उपदेश करतात.

सद्गुरूची ही स्वाभाविक लक्षणे पंडितांना पांडित्याच्या अभिमानामुळे कळत नाहीत. जे पूर्णानुभवी असतात ते सद्गुरूची खूण ओळखतात. इतरांचे ज्ञान त्यांच्या ठिकाणी कुंठित होते. पूर्ण शांती ही सद्गुरूची खरी खूण आहे. तेच सद्गुरुत्वाचे मुख्य लक्षण व भूषण आहे.

सत् शिष्याची लक्षणे :–

शक्तिपातयोगाचे साधन करणाऱ्या साधकाच्या ठिकाणी उत्तमोत्तम लक्षणे असणे आवश्यक असते. अशी लक्षणे ज्या साधकाच्या ठिकाणी मूलतः असतात त्याला शास्त्राने सांगितलेली फले त्वरित मिळतात. ज्या साधकाच्या ठिकाणी ही लक्षणे नसतात त्याने ती लक्षणे अंगी बाणविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शरणागती :–

सद्गुरूला सर्वार्थाने शरण जाणे हे सत् शिष्याचे सर्वात मोठे लक्षण आहे. कारण अशा प्रकारे शिष्य शरणागत झाल्याशिवाय शक्तिसंक्रमणाची भूमीच उपलब्ध होऊ शकत नाही. शरणागती हे एक रहस्य आहे. **" सर्व साधनहीनस्य पराधीनस्य सर्वथा । पापहीनस्य दीनस्य कृष्ण एव गतिर्मम ॥ "** हे गुरुराया मी अगदी साधनहीन मनुष्य आहे. मायेमुळे सर्वार्थाने पराधीन झालो आहे व पापांच्या भाराखाली दबून गेलो आहे. असा मी दीन आहे. तूच माझी गती आहेस," असे म्हणून शिष्य जेव्हा सद्गुरूला शरण जातो तेव्हाच तो दीक्षेला पात्र ठरतो. ही दीनत ा

व शरणागतता म्हणजे खरी निरभिमानता व अहंकारशून्यता होय. या अर्थानेच कुलार्णव तंत्रात शिष्याची व्याख्या करताना म्हटले आहे की –

शरीरमर्थं प्राणांश्च सद्गुरुभ्यो निवेद्य यः । गुरुभ्यः शिक्षते योगं शिष्य इत्यभिधीयते ॥

जी व्यक्ती तन, मन, धन व प्राण गुरूला समर्पण करून योगाचा अभ्यास करते व योग शिकते तिलाच वास्तविक शिष्य म्हटले जाते.

श्रीसमर्थांनीही शरणागतीला अनन्यसाधारण महत्त्व देऊन सच्छिष्याची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. त्यावरून हे लक्षण किती श्रेष्ठ व महत्वाचे आहे हे स्पष्ट होते.

मुख्य सच्छिष्याचे लक्षण सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ ५.३.१९ ॥ लागता सद्गुरुवचनपंथे । झाले ब्रह्मांड पालथे । तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ॥ ५१ ॥ शरण सद्गुरुसि गेले । सच्छिष्य ऐसे निवडले । क्रियापालटें झालें । पावन ईश्वरीं ॥

विविधगुण :–

इतरही अनेक गुण सच्छिष्याचे ठिकाणी असावेत म्हणून शास्त्रकारांनी त्यांचा परोपरीने व आवर्जून निर्देश केला आहे. कुलार्णव तंत्राच्या त्रयोदश उल्लासात पुढील लक्षणे सांगितली आहेत. "जो साधक सद्गुरूने दिलेल्या समाधीच्या साधनात सतत निमग्न असतो, गुण व शीलादी शुभलक्षणांनी युक्त असतो तोच शिष्य तत्त्वज्ञानाची दीक्षा देण्यास उत्तम अधिकारी असतो. शुद्ध मनाचा, श्रद्धाभक्तियुक्त, शास्त्राचा जाणकार, चांगल्या सदृढ शरीराचा, स्वच्छवस्त्र धारण करणारा, विचारपूर्वक कर्म करणारा, उदारचित्त, गंभीर, मिताहारी, सर्व कार्यात दक्ष, निरभिमानी व निष्काम सेवा करणारा जो साधक असतो तोच योगदीक्षेला अधिकारी सच्छिष्य असतो.

सच्छिष्य सर्व कार्यात कुशल असतो. स्वच्छता, कृतज्ञता, पापभिरूता, सर्वांवर उपकार करण्याची वृत्ती व साधुसज्जनांना अनुकूल वर्तन करणे, विश्वास, विनय, आस्तिकता, दानशीलता, सर्वांचे हित पाहाण्याची वृत्ती, विचक्षणता, उत्साह, प्रयत्नशील, असाध्य साध्य करणारा, अनुकूल कार्य करणारा, प्रमादरहित तपस्या करणारा असा शूरवीर पुरुषच ब्रह्मज्ञानाची दीक्षा देण्याला योग्य असतो.

सच्छिष्य हा सर्वांशी हितकर, दूषणरहित, परिमित व आनंदप्रद भाषण करतो. तो अत्यंत बुद्धिमान व चतुर असतो. त्याला एखादी गोष्ट एकदा सांगितली की त्याचा अर्थ त्याला त्वरित समजतो. असा बुद्धिमान शिष्यच दीक्षेचा अधिकारी असतो. सच्छिष्याला आपली स्तुती व दुसऱ्याची निंदा ऐकणे आवडत नाही. तो नेहमी अत्यंत प्रसन्न असतो. दुसऱ्यांचे आवडते व चांगले काम करण्यात तो तत्पर असतो. असा जितेंद्रिय, संतुष्ट, बुद्धिमान व ब्रह्मचारी सच्छिष्य योगदीक्षेचा अधिकारी असतो. सच्छिष्य मनस्ताप, दुश्चिन्तादी अंतःकरणाची पीडा, शारीरिक रोग, चंचलता, दुःख, भ्रांती व संशय यापासून मुक्त असतो. तो नेहमी गुरूचे ध्यान, स्तुती, कथा व देवतार्चनामध्ये निमग्न असतो.

श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनीही सच्छिष्याची लक्षणे दासबोधात फार सुंदर कथन केली आहेत. ते म्हणतात–

शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशील । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥५।३।२०॥ शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारी ॥ २१ ॥ शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥२२॥ शिष्य पाहिजे अतिधीर । शिष्य पाहिजे अति उदार । शिष्य पाहिजे अतितत्पर । परमार्थाविषयी ॥२३॥

याप्रमाणे पुढील लक्षणेही समर्थांनी आवर्जून सांगितली आहेत. सच्छिष्य हा परोपकारी, निर्मत्सरी, अर्थाकडे लक्ष देणारा, अत्यंत शुद्ध, परम सावध, अपार गुणांचा, प्रज्ञावंत, प्रेमळ भक्त, नीतीवंत, मर्यादाशील, युक्तिवंत, बुद्धिवंत, सदसद व नित्यानित्य विचारी, दृढ व्रताचा, उत्तम कुळाचा, पुण्यशील, सात्त्विक, भजनशील, उत्तम साधक व साधनकर्ता, विश्वासू, शरीर क्लेश सोसणारा, परमार्थ वाढविणारा, स्वतंत्र, जगन्मित्र व सत्पात्र असावा. इतके सांगून समर्थ म्हणतात–

याकारणे दृढ विश्वास । तोचि जाणा सच्छिष्य । मोक्षाधिकारी विशेष । अग्रगण्य ॥ ५.३.३८ ॥ जो सद्गुरुवचने निवाला । तो सायुज्यतेचा आंखला । संसारपांगे पांगिला । न वचे कदा ॥ ३९ ॥ सद्गुरुहूनि देव मोठा । जयास वाटे तो शिष्य करंटा । सुटला वैभवाचा फाटा । सामर्थ्य पिसे ॥ ४० ॥

गुरुभक्तीचा उच्च आदर्श :-

शक्तिपातयोगाचे खरे रहस्य गुरुभक्तीत आहे. हे रहस्य आत्मसात

करून साधकाने आपण ज्या परिस्थितीत आहोत त्या परिस्थितीत राहून गुरुभक्ती केली पाहिजे. अनुकूलताभेदाने गुरुभक्तीच्या अंगोपांगात फरक दिसला तरी फलप्राप्ती मात्र एकच राहाणार असल्याने न्यूनाधिक्य न मानता आपल्याला सोईचा, साजेलसा व झेपेलसा प्रकार अंगिकृत करून शरणागती पत्करली म्हणजे गुरुभक्तीचे म्हणजेच पर्यायाने ब्रह्मप्राप्तीचे रहस्य आत्मसात केल्यासारखे होईल.

गुरुपादुकापूजन :–

श्रीसद्गुरूंच्या पादुकांचे पूजन करणे हा गुरुभक्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. या देवदुर्लभ मार्गाचे माहात्म्य कथन करताना कुलार्णव तंत्राच्या द्वादश उल्लासात पुढील वर्णन आले आहे. पार्वती म्हणाली, "हे कुलेशा ! दयाळू महादेवा ! गुरुपादुकांच्याबद्दल साधकाच्या अंतःकरणात भक्ती व आचार कसा असावा हे ऐकण्याची माझी इच्छा आहे. तरी आपण कृपा करून त्यासंबंधी मला सांगावे." महादेव म्हणाले, "हे देवी, तू मला जो प्रश्न विचारलास त्याचे उत्तर सांगतो ते ऐक. माझे म्हणणे नुसते ऐकले तरीसुद्धा साधकाच्या अंतःकरणात भक्ती उत्पन्न होते. कोट्यावधिमहाज्ञानांहून, कोट्यावधिमहाव्रतांहून व कोट्यावधि-महादानांहूनही, श्रीसद्गुरूंच्या पादुकांचे स्मरण श्रेष्ठ आहे तसेच कोटी-कोटी मंत्रांच्या जपाहून, कोटीकोटी पुण्यतीर्थांच्या स्नानाहून व कोटीकोटी देवांच्या पूजनाहूनही श्रीसद्गुरुमहाराजांच्या पादुकांचे स्मरण श्रेष्ठ आहे. मोठमोठे रोग, उत्पात, दोष, भय, पाप व महाभयानक आपत्तीतून श्रीसद्गुरूंच्या पादुकांचे नुसते स्मरण केले तरी संरक्षण होते. तसेच दुष्टाचार, दुष्कीर्ती, दुःसंगती, दुष्टखाद्य, दुःसंग्रह आणि दुष्टबुद्धी यापासूनही पादुकांचे नित्य स्मरण करणाऱ्या साधकाचे रक्षण होते. ज्याच्या वाणीने नित्य गुरुपादुकास्मरण होत आहे त्याने वेदांचे अध्ययन केले, स्मृती पाहिल्या, सर्व देवांचे पूजन केले, सर्व काही पाहिले, यच्चयावत सर्व दिले आणि समस्त जाणले आहे असे म्हणावयास काहीही हरकत नाही असे निश्चित समज. भक्तिभावाने एकवेळ जरी श्रीगुरुपादुकांचे स्मरण केले तरी सर्व पातकांचा नाश होऊन श्रेष्ठ गती मिळते. शुची किंवा अशुची अशा कोणत्याही अवस्थेत पादुकांचे स्मरण केल्यास धर्मादी चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती अगदी अनायासाने होते. श्रीगुरुचरणकमल जेथे आहेत त्या दिशेला दररोज भक्तीने नमस्कार करावा. हे पार्वती ! पादुका-स्मरणापेक्षा श्रेष्ठ मंत्र नाही. गुरुपेक्षा श्रेष्ठ देव नाही. शास्त्रापेक्षा श्रेष्ठ ज्ञान नाही आणि कुलपूजनाइतके श्रेष्ठ पुण्य नाही. गुरुमूर्तीचे ध्यान हे

सर्व ध्यानात म्हणजे ध्येयवस्तूमध्ये श्रेष्ठ आहे. गुरुचरणपूजा ही सर्व पूजेत श्रेष्ठ पूजा आहे कारण सर्व पूज्य वस्तूत गुरुपाद अतिशय पूज्य आहेत. गुरुवचन हे सर्व मंत्राहून श्रेष्ठ आहे आणि मोक्षप्राप्तीचे श्रेष्ठ कारण गुरुकृपाच आहे. हे कुलनायके ! या जगात गुरुवाचून दुसरे काहीच नाही म्हणून भक्तियुक्त अंतःकरणाने सिद्धीसाठी म्हणजे मोक्षासाठी श्रीगुरूचीच सेवा करावी."

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनीही मोक्षप्राप्तीसाठी श्रीगुरूच्या पादुकांची पूजा कशी करावी याचे ज्ञानेश्वरीच्या १५ व्या अध्यायात फार बहारीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, "आता आपले हृदय चांगले स्वच्छ व शुद्ध करून त्यावर श्रीगुरूच्या पादुकांची स्थापना करू म्हणजे हृदय-कमळाचे ठिकाणी श्रीगुरूचे चरण दृढ धारण करू. नंतर मनातील सर्व भेद नाहीसा करून ऐक्यभावाच्या ओंजळीत सर्व इंद्रियांच्या फुललेल्या कळ्या भरून त्याच्या चरणावर वाहू. म्हणजे सर्व इद्रियांना एकवटून त्यांचे व्यापार त्या चरणाचे ठिकाणीच अनन्यभावानें समर्पण करू.श्रीगुरुचरणांना अनन्यभावरूपी स्वच्छ उदकाने स्नान घालून नंतर श्रीगुरुचरणनिष्ठारूप-वासनेच्या सुवासिक चंदनाचे बोट लावू. प्रेमरूपी सोन्याचे पैंजण घडवून ते श्रीगुरूंच्या सुकुमार पायात घालू. दृढप्रेमाची एक व शुद्ध अव्यभिचारी प्रेमाची एक अशा दोन उत्तम अंगठ्या श्रीगुरूंच्या दोन चरणांच्या बोटात घालू. आनंदरूपी सुगंधाने परिपूर्ण भरलेली व अष्टसात्त्विक भावांनी भरलेल्या कळीच्या सर्व पाकळ्या उमलेले अष्टदळात्मक कमळ श्रीगुरुचरणांवर वाहू. श्रीगुरूच्या पूजेच्या वेळी अहंकाररूपी धूप जाळू. मी नाही, सर्व एक श्रीगुरूच आहेत, या अद्वैतबुद्धिरूप दीपाने त्यांच्या चरणांचो आरती करू व शेवटी श्रीगुरूच्या प्रेमाने साक्षित्वही सोडून देऊन श्रीगुरूंशी समरस होऊन व त्यांचे चरणपोटाशी कवटाळून धरू. माझे शरीर व प्राण यांच्या पादुका करून श्रीगुरूचरणी घालू व त्या चरणावरून भोग व मोक्ष दोन्ही ओवाळून टाकू. जो कोणी परम भाग्यवान असेल त्यालाच या प्रकारची श्रीगुरुचरणांची सेवा प्राप्त होईल. मोक्षासकट सर्व अर्थांची प्राप्ती करुन देणे हे या सेवेचे फल आहे.

"सामरस्य या महामिलन" या आपल्या लेखात श्रीगोपीनाथ कविराज यांनी श्रीगुरुपादुकांचे एक चरम रहस्य सांगितले आहे. ते म्हणतात, " परमतत्त्वाच्या बरोबर होणारे जे सामरस्य त्याच सर्वोत्तम गुरुपादुका होत. स्वप्रकाशित असे जे शिवरूप आहे ते रूपसुद्धा गुरुपादुका या नावानेच ओळखले जाते. विमर्श किंवा शक्तिलाही गुरुपादुकाच म्हटलें

जाते. परंतु ज्या ठिकाणी शिवशक्तीचे ऐक्य किंवा सामरस्य होते त्यालाच श्रेष्ठ गुरुपादुका म्हणतात. गुरू हे परम शिवस्वरूप आहेत. शिवसुद्धा श्रीगुरूची पादुका आहे व शक्ती ही पादुकाच आहे. या दोहोंची समरसता म्हणजे परा पादुका होत.

स्वप्रकाशशिवमूर्तिरेकिका तर्द्विमर्शतनुरेकिका तयोः ।
सामरस्यवपुरिष्यते परा पादुका परशिवत्मनो गुरोः ॥

सेवा :–

गुरुभक्तीच्या उच्च आदर्शातील "सेवा" हा प्रकार अत्यंत मधुर गोड, गहन व कठीण असा आहे कारण या प्रकारात इतक्या संमिश्र भावनांचा व अनुभवांचा मिलाफ झालेला असतो की त्याचे वर्णन करणे कठीण आहे. असे असले तरी श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी १३ व्या अध्यायात आचार्योपासन या पदावर टीका करताना या प्रकाराचे फार बहारीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, "हे चतुर पुरुषांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना ! आता यानंतर गुरुभक्तीचा प्रकार सांगतो तो तू ऐक. ही गुरुसेवा म्हणजे संपूर्ण सद्भाग्याला जन्म देणारी माता आहे. कारण ती त्रिविध दुःखाने पोळलेल्या जीवाला अविनाशी सुखस्वरूप असे ब्रह्म करून सोडते. ती सद्गुरूची सेवा कशी करायची हे तुला आता सविस्तर सांगतो. तेथे तुझे संपूर्ण लक्ष एकाग्र होऊ दे. गंगा संपूर्ण पाण्याचे ओघ घेऊन समुद्राला मिळते. संपूर्ण श्रुतीचा अभिप्राय ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीच सामावून गेलेला असतो. किंवा पतिव्रता स्त्री आपल्या ठिकाणी असलेले सर्व गुणावगुण योग्यायोग्यतेंचा विचार न करता आपल्या प्रिय पतीस समर्पण करते. त्याप्रमाणे साधकाने आपले अंतर्बाह्य गुरुकुलाला समर्पण करून आपल्या मनाला श्रीगुरूच्या प्रेमरूपीभक्तीचे घर केले पाहिजे. ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री पतीचा विरह असताना मनात अखंड पतीचेच चिंतन करते त्याप्रमाणे गुरुभक्ताचे अंतःकरणात ज्या देशात श्रीगुरूच्या राहाण्याचे घर असेल त्या देशाचेच सारखे चिंतन असते. ज्या दिशेस गुरू राहातात त्या दिशेकडून वारा येत असेल तर त्या वाऱ्यासही साधक सामोरा धावतो व त्या वाऱ्याला लोटांगण घालून "आपण माझ्या घरी आगमन करावे" अशी प्रार्थना करतो. निर्व्याज प्रेमाने वेडा झाल्याने साधकाला त्या दिशेशीच बोलावेसे वाटते. साधक आपला जीव गुरुगृही कायम अडकवून ठेवतो. वासराला दावे अडकवून बांधले की त्याचा देह जरी गोठ्यात असला तरी त्याचे सर्व लक्ष गाईकडेच लागलेले असते. त्याप्रमाणे गुरूने आज्ञा दिलेली असल्यामुळे शिष्य देहाने आपल्या गावी

राहातो. मात्र त्याचे सर्व लक्ष सतत गरुगृहाकडेच असते. त्यामुळे त्याला सतत असे वाटत असते की संसारबंधनाचे हे दावे केव्हा तुटेल ? हे बंधन सुटून श्रीसद्गुरूस्वामींची भेट केव्हा होईल ? अशी चिंता सतत लागलेली असल्यामुळे साधकाला एक एक क्षणही युगापेक्षा मोठा भासत असतो. अशा स्थितीत गुरूच्या राहात्या गावाहून कोणी आल्यास किंवा श्रीगुरूंनीच त्याच्याकडे एखादा मनुष्य पाठविला तर आयुष्य संपलेल्या माणसाला आयुष्य प्राप्त व्हावे तशी त्याची स्थिती होते.

सुकत असलेल्या अंकुरावर अमृताचा वर्षाव झाला की त्याला नवजीवन प्राप्त होते. डबक्यातील मासा समुद्रात आला की त्याला डबके आटून गेल्यामुळे मरणाची भीती नाहीशी होते व भव्यता प्राप्त होते. दरिद्री माणसाला धनाचा हंडा सापडला की निरतिशय आनंद होतो आंधळ्याला डोळे प्राप्त झाले की नवे विश्व त्याच्यापुढे उभे राहाते व भिकाऱ्याला इंद्रपद प्राप्त झाले की त्याचे मूळ स्वरूपच पालटते. वरील गोष्टीप्रमाणेच श्रीगुरूच्या कुळाचे नाव ऐकताक्षणीच साधकाची स्थिती होते. त्याला निरतिशय सुख होते. त्यामुळे तो इतका मोठा होतो की त्याला वाटते आकाशही अगदी सहज कौतुकाने कवटाळता येईल. याप्रमाणे गुरुकुळादिकांच्या ठिकाणी ज्याची अशी प्रीती व तळमळ असलेली दिसेल त्याच्यापाशी ज्ञान हे त्याची सेवा करीत आहे असे समजावे. "

येथपर्यंत स्मरणसेवेचे वर्णन केल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अर्चनसेवेचे वर्णन केले आहे " श्रीगुरूविषयी साधकाच्या अंतःकरणात नितांत प्रेम असते. या प्रेमाच्या बळाने तो श्रीगुरूचे रूप ध्यानात आणून उपासना करतो. प्रथम साधक शुद्ध अशा हृदयाचा किंवा अंतःकरणाचा तट अगर आवार उभे करतो. मग आराध्य अशा श्रीगुरूच्या रूपाला तो ध्रुवाप्रमाणे अंतःकरणात अचल स्थापन करतो. नंतर सर्व मनोभाव व सेवासाहित्य यांच्या रूपाने आपणच आहोत अशी बुद्धी धारण करून चैतन्याच्या चौथऱ्यावर ब्रह्मानंदाचे देऊळ उभारून व त्या देवळात श्रीगुरुरूपी शिवलिंगाची स्थापना करून त्याच्यावर ध्यानरूपी अमृताचा अभिषेक करतो. अशा प्रकारच्या पूजेने प्रातिभज्ञानाचा सूर्य उगवतो. त्यामुळे अद्वैतज्ञान होते. अशा ऐक्यज्ञानरूप बुद्धीच्या परडीत अष्ट-सात्त्विकभावांची लाखलाख कमळे भरून ती श्रीगुरुरूप त्र्यंबकाला वाहातो. प्रातःकाळ, माध्यान्हकाळ व सायंकाळ असे जे शिवपूजेकरिता म्हणजे साधनाकरिता तीन शुद्ध काळ सांगितले आहेत त्या तिन्हीकाळी साधक उदित शक्तीच्या साहाय्याने जीवदशेचा धूप जाळीत असतो आणि ज्ञान-

दीपाने श्रीगुरूला अखंड ओवाळतो. श्रीगुरूच्या ऐक्याने प्राप्त झालेल्या समरस स्थितीचा नैवेद्य साधक अखंड अर्पण करीत असतो व याप्रमाणे श्रीगुरूला शिवलिंग करून आपण पुजारी होतो. "

यानंतर सख्यभक्तीने सेवा कशी करावी हे सांगतात. " एखाद्या-वेळी साधक जीवरूप शय्येवर श्रीगुरुरूप शिवाला पती करून त्याचा भोग घेतो. अशी नानाप्रकारे साधकाची बुद्धी प्रेमाच्या उल्हासाने स्फुरत असते. साधनरत असताना जेव्हा साधकाच्या अंतःकरणात एखाद्यावेळी प्रेम दाटून आले की त्या प्रेमाला साधक दुधाचा सागरच समजतो. तेथे ध्येय, ध्यान व अपार सुख ही त्रिपुटीच निर्दोष अशी शेष-रूप गादी आहे व त्यावर शयन करणारे भगवान विष्णू श्रीगुरू आहेत अशी भावना करतो. मग साधक त्या श्रीगुरुरूपी विष्णूची सेवा करणारी लक्ष्मी आपण होतो आणि आपणच गरूडही होऊन हात जोडून सन्मुख उभा राहातो. नाभीपासून जन्मलेला ब्रह्मदेव मीच होय अशी साधक भावना करतो. याप्रमाणे श्रीगुरुमूर्तीच्या प्रेमाने आपल्या ठिकाणी नाना-प्रकारच्या सेवकाच्या भावना करून ध्यानाचे सुख उपभोगतो. एखाद्यावेळी श्रीगुरूला प्रेमाच्या बळावर आपली आई समजून मी तिचे स्तनपान करीत आनंदाने तिच्या मांडीवर लोळत आहे अशी भावना करतो. किंवा चैतन्य वृक्षाचे खाली बसणारे श्रीगुरू हे गाईसारखे असून आपण तिच्या पोटाशी बसत असलेले वासरू होतो. एखाद्या वेळी श्रीगुरूच्या कृपाप्रेमरूप पाण्या-तील आपण मासोळी आहोत अशी साधक भावना करतो. माझे श्रीगुरू कृपारूप अमृताची वृष्टी असून त्याखाली आपण सेवावृत्तीरूप रोप आहोत असे साधकाला वाटते."

दास्यभक्तीने सेवा साधक कशी करतो हे सांगताना म्हणतात, " साधक श्रीगुरूंची अशी सेवा करतो की त्याच्या सेवेचे कौतुक करून ते प्रसन्न होऊन इच्छित वर माग म्हणतील मग साधक प्रार्थना करतो की हे गुरुदेवा ! तुमच्या सेवेला जेवढा काही सेवकवर्ग लागतो तो संपूर्ण एक मीच व्हावे आणि आपल्या सेवेला साहाय्यभूत होणारी जेवढी काही उपकरणे व सामग्री आहे ती सर्व माझीच रूपे व्हावीत. असा वर मी मागेन व श्रीगुरू प्रसन्न होऊन हो म्हणतील. मग त्यांचा सर्व परिवार व उपचार सामग्री मीच होईन. अशा प्रकारे देह असेपर्यंत व देहपाता-नंतरही सेवा करीन अशी साधकाची बुद्धी असते. पृथ्वीच्या ज्या भागा-वर श्रीगुरूचे चरण उभे राहातील त्या मातीत मी शरीरातील मातीचा अंश मिळवीन असे साधक म्हणतो. माझे श्रीगुरुस्वामी ज्या पाण्याला

कौतुकाने स्पर्श करतात त्या पाण्यामध्ये मी आपल्या शरीरातील जलाच्या अंशाचा लय करीन. ज्या दिव्याने श्रीगुरूला ओवाळले जाईल किंवा जे दिवे श्रीगुरूच्या घरी उजळले जातील त्या दिव्यांच्या तेजात मी आपल्या शरीरातील तेजाचा अंश मिळवीन. श्रीगुरूला वारा घालण्याकरिता असलेली चवरी किंवा पंखा यांच्यात मी आपल्या प्राणवायूचा लय करून श्रीगुरूच्या अंगाला वारा घालणारा सेवक होईन. ज्या ज्या पोकळीत आपल्या परिवारासह श्रीगुरू असतील त्या त्या पोकळीत मी आपल्या शरीरातील पोकळीचा लय करीन. पण जिवंतपणी आणि मेल्यावरही श्रीगुरूची सेवा केल्याशिवाय मी राहाणार नाही. एक क्षण देखील लोकांकरिता खर्च करणार नाही. याप्रमाणे कोटयवधी काल मी सेवा करीन असे साधक म्हणतो ''

'' कालाचा विचार ज्याच्या मनात येत नाही त्या साधकाच्या मनात अपार धैर्य असते. तो प्रत्यक्ष तशी अपार सेवाही करतो. साधक सेवारत असताना आता दिवस उगवला व रात्र झाली असे म्हणत नाही. त्याचे तिकडे लक्षच नसते. त्याच्या मनात ही सेवा थोडी झाली व ही जास्त झाली असे येत नाही. उलट श्रीगुरूंची आज्ञा वारंवार होत असताना त्याला सेवेचा अधिक हुरूप येतो. श्रीगुरूंची अशा प्रकारे सेवा करताना श्रीगुरूंच्या मुखातून अमुक काम कर असे निघाल्याबरोबर तो आनंदाने आकाशापेक्षा मोठा होतो आणि एकटाच संपूर्ण सेवा एकाकाळीच करू लागतो. साधकाचे शरीर अंतःकरणवृत्तीच्यापुढे धाव घेते व सेवा करण्याची प्रत्यक्ष कृती ही मनाशी पैज मारते. ''

'' श्रीगुरूंच्या सेवेने साधक कृश होतो. मात्र तो श्रीगुरूंच्या प्रेमाने पुष्ट होतो. श्रीगुरूंची आज्ञा पालन करणे एवढेच त्याला माहीत असते. आपल्या कुलाच्या कुलीनपणामुळे आपल्याला कुलीन न समजत केवळ श्रीगुरूंच्या कुलीनपणामुळे तो आपल्याला कुलीन समजतो. आपल्या बांधवांच्या सौजन्यमुळे आपण सज्जन आहो असे न समजता श्रीगुरुबंधूंच्या सौजन्यामुळे आपण सज्जन आहो असे साधक समजतो. त्याला निरंतर एकमात्र श्रीगुरुसेवेचेच व्यसन लागलेले असते. श्रीगुरुसंप्रदायात परंपरेने चालत आलेले व विहित केलेले धर्म, आचार हेच आपले वर्णाश्रमधर्म आहेत असे साधकाला वाटते. श्रीगुरूची सेवा हे त्याचे नित्यकर्म असते. श्रीगुरू हे त्याचे पुण्यक्षेत्र असून श्रीगुरू हीच त्याची उपास्य देवता असते. त्याचे मातापिता श्रीगुरूच असतात. त्याला श्रीगुरुसेवेवाचून परमार्थ मार्गच माहीत नसतो. श्रीगुरूंचे द्वार हे साधकाचे सारसर्वस्व असते.

आपल्याप्रमाणेच जो गुरुसेवा करतो त्याच्यावर साधक सख्ख्या भावाप्रमाणे प्रेम करतो. साधकाच्या मुखातून रात्रंदिवस श्रीगुरुनामाचा मंत्रोच्चार सारखा चालू असतो. श्रीगुरूच्या वचनावाचून साधकाला दुसरे कोणतेही शास्त्र माहीत नसते. ज्या पाण्यास श्रीगुरूच्या चरणाचा स्पर्श झाला आहे ते पाणी कसलेही असले तरी त्यात संपूर्ण ब्रह्मांडाची तीर्थे साठवली असून ते सर्व तीर्थात श्रेष्ठ आहे असे श्रीगुरुभक्त समजतो. साधकाला अकस्मात श्रीगुरूंचा उच्छिष्ट प्रसाद प्राप्त झाला तर त्या लाभापुढे त्याला समाधी नकोशी वाटते. श्रीगुरू चालत असताना त्यांच्या पायामागून जे धुळीचे रजःकण उडतात ते साधक आपल्या मस्तकावर धारण करतो व त्या लाभामुळे आपल्याला कैवल्यसुखाची प्राप्ती झाली आहे असे समजतो. "

साधनरतता :–

ज्या साधकांना अशा प्रकारची प्रत्यक्ष सेवा करण्याची संधी लाभत नाही त्यांनी निरंतर साधनरत राहून श्रीगुरूंची सेवा केली पाहिजे. शक्तिपातयोगाची दीक्षा मिळाल्यावर जागृत शक्ती श्रीगुरूंच्या रूपाने साधकांमध्ये निरंतर वास करीत असते. तिला सर्वार्थाने शरण गेले म्हणजे ती आतून मार्गदर्शन करते. अशावेळी साधन करणे हीच सर्वात मोठी सेवा **होय.**

गुरुशिष्यसंबंधाची परिणिती :–

गुरुशिष्य भावाची म्हणजे संबंधाची अखेर परिणती कोठे होते हे पाहिले म्हणजे गुरुभक्तीरूप साधनसंपत्तीचे महत्त्व लक्षात घेऊन सुरवातीस म्हटल्याप्रमाणे गुरुभक्तीला मूर्धन्य स्थान का प्राप्त झाले आहे याचाही उलगडा होईल. " सामरस्य या महामिलन " या लेखात श्रीगोपीनाथ कविराज म्हणतात. " शिव आणि शक्तीच्या सामरस्याइतकेच गुरू व शिष्य यांचे सामरस्य महत्त्वाचे व आवश्यक आहे. प्रभुदेवांनी आपल्या वचनामृतात असे म्हटले आहे की शिष्य ज्या प्रकाराने गुरुस्वरूपात विश्रांती प्राप्त करून घेतो त्याचप्रमाणे गुरुसुद्धा शिष्यरूपात विश्रांती प्राप्त करून घेतात. शिष्य ज्याप्रमाणे आपले सर्वस्व अर्पण करुन आपल्या स्वतःला हरवून बसतो व गुरुमध्ये राहाण्याच्या स्थितीचा लाभ करून घेतो त्याचप्रमाणे गुरुसुद्धा शिष्याला आत्मसमर्पण करतात. त्यांच्या या कृतीमुळेच शिष्य गुरुस्वरूपाला प्राप्त होऊ शकतो. गुरूने जर अशाप्रकारे आपल्या स्वतःचा असा त्याग केला नाही अथवा स्वःला समर्पित केले नाही

तर शिष्याला खरा गुरू प्राप्त होऊ शकत नाही आणि शिष्यानेही आपणा स्वतःला सर्वार्थाने समर्पित केले नाही तर गुरूला खरा शिष्य प्राप्त होत नाही. शिष्याच्या हृदयसिंहासनावर जसे गुरू विराजमान झालेले असतात त्याचप्रमाणे गुरूच्या हृदयात सुद्धा शिष्य विराजमान असतो. ऐक्यतेच्या म्हणजेच समरसतेच्या बोधावर प्राप्त होण्याचा हाच एकमेव मार्ग आहे."

सारांश जीवाला ब्रह्मप्राप्ती होण्यासाठी प्रथम विश्रांती आवश्यक आहे. या विश्रांतीचे मूळ सद्गुरू स्वतःच असतात. सद्गुरू वाक्याने, दृष्टीने, स्पर्शाने, कृपाकरून एका क्षणात शरणार्थी शिष्याला चित्तविश्रांती प्राप्त करुन देतात.

किमत्र बहुनोक्तेन शास्त्र कोटिशतेन वा ।
दुर्लभा चित्तविश्रांतिर्विना गुरुकृपां पराम् ॥

या विषयाबद्दल खूप सांगितले किंवा करोडो शास्त्रवचने उद्धृत केली तरी कोणताही लाभ व फायदा होणार नाही कारण गुरूच्या परम कृपेशिवाय चित्तविश्रांती कदापीही प्राप्त होऊ शकणार नाही.

अध्यात्म जीवनात गुरूचे स्थान : –

येथपर्यंत गुरुभक्तीच्या सर्वांगांची चर्चा यावच्छक्य केली. त्यावरुन अध्यात्म जीवनात गुरूचे स्थान काय आहे याची कल्पना साधकाच्या मनात स्पष्टपणे उभी राहाण्यास मदत होईल. श्रीसमर्थांनी दासबोधाच्या अनेक अध्यायामध्ये अध्यात्माच्या वाटचालीत सद्गुरूची अपरिहार्यता सिद्धांत मांडून, दृष्टांत देऊन व फलप्राप्ती सांगून उत्तम रीतीने पटविली आहे. त्यादृष्टीने समर्थ म्हणतात –

सगुण भक्ति ते कळे । निर्गुण भक्ति ते न कळे । हे अवघे प्रांजळ कळे । सद्गुरु केलिया ॥ ४.१०.३१ ॥ जयजयाजी सद्गुरु पूर्ण कामा । परमपुरुषा आत्मयारामा । अनिर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला न वचे ॥ ५.१-१ ॥ जे देवासि सांकडे । जे शब्दासि कानडे । जे सच्छिष्यासि रोकडे । अलभ्य लाभे ॥ २ ॥ जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम । जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥ तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होइजे अंगें । दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ॥ ४ ॥

सद्गुरूविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहतचि गेले ॥ २१ ॥ ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ झालें । म्हणोनि सद्गुरूची पाउले । सदृढ धरावी ॥ २२ ॥ जयास

वाटे देव व्हावा । तेणे सत्संग धरावा । सत्संगेविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥ नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करितीं वेडीं । गुरूकृपेविण कुडकुडी । व्यर्थचि होती ॥ २४ ॥ सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ । सद्गुरुविण तळमळ । जाणार नाही ॥ ३९ ॥ सद्गुरुचेनि अभयकरे । प्रकट होईजे ईश्वरें । जन्मदुःखें अपारें । नासूनि जाती ॥ ४० ॥ मागां झाले थोरथोर । संत महंत मुनीश्वर । तयांसहि ज्ञानविचार । सद्गुरूचेनि ॥ ४१ ॥ श्रीरामकृष्णादिकरुनी । अतितत्पर गुरुभजनी । सिध्द साधू आणि सज्जनी । गुरुदास्य केले ॥ ४२ ॥ सकळ सृष्टीचे चाळक । हरिहर ब्रह्मादिक । तेही सद्गुरुपदीं रंक । महत्वा न चढती ॥ ४३ ॥ असो जयास मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरुविण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे ॥ ४४ ॥

आता नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदयीं वसे ॥ ५ ६. ३४ ॥ न करिता वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास । प्रयत्नेविण सुरस । सद्गुरूकृपा ॥ ३५ ॥

याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ६. १. ३१ ॥

दिसेना जे गुप्त धन । तयास करणे लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन । संगती शोधावा ॥ ६. ९. १९ ॥ रायाचे सन्निध्य होतां । सहजचि लाभे श्रीमंतता । तैसा हा सत्संग धरिता । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥

सांगता नये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें । ऐसें हें सद्गुरुविणें होणार नाही ॥ ६. १०. १० ॥ सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणाशी । पुढे कळेल अनुभवासी । आपेआप वस्तु ॥ ११ ॥

आता आठवीन समर्थां । सद्दुरूसी ॥ ७. १. ११ ॥ जयाचेनि कृपादृष्टी । होय आनंदाचीं वृष्टी । तेणें गुणें सर्वसृष्टी । आनंदमय ॥ १२ ॥ की तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक । कैवल्यपददायक । अनाथ बंधु ॥ १३ ॥ मुमुक्षु चातकी सुस्वर । करुणा पाहिजे अंबर । वोळे कृपेचा जळधर । साधकावरी ॥ १४ ॥ की तें भवार्णवीचें तारूं । बोधें पाविजे पैलपारू । महा आवर्तीं आधारू । भाविकांसी ॥ १५ ॥ कीं तो काळाचा नियंता । नानासंकटीं सोडवितां । कीं ते भाविकांची माता । परम स्नेहाळ ॥ १६ ॥ कीं तो परत्रीचा आधारु । कीं तो विश्रांतीचा थारु । नातरी सुखाचे माहेरु । सुस्वरुप ॥ १७ ॥ ऐसा सद्गुरू पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी । देहेविण लोटांगणी । तया प्रभूसी ॥ १८ ॥

आता मनासि जें अप्राप्त । तें कैसेनि होईल प्राप्त । ऐसें म्हणाल

तरी कृत्य । सद्गुरुविण ॥ ७. २. १२ ॥ भांडारगृहें भरली । परी असती अडकलीं । हातास न येतां किल्ली । सर्वही अप्राप्त ॥ १३ ॥ तरी ते किल्ली ते कवण । मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्त्यासी ॥ १४ ॥ सद्गुरुकृपा तेचि किल्ली । जेणे बुद्धी प्रकाशली । द्वैतकपाटे उघडली । एकसरा ॥ १५ ॥

साधन चतुष्टय : –

नित्यानित्यवस्तुविवेक, वैराग्य, शमादी षट्संपत्ती व मुमुक्षत्व या चार साधनांना साधन चतुष्टय म्हणतात. ही साधनसंपत्ती शक्तिपात-योगाचे साधन करताना क्रमशः वाढत असली तरीसुद्धा शक्तिपातयोगाचे साधन करणाऱ्या प्रत्येक साधकाने ती अंगी बाणविण्याचा खूप प्रयत्न केला पाहिजे. कारण उपरोक्त साधनसंपत्ती साधकाजवळ असली म्हणजे ब्रह्मानुभवाची प्राप्ती त्वरित होण्यास खूपच मदत होते. आपण क्रमशः साधन चतुष्टयाचा विचार करू.

१) नित्यानित्यवस्तुविवेक : –

एकमात्र अखंड चैतन्यरूप ब्रह्मच नित्य असून त्याच्याशिवाय इतर सर्व अनित्य आहे असे जे निश्चयाचे ज्ञान असते त्यास नित्यानित्यविवेक म्हणतात. कूटस्थ केवल परब्रह्म आहे असा जो विचार त्यास नित्यानित्य-वस्तुविवेक म्हणतात. वेदांतसिद्धांतसारसंग्रहामध्ये श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी नित्यानित्यवस्तुविवेकाची व्याख्या हीच केली आहे.

ब्रह्मैव नित्यमन्यत्तु ह्यनित्यमिति वेदनम् सोयं नित्यानित्यव स्तु विवेक इति कथ्यते ॥ १६ ॥

२) वैराग्य :–

साधनसंपत्तीत वैराग्याला फार वरचे स्थान आहे. याची व्याख्या करताना श्रीशंकराचार्य म्हणतात–

ऐहिकामुष्मिकार्थेषु ह्यनित्यत्वेन निश्चयात् । नैस्पृह्यं तुच्छबुध्दया यत्तद्वैराग्यमितीर्यते ॥२२॥

या लोकातील व परलोकातील सर्व सुखे विनाशी असल्यामुळे ती तुच्छ आहेत अशा भावनेने त्या सर्व सुखाविषयी जी वितृष्णता त्यास वैराग्य असे म्हणतात. नित्यानित्यवस्तूच्या विचाराने सर्व अनित्य पदार्थांचे ठिकाणी पुरुषास तत्काळ वैराग्य उत्पन्न होते. सर्व पदार्थांचे ठिकाणी काकविष्ठेप्रमाणे जी किळस उत्पन्न होते त्यास तीव्र वैराग्य म्हणतात. ज्या पदार्थाचे ठिकाणी पुरुषास दोष दिसतात तेथे त्याची प्रवृत्ती होत नाही. म्हणून तीव्र वैराग्य होण्यासाठी भोग्य पदार्थांचे ठिकाणी साधकाने दोष पाहावेत असे श्रीशंकराचार्य म्हणतात.

शमदमादी षट्संपत्ती :–

शम, दम, उपरती, तितिक्षा, श्रद्धा व समाधान यांना षट्सपत्ती म्हणतात.

शम :– श्रणादिव्यवतिरिक्त विषयेभ्यो मनसः निवर्तनं शमः अशी शास्त्रकारांनी शमाची व्याख्या केली आहे. श्रवणादी व्यतिरिक्त विषयापासून मनाच्या निवृत्तीस शम म्हणतात. याचा अर्थच असा आहे की ब्रह्म व ईश्वर विषयांशिवाय शेष संसारसंबंधी सर्व विषयापासून मन निघून केवळ ब्रह्म व ईश्वर यांच्याकडे मन लागणे यालाच शम म्हणतात. विषयांकडून मनाला वळवून स्वरूपी ठेवणे हाच खरा शम म्हणजे शांती होय.

प्रबोधसुधाकर या प्रकरण ग्रंथात श्रीशंकराचार्यांनी मनोनिग्रह प्रकरणात शमाची आवश्यकता किती आहे हे सांगताना असे म्हटले आहे. की, " वाळलेला पोहावयाचा भोपळा जोराने पाण्यात बुडविला तरी तो चटकन् आपोआप वर येतो. त्याप्रमाणे मोठ्या प्रयत्नाने मन हे आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थापन केले तरी अनेक जन्मातील अनात्म संस्कारामुळे ते मन विषयाकडे चटकन वळते. ज्याप्रमाणे गळ्यात लोढणे नसलेले जनावर जिकडे गवत दिसेल तिकडे धावते त्याप्रमाणे अंतःकरणरूप पशू अशुभ मार्गाकडेच जातो. या पशूच्या गळ्यात वैराग्याचे लोढणे अडकविले म्हणजे तो ताब्यात येतो. मनोनिग्रहाचे हे एकच साधन परमेश्वराने निर्माण केले आहे. प्राणायाम, सत्संगती, वासनात्याग व हरिचरणभक्ती ही मनोनिग्रहाची चार साधने शास्त्रात सांगितली आहेत. या साधनाच्या अनुष्ठानाने मन हे विषयाकडे न जाता हळूहळू आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होते. यासाठी मनोनिग्रहरूपी शम अवश्य केला पाहिजे.

दम :–" बाह्येंद्रियाणां श्रवणादिव्यतिरिक्त विषयेभ्यो निवर्तनं दमः । " श्रवणादी व्यतिरिक्त विषयांपासून बाह्येंद्रियांची निवृत्ती यास दम म्हणतात. इंद्रिये ही स्वभावतः बाह्य विषयांकडे धावतात. हा त्यांचा स्वभाव आहे. कठोपनिषदात असे म्हटले आहे की " परमेश्वराने चक्षुरादी इंद्रिये बाह्य विषयांचे ठिकाणीच प्रवृत्त होणारी अशी निर्माण केली आहेत. म्हणून ती बहिर्विषयाकडेच प्रवृत्त होतात. आत्म्याचे ठिकाणी प्रवृत्त होत नाहीत. हा त्यांचा स्वभावच आहे. परंतु ब्रह्मचर्यादी साधनसंपन्न, जितेंद्रिय व मोक्षाची इच्छा करणारा असा एखादाच महापुरुष स्वाभाविक अशा इंद्रियांच्या प्रवाहाचा निरोध करून प्रत्यगात्मप्रवण होतो. त्यालाच आत्मसाक्षात्कार होतो. पाण्याचा प्रवाह स्वाभाविक सखल

भूमीकडे असतो. तो प्रवाह जर वर चढवावयाचा असेल तर त्या प्रवाहाला बांध घालावा लागतो. त्यासाठी प्रथम बाह्य इंद्रियांचा निरोध केल्याशिवाय मनोनिग्रह होत नाही. यासाठी दम केला पाहिजे.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी दम ही फार मोठी साधनसंपत्ती मानून ज्ञानेश्वरीमध्ये जागोजाग त्याचे वर्णन केले आहे " **आतां आत्मप्रभा नित्य नवी। तेचि करूनी ठाणदिवी। जो इंद्रियांते चोरुनि जेवी। तयासीचि फावे** ॥ ६. २३ ॥ या एकाच ओवीत दमाचे सार आले आहे. जो साधक नित्य नवे नवे अनुभव घेत ज्ञानरूप आत्मप्रकाशाचा ठाणदिवीसारखा उपयोग करुन इंद्रियांना कळू न देता म्हणजे त्यांचे दमन करून नियमित साधना करतो त्यालाच कैवल्यरसाचा स्वाद घेता येतो व ब्रह्म प्राप्ती होते.

उपरती :–विषयप्रवृत्तीची एकवेळा निवृत्ती झाल्यावर पुन्हा ती प्रवृत्ती जागृत न होणे याला उपरती म्हणतात. शास्त्राज्ञेनुसार कर्मकांडाचा त्याग करुन संन्यास ग्रहण करण्याला उपरती म्हणतात. शमदमादी साधनांनी बहिर्विषयांपासून निवृत्त केलेली जी इंद्रिये, त्या इंद्रियांचा श्रवणादिव्यतिरिक्त विषयांकडे जो स्वाभाविक प्रवृत्तिप्रवाह तो वळवून आत्मस्वरूपाचे स्थिरीकरण करण्यास उपरती अशी संज्ञा आहे.

तितिक्षा :–" **शीतोष्णादिद्वंद्वसहिष्णुता तितिक्षा** । " शीत, उष्ण, मानापमान, लाभालाभ, सुखदुःख हे सहन करणे याला तितिक्षा म्हणतात. " **सहनं सर्व दुःखानां अप्रतिकारपूर्वकं। चिंता विलाप रहितं सा तितिक्षा निगद्यते** ॥ " चिंता, विलाप व कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता सर्व दुःखे सहन करणे याला तितिक्षा म्हणतात. अशी व्याख्या पंचदशीकारांनी केली आहे. सर्ववेदांतसारसंग्रहामध्ये श्रीमदाद्य शंकराचार्यांनी " **अध्यात्मिकादि यद्दुख प्राप्तं प्रारब्धवेगतः । अचिंतया तत्सहनं तितिक्षेति निगद्यते** ॥ " अध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक इत्यादी जी दुःखे प्रारब्धामुळे येतात ती चिंता न करता सहन केली असता त्याला तितिक्षा म्हणतात.

श्रद्धा :–साधनसंपत्तीत श्रद्धेला फार महत्त्व असल्याने याची सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे.

श्रद्धा हीच श्रेष्ठ :

साधकाच्या जीवनात श्रद्धेला अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण शक्तिपातयोगाचे साधन सिद्ध होण्यासाठी श्रद्धेची नितांत आवश्यकता आहे. श्रद्धा ही पायाभूत गोष्ट आहे. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलाच्या

१५१ व्या सूक्तात श्रद्धेचे म्हणजे विश्वास–शक्तीचे माहात्म्य सांगितले आहे. मंत्रदृष्टे ऋषी म्हणतात, " मी असे निश्चयपूर्वक सांगतो की अग्नि-प्रज्वालक आणि हविर्दात्री श्रद्धा दैवापेक्षाही श्रेष्ठ आहे. हे श्रद्धे, दानशूर दात्यांना, तसेच दान न देणाऱ्या कृपणांना माझे भाषण प्रिय व्हावे. उदारदाते इंद्रश्रद्ध सामान्य देवतासदृश मजविषयी श्रद्धा ठेवोत. आकाशीय देव तसेच पृथ्वीलोकीचे देवभक्त धनदात्या श्रद्धेचीच उपासना अंतःकरणपूर्वक करतात. प्रातःकाली, माध्यान्हकाली आणि सायंकाळी पाचारलेल्या हे श्रद्धादेवी, तूं आम्हास श्रद्धायुक्त कर. "

श्रद्धा हीच संपत्ती :

बृहदारण्यक उपनिषदातही ऋषींनी श्रद्धा ही संपत्ती मानली आहे. ह्या साधनसंपत्तीचे फल आत्मसाक्षात्कार आहे म्हणून त्यांनी आर्जवून सांगितले आहे. ऋषी म्हणतात, " **तस्माच्छान्तो दान्त उपरत-स्तितिक्षुः श्रद्धावित्तो भूत्वात्मन्येवात्मानं पश्येत सर्वमात्मनि पश्यति** "। अशा प्रकारे शांत, दांत, उपरत, तितिक्षु व श्रद्धा ही संपत्ती असणारा आत्म्यामध्येच आत्म्याला पाहातो व सर्वत्र आत्मरूप पाहातो. आत्मरूपात स्थिर होण्यासाठी श्रद्धेची किती आवश्यकता आहे याचा साधकाने मनाशी नेहमी विचार केला पाहिजे व ती अंगी बाणविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्रद्धा ही साधनाचा आधार :—

छांदोग्य उपनिषदातही सनत्कुमार नारदसंवादात श्रद्धा, निष्ठा व क्रिया यांचे सुंदर वर्णन आले आहे. " **यदा वै श्रद्दधात्यथ मनुते नाश्रद्द धन्मनुते श्रद्दधदेव मनुते श्रद्धा त्वेव विजिज्ञासितव्येति। श्रद्धा भगवो विजि-ज्ञास इति॥**" सनत्कुमार म्हणतात, " ज्या वेळी मनुष्य श्रद्धा करतो त्या वेळीच तो मनन (साधनाभ्यास) करतो. श्रद्धेशिवाय कोणीही मनन (साधनाभ्यास) करू शकत नाही. खरोखर श्रद्धा ठेवणाराच मनन (साधनाभ्यास) करतो. तेव्हा श्रद्धेचीच विशेषत्वाने जिज्ञासा केली पाहिजे. (म्हणजे श्रद्धा आपल्या ठिकाणी कशी उत्पन्न होईल हे पाहिले पाहिजे). " नारद म्हणतात, " भगवन् ! मी श्रद्धेच्या विज्ञानाची इच्छा करतो. श्रीशंकराचार्यांनी यावर भाष्य करताना " आस्तिक्यबुद्धिः श्रद्धा " म्हणजे आस्तिक्य बुद्धीचे नाव श्रद्धा होय असे म्हटले आहे.

निष्ठेमुळे श्रध्दा उत्पन्न होते :

आता ही श्रद्धा कशी उत्पन्न होते याचे वर्णन करताना ऋषी

म्हणतात, " **यदा वै निस्तिष्ठत्यथ श्रद्दधांति नानिस्तिष्ठच्छ्द्दधाति निस्तिष्ठन्नेव श्रद्दधाति निष्ठा त्वेव विजिज्ञासितव्येति । निष्ठां भगवो विजिज्ञास इति ।।** " सनत्कुमार म्हणतात, ज्या वेळी पुरुषामध्ये निष्ठा उत्पन्न होते त्यावेळी तो श्रद्धा ठेवू लागतो. निष्ठेशिवाय कोणीही श्रद्धा ठेवीत नाही. खरोखर निष्ठा असणाराच श्रद्धा ठेवतो. तेव्हा निष्ठा ही विशेषरूपाने जाणण्याची इच्छा केली पाहिजे. नारद म्हणतात, " भगवन् ! मी निष्ठेला विशेषरूपाने जाणण्याची इच्छा करतो." यावर भाष्य करताना श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे, " **गुरुशुश्रूषादिस्तत्परत्वं ब्रह्म विज्ञाय** " म्हणजे गुरुशुश्रूषा इत्यादी गोष्टींना निष्ठा म्हणतात. ज्याला ब्रह्मज्ञान व्हावे असे वाटत असेल त्याने गुरुसेवा इत्यादींमध्ये तत्पर असले पाहिजे.

साधनामुळे निष्ठा उत्पन्न होते :—

आता निष्ठा कशी उत्पन्न होईल याचे वर्णन करताना ऋषी म्हणतात, " **यदा वै करोत्यथ निस्तिष्ठति नाकृत्वा निस्तिष्ठति कृत्वैव निस्तिष्ठति कृतिस्त्वेव विजिज्ञासितव्येति । कृतिं भगवो विजिज्ञास इति ।।** सनत्कुमार म्हणतात, " ज्या वेळी मनुष्य कृती करतो (साधन करतो) त्याच वेळी निष्ठा ठेवू लागतो. (साधन) कृती केल्याशिवाय कोणाच्याही ठिकाणी निष्ठा उत्पन्न होत नाही. कृती–साधन–केल्यावरच पुरुष निष्ठावान् होतो. याकरिता कृतीची विशेषरूपाने जिज्ञासा केली पाहिजे. (म्हणजे नियमित साधन केले पाहिजे.)"नारद म्हणतात, " भगवन् ! मी कृतीची विशेषरूपाने जिज्ञासा करतो." (प्रत्यक्ष साधन-कृती करण्याचे माहात्म्य फार मोठे आहे,) यावर भाष्य करताना श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे," **यदा वै करोती । कृतिरिन्द्रियसंयमश्चित्तैकाग्रताकरणं च । सत्यां हि तस्यां निष्ठदीनि यथोक्तानि भवन्ति विज्ञानावसानानि ।।** म्हणजे ज्या वेळी मनुष्य कृती करतो त्या वेळी त्याचे विशेष महत्त्व आहे. इंद्रियसंयम व चित्ताची एकाग्रता करण्याला कृती म्हणतात. (शक्तिपातयोगसाधनेत या दोन्ही गोष्टी आपोआप घडून येतात.) या वरील दोन गोष्टी घडून आल्यावर निष्ठेपासून विज्ञानापर्यंत सर्व साधन आपोआप घडून येते.

श्रद्धा पापापासून मुक्त करणारी :

श्रद्धा ही साधकाला सर्व पापापासून मुक्त करणारी शक्ती आहे. या तिच्या सामर्थ्याचे महाभारताच्या शांतिपर्वात २६४ व्या अध्यायात जे वर्णन आले आहे ते पाहाण्यासारखे आहे :—

अश्रद्दधान एवैको देवानां नार्हते हविः । तस्यैवान्नं न भोक्तव्य-मिति धर्मविदो विदुः ॥ अश्रद्धा परमं पापं श्रद्धा पापप्रमोचिनी । जहाति पापं श्रध्दावान् सर्पो जीर्णमिव त्वचम् ॥ ज्यायसी या पवित्राणां निवृत्तिः श्रद्धया सह । निवृत्तशीलदोषो यः श्रद्धावान् पूत एव सः ॥ किं तस्य तपसाकार्यं किं वृत्तेन किमात्मना । श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥

जो श्रद्धासंपन्न नसतो त्याला देवांना होमद्रव्य अर्पण करण्याचा अधिकार नाही व त्याचे अन्न भक्षण करण्याला अयोग्य होय असे धर्म-वेत्ते लोक समजतात. अश्रद्धा हे मोठे पाप आहे व श्रद्धा ही पापापासून मुक्त करणारी आहे ज्याप्रमाणे सर्प आपली जीर्ण झालेली त्वचा टाकून देतो, त्याप्रमाणेच श्रद्धासंपन्न पुरुष आपल्या पातकांचा त्याग करतो. श्रद्धापूर्वक जी अकर्मापासून निवृत्ती तीच सर्व पवित्र पदार्थांमध्ये श्रेष्ठ आहे. आचरणाचे जे रागलोभादी दोष त्यांची निवृत्ती झालेला श्रद्धा-संपन्न पुरुष हाच पवित्र होय. त्याला तपाशी, आचाराशी अथवा शरीराशी काय करावयाचे आहे ? मनुष्य हा श्रद्धेचेच कार्य असतो. ज्याची जशी श्रद्धा असते तो तशा प्रकारचा बनतो.

श्रद्धेमुळे ज्ञानप्राप्ती :

गीतेमध्ये जागोजाग श्रद्धेची आवश्यकता, श्रद्धेचे माहात्म्य व श्रद्धेचे फल यांचे वर्णन केले आहे. साधकाला श्रद्धेची किती आवश्यकता आहे हे यावरून लक्षात येते.

गीतेच्या ४ थ्या अध्यायाच्या ३९ व्या श्लोकात श्रद्धेमुळे ज्ञानप्राप्ती होते हे सांगताना भगवत म्हणतात–

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परःसंयतेंद्रियः । ज्ञानं लब्ध्वा परां शांति-मचिरेणाधिगच्छति ॥

श्रद्धावान म्हणजे परमविश्वासू, साधनपरायण आणि इंद्रिये जिंकलेल्या पुरुषासच ज्ञान प्राप्त होते आणि ते प्राप्त होताक्षणीच त्याला पूर्ण शांती मिळते.

श्रद्धायुक्त योगीच श्रेष्ठ :–

गीतेच्या ६ व्या अध्ययात ४७ व्या श्लोकात श्रद्धेने निरंतर भजन करणारा योगीच श्रेष्ठ होय हे सांगताना भगवंत म्हणतात–

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥

सर्व योग्यांमध्येही जो माझ्या ठिकाणी अंतःकरण लावून श्रद्धेने मला निरंतर भजतो तो योगी मला सर्वात श्रेष्ठ वाटतो.

मनुष्यप्राणी हा श्रद्धाशीलच आहे हे सांगताना अध्याय १६ श्लोक ३ मध्ये भगवंत म्हणतात –

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत । श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥

हे अर्जुना, सर्वांची श्रद्धा त्यांच्या त्यांच्या प्रकृतीस्वभावानुसार बनलेली असते. हा मनुष्यप्राणी श्रद्धाशीलच आहे. ज्याची जशी श्रद्धा असते त्याप्रमाणे तो बनत असतो, हे ओळखून ठेव.

अश्रद्धेमुळे हानी :–

अश्रद्धेमुळे साधकाची तीव्र हानी होते. भगवंतानी गीतेच्या अध्याय ४ श्लोक ४० मध्ये याचे वर्णन केले आहे –

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥

अज्ञानी, श्रद्धाहीन व संशययुक्त असा जो असतो तो अधोगतीला जातो. त्या संशयी पुरुषास इहलोक, परलोक व मोक्षसुख ही प्राप्त होत नाहीत.

अश्रद्धा हीं परलोकाची व इहलोकाची हानी करणारी असल्याने अध्याय १७ श्लोक २८ मध्ये भगवंत म्हणतात–

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् । असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥

हे अर्जुना, अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, आचरलेले तप किंवा इतर कोणतेही कर्म असत् असे म्हटले जाते. ते परलोकात उपयोगी पडत नाही व इहलोकातही उपयोगी पडत नाही.

श्रद्धाहीन पुरुषाला पुनःपुन्हा संसारात यावे लागते याचे वर्णन करताना अध्याय ८ श्लोक ३ मध्ये भगवंत म्हणतात–

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप । अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥

शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना! या आत्मज्ञानरूपी परमधर्मावर श्रद्धा न ठेवणारे पुरुष माझी प्राप्ती न होता मृत्युरूपी संसारमार्गातच पुनः-पुन्हा परत येतात.

यावर श्रीसंतज्ञानेश्वर महाराजांनी फार चांगले भाष्य केले आहे. ते म्हणतात –

पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासी त्वचेचिया पदरा आड । परि तें अव्हेरूनि गोचीड । अशुद्धची सेवी ॥ कां कमलकंद आणि दर्दुरी । नांदणूक एकेचि घरी । परी पराग सेविजे भ्रमरी । येरां चिखलुचि उरे ॥ नातरी निर्दैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्रतरी । परि तेथ बैसोनि उपवास करी । कां दरिद्रें जिथें ॥ तैसा हृदयामध्ये मी राम । असता सर्व सुखाचा आराम ॥ कीं भ्रांतासी काम । विषयांवरी ॥

अर्जुना, पाहा. गाईचे पवित्र आणि गोड दूध अगदी जवळ त्वचेच्या पडद्याच्या आडच असते, पण ते टाकून गोचीड रक्ताचेच सेवन करीत असतो. कमळाचा कंद व बेडूक हे एकाच ठिकाणी राहातात, परंतु कमलकंदातील परागाचे सेवन भ्रमर करतात व बेडकांच्या वाट्याला चिखलच राहातो. दुर्दैवी पुरुषाच्या घरी हजारो मोहरा पुरलेल्या असल्या तरी त्याला ठिकाण माहीत नसल्यामुळे तो (दरिद्री) तेथेच राहून उपवास करतो व दारिद्र्यात दिवस काढतो. त्याप्रमाणे सर्व सुखाचे विश्रांतिस्थान असलेला मी राम मनुष्याच्या हृदयात असता त्या अज्ञानी, अश्रद्ध व भ्रांत पुरुषाची विषयांवर वासना असते.

सामान्यांना श्रद्धा आवश्यक :–

पतंजलींनी योगदर्शनाच्या समाधीपादातील २० व्या सूत्रात सामान्य साधकांना श्रद्धा कशी आवश्यक आहे ते सांगितले आहे. ते म्हणतात, "**श्रद्धावीर्यस्मृतिसमाधिप्रज्ञापूर्वक इतरेषाम्**" म्हणजे ज्यांना नैसर्गिक, स्वयमेव व काही साधन केल्याशिवाय निरोध होत नाही असे लोक श्रद्धा, वीर्य, स्मृती, समाधी आणि प्रज्ञा या पाच गुणांच्या साहाय्याने ही कैवल्य अवस्था प्राप्त करून घेतात. या पाचही गुणांची साधकाला आवश्यकता आहे.

श्रद्धा म्हणजे माता :–

श्रद्धा म्हणजे शास्त्र, गुरू व साधनावर विश्वास होय. साधकाने अभ्यास करण्याला श्रद्धा हा गुण पतंजलीनी प्रथम सांगितला आहे. यावर भाष्य करताना श्री गुलाबराव महाराज आपल्या 'योगप्रभाव' ग्रंथात म्हणतात, श्रद्धा असली म्हणजे आपले हातून योग व्हावा ही तीव्र अभिलाषा उत्पन्न होते. ही श्रद्धा साधकाचे मातेप्रमाणे पालन करते असे व्यास आपल्या भाष्यात म्हणतात.

श्रद्धेमुळे पराक्रम :–

"श्रद्धेमुळे पराक्रम उत्पन्न होतो. हाच दुसरा सांगितलेला वीर्य

गुण होय. (वीर्य म्हणजे साधनाकरिता उत्तरोत्तर उत्साहाची वृद्धी होय.) घरगुती अनेक कामात मनुष्याचे मन गढलेले असते, परंतु योगाची अभिलाषा (श्रद्धा) उत्पन्न झाली म्हणजे पुढे घरचे काहीही होवो असा पराक्रम जास्त येतो. योग करीत असताही मन हे मनुष्याला अनेक कामात ओढीत असते. तुकाराम महाराज म्हणतात–

हागताही खोडी । चळण मोडविते काडी । असे अनावर गुण । आवरावे काय म्हून ।।

अशा वेळी सार काय व असार काय असा विवेक हवा असतो. तो विवेक करण्याला श्रद्धेमुळे पराक्रम जास्त येतो. श्रद्धा ही याप्रमाणे विवेकाचे पोषण करणारी असल्यामुळे तिला व्यासांनी 'मातेप्रमाणे पालन करणारी, म्हटले आहे.'

श्रद्धेमुळे स्मृती :–

श्री गुलाबराव महाराज म्हणतात, " विवेक करणारांचे विशेष लक्ष श्रद्धेमुळे दुसरीकडे जात नाही. अशा प्रकारचा विवेक करिता करिता त्याला स्मृती उत्पन्न होते. स्मृती म्हणजे आपण अभ्यास करीत आहोत, ही आठवण. " (स्मृती म्हणजे ध्येय नेहमी स्मरणात आणून देणारी बुद्धीची निर्मलता होय.)

श्रद्धेने एकाग्रता :–

श्रद्धेमुळे वीर्य व स्मृती प्राप्त होऊन ध्येयाकार बुद्धीची एकाग्रता म्हणजे समाधी प्राप्त होते. मन विषयरहित होते.

श्रद्धेमुळे प्रज्ञाप्राप्ती :–

श्रीगुलाबराव महाराज म्हणतात, " प्रज्ञा म्हणजे बुद्धी नव्हे. प्रज्ञा म्हणजे कोणतीही वस्तू जशीच्या तशी समजणे, तिचे यथार्थ स्वरूप समजणे. स्थूल डोळ्याने जसे जड पदार्थ दिसतात तशी ही प्रज्ञा चेतनाला जाणते. ही प्रज्ञा समाधीनंतरच्या स्थितीत उत्पन्न होते. ती शुद्ध परब्रह्माला जाणते म्हणून तिला कोणी ऋतंभरा म्हणतात. ऋतंभरा म्हणजे सत्याचे पोषण करणारी. "

सारांश, वेद, शास्त्र, ईश्वर, महापुरुषांची वचने व परलोक यांवर प्रत्यक्षपणे विश्वास असणे आणि त्यांच्याबद्दल पूज्यता व श्रेष्ठत्वाची भावना असणे याचे नाव श्रद्धा होय. भगवंताच्या सत्तेवर, त्यांच्या अवतारांवर, त्यांच्या वचनांवर, त्यांच्यां अचिंत्य अशा अनंत दिव्य

गुणांवर, त्यांच्या नामावर, त्यांच्या लीलांवर, त्यांच्या श्रेष्ठत्वावर, शक्तीवर, प्रभावावर, आणि ऐश्वर्य आदी गोष्टींवर प्रत्यक्षाप्रमाणे पूर्ण विश्वास जो ठेवतो त्याला श्रद्धावान म्हणतात. अशा प्रकारची श्रद्धा ज्या साधकाचे ठिकाणी वास करते त्याची उत्तरोत्तर उन्नती होत जाते. अशी श्रद्धा आपल्या ठिकाणी उत्पन्न व्हावी म्हणून साधकाने भगवच्चरणी नेहमी प्रार्थना केली पाहिजे.

समाधान :–ईश्वराच्या ठिकाणी चित्ताची एकाग्रता होणे याला समाधान म्हणतात. श्रीसंत तुकाराम महाराजांनी "**सदा राहे समाधान। हेचि देवाचे दर्शन**" असे म्हणून या गुणाचा महिमा गायिला आहे व "**ठेविले अनंते तैसेचि राहावे। चित्तीं असो द्यावे समाधान।**" असे म्हणून साधकाने प्रयत्नाने हे समाधान बाणवून घेतले पाहिजे म्हणून सांगितले आहे.

मुमुक्षुता :–पातंजल योगदर्शनामध्ये कैवल्यपादाच्या शेवटच्या सूत्रात कैवल्य म्हणजे मोक्षाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "**पूरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चिति-शक्तिरिति ॥ ४.३४ ॥**

पुरुषाला चित्तद्वारा भोग देण्याचे गुणांचे कार्य संपले म्हणजे ते गुण पुरुषार्थशून्य होतात. अशातऱ्हेने त्रिगुणांचे कार्य शून्य म्हणजे निरुपयोगी झाले म्हणजे ते गुण आपल्या मूळ कारणात म्हणजे प्रकृतीत लय पावतात. म्हणजे ते उलट वळून स्वस्वरूपात स्थित होतात. असे वरील प्रतिप्रसवः या पदाने सूचित केले आहे. हे जे त्यांचे स्थित होणे व पुरुषास आत्मसाक्षात्कार होणे यास कैवल्य किंवा मोक्ष म्हणतात. अथवा चैतन्यशक्ती कुंडलिनी आपल्या स्वरूपाशी म्हणजे शिवाशी एकरूप होऊन जाते त्याला कैवल्य म्हणतात. अशा मोक्षाची ज्याला तीव्र तळमळ लागली असेल तोच खरा मुमुक्षू होय. ज्याच्या सर्व इच्छा गेलेल्या असतील असा पुरुषच मोक्षाचा अधिकारी होतो. जीवब्रह्मैक्यविज्ञानाने या संसार बंधनातून लवकर मुक्त व्हावे अशी ज्या विद्वान् पुरुषास तीव्र इच्छा उत्पन्न झालेली असते तोच खरा मुमुक्षू होय.

यम व नियम :–

शक्तिपातयोगाच्या साधनेत यमनियमाला इतर सर्व साधनांप्रमाणे अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण पतंजलींनी आपल्या योगदर्शनामध्ये यमाचा महिमा सांगताना असे म्हटले आहे की "**जातिदेशकालसमयान-**

वच्छिन्नाः सार्वभौमा महाव्रतम् ॥ ३१–२॥ जात, ठिकाण, वेळ, प्रसंग यांची बंधने नसलेले व संपूर्णतया लागू असणारे म्हणजे उपरोक्त कोणत्याही गोष्टीमुळे खंड पडून न देता करीत राहाण्याचे हे यमाचे पालन म्हणजे सार्वभौम महान व्रत आहे. महर्षी पतंजलींनी "**अहिंसासत्यास्तेय ब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ॥ ३०–२॥** अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह असे पाच यम सांगितले आहेत. हठयोगप्रदीपिकेत "**अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं क्षमा धृतिः । दयार्जवं मिताहारः शौचं चैव यमा दश ॥** अहिंसा, सत्य, चोरी न करणे, ब्रह्मचर्य, क्षमा, धैर्य, नम्रता, मिताहार व शुचिता हे दहा यम सांगितले आहेत. आपण ओळीने थोडक्यात त्यांचा विचार करू.

अहिंसा :– "**अहिंसा सर्वथा सर्वभूतानामनभिद्रोहः**" म्हणजे काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या षड्विकारांच्या आधीन होऊन शरीराने, वाणीने किंवा मनाने अगर आचार, विचार किंवा उच्चारानेही घात करणे, हानी करणे किंवा नुकसान करणे अगर असे करण्यास अनुमती अथवा स्पष्ट किंवा अस्पष्टपणे परवानगी न देणे याला अहिंसा म्हणतात. ही अहिंसा जाती, देश, काल व वेळ यांच्यामुळे सुद्धा सीमाबद्ध किंवा परिमित होऊ शकते. आपल्या पोटाच्या धंद्यामुळे कोळी मत्स्याशिवाय इतर जात मारणे सोडू शकला तर त्याची अहिंसा जातीमुळे सीमित होते. कोणी जर तीर्थक्षेत्रातच अहिंसेचे पालन केले व इतर ठिकाणी हिंसेचा त्याग केला नाही तर अशा व्यक्तीची अहिंसा देशामुळे सीमाबद्ध होते. पुण्यकाली चतुर्दशीस हिंसा न करता अहिंसेचे पालन जेव्हा होते तेव्हा ती अहिंसा कालाने सीमित होते. वर सांगितल्याप्रमाणे जाती, देश व काल यांच्या बंधनात राहून फक्त शिष्ट लोक येतील तेव्हाच जो कोणी हिंसा करतो त्याची अहिंसा समयबद्ध होते. ज्याला शक्तिपातयोगाचे साधन करावयाचे आहे त्याने इष्ट सिद्धी जो मोक्ष तो प्राप्त होण्यासाठी वरीलप्रकारे परिच्छिन्न झालेली अहिंसा सोडून देऊन अहिंसाव्रताचे पालन करणे आवश्यक आहे.

श्रीसंतशिरोमणी ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या १६ व्या व १७ व्या अध्यायात अहिंसेचे विवेचन करताना असे म्हटले आहे की–

आणि जगाचिया सुखोद्देशे । शरीरवाचामानसें । राहाटणें तें अहिंसें । रूप जाण ॥ १६.११४॥ भूतमात्राचेनि नांवे । तृणही नासुडावें । किंबहुना सांडावे । छेद भेद ॥ १७.२१२ ॥

कायावाचामनाने प्राणिमात्रांना सुख व्हावे याच एकमेव हेतूने जे

वर्तन करणे तेच अहिंसेचे खरे स्वरूप व लक्षण होय. सर्व भूतमात्रांमध्ये जीव भरलेला आहे याची साधकाने जाणीव ठेवून गवतालासुद्धा हिसका देऊन तोडू नये किंवा कापू नये. फार काय साधकाने कोणाचीही मोडतोड करू नये व कोणालाही वर्मी लागेल असे बोलू नये.

सत्य :–" सत्यं यथार्थे वाङ्मनसे, यथादृष्टं यथा अनुमितं यथाश्रुतं; यदि चैवमप्यभिधीयमाना भूतोपघातपरैव स्यान्न सत्यम्भवेत्।" यथार्थवाणी म्हणजे जसे पाहिले व ऐकले असेल त्याप्रमाणे विचार व उच्चार करणे ते सत्य होय. याचा अर्थच असा आहे की मत व वाणी एकरूप होणे हें सत्य होय. तरीपण वेळ प्रसंग पाहून पाहिल्याप्रमाणें व ऐकल्याप्रमाणें बोलून जर दुसऱ्याचा घात होत असेल तर तसे न बोलणे हेही सत्य आहे.

प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेले किंवा शास्त्राने सांगितलेले तेच बोलावे. दुसरे भलतेच काही बोलू नये. मात्र आपण जे सत्य बोलणार आहोत ते सर्वांना प्रिय असावे. जें कोणास अप्रिय असेल व ज्याने कोणाचे मन दुखावेल असे सत्य देखील बोलू नये. असे कदाचित बोलल्यामुळे दुसऱ्याचे मन दुखावल्यामुळे हिंसा घडते. मग अहिंसेला बाध येतो. म्हणून प्रिय जे असेल तेच बोलावे. अप्रिय जे असेल ते सत्यही बोलू नये. त्याचप्रमाणे प्रिय जरी असले तरी खोटे बोलणे योग्य नाही. प्रसंगोपात् मौन धरणे किंवा निघून जाणे योग्य ठरते. हाही सनातन धर्म आहे असे मनुस्मृतीत सांगितले आहे. हा सत्यधर्म पूर्ण साधला म्हणजे वाचासिद्धी होते.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी सत्याची व्याख्या करताना असे म्हटले आहे कीं –

तैसे तोडावया संदेह । तीख जैसे का लोह । श्राव्यत्वें तरी माधुर्य । पायी घाली ॥ १६.११७ ॥ किंबहुना प्रियपणें । कोणतेंही झकव् नेणे । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा ॥ १२० ॥ परि अहितीं कोपोनि सोप । लालनी मऊ जैसें पुष्प । तिथे मातेचे स्वरूप । जैसे कां होय ॥ १२३ ॥ तैसें श्रवणसुख चतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । ते सत्य येथें ॥ १२४ ॥

सत्यवचन हे संशयनिवृत्ती करण्याचे बाबतीत लोखंडी शस्त्राप्रमाणे तीक्ष्ण असते मात्र ते ऐकले असता इतके अमृतमधुर असते की माधुर्यालाही पायाखालीं घालून लाजविते. सत्यवचनाची गोडी इतकी असल्यामुळे ते कोणालाही फसविण्याचे जाणत नाहीं आणि ते इतके यथार्थ असते की

ते कोणाच्याही मनाला खुपत नाही. मुलाचे अहित होऊ नये म्हणून आई पोकळपणे रागावते व त्याचे योग्य लालनपालन व्हावे म्हणून फुलाप्रमाणे मऊ असते. त्याप्रमाणे सत्यापासून कानाला सुख होते. ते चतुर असून परिणामी गोड असते. ते कोणाचाही मर्मभेद करीत नाही व रागद्वेषादी विकारांपासून सत्य दूर असते.

अस्तेय :–"अस्तेयनाम मनोवाक्कायकर्मभिः परद्रव्येषु निस्पृहा।" कायेने, मनाने व वाचेने सर्वथा परद्रव्याचा त्याग करणे याला अचौर्य अस्तेय किंवा चोरी न करणे असे म्हणतात. याचा अर्थ असा आहे की, कायेने कोणाचे द्रव्य बळेच हरण करू नये. वाचेने कोणाला मागू नये. द्रव्य उत्तम आहे म्हणून ते मिळाले पाहिजे असे मनाने चिंतू नये. अर्थात द्रव्य म्हणजे पैसा ऐवढाच अर्थ मर्यादित नाही. मातीच्या भांड्यापासून ते सुवर्णापर्यंत जे काही सामान ते द्रव्यच आहे. या सर्वांचाच कायावाचा-मनाने त्याग करावा. अशा तऱ्हेने जो हे सत्याचे व्रत पाळील त्याची वाणी वाया जात नाही. तो जे बोलेल ते होते.

आर्जव : आर्जव म्हणजे मनाचा सरळपणा होय. शक्तिपात योगसाधनेत या गुणाचे महत्त्व फार मोठे आहे. जितका हा गुण साधकाच्या ठिकाणी अधिक्याने असेल तितकी साधकाच्या आत्मशक्तीच्या विकासाला चालना मिळेल कारण या गुणामुळेच समर्पणाची क्रिया जलद घडून येण्यास मदत होते. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

" वाटेल त्या बऱ्या वाईट अशा सर्व प्राणिमात्रास मग तो कोणीही असला तरी त्यास जसा प्राण एकसारखाच अनुकूल असतो त्याप्रमाणे साधकाने मनाने सर्वांशी सरळ असावयास हवे. सूर्य जसा हा चांगला हा वाईट अशी भेदबुद्धी ठेवून एखाद्याचे तोंड पाहून प्रकाश पाडीत नाही किंवा आकाश हे सर्व जगाला सारखाच अवकाश देते त्याप्रमाणे साधकाचे मन हरएक प्राण्याविषयी निरनिराळे असता कामा नये. उलट वर्तन असे असावयास पाहिजे की सर्व जग जसे काही पूर्वीपासून त्याच्या ओळखीचे आहे. किंबहुना सर्व जगाबरोबर जसाकाही आपला अगदी दाट व जुनाट संबंध आहे असे त्याच्या मनाला वाटले पाहिजे. साधकाला आपपरभावाची भाषाच ओळखीची असता कामा नये. असे आर्जव ज्या साधकाचे ठिकाणी असते त्याची वाटेल त्याच्या बरोबर मैत्री होते. पाण्याप्रमाणे त्याचा स्वभाव सर्वांशी जुळणारा असतो. कोणाही विषयी त्याचे मन विकल्प घेत नाही. वाऱ्याचे वाहाणे जसे सरळ असते त्याप्रमाणे

साधकाच्या मनाचा स्वभाव सरळ असावयास हवा.शंका व लोभ त्याच्या चित्तात मुळींच असता कामा नयेत.

आत एक व बाहेर एक अशा विचारास साधकाने मनात थारा देता कामा नये. कोणाबरोबरही साधकाने वाईट बुद्धीने वागता कामा नये. साधकाची दहा इंद्रिये व पंचप्राण सदासर्वदा सरळ, निष्कपट व शुद्धबुद्धीने वर्तन करणारी असली पाहिजेत. अमृताच्या धारेप्रमाणे त्याचे अंतःकरण सरळ असले पाहिजे. तो साधक असे वागतो ती पुरुष मूर्तिमंत आर्जव आहे असे म्हणावयास पाहिजे. "

सारांश ज्याप्रमाणे आईच्या स्तनातील दूध हे मुलास सर्वतोपरी हितकारक असते किंवा चैतन्य अथवा प्राण हा सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी सारखाच असतो त्याप्रमाणे प्राणिमात्रांशी सरळ, निष्कपट व सौजन्यपूर्ण वागणे याला आर्जव म्हणतात.

क्षमा :–आपल्या शरीरावर केस आहेत व आपण ते धारण केले आहेत याची जाणीव शरीराला नसते. त्याप्रमाणे सर्व सहन करीत असताना देखील मोठेपणाचा गर्व ज्याला वाटत नाही त्याला क्षमा म्हणतात. कोणी प्रिय बोलो अथवा अप्रिय बोलो, दंड मारो अथवा सन्मान करो, चंदन लावो अथवा घाण टाको परंतु ते सहन करून घ्यावे. इतकेच नव्हे तर मनाने देखील त्याचे नुकसान चिंतू नये. साधकाने वरवर एखादी गोष्ट सहन केली आणि मनाने मात्र नुकसान चिंतिले तर पूर्वी सांगितलेल्या अहिंसेचा भंग होईल आणि योगसिद्धी होणार नाही. यासाठी मनाने देखील कोणाचे वाईट चिंतू नये. ही क्षमा पूर्ण साधली म्हणजे त्रिभुवनात कोणी शत्रू राहात नाही.

ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात साधकाच्या ठिकाणी क्षमेची किती नितांत आवश्यकता आहे हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " अपेक्षित इच्छित वस्तू प्राप्त झाली असता साधकाला जो संतोष होतो तोच संतोष अनपेक्षित वस्तू त्याला प्राप्त झाली असता त्याने मानला पाहिजे. शिवाय साधकाने मानापमान सहन करून सुख-दुःखांनाही सारखीच जागा दिली पाहिजे. त्याने निंदेने किंवा स्तुतीने मनाची समता दुभंगू देता कामा नये. अनेक प्रकारची सुखदुःखे प्राप्त झाली तरी अंतःकरण डगमगू न देता व श्रमी न होता साधकाने राहिले पाहिजे. नदी व नद यांचे समुदाय पाण्याचे लोटच्या लोट घेऊन जरी आले तरी त्यांना कोठे ठेवावे अशी चिंता न करिता ज्याप्रमाणे समुद्र आपल्या पोटात ते सहज सामावून घेतो त्याप्रमाणे साधकाने आपल्याला

एखादी गोष्ट सहन करता येत नाही असे कधीही घड़ देऊ नये. त्याचप्रमाणे आपण सर्व गोष्टी सहन करतो अशी आठवण ठेवून अभिमानही धरू नये. असे जो वागतो त्याला क्षमारूप साधनसंपत्ती प्राप्त होते.

धृती :– धृती म्हणजे धैर्य. जो साधक क्षमावान असतो त्याने कल्पांतीही आपले सहनशीलतेचे धैर्य सोडता कामा नये. साधन करताना विषयसेवनाविषयी इंद्रियांची असीम प्रवृत्ती ज्यावेळेस वाढते त्यावेळी मोठ्या धैर्याने साधकाने इंद्रियांना आवर घातला पाहिजे. त्याचप्रमाणे पूर्वप्रारब्धाने रोग खवळले असता किंवा अप्रिय वस्तूचा योग व प्रिय वस्तूचा वियोग झाला असता साधकाने अंतःकरण दगडासारखे कठीण करून धैर्य धारण केले पाहिजे. एवढेच नव्हे तर वरील सर्व गोष्टींचा एकसमयावच्छेदेकरून पूर जरी आला व त्यांनी एकवटून साधकाला गिळण्याचा प्रयत्न केला तरी साधकाने अगस्ती ऋषीप्रमाणे अत्यंत दृढतेने उपरोक्त सर्वांना गिळून टाकून व त्यांच्याशी अत्यंत धैर्याने सामना केला पाहिजे. आकाशात धुराचा महा प्रचंड लोट उठला तरी वारा एका झुळकेसरशी त्याला गिळून नष्ट करतो. त्याप्रमाणे साधकाने आध्यात्मिक आधिदैविक व आधिभौतिक हे त्रिविध उपद्रव जरी एकदम प्राप्त झाले तरीही त्याने अमाप धैर्याने त्या सर्वांना गिळून टाकले पाहिजे. याप्रमाणे ज्या ज्या वेळी चित्ताचा क्षोभ होण्याचा प्रसंग उत्पन्न होतो त्या त्या वेळी साधक ज्या सहनशीलतेने ही सर्व दुःखे पेलतो व पचवितो त्या मनोवृत्तीरूप शक्तीला धृती म्हणतात.

अपरिग्रह :– पातंजल योगसूत्राच्या व्यासभाष्यात अपरिग्रहाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की– " **विषयाणामर्जनरक्षणक्षयसंग, हिंसादर्शनादस्वीकरणमपरिग्रहः।**" स्वार्थबुद्धीने धन, संपत्ती, ऐश्वर्य, भोगसामुग्री व शरीर रक्षणाच्या अनावश्यक वस्तू मिळविणे, त्यांचे रक्षण करणे, त्या नाश पावू नये म्हणून त्यांची काळजी घेणे याला परिग्रह म्हणतात. या उलट अशा तऱ्हेच्या संग्रहबुद्धीचा त्याग करण्याचा अभ्यास करणे याला अपरिग्रह म्हणतात. प्राणिघातावाचून भोग नाही म्हणून हिंसा इत्यादी दोष विचारात घेता विषयांचा स्वीकार न करणे यालाच अपरिग्रह म्हणतात.

दया :– या साधन संपत्तीचे वर्णन करताना श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, " चंद्राचे चांदणे आपली शीतलता व शांती लोकांनादेत असताना हा थोर व हा लहान अशी निवड करीत नाही त्याप्रमाणे साधकाने सर्वांबद्दल अंतकरणात सारखी दया धारण केली पाहिजे."

श्रीसंत गुलाबरावमहाराज यांनी 'योगांगयमलक्षण' यात दयेविषयी असे म्हटले आहे की, " सर्वाभूती दया असावी. कोणाचाही द्वेष नसावा. ज्याप्रमाणे आपला प्राण आपल्याला प्रिय आहे त्याप्रमाणेच सर्व जीवाला आपापला प्राण प्रिय आहे. म्हणूनच कोणाचाही घात व द्रोह करू नये. व्याघ्र, सर्प, विंचू इत्यादिकांचाही वध करू नये. मनात देखील त्यांच्या नाशाविषयी इच्छा करू नये कदाचित उठलीच तर मागे केलेल्या अहिंसेचा भंग होतो व मग योगसिद्धी होत नाही. महासंकटात शत्रूलाही सोडवावे. मग तो आपला नाश करो वा न करो. ही भूतदया साधली म्हणजेच ईश्वरानुग्रह झाला. दानाहून दया विशेष आहे. कायावाचामने करून सर्व प्राण्यांच्या रक्षणाचा उपाय करावा. म्हणजे कायेने कोणास काही नसेल ते यथाशक्ती पुरवावे. काही जवळ नसेल तर हात जोडून वंदन करावे. सर्व प्राण्यांना आपले शरीर झिजवून संकटातून रक्षावे. दयेच्या ठिकाणी जाती वर्ण पाहू नये. सुष्टदुष्ट, लहानमोठा, शत्रूमित्र, आपलापरावा इत्यादी पाहू नये. ज्याप्रमाणे गंगेवर गाय व वाघ दोघेही जातात व त्या दोघांचो गंगा सारखी तृप्ती करते त्याप्रमाणे सर्वाभूती समान दया असावी. दयेपेक्षा श्रेष्ठ धर्म नाही. दया हीच साधारण लोकास समाधी आहे. " **सर्वभूतेषु दया ब्रह्म । एतद्ब्राह्मणलक्षणम् ।।** " असे श्रुतीचे वचन आहे. सर्वाभूती एक ब्रह्म आहे असे जाणून जो सर्व भूतांवर दया करतो तो कोणत्याही जातीचा असला तरी खरोखर ब्राह्मण आहे असे सामवेदात सांगितले आहे. यास आणखी पुष्कळ श्रुती प्रमाण आहेत. दया हे मुक्तीचे मूळ आहे. याविषयी तुलसीदास एके ठिकाणी म्हणतात. " **दया मुकतका मूल है । नरकमूल अभिमान। तुलसी दया न छांडिये । जबलग घटमों प्राण ।।**" तसेच दया भक्तीचेही मूळ आहे. एकनाथ महाराज म्हणतात,

" **ज्याचे अंगी दया शांती । तया न लगे ईश्वरभक्ती ।।** दया हे संतांचे गुह्य आहे. याविषयी तुकाराम महाराज म्हणतात, " **भूतांची दया हे भांडवल संता । आपल्याला ममता नाहीं देही ।। दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।। तुका म्हणे सुख पराविया सुखे ।। अमृत हे मुखे स्रवतसे ।।** " याप्रमाणे दया हे योगाचे मूळ आहे. याविषयी श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज म्हणतात–" **दया जयाचे अंतरी ।। त्याला दूर नाही हरी । हारवोनि सर्व धन । करा दया हे साधन । रामी रामदास म्हणे । दया सर्वत्र ठेवणे ।।** श्रीज्ञानेश्वर महाराजांनी तर दयेस ब्रह्मच करून ठेवले आहे. ते म्हणतात, " **गाईची तृषा हरू । व्याघ्रा विष**

होऊनी मारू । हे तेणेचि गा करू । तोय जैसे ॥ का घरिचिया उजियेडु करावा । पारखिया अंधारु पाडावा । हे नेणेचि गा पांडवा । दिपु जैसा ॥ जो सर्व भूतांचे ठायीं । द्वेषाते नेणेचि कांहीं । आपपर जया नाही । चैतन्य जैसे ॥ "

शौच : – शौच या शब्दाचा अर्थ शुद्धता असा आहे. पातंजल योगसूत्रात साधनसंपत्तीच्या या गुणाला नियम पंचकात घातले आहे. योगसूत्रावरील व्यासभाष्यात शुद्धतेची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, " **शौचं तु द्विविधं प्रोक्तं बाह्याभ्यंतरं यथा । शौचं मृज्जलादिजनितं मेध्या भावहरणादि च बाह्यम् । आभ्यंतरं चित्तमलानां क्षालनम् ॥** ती शुद्धता दोन प्रकारची आहे. बाह्य शुद्धता व आंतर शुद्धता. मातीने, पाण्याने अगर भस्माने जी देहाची शुद्धी ती बाह्य शुद्धी होय. आणि मनातील सर्व कृत्रिम भाव काढून टाकणे व वाईट वासनेचा त्याग करणे ही आंतरशुध्दी होय. ही साधली म्हणजे योगी पातकापासून मुक्त होतो. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी शुचितेचे वर्णन करताना असे म्हटले आहे की, " कापूर जसा आंतरबाह्य शुध्द व स्वच्छ असतो तसे साधकाचे शरीर व मन आंतर्बाह्य शुध्द व स्वच्छ असावयास हवे. असे असणे हेच खरे शुचित्व होय.

साधकाच्या घरादारामध्ये अशी शुचिता असणे नितांत आवश्यक आहे कारण याशिवाय योगशास्त्रात साधनाची जी फले मिळतात म्हणून सांगितले आहे ती साधकाला मिळत नाहीत. साधनाची खोली अगदी स्वच्छ असणे, नित्यनियमित स्नानादी करणे हे जितके आवश्यक आहे तितकेच घरात विटाळशीचा विटाळ पाळला जाणे आवश्यक आहे. कालौघात एक अत्यंत चांगली प्रथा समाज सोडून देत आहे परंतु साधकाने समाजाचा विचार न करता म्हणजे बाहेर कोण काय करतो, नियम कितपत पाळतो हे न पाहाता व याचा विचार न करता स्वतःच्या घरात हे नियम पूर्ण पाळलेच पाहिजेत. हे नियम न पाळता साधन करणे कित्येक वेळा घातुक ठरते.

वास्तविक रजस्वला स्त्रीने पहिल्या दिवसापासून ब्रह्मचारिणी राहावे. दिवसा झोपू नये. डोळ्यात काजळ घालू नये. कधीही रडू नये, स्नान करणे, चंदनाची उटी लावणे, तेलाने मॉलिश करणे, नखे काढणे, धावणे, हसणे, अति बडबडणे, भयानक शब्द ऐकणे, वेणी घालणे, व जोराचा वारा सेवन करणे या गोष्टी करू नयेत. शतपथ ब्राह्मण व तैत्तिरीयसंहितेमध्ये उपरोक्त नियमांचे रहस्य आवर्जून सांगितले आहे.

रजस्वला स्त्रींबरोबर एकासनावर बसणे, एका शय्येवर झोपने, तिला स्पर्श करणे किंवा तिच्याशी भाषण करणे इत्यादी सर्वाचा तीव्रतम निषेध शतपथ ब्राह्मणामध्ये सुस्पष्टपणे केला आहे. ऋषी म्हणतात, " रजस्वलेला स्पर्श करू नये. सहआसन, सहशयन व सहभाषण करू नये. तिचे निरीक्षणही करू नये. या गोष्टी अत्यंत निषिध्द आहेत कारण त्यामुळे मानव मलीन होतो. "

भगवान् व्यासांनी ऋतुमती स्त्रीच्या बाबतीत मुद्दाम स्पष्टपणे असे सांगितले आहे की–

स्त्रियं पवित्रमतुलं नैता दुष्यंति कर्हिचित ।
मासि मासि रजस्तासां दुष्कृतान्यपकर्षति ।।

पवित्रतेच्या दृष्टीने स्त्रिया अनुपम आहेत कारण त्यांच्या शरीरातील, मनातील व बुद्धीतील दोष प्रत्येक महिन्याला रज बाहेर पडून दूर होत असतात. अर्थात स्त्रियांचे हे परम कर्तव्य आहे की वस्तूला, अन्नाला, कपडयाला अगर व्यक्तीला स्पर्श न करता बाजूला राहून या दोषांचे संक्रमण उपरोक्त गोष्टीत होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. यासाठी त्यांनी नियमबद्ध राहाणे आवश्यक आहे.

रजोदर्शनतो दोषात् सर्वमेव परित्यजेत् । सर्वैरलक्षिता शीघ्रं लज्जितान्तर्गृहे वसेत् ।। स्त्रीधर्मिणी त्रिरात्रं तु स्वमुखं नैव दर्शयेत् । स्ववाक्यं श्रावयेन्नापि यावत् स्नानान्न शुद्धयति ।।

जी स्त्री विटाळशी झाली आहे तिने दुसऱ्या पदार्थांमध्ये आपल्या ठिकाणच्या रजोदोषांचे संक्रमण होऊ नये म्हणून स्वयंपाकपाणी इत्यादी कोणत्याही गृहकार्यापासून तीन दिवस पूर्णपणे दूर राहिले पाहिजे. चौथ्या दिवशी स्नान करून वरवरचे काम करण्यास हरकत नाही. मात्र स्वयंपाक करू नये. पाचव्या दिवशी स्नान करून स्वयंपाकादी करण्यास हरकत नाही. मनूने मनुस्मृतीत याबाबतीत असे स्पष्ट लिहिले आहे की–

नोपगच्छेत् प्रमत्तोऽपि स्त्रियमार्तवदर्शनें । समानशयते चैव न शयीत तया सह ।। रजसाभिप्लुतां नारीं नरस्य ह्यपगच्छतः । प्रज्ञा तेजो बलं चक्षुरायुश्चैव प्रहीयते ।। तां विवर्जयतस्तस्य रजसा समभिप्लुताम् । प्रज्ञा तेजो बलं चक्षुरायुश्चैव प्रवर्धते ।। ४. ४०–४२ ।।

कामाने पिडित झालेल्या पुरुषानेही रजोदर्शन झाले असता पहिले चार दिवस स्त्रीसमागम करू नये व तिच्याबरोबर एका शय्येवर झोपू नये. कारण रजस्वला स्त्रीशी गमन करणाऱ्या पुरुषाची बुध्दी, तेज, बल,

नेत्र व आयुष्यही क्षीण होतात. जो पुरुष अशा स्त्रीला वर्ज्य करतो त्याची बुध्दी, तेज, बल, नेत्र व आयुष्य ही वाढतात.

ज्यांना हे शक्तिपातयोगाचे साधन करावयाचे आहे त्यांनी निदान आपल्या घरात विटाळशीचा विटाळ कटाक्षाने टाळला पाहिजे. तिच्या हातचे अन्न तर कदापीही भक्षण करता कामा नये. प्रोफेसर शीक याने संशोधनाने सिद्ध केलेले मत साधकाने कायम ध्यानात ठेवले पाहिजे. तो म्हणतो, " विटाळशीच्या विटाळात अत्यंत प्रबल असे रजोविष असते. ती जर उद्यानात गेली तर फुले, पाने व फळे सुकून जातात. फुलांनी बहरणाऱ्या वेली व वृक्ष मरून जातात. फुले सडतात. इतकेच नव्हे तर वृक्षावरील किडे सुद्धा मरून पडतात किंवा पळून जातात. विटाळ किंवा रजोविष फार भयंकर आहे. ते निघून जाणेच इष्ट असते. याविषयी सुरवात पहिल्या दिवशी होऊन दुसऱ्या दिवशी त्याचे प्रमाण खूप वाढते. तिसऱ्या दिवशी हे प्रमाण कमी होऊन चवथ्या दिवशी नाहीसे होते. या अर्थानेच पराशर स्मृतीमध्ये असे म्हटले आहे की –

प्रथमेऽहनि चांडाली, द्वितीये ब्रह्मघातिनी ।
तृतीये रजकी प्रोक्ता चतुर्थेऽहनि शुद्धति ॥

रजस्वाला स्त्री पहिल्या दिवशी चांडालाप्रमाणे अपवित्र, दुसऱ्या दिवशी ब्रह्महत्या करण्याइतकी अपवित्र, तिसऱ्या दिवशी परटिणीइतकी अपवित्र व चवथ्या दिवशी स्नानाने ती पूर्ववत शुद्ध होते.

शाक्तानंद तरंगिणीमध्ये तर रजस्वला स्त्री पाचव्या दिवशी गृहकृत्यादी सर्व कार्यास शुद्ध होते असे म्हटले आहे.

रजस्वला च या नारी विशुद्धा पंचमे दिने ।

सारांश :– साधकाने साधनात प्रगती होण्याच्या दृष्टीने ही शुचिता पूर्णांशाने सांभाळली पाहिजे. याला दुसरा पर्याय नाही.

शुचितेमध्ये स्पर्शास्पर्श दोषाचा विचारही आवश्यक आहे. साधकाने उगीच कोणालाही सहसा स्पर्श करू नये. कारण जागृत शक्तीच्या रूपाने शरीराची, मनाची व प्राणाची निरंतर शुद्धी चालू असते. ही शुद्धी दुसऱ्याच्या स्पर्शाने कमी होते कारण त्याच्या विचारादिसंस्कारांचे संक्रमण होण्याची खूपच शक्यता असते.

आहार :– साधनसंपत्तीच्या दृष्टीने आहाराकडे साधकाने निरंतर

लक्ष दिले पाहिजे. आहार कसा, किती, कोणता व केव्हा घ्यावा याचा विचार होणे फार आवश्यक आहे.

मिताहार :– साधकाने नेहमीं मिताहारच करणे उचित आहे. अत्याहाराने योगाचा नाश होतो असे हठयोग प्रदीपिकेत सांगितले आहे. घेरंड संहितेत स्पष्ट म्हटले आहे की–

' मिताहारं विना यस्तु योगारम्भे तु कारयेत ।
नानारोगा भवेत्तस्य किंचित् योगो न सिध्दचति ।।

जो साधक परिमित आहार करण्याचा निश्चय व नियम न करता योगाभ्यासाला सुरवात करतो त्याला नानाप्रकारचे रोग होतात व त्याची साधनात थोडीसुद्धा प्रगती होत नाही.

श्रीमद्भगवद्गीतेमध्ये ६ व्या अध्यायामध्ये साधकाने आहार निद्रादी संबंधाने किती सावध असले पाहिजे हे आर्जवून सांगितले आहे कारण त्याशिवाय योगसिद्धी होत नाही.

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः । न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ।। १६ ।। युक्ताहारविह्मरस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।। १७ ।।

जितके हवे त्याहून अधिक अन्न खाणाऱ्या पुरुषाला शक्तिपात-योगाभ्यास होत नाही. अगदी मुळीच अन्न न खाणाऱ्या साधकाला अशक्तता आल्यामुळे हा शक्तिपातयोगाभ्यास करता येत नाही. खूप झोप घेण्याचा ज्याचा स्वभाव आहे त्याला व अतिशय जागणाऱ्या पुरुषाला योग घडत नाही व करताही येत नाही.

यावर टीका करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " जो मनुष्य जिव्हेच्या अंकित होतो किंवा सर्वथैव झोपेला जीवाभावाने विकला जातो तो या योगाचा अधिकारी म्हटला जात नाही. अथवा दुराग्रहाच्या आवेशात जो भूक आणि तहान मारून आहार कमी करतो त्याला योग साधत नाही. साधकाने झोप मुळीच घ्यावयाची नाही असा दुराग्रह धरून नाचू नये व त्यात धन्यताही मानू नये. कारण यातच साधकाने धन्यता मानली तर त्याचे शरीरच त्याच्या स्वाधीन राहात नाही. मग त्याला योग कोठून साध्य होणार? यासाठी विषयांचे अति-सेवन करावे अशी साधकाची विरोधीवृत्ती नसावी किंवा त्याचा सर्वथैव त्याग करण्याचा आग्रहही धरणे योग्य नाही. "

" साधकाने युक्तीच्या मापाने मोजून परिमित असे अन्न सेवन

करावे. त्याचप्रमाणे इतर सर्वच्या सर्व क्रियाही युक्तीनेच प्रमाणात कराव्यात. याचा अर्थ असा आहे की साधकाने थोडे बोलावे. अगदी कमी चालावे. झोप आली म्हणजे योग्यवेळी झोपही घ्यावी. जाग्रण करायचे झाले तरी तेही नियमित वेळेपर्यंतच करावे. अशा नियमित रीतीने आचरण केल्यावर शरीरातील रक्तादिक सप्तधातू सहजच समतोल राहातात. अशाप्रकारे बेताबताने इंद्रियांची तृप्ती नियमितपणाच्याद्वाराने करीत गेले म्हणजे हळूहळू संतोष वाढत जातो व अंतर्यामी सुख वाढते."

परिमित आहार म्हणजे काय ?

साधकाने भोजन करताना प्रथम आपल्या इष्टदेवतेला सर्व अन्न अर्पण करून भोजनास आरंभ करावा. भोजन करताता मन प्रसन्न व संतोषित असावे, निर्मल, सुमधुर, स्निग्ध, व सरस भोजनाने पोट अर्धे भरेल इतकेच खावे. नंतर एक चतुर्थांश भाग पाणी प्यावे व एक चतुर्थांश भाग वायूसाठी मोकळा सोडावा. मिताहारासंबंधी एकच विशेष गोष्ट अशी लक्षात ठेवली पाहिजे की भोजन झाल्यावर पोट थोडेसे मोकळे राहिले पाहिजे आणि मनाला असे वाटले पाहिजे की आपण आणखी थोडे खाऊ शकू. असे वाटले म्हणजे उत्तम मिताहार झाला असे समजावे. पोटाला तडणी लागेल इतके खाणे योग्य नाही. कारण त्यामुळे शरीराला जडता व आळस येऊन साधन चांगले होत नाही. भूक लागल्यावर साधकाने थोडे अवश्य खावे. परंतु एका वेळेलाच अधिक खाणे साधकाला कधीही योग्य नाही. साधकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की जेवण झाल्यावर त्याने तीन तास साधन करता कामा नये. त्याचप्रमाणे अतिशय भूक लागली असताना उपाशी पोटी साधन करणे चांगले नाही. अत्यंत भूक लागली तर थोडेसे हलके खाऊन साधन करण्यास हरकत नाही. मोकळ्या पोटी भूक लागली असताना साधनास बसल्यास चित्त स्थिर होत नाही. नसते विघ्न मात्र उपस्थित होते. कबिरांनी याबाबतीत असे म्हटले आहे की

कबिरा छूधा- कूकडी करत भजनमें भंग।
याको टुकडा डारिकै, सुमिरन करो निसंक॥

कबीर म्हणतात भूक ही एखाद्या कुत्रीप्रमाणे साधनभजनात विघ्न करते. यासाठी तिला थोडासा तुकडा खाण्यास दिला की साधकाला निश्चिंतपणे साधनात निमग्न होता येते.

भोजन केव्हा करावे ?

साधकाने सकाळ संध्याकाळ नियमित वेळी भोजन केले पाहिजे. त्याचप्रमाणे जेवताना उजव्या नाकपुडीने म्हणजे पिंगला नाडीने श्वास चालू असणे अधिक श्रेयस्कर असते. पिंगला नाडीलाच सूर्यनाडी म्हणतात. ही नाडी चालू असली म्हणजे श्वासोच्छवास उजव्या नाकपुडीने चालू असला की देहरूपी लघुब्रह्मांडात दिवस होतो. इडा नाडीला चंद्रनाडी म्हणतात. जेव्हा प्राणवायू या नाडीतून वाहात असतो तेव्हा देहात रात्र असते. त्यामुळे जेव्हा पिंगला नाडी चालू असून देहात दिवस असतो तेव्हा आहार घेतल्याने शरीररस उत्पन्न न होता अन्नाचे सहज पचन होते. मात्र इडा नाडी चालू असताना म्हणजे देहात रात्र असताना जर भोजन केले तर त्याचे पचन ठीक होत नाही व शरिरात रसाचा खूप संचार होतो.

जर भोजन करताना उजव्या नाडीने श्वास चालू नसेल तर डाव्या पायाचा गुडघा बगलेत दाबून धरला की उजवी नाडी सुरू होईल. डाव्या कुशीवर झोपले किंवा डाव्या बगलेत फडक्याचा एखादा बोळा दाबून धरला तरी उजवी नाडी सुरू होते.

साधकाचे भोजनातील पदार्थ —

साधकाच्या भोजनात पुढील पदार्थ विशेषे करून असावेत. साळीचे तांदूळ, गहू, मूग, पडवळ, काकडी, सातू, दूध, तूप, साखर, लोणी, वेलदोडे, तूर, पालक, चवळई, घोळूची भाजी, दुधी भोपळा, घोसाळे, सुरण, साठीभात, देवभात म्हणजे वरई, केळफुल, परवरची भाजी इत्यादी पदार्थ साधकाच्या भोजनात असावेत. शक्तिपातयोगाच्या साधनास सुरवात झाली की प्रथम प्रथम तीव्र शक्तिचालनामुळे शरीरात खूप उष्णता वाढल्याचे अनुभवास येते. अशावेळी तूप व दूधाचे सेवन करणे उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे साधकाचा आहार पौष्टिक, मधूर, धातूंचे पोषण करणारा, रुचकर, स्निग्ध व मनाला प्रसन्न करणारा असावा.

गीतेत सात्त्विक माणसाला जो प्रिय असणारा आहार सांगितला आहे. तोच साधकाने नेहमी घ्यावा.

आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ १७.८ ॥

आयुष्य, मानसबल, शरीरबल, आरोग्य, सुख, प्रीती यांना वाढविणारा, रसयुक्त, स्नेहयुक्त, देहात परिणामरूपाने चिरकाल राहाणारा

व हृदयाला प्रिय वाटणारा असा आहार सात्त्विक लोकांना प्रिय असतो. असाच आहार साधकाने घ्यावा. साधकाने मिताहार करावा म्हणून हठयोग प्रदीपिकेत मोठ्या कटाक्षाने सांगितले आहे.

सुस्निग्धमधुराहारश्च चतुर्थांशविवर्जितः ।
भुज्यते शिवसंप्रीत्यै मिताहारः स उच्यते ॥ १.५८ ॥

साधकाने स्निग्ध म्हणजे तूप व दूधयुक्त आणि मधुर असा आहार घ्यावा. जेवताना दोन भाग अन्न व एक भाग पाणी पिऊन एक भाग वायूच्या चलनासाठी मोकळा ठेवावा. त्याचप्रमाणे आपण जे भोजन करतो ते अंतःकरणामध्ये ईश्वराबद्दल प्रेम निर्माण व्हावे व त्याची प्राप्ती आपल्याला व्हावी म्हणून करीत असल्याने जेवण देहाकरिता नसून देव जो महेश्वर तो भोक्ता आहे, त्याच्या करिता आहे, अशी श्रद्धा मनात बाळगून जे जेवण केले जाते त्यालाच मिताहार असे म्हणतात.

भोजनातील वर्ज्य पदार्थ :–

ध्यानबिंदू उपनिषदात असे म्हटले आहे की –

कटवम्ल लवणत्यागी क्षीरपान रतः सुखी ।
मिताहारी ब्रह्मचारी योगी योग परायणः ॥

कडू, तिखट व खारट पदार्थ साधकाने टाळावेत. जो साधक दुग्धपान करतो, मिताहारी असतो व ब्रह्मचारी राहातो तो साधनाभ्यासाने योगपरायण होतो.

साधकाने कडू, खारट, आंबट, तिखट, गरम, कांजी, लोणचे, मोहरीचे तेल, मास, मासे, दही, अति आंबट ताक, हिंग, कांदा, लसूण, दोनदा गरम केलेले पदार्थ, रुक्ष व जळजळ करणारे पदार्थ, शिळे, पचण्यास कठीण, दुर्गंधीयुक्त, अतिउष्ण, अतिशीतल असे सर्व पदार्थ वर्ज्य करावेत. गीतेमध्ये राजस व तामस लोकांना जे पदार्थ आवडतात ते सांगितले आहेत. साधकाने ते कटाक्षाने टाळले पाहिजेत.

कटवम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः । आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदा ॥ १७.९ ॥ यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् । उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥

कडू, आंबट, खारट, अति उष्ण, तिखट, रुक्ष, नीरस, दाहक, पोटाची व तोंडाची आग करणारे, दुःख, शोक व रोग उत्पन्न करणारे पदार्थ राजस प्रकृतीच्या मनुष्याला आवडतात. त्याचप्रमाणे अर्धे शिज-

लेले, रसरहित, दुर्गंधीयुक्त, शिळे, उष्टे, यज्ञाला अयोग्य असे अन्न तामस लोकांना प्रिय असते. उपरोक्त सर्वप्रकारचे अन्न साधकाने टाळावे.

साधकाने मांसाहार कटाक्षाने वर्ज्य केला पाहिजे. कारण मांसाहारामुळे रज व तमोगुणाची वृद्धी होते. मांसाहारामुळे हिंसादोष साधकाला लागतो. यासाठी आपले शारीरिक व मानसिक कल्याण होईल असाच आहार साधकाने केला पाहिजे. कांदा व लसूण हे दोन पदार्थही कामोत्तेजक असून प्राणशक्ती खाली खेचणारे असल्याने तेही साधकाने यावज्जीव वर्ज्य केले पाहिजेत.

भोजनाचे नियम किती दिवस पाळावयाचे :–

योगी व रोगी हे जवळ जवळ सारखेच असतात कारण रोगी वैद्याकडे जाऊन योग्य औषध व आहाराच्या पथ्याचे पालन करून प्रकृती ठीक करतो तर साधक भवरोग पीडित असल्याने गुरुपाशी जाऊन भवरोगसमुद्रातून पार होण्यासाठी साधनरूप औषध घेऊन विधिनिषेधादी आहाराच्या नियमांचे पालन करणे त्याला भाग पडते.

गाय, म्हैस, बकरी, मेंढी इत्यादी प्राण्यांपासून रक्षण व्हावे म्हणून लहान लहान झाडांच्या रोपट्यांना काट्यांचे कुंपण घालतात. परंतु ती रोपटी जेव्हा मोठी होऊन त्यांचे वृक्षात रूपांतर होते तेव्हा त्यांना काट्यांच्या कुंपणाची आवश्यकता राहात नाही. इतकेच नव्हे तर हे प्राणी व प्रचंड हत्तीही त्या वृक्षाच्या बुंध्यालाच बांधता येतात. त्यावेळी झाडाचे काय होईल अशी भीती वाटत नाही. त्याचप्रमाणे नियमादिद्वारा नियमित साधन केले म्हणजे पांचभौतिक जड देहातील जडत्व योगाग्नीने दग्ध झाल्यामुळे साधकाचा देह परिपक्व होऊन त्यास अखंड चैतन्याची प्रत्यक्षानुभूती प्राप्त होते. ज्ञान दृढ झाल्यावर मग त्याला वासना, दुष्टसंस्कारादी कशाचेही भय राहात नाही. जोपर्यंत साधकाचे ज्ञान दृढ होत नाही तोपर्यंत त्याने उपरोक्त सर्वांचे पालन कटाक्षाने केलेच पाहिजे. तो जर यामध्ये हयगय करील तर त्याला पतनाचे व मागे येण्याचे भय राहाते.

ब्रह्मचर्य :–

शक्तिपात योगाच्या साधनसंपत्तीत ब्रह्मचर्याचे महत्त्व विशेष आहे. योगसूत्र व्यासभाष्यामध्ये ब्रह्मचर्याची व्याख्या करताना " **ब्रह्मचर्य गुप्तेंद्रियस्योपस्थस्य संयमः ।** " असे म्हटले आहे. गुप्त इंद्रिय म्हणजे उपस्थाच्या संयमाला ब्रह्मचर्य म्हणतात. शांडिल्योपनिषदातही ब्रह्म-

चर्याची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, " **ब्रह्मचर्यनाम सर्वावस्थासु मनोवाक्कायकर्मभिः सर्वत्र मैथुनत्यागः ।** " अर्थात शरीर, मन व वाणी यांच्याद्वारा सर्व अवस्थेमध्ये मैथुनाचा त्याग करणे याला ब्रह्मचर्य म्हणतात.

उपरोक्त ब्रह्मचर्याची प्रशंसा अनेकानेक ग्रंथांमध्ये विपुल प्रमाणात आली आहे. त्यावरून ब्रह्मचर्य ही फार महत्त्वाची साधनसंपत्ती आहे याचा सहज पडताळा येतो. शक्तिपातयोगाचे साधन करणाऱ्या साधकाला या गुणाची नितांत आवश्यकता आहे. साधक ज्या आश्रमात असेल त्याला अनुसरून त्याने ब्रह्मचर्य पाळले म्हणजे झाले.

मैथुनाचे प्रकार :–

ज्यामुळे वीर्यनाश होऊन हानी होते असे आठ प्रकारचे मैथुन शास्त्राने सांगितले आहे.

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्यभाषणम् । संकल्पोध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेव च ॥ एतन्मैथुनमष्टांगं प्रवदंति मनीषिण : । विपरीतं ब्रह्मचर्यमनुष्ठेयं मुमुक्षुभिः ।

कोणत्याही अवस्थेत स्त्रीचे स्मरण करणे, तिच्या रूपाचे व गुणांचे वर्णन करणे किंवा श्रृंगाररसप्रधान ग्रंथ वाचून स्त्री संबंधी चर्चा करून तिची स्तुती करणे, स्त्रियांबरोबर पत्ते, सोंगटया इ. खेळणे, स्त्रियांकडे वाईट दृष्टीने पाहाणे, स्त्रीबरोबर एकांतात बोलणे, स्त्री प्राप्त व्हावी म्हणून व तिच्याशी संभोग व्हावा असा संकल्प करणे, हा संकल्प पूर्ण व्हावा म्हणून उपाय किंवा प्रयत्न करणे आणि स्त्रीशी संभोग करणे असे आठ प्रकारचे मैथुन शास्त्राने व विद्वानांनी सांगितले आहे.

या आठही प्रकारच्या मैथुनाचा त्याग साधकाने अवश्य केला पाहिजे कारण त्यामुळे वीर्य स्खलन होऊन शरीर दुर्बल बनते.

वीर्यधारण हेच ब्रह्मचर्य :–

शरीरामध्ये ओजस् धातुमुळे जीवनाची धारणा होते. तेच एकमेव जीवनाचे खरे कारण आहे. वाग्भटाने याबाबत असे म्हटले आहे की–

ओजश्च तेजो धातूनां शुक्रांतानां परं स्मृतम् । हृदयस्थमपि व्यापि देहस्थितिनिबंधम् ॥ यस्य प्रवृध्दौ देहस्य तुष्टिपुष्टिबलोदया : ।

यन्नाशे नियतो नाशो यस्मिंस्तिष्ठति जीवनम् ॥ निष्पाद्यन्ते यतो भावा विविधा देहसंश्रयाः । उत्साहप्रतिभाधैर्यलावण्यसुकुमारताः ।

रसापासून वीर्यापर्यंत सात धातूमध्ये जे तेज असते त्याला ओजस् म्हणतात. हे ओज विशेषकरून हृदयात राहाते. परंतु ते सर्व शरीराला व्यापून असते. ओजाची वृद्धी झाली की तुष्टी, पुष्टी व बलाची उत्पत्ती होते. ओजाच्या नाशाने मृत्यू होतो. हे ओजच जीवनाचा आधार आहे. त्याच्यामुळे उत्साह, प्रतिभा, धैर्य, लावण्य व सुकुमारतेची प्राप्ती होते.

हे ओज कोठून येते हे सांगताना महर्षी सुश्रुताने असे म्हटले आहे की–" **रसादीनां शुक्रांतानां धातूनां यत्परं तेजस्तत् खल्वोजस्तदेव बलमिति ।** " म्हणजे रसापासून शुक्रापर्यंत जे सात धातू आहेत त्यातील श्रेष्ठ अशा तेजाच्या भागाला ओज म्हणतात. हेच खरे बल होय.

हे ओज कसे आहे व कोठे राहाते हे सांगताना शारंगधराने सांगितले आहे की–

ओजः सर्वशरीरस्थं स्निग्धं शीतं स्थिरं सितम् ।
सोमात्मकं शरीरस्य बलपुष्टिकरं मतम् ॥

ओज सर्व शरीराला व्यापून राहाते. हे स्निग्ध, शीतल, स्थिर, श्वेतवर्णाचे, सोमात्मक व शरीराला बल आणि पुष्टी देणारे असते.

यावरून हे सिद्ध होते की ओजाची उत्पत्ती वीर्यापासून होते. त्यामुळे जीवन धारणाचे प्रधान कारण व आलंबन वीर्य हेच आहे. या वीर्याची उत्पत्ती अन्नापासून होते. एवढेच नव्हे तर रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा व वीर्य हे सात धातू शरीरात राहून शरीराला धारण करतात. मनुष्य जेव्हा अन्न खातो तेव्हा प्रथम रस तयार होतो. रसापासून रक्त, रक्तापासून मांस, मांसापासून मेद, मेदापासून अस्थी, अस्थीपासून मज्जा व मज्जेपासून सर्व साररूप पदार्थ वीर्य उत्पन्न होते. या वीर्याचेच ओजामध्ये रूपांतर होऊन त्याचे महान तेज बनते व ते सर्व शरीरात पसरते.

यामुळे दुधातून लोणी काढण्यासाठी जसे दूध घुसळावे लागते व उसातून गुळाचे उत्पादन व्हावे म्हणून उसाला चरकात घालावे लागते त्याप्रमाणे वीर्याचा एक बिंदू बाहेर काढण्यासाठी सर्व शरीराला घुसळून व पिळून काढावे लागते. ज्याप्रमाणे लोणी काढल्यावर सत्त्वहीन दूध व ऊस पिळल्यावर उसाची चिपाडे खाली राहातात त्याप्रमाणे वीर्यस्रावानंतर शरीरातील सर्व नाड्या ढिल्या पडतात व प्रत्येक अवयवात

एकप्रकारची उदासीनता पसरते. वीर्यपतनात मनुष्याचे पतन आहे व वीर्य धारणात मनुष्याचे जीवन आहे. यासाठी वीर्यधारणेलाच ब्रह्मचर्य म्हटले जाते. शिवसंहितेत म्हटले आहे की–

मरणं बिंदुपातेन जीवनं बिंदुधारणात् ।
तस्मादतिप्रयत्नेन कुरुते बिंदुधारणाम् ॥

बिंदुपातातच मृत्यू आहे व बिंदुधारणताच खरे जीवन आहे. यासाठी अत्यंत प्रयत्नपूर्वक बिंदू धारण केला पाहिजे. भगवान शंकरांनी बिंदुधारणा करून ब्रह्मचर्याच्या प्रतापानेच हलाहल विष प्राशन केले. याबाबत त्यांनी स्वत: सांगितले आहे की–

सिद्धे बिन्दौ महारत्ने किं न सिद्धयति भूतले ।
यस्य प्रसादान्महिमा ममाप्येतादृशोऽभवत् ॥

ब्रह्मचर्य म्हणजे बिंदुधारणा सिद्ध झाल्याने, त्याच्या प्रभावाने सर्व ब्रह्मांडात माझा महिमा झाला आहे. त्यामुळे वीर्य म्हणजे बिंदूच्या धारणेने जगतामध्ये असे कोणते कार्य आहे की ते सिद्ध होणार नाही ?

वास्तविक पाहाता खरी गोष्ट अशी आहे की ब्रह्मचर्य हे सर्व पुरुषार्थाचे मूळ आहे. त्याच्या पालनाने मनुष्य निरोगी व सुखी होतो. जरा व मृत्यूपासून त्याचे रक्षण होते. त्यामुळे हृष्ट, पुष्ट, बलिष्ठ व धर्मपरायण संतती होते. ब्रह्मचर्यामुळेच भजनाची, ध्यानाची व साधन करण्याची योग्यता साधकाला येते. या साधनसंपत्तीमुळे शक्तिपातयोगाच्या साधनात रुची, प्रगती व सिद्धी प्राप्त होते. या गुणाच्या जोरावर मनुष्य निर्भय व विनम्र होऊन जगाची सेवा करू शकतो. वास्तविक हेच सर्वप्रथम साधन आहे. देवराज इंद्राने दीर्घकालपर्यंत ब्रह्मचर्य पालन केल्यावरच प्रजापती ब्रह्मदेवाने त्याला ब्रह्मविद्येची दीक्षा दिली.

यासाठीच "**यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति ।**" असे श्रीमदभगवद्-गीतेत भगवंतांनी स्पष्ट सांगितले आहे. ज्या साधकाला परमात्मप्राप्तीची इच्छा असते तो ब्रह्मचर्याचे पालन करतो. गीतेच्या १७ व्या अध्ययाच्या १४ व्या श्लोकात ब्रह्मचर्य हे शारीरिक तपच आहे असे भगवंतांनी सांगितले आहे. त्यावर भाष्य करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, "**जन्मतेनि प्रसंगे । स्त्रीदेह शिवणे आंगे । तेथूनि जन्म आघवें । सोवळें कीजे ॥ १७. २११ ॥** म्हणजे जन्माच्या प्रसंगीच फक्त स्त्री-शरीराचा स्पर्श होईल तेवढाच काय तो स्त्रीस्पर्श. तेथून पुढे सर्व जन्मभर एवढे कडक ब्रह्मचर्य व्रत पाळणे आवश्यक आहे की स्त्रीदेहाचा स्पर्शही होणार नाही.

गृहस्थाश्रम्यांचे ब्रह्मचर्य :—

ज्यांचा विवाह झाला आहे अशा गृहस्थाश्रमी साधकांना हे नियम नाहीत. जे नैष्ठिक ब्रह्मचारी, साधू, अरण्यवासी किंवा संन्यासी आहेत त्यांच्यासाठी उपरोक्त ब्रह्मचर्याचे नियम आहेत. परंतु जे गृहस्थाश्रमी विवाहित साधक आहेत त्यांच्यासाठी शास्त्राने स्वतंत्र मर्यादा घालून दिली आहे. या बाबतीत महर्षी याज्ञवल्क्य म्हणतात—

ऋतावृतौ स्वदारेषु संगतिर्या विधानतः ।
ब्रह्मचर्यं तदेवोक्तं ग्रहस्थाश्रमवासिनाम् ॥

स्त्रीला ऋतुकाल प्राप्त झाला असता जो आपल्या धर्मपत्नीबरोबर शास्त्राच्या आदेशाप्रमाणे केवळ संतती उत्पन्न व्हावी म्हणून समागम करतो तो पुरुष गृहस्थाश्रमात असला तरी ब्रह्मचारीच असतो. ऋतु-कालासंबंधी मनूने म्हटले आहे की—

ऋतुः स्वाभाविकः स्त्रीणां रात्रयः षोडशः स्मृताः । चतुर्भिरितरैः सार्धमहोभिः सद्विगर्हितैः । तासामाद्याश्चतस्रस्तु निंदितैकादशी च या । त्रयोदशी च शेषास्तु प्रशस्ता दश रात्रयः ।

सत्पुरुषांनी निंदित केलेल्या रजोदर्शनाच्या पहिल्या चार दिवस धरून सोळा रात्री स्त्रियांचा स्वाभाविक ऋतुकाल म्हटला जातो. या सोळा रात्रीतील पहिल्या चार रात्री, अकारावी व तेरावी रात्र स्त्री सहवासाला वर्ज्य आहे. बाकी दहा रात्री उत्तम समजल्या जातात.

वरील दहा रात्रींमधील प्रतिपदा, षष्ठी, अष्टमी, एकादशी, द्वादशी, चतुर्दशी व पौर्णिमा या तिथी वर्ज्य कराव्यात. त्याचप्रमाणे व्यतिपात, ग्रहण, रामनवमी, शिवरात्र, जन्माष्टमी, श्राद्धतिथी, संक्रांत व रविवार इत्यादी दिवसांचा त्याग करून जे दिवस शिल्लक राहातील त्या दिवशी फक्त आपल्याला सुलक्षणी पुत्र व्हावा म्हणून जो पुरुष स्त्रीच्या इच्छेने महिन्यातून केवळ दोनदा समागम करतो तो ग्रहस्था-श्रीमी असला तरी ब्रह्मचारीच असतो. याबाबत मनूने असे म्हटले आहे की—

निंद्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ।
ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥

पहिल्या निंदित सहारात्री व दुसऱ्या आणखी आठरात्री मिळून एकूण चौदारात्री सोडून जो पुरुष महिन्यामध्ये केवळ दोन रात्रीच स्त्रीशी गमन करतो त्याला ब्रह्मचारीच मानले पाहिजे.

रजस्वलेबरोबर साधकाने कधीही समागम व संसर्ग करता कामा

नये. त्यामुळे अनेक व्याधी होण्याचा संभव असतो. शिवाय आश्लेषा, मघा, मूळ, कृत्तिका, ज्येष्ठा, रेवती, उत्तराभाद्रपदा, उत्तराफाल्गुनी व उत्तराषाढा नक्षत्र असताना स्त्रीसहवास करू नये.

नियम :–

पांतजल योगसूत्रात नियमांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. **शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्राणिधानानि नियमः ॥ ३२ ॥** शरीराची आतील व बाहेरील शुध्दता, समाधान, तपश्चर्या, स्वाध्याय व ईश्वरोपासना हे नियम आहेत. यातील पहिल्या नियमाचा विचार पूर्वीच केला आहे. उरलेल्या चार नियमांचा विचार क्रमशः करू.

संतोष – शांडिल्योपनिषदामध्ये संतोषाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की,

संतोषो नाम यदृच्छा लाभ संतुष्टिः। ईश्वरेच्छेने प्रारब्धवशात जे मिळेल त्यात सुखी राहाणं याला संतोष म्हणतात. गीतेच्या १२व्या अध्ययात श्लोक १४ व १९ यामध्ये संतुष्ट शब्द आला आहे. त्यावर टीका करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " वर्षाऋतुशिवाय देखील समुद्र नेहमीच पाण्याने परिपूर्ण भरलेला असतो. तसेच आनंदाचे काही विशेष उपचार न करतासुध्दा साधकाने विषयनिरपेक्ष सहज आनंदात निमग्न असले पाहिजे. इतकेच नव्हे तर–

जो यथालाभे न तोखे। अलाभे न पारुखे। पाउसेंवीण न सुके। समुद्रु जैसा ॥ १२. २१० ॥ आणि वायूसि एके ठायीं। बिढार जैसें नाहीं। तैसा न धरीच कहीं। आश्रयो जो ॥ २११ ॥ आघवाची आकाशस्थिती। जेवीं वायूसि नित्य वसती। तेवीं जगचि विश्रांति। स्थान जया ॥ २१२ ॥ हे विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला ॥ २१३ ॥

तप :– सद्गुरुकृपेने जे शक्तिपातयोगाचे साधन मिळालेले असते ते यथाशास्त्र रात्रंदिवस करणे हेच खरे तप होय. कारण अशाप्रकारच्या तपामुळेच अनादी अविद्या नाहीशी होऊन ज्ञानाने जीवशिवाचे ऐक्य होते. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज ज्ञानेश्वरीत तपाचा अर्थ स्पष्ट करताना गीतेच्या १६ व्या अध्ययातील पहिल्याच श्लोकावर भाष्य करताना म्हणतात. " ब्रह्मस्वरूपाचा विकास होऊन ते पूर्णपणे अभिव्यक्त व्हावे म्हणून साधकाने सद्गुरुकृपेने मिळालेल्या साधनाने प्राण, इंद्रिय व शरीर यांची आटणी केली पाहिजे. अशा प्रकारे साधनाने यांचा लय

साधणे यालाच तप म्हणतात. याशिवाय जर तपाचे दुसरे काही निराळे लक्षण असले तर ते तप हया साधनाभ्यासाच्या तपाप्रमाणे शुद्ध असत नाही. यासाठी हंस पक्षी ज्याप्रमाणे दुधात आपली चोच घालून दूध व पाणी वेगळे करतो त्याप्रमाणे जन्मापासून देह व जीव यांच्या संयोगामुळे जीव जड वाटून आपण ब्रह्म आहोत ही जाणीव नाहीशी झालेली असते. यासाठी सतत साधानाभ्यास करून आत्मा व अनात्मा यांच्यातील सत्य व मिथ्यारूप वेगळे केले पाहिजे. निरंतर साधनाने साधकाने आत्मानात्म-विवेक सतत जागृत ठेवला पाहिजे. असे अखंड साधन घडले म्हणजे आत्मानात्मविचार सतत जागृत राहून बुद्धीचा विषयांकडे जाणारा मार्ग कुंठित होतो. मन अंतर्मुख होते. मग ज्याप्रमाणे मनुष्य जागा झाला की, निद्रा व स्वप्न ही दोन्ही आपोआप नाहीशी होतात, त्याप्र-माणे मनुष्याची अनादी निद्रा व जगत्स्वरूप स्वप्न नाहीसे होऊन तो आत्मस्वरूप होतो. अशा प्रकारे आत्मानात्मविवेक उत्पन्न करून स्वसंवेद्य असे स्वस्वरूप प्राप्त करून देणाऱ्या साधनाभ्यासाला खरे तप म्हणतात.

जोपर्यंत ब्रह्मप्राप्ती होत नाही तोपर्यंत साधकाने अत्यंत निष्ठेने या तपाचे म्हणजे साधनाचे आचरण केले पाहिजे. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज म्हणातात –

जंववरी अर्जुना । तो बोधु भेटेना मना ।
तंवचि यया साधना । भजावें लागे ॥ ३. १४९ ॥

साधनाभ्यास :–

शक्तिपातयोगाच्या साधनसंपत्तीत साधनाचा नियमित अभ्यास करण्याला निरतिशय महत्त्व आहे. कारण सद्गुरुकृपेने जेव्हा दीक्षा होऊन शक्ती जागृत होते तेव्हा तिच्या विकासाला वाव देण्यासाठी त्याने दिवसातून सकाळी व संध्याकाळी नियमित अभ्यास केलाच पाहिजे. वास्तविक त्याने दुपारी व रात्रीही अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणजे दिवसातून चार वेळा साधन करावे असे शास्त्र सांगते. परंतु ते शक्य नसल्यास दोन वेळा तरी साधनाभ्यास केलाच पाहिजे. नियमित साधनाने चित्ताच्या वृत्तींचा आपोआप निरोध होऊन संस्कार नाहीसे होत असल्याने **"तत्र स्थितौ यत्नोऽभ्यासः"** म्हणजे या चित्तवृत्तींना पूर्णपणे कह्यात आणण्यासाठी सद्गुरूने दिलेले साधन सतत करीत राहाण्याला व झट-ण्यालाच अभ्यास म्हणतात, अशी पतंजलींनी योगसूत्रात अभ्यासाची

व्याख्या केली आहे. त्यानंतर पुढील तीन सूत्रातून अभ्यासाचा महिमा सांगितला आहे. महर्षी पतंजली म्हणतात, **तीव्रसंवेगानामासन्नः।** जो खूप प्रयत्नशील असतो त्याला या योगात फार लवकर यश मिळते. "**मृदुमध्याधिमात्रत्वात् ततोऽपि विशेषः।** साधनेतील मंद प्रयत्न, मध्यम प्रयत्न व उत्कट प्रयत्न यांच्या अनुसार साधकांना प्राप्त होणाऱ्या यशामध्येही फरक पडतो. "**स तु दीर्घकाल नैरन्तर्यसत्कारासेवितो दृढभूमिः।**" अभ्यास दीर्घकाल, खंड न पडता व अत्यंत श्रद्धाभक्तिआदरपूर्वक केला म्हणजे तो दृढ होऊन परमपदाची प्राप्ती होते.

अभ्यासाचा हा महिमा तुकाराम, रामदास, व ज्ञानेश्वर महाराजांनी आपापल्या ग्रंथांमध्ये परोपरीने सांगितला आहे कारण साध्यसाधनाचा संबंध अविच्छेद्य असतो. शक्तिपातयोगसाधन हे साध्यरूप असल्याने साधनाभ्यास म्हणजे साध्याभ्यासच होय यात शंका नाही. या दृष्टिकोनातून अभ्यास, परिश्रम, साधन याकडे पाहिले म्हणजे आळस, संशय, प्रमाद, भ्रांती यांना दूर सारून साधक अभ्यासरत होईल असे वाटते.

अभ्यासास काहीही दुष्कर नाही :–

श्रीसंत तुकाराममहाराज अभ्यासाला काहीही दुष्कर नाही हे सांगताना म्हणतात –

ओले मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥ १ ॥ नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोचि वरि ॥ २ ॥ दोरे चिरा कापे पडिला कांचणी। अभ्यासें सेवनी विष पडे ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरी बाळा वाव एकाएकी ॥ ४ ॥

वृक्षाचे जिवंत मूळ जसजसे जोरावत जाते तसतसे ते खडकाचे अंग फोडून भूमीत शिरत जाते. त्याप्रमाणे अभ्यासाच्या बलाने सर्व कार्यसिद्धता येते. अभ्यासाने अमुक एक गोष्ट साध्य होत नाही असे काहीही अवघड नाही. पण जोपर्यंत सद्गुरूकडून साधनप्राप्ती होऊनही साधकाने अभ्यास करण्याचा व नियमित साधन करण्याचा निश्चय केला नाही तोपर्यंत सर्व कठीणच आहे. दोराच्या घर्षणाने मोठा दगड देखील कापला जातो. सवयीने व अभ्यासाने विषही पचनी पडते. तुकाराम महाराज म्हणतात, आईच्या पोटामध्ये नऊ महिन्याचे मूल राहाण्याएवढी जागा आरंभी असते काय ? पण हळहळू ते मूल राहाण्याइतका अवकाश होत जातो.

साधनाभ्यास हा अंकुश आहे :–

शक्तिपातयोगात भगवद्भक्तीचा तीव्र उन्मेष उद्भुत होताना

दिसून येतो. त्या भक्त्युन्मेषाला वाव देऊन शक्तीचा विकास करीत राहिले म्हणजे नित्य साधनाभ्यासाने मनावर अंकुश राहून हळूहळू क्रमविकासाने जागृती होत राहाते असे पुढील अभंगावरून दिसून येते.

भक्ती ते कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।। जेथे पाहे तेथे देखीचा पर्वत । पायाविण भित तातडीची ।। कामावले तरी पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ।। तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ।।

सुळावरील पोळी मिळणे जितके कठीण आहे तितकेच देवाची भक्ती करणे म्हणजे सद्गुरुकृपासादरूप साधन करणे कठीण आहे. जो अशा-प्रकारच्या साधनाची निवड करतो तो खराच शूर असतो कारण नियमित साधना करण्यासाठी ज्याच्या जवळ धैर्यादी व सातत्यादी शूर माणसाचे गुण असतात तोच या साधनाच्या कामी योग्य ठरतो. असा साधक क्वचित मिळतो. समाजात जिकडे पाहावे तिकडे बाहय भक्तीचा पोकळ डोंगर रचलेला दिसतो. खडकापर्यंत पाया न घेता झपाटयाने भिंत उभारावी त्या प्रमाणे बहुतेक जण भक्तीचा डोलारा उभा करतात. पण त्यात पक्केपणा नसतो. तो प्रयत्नाने येतो. धान्य चांगले निवडून मेहनत घेऊन स्वयंपाक केला तर अन्नाची रुची व दर्जा उंचावून भोजनाच्या वेळी समाधान वाटते. जो साधक सद्गुरुकृपाप्राप्त साधनाचा अभ्यास करतो त्याच्या बाबतीत साधनाचा अंकुशाप्रमाणे उपयोग होतो कारण मन हे मदोन्मत्त हत्ती सारखेच असते. ते साधनासारख्या अंकुशाच्या टोचणी शिवाय ताब्यात येत नाही. जो साधक नित्य नियनियमाने साधन करतो त्याला नवनवीन अनुभवांची प्राप्ती होऊन शक्तीचा विकास होत होत जागृतीची चरम अवस्था प्राप्त होते.

अभ्यासाने असाध्यही साध्य होते :–

श्रीसंत तुकाराममहाराजांनी अभ्यासाने असाध्य ब्रह्मही साध्य होते असे दोन दृष्टांत देऊन पटविले आहे. हळूहळू अभ्यास करीत कित्येक लोक विष वचनी पाडतात. इतर लोकांना या गोष्टीकडे डोळ्यानेही पाहावत नाही. त्याचप्रमाणे काही लोक अभ्यासाने जिवंत नाग हातात धरतात. इतर त्याला पाहून थरथर कापतात. यावरून हे स्पष्ट दिसते की सतत प्रयत्नाने न होणाऱ्या गोष्टीही साध्य होतात. याकरिता ब्रह्मप्राप्तीसाठी सतत साधनाभ्यास करणे हेच साधकाचे ध्येय असले पाहिजे.

आत्मज्ञान झाले तरी साधन केले पाहिजे :–

साधनाचा महिमा श्रीसमर्थ रामदासस्वामींनी फार आवर्जून सांगितला आहे. साध्य हे साधनरूप असल्यामुळे साधकाने आत्मज्ञान झाल्यावरही साधनाभ्यास करीत राहिले पाहिजे असा अपूर्व आग्रह त्यांनी दासबोधाच्या ५ व्या दशकाच्या ३ ऱ्या समासात प्रतिपादन केला आहे. ते म्हणतात–

म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथे न लागती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे एकसरा ॥ ५. ३. ७ ॥ सुभूमि आणि उत्तम कण । उगवेना पर्जन्येविण । तैसे अध्यात्मनिरूपण । नसता होय ॥ ८ ॥ शेत पेरिले आणि उगवले । परंतु निगेविण गेले । साधनेंविण तैसे झाले । साधकासी ॥ ९ ॥ जोंवरी पीक आपणासि भोगे । तोंवरी अवघेचि करणे लागे । पीक आलीयाहि उगे । राहूच नये ॥ १० ॥ तैसे आत्मज्ञान झाले । परि साधन पाहिजे केले । एक वेळ उदंड जेविले । तरी सामुग्री पाहिजे ॥ ११ ॥

श्रीसमर्थ म्हणतात जेव्हा सद्गुरूला खरा सच्छिष्य भेटतो तेव्हा सद्गुरूंना कोणतेही विशेष श्रम करावे न लागता शाक्तिसंक्रमण घडून येऊन शिष्याला ब्रह्मप्राप्तीचे साधन मिळते. यामुळे आपल्याला चांगला शिष्य मिळून श्रीशंकरापासून चालत आलेली शांभवज्ञानाच्या बोधाची ही अपूर्व परंपरा त्याच्या रूपाने पुढे चालू राहून अनेकांची जीविते धन्य होण्यास मदत होईल म्हणून त्यांना समाधान लाभते. तर आपल्याला सद्गुरू भेटून ब्रह्मप्राप्तीचे साधन मिळाले म्हणून शिष्याला धन्यता वाटते. मात्र उत्तम भूमीत चांगले बीज पेरले तरी पाऊस पडल्याशिवाय ते उगवत नाही. त्याप्रमाणे नित्य साधन केल्याशिवाय साधकाला अध्यात्माची प्राप्ती होत नाही. शेतात बी पेरल्यानंतर ते उगवून आले तरी जर त्या पिकाची योग्य निगा राखली नाही तर पीक हातचे जाते. त्याचप्रमाणे साधकाने दीक्षा मिळाल्यानंतर जर नियमित साधन केले नाही तर साध्यप्राप्ती होणे कठीण होते. पीक पूर्ण उगवून दाणा भरून येत नाही म्हणजे जोपर्यंत ते अपूर्णावस्थेत असते तोपर्यंत ते नीट उगवून यावे म्हणून सर्व काही करावे लागते. इतकेच नव्हे तर पीक उगवून आल्यावरही स्वस्थ राहाणे योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे पूर्णावस्था येईपर्यंत नित्यनियमित साधनाभ्यास करणे नितांत आवश्यक असते. एवढेच नव्हे तर आत्मज्ञान झाल्यावरही साधन मोठ्या आदराने, श्रद्धापूर्वक, भक्तीने, निरंतर, खंड न पडता व आळस सोडून केले

पाहिजे. एकवेळा खूप जेवण केले तरी तेवढ्याने भागत नाही. कारण नियमित भोजनासाठी साधनसामग्री अवश्य लागतेच. तसे साधकाने ब्रह्मप्राप्ती झाली तरी नित्य साधन हे केले पाहिजे कारण साधन हे साध्यरूप आहे.

प्रयत्नाशिवाय व साधनाशिवाय ब्रह्मज्ञान कठीण आहे :–

श्रीसमर्थांनी आपल्या अंतर्भाव या प्रकरणात्मक ग्रंथाच्या दुसऱ्या समासात प्रयत्नाशिवाय व साधनाशिवाय ब्रह्मज्ञान अत्यंत कठीण आहे हे सांगताना म्हटले आहे की –

सर्वात्मा असे बोलता । अंगी बाणेना सर्वथा । साधनेविण ज्ञानवार्ता । बोलो नये ॥ ८ ॥ दसऱ्याचे सोने वाटले । तेणे काय हातासी आले । राये विनोदें आले । सुखासना ॥ ९ ॥ तैसे शब्दे ब्रह्मज्ञान । बोलता नये समाधान । म्हणोनि आधी साधन । केले पाहिजे ॥ १० ॥ शब्दी जेविता तृप्ति जाहली । हे तो वार्ता नाही ऐकली । पाकनिष्पत्ति पाहिजे केली । साक्षेपे स्वये ॥ ११ ॥ काही तरी एक कारण । कैसे घडे यत्नेवीण । ब्रह्मज्ञान परम कठीण । साधनावाचूनी ॥ १२ ॥

नित्यनेमाने समाधान, शांती व ज्ञानप्राप्ती :–

अंतर्भावाच्या तिसऱ्या समासात श्रीसमर्थांनी नित्यनियमिततेचा महिमा सर्वार्थाने प्रकट केला आहे. ते म्हणतात --

कर्मे त्यजोनि बाधक । शुद्ध वर्ते तो साधक । क्रिया पालटे विवेक । निष्कलंक तेव्हा ॥ ३ ॥ तये क्रियेचे लक्षण । आधी स्वधर्म रक्षण । पुढे अद्वैत-श्रवण । केले पाहिजे ॥ ४ ॥ नित्यनेम दृढचित्ती । तेणे शुद्ध चित्तवृत्ती । होवोनि भगवंती । माग फुटें ॥ ५ ॥ नित्यनेमें भ्रांति फिटे । नित्यनेमें संदेह तुटे । नित्यनेमें लिगटे । समाधान अंगी ॥ ६ ॥ नित्यनेमें अंतर शुद्ध । नित्य-नेमें वाढे बोध । नित्यनेमें बहुखेद । प्रपंचीं तुटती ॥ ७ ॥ नित्यनेमें सत्त्व चढे । नित्यनेमें शांति वाढे । नित्यनेमें थारा मोडे । देहबुद्धीचा ॥ ८ ॥ नित्यनेमें दृढभाव । नित्यनेमें भेटे देव । नित्यनेमें पुसे ठाव । अविद्येचा ॥ ९ ॥ ऐसी साधकाची स्थिती । साधके राहावे या रीती । साधनेविण ज्ञानप्राप्ती । होणार नाही ॥ १५ ॥

भगवान् शंकरही साधन करतात - साधनाशिवाय बाष्कळता व बद्धता–

श्रीसमर्थ अंतर्भावाच्या चवथ्या समासात म्हणतात–

सिद्ध होऊन बैसला । दृष्टी नाणी साधनाला । सादर अशन शयनाला । अत्यादरे ॥ १ ॥ ऐसा असे विषयासक्त । अत्यंत विषयी

आसक्त । सिद्धपणे आपला घात । तेणे केला ॥२॥ जो सिद्धांचा मस्तकमणी । महातापसी शूळपाणी । तोहि आसक्त श्रवणी । जपध्यानपूजेसी ॥ ३ ॥ अखंड वाचें रामनाम । अनुष्ठान हेच परम । ज्ञानवैराग्यसंपन्नकाम । सामर्थ्यसिंधू ॥ ४ ॥ तोही म्हणे मी साधक । तेथे मानव पुढे रंक । बापुडे सिद्धपणाचे कौतुक । केवी घडे ॥ ५ ॥ म्हणोनि साधनाशी जो सिद्ध । तोचि ज्ञाता परम शुद्ध । येर ते जाणावे अबद्ध । अप्रमाण ॥ ६ ॥ साधनेवीण बाष्कळता । तीच जाणावी बद्धता । तेणे अनर्गळता । आसक्तरूपे ॥७॥ मन सुखावले जिकडे । अंग टाकिले तिकडे । साधन उपाय नावडे । अंतरापासोनी ॥ ८ ॥ चित्ती विषयाची आस । साधन म्हणता उपजे त्रास । नेम धरिता कासाविस । परम वाटे ॥ ९ ॥ दृढ देहाची आसक्ती । तेथे कैची विरक्ती । विरक्तीवीण भक्ती । केवी घडे ॥ १० ॥ ऐक शिष्यटिळका । नेम नाही साधका । तयालागी धोका । नेमस्त आहे ॥ ११ ॥

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनीही ज्ञानेश्वरीत जागोजागी साधनाभ्यासाचे महत्त्व किती अपार आहे हे स्पष्ट केले आहे. " हे अर्जुना ! आम्ही तुला हे अपूर्व असे शक्तिपातयोगाचे साधन सांगितले. जे साधक हे साधन शरीर कष्टवून करतात, खूप प्रयत्न करतात व नित्यनिरंतर अभ्यास करतात ते अत्यंत शुद्ध होऊन मत्स्वरूप होतात. जे या शक्तिपातयोगाभ्यासाचे ठिकाणी दृढनिश्चयाने लागतात ते खात्रीने ब्रह्मरूप होतात. भोग्योदय होण्याची वेळ आली की उद्योग किंवा प्रयत्नाचे निमित्त होऊन सर्व संपत्ती आपोआप घरी चालून येते. त्याचप्रमाणे मित आहारविहारादी युक्तीने वागणारा साधक हा साधनाभ्यास जेव्हा दृढतेने पुढे सरसावून करू लागतो त्यासेळी त्याला आत्मसिद्धीचा अनुभव येतो. यासाठी ज्याला ब्रह्मस्थिती प्राप्त व्हावी असे वाटत असेल त्याने योगाभ्यास करताना कचरता कामा नये. "

" मन हे मूलतःच चंचल आहे. त्याला वैराग्याच्या साहाय्याने जर या अभ्यासाकडे लावले तर काही काळाने ते आपोआप स्थिर होते. जर साधकाने अभ्यासाची पावले जोराने टाकली म्हणजे अभ्यास झपाट्याने केला तर आयुष्य संपण्यापूर्वीच साधकाला मोक्षप्राप्ती होते. जर साधकाच्या अभ्यासाचा वेग कमी असला तर पुन्हा जन्म घेऊन त्याला अभ्यास पूर्ण करावा लागतो. "

" हे अर्जुना ! साधकाला नेहमीच असे वाटते की ही जन्ममरणाची कथा आपल्याला पुन्हा ऐकू येऊ नये. पण त्यासाठी सद्गुरुकृपेने मिळा-

लेल्या साधनाचा खूप अभ्यास करावा लागतो. साधक जेव्हा निष्ठेने प्रयत्न करतो तेव्हा ह्या प्रयत्नाच्याच जोरावर समग्र परब्रह्माची फल-प्राप्ती होते. हे अनुभवरूप फळ पिकले की पूर्णतेचा, अद्वैताचा व ऐक्याचा रस त्यातून गळू लागतो. "

" शक्तिपातयोगसाधन हे संपूर्ण समर्पणाचे साधन आहे. परंतु सर्व साधकांना हे जमत नाही. कारण मनबुद्धिसहित चित्त ते एकदम परमेश्वराच्या चरणी अर्पण करू शकत नाहीत. असे जरी घडले नाही तरी दिवसभरात वेळ काढून डोळे मिटून जसा वेळ मिळेल तसे साधन केले पाहिजे. असा प्रयत्न केला म्हणजे जागृत शक्तीच्या साहाय्याने प्रयत्न करीत असता परमेश्वराचे सुख थोडे थोडे अनुभवाला येऊन जसजसा क्षण जाईल तसातसा चित्ताला विषयसुखाचा कंटाळा येत जाईल. ज्याप्रमाणे शरद्ऋतूला प्रारंभ झाला म्हणजे नद्यांचे पाणी ओसरू लागते त्याप्रमाणे माझ्या स्वरूपानंदामध्ये जसजसे साधकाचे चित्त गुंतत जाते तसतसे ते विषयसुखातून व प्रपंचातून बाहेर निघते. ज्याप्रमाणे चंद्रबिंब पौर्णिमेपासून दिवसेंदिवस कमी होत होत अमावस्येला नाहीसे होते त्याप्रमाणे अभ्यासाच्या योगाने साधकाचे चित्त विषयसुखाच्या वासनेतून क्रमाने निघून परमेश्वराच्या ठिकाणी प्रविष्ट होऊ लागते. यालाच अभ्यासयोग म्हणतात. या अभ्यासयोगाने प्राप्त होत नाही असे काहीही नाही."

" अभ्यासाचा महिमा अत्यद्भुत आहे. कारण या अभ्यासाच्या बळाने कोणी अंतरिक्षातही संचार करतात. कोणी वाघ, साप, अशा दुष्ट प्राण्यांनाही निर्वैर करून सुस्वभावी करतात. अभ्यासाने विषसुद्धा पचनी पडते. याच्या जोरावर समुद्रावरूनही पायवाटेप्रमाणे चालता येते. काही-जण या अभ्यासाच्या बळावर संपूर्ण वेदादिशास्त्रे मुखोद्गत करतात. म्हणून अभ्यासाला असाध्य किंवा अप्राप्त नाही. याकरिता अभ्यासाने परमेश्वराची प्राप्ती होते हे निश्चित आहे."

म. म. श्री गोपीनाथ कविराज यांनी ईश्वरमें विश्वास या आपल्या लेखात तीव्र पुरुषार्थाचे माहात्म्य सांगताना असे म्हटले आहे की, " साधन जगत्का जो निगूढ रहस्य हैं, जिसकी प्राप्तिके लिए दीर्घकाल तक सत्यस्वरूप सद्गुरूकी कृपा का अवलंबन कर तीव्र पुरुषार्थका प्रयोग करना पडता है। तार्किक-प्रकृति-विशिष्ट तथा साधनहीन पुरुष के सामने उस रहस्यकी आलोचना करना उचित नही है। वहाँ इस आलो-चनका यथार्थ फल उत्पन्न नहीं हो सकता "।

ईश्वरप्रणिधान –

ऐतरेय उपनिषदात ईश्वरप्रणिधानाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "**ईश्वरप्रणिधानं तस्मिन्परमगुरौ सर्वकर्मार्पणम्**" परमगुरू परमेश्वर किंवा परमात्म्याला सर्व कर्मे अर्पण करणे हे खरे ईश्वरप्रणिधान होय. पातंजल योगसूत्रात "**ईश्वरप्रणिधानाद्वा**।" असे सूत्र घालून या साधनसंपत्तीचा महिमा सांगितला आहे. ईश्वराच्या उत्कट भक्तिमुळेही समाधी लाभ होतो असा या सूत्राचा अर्थ आहे. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी गीतेच्या ७ व्या अध्ययातील १५ व्या श्लोकावर भाष्य करताना ईश्वरप्रणिधानाचा अपूर्व अर्थ व्यक्त केला आहे. ते म्हणतात– "हे अर्जुना ! ज्याप्रमाणे विषयासक्त पुरुषाला स्त्रीला कधीही जिंकता येत नाही त्याप्रमाणे ही मायारूप नदी जीवाला स्वतःच्या प्रयत्नाने तरून जाता येत नाही. मात्र जे सर्व भावाने ईश्वराचे भजन करतात व त्याला शरण जातात ते या दुस्तर नदीतून सहज तरून जातात. इतकेच नव्हे तर साधकाला अलीकडच्या काठावरच या मायानदीचे पाणी पार नाहीसे होते. कारण परमेश्वर अशाप्रकारे शरण आलेल्या साधकांना शक्तिपात योगदीक्षा देणाऱ्या सद्गुरुरूप नावाडयाची गाठ घालून देतो. अशा प्रकारे दीक्षा देणाऱ्या सद्गुरूंपाशी ब्रह्मसाक्षात्काराचा अगदी बळकट अनुभव असतो. आत्मनिवेदन कसे करावे हे परंपरागत चालत आलेल्या साधनाच्याद्वारा त्यांना ज्ञात असते. तेच ज्ञान ते आपल्या शिष्याच्या ठिकाणी संक्रांत करतात. त्यामुळे जीवब्रह्माचे ऐक्य होते. अहंभावाचे ओझे संपते. विकल्परूप वाऱ्याच्या झुळका आपोआप चुकतात. संसारातील प्रेमरूपी पाण्याची धार आटून जाते. त्यामुळे साधकाला आत्मबोधरूपी तेजस्वी तारा प्राप्त होतो व त्याला निवृत्तीच्या अगदी पैलतीरावर जाता येते. या सर्व बाबतीत साधनामुळे त्याची गती अत्यंत तीव्र असते. या तीव्रतेमुळे "मी ब्रह्म आहे" हा भावच त्याला मुक्त करतो. या शक्तिपातयोगसाधनेने असे हे ईश्वरप्रणिधान जेव्हा घडून येते तेव्हा साधक मायानदीतून पार होतो."

विविध गुणयुक्त साधनसंपत्ती :--

आतापर्यंत वर्णन केलेल्या साधनसंपत्तीशिवायही विविध गुणांनी युक्त अशा अनेक बाह्य साधनांचेही अनेकानेक ग्रंथकारांनी वर्णन केले आहे. "**सिद्धस्य लक्षणानि साधकस्य साधनानि भवंति**" अर्थात् सिद्धाची जी लक्षण असतात ती साधकाची प्रयत्नसाध्य साधने असतात. भगवद्गीतेमध्ये दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची, बाराव्या अध्ययात भक्ताची,

तेराव्या अध्यायात ज्ञानाची व चौदाव्या अध्यायात गुणातीताची लक्षणे सांगितली आहेत ती अंगी बाणविण्याचा साधकाने फार कसोशीशे प्रयत्न केला पाहिजे. यातील काही महत्त्वाच्या लक्षणांचा उल्लेख करू.

शास्त्रावर निष्ठा :–

शक्तिपातयोगाची साधना करणाऱ्या अनेक साधकांना गुरुकृपेमुळे शक्तिसंक्रमण होऊन दिव्य अनुभव येतात. त्यांची साधना चांगली चालते. परंतु शास्त्राकडे, आचारविचारांकडे व धर्माकडे त्यांचे जेवढे लक्ष असावयास पाहिजे तेवढे असत नाही. शब्दप्रामाण्य खोटे आहे, पोथीनिष्ठा ढोंग आहे, मन शुद्ध असले म्हणजे झाले, आचारविचारांची, सोवळ्याओवळ्याची तितकीशी आवश्यकता नाही असा नवमतवादी लोकांच्या विचारांचा त्यांच्या मनावर पगडा बसून ते वरील गोष्टींकडे उपेक्षेने पाहातात. एवढेच नव्हे तर " शास्त्रावर निष्ठा ठेवली पाहिजे, वर्णाश्रमधर्माप्रमाणे वागले पाहिजे, नित्यनैमित्तिक कर्मे केली पाहिजेत, कुलाचार कुलधर्म पाळले पाहिजेत, जानवे घातले पाहिजे, शेंडी ठेवली पाहिजे, संध्या केली पाहिजे, पूजा केली पाहिजे, विटाळशीचा (रजस्वलेचा) विटाळ घरात पाळला पाहिजे, यमनियम पाळले पाहिजेत, खाण्यापिण्याचे नियम चुकता कामा नयेत, इत्यादी सर्व आग्रह कां ? " असा प्रश्न ते साधक व साधन करण्याची इच्छा असणारे नवीन साधकही विचारीत असतात. साधन तेवढे आवश्यक बाकी सर्व अनावश्यक आहे असे ते समजतात. परंतु सर्व साधकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की साधनाइतकीच शास्त्रनिष्ठा आवश्यक आहे. ज्या साधकांची प्रगती या जन्मी त्वरित झालेली दिसते त्यांनी पूर्वजन्मी वरील सर्व गोष्टी चांगल्या प्रकारे आचरणात आणल्या असणार हे निश्चित. याकरिता प्रत्येक साधकाने शास्त्र म्हणजे काय व त्याचे माहात्म्य किती मोठे आहे हे ध्यानात ठेवून वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शास्त्र व त्याचे माहात्म्य :–

ऋग्वेदादी चार वेद व स्मृती यांनाच शास्त्र म्हणतात. वेदाचे व स्मृतीचे माहात्म्य वर्णन करताना स्मृतीकार मनू म्हणतात,

श्रुतिस्मृत्युदितं धर्ममनुतिष्ठन् हि मानवः । इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुत्तमं सुखम् ॥ श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः । ते सर्वार्थेष्वमीमांसे ताभ्यां धर्मो हि निर्बभौ ॥ आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च । तस्मादस्मिन्सदा युक्तो नित्यं स्यादात्मवान्द्विजः ॥

श्रुतिस्मृत्युदितं सम्यङ्निबद्धं स्वेषु कर्मसु । धर्ममूलं निषेवेत सदाचारमतन्द्रितः ॥ आचाराल्लभते ह्यायुराचारादीप्सिताः प्रजाः ॥ आचाराद्धनमक्षय्यमाचारो हन्त्यलक्षणम् ॥ दुराचारो हि पुरुषो लोके भवति निन्दितः । दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥ सर्वं लक्षणहीनोऽपि यः सदाचारवान्नरः । श्रद्दधानोऽनसूयश्च शतं वर्षाणि जीवति ॥ यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् । यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः ॥ सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् । एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥ यत्कर्म कुर्वतोऽस्य स्यात्परितोषोऽन्तरात्मनः । तत्प्रयत्नेन कुर्वीत विपरीतं तु वर्जयेत् ॥ तस्माद्धर्मं सहायार्थं नित्यं संचिनुयाच्छनैः । धर्मेण हि सहायेन तमस्तरति दुस्तरम् ॥ धर्मप्रधानं पुरुषं तपसा हतकिल्बिषम् । परलोकं नयत्याशु भास्वन्तं स्वशरीरिणम् ॥ या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः ॥ सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठा हि ताः स्मृताः ॥ उत्पद्यन्ते च्यवन्ते च यान्यतोऽन्यानि कानिचित् । तान्यार्वाक्कालिकतया निष्फलान्यनृतानि च ॥ चातुर्वर्ण्यं त्रयो लोकाश्चत्वारश्चाश्रमाः पृथक् । भूतं भव्यं भविष्यं च सर्वं वेदात्प्रसिध्यति ॥ शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गंधश्च पंचमः । वेदादेव प्रसूयन्ते प्रसूतिगुणकर्मतः ॥ बिभर्ति सर्वभूतानि वेदशास्त्रं सनातनम् ॥ तस्मादेतत्परं मन्ये यज्जन्तोरस्य साधनम् ॥ वेदशास्त्रार्थतत्त्वज्ञो यत्र तत्राश्रमे वसन् । इहैव लोके तिष्ठन्स ब्रह्मभूयाय कल्पते ॥ आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्राऽविरोधिना । यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥

श्रुती व स्मृती यांमध्ये सांगितलेल्या धर्माचे अनुष्ठान करणाऱ्या मनुष्याची या लोकी कीर्ती होते व परलोकी गेल्यावर त्यास अत्युत्तम सुख मिळते. श्रुती म्हणजे वेद व स्मृती म्हणजे धर्मशास्त्र असे समजावे. त्या दोघांचाही प्रतिकूल तर्क करून विचार करू नये, कारण त्यांच्यापासून संपूर्ण धर्म प्रकट झाला आहे. वेदोक्त व स्मृत्युक्त आचार हाच परमधर्म आहे. याकरिता आपल्या हिताची इच्छा करणाऱ्या द्विजाने आचारामध्ये सतत व अहर्निश तत्पर असावे. श्रुती व स्मृती यांनी उत्तम प्रकारे सांगितलेले, अध्ययनादी आपल्या कर्मामध्ये अंगत्वाने संबद्ध असलेले व धर्मास कारण होणारे असे जे साधूंचे आचरण असेल त्याचे आळस सोडून पूर्णपणे सेवन करावे. आचाराच्या योगाने आपणास पाहिजे असेल तशी पुत्रपौत्रादी प्रजा होते. आचारापासून अक्षय्य धन मिळते व देहामध्ये असलेले अशुभसूचक अलक्षण निष्फळ होते. कारण दुराचारी पुरुष लोकांमध्ये निंदित, दुःखभागी, व्याधियुक्त व अल्पायुषी होतो

जो सदाचारसंपन्न, श्रद्धाळू व दुसऱ्याचे दोष न बोलणारा पुरुष असतो तो सर्व शुभ लक्षणांनी हीन असला तरी शंभर वर्षे जगतो. जे जे दुसऱ्याची प्रार्थना इत्यादिकांनी साध्य होणारे कर्म असेल त्याचा प्रयत्नाने त्याग करावा व जे जे आत्मवश कर्म असेल ते ते प्रयत्नाने करावे. दुसऱ्याची प्रार्थना करणे इत्यादी उपायांनी साध्य होणारे अर्थात् सर्व परवश कर्म दुःख देणारे असते व आपल्या अधीन असलेले सर्व कर्म सुखकारक असते. हेच सुखदुःखाचे लक्षण होय. जे कर्म करीत असताना कर्त्याच्या अंतरात्म्यास संतोष होतो तेच त्याने प्रयत्नपूर्वक करावे व त्याच्या विपरीत म्हणजे अनुष्ठानसमयी दुःख देणारे जे कर्म असते ते करू नये. यास्तव, साहाय्याकरिता धर्माचा नित्य व हळूहळू संग्रह करावा. कारण धर्म साहाय्य झाला असता प्राणी दुस्तर तमाचे उल्लंघन करतो. जो पुरुष धर्मपरायण झाला आहे, दैववशात् काही पाप घडल्यास त्याचा तपाच्या योगाने ज्याने नाश केला आहे व त्यामुळेच जो दीप्तिमान् व ब्रह्मस्वरूप झाला आहे अशा त्या पुरुषास धर्मच शीघ्र ब्रह्मस्वर्गादिरूप परलोकास नेतो. (ह्यास्तव, केवळ धर्माचेच अनुष्ठान करावे.) ज्या स्मृती वेदबाह्य आहेत व ज्या कुतर्कावर आधारलेल्या आहेत त्या सर्व परलोकी निष्फळ होत असतात, कारण त्यांचे नरक हे फल मिळत असते. चार वर्ण, तीन लोक, ब्रह्मचर्य इत्यादी चार आश्रम, भूत, भविष्य व वर्तमान इत्यादी सर्व वेदापासूनच प्रसिद्ध होत असते. शब्द, स्पर्श, रूप, रस व पाचवा गंध हे सत्त्वादिरूप विषय वेदापासूनच प्रसिद्ध होतात. सनातन वेदशास्त्र सर्व भूतांचे धारण करते. यास्तव, या वैदिक कर्माधिकारी पुरुषाचे वेदशास्त्र हेच उत्कृष्ट पुरुषार्थाचे साधन होय असे निश्चित समजावे. जो वेद, वेदार्थ व वेदात्मक कर्म यांना तत्त्वतः जाणतो तो नित्यनैमित्तिक कर्मानुगृहित ब्रह्मज्ञानाने युक्त असल्यामुळे ब्रह्मचारी, गृहस्थ इत्यादी कोणत्याही आश्रमामध्ये याच लोकी जरी राहिला तरी ब्रह्मभावास समर्थ होतो. ऋषींनी सांगितलेला वेद व तन्मूलक स्मृत्यादी धर्मोपदेश यांचा त्यांच्या विरुद्ध कुतर्क न करता जो विचार करतो त्यासच धर्मज्ञान होते. इतर कोणासही होत नाही.

श्रुतिस्मृतियुक्त आचारच श्रेष्ठ :–

श्रुतिस्मृतियुक्त आचारच कसा श्रेष्ठ आहे हे सांगतांना वसिष्ठस्मृतीत पुढील विवेचन आले आहे.

श्रुतिस्मृतिविहितो धर्मः । आचारः परमो धर्मः सर्वेषामिति निश्चयः । हीनाचारपरीतात्मा प्रेत्य चेह विनश्यति ॥ नैनं तपांसि न ब्रह्म नाग्निहोत्रं न दक्षिणाः । हीनाचारमितो भ्रष्टं तारयन्ति कथंचन ॥ आचारहीनं न पुनंति वेदा यद्यप्यधीताः सह षड्भिरंगैः ॥ छंदास्येनं मृत्युकाले त्यजन्ति नीडं शकुन्ता इव जातपक्षाः ॥ दुराचारो हि पुरुषो लोके भवति निंदितः । दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥ आचारात्फलते धर्ममाचारात्फलते धनम् । आचाराच्छ्रियमाप्नोति आचारो हन्त्यलक्षणम् ॥ वेदोदितं स्वकं कर्म नित्यं कुर्यादतन्द्रितः । तद्धि कुर्वन्यथाशक्त्या प्राप्नोति परमां गतिम् ॥

श्रुती (वेद) आणि स्मृती यांनी जो सांगितला आहे त्यालाच धर्म म्हणणात. श्रुत्युक्त व स्मृत्युक्त आचार हाच सर्वांचा श्रेष्ठ धर्म आहे. जो हीनाचाराने वागतो त्याचा संसारात व मेल्यावर परलोकात नाश होतो. आचारहीनतेमुळे भ्रष्ट झालेल्या पुरुषाला तप, वेद, अग्निहोत्र आणि दक्षिणा या गोष्टी तारू शकत नाहीत. एखाद्याने सहा अंगांसहित वेदाध्ययन केले असेल तरी जो पुरुष आचारहीन असतो त्याला वेदसुद्धा पवित्र करू शकत नाहीत. पंख उत्पन्न झालेले पक्षी ज्याप्रमाणे आपल्या घरटचाचा त्याग करतात त्याप्रमाणे आचारहीन माणसाचा मृत्युसमयी वेद त्याग करतात. दुराचारी माणसाची संसारात निंदा होते. त्याला अतिशय दुःख भोगावे लागते. तो नेहमी व्याधिग्रस्त असतो व त्याला अल्पायुष्य प्राप्त होते. आचारामुळे धर्माचे फल मिळते, आचारामुळे धनही प्राप्त होते. आचारामुळेच मनुष्याला लक्ष्मीची प्राप्ती होते. दुष्ट स्वरूपाच्या आचाराने लक्षणहीन मनुष्याचा नाश होतो. वेदांनी सांगितलेले आपले कर्तव्यकर्म अतंद्रित होऊन दररोज केले पाहिजे. जो आपले कर्म यथाशक्ती करतो त्याला परमगती प्राप्त होते.

पाराशर स्मृतीतही आचाराचे माहात्म्य सांगताना ऋषी म्हणतात–

चतुर्णामपि वर्णानामाचारो धर्मपालकः ।
आचारभ्रष्टदेहानां भवेद्धर्मः पराङ्मुखः ॥

चारही वर्णांचा आचार हा धर्माचे पालन करणारा असतो. जे लोक आचारभ्रष्ट होतात त्यांच्याकडे धर्म पाठ फिरवितो.

हारीत स्मृतीत धर्मशास्त्र व योगशास्त्र यांचे एकाच वेळी पालन केल्याने मनुष्य मुक्त होतो हे सांगताता ऋषी म्हणतात.

वर्णानामाश्रमाणां च योगशास्त्रं च सत्तमाः ।
सन्धार्य मुच्यते मर्त्यो जन्मसंसारबंधनात् ॥

आपापल्या वर्णाप्रमाणे व आश्रमाप्रमाणे जो धर्माचे पालन करतो व योगशास्त्राचा अभ्यास करतो तो जन्मबंधनापासून मुक्त होतो.

शास्त्रीय प्रयत्नाने आत्मज्ञान :--

साधकाने शास्त्रीय प्रयत्न केला असता त्यास आत्मज्ञान प्राप्त होते असा योगवासिष्ठात श्रीवसिष्ठांनी सिद्धांत मांडला आहे. ते म्हणतात, " ज्याप्रमाणे निळा, पिवळा वगैरे रंगांमधील फरक स्पष्ट कळावयाला प्रकाशाची आवश्यकता असते, त्याप्रमाणे शास्त्रांनी घालून दिलेल्या नियमांप्रमाणे वर्तन करणाऱ्या मनुष्याला आपल्या कर्मात यश येण्याला त्यासंबंधाचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. एखाद्या शास्त्रसंमत फलाची मनाने नुसती इच्छा केली, परंतु त्या संबंधाचा प्रयत्न केला नाही, तर ती फलासंबंधीची नुसती इच्छा पुरुषार्थाच्या प्राप्तीला कारण होणारी नसून उन्मत्त मनुष्याच्या चेष्टांप्रमाणे मोहाला मात्र कारण होते. शास्त्रीय प्रयत्न केला असता शास्त्राने सांगितल्याप्रमाणे फल मिळते, परंतु अशास्त्रीय प्रयत्न केला असता अशास्त्रीय फल प्राप्त होते. आपले स्वतःचे पूर्वीचे कर्म फलोन्मुख झाले म्हणजे त्यालाच दैव असे नांव दिले जाते. त्याच्याशिवाय दैव म्हणून काही निराळे नाही. पौरुषाचे शास्त्रीय आणि अशास्त्रीय असे दोन प्रकार मानले गेलेले आहेत. त्यांपैकी अशास्त्रीय कर्म अनर्थाला कारण होते व शास्त्राला अनुसरून केलेले कर्म परमार्थ प्राप्त करून देते. दोन एडके आपसात लढू लागले म्हणजे कधी एकाचा जय होतो तर कधी दुसऱ्याचा जय होतो. त्याप्रमाणे प्राक्तन व ऐहिक प्रयत्न एकमेकांवर जय मिळविण्यासाठी लढत असतात. त्यांमध्ये जो सामर्थ्याने कमी त्याला अर्थातच हार खावी लागते. यासाठी मनुष्याने शास्त्रीय निममांप्रमाणे उत्तम उद्योग करावा म्हणजे या जन्मात केलेला शास्त्रीय प्रयत्न यशस्वी झाल्याशिवाय निःसंशय राहात नाही. कित्येक वेळा शास्त्राने आखून दिलेल्या मार्गाने मनुष्य प्रयत्न करीत असताही रोगादिकांसारखे अनर्थ उत्पन्न होतात. परंतु आपले पूर्वीचेच कर्म ते अनर्थ उत्पन्न करीत आहे, असे त्या ठिकाणी समजावे. अशा ठिकाणीही शास्त्रीय प्रयत्नाने अनर्थ उत्पन्न करणाऱ्या पूर्वीच्या कर्माचा पाडाव करावा. पूर्वजन्मातील कर्मफले मला विघ्न करीत आहेत, असे मनात आणून त्यांना जोराने पायाखाली तुडवावे, कारण या जन्मीच्या प्रत्यक्ष क्रियांपुढे (साधनांपुढे) त्यांची काही किंमत नाही. पूर्वीच्या जन्मातील कर्मफले नाहीशी होईपर्यंत मनुष्याने आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करावा. कालच्या दिवशी झालेले अजीर्ण आज केलेल्या लंघनामुळे नाहीसे

होते, त्याप्रमाणे पूर्वीच्या जन्मातील कर्माचे दोष या जन्मातील शुभ कर्मांनी नाहीसे होतात. उत्साहयुक्त बुद्धीने पूर्वीची सदोष कर्मे नाहीशी करून संसारसागर तरून जाण्यासाठी शमदमादी साधनसंपत्ती प्राप्त करून घ्यावी. निरुद्योगी पुरुष गाढवांची बरोबरी करण्यासही समर्थ नाहीत; परंतु मनुष्याने शास्त्रशुद्ध प्रयत्न केला असता त्याला स्वर्ग आणि मोक्ष यांची प्राप्ती होते. मनुष्यांनी तयार केलेल्या पिंजऱ्यातून सिंह प्रयत्नाने सुटून जातो, त्याप्रमाणे स्वतः नेटाने प्रयत्न करून मनुष्यांनी संसाररूपी खळग्यातून बाहेर पडावे. आपला देह नश्वर आहे या गोष्टीचे नेहमी मनन करावे. पशूंच्यासारखे वर्तन टाकून द्यावे आणि सत्पुरुष व सच्छास्त्रे यांचा आश्रय करावा. शास्त्रात सांगितलेल्या नियमांना धरून शुभ प्रयत्न केले असता त्यापासून ताबडतोब शुभफल प्राप्त होते व अशुभ प्रयत्न केले असता नियमाने अशुभ फल भोगावे लागते. सांराश सच्छास्त्र, सत्संग व सदाचार यांनी युक्त असला तर तो आत्मज्ञान देण्याला समर्थ होतो."

शास्त्रीय प्रयत्नाने जीवनमुक्तिसुखाचा आनंद–

श्रीवसिष्ठांनी शास्त्रीय प्रयत्नाने जीवनमुक्तिसुखाचा आनंद मनुष्याला कसा प्राप्त होतो हे श्रीप्रभुरामचंद्राना योगवासिष्ठात पुढीलप्रमाणे समजावून सांगितले आहे. "हे रघुनंदना! प्रत्येक मनुष्याने योग्य दिशेने प्रयत्न केला असता त्याला ह्या संसारामध्ये आत्मज्ञान प्राप्त झालेच पाहिजे. चंद्रापासून शीतल आणि आल्हादकारक किरण उत्पन्न होतात, त्याप्रमाणे पुरुषप्रयत्नापासून चित्तशुद्धिद्वारा जीवनमुक्तिसुखाचा आनंद प्रत्येकाला प्राप्त होणे शक्य आहे. सत्पुरुषांनी आखून दिलेल्या मार्गाने काया, वाचा, आणि मन यांनी जे कर्म केले जाते तेच पौरुष होय व असे पौरुषच फलदायी होते."

शास्त्रीय प्रयत्नांचे सामर्थ्य–

शास्त्रीय प्रयत्नांच्या अद्‌भुत सामर्थ्याचे वर्णन करताना योगवासिष्ठात श्रीवसिष्ठ म्हणतात, "या जन्मात मनुष्याने नेटाने प्रयत्न केला असता पूर्वजन्मातील पौरुष त्याला नाहीसे करून टाकता येते. बुद्धी आणि साहस यांनी युक्त असलेल्या पुरुषांनी दृढप्रयत्नाने अभ्यास केला असता मेरूपर्वत सुद्धा गडप करून टाकता येतो. मग पूर्वजन्मातील पौरुष नाहीसे करता येईल यात नवल काय ? जो मनुष्य शास्त्राने दर्शविलेल्या मार्गांनी कार्य करण्याला उद्युक्त होतो त्याला प्रयत्नापासून इष्ट फलाची प्राप्ती निःसंशय

होते. परंतु या व्यतिरिक्त केलेले सर्व प्रयत्न अनर्थाला कारण होतात. एखादा मनुष्य रोगाने पीडलेला असून शक्तिहीन झालेला असला व आपल्या हाताने पाणी पिण्याचेही सामर्थ्य त्याच्या अंगी नसले, तर अशा स्थितीत त्याला पाण्याचा एक बिंदूही प्राशन करण्यास मिळाला तरी तेवढ्याने तो संतुष्ट होतो. परंतु असा मनुष्यही शास्त्रीय प्रयत्न करील तर त्याची सर्व आपत्ती नाहीशी होऊन कालांतराने का होईना त्याच्या सामर्थ्याला अखिल पृथ्वीही पुरेनाशी होईल.

शास्त्रप्रभावामुळे परम शुद्धी :–

शास्त्राचा प्रभाव किती विलक्षण असतो व त्यामुळे परम शुद्धी कशी प्राप्त होते हे सांगताना योगवासिष्ठात श्रीरामांना वसिष्ठऋषी म्हणतात, "हे राघवा! शास्त्रोक्त उपायांचा अभ्यास केल्याने अतिशय शुद्ध झालेले चित्त त्याची इच्छा नसतानाही सत्वर पावन पदाला पोहाते. ते जस जसे शुद्ध होऊ लागते तसे तसे भोगेच्छारहित होऊन प्रत्यही अंतर्मुख होत जाते व शेवटी आत्मपरायण होते. या शास्त्रामुळे अविद्येचा सात्त्विक भाग उत्कर्ष पावतो आणि या सात्त्विक भागाच्या उत्कर्षामुळे तिचा तामस भाग क्षीण होतो. या शास्त्ररूपी प्रधान जलाने नित्य मलाचे क्षालन करणारा मनुष्य अचिंत्य शास्त्रप्रभावामुळे परम शुद्धीला प्राप्त होतो. ज्याप्रमाणे सूर्य व समुद्र हे एकमेकांच्या समोर आले तर त्यांतील कोणाचीही जरी इच्छा नसली तरी पूर्वी त्यात पाहिलेलेच प्रतिबिंब स्वच्छ प्रकाशस्वभावामुळेच प्रवृत्त होते. त्याच न्यायाने मुमुक्षू व शास्त्र यांचा परस्पर संबंध झाल्यामुळेच अनुभवसिद्ध सर्व संवित्पदातील आत्मज्ञान प्रवृत्त होते."

शास्त्ररक्षण न केल्यास पतनाचा संभव :–

महर्षी नारदांनी आपल्या भक्तिसूत्रात शास्त्ररक्षणाची आवश्यकता सांगताना पुढील दोन महत्त्वाची सूत्रे लिहिली आहेत. **भवतु निश्चयदाढर्यादूर्ध्वं शास्त्ररक्षणम् ॥ १२॥ अन्यथा पातित्याशंकया ॥१३॥** साध्यसाधनाचा निश्चय दृढ झाल्यावर तदनुरोधाने शास्त्राज्ञांचे पालन अवश्य झाले पाहिजे. शास्त्रपालन केले नाही तर साधक पतन पावण्याचा संभव असतो. परमेश्वरप्राप्ती हे साध्य व शक्तिपातयोग हे साधन होय. शक्तिपातयोगाची साधना करणाऱ्या साधकाने सद्गुरूंनी जागृत केलेल्या शक्तीचा

उत्तरोत्तर विकास होण्यासाठी आवश्यक त्या सर्व शास्त्रमर्यादांचे पालन काटेकोरपणे केले पाहिजे. ज्या साधकाला मुक्कामाला लवकर पोहोचण्याची इच्छा असेल त्याने तर चुकून सुद्धा शास्त्ररक्षणात कसूर करता कामा नये. साधन श्रेष्ठ आहे, आपण कसेही वागले तरी चालेल असे म्हणून शास्त्ररक्षणाची साधकाने कधीही उपेक्षा करता कामा नये. शास्त्राची उपेक्षा ही साधकाच्या पतनास कारण होते. त्यामुळे साधन नीट चालत नाही व मन:शांती बिघडते. शास्त्रानें आपल्या दैनंदिन आचाराला अशा काही मर्यादा घालून ठेवल्या आहेत की त्यांचे पालन केल्यास स्वैराचारास आळा बसून साधकाचे मन सहजच शुद्ध व स्थिर होऊ लागते.

शक्तिपातयोगप्राप्तीमुळे आपल्याला अलौकिक अशा भगवत्प्रेमाची प्राप्ती झाली असून आपण विधिनिषेधातीत आहोत असे समजून साधकाने लौकिक व वैदिक कर्मांचा त्याग मुद्दाम करता कामा नये. असा त्याग आपोआप होत असतो. त्याकरिता सर्व गोष्टींचे विस्मरण पाडणारी भगवत्प्रेमाची दिव्य स्थिती जोपर्यंत साधकाला प्राप्त होत नाही तोपर्यंत शक्तिपातयोगाच्या नावावर साधकाने शास्त्रविहित कर्मांचा त्याग कधीही करता कामा नये. जो साधक जाणून बुजून शास्त्राज्ञांचे पालन करीत नाही व शास्त्रविरुद्ध अमर्यादेने वागून शक्तिपातयोगसाधनेच्या नावाखाली स्वत:ची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतो अशा साधकाला पतनाचे भय राहाते. त्याच्या शक्तीच्या विकासाचा वेग कमी होतो याकरिता **" विधीते पाळीत । निषेधाते गाळीत "** असेच साधकाचे आचरण असले पाहिजे.

श्रुती ही जगाची माऊली आहे :–

गीतेच्या सोळाव्या अध्यायात शास्त्रच प्रमाण कसे मानले पाहिजे हे सांगताना भगवान् म्हणतात,

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्मकर्तुमिहार्हसि ॥

काय केले पाहिजे व काय करता कामा नये यांचा निश्चय करण्याकरिता तुला शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे. म्हणून शास्त्रांनी सांगितलेले विधान जाणून घेऊन तसे कर्म करण्यास तू योग्य आहेस. यावर श्रीज्ञानेश्वर महाराजांनी फार सुंदर भाष्य केले आहे. ते म्हणतात –

या कारणे पैं बापा । जया आथी आपली कृपा । तेणें वेदांचिया निरोपा । आन न कीजे ॥ पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अना-

यासें आत्महिता । भेटेचि ते ॥ नातरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना । शिष्य आत्मभुवना–। माजी पैसे ॥ हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा । तरी आदरें जेंवि दिवा । पुढां कीजे ॥ तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था । तेणें श्रुतिस्मृति माथां । बैसणे घापे ॥ शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न म्हणावें । विषही विरूं ॥ ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरि कें आहे अनिष्टां । भेटणे गा ॥ पै अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती । नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा ॥ म्हणोनि ब्रह्मेंसी मेळवी । तंव हे कोण्हे न सांडावी । अगा तुवां ही ऐसी भजावी । विशेषेसी ॥ कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेंचि करावी पारखी । अकृत्य तें कुडें लोकीं । वाळावें गा ॥ मग कृत्यपणें खरे निगे । ते तुवां आपलेनि आंगें । आचरोनी आदरें चांगें । सारावें गा ॥

म्हणून हे बापा अर्जुना ! ज्याला आपले कल्याण व्हावे अशी इच्छा आहे त्याने वेदांची आज्ञा कधीही मोडू नये पतिव्रता स्त्री आपल्या पतीच्या मनोगताप्रमाणे वागून अनायासे आपले आत्महित साधून घेते, किंवा जो शिष्य श्रीगुरूंच्या आज्ञेकडे लक्ष देऊन वागतो तो आत्मप्राप्ती करून घेतो. फार काय, आपणच ठेवलेली ठेव हाती येण्याकरिता ज्याप्रमाणे दिवा अगत्याने पुढे करावा लागतो त्याप्रमाणे पार्था, सर्व पुरूषार्थांचा स्वामी होण्याची ज्याला इच्छा असेल त्याने श्रुती व स्मृती यांना शिरसावंद्य मानलेच पाहिजे. शास्त्रांनी जे टाकावे म्हणून म्हटले असेल ते आवडते राज्यही असले तरी तृणाप्रमाणे तुच्छ समजून त्याचा त्याग करावा आणि ज्याचा स्वीकार करावा असे म्हटले असेल ते विषही असले तरी ते मारक होईल असे मनातही आणू नये. अर्जुना, अशा रीतीने जो वेदांची आज्ञा एकनिष्ठपणे पाळतो त्याचे अकल्याण कधीच होत नाही. अकल्याणापासून सोडविणारी व कल्याण करून पोषण करणारी अशी श्रुतीशिवाय जगाला दुसरी माऊली नाही. परब्रह्माशी ऐक्य होईपर्यंत श्रुतीचा कोणीही त्याग करू नये आणि अर्जुना ! तूही विशेषेकरून श्रुतीची आज्ञा पाळली पाहिजे. काय करावे व काय करू नये यांचा निवाडा शास्त्रावरूनच करावा आणि जगात करू नये म्हणून सांगितले असेल अशा निंद्य कर्माचा त्याग करावा. मग करावे म्हणून जे यथार्थ ठरेल त्याचे तू स्वत: श्रद्धायुक्त अंत:करणाने आचरण करून ते पुरे करावे.

विहितकर्मे टाकणे हा वेडेपणा होय :–

जोपर्यंत साधकाला दिव्य व अलौकिक अवस्था प्राप्त होत नाही

तोपर्यंत साधकाने मुद्दाम होऊन शास्त्राने उचित सांगितलेल्या अशा कर्माचा त्याग कधीही करता कामा नये. याबद्दल श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

वांचोनि कर्मारंभ उचित । न करितां सिद्धवत । कर्महीना निश्चित । होईजेना ।। की प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म्य होईजे । हे अर्जुना वाया बोलिजे । मूर्खपणे ।। सांगें पैलतीरा जावे । ऐले व्यसन कां जेथ पावे । तेथ नावेते त्यजावे । घडे केवी ।। नातरी तृप्ती इच्छिजे । तरी कैसेनि पाक न कीजे ।। कीं सिद्धही न सेविजे । कैंवि सांगें ।। जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापक असे पाहीं । मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहजे ।। म्हणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ।। आणि आपुलिये चाडे । आपादिले हें मांडे । कीं त्यजिलें हें कर्म सांडे । ऐसें आहे ।। हें वायांचि सैरा बोलिजे । उकल तरी देखोनि पाहिजे । परी त्यजिता कर्म न त्यजे । निभ्रांत मानी ।। देखे विहित कर्म जेतुलें । तें सगळें जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ।। सांगे श्रवणी ऐकावें ठेलें । कीं नेत्रींचें तेज गेलें । हे नासरंध्र बुझालें । परिमळ नेघे ।। ना तरी प्राणापानगति । कीं निर्विकल्प जाहली मति । की क्षुधा तृषादि आर्ति । खुंटलिया ।। हे स्वप्नावबोधु ठेले । चरण चालों विसरले । हे असो काय निमाले । जन्ममृत्यु ।। हें न ठकेचि जरी कांहीं । तरी सांडणें तें कायी । म्हणोनि कर्मत्यागु नाही । प्रकृतिवंतां ।। कर्म पराधीनपणें । निपजत असे प्रकृतिगुणें । येरी धरी मोकली अंतःकरणें । वाहिजे वाया ।। देखे रथीं आरूढिजे । मग जरी निश्चळ बैसिजे । तरी चळु होऊनि हिंडिजे । परतंत्रा ।। कां उचलिलें वायुवशें । चळे शुष्क पत्र जैसें । निश्चेष्ट आकाशें । परिभ्रमे ।। तैसें प्रकृतिआधारें । कर्मेंद्रियविकारें । नैष्कर्म्यही व्यापारे । निरतर ।। म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा । तंववरी त्यागु न घडे कर्मांचा ।। ऐसियाहि करूं म्हणतो तयांचा । अग्रहोचि उरे ।।

कोणीही मनुष्य विहित कर्मे टाकून जर सिद्ध (ज्ञानी) होऊ म्हणेल तर निश्चयाने त्याला तसे होता येणार नाही. अर्जुना, ज्याला जी विहित कर्मे करावयाची, ती टाकल्याने तो कृतार्थ होईल असे म्हणणे हा केवळ वेडेपणा होय. दुथडी भरलेल्या नदीच्या परतीराला जाण्याचे संकट प्राप्त झाले तर नावेचा त्याग करिता येईल का? भोजनापासून जो तृप्तीची इच्छा करतो त्याला स्वयंपाक न करता अथवा तयार असलेले अन्न न खाता तृप्ती कशी प्राप्त होईल ? जोपर्यंत निरिच्छपणा प्राप्त झाला नाही तोपर्यंत खटपट ही केलीच पाहिजे.

एकदा का निरिच्छता प्राप्त झाली की प्राणी आत्मसंतोषात सहज गुंतून जातो. म्हणून पार्था, ज्याला मोक्ष प्राप्तीची इच्छा आहे त्याने आपले विहित कर्माचरण कधीही सोडू नये. आणि आपापल्या गरजेप्रमाणे कर्माचा स्वीकार व त्याग करू म्हटल्याने तो होईल काय ? हे बोलणे व्यर्थ बहकल्यासारखे आहे. ह्याचा नीट विचार करून पाहिला तर कर्म टाकल्याने कर्माचा त्याग होत नाही असे पक्के समज.

जेवढी विहित कर्मे आहेत तेवढी सगळी जरी त्रासाने सोडली तरी इंद्रियांचे स्वभावधर्म नाहीसे होतात का ? कर्मत्याग केला म्हणून कानाचे ऐकणे बंद झाले आहे का ? का डोळ्याची दृष्टी (तेज) गेली ? का नाकाची भोके बुजून जाऊन वास येईनासा झाला ? किंवा प्राणापान-वायूंची गती बंद झाली ? का मन हे कल्पनारहित झाले ? का तहान-भूकेची इच्छा नाहीशी झाली? त्याचप्रमाणे निद्रा व जागृती या अवस्था बंद झाल्या का ? किंवा पाय चालणे विसरले ? इतकेच नव्हे, परंतु जन्ममरण तरी चुकले आहे काय ? हे इंद्रियांचे व्यापार बंद पडत नाहीत तर कोणते कर्म सोडले असे म्हणता येईल ? म्हणून देहभिमान्याला कर्मत्याग करता येणार नाही. कर्म हे पराधीन असल्यामुळे प्रकृतीच्या गुणानुरोधाने घडते. याकरिता मी कर्म करीन अगर सोडीन असे समजणे व्यर्थ होय. हे पहा अर्जुना ! आपण रथावर बसलो व निश्चळ जरी राहिलो तरी रथाच्या आधीन झाल्यामुळे आपण चालतो व हिंडतोच. किंवा झाडाचे वाळलेले पान निश्चेष्ट असताही वायूच्या वेगाने उडून आकाशात भ्रमण करते. त्याप्रमाणे मायेच्या आधाराने व कर्मेंद्रियांच्या विकाराने निष्कामही नेहमी कर्म करतो. म्हणून जोपर्यंत मायेचा संग आहे तोपर्यंत कर्माचा त्याग घडत नाही. असे असूनही जे कर्माचा त्याग करू म्हणतात त्यांचा तो रिकामा आग्रह आहे.

स्वधर्म हा मोक्षदायक यज्ञ :–

स्वधर्म हा मोक्ष देणारा असा नित्य यज्ञ आहे. त्याचे वैशिष्ट्य वर्णन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात –

म्हणोनि नैष्कर्म्य होआवे। तरी एथ तें न संभवे। आणि निषिद्ध केंवि राहाटावें। विचारीं पां ॥ म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरें-करूनि प्राप्त। तें कर्म हेतुरहित। आचरें तूं ॥ पार्था आणिकही एक। नेणसी तूं हें कवतिक। जें ऐसें कर्ममोचक। आपैसें असे ॥ देखें अनुक्र-माधारें। स्वधर्म जो आचरे। तो मोक्ष तेणें व्यापारें। निश्चित पावे ॥ स्वधर्म जी बापा। तोचि नित्य यज्ञ जाणा पां। म्हणोनि वर्तत तेथ पापा ॥

संचार नाहीं ।। हा निजधर्म जैं सोडे। आणि कुकर्मी रति घडे। तैंचि बंध पडे। सांसारिक ।। म्हणोनि स्वधर्मानुष्ठान। तें अखंड यज्ञयाजन। जो करी तया बंधन। कहींच न घडे ।। हा लोक कर्मे बांधला। जो परतंत्रा भूलला। तो नित्ययज्ञातें चुकला। म्हणोनियां ।।

म्हणून कर्मरहित असे आत्मरूप व्हावयाचे असल्यास कर्मत्याग करून ते साधणे हे ह्या संसारात असंभवनीय आहे. मग शास्त्रविरुद्ध आचरण कां करावे याचा विचार कर. म्हणून आपल्याला विहित असेल ते उचित कर्म व प्रसंगोपात्त जे नैमित्तिक कर्म असेल ते ते विषयसुखाच्या प्राप्तीचा उद्देश सोडून केवळ भगवंताने लावून दिलेले आपले कर्तव्य आहे असे समजून कर. अशा रीतीने निष्काम कर्म करण्यात एक मौज आहे, ती तुला माहीत नाही. अशा रीतीने केलेले कर्म अनायासे कर्म-बंधनापासून सोडविणारे होते. जो वर्णाश्रमधर्मप्रमाणे स्वधर्माचे आचरण करतो तो त्या आचरणानेच निश्चयेकरून मोक्ष पावतो. आपल्या धर्मा-प्रमाणे आचरण करणे हाच नित्ययज्ञ आहे असे समज. म्हणून त्याप्रमाणे वर्तन केल्यावर त्यात पापाचा रिघाव होत नाही. प्राणी जेव्हा हा स्वधर्म टाकतात आणि वाईट कर्माच्या ठिकाणी प्रवृत्त होतात, तेव्हाच जन्ममरणाचे फेऱ्यात सापडतात. म्हणून स्वधर्माप्रमाणे आचरण करणे हाच अखंड यज्ञ असे समज. जो पुरुष हा यज्ञ करतो त्याला काही सुद्धा बंधन होत नाही. हे सर्व जग स्वकर्माला चुकले म्हणूनच कर्माने बांधले जाऊन मायेच्या पाशात गुंतले आहे.

स्वधर्म सोडण्याने दुःख, दारिद्र व पाप प्राप्त होते :–

स्वधर्माचे आचरण जर मनुष्याच्या हातून घडले नाही तर मनुष्याला किती हालआपेष्टा, दुःख व दैन्य सोसावे लागते याचे मोठे विदारक चित्र श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी रंगविले आहे. शक्तिपातयोगाची साधना करणारांनी साधन व नित्यनैमित्तिक कर्मांची सांगड उत्तम प्रकारे घातली पाहिजे. त्यामुळे त्यांच्या वाटचाला दुःख, दारिद्र्य व पाप न येता सुखच येईल. याबाबत श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात––

ऐसे समस्त भोगरहित। होआल तुम्ही अनार्त। जरी स्वधर्मैक निरत। वर्ताल बापा ।। की जालिया सकळ संपदा। जो अनुसरेल इंद्रियमदा। लुब्ध होऊनियां स्वादा। विषययांचिया ।। तिहीं यज्ञ-भावितीं सुरीं। जे हे संपत्ति दिधली पुरी। तयां स्वधर्मीं सर्वेश्वरीं। न भजेल जो ।। अग्निमुखीं हवन। न करील देवतापूजन। प्राप्तवेळ

भोजन । ब्राह्मणाचे । विमुख होईल गुरुभक्ती । आदर न करील अतिथी । संतोष नेदील ज्ञाती । आपुलिये ॥ ऐसा स्वधर्मक्रियारहित । आथिलेपणें गर्वित । केवळ भोगासक्त । होईल जो ॥ तया मग अपावो थोर आहे । जेणें ते हातिचे सकळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ॥ जैसें गतायुशरीरीं । चैतन्य वास न करी । कां निदैवाच्या घरीं । न राहे लक्ष्मी ॥ तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ तैसी निजवृत्ति जेथ सांडे ॥ तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आइका प्रजा हो फुडें । विरंचि म्हणे ॥ म्हणऊनि स्वधर्म जो सांडील । तयातें काळ दंडील । चोर म्हणूनि हरील । सर्वस्व तयाचें ॥ मग सकळ दोष भंवते । गिवसोनि घेती तयातें । रात्रि-समयीं स्मशानातें । भूतें जैसीं ॥ तैसीं त्रिभुवनींची दुःखे । आणि नानाविधें पातकें । दैन्यजात तितुके । तेथेंचि वसे ॥ ऐसें होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदता । कल्पांतींही सर्वथा । प्राणिगण हो ॥ म्हणऊनि निजवृत्ति हे न सांडावी । इंद्रियें बरळों नेदावीं । ऐसें प्रजातें शिकवी । चतुरानन ॥ जैसें जळचरां जळ सांडे । मग तत्क्षणीं मरण मांडे । हा स्वधर्म तेणें पाडें । विसंबों नये ॥ म्हणोनि तुम्हीं समस्तीं । आपुलिया कर्मी उचितीं । निरत व्हावें पुढतपुढती । म्हणिपत असे ॥

अशा रीतीने तुम्ही एकनिष्ठेने स्वधर्माचे आचरण कराल तर तुम्ही ऐश्वर्ययुक्त होऊन तुम्हाला विषयांची इच्छा राहाणार नाही. याच्या उलट सर्व संपत्ती प्राप्त होऊन जो कोणी विषयाच्या सुखाला भुलून इंद्रियांना जसे वाटेल तसे वागण्याचा प्रयत्न करील, यज्ञाने संतुष्ट झालेल्या देवांनी प्रसन्न होऊन मनुष्याला पूर्ण संपत्ती दिली त्या संपत्तीने व स्वधर्माचरणाने जो ईश्वरास भजणार नाही, जो अग्नीत आहुती देणार नाही, देवता पूजन करणार नाही, प्रसंगाने ब्राह्मणाला भोजन देणार नाही, आपल्या गुरूची भक्ती करणार नाही, अतिथीचा आदर सत्कार करणार नाही, आपल्या जातीबांधवांचें कार्य करून त्यांना संतोष देणार नाही, अशा रीतीने जो स्वधर्माचे आचरण करीत नाही, श्रीमंतीने ज्याला गर्वाचा ताठा भरला आहे आणि जो केवळ विषयासक्त झाला आहे अशा पुरुषाला महासंकटे येऊन पुढे फार दुःख होते. त्याला मिळालेले सर्व ऐश्वर्य नाहीसे होते आणि प्राप्त भोग भोगण्याकरिताही तो समर्थ राहात नाही. ज्याप्रमाणे आयुष्य संपलेल्या शरीरात चैतन्य वास करीत नाही किंवा ज्याचे दैव फिरले आहे त्याचे घरी लक्ष्मी राहात नाही, त्या प्रमाणे, जसा दिवा मालविला की प्रकाश तत्काळ नाहीसा होतो तसा स्वधर्माचा

लोप झाला असता, सर्व सुखाचे आश्रय स्थान नाहीसे होते. या करिता ब्रह्मदेव म्हणतात, प्रजाजन हो ! जो स्वधर्माचे आचरण सोडतो, त्याचें स्वातंत्र्य नष्ट होते. म्हणून स्वधर्माचा जो त्याग करील त्याला काळ शिक्षा करील आणि हा चोर आहे असे समजून त्याच्या सर्वस्वाचे हरण करील. मग रात्र झाल्यावर स्मशानात जशी भुतांची गर्दी होते तशी सर्व संकटे व पापे त्याला येऊन वेढतात. तसेच त्रिभुवनातील सर्व दुःखे हजारो प्रकारची पातके व झाडून सर्व दारिन्द्रही त्याचे ठिकाणी वास करतात ब्रह्मदेव म्हणतात, हे प्रजाजन हो, हयाप्रमाणे त्या उन्मत्त मनुष्याची स्थिती होते. मग कितीही तो रडला व त्याने दुःख केले तरी कोणी त्याला कल्पांतीही सोडवू शकत नाही. ब्रह्मदेव असा बोध करतात की आपला स्वधर्म सोडू नका आणि इंद्रियांना स्वैर वर्तन करू देऊ नका. ज्याप्रमाणे जलचरांना पाण्यातून बाहेर काढल्याबरोबर लागलीच मृत्यू येतो त्याप्रमाणे स्वधर्माचा विसर पडला म्हणजे प्राणी अधःपात पावतो. ब्रह्मदेव म्हणतात, म्हणून तुम्ही सर्वांनी आपल्या धर्माप्रमाणे कर्म करण्यास नेहमी तत्पर राहावे.

साधनावर विश्वास :–

शक्तिपातयोगसाधनेत साधकाचा साधनेंवर पूर्ण विश्वास असणे अत्यंत आवश्यक आहे, कारण विश्वासामुळेच कोणत्याही कार्यात सिद्धी प्राप्त होत असते. श्रीमद्गोस्वामी तुलसीदासमहाराजांनी श्रीरामचरित मानसाच्या मंगलाचरणात विश्वासाचे स्थान किती मोठे आहे हे सांगताना म्हटले आहे की–

भवानीशंकरौ वंदे श्रध्दाविश्वासरूपिणौ । याभ्यां विना न पश्यन्ति सिध्दाः स्वान्तःस्थमीश्वरम् ।।

श्रद्धा व विश्वासरूपी उमामहेश्वरांना मी वंदन करतो, (कारण) त्यांच्याशिवाय आपल्या हृदयातील परमात्म्याचे दर्शन योगीसुद्धा घेऊ शकत नाही.

गीतेच्या चवथ्या अध्यायातील ४० व्या श्लोकात भगवंतांनी अर्जुनाला अविश्वासाची भीषणता पुढील शब्दात सांगितली आहे.

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।। नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः

अज्ञानी, श्रद्धाहीन व संशययुक्त असा जो असतो तो अधोगतीला जातो. त्या संशयी पुरुषास इहलोक, परलोक व मोक्षसुखही प्राप्त होत नाही.

या श्लोकावर भाष्य करून साधकाच्या दृष्टीने संशय व अविश्वास हा किती हानीकारक आहे हे सांगताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

मग संशयी जरी पडिला। तरी निभ्रांत जाणें नासला। तो ऐहिक परत्रा मुकला। सुखासि गा॥ जया काळज्वर आंगी बाणे। तो शीतोष्णे जैशीं नेणे। आगी आणि चांदणें। सरिसेचि मानी॥ तैसे साच आणि लटिकें। विरुध्द आणि निकें। संशयी तो नोळखे। हिताहित॥ हा रात्री दिवस पाहीं। जसा जात्यंधा ठाउवा नाहीं। तैसें संशयी असतां काहीं। मना नये॥ म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाही पाप घोर। हा विनाशाची वागुर। प्राणियांसी॥ येणे कारणे तुवां त्यजावा। आधी हाच एक जिणावा। जो ज्ञानाचिया अभावा–। माजि असे॥ जैं अज्ञानाचे गडद पडे। तैं हा बहुवस मनीं वाढे। म्हणोनि सर्वथा मार्ग मोडे। विश्वासाचा॥ हृदयीं हाचि न समाये। बुद्धीतें गिंवसूनि ठाये। तेथें संशयात्मक होये। लोकत्रय॥

मनुष्य संशयात पडला की निःसंशय नाश पावतो व तो ऐहिक व पारत्रिक अशा दोन्ही सुखाला मुकतो. ज्याला भयंकर सन्निपातज्वर झाला आहे त्याला शीत–उष्णाचे ज्ञान होत नाही. तो उष्णता व चांदणे सारखेच मानतो. त्याचप्रमाणे संशयग्रस्त मनुष्याला खरे-खोटे, अनुकूल-प्रतिकूल व हित-अहित ही कळत नाहीत. ज्याप्रमाणे जन्मांध पुरुष रात्र व दिवस ओळखत नाही, त्याप्रमाणे संशयात पडलेल्या मनुष्याच्या बुद्धीला दुसऱ्याचे सांगणे मुळीच पटत नाही. म्हणून संशयापेक्षा दुसरे भयंकर पाप कोणतेच नाही. संशय हा प्राण्याचा सर्वस्वी नाश करणारे जाळे आहे, म्हणून अर्जुना ! तू त्याचा त्याग कर. प्रथम संशयालाच जिंक. हा संशय जेथे यथार्थ ज्ञान नाही तेथेच असतो. जेव्हा अज्ञानाचा गाढ अंधकार असतो तेव्हाच याची फार वाढ होते. तो विश्वासाविषयी मनात कल्पना देखील येऊ देत नाही. हा संशय वाढला की अंतःकरणातच भरून राहातो असे नाही, तर तो बुद्धीलाही ग्रासून टाकतो. असे झाले की त्या मनुष्याला तिन्ही लोक संशयात्मकच दिसू लागतात.

हे सर्व जरी खरे असले तरी साधकांना संशय येतच राहातो. साधक ज्या ज्या अवस्थेत असतो त्या त्या अवस्थेत त्याला निरनिराळे संशय येतात. साधकांमध्ये नवीन साधक, साधना करून काही दिवस झालेले साधक व थोडया वरच्या पायरीवर गेलेला साधक असे तीन

प्रकार सर्वसाधारणपणे संभवतात. या तीनही प्रकारच्या साधकांचे भिन्नभिन्न संशय व त्यांचे निराकरण यांचा आपण क्रमशः विचार करू.

नवीन साधक व त्यांचे संशय :–

पहिली शंका :– नवीन साधकाला वाटते, कुंडलिनी-जागरण ही तर अत्यंत दुर्लभ गोष्ट आहे. मग अत्यंत सहजपणे ती आपल्यासारख्या सामान्य माणसाला प्राप्त होणे कसे शक्य आहे ? यात काही मायाजाल किंवा जादूटोणा तर नसेल ? संमोहन विद्येच्या प्रभावाने तर लोक इकडे आकर्षित होत नसतील ? अशा प्रकारे शक्ती जागृत करणारे लोक जादूगार तर नसतील ?

पूर्वजन्मीची पुण्याई, भाग्य व कर्मसाम्यदशा प्राप्त झाल्याने शक्तिपातयोगसाधनाकडे साधक वळू लागतो. त्याची सद्गुरूशी अनायासे गाठ पडते. अशा साधकावर कृपा करून सद्गुरू त्याच्या मुक्तीचा मार्ग मोकळा करून देतात, परंतु साधकाच्या वाटचालीत वर वर्णन केलेले संशय व अविश्वास अनेक वेळा डोके वर काढून प्रगती थांबवून ठेवतात. दुर्लभ वस्तू सहजतेने प्राप्त झाली म्हणजे माणसाचे मन अनेक शंकाकुशंकांनी भरून जाते. यासंबंधी योगवासिष्ठात मणिकांचन उपाख्यान आले आहे. ते पाहाण्यासारखे आहे.

रामप्रसाद नावाचा एक श्रीमंत ब्राह्मण होता. तो सर्व कलात पारंगत होता. खूप हुशार होता, व्यवहारात निपुण होता. त्याचे जीवन सर्वांगांनी समृद्ध होते.

एकदा त्याला आपल्याला चिंतामणी प्राप्त व्हावा अशी तीव्र इच्छा झाली. आपली इच्छा पुरी व्हावी म्हणून रामप्रसादने घोर तपश्चर्या सुरू केली. त्याच्या दृढनिश्चयामुळे व भगवत्कृपेने थोड्याच दिवसात एक अमूल्य चिंतामणी त्याला प्राप्त झाला. परंतु एखाद्या अत्यंत पामर व दीनदरिद्री पुरुषाला अकस्मात संपत्ती प्राप्त झाली किंवा राज्य मिळाले तर त्याची त्याविषयी खात्री नसते. आपल्याला खरोखरच चिंतामणी मिळाला असेल का ? हा प्रश्न त्याला वारंवार भेडसावू लागला. त्यामुळे रामप्रसादचा त्या श्रेष्ठ अशा चिंतामणीविषयी पक्का निश्चय होईना. हा चिंतामणीच नव्हे असे त्याला वाटू लागले.

या विचारांमुळे रामप्रसादचे मन भ्रांत बनले. त्याने प्राप्त झालेल्या त्या चिंतामणीची उपेक्षा केली. त्याच्या एका मनाला मधून मधून थोडा वेळ असे वाटे की अमूल्य असा चिंतामणी आपल्याला प्राप्त

झाला असावा; परंतु त्याचे दुसरे मन म्हणत असे, छे ! हा चिंतामणी खासच नव्हे. माझ्या इतक्याशा थोड्या तपश्चर्येने हा मणी मला प्रत्यक्ष दिसणे शक्यच नाही.

अशा विचारांच्या द्विधा अवस्थेत मन सापडले असता हा खरोखरीचा अस्सल चिंतामणी आहे की नाही याचे मणी हातात घेऊन परीक्षण करावे असे रामप्रसादला वाटले. परंतु त्या मण्याला स्पर्श करणे त्याला बरे वाटेना. याला जर आपण स्पर्श केला तर आपल्या अभाग्याच्या स्पर्शाने हा गुप्त होईल असे वाटून तो नुसता त्या मण्याकडे पाहात राहिला.

एवढ्याशा थोड्या कालात चिंतामणी सिद्ध होणे शक्य दिसत नाही असा विचार शेवटी प्रबळ होऊन पुन्हा अनेक संशय त्याच्या मनात आले. " इतिहासाकडे पाहिले तर मरेपर्यंत जेव्हा प्रयत्न करावा तेव्हाच चिंतामणी प्राप्त होतो असे दिसून येते. या रत्नाला एवढा प्रकाश आहे खरा पण कृपणता, भ्रांती, द्विधा मनःस्थिती व संशय यामुळे मला तो खोटा वाटत आहे. एखाद्या माणसाला दृष्टिदोषामुळे जसे दोन चंद्र दिसतात, त्याप्रमाणे मला हा चिंतामणी दिसत आहे. माझे भाग्य मोठे नाही. तपश्चर्या तीव्र नाही. दैव बलवत्तर नाही. पूर्वजन्मीचे खूप पुण्य नाही. अशा परिस्थितीत मला सर्वसिद्धी देणारा श्रेष्ठ चिंतामणी प्राप्त होईलच कसा ? ज्यांना थोड्याच कालात अल्प प्रयत्नाने संपत्ती मिळते असे महाभाग्यशाली महात्मे या भूतलावर काही थोडेच असतील! मी अगदी दुर्बल मनुष्य आहे, तेव्हा मला अभाग्याला अशी सिद्धी कशी मिळणार ? "

अशा प्रकारच्या संकल्प-विकल्पात रामप्रसादचा बराच वेळ निघून गेला. शेवटी संभ्रमाने व अज्ञानाने मोहित झाल्याने रामप्रसादने तो मणी उचलून घेण्याचा साधा प्रयत्न सुद्धा केला नाही. त्याने प्राप्त झालेला तो चिंतामणी दुर्बुद्धीने व अनादराने टाकून दिला. या मूर्खाने आपल्याला अनादराने टाकून दिले असे पाहून तो चिंतामणीही तेथून अंतर्धान पावला.

चिंतामणी निघून गेल्यावर आता खरा चिंतामणी आपल्याला प्राप्त व्हावा या इच्छेने रामप्रसादने पुन्हा तपश्चर्येस प्रारंभ केला. खरा चिंतामणी सोडून पुन्हा चिंतामणीसाठी तप करणाऱ्या त्या ब्राह्मणाला पाहून काही थट्टेखोर सिद्धांनी रामप्रसादच्या दृष्टीला न पडता हळूच एक चकचकीत काचेचा तुकडा त्याच्या पुढे ठेवला. ध्यानाच्या शेवटी

रामप्रसादला तो चमकणारा काचेचा तुकडा दिसला. त्याला वाटले, इतके दिवस आपण जी तपश्चर्या केली ती फळाला आली. ज्या दुर्लभ व अमूल्य वस्तूची आपण इतके दिवस इच्छा करीत होतो ती वस्तू भगवंताच्या कृपेने आपल्याला मिळाली. रामप्रसादला परमानंद झाला.

अत्यानंदाने व हर्षातिरेकाने रामप्रसादाने तो काचेचा तुकडा घेतला. तो घरी आला. काचेच्या तुकड्यालाच चिंतामणी समजून रामप्रसाद सुखात राहू लागला. पुढे पुढे त्याला असे वाटू लागले की आपल्या सर्व इच्छा, आशा व आकांक्षा या चिंतामणीमुळेच पूर्ण होऊन सर्व अडचणी दूर होतील.

या विचाराने रामप्रसादने आपली सर्व मालमत्ता विकून टाकून तो दूर ठिकाणी निघून गेला. रामप्रसाद विश्वासाने निघून गेला खरा, पण त्याच्या दुःखाला व दुर्दशेला सीमा राहिली नाही. या परिस्थितीमुळे हा चिंतामणी नसून काचेचा तुकडा आहे याची खात्री पटून त्याने तो काचेचा तुकडा फेकून दिला.

शक्तिपाताचे साधन करणाऱ्या काही नवीन साधकांची स्थितीही वरील गोष्टीतील ब्राह्मणाप्रमाणे होते. पूर्वजन्मीच्या बलवत्तर पुण्याईने, भाग्य उदयास आल्याने व कर्मसाम्यदशा प्राप्त झाल्याने थोड्याशा प्रयत्नाने ईश्वरी कृपा होऊन साधकाची सद्गुरूंशी गाठ पडून त्याला शक्तिपातासारखे दुर्लभ साधन प्राप्त होते, परंतु हे दुर्लभ साधन सहजा-सहजी मिळाल्याने त्याचे विशेष महत्त्व व त्याची श्रेष्ठता साधकाला जाणवत नाही. अशा वेळी साधकाने हृदयाच्या कसोटीवर साधनाला पारखून आपल्याला सोने मिळाले की पितळ हे साक्षेपाने पाहिले पाहिजे. आपण चिंतामणीचे स्वामी आहोत की काचेचे याची परीक्षा त्याने केली पाहिजे. साधना नियमित करून गुरुवाक्य व शास्त्रवाक्य यांच्याशी आपली अनुभूती जुळते की नाही हे अवश्य पाहिले पाहिजे. जर गुरु-वाक्य, शास्त्रवाक्य व स्वतःचा अनुभव या तीनही गोष्टी बरोबर जुळल्या तर साधन–तत्त्वासंबंधी कोणताही संशय मनात ठेवता उपयोगी नाही.

जादूटोण्याने किंवा संमोहन विद्येच्या जोरावर एखाद्याने काही काळ माणसाला झुलविले तरी फार काळ त्याचा प्रभाव राहाणार नाही. या साधनाने मिळणारा आनंद, प्रचीती व ब्रह्मप्राप्ती ही जादूटोण्याने किंवा संमोहनविद्येच्या प्रभावाने कदापीही मिळणार नाही. संमोहनामुळे तात्कालिक भ्रम पडेल पण निरंतर सुख कसे मिळेल ?

सारांश शक्तिपातयोग म्हणजे मायाजाल, जादूटोणा किंवा संमोहनविद्या नव्हे. अशाप्रकारे शक्तिजागृती करणारे सद्गुरू जादूगारही नव्हेत. तर आदिगुरू शंकरांपासून शिष्यपरंपरेने हे महायोगाचे ऐश्वर्य चालत आलेले असून ते महद्भाग्याने आपणास प्राप्त झालेले आहे याची निरंतर जाणीव अंतःकरणात बाळगून साधकांनी निःशंक होऊन साधन केले पाहिजे.

दुसरी शंका : नवीन साधकांच्या मनात दुसरी शंका नेहमी येते की ईश्वरप्राप्ती करून देण्याइतके हे साधन खरोखरच अपूर्व आहे का ? मनःशांती प्राप्त करून देण्याचे अद्वितीय सामर्थ्य या साधनात आहे का ? ज्या ध्येयाने आपण वेडे झालो त्या ध्येयाप्रत सहजसुलभतेने पोहोचू शकू इतके हे साधन अद्वितीय असेल का ? ब्रह्मज्ञान होण्यासाठी हे साधन अमूल्य ठरेल का ?

नवीन साधक ध्येयसिद्धीसाठी उतावीळ झालेला असतो. त्यामुळे त्याच्या मनात वरील प्रकारच्या शंका सतत येत राहातात. या दृष्टीने पुढील कथा अत्यंत बोधकारक ठरेल :–

शंकरप्रसाद नावाचा एक श्रद्धाळू भक्त होता. तो लहानपणापासून ईश्वराची भक्ती करीत असे. तो जेव्हा मोठा झाला तेव्हा त्याची एका साधूशी गाठ पडली. तो साधू फार मोठा महात्मा होता. त्या साधूने खूप वर्षे एकांतात राहून तपश्चर्या केली होती. त्यामुळे त्याला ईश्वरी साक्षात्कार झाला होता. साक्षात्काराचे तेज त्याच्या सर्वांगावर झळकत असे.

शंकरप्रसादला ईश्वरी साक्षात्काराची फार तळमळ लागली होती. साधूशी गाठ पडल्यावर त्याने त्याची खूप दिवस उत्तम प्रकारे सेवा केली. हळूहळू सेवेमुळे शंकरप्रसादचे दोष दूर होऊ लागले. तो सत्त्वगुणसंपन्न बनू लागला. त्याची गुरुभक्ती अधिकाधिक दृढ होत गेली. श्रद्धा वृद्धिगत झाली. कुतार्किकपणा नाहीसा झाला. आळस झडून गेला. शास्त्रवचनावर विश्वास बसला. काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे षड्रिपू ताब्यात आले. घृणा व द्वेष हे दुष्ट भाव जाऊन चित्त सरळ, शांत व मृदु बनले. संतांविषयी व भगवद्भक्तांविषयी त्याच्या मनात गाढ प्रीती उत्पन्न झाली. अंगी तितिक्षा बाणली. ब्रह्मज्ञान होऊन मोक्षप्राप्ती लवकर व्हावी यासाठी त्याचे अंतःकरण तळमळू लागले.

शंकरप्रसादची तळमळ शिगेला पोहोचली. एक दिवस त्याने साधूचे चरण घट्ट पकडले. " माझा आपण उद्धार करावा व जन्ममर-

णाच्या फेऱ्यातून मला सोडवावे," अशी त्याने साधूची प्रार्थना केली. त्याच्या प्रार्थनेने महात्मा प्रसन्न झाले. शंकरप्रसाद मोक्षाचा आता अधिकारी झाला हे त्यांनी जाणले.

एके दिवशी साधूने शंकरप्रसादला सांगितले की उद्या दिवस उत्तम आहे. अमृतसिद्धी योग आहे. उद्या दीक्षाविधी होईल. तेव्हा सकाळी लवकर उठून गंगास्नान करून एक हार व नारळ घेऊन तू ये. गुरुमहाराजांच्या या आज्ञेने शंकरप्रसादचे डोळे भरून आले. त्याला खूप खूप आनंद झाला. साधुमहाराजांना प्रणाम करून तो घरी आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी गंगास्नान करून शंकरप्रसाद नारळ व हार घेऊन महाराजांकडे गेला. साधूने प्रथम आपल्या गुरुमहाराजांच्या प्रतिमेपुढे नारळ ठेवून नंतर हार अर्पण करण्यास शंकरप्रसादला सांगितले. त्याप्रमाणे त्याने केले. नंतर त्याने साधुमहाराजांना साष्टांग प्रणिपात घातला.

साधूने शंकरप्रसादला आपल्या समोर बसवून घेतले. ते त्याला म्हणाले, "मी तुला जो आता मंत्र सांगणार आहे तो अत्यंत श्रेष्ठ आहे. तो नेहमी गुप्त ठेवला पाहिजे. या अमूल्य मंत्राचे माहात्म्य फारच थोड्या लोकांना माहीत आहे. तू हा मंत्र कधीही कोणाला सांगू नकोस. रोज सकाळ संध्याकाळ साधी मांडी घालून एका आसनावर डोळे मिटून बसत जा. श्वास आत घेताना एकदा व श्वास बाहेर सोडताना एकदा मानसिक रीतीने उच्चार करून जप करीत जा."

एवढे सांगून साधूमहाराजांनी "राम" या महामंत्राची शंकरप्रसादला शक्तिपातपूर्वक दीक्षा दिली. मंत्र कानात शिरल्याबरोबर त्याच्या ठिकाणी अष्ट सात्त्विक भाव जागृत झाले. वृत्ती स्थिर झाली. आनंदाच्या उर्मी अंतःकरणात उसळू लागल्या. अशा रीतीने त्याला साधनात निरनिराळे अनुभव येऊ लागले.

एक दिवस शंकरप्रसाद गंगास्नान करून घरी परत येत होता. इतक्यात त्याच्या असे लक्षात आले की, आपल्याप्रमाणेच कित्येक लोक गंगेचे स्नान करून राम मंत्राचा जोरजोराने जप करीत चालले आहेत. अशा प्रकारे गंगास्नान करून रोजच लोक नामस्मरण करीत जात असत. परंतु रोज हे पाहात व ऐकत असूनही त्याचे लक्ष कधी विशेष तिकडे गेले नव्हते. त्या दिवशी त्या लोकांकडे त्याचे लक्ष गेल्यावर त्याच्या मनात असा संशय आला की श्रीगुरुमहाराजांनी सांगितले होते की, मी

तुला जो मंत्र सांगितला आहे तो अत्यंत गुप्त आहे. त्याचे सामर्थ्य फार अलौकिक आहे. त्याचे खरे माहात्म्य फारच थोड्या लोकांना माहीत आहे, परंतु हा मंत्र तर सर्वांनाच माहीत आहे. हजारो लोक राम राम अशी गर्जना करीत चालले आहेत.

या विचाराने शंकरप्रसाद अस्वस्थ झाला. त्या दिवशी तो घरी न जाता सरळ गुरुदेवांकडे गेला. त्याला अवेळी आलेला पाहून गुरुदेव म्हणाले, " अरे, तू या वेळी इकडे कसा आलास ? " त्यावर शंकरप्रसाद म्हणाला, " माझ्या मनात जो संशय आला त्यामुळे मी बेचैन झालो. संशयाची निवृत्ती झाल्याशिवाय बरे वाटेना, म्हणून तत्काळ आपल्याकडे आलो. आपण माझा संशय अवश्य दूर करावा. "

गुरुदेवांनी शंकरप्रसादच्या मनातील शंका ओळखली. ते त्याला म्हणाले, " तुझ्या प्रश्नाचे उत्तर मी मागाहून देईन. प्रथम तू माझे एक काम कर. " असे म्हणून गुरुदेवांनी आपल्या झोळीत हात घातला. काचेसारखी एक मोठी गोटी बाहेर काढली. ती चकाकत होती. पाहाताक्षणीच मोह पडावा इतकी ती वस्तू आकर्षक होती. ती वस्तू शंकरप्रसादच्या हातात देत गुरुदेव म्हणाले, " ही वस्तू घेऊन तू बाजारात जा. त्याची खरी किंमत काय असेल ते पाहून परत ये. वस्तू विकू मात्र नकोस. फसू नकोस. सावध राहून वस्तूची काळजी घे. "

गुरुदेव आपल्या प्रश्नाचे उत्तर न देता काचेच्या गोटीची किंमत करण्यासाठी आपल्याला बाजारात पाठवीत आहेत हे पाहून त्याला आश्चर्यच वाटले, परंतु तो आज्ञाधारक व श्रद्धाळू होता. त्याने आपला प्रश्न तेथेच सोडून दिला व तो गुरूच्या कामासाठी बाहेर पडला.

बाजारात गेल्यावर पहिल्या प्रथम त्याला रस्त्यावर भाजी विकणारी एक बाई भेटली. त्याने तिला आपल्या जवळील चकचकीत वस्तू दाखविली व विचारले की ह्याची तू मला किती किंमत देशील ? भाजीवालीने ती चकाकणारी काचेची गोटी पाहून विचार केला, " आपल्या मुलांना खेळावयास ही वस्तू बरी आहे. बाजारात इतकी सुंदर काचेची गोटी आपणास कधीच मिळणार नाही. " त्यामुळे ती "या वस्तूच्या बदल्यात मी तुला दोन शेर बटाटे व दोन शेर वांगी देईन. म्हणाली, "

शंकरप्रसाद पुढे गेला. त्याला एक सोनाराचे दुकान लागले. तेथे तो थांबला. त्याने सोनाराला आपल्याजवळील वस्तू दाखविली. त्याची किंमत किती होईल म्हणून त्याने विचारले. सोनाराने वस्तू हातात घेऊन वर-

खाली करून पाहिली. हा बहुतेक नकली हिरा असावा असे समजून त्याने १०० रु. किंमत सांगितली.

वस्तूची किंमत वाढू लागल्याने शंकरप्रसादला आश्चर्य वाटले. तो आणखी पुढे गेला. त्याला एक सराफी दुकान लागले. सराफाने शंकरप्रसादची वस्तू पाहिली. परीक्षा केली. ही सामान्य काचेची गोटी नसून एक अप्रतिम हिरा असल्याबद्दल त्याची खात्री पटली. मात्र त्याने इतका मोठा सुंदर हिरा उभ्या आयुष्यात पाहिला नव्हता. त्यामुळे त्याच्या मनांत किंचित संदेह उत्पन्न झाला. शेवटी त्याने त्याला हिऱ्याची किंमत एक लाख रुपये सांगितली.

शंकरप्रसादचे कुतूहल आणखी जागृत झाले. त्याने पुढे आघाडी मारली. जेव्हा तो गुरुदेवांकडून निघाला तेव्हा त्यालाही ती काचेचीच वस्तू वाटत होती. परंतु जसजशी वस्तूची किंमत वाढत गेली तसतसे त्याचे साहसही वाढत गेले. त्यामुळे सर्वात मोठ्या सराफी दुकानात तो गेला. त्याने सराफाला हिरा दाखविला. ते अद्वितीय रत्न पाहून दुकानदार चकित झाला. त्याने शंकरप्रसादला सांगितले की आपल्या देशातील सर्व संपत्ती एकत्रित केली तरी या हिऱ्याचे मूल्य पूर्ण होऊ शकणार नाही. हे अपूर्व रत्न आहे.

आता या रत्नाची किंमत कोणीही करू शकणार नाही याची खात्री शंकरप्रसादला झाली. तो गुरुदेवांकडे परत आला. त्याने गुरुदेवांना सर्व हकीकत सांगितली व तो म्हणाला, "आपण दिलेल्या वस्तूची किंमत कोणीही करू शकत नाही. इतके सांगून शंकरप्रसादने गुरुदेवांकडे हिरा परत दिला. गुरुदेवांनी तो आपल्या झोळीत ठेवून दिला."

शंकरप्रसादने गुरुदेवांना विचारले, "प्रभो, आपण माझी शंका आता दूर करावी." गुरुदेव म्हणाले, "मी उदाहरणासहित तुझ्या शंकेचे निवारण केले. तुझ्या ते लक्षात आलेले दिसत नाही. पुन्हा तुला समजावून देतो. या रत्नाची किंमत करतानाच तुझी शंका दूर व्हावयास पाहिजे होती. तुला दिलेली वस्तू काचेची गोटी नसून एक अमूल्य हिरा होता. त्याची खरी किंमत शेवटी फक्त एका सराफालाच कळू शकली. दुसऱ्या कोणाला त्या वस्तूची साधी ओळख सुद्धा झाली नाही. जर तुला मी हा हिरा विकण्याची परवानगी दिली असती तर तू दोन शेर बटाट्याच्या मोबदल्यात तो विकून टाकला असतास. पुढे जाऊन अधिक चौकशीही केली नसतीस. अमूल्य हिरा कवडीमोल भावाने गेला असता.

याच दृष्टिकोनातून पाहा म्हणजे तुला दिलेले साधन किती अमूल्य आहे हे कळेल. सामान्य माणसाला या साधनाची किंमत कधीही कळणार नाही. वस्तू हातात असूनही जोपर्यंत त्याची खरी ओळख पटत नाही तोपर्यंत त्याचा अस्सलपणा व दर्जा गुप्तच राहातो. "

सारांश, शंकरप्रसाद ज्याप्रमाणे हिऱ्याला काचेचा तुकडा समजत होता त्याप्रमाणे शक्तिपातयोगाचे साधन करणाऱ्या नवीन साधकालाही अनुभवाशिवाय या साधनाची किंमत कळत नाही. साधकाने सकाळ–संध्याकाळ दृढपणे साधन केले म्हणजे हळूहळू त्याचे मन शांत होऊ लागते. वृत्ती स्थिर होऊ लागतात. ध्येयसिद्धीच्या मार्गावर साधक अग्रेसर होऊ लागतो. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी तर या साधनाबद्दल खात्री दिली आहे की " **इये अभ्यासीं जे दृढ होती। ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती ॥** "

शेवटी कबिरांनी म्हटले आहे तेच खरे आहे,

हीरा पडा बाजारमें रहा धूल लपटाय। बहुतक मूरख चलि गये पारखि लिया उठाय ॥

तिसरी शंका :– नवीन साधकाला काही काही वेळेला असा प्रश्न पडतो की शक्तिपात जर एकच आहे तर त्याच्या फलात व परिणामात भिन्नता का दिसून येते ? शास्त्रात शक्तिपाताचे सर्वात मोठे माहात्म्य सांगितले आहे तर आपल्याला एकदम सर्व फल का प्राप्त होत नाही ? सद्गुरूंनी केलेल्या मूळ अनुग्रहातच तरतमभाव व पृथक्ता का दिसून येते ? मन एकदम निर्विकार का होत नाही ? चित्तवृतींचा निरोध होऊन समाधी सुख लगेच का मिळत नाही ? भक्ती त्वरित का वाढत नाही ? ब्रह्मज्ञान तत्काल का होत नाही ?

जोपर्यंत शक्ती जागृत होऊन मनुष्याची शिवत्वाकडे वाटचाल सुरू होत नाही तोपर्यंत मनुष्य मनुष्याच्या रूपाने दिसत असूनसुद्धा प्रकृतीच्या दृष्टीने पशूच्याशिवाय दुसरे काहीही असत नाही. कुंडलिनी शक्तीचे जागरण व त्याच्या जोरावर शिवत्वाचा विकास करणे हा पशुत्व निवृत्तीचा एकमात्र उपाय आहे. परंतु हे कुंडलिनी शक्तीचे जागरण सर्वांचे एकसारखे होत नाही. जरी सद्गुरू साक्षात् भगवत्शक्तिसंपन्न असले तरी शिष्याची पात्रता किती, त्याच्या शरीराचे व मनाचे सामर्थ्य किती आणि आधार किती बलवान आहे हे पाहाणे महत्त्वाचे आहे. कारण सद्गुरूंनी शिष्यामध्ये संचारित केलेल्या शक्तीची फलप्राप्ती वरील गोष्टीवरच

अवलंबून असते. ज्या शिष्याला जितकी शक्ती धारण करता येणे शक्य असते त्याच्या ठिकाणी सद्गुरू अधिक संचार करीत नाहीत आणि कमी शक्तीचाही संचार करीत नाहीत. शिष्याची पात्रता अगदी सामान्य असेल व आधार अगदी दुर्बल असेल तर कुंडलिनीचे उत्थान अगदी किंचित् स्वरूपात होते. मग साधक आपण स्वत: अभ्यास करून शक्तीचा विकास करून घेऊन पुढे जातो. अशाप्रकारे साधकाच्या आतून व बाहेरून जागृत चैतन्यशक्तीचा विकास होत जातो. जसजसा शक्तीचा हळूहळू विकास होतो तसतसे त्याचे सर्व संस्कार नाहीसे होऊन पशुत्वाचे बीज नाहीसे होते व दिव्यज्ञानाचा उदय होऊ लागतो.

दोन दृष्टांत :–

संत तुकाराममहाराजांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे की **' भूमि पाहता नाही वेगळी । माळ बरड एक काळी । उत्तम निराळी । मध्यम आणि कनिष्ठ ।। "** म्हणजे तत्त्वत: विचार केला तर सर्व जमीन एकच आहे. तीत भेद नाही. पण व्यवहारदृष्टीने माळ जमीन कनिष्ठ, बरड जमीन मध्यम व काळी जमीन उत्तम असा भेद दिसून येतो. त्यामुळे पाऊस सर्व जमिनीवर सारखा पडत असला तरी जमिनीच्या प्रतिप्रमाणे त्यात येणाऱ्या पिकाचा दर्जा व प्रमाणही बदलत जाते. त्याचप्रमाणे सद्गुरू सर्व साधकांवर समान अनुग्रह करतात. परंतु साधकाची जितकी पात्रता असेल तितकेच तो ग्रहण करू शकतो. अर्थात माळ द बरड जमिनीवर खूप मेहनत घेतली म्हणजे ज्याप्रमाणे तिचा दर्जा सुधारून तिच्या पिकाच्या प्रमाणात फरक पडतो त्याचप्रमाणे साधकाने साधनाभ्यास दीर्घकाल, खंड न पाडता निरंतर व अत्यंत श्रद्धाभक्तिआदरपूर्वक केला म्हणजे शक्तीचा विकास हळूहळू निश्चितपणे होत जातो. मात्र योगसूत्राकार महर्षी पतंजलींनी लिहिल्याप्रमाणे **" मृदुमध्याधिमात्रत्वात् ततोऽपि विशेष :।"** म्हणजे साधनेतील मंद, मध्यम व उत्कट प्रयत्नांच्या अनुसार साधकांना प्राप्त होणाऱ्या यशामध्येही फरक पडतो हे नेहमी लक्षात ठेवण्यासारखे आहे. या दृष्टीने श्रीगुरु-चरित्रातील पुढील ओव्या पाहण्यासारख्या आहेत: **तो (गुरू) दातार अखिल मही । जैसा मेघाचा गुण पाही । पर्जन्य पडतो सर्वा ठायी । कृपा-मूर्ति ऐसा असे ।। त्यातचि पाही पाही पात्रानुसार । सांगेन साक्षी एक थोर । सखोल भूमि उदक स्थिर । उन्नती उदक नाही जाण ।। दृढ भक्ती जैसी सखोल भूमि । दांभिक जाणावी उन्नत तुम्ही । याची कारणे मनोवाक्कर्मी । निश्चयावे श्रीगुरुसी ।।**

गोडे तेल, घासलेट व पेट्रोल या तेलांच्या दिव्यांच्या वातीजवळ पेटलेली काडी नेली म्हणजे पेट्रोलच्या दिव्याची वात काडीचा अग्नी स्वत:कडे ओढून घेऊन तात्काल पेट घेते. घासलेट तेलाच्या दिव्याच्या वातीवर काडी ठेवली म्हणजे ती पेटते. गोडचा तेलाच्या दिव्याच्या वातीवर पेटलेली काडी काही काळ धरली म्हणजे ती पेट घेते. तिन्ही तेलांची पेट घेण्याची शक्ती भिन्न असल्याने वरील फरक दिसून येतो. त्याचप्रमाणे उत्तम दर्जाचा साधक सद्गुरूंच्या संपर्कात आला की तो सद्गुरूंपासून शक्ती खेचून घेतो. त्याच्या ठिकाणी शक्तिसंक्रमण सहज घडून येते. मध्यम दर्जाच्या साधकाची थोडचा कालाने व थोडचा प्रयत्नाने शक्ती जागृत होते. मात्र सामान्य दर्जाच्या साधकाची शक्ती खूप उशिरा व खूप प्रयत्न केल्यावर जागृत होते.

एक अपूर्व उदाहरण :-

या दृष्टीने एक अपूर्व उदाहरण पाहाण्यासारखे आहे. श्रीतोतापुरीमहाराज हे श्रीरामकृष्ण परमहंस यांचे सद्गुरू होत त्यांच्या जवळ श्रीरामकृष्ण ध्यानाचा अभ्यास करीत असता एकदा निराश होऊन श्रीतोतापुरीमहाराजांना ते म्हणाले, "माझे मन पूर्णपणे निर्विकल्प होत नाही; काय करू?" त्याबरोबर "होत नाही म्हणजे काय?" असे म्हणून श्रीतोतापुरीमहाराजांनी एक काचेचा तुकडा शोधून काढला. त्याचे सुईसारखे तीक्ष्ण टोक श्रीरामकृष्णांच्या कपाळावर दोन्ही भुवयांच्यामध्ये जोराने टोचले. त्याबरोबर रामकृष्णांची समाधी लागली. ती पुढे तीन दिवस टिकली.

श्रीरामकृष्णांना अशा प्रकारे समाधी लागताच श्रीतोतापुरी महाराज उद्गारले, "ही खरोखरच एक अपूर्व गोष्ट आहे. जी गोष्ट साध्य करून घेण्याला मला चाळीस वर्षे सतत परिश्रम करावे लागले ती गोष्ट या महापुरुषाने तीनच दिवसात साध्य करून घेतली."

तरतमभावाचा हेतू काय ?

शिष्याला शक्तिपाताची दीक्षा मिळाल्यावर जी भिन्नता अगर तरतमभाव दिसून येतो त्याचा हेतू काय असावा हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. तरतमभावाचा खरा हेतू असा आहे की साधारण देहाभिमानी जो जीव असतो तो प्रत्यक्ष भगवत्शक्ती ग्रहण करू शकत नाही. कारण की भगवंताची साक्षात् शक्ती अत्यंत तीव्र असते. ती सहन करणे अत्यंत कठीण आहे. मग ती धारण करणे ही फार दूरची गोष्ट होय. म्हणूनच

नारदांनी आपल्या भक्तिसूत्रात, "**प्रकाश्यते क्वापि पात्रे**" म्हटले आहे. भगवंताचे अनिर्वचनीय प्रेम, शक्ती व सामर्थ्य योग्य अशा भगवंताच्या कृपेला पात्र झालेल्या भाग्यवानाचे ठिकाणी दिसून येते. श्रीचैतन्य महाप्रभूंना श्रीईश्वरपुरींनी मंत्रदीक्षा दिल्यावर त्यांच्या ठिकाणी प्रेमाचा व शक्तीचा जो दिव्य स्रोत प्रकट झाला तो सामान्य जीवाला कसा सहन झाला असता? प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी लिहिलेल्या श्रीचैतन्य चरितावली खंड १ मध्ये त्यांच्या प्रेमोन्मादाचे वर्णन करताना लिहिले आहे की, "**महाप्रभु चैतन्य देवका प्रेम दिव्यही था। उनकी हृदय कंदारसे जो भक्तिभावका भव्य स्रोत उदित हो गया, वह फिर सदा उत्तरोत्तर बढता ही गया। उनकी हृदय–कंदारसे उत्पन्न हुई भक्तिभागीरथी की धारा सावन–भादों की क्षुद्र नदी की भाती नहीं थी जो थोडे समय के लिये तो खूब इठलाकर चलती है और जेठमासकी तेजधूप पडतेही सूख जाती हैं। उनके हृदय से उत्पन्न हुई प्रेमसरिता की धारा सदा बहकर समुद्रमेंही जाकर मिलनेवाली स्थायी थी। उसमें कमी का क्या काम! वह तो उत्तरोत्तर बढनेवाली अलौकिक और अनुपम धारा थी, उसकी उपमा इन संसारी धाराओंसे दी नहीं जा सकती, वह तो अनुभवगम्य ही है।**"

"**महाप्रभु जबसे मंत्रदीक्षा लेकर गयासे लौट आये तभी से उन की विचित्र दशा हो गयी हैं। वे भोजन करते-करते सहसा बीचमें ही उठकर रुदन करने लगते हैं। रास्ता चलते-चलते पागलों की भाँति नृत्य करने लगते हैं। शय्या पर लेटे लेटे सहसा उठकर बैठ जाते हैं और हा कृष्ण! हा कृष्ण! कहकर जोरों से चिल्लाने लगते हैं। कभी कभी लोगों से बाते करते करते बीच में ही जोरोंसे ठहाका मारकर हँसने लगते हैं। रातभर सोने का नाम नहीं। लंबी लंबी साँसें लेते रहते हैं। अधीर होकर अत्यंत विरही की भाँति हिचकियाँ भरते रहते हैं। और उनके वस्त्रों से इतना जल निकालता है कि संपूर्ण वस्त्र गीले हो जाते हैं।**"

तरमभावाचा दुसरा हेतू असा आहे की शिष्याचे–साधकाचे–कोणत्याही प्रकारे अकल्याण होऊ नये. जीवाचे–साधकाचे–अंतिम कल्याण करणे हाच शक्तिपाताचा हेतू असल्याने सद्गुरूंनी दीक्षा दिल्यावर शक्ती स्वतःच शिष्याची पात्रापात्रता व योग्यायोग्यता पाहून त्या प्रमाणात प्रकट होत असते. शक्ती ही माता आहे. आई ही बालकाचे हित व अहित कशात आहे हे पूर्ण जाणून असते. बालकाला कोणत्या वेळेस कोणती गोष्ट किती प्रमाणात द्यावयाची हे ठरवून त्याच्या हिताची रात्रंदिवस

चिंता वाहून ती बालकाचे संगोपन करते. त्याचप्रमाणे शक्ती ही साधकाला जी गोष्ट ज्या प्रमाणात व ज्या पद्धतीने सहन होईल ती देऊन त्याची प्रगती घडवून आणते. साधकाला शिवत्वाच्या गंतव्य स्थानापर्यंत शक्ती घेऊन जात असल्याने कमी जास्त प्रमाण करणे व तरमभाव दाखविणे क्रमप्राप्त व अपरिहार्य असते. या क्रमविकासामुळे मनाची निर्विचार स्थिती येण्यास उशीर लागतो व चित्तवृत्तीचा निरोधही लवकर होत नाही.

भोगेच्छू फलार्थी व निस्वार्थी मुमुक्षू :-

शक्तिपात एकच व निरपेक्ष असूनसुद्धा त्यात तरतमभाव, भिन्नता व वैचित्र्य दिसून येते. त्यामुळे शास्त्रात सांगितलेली फळे साधकाला एकदम प्राप्त होत नाहीत, कारण प्रत्येक अनुग्रहपात्र जीवाच्या चित्तात किंवा आधारात विषमता दिसून येते. जे निःस्वार्थी मुमुक्षू असतात त्यांच्या ठिकाणी शक्तिपाताच्या माहात्म्याने भगवद्भक्तीचा उदय होतो. अशा व्यक्तींच्या ठिकाणी फलाकांक्षा नसल्याने कुल, जाती, देह, कर्म, वय, अनुष्ठान इत्यादी गोष्टीचा प्रश्नच येत नाही. अशा मुमुक्षूंच्या ठिकाणीच शक्तिपाताची उत्कृष्ट अवस्था दृष्टीस पडते आणि या शक्तीच्या प्रभावामुळे चिदात्मा अंतःकरणात प्रकाशित होतो.

मात्र आधार निष्काम नसेल म्हणजेच साधक जर भोगेच्छू व फलार्थी असेल तर ही गोष्ट साध्य होत नाही. जे फलाची इच्छा करणारे असतात त्यांना अनुग्रहप्राप्तीच्या प्रभावाने भक्ती प्राप्त होत असली तरी फलार्थी लोक भोगेच्छू असल्याने त्यांची भक्ती मुमुक्षूंच्या भक्तीसारखी निरपेक्ष असत नाही. या फलार्थी साधकांना कर्मादी गोष्टींची आवश्यकता सतत भासत राहाते. खरे पाहाता हा शक्तिपाताचा अगदी खालचा दर्जा आहे. हा शक्तिपात पहिल्या शक्तिपातासारखा अनवच्छिन्न असत नाही, कारण साधकाच्या भोगाकांक्षांमुळे त्याला मर्यादा पडतात. अर्थात् नियमित साधनाने अशा साधकांनाही पूर्ण अवस्था निश्चित प्राप्त होते.

भोगाकांक्षेमुळे अडथळा :-

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट दिसून येते की ज्याला कोणाला शक्तिपातयोगाचा अनुग्रह प्राप्त होतो त्याच्या बाबतीत हे निश्चित मानावे लागते की केव्हा ना केव्हा तरी त्याला भगवच्चरणांची प्राप्ती अवश्य होते. ही प्राप्ती लवकर होईल का उशिरा हा प्रश्न सर्वस्वी भिन्न

आहे. परंतु जे निष्काम आहेत, भोगाकांक्षेपासून अलिप्त आहेत आणि मुमुक्षू आहेत तेच भगवत्शक्तिधारणा करण्यास सर्वोत्तम अधिकारी असतात. अशा साधकांना पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी कालक्षेप करावा लागत नाही. परंतु ज्या व्यक्तीच्या ठिकाणी भोग, इच्छा, आकांक्षा, वासना, तृष्णा इत्यादी गोष्टी जोपर्यंत शिल्लक राहातात व त्यांची पूर्णपणे निवृत्ती होत नाही तोपर्यंत पूर्णत्वाची प्राप्ती होत नाही. काही दुसऱ्या उपयांनीसुद्धा भोगतृष्णा दूर होऊ शकतात परंतु जोपर्यंत त्यांची पूर्ण निवृत्ती होत नाही तोपर्यंत पूर्णत्वाची प्राप्ती होऊन देखील त्यामध्ये तो साधक स्थिर होऊ शकत नाही.

पूर्व जन्माचे संस्कार :–

शक्तिपाताच्या फलात व परिणामात भिन्नता दिसून येण्यास व सर्व फले एकदम प्राप्त न होण्यात पूर्व जन्माचे संस्कार हे एक प्रबल कारण आहे. प्रत्येक जीवावर पूर्वजन्माचे संस्कार दृढ झालेले असतात. अर्थात सर्वांचे संस्कार एकसारखे असत नाहीत. त्यामुळे प्रत्येकाची आकृती व प्रकृती निराळी दिसून येते. शरीराची रचना व क्षमता भिन्न असते. चित्ताच्या व मनाच्या धारणाशक्तीत फरक आढळून येतो. प्राणिमात्राला कर्मामध्ये प्रवृत्त करण्यास पूर्वजन्मीचे संस्कारच बलवान ठरतात. शुभ व अशुभ असे दोन प्रकारचे संस्कार कर्मामुळे उत्पन्न होतात.

सद्गुरू सूर्यकिरणांप्रमाणे सर्व साधकांवर समभावाने कृपा करतात. परंतु वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे फलात व परिणामात भिन्नता दिसून येते. सूर्याची किरणे सर्वत्र सारखीच पसरतात. परंतु स्वच्छ काचेवर ती पडल्यावर प्रकाश अधिक दिसतो. स्वच्छ पाण्यावर पडल्यास खूप चमचमाट दिसून येतो. स्वच्छ काचेतून व पाण्यातून सूर्याची किरणे आरपार जाऊ शकतात. ती पात्रता अस्वच्छ काचेत व शेवाळलेल्या पाण्यात असत नाही. त्याचप्रमाणे पूर्वजन्मी केलेल्या शुभ कर्मामुळे ज्या साधकाचे चित्त जितके निर्मळ झाले असेल तितका गुरुशक्तीचा परिणाम व प्रभाव दिसून येतो. त्या अनुरोधाने साधकाचा विकास होत जातो.

अर्जुनाने श्रीकृष्णांना एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. तो वरील विचारांना पोषक ठरेल. तो म्हणतो, " हे कृष्णा! जो साधक श्रद्धायुक्त असतो परंतु मोक्षप्राप्तीसाठी विशेष प्रयत्न न केल्यामुळे ज्याचे मन योगापासून भ्रष्ट होते अशा पुरुषाला योगसिद्धी मिळत नाही. जर असा मनुष्य मरण पावला तर तो कोणत्या गतीला जातो ? त्याला

श्रीकृष्णांनी उत्तर दिले आहे की, हे पार्था! असा जो योगेच्छू पुरुष आहे तो इहलोकाला व परलोकाला अंतरत नाही. शुभ कर्मांच्या द्वारे स्वतःच्या कल्याणाची इच्छा असल्याने तो कधीही दुर्गतीला जात नाही. मात्र तो पुन्हा पवित्र अशा श्रीमंत कुलात किंवा बुद्धिमान योग्याच्या कुलात जन्म घेतो. अशा कुलामध्ये जन्म झाला म्हणजे त्याला पूर्वजन्मीची योगबुद्धी या जन्मी प्राप्त होते आणि योगाच्या सिद्धीकरता तो पुन्हा यत्न करतो." वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की पूर्वजन्मी साधक जेथे थांबला तेथपासून त्याची पुढे या जन्मात वाटचाल सुरू होते. प्रत्येक साधकाची थांबण्याची ठिकाणे निरनिराळी असल्याने या जन्मात सद्गुरूने अनुग्रह केल्यावर तरतमभाव व पृथक्ता दिसून येते. त्यामुळे अनुग्रह एक असूनसुद्धा साधकाची पातळी भिन्न असल्याने शक्तिपाताच्या परिणामात भिन्नता दिसते.

अधिकारभेदाने साधकांचे तीन प्रकार :–

कुलार्णव तंत्राच्या १४ व्या उल्लासात अधिकार भेदामुळे शक्तिपाताच्या फलात तरतमभाव किंवा पृथक्ता कशी दिसून येते याचे सुंदर वर्णन केले आहे:

आदिमध्यावसानेषु योगे शक्तिर्निपातिता । अधमा मध्यमाः श्रेष्ठाः शिष्या देवि प्रकीर्तिताः ॥ १ ॥ आदौ भक्तिर्भवेद्देवि दीक्षार्थं समुदन्ति ये । पुनर्विद्दवहृष्टास्ते आदियोग्या इतीरिता ॥ २ ॥ यथा विहंगमः शीघ्रं फल एव निषीदति । तथा ज्ञानोपदेशश्च कथितः कुलनायिके ॥ ३ ॥

श्रीशंकरांच्यापासून परंपरागत शक्तीचे सामर्थ्य एकसारखे असूनसुद्धा शिष्य उत्तम, मध्यम व अधम अधिकारी असल्याने दीक्षेच्या वेळेला शक्तिपाताची लक्षणेही तीन प्रकारची दिसून येतात. त्यामुळे उत्तमाला तत्काल, मध्यमाला क्रमाने व अधमाला विलंबाने फल मिळते. ज्यांच्या ठिकाणी पहिल्यापासून भक्ती असते, जे दीक्षाग्रहणार्थ प्रसन्न व उत्सुक असतात आणि दिक्षेनंतर आनंदाने बेहोष होऊन जातात ते शिष्य आदियोग्य अधिकारी आहेत असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे पक्षी सरळ उडत जाऊन तात्काळ फलप्राप्ती करून घेतो त्याचप्रमाणे उत्तम अधिकारी शिष्याला दीक्षेमुळे उत्पन्न होणारे ज्ञान तत्काळ मिळते.

दीक्षासमयसंप्राप्ता ज्ञानविज्ञानविवर्जिताः । भक्त्या प्रध्वस्तसुधियो

मध्ययोग्याश्च ते स्मृताः ॥ ४ ॥ यथा कपिश्च शाखायाः शाखामुल्लंघ्य यत्नतः । फलं प्राप्नोति धर्मस्य चोपदेशस्तथा प्रिये ॥ ५ ॥

जे दीक्षा घेईपर्यंत ज्ञानविज्ञानरहित असतात, ज्यांना दीक्षा व योगासंबंधी फार माहिती नाही, परंतु दीक्षा प्राप्त झाल्याबरोबर ज्यांच्या ठिकाणी भक्तीचा उदय होतो व बुद्धी निर्मळ होते अशा शिष्यांना मध्ययोग किंवा मध्यम अधिकारी म्हटले जाते. ज्याप्रमाणे माकड झाडाच्या फांदीवरून उडी मारून दुसऱ्या फांदीवर जाऊन फळ तोडून घेतो त्याप्रमाणे या दुसऱ्या प्रकारच्या साधकाला दीक्षेच्या फलाची प्राप्ती क्रमशः होते.

आदौ भक्तिविहीना ये मध्यभक्तास्तु ये नराः । अन्ते भक्ताः प्रबुद्धा स्युर्ह्यन्तयोग्या भवन्ति ते ॥ ६ ॥ यथा पिपीलिका मंदं मंदं वृक्षाग्रगं फलम् । चिरेणाप्नोति धर्मोपदेशश्चापि तथा स्मृतः ॥ ७ ॥

जे आधी भक्तीहीन असतात, दीक्षा मिळाल्यावर ज्यांच्या ठिकाणी भक्ती उत्पन्न होते आणि शेवटी ज्ञान-भक्तियुक्त झाल्याने जे अत्यंत एकनिष्ठ भक्त होतात ते अंतयोग्य म्हणजे कनिष्ठ अधिकारी शिष्य समजावे. त्यांना गुरुप्रदत्तकृपेचे फल खूप उशिरा मिळते. मुंगी ज्याप्रमाणे वृक्षावर चढत जाऊन फळापाशी पोहोचते त्याप्रमाणेच कनिष्ठ साधकाला उशिरा दीक्षा फलद्रूप होते.

गुणांमधील फरक :–

शिवसंहितेतही साधकांचे चार प्रकार सांगितले आहेत. त्यांच्या गुणांमध्ये फरक असल्याने फलप्राप्तीतही फरक दिसून येतो. चार प्रकारचे साधक कोणते ते प्रथम सांगितले आहे.

चतुर्धा साधको ज्ञेयो मृदुमध्याधिमात्रकाः ।
अधिमात्रतमः श्रेष्ठो भवाब्धौ लंघनक्षमः ॥

मृदु, मध्यम, अधिमात्र म्हणजे उत्तम व अधिमात्रतम म्हणजे उत्कृष्ट असे साधकांचे चार प्रकार असतात. या सर्व साधकात अधिमात्रतम साधक श्रेष्ठ होय. हा साधक संसाररूपी समुद्र पार करून जाण्यास समर्थ होतो.

मृदुसाधकाची लक्षणे :–

मन्दोत्साही सुसंमूढो व्याधिस्थो गुरुदूषकः । लोभी पापमतिश्चैव

बहवाशी वनिताश्रयः।। चपलः कातरो रोगी पराधीनोऽतिनिष्ठुरः। मंदाचारो मंदवीर्यो ज्ञातव्यो मृदुमानवः ।।

मृदुमानवाची म्हणजे अगदी सामान्य दर्जाच्या साधकाची लक्षणे पुढीलप्रमाणे दिसून येतात. या साधकाचा उत्साह अगदी मंद म्हणजे सामान्य दर्जाचा असतो. निरुत्साह हा त्याचा स्थायी स्वभाव असतो. बुद्धी मंद असल्याने एखाद्या मूढासारखी त्याच्या चित्ताची स्थिती असते. **"स्वहित काय हे कळेना। विषयवासना तुटेना। देहाभिमान गळेना। मंदबुध्दिस्तव।।** हे समर्थांचे म्हणणे या साधकाला लागू पडते. याला अनेक व्याधी असतात किंवा मधूनमधून त्याला काहीना काही रोग होत असतात. गुरूवर त्याची पूर्ण श्रद्धा असत नाही. त्यामुळे कोणत्याही बाबतीत कमीजास्त झाल्यास तो गुरूला दोष देण्यास व त्याची निंदा करण्यास कमी करीत नाही. संसाराची आसक्ती असल्याने त्याच्या ठिकाणी खूप लोभ दिसून येतो. पूर्वजन्मीच्या दोषामुळे त्याची पाप करण्याकडे प्रवृत्ती होते व त्याच्या हातून खूप वेळां पापाचरण घडतही जाते. याचे जेवणही खूप असते. तीव्र कामासक्ती, बलवत्तर भोगेच्छा व उत्कट वासना यांमुळे तो नेहमी स्त्रीच्या आधीन असतो. तो अत्यंत भित्रा असतो. याची वृत्ती नेहमी चंचल असते. याचा साधनावर पूर्ण विश्वास नसतो. तो पराधीन, कठोर शब्द बोलणारा, रागीट व क्रोधी असतो. त्याचा आचार अत्यंत सामान्य दर्जाचा असतो व तेजस्वीपणाही अगदी मंद असतो. असा जो साधक असतो त्याला मृदुमानव किंवा सामान्य दर्जाचा साधक म्हणतात. याची प्रगतीही अगदी मंद होत असते.

याप्रकारचे जे साधक असतात त्यांना श्रीसमर्थरामदासांनी **" येर मायिक वेषधारी। असत् शिष्य ।। "** असे म्हटले आहे व त्याचे वर्णन केले आहे.

मध्यम साधकाची लक्षणे :–

समबुद्धिः क्षमायुक्तः पुण्याकांक्षी प्रियंवदः।
मध्यस्थः सर्वकार्येषु सामान्यः स्यान्न संशयः।।

मध्यम साधकाची पुढील लक्षणे दिसून येतात–याचीं बुद्धि सर्वसाधारणपणे समतोल असते, तो क्षमाशील असून पुण्यकर्म करण्याकडे त्याचा स्वभावतःच ओढा असतो. याचे बोलणे प्रिय असते. कोणत्याही गोष्टीचा विशेष हर्ष–विषाद नसल्याने तो कोणाचीही बाजू न घेता सर्वकार्यात मध्यस्थाची भूमिका करतो.

उत्तम साधकाची लक्षणे :–

स्थिरबुद्धिर्लये युक्तः स्वाधीनो वीर्यवानपि । महाशयो दयायुक्तः क्षमावान् सत्यवानपि ।। शूरो वयस्थः श्रद्धावान् गुरुपादाब्जपूजकः । योगाभ्यासरतश्चैव ज्ञातव्यश्चाधिमात्रकः ।।

अधिमात्र म्हणजे उत्तम साधकाची पुढील लक्षणे दिसून येतात. याची बुद्धी स्थिर असते. तो मनाचा लय करण्याच्या योगात समर्थ असतो. स्वतंत्र असतो. कु णाच्याही आधीन असत नाही. तो शक्तिसंपन्न, सामर्थ्य-संपन्न व तेजस्वी असतो. तो दयाशील, क्षमाशील व सत्यशील असतो. "भक्ति ते कठीण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर" या श्रीसंत तुकारामम्हाराजांच्या म्हणण्याप्रमाणे तो शूर असतो. समाधियोग आपल्याला निश्चित प्राप्त होईल अशी त्याची दृढ श्रद्धा असते. गुरुचरणांवर त्याची नितांत भक्ती असते. योगाभ्यासात तो नेहमी मग्न असतो. नियमित अखंड साधनतत्परता त्याच्या ठिकाणी असते.

श्रीसमर्थ रामदास स्वामी महाराजांनी या प्रकारच्या साधकाचे मनाच्या श्लोकात पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे :--

मना लोचनी श्रीहरी तोचि पाहे । जनी दक्ष तो लक्ष लावूनि पाहे । गुणी प्रीति लागो क्रमू साधनाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।१।। सदा देवकाजी झिजे देह ज्याचा । सदा रामनामे वदे नित्य वाचा ।। स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।२।। सदा बोलण्यासारिखे चालताहे । अनेकी सदा एक देवासि पाहे । सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ३ ।। नसे अंतरी काम नानाविकारी । उदासीन तो तापसी ब्रह्मचारी । निवाला मनी लेश नाही तमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ४ ।। मदे-मत्सरी सांडली स्वार्थबुद्धी । प्रपंचीक नाही जयाते उपाधी । सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५ ।। क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे । न लिंपे कदा दंभ वादे विवादे । करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ६ ।। सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकी । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी । न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ७ ।। सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी । मिळेना कदा कल्पनेचेचि मेळी । चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ८ ।। नसे मानसी दुष्ट आशा दुराशा । वसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा । ऋणी देव

हा भक्तिभावे जयाचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ९ ।। दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू । जगी दास पाळू । जगी अंतरी क्रोध संताप कैंचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।

उत्कृष्ट साधकाची लक्षणे :–

महावीर्यान्वितोत्साही मनोज्ञः शौर्यवानपि । शास्त्रज्ञोऽभ्यासशीलश्च निर्मोहश्च निराकुलः ।। नवयौवनसंपन्नो मिताहारी जितेंद्रियः । निर्भयश्च-शुचिर्दक्षो दाता सर्वजनाश्रयः ।। अधिकारी स्थिरो धीमान् यथेच्छावस्थितः क्षमी । सुशीलो धर्मचारी च गुप्तचेष्ट प्रियंवदः ।। शास्त्रविश्वाससंपन्नो देवतागुरुपूजकः । जनसंगविरक्तश्च महाव्याधिविवर्जितः ।। अधिमात्रतरो ज्ञेयः सर्वयोगस्य साधकः ।।

अधिमात्रतम म्हणजे उत्कृष्ट साधकाची पुढील लक्षणे दिसून येतात. असा साधक अत्यंत तेजस्वी असतो. त्याच्या उत्साहा कधीही खंड पडत नाही. अखंड उत्साहाचा स्रोत त्याच्यापासून उत्पन्न होतो. तो स्वतःचे मन जाणून मनावर ताबा ठेवतो. तो शौर्यसंपन्न, शास्त्र जाणणारा म्हणजे वेदशास्त्रांप्रमाणे आचरण ठेवणारा, अभ्यासशील म्हणजे प्रयत्न करणारा, कधीही मोहाला बळी न पडणारा व नेहमी समाधानी असतो. असा साधक नवयौवनसंपन्न म्हणजे तारुण्यातील शक्तींनी युक्त असतो. त्या मुळे शक्तीचा वेग सहन करण्याचे सामर्थ्य अशा शरीरात असते. तो नेहमी योग्य तेवढाच आहार घेतो. त्याची इंद्रिये स्वाधीन असतात. तो निर्भय, अत्यंत पवित्र व शुद्ध, अखंड सावधान, दानशूर व शरण आलेल्या सर्व लोकांना आश्रय देण्याची बुद्धी त्याचे ठिकाणी असते. त्याचा अधिकार मोठा असतो. त्याचे चित्त स्थिर असते. अंतःकरणात संतोष असतो. तो क्षमाशील, सुशील, धार्मिक कृत्ये गुप्त ठेवणारा व शास्त्रावर विश्वास ठेवणारा असतो. तो देवता व गुरु–पूजक, जनसंगाची आवड नसलेला व महाव्याधिरहित असतो.

साधनाचा हेतू :– (चवथी शंका)

काही काही वेळेला साधकाच्या मनात साधनाबद्दल अशी शंका येते की आपण जे शक्तिपातयोगाचे साधन करतो त्याचा खरा हेतू काय? अमक्या साधकाचा रोग बरा झाला, अमक्याची स्थिती दीक्षा घेतल्यावर सुधारली, शारीरिक–मानसिक व आर्थिक विवंचनेतून साधक पार झाला, अशा कितीतरी गोष्टी व अनुभव कानावर येत असतात. अशा-

वेळी साधकाची द्विधा मनस्थिती होते. परंतु अशाप्रकारे साधकाने कधीही आपले मन दोलायमान होऊ देता कामा नये.

ब्रह्मप्राप्ती करून घेणे हाच या साधनाचा खरा हेतू आहे. विषय-सुख प्राप्त करणे, रोग दूर करणे व व्यवहारात यश प्राप्त करणे हा या साधनाचा हेतू नाही. एखादी नर्तकी नाचत असताना तिच्या डोळ्यापुढे प्रेक्षकांचे मनोरंजन करून कलेचा अत्युच्य आनंद प्राप्त करून देणे हाच हेतू असतो. पायांना व्यायाम देणे हा तिचा हेतू कधीही नसतो. तसा व्यायाम जर घडत असेल तर तो नाचण्याचा आपाततः होणारा परिणाम आहे, हेतू नाही, हे अगदी निश्चित आहे. त्याचप्रमाणे शक्तिपात-योगाचे साधन करीत असताना उपरोक्त गोष्टी घडून आलेल्या दिसल्या तरी तो त्या साधनाचा हेतू नसून उपरोक्त दृष्टांताप्रमाणे आपाततः घडून आलेला परिणाम होय. वैराग्य प्राप्त होणे, भगवद्भक्ती वाढत जाणे, मनातून संसाराची आसक्ती नाहीशी होणे व मोक्षप्राप्तीची इच्छा प्रतिदिन वाढत जाणे हा या साधनाचा खरा उद्देश आहे. श्रीसंत ज्ञानेश्वर-महाराजांनी "**आम्ही साधन हे जे सांगितले। तेचि शरीरा जिही केले। ते आमुचेनि पाडे आले। निर्वाळलेया ॥ इये साधनी जे दृढ होती। ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती** ॥ असा या साधनाचा अंतिम परिणाम सांगितला आहे. साधनामुळे शरीर, मन, नाडी व चित्त शुद्धी होऊन मनाला शांती मिळून भगवत्प्राप्ती होणे हाच या साधनाचा एकमेव हेतू आहे असा विचार करून साधन करावे.

आदेश व संदेश :– (पाचवी शंका)

साधना करताना साधकाला नाना तऱ्हेचे आदेश व संदेश आतून येत आहेत असे वाटते. कधी कधी बाहेरूनही या स्वरूपात कानावर शब्द आदळत असतात. अशा वेळी साधकाला शंका येते की याचे पालन करावे की करू नये. नेमका कोणता निर्णय घ्यावा. वास्तविक साधन सुरू झाल्यावर पूर्वसंचित, संस्कार, वासना व इच्छा अनेक प्रकारची रूपे धारण करून पुढे येतात. त्यामुळे अंतःकरणात नाना तऱ्हेचे विचार-तरंग उत्पन्न होऊन ते साधकाच्या तोंडून आदेश किंवा संदेशाच्या रूपाने बाहेर पडतात. अशावेळी साधकाने सावध राहिले पाहिजे. काही साधक अशा आदेशाला क्रियाशक्तीची आज्ञा मानून त्याप्रमाणे कार्य करू लागतात. साधकाने असे करता कामा नये. आदेश हा इच्छा व वासनेतून आला की खरोखर क्रियाशक्तीकडून आला याचे विश्लेषण करणे

साधकाला कठीण जाते. याकरिता साधकाने अगदी सावध राहून संदेश व आदेशाचे निरीक्षण केले पाहिजे. बहुतांशी असे संदेश व आदेश साधकाच्या इच्छेमुळे, वासनेमुळे, पूर्वसंस्कारांमुळे, वैचारिक, मानसिक, सांसारिक किंवा व्यावहारिक असमानतेमुळे येत असल्याने साधकाने त्याप्रमाणे न वागता त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे.

साधनातील विघ्ने :–

नवीन व जुन्या साधकाला साधनात विविध प्रकारची विघ्ने उपस्थित झाल्याचे अनुभवाला येते. त्यामुळे तो चिंताक्रांत होतो. नवीन साधक पहिल्या दिवशी दीक्षा ग्रहणाकरिता बसल्यावर जर त्याला अनुभव आला नाही तर त्याच्या मनात शंकांचे काहूर उठते. यावेळी अंतर्दर्शी होऊन साधकाने विचार केला पाहिजे. त्याचे खरे कारण त्याचे न्यूनत्वच असते. भट्ट कल्लटाने एके ठिकाणी असे म्हटले आहे की " ही शक्तिपातयोगविद्या म्हणजे ब्रह्मविद्येचे बीज आहे. परीक्षा घेतल्याशिवाय अगर केल्याशिवाय अयोग्य क्षेत्रामध्ये हे बीज पेरता कामा नये. सिद्धविद्या ही गुणवती कन्येप्रमाणे आहे. जर अशा कन्येचे दान गुणवर्जित पुरुषाला दिले तर ती पुरुषाच्या अपात्रतेमुळे त्याला संभोग देऊ शकत नाही एवढेच नव्हें तर ती दान करणाऱ्याच्या अपकीर्तीचे कारण मात्र होते. याकरिता सद्गुणसंपन्न साधकालाच या विद्येचे दान दिले पाहिजे." कुलार्णव तंत्राच्या १४ व्या उल्लासामध्येही असे म्हटले आहे की–

असाच्छिष्येष्वभक्तेषु यज्ज्ञानमुपदिश्यते ।
तत्प्रयात्य पवित्रत्वं गोक्षीरं श्वघृतादिव ॥

जो शिष्य असत्य कर्म करणारा, मिथ्याचारी, भक्तिहीन, श्रद्धारहित व साधनसंपत्तिरहित असतो अशा साधकाला या शक्तिपातयोगज्ञानाचा उपदेश दिला तर हे साधन अपवित्रतेला प्राप्त होऊन त्याची अप्रतिष्ठा होते. गाईचे दूध व तूप पवित्र असले तरी हे पदार्थ कुत्र्याला खावयास दिले की त्याच्या अंगाला खाज सुटते, त्याचे केस झडून जातात व शेवटी कुत्रा अगदी निकामी होतो. याप्रमाणे अपात्र माणसाला ही सिद्धयोगाची विद्या दिली म्हणजे अनुभूती न आल्याने संशयाच्या काहुराने मोठा अनर्थ उत्पन्न होतो.

येथे काही लोकांच्या मनात अशी शंका येईल की शक्तिपातयोगाची वैशिष्टये सांगताना शक्तिपाताच्यावेळी पात्रापात्रतेचा विचार होत नाही असा सिद्धांत मांडला व आता अपात्रतेमुळे अनुभव येत नाही

असा सिद्धांत सांगतात. हे परस्पर विरुद्ध आहे. परंतु ही दोन्ही विधाने परस्पर विरुद्ध नाहीत कारण सद्गुरू शिष्याच्या आत्यंतिक शरणागतीने परमकारुणिक बनून त्याला दीक्षा देत असतात. त्यावेळी पात्रापात्रतेचा विचार आड न येता शक्तिपाताची प्रक्रिया घडून येते. परंतु पात्रापात्रतेनुसार ह्या प्रक्रियेचा परिणाम घडून येत असल्याने अनुभूतीची भिन्नता दिसून येते. हे लक्षात घेतले म्हणजे अपात्रता ही दीक्षेच्या आड येत नसून अनुभूतीच्या आड येते हे स्पष्ट होते व संशयही राहात नाही. यासाठी नूतन साधकाने पहिल्या दिवशी आपल्याला काही अनुभव आला नाही म्हणून निराश होण्याचे कारण नाही. सूक्ष्म स्वरूपात शक्तिसंचार झाल्याने व्यक्त स्वरूपातील स्पष्ट असे अनुभव येण्यास वेळ लागतो. काही वेळेला साधन सुरू झाल्यावर क्रियाच इतक्या सूक्ष्म, सौम्य, अल्प व लहान असतात की त्या साधकाच्या लक्षातही येत नाहीत. त्याचप्रमाणे शारीरिक रोग, मानसिक चिंता, शोक, भय, वृद्धावस्था, अशुद्धी आणि श्रद्धाहीनता या गोष्टी शक्ती कार्यान्वित होण्यास बाधक ठरतात. मनाचे जडत्व, पूर्वजन्मीचे दुष्ट संस्कार, पाप, संशय, प्रमाद, आळस, चित्ताची विषयांकडे ओढ होणे, जागा चांगली नसणे इत्यादी विविध कारणांमुळे पहिल्याप्रथम अनुभव येण्यास वेळ लागतो.

जुन्या साधकांनाही साधनात उपस्थित होणाऱ्या विघ्नांना तोंड द्यावे लागते. पातंजलयोगदर्शनात पतंजली महर्षींनी साधनात येणाऱ्या अडथळ्यांचे पुढीलप्रमाणे समाधीपादात वर्णन केले आहे. " **व्याधिस्त्यान-संशय--प्रमादालस्या-विरति--भ्रांतिदर्शनालब्धभूमिकत्वानवस्थितत्वानिचित्तविक्षेपास्तेऽन्तरायः ॥ ३० ॥** रोग, मानसिक जडता, संशय, निरुत्साह, आळस, भोगासक्ती, भ्रम, एकाग्रता न साधणे व प्राप्त केलेल्या अवस्थेपासून च्युत होणे ही साधनात अडथळा आणणारी विघ्ने आहेत. त्यांचा क्रमशः विचार करू.

व्याधी :—साधनाला सुरवात झाल्यावर शक्ती जागृतीमुळे सर्व शरीर ढवळून निघते. अपानवायू शरीर शुद्धीचे कार्य करतो.त्यावेळी व्याधी उत्पन्न होऊन नाहीशा होतात. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " अपानवायू खवळून बलवत्तर होतो. " तो सर्व शरीर ढवळून काढतो व बाळपणापासून शरीरात साचलेली सर्व घाण बाहेर फेकून देतो. कफ आणि पित्त यांचे तो नावही ठेवीत नाही. शरीरातील रसरक्तादी सप्तधातूंचे समुद्र हा वायू पालथे घालतो. मेदाचे पर्वत फोडून टाकतो. हाडातील मज्जा नाहीशी करतो. नाड्या सोडवितो व शुद्ध करतो. सर्व अवयवांना शिथिल करतो

अभ्यास करणाऱ्या साधकाला भिवविते. पण साधकाने भिऊन जाता कामा नये. हा वायूच शरीरात व्याधी उत्पन्न करतो व लगेच नाहीशी करतो. साधकाने नियमित साधन केले म्हणजे हा व्याधीदोष, विघ्न किंवा अडथळा आपोआप दूर होतो. त्याचप्रमाणे अनियमित आहार व विहार, ऋतूंचे बदल, आर्थिक स्थिती, मानसिक अस्वस्थता, पूर्वजन्मींचे बलवत्तर प्रारब्ध इत्यादी विविध कारणे शरीरस्थ दोषांना कारण होतात. परंतु हे सर्व अडथळे एकमात्र नियमित साधनाने दूर होतात असे अनुभवाला येते.

स्त्यान :– साधकाला दुसरा अडथळा येतो त्याला शास्त्रकारांनी स्त्यान असे म्हटले आहे. आपण नियमित सकाळसंध्याकाळ साधन करावे अशी साधकाला इच्छा असते. परंतु काही वेळेला चित्त इतके दुर्बल, असमर्थ, मूढ, तमोगुणावृत व जड बनते की ते साधकाला साधनास बसूच देत नाही. या अकर्मण्यावस्थेलाच स्त्यान म्हणतात. परंतु साधकाने निश्चयाच्या बळाने हा अडथळा दूर केला पाहिजे.

संशय :– संशय हा साधनाचा सर्वांत मोठा असा तिसरा अडथळा आहे. आपण करतो ते साधन आपल्याला ब्रह्मप्राप्ती करून देईल का नाही ? या योगमार्गाने शेवट गाठलेले कोणी दिसतात की नाही ? या योगाचे फल खरे आहे की खोटे ? हा योग सोपा आहे तर तो सर्व संतानी ऋषींनी व मुनीनी स्वच्छ का सांगितला नाही? गुप्त का ठेवला? इत्यादी नानाविध संशयांनी साधकाचे मन संदेहयुक्त बनते. या संशयांनी साधकाचा सर्वनाश होतो असे अनुभवाला आले आहे. यासाठी साधकांनी सर्व संशय दूर ठेऊन निःसंदिग्धपणे व श्रद्धेने साधन केले पाहिजे. "**संशयात्मा विनश्यति**" असे शास्त्रकार म्हणतात ते अगदी खरे आहे.

प्रमाद :– साधन नित्यनियमित न करणे व दीक्षेचा प्रसाद मिळूनही शक्तिपातयोग साधनाबद्दल उदास राहाणे याला प्रमाद म्हणतात. साधकाच्या आर्थिक, व्यावहारिक, सामाजिक, मानसिक असंतुलनामुळे व दृढनिश्चयाच्या अभावामुळे साधकाच्या हातून साधन न करण्याची चूक होते. वास्तविक काही कारणांनी नित्य साधन झाले नाही व मध्ये खंड पडला तर पुन्हा उत्साहपूर्वक साधन करणे हे साधकाचे कर्तव्य आहे. जर प्रमादांकडे त्याने दुर्लक्ष केले तर हळूहळू त्याला मिळालेले साधन शिथिल व मंद होऊन जाते.

आळस :– वात, पित्त व कफामुळे देहाला व तमोगुणामुळे चित्ताला जडता आली की साधकाच्या देहात आळस उत्पन्न होतो. आळस देहात

शिरला की साधन करावे असे वाटत नाही व संसारातच मन रमून जाते. जादा खाणे व जादा झोप घेणे यामुळेही साधकाला आळस येतो. आळस जाण्यासाठी मनाला धारेवर धरणे हा सर्वात मोठा उपाय आहे. त्याचबरोबर खाणे,पिणे इत्यादी सर्व बेतात व नियमित ठेवणे हेही आवश्यक आहे.

अविरती :– अविरती म्हणजे भोगासक्ती. साधनातील हे सर्वात मोठे विघ्न आहे. पूर्वसंस्कारानुरूप नानाप्रकारच्या भोगांची आसक्ती साधकाच्या मनात असते. या भोगाचे रूप इतके व्यापक आहे की त्याचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. ज्यामुळे साधनात अडथळे येणार नाहीत असे लहान-सहान भोग साधकाने भोगून संपवावेत. परंतु ज्यामुळे शास्त्रमर्यादिकांचे उल्लंघन होऊन अनर्थ उत्पन्न होण्याची शक्यता असते त्यावेळी मोठ्या धैर्याने या भोगाकांक्षेशी सामना करून बाह्यतः साधकाने त्यांचे निराकरण करावे. असे केले म्हणजे नियमित साधनाने भोगासक्ती दूर होऊन नाहीशी होते. कारण साधनाभ्यासानेच "**विषयांचा विसरू पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजी॥**" असे या साधनाचे फल मिळते म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे. यामध्ये भोगासक्ती साधनानेच दूर होते हे स्पष्ट झाले आहे. यासाठी साधकाने साधनेचा आधार कधीही सोडता कामा नये.

भ्रांतिदर्शन :– उलटचा किंवा विपरीत ज्ञानाला भ्रम किंवा भ्रांतिदर्शन म्हणतात. साधन करताना साधकाची काही काही वेळेस मोठी चमत्कारिक धारणा होते. यामुळे आपली स्थिती फार उत्तम आहे, अवस्था फार वरच्या दर्जाची आहे, आपल्याला साक्षात्कार झाला व समाधी लागली अशी धारणा होऊन त्याचे साधनावरील लक्ष कमी होते. साधकाने अशावेळी मोठ्या सावधानतेने राहिले पाहिजे. स्वतःवर लक्ष ठेवले पाहिजे व शास्त्राशी अनुभव जुळतो की नाही हे पाहिले पाहिजे.

अलब्ध भूमिकत्व :– चित्ताची एकाग्रता न साधणे याला अलब्ध भूमिकत्व म्हणतात. शक्तिपातयोगाच्या साधनात साधकाला सुरवाती-पासून कित्येक दिवस पर्यंत या अडथळ्याशी सामना करावा लागतो. कारण हे साधन सुरू झाले की या व पूर्वजन्मीच्या संस्कारांचे शुद्धीकरण सतत सुरू असते. अशावेळी चित्ताची एकाग्रता वारंवार खंडित होते. क्वचित प्रसंगी चित्त इतके क्षुब्ध होते की कशाला आपण हे साधन घेतले असे साधकाला वाटू लागते. चित्ताला एकाग्रता प्राप्त होऊन शांतता लाभावी म्हणून साधक साधनेला बसला की जे विचार व प्रसंग

स्मृतीच्या गर्तेत नाहीसे झालेले असतात व ज्यांचा अर्थाअर्थी काही संबंध नसतो तेच दत्त म्हणून पुढे उभे राहातात. साधकाला स्वतःचाच राग येतो. संतोष नाहीसा होतो. त्याला वाटते की साधन सोडून दूर पळून जावे. परंतु मनाला दूर कोठे काढून ठेवणार ? यासाठी मन जसे उसळेल, विचार करील व जिकडे जाईल तिकडे जाऊ दिले पाहिजे. अगदी मोकळे सोडले पाहिजे. असे केले म्हणजे त्याचे शुद्धीकरण लवकर होऊन दमून ते स्थिरावते. कोठेही एकाग्रता न करता स्वस्थ बसून काय होते ते पाहाणे हा या साधनाचा विशेष असल्याने या अडथळ्याचा म्हणजे चित्त एकाग्र न होण्याचा विचारच साधकाने डोक्यातून काढून टाकला पाहिजे. साधनानेच एकाग्रता, चित्तवृत्ती निरोध व मनःशांती साधणार असल्याने साधकाने या शक्तिपातयोगसाधनाला पूर्ण शरणागत होणे एवढेच त्याच्या हातात आहे.

अनवस्थित्व :—प्राप्त केलेल्या अवस्थेपासून च्युत होणे याला अनवस्थित्व असे म्हणतात. साधक जसजसा साधनात पुढे प्रगती करीत जातो तसतशी त्याची अवस्था बदलत जाते. त्याला स्थिरचित्तत्वाचा व समाधीचा अनुभव येऊ लागतो. परंतु वर वर्णिलेल्या अडचणी आल्या की मधून मधून आपण पुन्हा खालच्या पायरीवर आलो आहोत असे वाटून तो अस्वस्थ होतो. अशावेळी साधकाने आपल्या मनाशी पक्का विश्वास बाळगला पाहिजे की जागृत शक्ती आपल्याला मुक्कामाला नेणार आहे. साधनात येणारे अडथळे व अडचणी ती दूर करणार आहे. त्याची ही धारणा पक्की राहिली की वरील सर्व अडथळे पार करून तो आपल्या इष्टस्थानी पोहोचतो हे निःसंशय खरे आहे.

हठयोग प्रदीपिकेतही योगाभ्यास प्रतिबंधक गोष्टींचे वर्णन करकरताना असे म्हटले आहे की—

अत्याहारः प्रयासश्च प्रजल्पो नियमग्रहः ।
जनसंगश्च लौल्यं च षड्भिर्योगो विनश्यति ॥

भूक नसता ज्यादा खाणे, खूप परिश्रम करणे, खूप बोलणे, थंड-पाण्याने प्रातःस्नान करणे, रात्रीचे एक वेळाच जेवण घेणे इत्यादी नियम करणे, लोकसंपर्क करणे व लोलुपता या सहा गोष्टी योगाचा नाश करतात.

साधकाने मोजकेच खाल्ले पाहिजे. याबाबत त्याने कोणाचीही क्षिती बाळगता कामा नये. आपल्याकडे आग्रहाची दुष्ट प्रवृत्ती आहे.

त्यामुळे भिडेला बळी पडून साधकाला ज्यादा खावे लागते. त्यामुळे त्याच्या अभ्यासाचा नाश होतो. अती आहारामुळे जडता, आळस व चंचलता येते. परिश्रमाबाबतही साधकाने अखंड सावध असले पाहिजे. धावणे, पळणे, जड वजन उचलणे अशा प्रकारचा व्यायाम किंवा खूप कष्टादी गोष्टी त्याने टाळाव्यात. कारण त्यामुळे प्राणांची गती वाढून चित्त चंचल होते व शरीर थकल्याने साधनाला जास्त वेळ बसवत नाही. बोलण्याबाबत तर श्रीसंत तुकाराम महाराजांनी "**नये बोलो फार**" अशी मोलाची सूचना देऊन ठेवली आहे. साधकाने नियमित सकाळ संध्याकाळ साधन करण्याला प्राधान्य देऊन इतर गोष्टींना गौणत्व दिले पाहिजे. याचा अर्थ असा की आपण जे साधन करणार आहोत त्याच्याशी धर्मशास्त्र, कर्मकांड, अर्थशास्त्रादी इतर सर्व शास्त्रांचा समन्वय आपल्या पद्धतीने घातला पाहिजे. अगदी प्रातःकाली स्नान करणे, उपवासाचा किंवा नक्ताचा नियम करणे इत्यादी नियम न करता जेणे करून शरीर सुस्थितीत धातुसाम्ययुक्त राहील व उत्तम साधनाभ्यास घडेल असे पाहिले पाहिजे. इतर शास्त्रांचे जे विहित नियम आपल्या वर्णाश्रमाला उचित असतील ते योग्य ती मुरड घालून त्यांचे आपल्या प्राप्त परिस्थिती प्रमाणे पालन करावे. आपले घर, परिस्थिती, शारीरिक–मानसिक व आर्थिक स्थिती इत्यादी सर्वांचा साकल्याने विचार करून साधकाने स्वतःच आपला मार्ग प्रशस्त केला पाहिजे. यासाठी प्रत्येकाला आपल्याला काय पेलेल हे पाहून आपला मार्ग निश्चित करणे योग्य ठरते.

जनसंगाचा त्यागही साधकाला फार आवश्यक आहे. "**नये बैसो जनामध्ये**" अशी सूचना याबद्दल श्रीसंत तुकाराममहाराज यांनीही दिली आहे. "**दुःसंगः सर्वथैव त्याज्यः**" ॥ ४३ ॥ **कामक्रोध मोहस्मृतिभ्रंशबुध्दिनाश सर्वनाशकारणत्वात्** ॥ ४४ ॥ **तरंगायिता अपीमे संगात्समुद्रायंति** ॥ ४५ ॥ अशी तीन सूत्रे नारदांनीही आपल्या नारद भक्तिसूत्रात घालून दुःसंगादी जनसंगाचा निषेध केला आहे. दुर्जन संगती सर्व प्रकारे त्याज्य होय. कारण दुःसंगाने काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर हे वाढतात. स्मृती नाहीशी होते आणि बुद्धिनाश होतो. त्यामुळे हा दुष्ट जनसंग अखेर सर्वनाशाला कारण होतो. हे कामक्रोधादी विकार जरी तरंगासारखे प्रथम लहान दिसले तरी ज्यावेळी दुष्ट असा जनसंग होतो त्यावेळी ते समुद्रप्राय होतात. यासाठी साधकाने सावध राहून हे टाळले पाहिजे.

लौल्य म्हणजे लोलुपता होय. साधकाने अखंड सावधान राहून अलिप्तता साधली पाहिजे. परिस्थिती, स्वभाव व संधी यांमुळे तो कशात लिप्त होईल ते सांगता येत नाही. " **लोलुप्यता काय निद्रेसी जिणावे** " असे म्हणून श्रीसंत तुकाराम महाराजांनी लोलुपता अशी काय लागून गेली आहे असे मनात आणून निद्रेबरोबर ती बलपूर्वक प्रयत्नाने जिंकावी असे म्हटले आहे.

वरील सर्व अडथळे नियमित साधनाने दूर होत असले तरी सुद्धा साधकाने व्यवहारात सावधान राहिले पाहिजे. म्हणजे साधन अधिक उत्तम चालण्यास व प्रगती लवकर होण्यास मदत होते. " **अखंड सावधान असावे** " हे सूत्रच येथे लागू केले पाहिजे. " **आपल्या मनासी रोधावे । परांतर शोधावे । क्षणाक्षणा सांभाळावे । बदलेल म्हणुनी** " हे साधकाचे बाह्य जीवनातील ध्येय असले पाहिजे. साधन मोठे आहे व आपण कसेही वागले तरी चालेल असे साधकाने कधीही मनात आणता व त्याप्रमाणे वागता कामा नये.

शिवसंहितेच्या पाचव्या पटलामध्ये शक्तिपातयोगाच्या साधकांना कोणकोणत्या योगविघ्नांना तोंड द्यावे लागते याचे फार चांगले वर्णन केले आहे. साधकांनी या विघ्नांपासून आपला बचाव कसा होईल याचा चांगला अभ्यास व विचार केला पाहिजे. भोगरूपी, धर्मरूपी, ज्ञानरूपी व स्वादरूपी अशी चार प्रकारांची विघ्ने उपस्थित होतात व ती साधनाचा नाश करतात म्हणून शंकरांनी पार्वतीला सांगितले आहे.

देवी पार्वती शंकरांना म्हणाली, " हे देवाधिदेवा ! परमार्थ ज्ञानाच्या प्राप्तीमध्ये मनुष्याला जी विघ्ने येतात त्याबद्दल सविस्तर माहिती तुम्ही मला सांगा. " पार्वतीने अशी प्रार्थना केल्यावर शंकर तिला म्हणाले, "हे देवी ! मोक्षप्राप्तीकरिता साधक प्रयत्न करू लागला की त्याच्या प्रगतीमध्ये अडथळा करणारी नाना प्रकारची विघ्ने उपस्थित होतात. त्यांचे क्रमशः सविस्तर वर्णन करतो. ते तू ऐक."

"एखाद्या मार्गावर काटेच काटे पसरलेले असावेत त्याप्रमाणे शक्तिपातयोगाने प्राप्त होणाऱ्या मुक्तीच्या साधनातही विषयभोगरूपी विघ्नांचे समुदाय सतत उपस्थित होत असतात. भोगाची ही तीव्र वासना हे सर्वात मोठे बंधन व विघ्न आहे. स्त्री उपभोग, उत्तम शय्या, मनोहर आसन, रमणीय वस्त्र आणि खूप धनसंचय या गोष्टी मोक्षाच्या आड येतात. विडा खाणे, अत्यंत स्वादिष्ट भोजन करणे, उत्तमोत्तम गाडयातून प्रवास करणे, राजऐश्वर्य उपभोगणे, सर्वांवर प्रभुत्व गाजविणे, मोठेपणा

मिरविणे, सोने, चांदी, तांबे, रत्ने, सुगंधित द्रव्ये, संपत्ती, गाई या गोष्टी एकत्रित करून त्यांचा संचय करणे; पांडित्य, वेदादी शास्त्रोक्त कर्मकांड, नृत्य, गीत अलंकार, बासरी, वीणा, मृदुंग व संगीत यांमध्ये विशेष रुची दाखविणे व हत्ती-घोड्यांच्या संग्रहासारखे ऐश्वर्य असावे असे वाटणे ही सर्व साधनात आडवी येणारी भोगरूपी विघ्ने आहेत."

"साधनामध्ये धर्मरूपी विघ्नेही आडवी येतात. प्रातःस्नान, बाह्य पूजेमध्ये अधिक निमग्नता, होम, अतिथी सेवा, विविध तिथी कृत्य, धर्मार्थ दानाचे ऐश्वर्य दाखविणे, व्रत व उपवास इत्यादी नियमबंधनात स्वतःला जखडून घेणे, हट्टाने बलपूर्वक मौन धरणे व इंद्रिय निग्रह करणे, ध्येय वस्तूचे जबरदस्तीने ध्यान करणे, स्थूल ध्यान करणे, अमुक मंत्राचा अमुक इतक्या संख्येपर्यंत काय वाटेल ते झाले तरी जप झाला पाहिजे असा अट्टाहास करणे, नियमित दान झाले पाहिजे, या सर्वांच्या प्रसिद्धीची हाव, वावडी, विहीर, तलाव या गोष्टी व्हाव्यात म्हणून त्यातच सर्व लक्ष घालणे, मोठमोठी घरे बांधणे, बगीचे तयार करणे, केळ्यांचे मांडव तयार करणे, यज्ञ, पापक्षय व्हावा म्हणून चांद्रायण व कृच्छ्र व्रते करणे, तीर्थयात्रा सतत करणे व नानात-हेच्या देवोत्सवामध्ये संमिलित होणे ही सर्व धर्मरूपी विघ्ने साधकाला आडवी येतात."

"हे वरानने! आता साधकाला साधनामध्ये जी ज्ञानरूपी विघ्ने आडवी येतात ती सांगतो. गोमुख, पश्चिमोत्तान इत्यादी विविध आसने करणे, धौती व बस्ती इत्यादी षट्क्रिया करून नाडी प्रक्षालन-शोधन करीत राहाणे, नाडी विज्ञान व्हावे म्हणून प्रयत्न करणे, प्रत्याहार साधावा म्हणून अत्यंत निग्रहाने, निश्चयाने व बलाने कान, नाक इत्यादी इंद्रियांचा निरोध करणे, लोखंडाच्या साखळीने किंवा लाकडी लंगोटीने उपस्थ बांधून टाकणे, त्याचप्रमाणे संयमासाठी उपस्थ छेदून टाकणे अशाप्रकारची उत्कट कर्मे, वायू चालन व्हावे म्हणून कुक्षी संचालन करणे किंवा वज्रोली मुद्रा करणे इत्यादी कोणत्याही क्रिया मुद्दाम करणे हे शक्तिपातयोगासाधन करणाऱ्याला अनावश्यक असून त्या साधनाने उत्पन्न होणाऱ्या ज्ञानामध्ये विघ्न आणतात यात शंका नाही."

"साधकाला स्वादरूप विघ्नांनाही तोंड द्यावे लागते. खूप गोड व पोटभरून खावे असे वाटणे हे मोठे विघ्न आहे. साधकाने लोभाने अशा प्रकारे खूप गोड खाल्ले व अपरिमित आहार घेतला की शरीरात नव्या रसाचा संचार होऊन एक प्रकारचे जडत्व शरीराला प्राप्त होते. शरीरा-बरोबर मन ही विकारी, जड व तामसी होऊन बहुतांशी कामोत्तेकजता

वाढीस लागल्याचे दिसते. यासाठी साधकाने अत्यंत सावध राहून शरीरात नवीन रसाचा संचार होईल असे पदार्थ टाळले पाहिजेत. यासाठी जीभ ताब्यात ठेवून रात्रंदिवस पहारा ठेवून जिव्हेची तृप्ती होईपर्यंत न खाता संयमित भोजन करून खाण्याची वासना कमी केली पाहिजे.

एथपर्यंत शक्तिपातयोगाचा साधन संपत्तीचे सर्वांगाने दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. आपल्या सर्व शास्त्रकारांनी साध्यप्राप्तीमध्ये साधन संपत्तीचे फार मोठे महत्त्व असल्याने पुनःपुन्हा घोळून घोळून हा विषय मांडला आहे. किंबहुना सर्व पारमार्थिक ग्रंथांचे अभ्यासपूर्वक वर्गीकरण केले तर असे आढळून येते की ३/४ पेक्षा जास्त भाग या साधनसंपत्तीच्या स्पष्टीकरणाकरिता खर्ची पडला आहे. यावरून या विषयाचे महत्त्व किती आहे याचे आकलन साधकांना होईल. शास्त्रीय प्रयोगाचे अचुक उत्तर जर हवे असेल तर सर्व उपकरणे व परिस्थती त्या प्रयोगाला अनुकूल अशीच आवश्यक असते. त्याचप्रमाणे या शक्तिपातयोगाची किंवा सिद्धमहायोगशास्त्राची फले शास्त्रीय निकषावर उत्तम ठरतील इतकी चांगली व उत्कृष्ट यावी असे वाटत असेल तर साधनसंपत्तीचा अपूर्व साठा जवळ असला पाहिजे. असे घडले म्हणजे अपेक्षित फलनिष्पत्ती झाल्याशिवाय कधीही राहाणार नाही.

[आधार अकरावा]

★ शक्तिपाताची शास्त्रीय प्रक्रिया ★

१) संप्रदायाचा महिमा
२) दीक्षेचा महिमा
३) दीक्षेचा अर्थ
४) दीक्षेचा हेतू
५) दीक्षा कशी होते?–अ) स्पर्शदीक्षा
ब) दृग्दीक्षा
क) शब्ददीक्षा
ड) ध्यानदीक्षा
(कृपा किंवा पत्रदीक्षा)
६) दीक्षेचे व साधनाचे स्थान
७) साधनासाठी आसन
८) साधनाला बसण्याची पद्धत
९) साधनाला बसण्यापूर्वी करावयची प्रार्थना
१०) साधनाची वेळ
११) साधनेसाठी वस्त्रे
१२) साधनातील क्रिया–अ) साधनात क्रिया का होतात ?
ब) पश्चिममार्ग खुला होतो
क) प्राणशक्तीचे ऊर्ध्वगामित्व
ड) तीन ग्रंथींचे भेदन
इ) पंचतत्त्वांचे अवलंबन
ई) आत्मतत्त्वांचे शुद्धिकरण
उ) परिपक्वता व परिपूर्णताप्राप्ती
ऊ) षट्चक्र वेध

१३) दीक्षेची वेळ

१४) साधनक्रियांची वैशिष्ट्ये–

श्री) क्रिया अर्थशून्य नाहीत

प्र) आनंदाची प्राप्ती

भु) साधनमहायज्ञात क्रियाद्वारा हवन

रा) कर्म, जाती व अवस्थांचे क्रियांना बंधन नाही

म) विचारप्रवाह व एकाग्रता

१५) साधनातील क्रिया व अनुभव–

श्री) आरंभावस्था

कृ) घटावस्था

ष्णा) परिचयावस्था

य) निष्पत्ती अवस्था

न) हठयोगाच्या क्रिया

मः) नाडीशुद्धीच्या क्रिया

ॐ) बंध व मुद्रा

न) प्राणायाम

मः) नऊरस

शि) मंत्रयोगाच्या क्रिया

वा) लययोगाच्या क्रिया

य) राजयोगाच्या क्रिया–

अ) दिव्यस्पर्शज्ञान

ब) दिव्यरस



शक्तिपात दीक्षा मिळून शक्ती जागृत होणे नितांता आवश्यक आहे. कारण त्याशिवाय मंत्र, तंत्र व अर्चन इत्यादी गोष्टी सिद्ध होत नाहीत व ज्ञानप्राप्तीही होत नाही. गौतमीयतंत्रामध्ये असे म्हटले आहे की –

मूलपद्मे कुंडलिनी यावन्निद्रायिता प्रभो । तावत् किंचिन्न सिध्येत् मंत्रयंत्रार्चनादिकम् । जागर्ति यदि सा देवी बहुभिः पुण्यसंचयैः । तदा प्रसादमायाति मंत्रयंत्रार्चनादिकम् ।।

जोपर्यंत मूलाधारामध्ये कुंडलिनी शक्ती निद्रा घेत असते तोपर्यंत मंत्र, यंत्र किंवा पूजाअर्चादी कोणतीही गोष्ट सिद्ध होत नाही. ज्यावेळी पुण्यसंचयाच्या प्रभावामुळे कुंडलिनीशक्ती गुरुकृपेने जागृत होईल तेव्हा त्या शक्तीच्या कृपेमुळेच मंत्र, यंत्र किंवा अर्चनादी गोष्ट सिद्ध होतात.

ज्ञानप्राप्तीसाठीही शक्ती जागृत होणे आवश्यक असते. घेरंड संहितेच्या तृतीय उपदेशात म्हटले आहे की–

मूलाधारे आत्मशक्तिः कुंडलिनी परदेवता । शायिता भुजगाकारा सार्द्धत्रय वलयान्विता ।।४९।। यावत्सा निद्रिता देहे तावज्जीवः पशुर्यथा । ज्ञानं न जायते तावत कोटियोगविधेरपि ।। ५० ।। आधार शाक्ति निद्रायां विश्वं भवति निद्रया । तस्यां शक्तिप्रबोधेन त्रैलोक्यं प्रति बुध्यते ।। ५१ ।।

मूलाधारात परमदेवता कुंडलिनी शक्ती सर्पाचा आकार घेऊन साडेतीन वेढे घालून झोपलेली आहे. जोपर्यंत ही शक्ती झोपलेली असते तोपर्यंत जीव पशुप्रमाणे अगदी अज्ञानात असतो. त्यामुळे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय इतर कोटी कोटी योगांचे साधन केले तरी ज्ञानाची प्राप्ती होत नाही. याचे कारण आधार शक्ती झोपली की

सर्व ब्रह्मांड झोपलेले असते. ती जेव्हा जागृत होते तेव्हा सर्व त्रैलोक्य जागृत होते. याकरिता कुंडलेनी शक्ती जागृत झाल्याशिवाय ज्ञानाची सर्व साधने निष्फळ ठरतात.

शक्ती जागृत होण्याची नितांत आवश्यकता आहे हे निःसंशय आहे. यासाठी शक्तिपाताच्या शास्त्रीय प्रक्रियेच्या सांगोपागांचा यथाक्रम विचार आवश्यक आहे.

संप्रदायाचा महिमा :–

शक्तिपातयोगशास्त्राचा गीता हा ग्रंथ मुकुटमणी आहे आणि शक्तिपातयोग हे सर्व शास्त्रात श्रेष्ठ शास्त्र आहे. त्यामुळे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की अर्जुनाने पुष्कळ पुण्य केल्यामुळे त्याला सर्व शास्त्रांचा राजा असलेले हे शक्तिपातयोगशास्त्र म्हणजे गीताशास्त्र भगवंतानी सांगितले. मात्र ह्या शक्तिपातयोगशास्त्रामध्ये संप्रदायाचा महिमा फारच अपूर्व आहे व त्याच्या आधाराशिवाय गती नाही हे सांगताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

तरि ययाचि शास्त्राचेनि । संप्रदायें पांघरौनि । शास्त्रार्थु हा निकेनि । अनुष्ठी हो ॥१८–१४८१॥ येरवी अमृतमथना । सारिखे होईल । अर्जुना । जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ॥ १४८२ ॥ गाय धड जोडे गोमटी । ते तैंचि पथ दे किरीटी । जैं जाणिजे हातवटी । सांजवणीची ॥ १४८३ ॥ तैसा श्रीगुरु प्रसन्नु होये । शिष्य विद्याही कीर लाहे । परि ते फळे संप्रदायें । उपासिलिया ॥ १४८४ ॥

शक्तिपातयोगशास्त्राचा जो संप्रदाय आहे तो समजावून घेऊन त्याचाच अंगिकार केला पाहिजे. मग त्या शास्त्राप्रमाणे या योगाचा अभ्यास केला पाहिजे. संप्रदायाचे पांघरूण हे कृपाछत्रच असते. साधक परंपरेने चालत आलेल्या संप्रदायातून दीक्षित झाला की त्या संप्रदायाची सिद्धशक्ती साधकाचे अखंड कल्याण करण्यास सिद्ध होते. एरवी हे अर्जुना ! संप्रदाय सोडून जो आपल्या मनाप्रमाणे अनुष्ठान करतो त्याची स्थिती अमृतमंथनाप्रमाणे होते. अमृतमंथनात परिणामी जसे विष निघाले, त्याप्रमाणे साधकाला संप्रदायक्रमाने शक्तिसंक्रमण झाले नाही तर कैवल्यामृताची सिद्धी होत नाही. यासाठी दीक्षेची नितांत आवश्यकता आहे. हे अर्जुना ! गाय उत्तम मिळाली तरी तिचे दूध काढण्याची हातोटी माहीत असली तरच ती दूध देते. त्याप्रमाणे ज्यावेळी श्रीगुरू प्रसन्न होतात त्यावेळी शिष्याला शक्तिपात दीक्षा मिळून त्याला ही विद्या प्राप्त होते. परंतु शिष्याने संप्रदायाप्रमाणे नियमाने साधन केल्याशिवाय त्याला

फलप्राप्ती मिळत नाही. नुसते साधन मिळाले म्हणजे आपण कृतकृत्य झालो असे ज्या साधकांना वाटते ते चुकीचे आहे. साधनाचे अनुष्ठान झाले पाहिजे. हाच प्रयत्न होय. अशा या शक्तिपातयोगस्वरूप गीतारत्नेश्वराची जेव्हा साधकभक्त आपल्या अंत:करणात दृढ निश्चयाने स्थापना करतो तेव्हा त्याला परब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते. या अर्थानेच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " **ऐशा भक्तालयी चोखटी । गीतारत्नेश्वर हा प्रतिष्ठीं । मग माझिया संवसाटी । तुकसी जगीं ।।१८.५०९।।** इतकेच नव्हे तर भगवंतानी असे म्हटले आहे की, **न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तम: । भविता न च मे तस्मादन्य: प्रियतरो भुवि ।। १८–६९ ।।**

भगवंत अर्जुनाला म्हणतात की, "जो कोणी माझे हे शक्तिपातयोगशास्त्राचे गुह्यज्ञान सांगतो त्याहून माझी अत्यंत आवडती गोष्ट करणारा मनुष्य दुसरा कोणीही नाही आणि त्याच्यापेक्षा या लोकी मला अत्यंत आवडता असा दुसरा होणार नाही.

शक्तिपातयोगामुळे परंपरेने आपल्याला बोधाचे ऐश्वर्य कसे प्राप्त झाले हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मोठ्या अभिमानाने सांगितले आहे. ते म्हणतात, " कलीने भूतांचा ग्रास केलेला आहे असे पाहून गहिनीनाथांनी श्रीनिवृत्तीनाथांना अशी आज्ञा केली की आदिगुरू शंकरांपासून शिष्यपरंरेने हे बोधाचे ऐश्वर्य आमच्या कुलात प्राप्त झाले. शक्तिपातयोगाने शिष्याला बोध देण्याचे, विषय विध्वंस करणारे व अद्वयानंदसुख देणारे हे ऐश्वर्य घेऊन तू कलीने त्रस्त केलेल्या जीवांना देऊन दु:खापासून सर्वप्रकारे मुक्त कर."या सर्व विवेचनावरून संप्रदाय व परंपरा यांची आवश्यकता किती आहे हे लक्षात येईल.

दीक्षेचा महिमा :–

दीक्षेचा महिमा अपूर्व आहे. कारण वेदान्त, योग, मंत्र, तंत्र, भक्ती इत्यादी जेवढे म्हणून ज्ञानप्राप्तीचे संप्रदाय आहेत त्यामध्ये दीक्षा ही दिली जातेच. परंतु ज्या दीक्षमुळे गुरूच्या शक्तीचा शिष्याच्या ठिकाणी संचार होतो तीच खरी दीक्षा होय. दीक्षेचे माध्यम व प्रकार कोणता आहे ही अगदी गौण बाब आहे. दीक्षेत शक्तिसंचार हा झालाच पाहिजे कारण त्याशिवाय शिष्याची बुद्धी अतींद्रिय विषय ग्रहण करू शकत नाही. अतींद्रिय अशा ब्रह्मतत्त्वाचे ग्रहण दीक्षेने होत असल्याने त्याला शक्तिपात असे म्हणतात. ब्रह्मतत्त्वाचे ग्रहण हे शक्तिपातदीक्षेशिवाय इतर कोणत्याही मार्गाने होणे शक्य नसल्याने या दीक्षेचा महिमा अपूर्व आहे हे सर्वांनी मान्य केले आहे.

देवात्मशक्ती या ग्रंथामध्ये श्री प. प. विष्णूतीर्थस्वामीमहाराज दीक्षेचा महिमा सांगताना म्हणतात, "शक्तिपात हे एक प्रकारचे शक्तीचे संक्रमण किंवा निवेशच आहे. सिद्धपुरुष अनुग्रहकांक्षी शिष्याच्या प्राणदेहात संवित् शक्तीचा एक प्रवाह निवेशित करतात. हा प्रवाह म्हणजे अत्युच्च बीजरूप शक्त्यात्मक तेजोमय द्रवाचा अति उदात्त कवलच होय. हा प्रवाह हस्तस्पर्श, दृष्टिक्षेप, मुखाने उच्चारलेला एखादा शब्दसमूह म्हणजे मंत्र, ईश्वराच्या परम पावन नामांपैकी एखादे नाम किंवा केवळ चिद्-विचार असू शकतो. ही देवात्मशक्ती ज्यावेळी दीक्षित केली जाते तेव्हा अनुग्रहीताची सुप्तकुंडलिनी शक्ती जागृत होते. आपण असे म्हणू या की प्राणाग्नी चेतविला जाऊन त्यांच्या शिखाज्वाला चैतनिक व्यूहात फैलावतात. त्यामुळे सरतेशेवटी सुषुम्णेचे दार उघडले जाऊन वंशीय रज्जूमधील चैतनिक केंद्रे म्हणजे षट्चक्रांचा वेध करीत त्या सहस्रारा-पर्यंत जातात. शक्तिपात दीक्षेस वेध दीक्षाही म्हणतात. वेध म्हणजे आरपार जाणे. गुरू शक्ती जागृत करतात व त्याच शक्तीने षट्चक्र वेध होतो. एका शरीरातून दुसऱ्या शरीरात शक्ती प्राणांच्या द्वारे जाते. कारण प्राण सर्वव्यापी आहे. हेच कार्य मंत्रदीक्षेत वाणीच्या व्यापाराने श्रवणद्वारा होते. अशा मंत्रास मंत्रचैतन्य अथवा शक्तिसंपुटित मंत्र असे म्हटले जाते."

कुलार्णव तंत्राच्या १४ व्या उल्लासात दीक्षेचा महिमा पुढील प्रमाणे सांगितला आहे.

दीक्षामूलो जपः सर्वे दीक्षामूलं परं तपः । दीक्षामाश्रित्य निवसेत् यत्र कुत्राश्रमे वसन् ॥ विना दीक्षां न मोक्षः स्यात्तदुक्तं शिवशासने । सा च न स्याद्विनाचार्यमित्याचार्य परंपरा ॥ ३ ॥ दीक्षया मोक्षदीपेन चंडालोऽपि विमुच्यते । आभ्यां विना कुलेशानि कौलिको नैव मुच्यते ॥ ८० ॥ शरीरस्य न संस्कारो जायते न च कर्मणः । आत्मनः कारयेद्दी-क्षामनादि कुलकुंडलीम् ॥ ८१ ॥ मंत्रौघधैर्यथा हन्याद्विषशक्तिं कुलेश्वरी । पशुपाशं तथा छिन्द्याद्दीक्षया मंत्रवित् क्षणात् ॥ ८३ ॥ अस्मात् प्रवितताद् बंधात् परसंस्थानबोधकात् । दीक्षैव मोक्षयेत्पूर्वं दिव्यं धाम नयत्यपि ॥ ८४ ॥ उपपातकलक्षाणि महापातककोटिशः । क्षणाद्हति देवेशि दीक्षा हि विधिना कृता ॥ ८५ ॥ यया चोन्मीलितात्मानो भवन्ति पशवः शिवाः । सा दीक्षा हचुदिता देवि पशुपाशविमोचका ॥ ८६ ॥ यया दीक्षितमात्रेण जायंते प्रत्ययाः प्रिये । सा दीक्षा मोक्षदा ज्ञेया शेषास्तु जनसेविकाः ॥८७॥ उपासनाशतेनापि यां विना नैव सिध्दचति । तां दीक्षामाश्रयेद् यत्नात्

श्रीगुरोर्मंत्रसिध्दये ॥ ८८ ॥ रसेंद्रेण यथा विद्धमयः सुवर्णतां व्रजेत् । दीक्षा विद्धस्तथा ह्यात्मा शिवत्वं लभते प्रिये ॥ ८९ ॥ दीक्षाग्निदग्धकर्मासौ मायाविच्छिन्नबंधनः । गतः परां ज्ञानकाष्ठां निर्बीजस्तु शिवो भवेत् ॥ ९० ॥ दार्वश्मलौहमृद्रत्न जातिलिंगप्रतिष्ठितम् । यथोच्यते तथा शुद्धाः सर्ववर्णास्तु दीक्षिताः ॥ ९३ ॥ येन पूजितमात्रेण चाब्रह्मभुवनांतिकम् । पूजितं तेन सर्वं स्याद्दीक्षितेन न संशयः ॥ ९४ ॥ दीक्षितस्य न कार्यं स्यात्तपोभिर्नियमव्रतैः । न तीर्थक्षेत्रगमनैर्न च शारीरयंत्रणैः ॥ ९५ ॥ अदीक्षिता ये कुर्वंति जपपूजादिकाः क्रियाः । न फलंति प्रिये तेषां शिलायागुप्तबीजवत् ॥ ९६ ॥ देवि दीक्षाविहीनस्य न सिद्धिर्न च सद्गतिः । तस्मात् सर्व प्रयत्नेन गुरुणा दीक्षितो भवेत् ॥ ९७ ॥

"जप आणि तप यांच्या मुळाशी दीक्षा आहे. कोठल्याही आश्रमात असले तरी दीक्षेच्या आश्रयाने उन्नती करून घ्यावी. शंकरांपासून परंपरेने जी योगदीक्षा प्रवाहित झाली त्यामध्ये योगेच्छू लोकांना दीक्षेवाचून फलप्राप्ती नाही. गुरुवाचून कधीही दीक्षा होत नाही. अशी योगमार्ग परंपरा आहे. दीक्षेने प्राप्त होणाऱ्या ज्ञानदीपाने चांडालही मुक्त होतो. दीक्षेशिवाय व ज्ञानाशिवाय शंकरांच्यापासून चालत आलेल्या म्हणजेच महेशान्वयसंभूत परंपरेशिवाय साधकाला मुक्ती मिळत नाही. मंत्र व विषघ्न औषधीने जशी विषाची मारक शक्ती नष्ट होते त्याप्रमाणेच मंत्रज्ञ-गुरूच्या दीक्षेने एका क्षणात पशुपाशाचा छेद होतो. या दृढतर विस्तृत बंधनातून परमस्थानाचे म्हणजे ब्रह्माचे ज्ञान देऊन दीक्षाच फक्त मुक्त करणारी व श्रेष्ठ स्थानाला नेणारी आहे. विधियुक्त दीक्षा ही उपपातक व महापातकांच्या कोटी कोटी राशी एका क्षणात् भस्मसात करते. ज्यामुळे सामान्यजनही आत्मजागृत होऊन शिवस्वरूप होतात तीच खरी माणसाला पशुसारख्या पाशातून सोडविणारी दीक्षा होय. जी दीक्षा होताच दिव्य अनुभव येऊ लागतात तीच खरी मोक्ष देणारी दीक्षा होय. इतर ज्या दीक्षा असतात त्या सामान्य जनसेविकांप्रमाणे होत. शेकडो उपासना करूनही दीक्षेवाचून सिद्धी प्राप्त होत नाही. यासाठी प्रयत्नाने गुरुमंत्र सिद्धीसाठी दीक्षा जरूर घ्यावीच. धातुवादाच्या प्रक्रियेत ज्यावेळी पाऱ्याचा लोखंडावर संस्कार केला जातो त्यावेळी त्याचे सोने होते. त्याप्रमाणेच दीक्षेच्या संस्कारामुळे जीवाला शिवभावाची प्राप्ती होते. दीक्षारूप अग्नीने ज्याची कर्मे दग्ध झाली, मायिकबंधन तुटून गेले व परम तत्त्वज्ञान झाले तो शिवच समजावा. पाषाण, लोहादी धातू, मृत्तिका व रत्नादींना देवप्रतिमेच्या संस्काराने जसे

पावित्र्य येते तसे दीक्षा संस्काराने कोणत्याही वर्णाच्या व्यक्तीची शुद्धी होते. जो दीक्षा घेतो त्याने सृष्टीतील पिपीलीके पासून ब्रह्मापर्यंत सर्व काही पूजल्यासारखे आहे. दीक्षा ही सर्व पूजांपेक्षा श्रेष्ठ आहे. दीक्षिताला तप, नियम, व्रत, तीर्थ, क्षेत्रगमन व इतर कोणतेही शारीरिक क्लेश करण्याची आवश्यकता नाही. दीक्षा न घेता केलेल्या जप व पूजादिक्रिया खडकाळ जमिनीत पेरलेल्या धान्यबीजांप्रमाणे व्यर्थ न निष्फळ होतात. हे पार्वती ! दीक्षाहीनाला मंत्रसिद्धी होत नाही. सद्गती मिळत नाही. म्हणून सर्व प्रयत्नाने गुरुकडून दीक्षा घ्यावी."

दीक्षेचा अर्थ :-

दीक्षेचा अर्थच देवत्वाची प्राप्ती असा आहे. विश्वसार शारदा-तिलक ग्रंथात म्हटले आहे की-

अथ दीक्षां प्रवक्ष्यामि शृणुष्व कमलानने ।
अस्य विज्ञानमात्रेण देवत्वं लभते नरः ॥

श्रीशंकर पार्वतीला दीक्षेच्या विषयासंबंधी चर्चा चालू असताना असे म्हणाले की, "या दीक्षेचे विज्ञान म्हणजे त्याची शास्त्रीय प्रक्रिया जाणल्याने मनुष्य देवत्वाचा लाभ करून घेऊ शकतो. याचा अर्थच असा आहे की दीक्षेमुळेच मनुष्याला दैवी शक्ती प्राप्त होते."

रुद्रयामल तंत्रातही दीक्षाचा अर्थ सांगून तिच्या ठिकाणी परम ज्ञान देण्याचे व पाप शृंखला नाहीशी करण्याचे अद्भुत सामर्थ्य कसे असते हे सांगताना म्हटले आहे की-

दिव्य ज्ञानं यतो दद्यात् कुर्यात्पापक्षयं ततः । तस्मात् दीक्षेति सा प्रोक्ता सर्व तंत्रस्य सम्मता ॥ १ ॥ ददाति शिवतादात्म्यं क्षिणोति च मलत्रयम् । अतो दीक्षेति संप्रोक्ता दीक्षातंत्रार्थवेदभिः ॥ २ ॥ दीयते परमं ज्ञानं क्षीयते पाप पद्धति : । तेन दीक्षोच्यते मंत्रे स्वागमार्थबलाबलात् ॥ ३ ॥

दीक्षा या शब्दात दी+क्षा अशी दोन अक्षरे आहेत. दीक्षा दिव्य ज्ञान देते व तिच्यामुळे सर्व पापांचा क्षय होतो. याकरिताच तिला दीक्षा असे म्हणतात. दीक्षा या शब्दाचा खरा अर्थ हाच आहे. दीक्षा ही सर्व तंत्रांना संमत व सर्व शास्त्रांना मान्य आहे. ही दीक्षा शिवाशी जीवाचे तादात्म्य करते. ती आणव, कर्मण व मायिक अशा तीन मलांचा नाश करते. दीक्षातंत्राच्या ज्ञात्या अशा ऋषींनी व मुनींनीच या शक्तिपाताने होणाऱ्या शक्तिसंक्रमणाच्या प्रक्रियेला दीक्षा हे नाव दिले आहे. ही दीक्षा अत्यंत श्रेष्ठ असे ज्ञान देते व पापांच्या राशींचा नाश करते. या

कारणामुळे या संक्रमण प्रक्रियेला दीक्षा असे नाव मंत्रशास्त्र व आगमशास्त्रामध्ये दिले आहे.

योगिनी तंत्रामध्येही दीक्षेचा अर्थ पुढीलप्रमाणे वर्णन केला आहे.

दीयते ज्ञानमत्यर्थं क्षीयते पाशबंधनम् । अतो दीक्षेति देवेशि कथिता तत्त्वचिंतकैः ॥ १ ॥ मनसा कर्मणा वाचा यत्पापं समुपार्जितम् । तेषां विशेषा करणी परमज्ञानदायतः ॥ २ ॥ तस्मात् दीक्षेति लोकेऽस्मिन् गीयते शास्त्र वेदकैः । विज्ञानफलदा सैव द्वितीया लयकारिणी । तृतीया मुक्तिदा चैव तस्माद्दीक्षेतिधीयते ॥ ३ ॥

दीक्षा ब्रह्मज्ञान देते. पाश म्हणजे कर्मबंधनांचा नाश करते. याकरिता तत्त्वचिंतन करणाऱ्या ज्ञानी पुरुषांनी या प्रक्रियेला दीक्षा असे म्हटले आहे. मन, वाणी आणि कर्म यांच्याद्वारे जो पाप संचय केला जातो तो दीक्षेमुळे अगदी मुळापासून नष्ट होतो. शास्त्रवेत्त्यांचा असा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे की एकमात्र दीक्षा हीच मनुष्याला परमज्ञान प्रदान करू शकते. दीक्षा विज्ञानरूपी फल देते. दुसरी विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती द्वैतभावाचा व मनाचा लय करते. आणि तिसरी सर्वात श्रेष्ठ गोष्ट म्हणजे दीक्षा मुक्ती देते. या सर्व गोष्टी ज्या क्रियेमुळे घडून येतात त्या शक्तिपाताला दीक्षा म्हणतात.

दीक्षेचा हेतू :–

ज्ञानाचे दान करणे हाच दीक्षेचा हेतू आहे. कारण ज्ञान प्राप्त झाले की मनुष्य मुक्त होतो. सामान्य लोकांची अशी समजूत आहे की ज्ञान ही काही दान करण्याची किंवा एकाने दुसऱ्याला देण्याची वस्तू नव्हे. ज्यांना वेदान्ताचा गभितार्थ शक्तिपातयुक्त गुरुपरंपरेने प्राप्त होत नाही त्यांना असे वाटते की नुसत्या प्रवचनाने सांगण्याने किंवा महावाक्योपदेशाने वेदान्त प्रतिपादित ज्ञान प्राप्त होईल. परंतु शास्त्रकारांनी निक्षून सांगितले आहे की –

परिपक्वमला ये तानुत्सादनहेतुशक्तिपातेन ।
योजयती परे तत्त्वे स दीक्षाचार्यमूर्तिस्थः ॥

ज्यावेळी शिष्याचा मूळ आवरणरूप मल हा परिपक्व होऊन गळून पडण्याच्या अवस्थेला येतो त्यावेळी सदगुरू शक्तिपात करून शिष्याच्या मलादी आवरणाचा भेद करतात व त्याची परतत्त्वाशी गाठ घालून देतात. अशा प्रकारे शक्तिपाताने ज्ञानदान करणाऱ्या गुरूला मूर्तिमंत दीक्षाचार्य म्हणतात.

शक्तिपातेन संयुक्ता विद्या वेदान्तवाक्यजा ।
यदा यस्य तदा तस्य विमुक्तिर्नात्र संशयः।

वेदान्ताने प्राप्त होणारी विद्या जेव्हा शक्तिपाताच्या संयोगाने मिळते तेव्हा मनुष्य तत्क्षणीच मुक्त होतो यात काहीच संशय नाही. याचा अर्थच असा आहे की गुरू हा श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ असूनसुद्धा जर शक्तिपात करण्याचे सामर्थ्य त्याच्यात नसेल तर शिष्याला त्याचक्षणी साक्षात्कार होऊ शकत नाही.

सूतसंहितेमध्ये तर वेदान्त–तत्त्वज्ञान हे शक्तिपाताच्या हातात हात घालून आल्यावरच उपयुक्त ठरते हे सांगताना म्हटले आहे की-

तत्त्वज्ञानेन मायया बाधो नान्येन कर्मणा । ज्ञानं वेदान्तवाक्योत्थं ब्रह्मात्मैकत्वगोचरम ।। तच्च देवप्रसादेन गुरोः साक्षान्निरीक्षणात । जायते शक्तिपातेन वाक्यादेवाधिकारिणम् ।।

तत्त्वज्ञानानेच मायेचा निरास होतो. दुसऱ्या कोणत्याही कर्माने किंवा उपासनेने म्हणजे मार्गाने होत नाही. महावाक्यामुळे उत्पन्न होणारे जीव व ब्रह्माचे एक्य दाखविणारे असे ज्ञानच वेदान्तशास्त्राला संमत आहे. हे ज्ञान देवाच्या प्रसादामुळे गुरूकडून प्रत्यक्ष दृष्टिक्षेप झाल्यामुळे शक्तिपात होऊन अधिकारी शिष्याला नुसत्या वाक्योच्चाराबरोबर अनुभवला येते. यावरून हे सिद्ध होते की नुसत्या प्रवचनाने, बोलण्याने किंवा सांगण्याने ज्ञान प्राप्तीचे काम होत नाही. त्यासाठी ज्ञान देण्याची क्रिया घडून येणे आवश्यक असते. ज्ञान देणे ही अपूर्व गोष्ट आहे व ती एकमात्र दीक्षेनेच साध्य होते. दीक्षा म्हणजेच ज्ञान देणे. ज्या गुरूजवळ ही ज्ञान देण्याची शक्ती आहे तोच ज्ञान देऊ शकेल. बाकी कोणीही ज्ञान देऊ शकणार नाही. फक्त सांगू शकेल.

ज्याला खरी ज्ञानप्राप्तीची तळमळ आहे त्याने अशी शक्तिपात दीक्षा आपल्याला कोठे मिळेल याच्या शोधात असले पाहिजे. इतर शेकडोशे साधनांचा, उपासनांचा व मार्गांचा त्याग करून जेथे अशा प्रकारे प्रत्यक्ष ज्ञानदानाची दीक्षा मिळत असेल तेथे निःसंकोचपणे पदर पसरला पाहिजे. याबाबतीत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी गीतेच्या ४ थ्या अध्यायातील ३४, ३५, ३६ व ३७ या श्लोकांवर जे भाष्य केले ते पाहाण्यासारखे आहे.

**तें गा ज्ञान पै बरवे । जरी मनीं आथि जाणावें । तरी संतांतें भजावें । सर्वस्वेंसीं ।। १६५ ।। जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा

दारिवंठा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी ॥ १६६ ॥ तरी तनुमन-जीवे । चरणासी लागावें । आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥१६७॥ मग अपेक्षित जें आपुलें । तेंहि सांगतील पुसलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा न ये ॥१६८ ॥ जयाचेनि वाक्य उजिवडें । जाहाले चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें । निःशंक होय ॥ १६९ ॥ ते वेळी आपणपेयां सहितें । इयें अशेषेंहि भूतें । माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ १७० ॥ ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा ॥ १७१ ॥ जरी कलमषाचा आगर । तूं भ्रांतीचा सागर । व्यामोहाचा डोंगर । होऊनि अससी ॥ १७२ ॥ तन्ही ज्ञानशक्तिचेनि पाडें । हें आघवेंचि गा थोकडें । ऐसें सामर्थ्य असें चोखडें । ज्ञानी इये ॥ १७३ ॥ देखे विश्वसंभ्रमा ऐसा । जो अमूर्ताचा कडवसा । तो जयाचिया प्रकाशा । पुरेचिना ॥ १७४ ॥ तया कायसे हे मनोमळ । हें बोलताचि अति किडाळ । नाही येणें पाडे ढिसाळ । दुजें जगीं ॥ १७५ ॥

" ते उत्तम असे आत्मज्ञान आपल्याला प्राप्त व्हावे असे साधकाला वाटत असेल तर त्याने ज्यांना ज्ञानाचे दान करण्याची शक्ती परंपरेने प्राप्त झाली आहे अशा संत सत्पुरुषांची सर्व भावाने उपासना केली पाहिजे. कारण हे सत्पुरुष म्हणजे ज्ञानाचे कोठार होत. सेवाधर्म हा त्या कोठाराचा दरवाजा आहे. श्रीकृष्ण म्हणतात की, हे अर्जुनरूपी साधका ! तू अत्यंत मनोभावाने ह्या संतसत्पुरुषांची सेवा करून हा दरवाजाच आपल्या स्वाधीन करून घे. शरीर, मन व जीवभाव हे सर्व त्यांना अर्पण करून त्यांच्या चरणी लाग. अत्यंत नम्र व निरहंकार होऊन त्यांची सेवा किंवा दास्य कर. अशा प्रेमाने केलेल्या सेवेने ते प्रसन्न होतील. मग जर तू त्यांच्यापुढे आत्मज्ञानाची इच्छा स्वतःहून प्रकट केलीस तर ते शक्तिपात दीक्षा देऊन तुला ज्ञानबोधाने तृप्त करतील. ही ज्ञानवस्तू तुला प्राप्त झाली की तुझे अंतःकरण संकल्प करण्याचे विसरून जाईल व मनामध्ये कसलेही संकल्पविकल्प उत्पन्न होणार नाहीत. यामुळे एका आत्मपदार्थावाचून साधकाला दुसरा पदार्थ जगात आहे याची कल्पनाच येत नाही. ज्यावेळी सदगुरू शक्तिपातपूर्वक शिष्याला तत्त्वज्ञानाचे दान करतात, त्यावेळी त्याच्या दिव्यचक्षूंचे उन्मीलन झाल्याने चित्त निर्भय होते. या दीक्षा समकालच जीव परब्रह्माचे योग्यतेस पोहोचतो. हे अर्जुना ! शक्तिसंक्रमणामुळे तुझ्या चित्ताची जेव्हा वर वर्णिल्याप्रमाणे स्थिती होईल त्यावेळी तू आपल्यासह सर्व भूते व सर्व जग एकरूप म्हणजे माझ्या स्वरूपात निरंतर पाहाशील. अर्जुना ! ज्यावेळी

श्रीगुरू कृपेने हे ज्ञानाचे दान तुला शक्तिपाताने करतील त्याचवेळी खऱ्या ज्ञानप्रकाशाचा तुझ्या अंतःकरणात उदय होईल व तुझा मोहरूपी अंधकार पूर्णपणे नाहीसा होईल. हे अर्जुना ! जरी तू सर्व पापांचे आगर असला किंवा भ्रांतीचा समुद्र अथवा मोहाचा डोंगर जरी असला तरी ज्यावेळी कुंडलिनीरूपी ज्ञानशक्ती जागृत होऊन तिचा उदय होईल त्यावेळी त्या कुंडलिनी शक्तीपुढे ह्या सर्व गोष्टी अगदी कःपदार्थ ठरतील. शक्तिपातयोगाने प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचे सामर्थ्य अत्यंत श्रेष्ठ असे आहे. कारण शक्ती जागृत होऊन जेव्हा तिचा सुषुम्नेत प्रवेश होतो तेव्हा वरील सर्व गोष्टी जळून जाऊन साधक ज्ञानाच्या उदयामुळे हळूहळू शुद्धचित्त होत जातो व शेवटी ब्रह्मरूप होतो. जीवाला विश्व आहे असा भ्रम झाला आहे. हा भ्रम म्हणजे ब्रह्माचा कवडश्या सारख्या प्रकाशाप्रमाणे आहे. परंतु ज्यावेळी ज्ञानशक्तीच्या उदयामुळे सर्वत्र प्रकाशचैतन्याचा अनुभव येतो त्यावेळी कडवसा म्हणजे भ्रांतीचे नावही उरत नाही. या ज्ञानापुढे मनाच्या दोषांचे सामर्थ्य शून्य ठरते. खरोखर शक्तिपातयोगाने उदित होणाऱ्या या कुंडलिनीरूप ज्ञानशक्तीच्या सामर्थ्याची दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची तुलना करणे योग्य नाही. या ज्ञानासारखा दुसरा थोर पदार्थच या जगात नाही."

यावरून हे सिद्ध होते की दीक्षा किंवा ज्ञान ही नुसती सांगण्याची किंवा फक्त ऐकण्याची गोष्ट नाही. ज्ञान ही देण्याची वस्तू आहे. याकरिता बोलण्याने, सांगण्याने, प्रवचनाने किंवा तत्सम कोठल्याही कृतीने जीव–साधक–कधीही कृतार्थ होणार नाही. फक्त ज्ञानवस्तू देण्यानेच जीव कृतार्थ होईल. ज्याने अशाप्रकारे ज्ञान दिले आहे व ज्याने ते घेतले आहे तेच हे जाणू शकतील. याकरिता ज्ञान ही सांगण्याऐकण्याची गोष्ट नसून देण्याघेण्याची आहे हे नितांत सत्य आहे. **हृदया हृदय एक जाहले। ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडता केले। आपणा ऐसे अर्जुन॥** असे जेव्हा श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज अर्जुनाच्या दीक्षेचे वर्णन करतात तेव्हा ज्ञान ही देण्याचीच वस्तू आहे याचा पडताळा आल्याशिवाय राहात नाही. त्याचप्रमाणे "**येर कलशींचे येरी। रिचविजे जयापरी। आपणपें तया श्रीहरी। दिधलें तैसें॥ १०. ११४६॥** ज्याप्रमाणे एका कलशातील पाणी दुसऱ्या कलशात ओतावे त्याप्रमाणे भगवंतांनी अर्जुनाच्या अंतःकरणात ज्ञान ओतून आपणच आपल्याला दिले. म्हणजे भगवंत हे ज्ञानस्वरूप असल्याने त्यांनी शक्तिसंक्रमण करून आपली शुद्ध स्वरूपस्थिती अर्जुनाचे अंतःकरणात प्रकट केली.

दीक्षा कशी होते ? :–

तस्य प्रसादयुक्तस्य विद्या वेदान्तवाक्यजा ।
दहत्यविद्यामखिलां तमः सूर्योदये यथा ।।

ज्याप्रमाणे सूर्योदय अंधःकाराला जाळून टाकतो त्याप्रमाणे वेदान्त वाक्यापासून शक्तिपातामुळे उत्पन्न होणारी विद्या, ज्याला मागे कथन केलेला दीक्षाप्रसाद प्राप्त झाला आहे, त्याची सर्व अविद्या जाळून टाकते. असे सामर्थ्य असणारी दीक्षा कशी होते हे पाहाण्यासारखे आहे.

स्पर्श, भाषण, दर्शन व संकल्प या चार प्रकाराने दीक्षा होते. चार प्रकाराने दीक्षा होते हे सांगताना योगवासिष्ठाच्या निर्वाण प्रकरणाच्या पूर्वार्धात असे म्हटले आहे की –

दर्शनात् स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्यदेहके ।
जनयेद्यः समावेशं शांभवं स हि देशिकः ।। १२८-६१ ।।

जे दर्शनाने, स्पर्शाने, शब्दाने व कृपा म्हणजे संकल्प या चार साधनांनी शिष्याच्या देहात ज्ञानाचा समावेश करतात ते साक्षात् शिवस्वरूप गुरू होत असे समजावे. पहिल्या तीन प्रकारातही कृपा हाच आधार असतो.

समर्थांनी मनाच्या श्लोकात या चार प्रकारच्या दीक्षांचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी । जेणे मानसी स्थापिले निश्चयाशी ।
तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे । तया भाषणे नष्ट संदेह मोडे ।। १३३ ।।

गुरू हरिभक्त व विरक्त असून शिष्याला दीक्षेने ज्ञान देण्याची विशेष प्रक्रिया जाणणारे असतात. ते संकल्पाने शिष्याच्या मनात ज्ञानाचा निश्चय शक्तिपाताने स्थापन करतात. दर्शनाने व स्पर्शाने त्यांच्या ठिकाणी दीक्षा देण्याचे सामर्थ्य असल्याने शिष्याला ज्ञानभिक्षारूप पुण्याची प्राप्ती होते. अशा समर्थ सद्गुरूंच्या तत्त्वमस्यादीपकी एखाद्याही महावाक्याने, मंत्राने किंवा नुसत्या कल्याणकारक शब्दाने शिष्याचा संदेह ज्ञानप्राप्तीमुळे दूर होतो.

प्रत्येक दीक्षा कशी होते ते पाहाण्यासारखा आहे.

स्पर्शदीक्षा :–

यथा पक्षी स्वपक्षाभ्यां शिशून् संवर्धयेच्छनैः ।
स्पर्शदीक्षोपदेशस्तु तादृशः कथिते प्रिये ।।

ज्याप्रमाणे पक्षी आपल्या पंखांचा स्पर्श करून आपल्या पिल्लांचे लालन, पालन व वर्धन करतो त्याप्रमाणे स्पर्शदीक्षा असते. जोपर्यंत पिल्लू अंड्याच्या बाहेर येत नाही तोपर्यंत पक्षी अंडे उबवितो व अंड्यातून बाहेर आल्यावर जोपर्यंत पिल्लू लहान असते तोपर्यंत आपल्या पंखाखाली झाकून ठेवतो. याप्रमाणेच गुरू स्पर्शाने शिष्याच्या ठिकाणी सुप्त असलेली शक्ती जागृत करून तिचे संवर्धन करतात. शक्तीचा हळूहळू विकास होऊन शेवटी ती सहस्त्रारापर्यंत जाते. त्यामुळे साधकाला पूर्णावस्था प्राप्त होते. अशा प्रकारे जी दीक्षा होते तिला स्पर्शदीक्षा किंवा स्पर्शद्वारे शक्तिसंचार म्हणतात.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात अर्जुनाला आलिंगन देऊन श्रीकृष्णांनी ज्ञान कसे संक्रमित केले याचे जे वर्णन केले आहे ते स्पर्शदीक्षेचेच वर्णन आहे.

मग सावळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु । अलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ॥ न पवता जयातें । कांखे सूनि बुद्धितें । बोलणें मागौतें । ओसरले ॥ ऐसे जें कांहीं एक । बोला बुद्धीसीही अटक । ते द्यावया मिष । खेवाचें केले ॥ हृदया हृदय एक जाहले । ये हृदयीचें तें हृदयीं घातलें । द्वैत न मोडता केलें । आपणा ऐसे अर्जुना ॥ दीपें दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत मोडता केला । आपणपें पार्थु ॥

श्रीकृष्णांनी कंकणांनी युक्त असा आपला श्यामवर्णाचा उजवा हात पुढे करून आपल्यास शरण आलेल्या भक्तराज अर्जुनाला आलिंगन दिले. स्वस्वरूप हे बुद्धीला व शब्दाला आकलन होत नाही. त्यामुळे तेथे बोलणे खुंटून जाते. ते स्वरूप अर्जुनाला देण्याकरिता देवांनी आलिंगनाचे निमित्त केले. श्रीकृष्णांचे हृदय व अर्जुनाचे हृदय एकमेकांना भिडले. श्रीकृष्णांनी आपल्या हृदयातील ज्ञान अर्जुनाच्या हृदयात घातले. त्यांनी देव व भक्त यारूपाने दिसणारे द्वैत न मोडता अर्जुनाला आपल्यासारखे केले. एका दिव्याने दुसरा दिवा लावल्यावर जसे द्वैत कायम राहून ऐक्य मोडत नाही तसा प्रकार या आलिंगनाचा होऊन द्वैत न मोडता श्रीकृष्णांनी पार्थला आपलेपणा दिला.

ज्ञानेश्वरीच्या ११ व्या अध्यायातही अर्जुनाला स्पर्शदीक्षेने अनुग्रह कसा झाला याचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केले आहे.

ना तरी मधुवनीं ध्रुवासी केले । जैसे कपोल शंखें शिवतलें । आणि वेदांचियेही मतीं ठेले । तें लागला बोलो ॥ १८४ ॥ तैसा अनुग्रहो

पैं राया। श्रीहरी धनंजया। आता कवणेकडेही माया। ऐसी भाष नेणें तो ॥ १८५ ॥

मधुवनात ध्रुव तपश्चर्या करीत होता. त्याला भगवंताची स्तुती करण्याची इच्छा होती. भगवंतांनी ध्रुवाच्या गालाला आपल्या हातातील शंखाचा स्पर्श केल्याबरोबर वेदालाही जे अगम्य होते ते त्याच्या मुखातून आपोआप उमटू लागले. अगदी याचप्रमाणे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला स्पर्शदीक्षानुग्रह दिला. त्यामुळे त्याच्या दृष्टीने मायेची भाषाच नाहीशी झाली.

प्रत्यक्ष डोक्यावर हात ठेवून श्रीनिवृत्तीनाथांनी आपल्याला स्पर्श दीक्षा देऊन ज्ञानाचे बीज आपल्या ठिकाणी कसे रुजविले याचे वर्णन ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केले आहे.

ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूंनी केले कोडें।
माथां हात ठेविला तें फुडे। बीजचि वाईलें ॥ ४९२ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की मी बीज पेरण्याचे चाडे आहे. श्रीनिवृत्तीनाथांनी असे काही नवल केले की त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवून शक्तिपातयोगाच्या द्वारा ज्ञानाचे बीज माझ्या ठिकाणी घातले. ज्ञान ही देण्याची व घेण्याची वस्तू असल्याने श्रीसद्गुरू ती शक्तिपाताने देतात व शिष्य ती स्वीकारतो. ज्याप्रमाणे चाडयातून पेरलेले बी **" सुक्षेत्रे आणि वोलटे। बीजही पेरिले गोमटें। तरी आलोट फळ भेटे। परि वेळे कीं गा ॥ १८. ९९९ ॥** या न्यायाने फळ देते त्याप्रमाणे सद्गुरूंच्या कृपेने मूलाधारस्थ कुंडलिनी शक्ती जागृत होऊन मलविक्षेपआवरणादी सर्व दोषांचे भस्म होते. **" तिये ब्रह्मी ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें। तें क्रमेंचि करून तेणें। पाविजे पै ॥ १८. १००६ ॥** अशी स्थिती साधकाला क्रमाक्रमाने प्रयत्न करून प्राप्त होते.

आता सद्गुरूंच्या केवळ दर्शनाने दृग्दीक्षा कशी होते ते पाहू.

दृग्दीक्षा :–

स्वापत्यानि यथा मत्स्यो वीक्षणेनैव पोषयेत्।
दृग्भ्यां दीक्षोपदेशश्च तादृशः परमेश्वरि ॥

" हे पार्वती मासा ज्या माणे आपल्या अपत्यांचे पालन केवळ प्रेमळ दृष्टीने करतो त्याप्रमाणे गुरूच्या प्रेमळ कृपाकटाक्षाने शिष्यामध्ये-शक्तिसंचार होऊन शिष्य कृतार्थ होतो. "

संत हे साधकांच्या बाबतीत अत्यंत प्रेमळ व श्रीमंत असतात. **" कां जे लळेयाचे लळे सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती "** ॥ ९–३ ॥ असे श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे साधकाला त्याने जी जी आळ घ्यावी किंवा जे जे मनोरथ करावे ती ती इच्छा व ते ते त्यांचे मनोरथ सहज पूर्ण होतात, म्हणून त्यांना प्रेमळ म्हटले जाते. त्याचप्रमाणे **" परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ॥ "** असे श्रीसंत तुकारामहाराजांनी म्हटल्याप्रमाणे परमात्मस्वरूपाची प्राप्ती करून देत असल्यामुळे त्यांना श्रीमंत म्हटले जाते. श्रीसंत निवृत्तीमहाराजांनी दृग्-दीक्षा देऊन आपल्याला कृतार्थ कसे केले हे वर्णन करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, **तुमचेया दिठिवेयाचिये वोलें । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे । ते साउली देखोनि लोळे । श्रांत जी मी ॥ ९.४ ॥ कां जें दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकाळार्थसिद्धिमती पिके । येन्हवीं कोंभेला उन्मेष सुके । जरी उदास तुम्ही ॥ ९. २५ ॥**

श्रीगुरुमहाराजांच्या कृपादृष्टीच्या ओलाव्यामुळे माझ्या अंतः-करणात प्रसन्नतेचे हिरवेगार मळे भरास आले. मी संसारतापाने अगदी पोळून गेलो होतो. परंतु त्यांची दृग्दीक्षा प्राप्त झाल्याबरोबर मी त्या कृपेच्या सावलीत अगदी आनंदाने लोळत आहे. कारण जेव्हा गुरूच्या कृपादृष्टीचा म्हणजे दृग्दीक्षेचा साधकावर वर्षाव होतो तेव्हा सर्व शब्दांचे अर्थ खरोखरी कोणते आहेत याची सम्यक् दृष्टी साधकाच्या बुद्धीमध्ये उत्पन्न होते. या दीक्षेमुळे शब्दांचे ब्रह्मज्ञानार्थ प्रतिपादक अर्थ कसे आहेत हे समजणारी बुद्धी उत्पन्न होऊन पक्व होते. मात्र अशी दृग्दीक्षा साधकाला मिळाली नाही तर ज्ञानाचा फुटलेला अंकुरही सुकून जातो.

ज्ञानेश्वरीच्या १० व्या अध्यायात या दृग्दीक्षेचा महिमा वर्णन करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की **" हें असो दिठी जया-वरी झळके । तो जीवचि परि तुके । महेशेसीं ॥ १०-९ ॥ "** सद्गुरु-रायांची दृष्टी ज्या वेळी साधकांवर झळकते त्यावेळी साधकाच्या जीवस्थितीचा भंग होऊन त्याची योग्यता शिवाइतकी होते. म्हणजे दृग्दीक्षेच्या प्रभावाने जीव शिव होतो.

दृग्दीक्षेचा प्रभाव अपार आहे. डोळ्यांचे सामर्थ्य कल्पनातीत आहे. अर्जुनाला ते जाणवले. तो म्हणतो–

" जी आनंदसरोवरीची कमळें । तैसे जे हे तुझे डोळे ।
आपुलिया प्रसादाचीं राउळें । जयालागी करिती ॥ ११.६५ ॥

अर्जुन म्हणाला, "हे श्रीकृष्णा ! आनंदसरोवरातील कमळाप्रमाणे तुझे डोळे आहेत. किती विशाल. किती सुंदर. ज्यावेळी तुझ्या नेत्रातून कृपेची किरणे साधकांवर पडतात त्यावेळी जन्मजन्मांतरीच्या अज्ञानाचा नाश होऊन ज्ञानाचा प्रसाद प्राप्त होतो. या ज्ञानप्रसादरूप मंदिरात साधक आनंदाने सुखाची राणीव भोगतो. दृग्दीक्षेमुळेच साधकाला आनंदाचे साम्राज्य प्राप्त होते."

सद्गुरूंच्या या दृग्दीक्षेचा अद्भुत महिमा श्रीसंत ज्ञानेश्वर-महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायात फारच बहारदारपणे वर्णन केला आहे.

जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ॥ १२.१ ॥ विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी । ते तुझिये कृपा-दृष्टी । निर्विष होय ॥ २ ॥ तरी कवणाते ताप पोळी । कैसेनि वो शोक जाळी । जरी प्रसादरसकल्लोळीं । पुरें येसी तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे । सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ॥ ४ ॥ आधार शक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं । हृदयाकाशपालखीं । परिये देसी निजें ॥ ५ ॥ प्रत्यक्ज्योतीची ओवाळणी । करिसी मनपवनाची खेळणीं । आत्मसुखाची बाळलेणीं । लेववसी ॥ ६ ॥ सतराविधेचें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाउनी ॥ ७ ॥ म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं । याकारणें मी साउली । न संडी तुझी ॥ ८ ॥ अहो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझे कारुण्य जयातें अधिष्ठी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥ ९ ॥

"हे गुरुकृपादृष्टी माते ! तुझा जयजयकार असो. तू शुद्ध आहेस. तू अत्यंत उदार म्हणून प्रसिद्ध आहेस. तू अखंड आनंदस्वरूप किंवा प्रेमरूप असून शिष्याचे ठिकाणी अखंड परमानंदाचा वर्षाव करणारी किंवा प्रेमाची प्राप्ती करून देणारी आहेस. विषयरूपी भयंकर सर्पाने जीवाला मिठी मारून वेढून टाकल्यामुळे त्याला आत्मविस्मृतीरूप मूर्च्छा येते. ती कशानेही नाहीशी होत नाही. पण ज्यावेळी श्रीगुरू दृग्दीक्षा देतात तेव्हा त्यांच्या कृपादृष्टीनेच विषयरूपी सर्पाचे विष उतरून ती मूर्च्छा नाहीशी होते. या दृग्दीक्षेचा महिमा अपार आहे. ज्यावेळी सद्गुरूच्या अंतःकरणात साधकाच्याविषयी कृपाप्रेमाचा पूर येऊन त्याच्या लाटा उसळू लागतात तेव्हा हे कृपाप्रेम दृष्टिद्वारा स्रवून शिष्याच्या ठिकाणी संक्रांत होते. त्यावेळी संसारातील त्रिविध तापाने पोळणारा साधक

शांत होऊन जातो. प्रियवस्तूचा वियोग व अप्रियवस्तूचा संयोग यांच्या विषयीचा शोक त्याला जाळू शकत नाही."

"ही दृग्दीक्षा साधकाला मिळाली की साधकाला कोणत्याही प्रकारचे सायास न करता योगसुखाचे सोहळे भोगावयास मिळतात. ही दीक्षा झाल्या बरोबर साधकाची कुंडलिनी शक्ती जागृत होऊन ती साधकाला अत्यंत प्रेमाने व सहजतेने योगाचा आनंद भोगवीत उन्नती पथावर नेत असते. शेवटी मी ब्रह्म व्हावे अशी जी साधकाची इच्छा असते तीही या दीक्षेमुळे पूर्ण होते. या दीक्षेमुळे मूलाधारातील कुंडलिनी शक्ती जागृत होते. ती मोठ्या लीलेने व कौतुकाने सुषुम्णामार्गात प्रवेश करून साधकाला वर नेते. वर जाताना षटचक्रांचा वेध होत जेव्हा शक्ती जाते तेव्हा ती आज्ञाचक्रामध्ये म्हणजे हृदयाकाशात येते. तेथे साधकाला आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. जणू काही या हृदयाकाशरूपी पाळण्यात साधकाला आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाच्या ऐक्याचे झोकेच मिळतात. या दीक्षेमुळेच स्थलकालापलीकडील आत्मतत्त्वरूप ज्योतीची ओवाळणी मिळते. म्हणजे देहापासून बुद्धीपर्यंत जेवढी सूक्ष्म तत्त्वे आहेत त्या सर्वांच्या अंतर्यामी राहाणाऱ्या चैतन्याची या दीक्षेमुळेच प्राप्ती होते. मन व प्राण या दोन्ही अवघड गोष्टी दीक्षाप्रसादामुळे खेळण्याप्रमाणे स्वाधीन होऊन राहातात. बाळाला आईने अलंकार घालावेत त्याप्रमाणे आत्मसुखाचा अलंकार या दीक्षासाधनामुळे अनायासे प्राप्त होतो. शक्ती ऊर्ध्वगामिनी होऊन सहस्रारात गेली की साधकाला व्योमचक्रातील चंद्रामृताच्या संतराव्या कलेचे दूध मिळते. तेथेच शिवशक्तीचे एक्य घडून येते. हे होत असताना नाना तऱ्हेचे अनाहत ध्वनी साधकाला ऐकू येतात. अनाहतनादामध्ये जेव्हा मनाचा लय होतो तेव्हा साधक नामरूपातीत होऊन त्याला समाधी सुख प्राप्त होते. साधक या समाधी बोधामुळे जणू काही स्वरूपात निद्रा घेत पहुडतो. म्हणून हे गुरुकृपादृष्टे तुझ्यामुळे जे साधन प्राप्त होते त्यामुळे तू साधकांची सतत कृपादृष्टीने सांभाळ करणारी आई आहेस. या दीक्षासाधनामुळेच सर्व प्रकारच्या विद्या साधकाला प्राप्त होतात. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, की मी दृग्दीक्षा साधनाची कृपारूप सावली कधीही सोडणार नाही. हे सदगुरूचे कृपादृष्टी! तुझ्या कृपेचा आश्रय ज्याला मिळेल तो सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणे नाना विद्यांची सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव होतो."

शब्ददीक्षा :–

सद्गुरूंच्या शब्दाबरोबर शक्ती संक्रमित होऊन शिष्याच्या

ठिकाणी आपण ब्रह्म आहोत असा भाव जेव्हा उदित होतो तेव्हा शब्ददीक्षा घडून येते.

कावळ्यांच्यामध्ये पाळलेले कोकिळेचे पिल्लू कोकिळेचा शब्द ऐकताच मी कावळा नसून कोकीळ आहे असे ओळखते. त्याप्रमाणे 'तू ब्रह्म आहेस' असे सदगुरू म्हणताच शिष्याच्या ठिकाणी तो भाव उदित होऊन त्यास तसा अनुभव येतो तेव्हा त्याला शब्ददीक्षा म्हणतात–

या शब्दीक्षेचे व तिच्या सामर्थ्याचे वर्णन करताना ज्ञानेश्वरीच्या ४ थ्या अध्यायात श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

जयाचेनि वाक्य उजिवडें। जाहले चित्त निधडें। ब्रह्माचेनि पाडें। निःशंक होय ॥ १६९ ॥ तें वेळीं आपणपेयां सहिते। इयें अशेषेंहि भूतें। माझ्या स्वरूपीं अखंडितें। देखसी तूं ॥ १७० ॥ ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहांधकार जाईल। जैं गुरुकृपा होईल। पार्था गा ॥ १७१ ॥

ज्यावेळी सदगुरू शिष्याला तू ब्रह्म आहेस असे सांगतात त्यावेळी अशेष अज्ञान नाहीसे होऊन शिष्याच्या ठिकाणी ज्ञानाचा उजेड उत्पन्न होतो.त्यामुळे त्याचे चित्त निर्भय होते व निःसंशयपणे तो ब्रह्माच्या योग्यतेस जाऊन पोहोचतो. ही शब्ददीक्षा झाली की तत्काळ ब्रह्मज्ञान उत्पन्न होऊन साधक आपल्यासह सर्व जग भगवत्स्वरूप आहे असे पाहू लागतो. त्याची द्वैताची जाणीव नाहीशी होते. अशा रीतीने जेव्हा शब्ददीक्षारूप गुरुकृपा होते तेव्हा शक्तिसंक्रमण होऊन मलविक्षेपआवरणादी सर्व दोष जळून जाऊन साधकाच्या अंतःकरणात ज्ञानप्रकाशाचा उदय होऊन मोहरूपी अंधकार पूर्णपणे नाहीसा होतो.

सातव्या अध्यायातही श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी शब्ददीक्षेची अपूर्वता अलौकिकपणे वर्णन केली आहे.

जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें। जिये नानार्थरसें रसाळें। बहकतें आहाति परिमळें। भावाचेनि ॥ १८६ ॥ सहज कृपामंदानिळें। श्रीकृष्णद्रुमाचीं वचनफळें। अर्जुनश्रवणाचिये खोळे। अवचिति पडिलीं ॥ १८७ ॥ तियें प्रमेयाचीं हो कां वळलीं। कीं ब्रह्मरसाच्या सागरीं चुबुकळिलीं। मग तैसींच कां धोळिलीं। परमानंदे ॥ १८८ ॥ तेणें बरवेपणें निर्मळें। अर्जुना उन्मेषाचे डोहाळे। घेताति गळाळे। विस्मयामृताचे ॥ १८९ ॥ तिया सुखसंपत्ति जोडलिया। मग स्वर्गा वाये वांकुलिया। हृदयाच्या जीवीं गुतकुलिया। होत आहाती ॥ १९० ॥ ऐसे वरचिलीचि बरवा। सुख जावों लागलें फावा। तंव रसस्वादाचिया हांवा। लाहो केला ॥ १९१ ॥

कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचे रश्मी अभ्यंतरें। पाहेना तंव चमत्कारें। अवधान ठाकलें ॥ २०० ॥

"भगवंताचे बोलण्यात तद्ब्रह्म इत्यादी ब्रह्मप्रतिपादक वाक्ये आली. त्या वाक्यांचे सामर्थ्य अद्भुत व अपार होते. ती वाक्ये ब्रह्मप्रतिपादक अशा नानाअर्थरूपरसाने भरलेली होती. कारण भगवंताच्या मुखातून जी जी वाक्ये निघत होती ती शक्तिसहित संक्रमित होत असल्याने अर्जुनाच्या अंतःकरणात त्यामुळे भक्तिप्रेमाचा सुगंध दरवळू लागला. भगवंताची अर्जुनावर असलेली स्वाभाविक कृपा हाच मंदवायू होता. त्या मंदवायूने श्रीकृष्णरूप वृक्षाची वचनरूपफळे अर्जुनाच्या श्रवणरूप झोळीत अकस्मात पाडली. म्हणजे श्रीकृष्णांच्या कृपेमुळे अर्जुनाला शब्ददीक्षा मिळून तो कृतार्थ झाला. ती वाक्यरूपी फळे सिद्धांताचीच बनली होती व ब्रह्मरसाच्या समुद्रात बुडविली होती. त्याचप्रमाणे ती परमानंदात घोळली होती. अशी त्या शुद्ध व उत्कृष्ट वाक्यांनी अर्जुनाच्या अंतःकरणाचा वेध घेतला. त्याबरोबर त्याच्या ठिकणी "मी ब्रह्म आहे" असे ज्ञान उत्पन्न झाले. इतकेच नव्हे तर या शब्ददीक्षेमुळे अर्जुनाला अनेक दिव्य दिव्य अनुभव येऊ लागल्यामुळे तो विस्मयामृताच्या डोहामध्ये बुडून गेला. अशा दिव्य अनुभवांच्या रसाळ स्वादाच्या सुखाने अर्जुन संपन्न झाल्यामुळे त्याला स्वर्गसुख तुच्छ वाटू लागले. शब्ददीक्षेमुळे जे अपूर्व अनुभव अर्जुनाला आले त्यामुळे त्याच्या हृदयात गुदगुल्या होऊ लागल्या. अशा रीतीने भगवंताच्या तोंडून निघालेल्या शब्दांमुळे अगदी सुरवातीलाच वरवर पाहाता पाहाता अर्जुनाच्या मनात सुख उचंबळून आले. परंतु या वरवरच्या सुखकारक अनुभवांचा जो ब्रह्मरूप शेवट, त्या ब्रह्मरसाचा स्वाद घेण्याची त्याला उत्कट इच्छा झाली. ती त्याची इच्छा पूर्ण झाली कारण श्रीकृष्णांच्या मुखातून निघालेल्या शब्दांचे सामर्थ्य इतके अपूर्व होते की विस्मयालाही विस्मय वाटला. अर्जुनाच्या कानाच्या झरोक्यातून श्रीकृष्णांच्या शब्दांचे किरण हृदयाच्या आत गेल्याबरोबर त्याला दिव्य अनुभव आल्यामुळे त्याचे मन आश्चर्यचकित झाले व शेवटी तो ब्रह्मरूप होऊन गेला."

शब्ददीक्षेने हृदयात मूलतःच असलेले ज्ञान कसे प्रकट होते हे सांगताना ९ व्या अध्यायात श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.—

मोटकें गुरूमुखे उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असें।
प्रत्यक्ष फावों लागे तैसें। आपैसयाचि ॥ ४९ ॥

अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि इत्यादी अगदी थोडया शब्दांनी गुरू शिष्याला उपदेश देतात. हा उपदेश मिळाल्याबरोबर शक्तिपात होऊन शिष्याच्या ठिकाणी आत्मज्ञानाचा उदय होतो. वास्तविक आत्मज्ञान हे जीवाच्या ठिकाणी मूळचेच असते. ते अज्ञानाने म्हणजेच मलविक्षेप-आवरणादी दोषांनी झाकलेले असते. जेव्हा वरील वाक्ये शक्तिसहित संक्रमित होतात तेव्हा उक्त दोष जळून जाऊन आत्मज्ञान विलसू लागते. हा अनुभव शिष्याला या शक्तिपातयोगाच्या अलौकिक सामर्थ्यामुळे आपोआप येतो. त्याला कोणतेही सायास स्वतःहून करावे लागत नाहीत. मी मूळचाच " **सर्वदुःख विनिर्मुक्तैकचैतन्यात्मकोऽहमित्येष आत्मानुभवः** (ब्र. सू. ४-१-२) सर्वदुःखरहित केवळ ज्ञानमात्र चैतन्यस्वरूप आहे असा अनुभव येऊन " **कोणाचे कांहीं न घेसी । आपुलेही तैसेंचि न देसी ॥ ६ ॥** (अमृतानुभव प्र. ९) गुरूने माझे काही घेतले नाही किंवा आपले काही दिलेही नाही असा आपोआप प्रत्यय येऊन शिष्य कृतार्थ होतो.

ज्ञानेश्वरीच्या १० अध्यायातही शब्ददीक्षेची महिती आढळून येते.

जी आपुलिया स्नेहाची वागीश्वरी । जरी मुकेयातें अंगिकारी । तो वाचस्पतीसीं करी । प्रबंध होडा ॥ ८ ॥ तरी ऐकें ऐकें गा सुवर्म । वाक्य माझें परम । जे अक्षरें लेऊनि परब्रह्म । तुज खेंवासि आले ॥६२॥ पैं गुरूशिष्याचिया एकांतीं । जे अक्षरा एकाचि वदंती । ते मेघाचिया परी त्रिजगती । गर्जती सैंघ ॥ १२६ ॥ आजि आयुष्या उजवण जाहाली । माझिया दैवा दशा उदयली । जे वाक्यकृपा लाधली । दैविकेनि मुखे ॥ १४७ ॥ आतां येणे वचनतेजाकारें । फिटलें आंतील बाहेरील अंधारें । म्हणोनि देखतसे साचोकारें । स्वरूप तुझे ॥ १४८ ॥ ते आतां वाक्यसूर्य-कर तुझे फाकले । आणि ऋषींनी मार्ग होते जे कथिले । तयां आघव-यांचेंचि फिटलें । अनोळखपण ॥ १६३ ॥ तुझे वाक्य व्यक्ती न येतां देवा । आपुलिया जाणे जाणिवा । तो कहींचि नोहे हे मद्भावा । भरंवसेनि आले ॥ १७५ ॥ जयाचि गोठीचि ऐकतखेवों । आघवा संसार होय वावो । बळिया नित्यता लागे येवो । आपणपेयां ॥ १९७ ॥ जन्म-मृत्युची भाख । हारपोनि जाय निःशेख । आत बाहेरि महासुख । वाढोचि लागे ॥ १९८ ॥ मग दैवगत्या जरि सेविजे । तरी तें आपणचि होऊनि ठाकिजें । तें तुज देतां चित्त माझें । पुरे म्हणों न शके ॥ १९९ ॥

" सद्गुरूंचे प्रेम हीच कोणी सरस्वती होय. ज्यावेळी शब्द प्रेमाने

थबथबून श्रीगुरूंच्या मुखातून स्रवतात तेव्हा शक्तीचे संक्रमण होऊन शिष्याच्या ठिकाणी अलौकिक सामर्थ्य उत्पन्न होते **अनधीतस्य शास्त्रस्य स्वत एव प्रकाशनम्** । असे या शब्ददीक्षेने घडून येत असल्यामुळे शक्तिपात-योग सामर्थ्यामुळे सद्गुरूंच्या प्रेममय शब्दांनी मुक्याचा अंगीकार केला तर तो बृहस्पतीशी देखील ग्रंथरचनेत प्रतिज्ञेने पैज लावू शकेल अशी स्थिती उत्पन्न होते.

शब्ददीक्षेचे सामर्थ्यच अलौकिक आहे. त्यामुळे श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, माझे हे शक्तीने संपुटित झालेले वाक्य ऐक. माझे हे वाक्य साधेसुधे नसून अक्षररूपाने साक्षात् परब्रह्मच तुला आलिंगन देण्यास आले आहे. सद्गुरू शिष्याला एकांतात शब्ददीक्षा एखाद्या नाममंत्राने किंवा तत्त्वमत्स्यादी महावाक्याचा आश्रय करून देतात त्या एका शब्दाने शिष्याची कुंडलिनी शक्ती जागृत होऊन शरीरस्थ त्रिजगतात मेघाच्या गर्जनेप्रमाणे अनाहत नादाची नानाप्रकारे गर्जना होऊ लागते. शक्तीचे चालन झाले की ब्रह्मग्रंथी, विष्णूग्रंथी व रुद्रग्रंथींचे भेदन होते. शरीरस्थ त्रिजगतात ज्ञानरूपा गौरी (माहेश्वरी) शक्ती, इच्छारूपी ब्राह्मीशक्ती व क्रियारूपा वैष्णवीशक्ती किंवा लक्ष्मी यांचा निवास असतो. मूलाधा-रापासून नाभीचक्रापर्यंत इच्छाशक्तिरूप ब्राह्मीशक्तीचे स्थान आहे. हिलाच अधःशक्ती म्हटले जाते. नाभीपासून कंठचक्रापर्यंत क्रियाशक्ति-रूप विष्णुशक्तीचे स्थान आहे. या वैष्णवीशक्तीलाच मध्यशक्ती म्हणतात. कंठचक्रापासून आज्ञाचक्रापर्यंत ज्ञानशक्तिरूप शिवशक्तीचे स्थान आहे. हिला ऊर्ध्वशक्ती म्हणतात. याच्यापुढे निरंजन निर्गुण ब्रह्माचे स्थान आहे. या तीनही ग्रंथींचा भेद करून शक्ती ऊर्ध्वगामिनी झाली की तीनही शक्तींना आपल्यामध्ये सामावून ती ब्रह्मरंध्रामध्ये स्थिर होते. त्यावेळी साधक नामरूपातीत अशा निरंजन पदाची प्राप्ती करून घेतो. असा शब्ददीक्षेचा महिमा अपूर्व आहे."

अर्जुन म्हणाला, "हे प्रभो ! श्रीकृष्णा ! ! आपण शब्ददीक्षेने माझ्या-वर जो शक्तिपातयोगानुग्रह केला त्यामुळे माझ्या आयुष्याची सफलता झाली व माझ्या दैवाच्या भाग्यदशेस प्रारंभ झाला. इतकेच नव्हेतर हे प्रभो ! या वचनाच्या अर्थरूप ज्ञानप्रकाशाने माझा आतील व बाहेरील अज्ञान अंधकार नाहीसा झाला. त्यामुळे आता तुझे खरे स्वरूप मी पाहात आहे. तुझे वाक्यरूपी सूर्यकिरण माझ्या अंतःकरणात फाकल्या-मुळे पूर्वी ऋषींनी जे मार्ग सांगून ठेवले आहेत त्या सर्वांची, आज शब्ददीक्षेमुळे जे ज्ञान उत्पन्न झाले, त्यामुळे ओळख पटली. म्हणजे त्यांनी

जे तुझ्या स्वरूपाचे पूर्ण ब्रह्मत्त्व म्हणून वर्णन केले होते ते सर्व यथार्थ आहे याचा आज मला अनुभव आला. अशा प्रकारे शब्ददीक्षा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हे प्रभो तुझ्या वचनाचा यथार्थ व स्पष्ट बोध होत नाही. कारण शब्ददीक्षेने शक्तिपात होऊन दिव्यचक्षूंचे उन्मीलन झाल्याशिवाय आपल्या बुद्धीनेच जाणण्याचा एखाद्याने कितीही प्रयत्न केला, तरी त्याला त्यांचा यथार्थ बोध होणे कधीही शक्य नाही, हे मला निश्चित कळून आले आहे. या शब्ददीक्षारूप परमामृताचे जो पान करतो त्याचा सर्व संसार खोटा ठरतो व आपला विनाशीपणा जाऊन बळेच आपोआप आपल्या ठिकाणी नित्यता धर्म येतो. शब्ददीक्षेमुळे जन्ममरणाची भाषा निःशेष नाहीशी होते व आतबाहेर परमसुख वाढू लागते. सुदैवाने या शब्ददीक्षारूप परमामृताचे सेवन झाले असता तो साधक परमामृत स्वरूप होऊन जातो. असे हे परमामृत तू मला पाजीत असताना माझे चित्त पूरे म्हणू शकत नाही.

ज्ञानेश्वरीतील ११ व्या अध्यायातही शब्ददीक्षेचे वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे.

म्हणोनि तो देवांचा रावो । म्हणे पार्थातें तुज दृष्टि देवों । जया विश्वरूपाचा ठावो । देखसी तू ॥ १७६ ॥ ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें । निघती ना जंव एकसरें । तंव अविद्येचे आंधारे । जावोचि लागे ॥ १७७ ॥ तीं अक्षरें नव्हती देखा । ब्रह्मसाम्राज्यदीपिका । अर्जुनालागीं चित्कळिका । उजळलिया श्रीकृष्णें ॥ १७८ ॥ मग दिव्यचक्षुप्रकाश जाहाला । तया ज्ञानदृष्टी फांटा फुटला । ययापरी दाविता जाहला । ऐश्वर्य आपुलें ॥ १७९ ॥

तो देवांचाही देव भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, "ज्या दृष्टीने माझ्या विश्वरूपाचे दर्शन तुला घेता येईल अशी दृष्टी मी तुला देतो. श्रीकृष्णाच्या मुखातून अशी अक्षरे निघाल्याबरोबर शक्तिसंक्रमण होऊन एकदम अविद्यारूपी अंधःकार नाहीसा झाला. भगवंताच्या मुखातून "मी तुला दिव्यदृष्टी देतो" ही जी अक्षरे निघाली ती साधीसुधी अक्षरे नव्हती. त्या शब्दांच्या ठिकाणी अपूर्व सामर्थ्य होते. ती अक्षरे म्हणजे ब्रह्मस्वरूपाचे साम्राज्य दाखविणारी ज्योती होती. ती ज्ञानज्योती शब्ददीक्षा देऊन अर्जुनाकरिता भगवंतांनी उजळली होती. या शब्ददीक्षेमुळे अर्जुनाचा अज्ञानांधःकार नाहीसा होऊन चैतन्याचा प्रकाश सर्वत्र पसरला. त्यामुळे ज्ञानदृष्टी प्राप्त होऊन अद्वैत स्थिती अर्जुनाला प्राप्त झाली. ही स्थिती प्राप्त होण्यापूर्वी शब्दाच्या द्वाराने जी शक्तिपातदीक्षा झाली होती त्यामुळे त्याला नाना तऱ्हेचे दिव्य अनुभव प्राप्त झाले.

भगवंतांनी अर्जुनाला जे विश्वरूप ऐश्वर्य दाखविले ते सर्व दिव्य अनुभवाच्या रूपांनी शब्ददीक्षा देऊन दाखविले.

अठराव्या अध्यायातही शब्ददीक्षेची अपूर्वता वर्णन करताना म्हटले आहे की –

तैसें जया कोण्हासी दैवें । गुरुवाक्यश्रवणाचिसवें । द्वैत गिळोनि विसवें । आपणया वृत्ति ॥ ९८८ ॥ कानावचनाचिये भेटी । सरिसाचि पैं किरींटी । वस्तु होऊनि उठी । कवणि एकु जो ॥ ९८९ ॥

ज्यावेळी दैवयोगाने सद्गुरूची प्राप्ती होऊन साधकाला शब्ददीक्षा मिळते तेव्हा गुरुवाक्यश्रवणाबरोबर भेदाचा सर्वार्थाने नाश होऊन तो आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होतो. अर्जुना जो साधक तीव्र अधिकारी असेल त्याला जेव्हा शब्ददीक्षा होते तेव्हा श्रीगुरूच्या उपदेशरूप वचनाची म्हणजे तत्त्वमत्स्यादी महावाक्याची व त्याच्या कानाची गाठ पडल्याबरोबर तो ब्रह्मरूप होतो.

ध्यानदीक्षा :– (कृपा किंवा पत्रदीक्षा)

यथा कूर्मः स्वतनयान्ध्यानमात्रेण पोषयेत् ।
वेधदीक्षोपदेशश्च मानुषस्य तथाविधः ।।

ज्याप्रमाणे कासवी केवळ मनाने चिंतन करून भूमीच्या खाली ठेवलेली अंडी उबवून पिल्लांना वाढविते व पोषण करते त्याप्रमाणे केवळ संकल्पाने गुरू शिष्याची शक्ती जागृत करून शक्तिसंचार करतात. या प्रकाराने जी वेधदीक्षा किंवा शक्तिसंचार होतो त्याला मानसदीक्षा असेही म्हणतात.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात कृपादीक्षेच्या सामर्थ्याचे पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

ते बुद्धीही आकळीतां सांकडें । म्हणऊनि बोलीं विपायें सांपडे । परी श्रीनिवृत्तिकृपादीपउजियेडें । देखेन मी ॥ ३२ ॥ जें दिठीही न पविजे । तें दिठीवीण देखिजे । जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ॥ ३३ ॥ नातरी जें धातुवादाही न जोडे । ते लोहींचि पंधरें सांपडे । जरी दैवयोगें चढे । परिस हातां ॥ ३४ ॥ तैसी सद्गुरुकृपा होये । तरी करितां काय आपु नोहे ।

परब्रह्म हे बुद्धीला आकलन करणे कठीण आहे. त्यामुळे शब्दाने त्याचे क्वचितच वर्णन करता येते. असे जरी असले तरी श्रीनिवृत्तीनाथ सद्गुरूंची कृपादीक्षा झाल्यावर त्या कृपारूप दिव्याच्या प्रकाशात मी ते परब्रह्म पाहीन असे श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. ज्यावेळी अशी

ध्यानकृपादीक्षा मिळते त्यावेळी शक्तिपातामुळे इंद्रियातीत असे ब्रह्मज्ञान प्राप्त होते. ते जर प्राप्त झाले तर इंद्रिय दृष्टीलाही जे दिसू शकत नाही ते इंद्रियावाचूनही पाहता येते. किमयेने लोखंडाचे जातिवंत सोने होऊ शकत नाही. पण दैवाने परिस हाती आला तर त्या परिसाने मात्र धातूचे जातिवंत सोने होऊ शकते. त्याप्रमाणे श्रीसद्गुरूची कृपादीक्षा झाल्यावर जर प्रयत्न केला तर काय काय साध्य होणार नाही ?

श्रीकृष्णांनी कृपादीक्षा देऊन अर्जुनाला संसारसागरातून कसे तारले याचे वर्णन ११ व्या अध्यायात श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

मग पार्थ म्हणे देवाते । जी तुम्ही मजकारणें । वाच्य केलें जें न बोलणें । कृपानिधे ॥ ४४ ॥ जैं महाभूतें ब्रह्मीं आटती । जीवमहदादिचे ठाय फिटती । तैं जें देव होऊनि ठाकती । तें विसवणे शेषींचें ॥ ४५ ॥ होतें हृदयाचिये परिवरी । ठेविलें कृपणाचिये परी । शब्दब्रह्मासिही चोरी । जयाची केली ॥ ४६ ॥ तें तुम्ही आजि आपुलें । मजपुढां हियें फोडिलें । जया अध्यात्मा वोंवाळिलें । ऐश्वर्य हरें ॥ ४७ ॥ ते वस्तु मज स्वामी । एकीहेळा दिधली तुम्ही । हें बोलों तरी आम्ही । तुजपासोनि भिन्न कैंचे ॥ ४८ ॥ परि साचचि महामोहाचिये पुरीं । बुडिलिया देखोनि सीसवरी । तुवां आपणपें घालोनि श्रीहरी । मग काढिलें मातें ॥ ४९ ॥ आणि मी तंव दातारा । ये कृपेचिये रिघोनि गाभारां । घेत आहें चारा । ब्रह्मरसाचा ॥ ६७ ॥

मग अर्जुन म्हणाला, " देवा ! तुम्ही कृपासागर आहात. त्यामुळे कृपादीक्षा देऊन जे परब्रह्म बोलून दाखविले जात नाही ते तुम्ही मला प्रत्यक्षात आणून दिले. जेव्हा ही संपूर्ण महाभूते परब्रह्मात लय पावतात व जीवरूप पराप्रकृती व महदादिरूप अपराप्रकृती यांचे नावही राहात नाही तेव्हा तुम्ही परब्रह्मस्वरूपात स्थिर होऊन राहाता. हेच कुंडलिनीरूप शेषशक्तीचे खरे विश्रांतीस्थान आहे. हे स्थान सहस्रारात आहे. तेच खरे हृदयमंदिर आहे. त्याठिकाणी हे परब्रह्म एखाद्या कृपण मनुष्याप्रमाणे लपवून ठेवले आहे. शब्दब्रह्मापासून म्हणजे वेदापासूनही ते चोरून ठेवले आहे. याचा अर्थच असा आहे की वेद सुद्धा त्या स्वरूपाला जाणू शकत नाहीत. परंतु तुम्ही ते आत्मस्वरूप हृदय उघडे करून कृपेने मला दाखविले. त्यामुळे मी धन्य झालो. या अध्यात्मस्वरूपावरून शंकराने कैलासाचे राज्य ओवाळून टाकून स्मशानात वास केला. हे प्रभो ! ती अध्यात्मवस्तू, ते ज्ञान, तुम्ही मला एकदम दिले. वास्तविक दिले व

घेतले ही भाषा खरी नाही. आम्ही तुझ्यापासून निराळे नसल्यामुळे ही स्वभावतःच होण्याघडण्याची गोष्ट आहे. पण खरोखरच मी या संरसारूपी महामोहाच्या पुरात डोक्यापर्यंत बुडालो आहे, हे पाहून, देवा ! आपण स्वतः त्यात उडी टाकून मला बाहेर काढले. ही खरी कृपादीक्षा आहे. आपण कृपासागरच आहात. मी तर तुमच्या कृपेच्या गाभाऱ्यात बसून ब्रह्मानंदाचा स्वाद घेत आहे.

गीतेच्या १८ व्या अध्ययातही ही कृपादीक्षा कशी अपूर्व आहे हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

ते सत्त्वशुद्धि साहाकारें । गुरुकृपामृत तुषारें । सासिन्नलेनि बोधें बोसरे । द्वैतदैन्य ॥ २५९ ॥ म्हणौनि धनंजया । तूं संसारदुर्गती इया । तरसील माझिया । प्रसादास्तव ॥ १२७३ ॥

"साधकाला शुद्ध सत्त्वाच्या साहय्याने गुरुकृपारूपी अमृताच्या तुषारांचा लाभ कृपादीक्षेने झाल्यामुळे जो आत्मबोध होतो त्यामुळे त्याचे द्वैताचे दैन्य नाहीसे होते. म्हणून श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, "हे धनंजया ! या कृपादीक्षारूप प्रसादाशिवाय संसारदुर्गतीपासून तरण्याचा दुसरा मार्गच नाहीं."

दीक्षेचे व साधनाचे स्थान :–

ज्या ठिकाणी बसून साधक दीक्षा घेणार ते व नित्यसाधनाचे स्थान अत्यंत पवित्र असले पाहिजे. मंत्रयोग संहितेमध्ये दीक्षेच्या स्थानाचे वर्णन करताना म्हटले आहे –

गोशालायां गुरोर्गेहे देवागारे च कानने । पुण्यक्षेत्रे तथोद्याने नदीतीरे च दीक्षणम् ॥१॥ धात्री बिल्वसमीपे च पर्वताग्रगुहासु च । गंगायास्तु तरे वापि कोटिगुणं फलं भवेत् ॥ २ ॥ अथवा गुरुरेवास्य दीक्षयेद् यत्र तच्छुभम् । गुरोः परतरं नास्ति तद्वाक्यं श्रुतिसन्निभम् ॥ ३ ॥

दीक्षेच्या वेळी जीवात्म्याच्या व परत्म्याच्या मीलनाचा मार्ग मोकळा व्हावयाचा असतो. याकरिता उत्तम स्थानाची आवश्यकता असते. स्थान जितके उत्तम तितकी शिष्याची अभीष्ट सिद्धी होण्याला अवसर अधिक हे निश्चित आहे.

दीक्षेकरिता स्थान प्रशस्त व पवित्र असावे. गोशाला, गुरुगृह, देवालय, वन, (एकांत अरण्य) पुण्यक्षेत्र, (तीर्थक्षेत्र) उद्यान, नदीतट, आवळ्याच्या किंवा बेलाच्या झाडाखाली, पर्वतावर, गुहेत किंवा गंगेच्या तीरावर दीक्षा ग्रहण केली पाहिजे. गंगेच्या तीरावरील कोणत्याही स्थानी

दीक्षा ग्रहण करण्यात खूप मोठे पुण्य आहे. याकरिता गंगा तटावर दीक्षा ग्रहण करणे ही सर्वोत्तम गोष्ट आहे. गंगेच्या तीरावरील सर्व स्थानें तीर्थरूप आहेत.

या सर्वांपेक्षा गुरूंची ज्या ठिकाणी दीक्षा देण्याची इच्छा होईल व ते ज्या ठिकाणी दीक्षा ग्रहणासाठी शिष्यास बसावयास सांगतील ते स्थान सर्वश्रेष्ठ आहे असा नितांत विश्वास शिष्याने मनात बाळगला पाहिजे. श्रीगुरूंचे वाक्य हे वेदतुल्य वाक्य असून त्यांच्याशिवाय या त्रिभुवनात कोणतेही मोठे तीर्थ नाही.

नित्याच्या साधनाची जागाही फार सुंदर व मनोहर अशा एकांत-स्थळी असावी असे श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे. परंतु प्रत्येक साधकाला अशी जागा सध्याच्या कालात उपलब्ध होणे शक्य नसल्याने कालमानाला अनुसरून जागा कशी असावी हे पाहू.

साधनाला शक्यतो स्वतंत्र व एकांताची खोली असावी. तेथे निदान साधनाच्या वेळी तरी लोकांची जा ये नसावी. साधनाची खोली– जागा दररोज एकच असली म्हणजे खूप फायदा होतो. अशी शक्यता नसल्यास भिन्न जागी साधन करण्यास हरकत नाही. साधनाच्या खोलीत जितका अधिक एकांत, स्वच्छता व प्रसन्नता राहील तितका अधिक लाभ होईल. पलंग, टेबल, दिवा, उदबत्ती, समई, काचेच्या वस्तू इत्यादी शरीराला जखम करणाऱ्या किंवा साधनात क्रिया सुरू झाल्यावर काही तरी अनिष्ट घडून येईल अशा वस्तू आसपास असू नयेत. जागा भरपूर मोकळी असावी. आपण नित्य ज्या खोलीत अभ्यास करतो त्या खोलीचे वातावरण शक्तियुक्त होत असते. जर ती खोली दुसऱ्या कामासाठी उपयोगात आणली तर तेथील वातावरण दूषित होते. यासाठी साधनाव्यतिरिक्त खोली बंद ठेवणे अधिक श्रेयस्कर ठरते. खोलीत उन्हाळ्यात गारवा व थंडीत उष्णता असावी. मात्र पंखा लावून ठेऊन साधन करू नये. खोली-जवळ कोणत्याही प्रकारची घाण असू नये. दुर्गंधीमुळे साधन चांगले होत नाही. साधनापूर्वी धूप जाळून किंवा उदबत्ती लावून खोली सुवासिक करावी. मात्र धूर होणार नाही याची काळजी घ्यावी, डास, पिसवा, किडे, ढेकूण किंवा मुंग्या खोलीत असू नयेत. असे स्थान न मिळाल्यास किंवा परिस्थितीमुळे काही कमतरता असल्यास भगवान् वेदव्यासांच्या सूचनेप्रमाणे **" यत्रैकाग्रता तत्राविशेषात् "** म्हणजे जागा कशीही असली तरी जेथें मन एकाग्र होईल तेथे साधन करावे. साधन देवघरातच बसून केले पाहिजे असे नाही.

साधनासाठी आसन :–

साधनासाठी आसन कसे असावे हे सांगताना गीतेच्या ६ व्या अध्ययात भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाचा सांगतात की–

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमानसनमानात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

अतिशय शुद्ध अशा पवित्र स्थळी अत्यंत उंच होणार नाही व अगदी जमिनीशी लागून होणार नाही असे आपले स्थिर आसन असावे. हे आसन खाली दर्भ आंथरून त्यावर मृगचर्म घालून व शेवटी वस्त्राची घडी घालून तयार करावे.

कुलार्णव तंत्र, संमोहन तंत्र व गंधर्व तंत्रात आसन कोणते असावे व त्याचा उपयोग कसा होतो हे सांगताना म्हटले आहे की–

तूलकंबलवस्त्राणां सिंहव्याघ्रमृगाजिनम् । कल्पयेदासनं श्रीमान् सौभाग्यज्ञानवर्धनम् ॥ १ ॥ कृष्णाजिने ज्ञानसिद्धिः मुक्तिः स्याद्व्याघ्रचर्मणि । वस्त्रासने व्याधिनाशः कंबलं दुःखमोचनम् ॥ २ ॥

साधकाने आसनावर बसल्याशिवाय साधन करता कामा नये. आसनाशिवाय साधन करणे शास्त्रसंमत नाही. यासाठी बुद्धिमान साधकाने सौभाग्य व ज्ञानबुद्धी व्हावी म्हणून वस्त्राचे किंवा लोकरीपासून तयार केलेले आसन वापरावे. सिंह, व्याघ्र किंवा मृगचर्माचाही उपयोग करण्यास हरकत नाही. काळ्या हरणाच्या कातडयावर बसून साधन केल्याने ज्ञानाची सिद्धी होते. सिंह किंवा व्याघ्रचर्मावर बसून साधन केल्याने समाधीची सिद्धी लवकर होऊन मोक्ष प्राप्ती लवकर होते. कंबलासनावर बसून साधन केल्याने दुःखाची निवृत्ती होते. वस्त्रासनामुळे व्याधिनाश होतो.

आसन कसे असू नये हेही साधकाने लक्षात ठेवले पाहिजे.

धरण्यां दुःखसंभूतिर्दौर्भाग्यं दारुजासने । वंशासने दरिद्रः स्यात्पाषाणे व्याधिपीडनम् ॥ तृणासने यशोहानिः पल्लवे चित्तविभ्रमः । जपध्यानतपोहानि जायते वसनासने ॥

आसन न घालता जमिनीवर बसून साधन केल्याने त्रास दुःख व व्याधी होण्याचा संभव असतो. बांबूपासून तयार केलेल्या आसनावर बसून साधन केल्याने दारिद्र्य येते. जमिनीवर बसून साधन केल्याने पीडा व रोगाची उत्पत्ती होते. गवतावर बसून साधन केल्याने यशहानी व पानावर बसून साधन केल्याने चित्तामध्ये भ्रांती उत्पन्न होते. नुसत्या वस्त्रासनावर बसून साधन केल्याने जप, ध्यान व तप यांचा नाश होतो.

पाटावर, पलंगावर किंवा टेबलावर बसून साधन करू नये. पडण्याचा संभव असतो. आसन पाच फूट लांबरुंद, मऊ, नरम, सुखकारक, जाड व औरस चौरस प्रशस्त असे असावे. गादीपेक्षा चौपदरी घोंगडी, जाड सतरंजी किंवा गालीचा उत्तम. आसन खोलीच्या मधोमध घालावे. भिंतीजवळ घालू नये. कारण साधनाच्या वेळी क्रिया जोरात झाल्यास किंवा मागे पडल्यास शरीराला लागण्याचा संभव असतो. आसनाच्या चारी बाजूला जागा मोकळी असावी. आपल्या आसनावर दुसऱ्या कोणालाही बसू देणे उचित व इष्ट नाही. त्यामुळे दुसऱ्याचे दोष येण्याची शक्यता असते.

साधनाला बसण्याची पद्धत :–

शक्तिपातयोगसाधना ही जागृत म्हणजेच प्रत्यक्ष अनुभूती देणारी साधना आहे. त्यामुळे साधनाला बसताना एखादे विशिष्ट आसन घालूनच साधन सुरू केले पाहिजे अशी आवश्यकता नाही.

सोईची, सुखकारक व आराम वाटेल अशी मांडी घालून पाठीला बाक न येता सरळ व ताठ बसून साधनाला आरंभ करावा. कपिल महामुनींनी सांख्य सूत्रात लिहिले आहे की **"स्थिरसुखमासनमिति न नियमः"** ज्यामुळे देह व मन स्थिर होऊन सुख वाढेल त्याला आसन म्हणतात. यासंबंधी आणखी कोणताही नियम नाही. मुद्दाम पद्मासन किंवा सिद्धासन घालून साधनाला बसू नये. त्यामुळे शरीरावर ताबा व संयम येऊन साधनाच्यावेळी आतून होणाऱ्या क्रियांना अडथळा उत्पन्न होतो. साधनात होणाऱ्या क्रियांना अगदी मोकळेपणी वाव मिळाला पाहिजे. यासाठी साधी मांडी घालून बसले म्हणजे शक्तीकडून आवश्यक त्या क्रिया होऊन लवकर प्रगती होईल. एकाच आसनावर पुष्कळ वेळ बसल्याने पायास रग लागल्यास अगर मुंग्या येऊ लागल्यास पाय बदलण्यास हरकत नाही. ज्यांचे गुडघे दुखतात त्यांनी ताठ बसून पाय लांब पसरून व कंबरेला फार रग लागल्यास आडवे पडून साधन करण्यास हरकत नाही.

साधनाला बसण्यापूर्वी करावयाची प्रार्थना :–

साधनाला बसण्यापूर्वी पुढील प्रार्थना करून साधनाला सुरवात करावी.

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।। एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।। अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम् । तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरुवे नमः ।। अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।। मंत्रः सत्यं पूजा सत्यं सत्यं देवो निरंजनः । गुरुर्वाक्यं सदा सत्यं सत्यमेव परंपदम् ।।

साधनाची वेळ :–

सकाळ संध्याकाळची साधनाची वेळ निश्चित ठेवल्याने खूप फायदा होतो. त्यामुळे साधनात नियमितपणा येतो. साधन निरंतर होण्याची शक्यता खूप वाढते. खंड पडत नाही जेवणाची ठराविक वेळ असली म्हणजे ती वेळ झाली की भूक लागते त्याप्रमाणे साधनाची वेळ झाली की मन तिकडे खेचले जाऊन साधन होते.

प्रत्येक दिवशी सकाळी व संध्याकाळी कमीत कमी एक एक तास तरी उत्साहाने साधन केले पाहिजे. शक्य असेल तर दुपारी व मध्यरात्री उठून साधन केले तर अधिक चांगले. एखाद्या दिवशी ठरलेल्या वेळी काही अपरिहार्य कारणामुळे साधन झाले नाही तर इतर वेळेला साधन अवश्य केले पाहिजे. काही सामाजिक, व्यावहारिक, शारीरिक व मानसिक कारणांमुळे साधन झाले नाही तर निरुत्साहित व अस्वस्थ होता कामा नये.

भोजन झाल्यानंतर तीन तास पर्यंत बैठक करू नये. भोजनानंतर तत्काळ भरल्या पोटी किंवा भुकेने व्याकुळ झालेल्या अवस्थेत रिकाम्या पोटी साधन करू नये. अशावेळी अगदी थोडेसे खाऊन साधनाला बसावे.

सुतकामध्ये साधन करू नये. सोयरात करण्यास हरकत नाही. साधनाच्यावेळी शरीरावर वारा बसू देऊ नये. खोलीत दिव्याचा किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रखर प्रकाश असू नये. त्याचप्रमाणे परगावी गेल्यावर साधकाला एकांताची स्वतंत्र खोली असल्यास साधन करावे. तशी सोय नसल्यास साधन करू नये.

साधनेसाठी वस्त्रः—

साधनाच्या वेळी कमीत कमी कपडे अंगावर असावेत. पुरुषांनी धोतर अगर पंचा नेसून बसावे. पॅण्ट घालून बसल्याने शरीर जखडल्यासारखे होते. शरीरावर अधिक कपडे असले म्हणजे मोकळेपणे क्रिया होत नाहीत. थंडीच्या दिवसात प्रकृतीमानाप्रमाणे कपडे घालण्यास हरकत नाही. साधनाच्या वेळी येणारी लाळ किंवा नाक पुसण्याकरता जवळ रुमाल ठेवावा. तो रोज धुवावा.

साधनातील क्रिया :–

ज्यावेळी श्रीमहेश्वराची कृपा होते तेव्हा गुरुकृपेने व प्रबल पुण्यतापामुळे साधकाची आत्मसत्ता जागृत होते. या आत्मसत्तेला योगी लोक कुंडलिनी शक्ती म्हणतात. भक्तिमार्गाने जाणारे भक्त हिलाच आल्हादिनी शक्ती म्हणतात. वेदांती लोक या आत्मसत्तेला चित्शक्ती असे नाव देतात. तर मंत्रतंत्राचे उपासक महामाया आद्याशक्ती कुलकुंडलिनी या नावाने संबोधतात. या आत्मसत्तेच्या जागृतीची सर्व जण इच्छा करतात. कारण ही आत्मसत्ता जागृत झाल्याशिवाय व स्वत: वाटचाल करू लागल्याशिवाय इतर कोणत्याही प्रकाराने सुलभतेने साधक परमात्मस्वरूप होऊ शकत नाही. ही आत्मसत्तारूप कुंडलिनी शक्ती जागृत झाली की अनादिकालाच्या निद्रेचा त्याग करून ब्रह्मस्वरूप प्रकट होऊन शिवाशी ऐक्य व्हावे म्हणून गतिमान होते. त्यामुळे जप, यज्ञ, पूजा, ध्यान इत्यादी सर्व बाह्य साधने समाप्त होऊन खरे अंतरंग साधन सुरू होते. शक्ती शिवाशी समरस होण्यासाठी धडपड करू लागते. त्यावेळी साधकाच्या शरीरात हठयोग, लययोग, मंत्रयोग व राजयोगातील निरनिराळ्या क्रिया आपसुख होत असल्याने त्या होऊ देण्यातच साधकाला आनंद वाटत असतो. त्या अवस्थेत सर्व ब्रह्मांड साधकाच्या अंतरंगामध्ये चित्र विचित्र रूपाने दिसू लागते. जागृतशक्ती नानातऱ्हेच्या क्रिया साधकाकडून करविते. या क्रियांच्यामुळे साधकाला नाना तऱ्हेचे आश्चर्यकारक अनुभव येतात. योगशिखोपनिषदाच्या ६ व्या अध्ययात यासंबंधी असे म्हटले आहे की–

मनसा मन आलोक्य योगनिष्ठ: सदाभवेत् । मनसा मन आलोक्य दृश्यन्ते प्रत्यया दश ॥ ६४ ॥ यदा प्रत्यया दृश्यंते तदा योगीश्वरो भवेत् ॥ ६५ ॥ बिंदु नाद कला ज्योतीरवीन्दु ध्रुवतारकम् । शांतं च तदतीतं च परब्रह्म तदुच्यते ॥ ६६ ॥ हसत्युल्लसति प्रीत्या क्रीडते मोदते तदा । तनोती जीवनं बुद्धचा विभेति सर्वतोभयात् ॥ ६७ ॥ रोध्यते बुध्यते शोके मुह्यते न च संपदा । कंपते शत्रुकार्येषु कामेन रमते हसन् ॥ ६८ ॥ स्मृत्वा कामरतं चित्तं विजानीयात्कलेवरे । यत्र देशे वसेद्वायुच्चित्तं तद्वसति ध्रुवम् ॥ ६९ ॥

ज्यावेळी शक्ती जागृत होऊन कुंडलिनी क्रियाशील होईल त्यावेळी मनानेच मनाला पाहून योगसाधन घडू लागते. अशाप्रकारे जेव्हा योगसाधन आपोआप घडू लागेल त्यावेळी साधकाला दशेंद्रियविषयक अतिंद्रिय ज्ञान होते. अशाप्रकारे साधन करताना जेव्हा अनुभव येऊ लागतो त्यावेळी योगाची सिद्धी फार लवकर होते. नाद, बिंदू, कला,

ज्योती, सूर्य, चंद्र, ध्रुव, तारा इत्यादी परब्रह्माची अभिव्यक्ती करणारी चिन्हे अंतराकाशात दिसतात व पुढे नाहीशी होतात. ज्यावेळी या क्रिया संपतात त्यावेळी मन शांत होते. त्यावेळी कोणतीही क्रिया होत नाही. मग शांत्यातीत अवस्था प्राप्त होते. शांत्यातीत अवस्था ही परब्रह्म आहे. ही अवस्था मनाच्या व वाणीच्या पलीकडे असल्यामुळे केवळ स्वानुभवगम्य आहे हेच खरे.

ज्यावेळी साधन करताना दिव्य अनुभव साधकाला येऊ लागतात त्यावेळी त्याला अपार आनंद होतो. या आनंदामुळे तो उल्हासित व उत्फुल्ल होऊन आनंदित व प्रसन्न होतो. प्रेमाने आपल्याशीच क्रिडा करतो. स्वतःतच रममाण होतो. साधक महासुखाच्या अपार सागरात पोहू लागतो. अशाप्रकारे आत्मसुखाचा अनुभव आला की साधक विषयांपासून निवृत्त होतो. संसाराबद्दल भय मानून तो त्याच्यापासून लांब राहातो. शोकाच्या प्रसंगात तो बुद्धीच्या जोरावर विवेकाने राहातो. ज्यावेळी साधकाला खूप संपत्ती व सुख मिळते त्यावेळी तो मोहित होत नाही. शत्रुत्वाच्या कार्याबद्दल त्याला भय वाटते. कामामुळे जे विकार शरीरामध्ये होतात त्याचे परिणाम त्याला जाणवतात. त्यामुळे तो सर्व कामनांपासून मनाला आवरतो. शरीरामध्ये ज्या ज्या स्थानी वायू राहातो त्या त्या ठिकाणी चित्तही राहात असते.

ज्यावेळी कुंडलिनी शक्ती मूलाधारातून निघून सहस्त्राराकडे जाऊ लागते त्यावेळो अनंत क्रिया होतात व अपार अनुभव येतात. या क्रिया का होतात ? अनुभव का व कोणते येतात ? क्रिया कोणत्या व कशा होतात ? त्यांचा शेवट केव्हा होतो ? या सर्वांचा विचार व त्याची स्पष्ट कल्पना साधकाला असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

साधनात क्रिया का होतात ? :–

ज्यावेळी साधकाला शक्तिपात दीक्षा होते त्यावेळी साधकाच्या ठिकाणी ज्या अनंत प्रकारच्या क्रिया प्रकट होतात त्या का होतात हे प्रथम पाहाणे आवश्यक आहे. त्याचा क्रमशः विचार करू.

शक्ती जागृत होते :–

ज्यावेळी गुरू शक्तिपात करतात त्यावेळी तत्काल अनादी निद्रेचा भंग होऊन कुंडलिनी शक्ती जागृत होते. त्यामुळे प्राण प्रक्षुब्ध होतो. मूलाधारात त्याची गती रुद्ध झाली की क्रिया सुरू होतात. याबद्दल योगशिखोपनिषदाच्यया ६ व्या अध्ययात म्हटले आहे की –

आधारवातरोधेन शरीरं कंपते यदा । आधारवातरोधेन योगी

नृत्यति सर्वदा ॥ २८ ॥ आधारवातरोधेन विश्वं तत्रैव दृश्यते । सृष्टिधारमाधारमाधारे सर्वदेवताः । आधारे सर्व वेदाश्च तस्माधारमाश्रयेत् ॥२९॥

आत्मशक्तीचे उद्‌बोधन झाले की प्राणाची गती बदलून जाते. ते प्रक्षुब्ध होऊन सहस्त्राराकडे जाऊ लागतात. परंतु पुढे जाण्याला वाट न मिळाल्यामुळे आधारचक्रामध्येच रुद्ध होतात. त्यामुळे शरीरात कंप उत्पन्न होतो. मूलाधारात प्राण रुद्ध झाल्यामुळे साधक आनंदित होऊन नाचू लागतो. आधार चक्रामध्ये प्राणवायूचा निरोध झाल्याने तेथे साधकाला संपूर्ण विश्वाचे दर्शन होते. कुंडलिनी शक्ती ही मूलाधारातच निवास करते. तिच्या या स्थितीमुळेच सृष्टीचा आधार मूलाधार आहे. या ठिकाणीच सर्व सृष्टी, सर्वदेवता व सर्व वेद असतात म्हणून आधार शक्तीचाच आश्रय घ्यावा

पश्चिम मार्ग खुला होतो :–

" द्विवक्त्रा कुंडलिन्यभिधा नित्यानंदस्वरूपा परमा कला प्रकृति वर्तते ! " कुंडलिनी नावाची नित्यानंदस्वरूपाची परम प्रकृती जीवन किंवा प्राणशक्तीच्या रूपाने शरीरात निवास करते. तिला दोन मुखे आहेत. सुषुम्णानाडीचे एक मुख मूलाधारात आहे व दुसरे सहस्त्रारात आहे. या मूलाधारातील मुखाला म्हणजेच ब्रह्मद्वार किंवा ब्रह्मविवराला अडवून त्याच्या तोंडावरच ती झोपली आहे. हे तिचे अंतर्मुख आहे. दुसरे जे बहिर्मुख आहे त्याच्या द्वारा ही प्राणरूप कुंडलिनी शक्ती श्वासप्रश्वास करते. यालाच जीवाचा श्वासनिश्वास म्हणतात. या मुखानेच ती नित्य जागृत आहे असे दिसते. यामुळेच जीवाला बाह्य ज्ञान किंवा चेतना प्राप्त होत असते. जीवाला जो भिन्नतेचा किंवा द्वैताचा भास सतत होतो व एकत्वाचा बोध होत नाही, त्याला कारण ही शक्तीची बहिर्मुखताच आहे. ज्या ठिकाणी तिचे अंतर्मुख आहे तेथे ती झोपलेलीच आहे. त्यामुळे जीवाला अंतर्ज्ञान, ब्रह्मज्ञान किंवा आत्मज्ञान न होता तो अज्ञानाने बद्ध होतो. या मार्गानेच गेल्याने साधक सहस्त्रारातील निरामय अशा ब्रह्मस्थानात पोहोचून त्याला आत्मसाक्षात्कार होतो. परंतु ब्रह्मद्वार अडवून परमेश्वरी शक्ती तेथे झोपलेली असल्यामुळे साधकाचे प्राण सुषुम्णेत प्रवेश करीत नाहीत. आणि जोपर्यंत प्राणशक्ती सुषुम्णा मार्गात प्रवेश करीत नाही तोपर्यंत मोक्षप्राप्तीचा संभव नाही हे अगदी निश्चित आहे. योगशिखोपनिषदात असे म्हटले आहे की–

नाकृतं मोक्षमार्गं स्यात् प्रसिद्धं पश्चिमं विना । १-१४५ । पश्चिम म्हणजे पाठीतून जाणारा मार्ग मोकळा झाल्याशिवाय मोक्षमार्गात प्रगती

होत नाही. शरीरात मूलाधारातून निघून सहस्रारापर्यंत पाठीमागून जी नाडी जाते तिला सुषुम्णा म्हणतात. हिलाच पश्चिममार्ग म्हटले जाते. शरीरातील पुढील भागातून गुह्यस्थान, बेंबी, हृदय, कंठ व नाक यांच्या द्वाराने जो प्राणाचा प्रवाह चालू असतो त्याला पूर्वमार्ग असे म्हणतात. या पूर्वमार्गाने म्हणजेच पूर्वमुखाने प्राणाची गती बहिर्मुख अशी चालू असते. कुंडलिनीच्या या मुखानेच श्वासप्रश्वासाची क्रिया होत असते. अंतर्मुखाकडील गती मूलाधारात कपाटात वस्तू बंद करून ठेवल्याप्रमाणे बंद असते. ज्यावेळी गुरुकृपा होते त्यावेळी प्राणशक्तीचे चालन होऊन हे बंद द्वार उघडण्याचा प्रयत्न होऊ लागतो. या प्रयत्नामुळेच नाना प्राकारच्या क्रिया साधनात प्रकट होतात. योगशिखोपनिषदाच्या सहाव्या अध्ययात म्हटले आहे की

आधारे पश्चिमे भागे त्रिवेणी संगमो भवेत् । तत्र स्नात्वा च पित्वा च नरः पापात्प्रमुच्यते ।। ३० ।। आधारे पश्चिमं लिंगं कवाटं तत्र विद्यते । तस्योद्घाटन मात्रेण मुच्यते भव बंधनात् ।। ३१ ।।

मूलाधारात पश्चिमभागात ईडा, पिंगला व सुषुम्ना यांचा त्रिवेणी संगम होतो. ज्यावेळी गुरुकृपेने शक्ती जागृत होते त्यावेळी मन व प्राण एकत्र होऊन दिव्य क्रिया होऊ लागतात. हेच खरे स्नान होय. हे क्रियारूप स्नान होऊ लागले की अद्भुत अनुभवाचे पान साधक करतो व सर्व पापापासून तो मुक्त होतो. आधाराच्या पश्चिम भागात स्वयंभू लिंग प्रतिष्ठित आहे. त्या ठिकाणी सुषुम्नेमध्ये प्रवेश करण्याचे ब्रह्मद्वार आहे. नानाप्रकारच्या क्रियांनी कुंडलिनी शक्ती जेव्हा धडका मारून ते दार उघडते तेंव्हा मनुष्य संसार बंधनातून मोकळा होतो.

प्राणशक्तीचे ऊर्ध्वगामित्व :–

साधकाला क्रिया होण्यास तिसरे महत्त्वाचे कारण हे आहे की प्राणांची गती ऊर्ध्वमुखी होते. प्राण ऊर्ध्वमुख झाल्याबरोबर ते सुषुम्ने मधून वर जाण्याचा प्रयत्न करू लागतात. अशावेळी मार्गात जे जे अडथळे येतात ते ते निरनिराळ्या प्रकारच्या क्रिया करून प्राणशक्ती दूर करतात. प्रत्येक जीवाच्या कर्मगतीप्रमाणे व त्यान पूर्वजन्मात केलेल्या साधनाप्रमाणे अडथळे येत असतात. त्यामुळे प्रत्येकाच्या अडथळचात सारखेपणा असणे कधीही शक्य नाही. जागृत आत्मशक्तीला हे अडथळे ओलांडून साधकाला पलीकडे कसे न्यावयाचे याची पुरेपूर जाणीव असते. त्यासाठी कोणत्या क्रियेची आवश्यकता आहे हे ती जाणते. या जाणिवेतूनच अनंत जीवांच्या अनंत क्रिया प्रकट होऊन प्राण सर्व अडथळे

ओलांडून सहस्त्राराकडे जातो. सहस्त्रारापाशी जाईपर्यंत प्राणशक्तीची जी हालचाल होते, ती बाह्य व अंतःक्रियांच्या रूपाने प्रकट होते व जाणवते.

वासना व संस्कारांचा नाश:–

नुसत्या विचाराने वासनांचा व संस्काराचा नाश लवकर होत नाही. मात्र जेव्हा शक्ती जागृत होऊन सुषुम्नेमध्ये प्रवेश करते तेव्हा हे कार्य सुलभतेने व आपोआप होऊ लागते. सुषुम्ना नाडीमध्ये जन्मजन्मांतरीच्या वासना व संस्कार एकत्रित होऊन एखाद्या गाळाप्रमाणे साठून राहिलेले असतात. ज्यावेळी शक्ती जागृत होते त्यावेळी ती सुषुम्ना मार्गातून प्रवाहित होऊन ऊर्ध्वगामिनी होते. ती जसजसा मार्ग आक्रमू लागते तसतसा वासना व संस्कार यांचा नाश होऊ लागतो. मात्र हा नाश सहजासहजी होत नाही. शक्ती ऊर्ध्वगामी होऊन या दोन्ही गोष्टी जाळून टाकू लागते त्यावेळी प्राणशक्तीला खूप अडथळे येतात. सबंध सुषुम्णामार्गात जेथे जेथे अडथळे येऊन प्राणशक्ती रुद्ध होते त्या त्या वेळी तीव्र स्पंदने निर्माण होतात. या स्पंदनांमुळे निरनिराळ्या क्रिया सतत प्रकट होत राहातात व प्रगती होत जाते. शक्ती जागृत होऊन आपल्याला एकदम समाधी लागावी असे साधकाला वाटत असले तरी जन्मजन्मांतरीचे संस्कार, वासना, इच्छा, आकांक्षा त्याला पुढे जाऊ देत नाहीत. साधकाला त्या मागे खेचीतच राहातात. अशावेळी नियमित साधन केले म्हणजे ब्रह्माभिव्यक्तीची चिन्हे असलेल्या क्रिया शरीरात प्राणशक्ती उद्भुत करून सर्व दोषांचा निरास करते. हुक्क्याची नळी जर लोखंडाच्या सळईने बरेच दिवस साफसूफ केली नाही तर त्यात साठलेली घाण वाढत जाऊन हळूहळू काही दिवसानंतर ती नळी बंद होते व पुढे त्या नळीतून हुक्का पिणारा धूर खेचू शकत नाही. मात्र तापलेली लोखंडाची सळई घालून जर ती हुक्क्याची नळी हळूहळू साफ केली तर ती जेव्हा पूर्णपणे साफ होईल त्यावेळी त्या नळीतून तंबाखूचा धूर योग्य रीतीने वाहू लागून तो पिणाऱ्याला आनंद देऊ शकेल. सुषम्णामार्गातही प्राणशक्तीमुळे अशीच साफसफाई करून शुद्धीकरण झाले म्हणजे प्राण विनासायास सहस्त्रारामध्ये पोहोचतात व साधक कृतकृत्य होतो. हे शुद्धीकरण पूर्ण होईपर्यंत नाना प्रकारच्या क्रियांचे आविष्करण होत राहातेच.

शक्तिपातदीक्षेने उद्भुत होणाऱ्या या क्रियांमुळे हवनाला प्रारंभ होतो. पूर्णाहुती होईपर्यंत ज्या ज्या क्रिया घडतात व जे जे अनुभव साधकाला येतात त्याचे यथातथ्य वर्णन करणे हे मनुष्य बुद्धीच्या पली-

कडचे काम आहे. या विविध क्रियांचे विश्व साधकाला आश्चर्याच्या महासागरात बुडवून टाकून ब्रह्मानंदामध्ये हळूहळू निमग्न करीत करीत वासनासंस्कारांना जाळीत जाळीत पुढे नेत असते. ज्यावेळी शक्ती शंभूशी एकरूप होते तेव्हा सर्व क्रिया संपून साधक कृतकत्य व कृतार्थ होतो.

तीन ग्रंथींचे भेदन :–

ज्यावेळी कुंडलिनी शक्ती जागृत होते त्यावेळी ब्रह्मग्रंथी, विष्णुग्रंथी व रुद्रग्रंथी या तीनही ग्रंथीचे भेदन करून ती सहस्त्रारस्थ परम शिवाबरोबर एकरस होऊन आनंदरसात बुडून जाते. ही साधनाची परावस्था म्हटली पाहिजे. या अवस्थेतच सर्व कामनांची निवृत्ती होते. हे कसे घडते ? योगकुंडलिनी उपनिषदात याचे वर्णन करताना म्हटले आहे की–जेव्हा अग्नी प्राणस्थानात जाऊन प्राणवायूला मिळतो त्यावेळी निद्रिस्थ कुंडलिनी शक्ती जागृत होते. त्या उष्णतेमुळे तापून जाऊन व वायूमुळे चलित होऊन कुंडलिनी सरळ होते व सुषुम्नेमध्ये प्रवेश करते. प्रथम रजोगुणापासून उत्पन्न झालेल्या दशदलयुक्त नाभीपद्मातील ब्रह्मग्रंथीचा भेद करून कुंडडिनी शक्ती सुषुम्नेमध्ये विजेप्रमाणे चमचमाट व झगझगाट करीत ती मार्गक्रमण करीत वरती चढत जाते. कुंडलिनीशक्तीचा हा चमचमाट व झगझगाट म्हणजेच अनेक प्रकारच्या क्रिया होत. अशाप्रकारे क्रिया करीत कुंडलिनी शक्ती अत्यंत जलद गतीने द्वादशदल हृदयपद्मस्थित विष्णुग्रंथीचा भेद करून पुढे आज्ञा चक्रातील भ्रूमध्यस्थ द्विदल चक्रस्थ रुद्रग्रंथीचा भेद करून सहस्त्रारात जाते. सारांश अग्नी व वायू या दोघांच्या आघातामुळे निद्रिस्थ कुंडलिनी शक्ती जागृत होते तेव्हा ब्रह्मग्रंथी, विष्णुग्रथी, रुद्रग्रंथी आणि षट्चक्रांचे भेदन करीत ती सहस्त्रदलकमलात जाऊन पोहोचते. त्याठिकाणी शिवाशी शक्तीचे ऐक्य होऊन साधकाला परमानंद प्राप्त होतो. हीच श्रेष्ठ व मोक्षदायक अवस्था आहे.

त्याचप्रमाणे योगशिखोपनिषदातही या तीनही ग्रंथींचे भेदन शक्तिचालनामुळे व विविध क्रियांमुळे कसे होते याचे वर्णन करताना म्हटले आहे की –

यथा करी करेणैव पानीय प्रपिबेत्सदा ।
सुषुम्णावज्रनालेन पवमानं ग्रसेत्तथा ।।

ज्याप्रमाणे हत्ती नेहमी आपल्या सोंडेने पाणी पितो त्याप्रमाणे योगी सुषुम्नेमध्ये असलेल्या वज्रा नाडीच्या द्वाराने प्राणवायू ग्रहण करीत असतो. बांबूमधील गाठींचा छेद केल्याप्रमाणे प्राणवायू सुषुम्ने-

मधील तीनही ग्रंथीचा भेद करतो. या अर्थानेच योगशिखोपनिषदात म्हटले आहे –

भिद्यन्ते ग्रंथयो वंशे तप्तलौहशलाकया ।
तथव पृष्ठवंशः स्याद्ग्रंथिभेदस्तु वायुना ।।

ज्याप्रमाणे तापलेल्या लोखंडाच्या सळईने बांबूच्या गाठींचा छेद लवकर व सहजासहजी होतो त्याप्रमाणे सहज क्रियांच्या द्वारा मेरुदंडातील सुषुम्नेतील तीनही ग्रंथींचे भेदन अत्यंत सुलभतेने होते.

पंचतत्त्वांचे अवलंबन :–

शक्तिपात झाला की प्राणाच्या गतीत बदल होतो. त्यामुळे प्राण साधकाच्या देहाला विशेष रीतीने क्षुब्ध करतो. हा क्षुब्ध प्राण कधी पृथ्वीतत्त्व, कधी जलतत्त्व, कधी तेजतत्त्व व कधी आकाशतत्त्व या पैकी एका तत्त्वाचा अवलंब करून शरीरात वावरू लागतो. काही वेळेस तो स्वप्रधान होऊन म्हणजे स्वतःच्याच प्राणतत्त्वाचा अवलंब करून देहात सर्वत्र फिरू लागतो. यामुळे नाना प्रकारच्या क्रिया शरीरात उत्पन्न होतात. जेव्हा प्राण भूमितत्त्वाचे अवलंबन करतो तेव्हा शरीर खांबासारखे निश्चल होऊन साधकाला स्तंभभाव प्राप्त होतो. जलतत्त्वाशी प्राण निगडीत झाला की अश्रुपात होऊ लागतो. तेजतत्त्वाशी प्राणाचा संयोग झाला की घाम येऊ लागतो व शरीराचा रंग पालटू लागतो. यालाच वैवर्ण्य किंवा वर्णविकृती म्हणतात. जेव्हा प्राण आकाश तत्त्वाशी एकरूप होतो तेव्हा प्रलय म्हणजे भावसमाधी, मूर्च्छा, तंद्रा अगर निद्रा या सारख्या क्रिया होतात. जेव्हा प्राण स्वस्थ होतो म्हणजे आपल्या वायुरूपतत्त्वामध्ये राहू लागतो तेव्हा मंद, मध्य किंवा तीव्रतेने रोमांच, कंप व स्वरविक्रिय हे तीन भाव प्रकट होतात.

आपल्या देहामध्ये मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत व विशुद्ध ही पाच चक्रे पृथ्वी, जल, तेज, वायू व आकाश या पाच महाभूतांची स्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. मूलाधारात पृथ्वीतत्त्व, स्वाधिष्ठानात जलतत्त्व, मणिपुरात तेजतत्त्व, अनाहतामध्ये वायुतत्त्व व विशुद्धचक्रामध्ये आकाशतत्त्व असते. प्राणशक्ती ऊर्ध्वगामी होऊन ज्या ज्या वेळी ज्या ज्या चक्रांचा आश्रय करते त्या त्या वेळी त्या त्या क्रिया होऊन ती ती भूततत्त्वांची लक्षणे प्रकट होत राहातात.

श्रीगुरूंनी शक्तिपात केला की पंचमहाभूतांची आटणी होताना ज्या अनंत क्रिया होऊन मन, प्राण व शरीरामध्ये अध्यात्मप्रसादाच्या आनंदाचा जो उद्रेक होतो त्याचे वर्णन करणे शक्य नाही. साधकशिष्य

वेदांती, योगी, सगुणोपासक, निर्गुणोपासक, भगवद्भक्त, मांत्रिक, यांत्रिक, ज्ञानी, अज्ञानी, इत्यादी कसाही असला तरी ज्यावेळी आत्मशक्तीचे म्हणजे प्राणकलेचे उद्बोधन होते त्यावेळी उपरोक्त सर्व क्रिया व लक्षणे ही प्रकट होतात. याप्रकारे श्रीमहेश्वरांनी सांगितलेल्या या महायोगाचे साधन ज्ञात किंवा अज्ञात रूपाने ज्ञानी, ध्यानी, योगी, यती, भक्त इत्यादी सर्वांना क्रियांचा अनुभव घेत करावे लागतो.

आत्मतत्त्वांचे शुद्धीकरण :–

उद्बोधित कुंडलिनी शक्तीकडून ज्या क्रिया आपोआप होतात त्यामुळे आत्मतत्त्वाचे शुद्धीकरण घडून येते. प्रकृतीच्या ३६ तत्त्वांचे पूर्ण शुद्धीकरण झाल्यासच जीवाची मायेच्या बंधनातून पूर्ण मुक्ती होते. पृथ्वीतत्त्वापासून जागतिक विकासावरणाच्या ३६ तत्त्वातून आत्मा बाहेर पडला म्हणजे तो उत्क्रांत होऊन मुक्ती मिळवितो. आत्मोत्क्रांतीच्या या प्रणालीलाच तत्त्वशुद्धी असे नाव आहे.

शक्ती जागृत झाली की क्रियाशील होऊन ती तत्त्वशुद्धी करू लागते. पहिल्याने निवृत्ती तत्त्वापासून म्हणजे त्यागापासून रुद्रतत्त्वापर्यंत ब्रह्मांडतत्त्वाची शुद्धी होते. दुसऱ्या प्रतिष्ठा तत्त्वापासून अव्यक्ततत्त्वापावेतोची दुसरी अधिक उच्च तत्त्वे शुद्ध होतात. त्याहीपुढे विद्यातत्त्व सामावून विद्याधिपतीपर्यंतची शांत्यासह अधिक तत्त्वे विशुद्ध होतात. हा क्रम शांत्यातीत अवस्थेपर्यंत असाच उत्तरोत्तर चालतो. हा विशुद्धीकरणाचा क्रम केवळ शक्तिपात दीक्षेनेच चालतो हे नितांत सत्य आहे.

शक्तिपातसमायोगादृते तत्त्वानि तत्त्वतः ।
तद्व्याप्तिद्विशुद्धिश्च ज्ञातुमेव न शक्यते ।।

आत्मतत्त्व हे मूल तत्त्व आहे. सर्व तत्त्वांची व्याप्ती आत्मतत्त्वापर्यंतच असते. या आत्मतत्त्वाचे शुद्धीकरण केवळ शक्तिपातदीक्षेनेच सिद्ध होते. आत्मतत्त्व हे मूलतः विशुद्ध व अविकृत असूनही केवळ देहाध्यासाने प्रकृतीच्या २४ तत्त्वांशी त्याचे ऐक्य भासमान होते. मी शरीरच आहे ही मिथ्या कल्पना म्हणजे देहाध्यास होय. आत्मतत्त्वाचे मूळ शुद्ध स्वरूप विपर्यय ज्ञानाने विस्मृत होते. याचे कारण आत्मतत्त्वाची व्याप्ती व व्यापकता हेच आहे. स्थूल, सूक्ष्म व कारण शरीराच्या बीजभूत तत्त्वापासून आत्मतत्त्व हे सर्वथा भिन्न असल्याचे सम्यक् ज्ञान हेच या आत्मतत्त्वाचे विशुद्धीकरण होय. या उलट आत्मतत्त्वापासून प्रकृतीची २४ तत्त्वे सर्वथा भिन्न आहेत हे समजणे ही त्या तत्त्वांची

शुद्धी होय. शक्तीमुळे होणाऱ्या क्रियांमुळे उपरोक्त शुद्धीकरण होऊन सत्य ज्ञान होण्याने जीव मुक्त होतो. या दृष्टीनेच योगदर्शनात पंतजलीनी **" सत्त्वपुरुषयोः शुद्धिः साम्ये कैवल्यमिती ।।** ३.५५ ।। म्हणजे सत्त्व शुद्धी व पुरुष शुद्धी झाल्यावर मोक्ष प्राप्त होतो, असे म्हटले आहे. शक्तिपातयोगाच्या प्राप्तीने ज्या क्रियांचे विश्व साधकाच्या अंतरंगात उद्‌भुत होऊन समाप्त होते, त्यामुळेच तत्त्वांच्या मूलार्थाची विशुद्धी व व्याप्ती समजू शकते.

परिपक्वता व परिपूर्णता प्राप्ती :–

शरीर, मन, प्राण व ज्ञानामधील अपरिक्वता दूर होऊन साधकाला परिक्वता प्राप्त होऊन तो परिपूर्ण व्हावा म्हणून कुंडलिनी शक्ती साधकाकडून शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्रिया करवून घेते. कच्चे शरीर, दुर्बल मन, अपूर्ण बुद्धी व अस्वस्थता यामुळे साधक आत्मदर्शन प्राप्त करून घेऊ शकत नाही. त्यामुळेच उपनिषदात **"नायमात्मा बलहिनेन लभ्यः "** असे म्हटले आहे. याकरिता योगमाया कुंडलिनी शक्ती नाना प्रकारच्या क्रियांनी साधकाला आत्मज्ञानाकरिता आवश्यक साधनसंपदा प्राप्त करून देते. त्यामुळे साधक या जन्मातच जीवनमुक्त होऊ शकतो.

षट्चक्रवेध :–

ज्यावेळी गुरुकृपेने शक्ती जागृत होते तेव्हा ती मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा या षट्चक्रांचा वेध करीत सहस्त्रारात जाऊन पोहोचते. कुंडलिनी शक्ती जागृत होऊन सुषुम्नेत प्रवेश करून मार्ग आक्रमू लागली की मार्गातील षट्चक्ररूपी प्राणप्रवाहाच्या केंद्रस्थानातून तिला जावे लागते. ह्या चक्रांचे भेदन होत असताना निरनिराळ्या क्रिया होतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी चक्रवेध होत असताना क्रिया कशा होतात हे ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात वर्णन केले आहे. **" ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाची पाखर पडे "** ।। २११ ।। म्हणजे नानाप्रकारच्या शारीरिक क्रिया या साधनाभ्यासात घडून येऊन शरीराच्या बाहेरच्या भागातही या अभ्यासाचा कृपाप्रसाद घडून येतो. **जो मूळबंधे कोंडला । अपान माघौता मुरडला । तो सवेंची वरी साकडला । धरी फुगू ।।२१४।। क्षोभलेपणें माजे । उवाइला ठायी गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनिया ।। २१५ ।।**

जो अपाननायू मूळबंधनामुळे कोंडला जाऊन मागे फिरला होता तो वर कैचित सापडला जाऊन लगेच फुगू लागतो. तो क्षुब्ध झालेला

अपानवायू माजून तेथल्या तेथेच गुरगुरू लागतो व राहून राहून मणिपूरचक्राशी झुंज घेतो. ही झुंज अनेक क्रिया घडवून आणून षट्चक्र-भेद होतो.

दीक्षेची वेळ :–

साधारणपणे शास्त्राने सांगितल्याप्रमाणे व्यवहारात लोक लग्न, मुंज, गृहप्रवेशादी सर्व नैमित्तिक शुभ कर्मे तिथी, वार, नक्षत्र इत्यादी चांगला दिवस पाहून करतात. तीर्थयात्रा, यज्ञ, दान, तप, जप, दीक्षा इत्यादी शुभ कर्मे करताना सुद्धा शुभाशुभ काल पाहूनच ती सुरू करतात. शुभ कालावर सुरू झालेली कर्मे निर्विघ्नतेने पूर्ण होऊन इच्छेप्रमाणे फलप्राप्तीही होते. यासाठी ज्योतिषाचा आधार घेऊन व कालाकालाचा निर्णय घेऊन धर्मकर्मे केली पाहिजेत. परंतु मंत्रयोगसंहिता तत्त्वसार या ग्रंथात दीक्षेच्या वेळासंबंधी म्हटले आहे की –

यदि भाग्यवशेनैव सिद्धो हि पुरुषो मिलेत्। तदैव दीक्षां गृहणीयात् त्यक्त्वा कालविचारणम् ।। दुर्लभे सद्गुरुणांच सकृत् संग उपस्थिते। तद्नुज्ञा यदा लब्धा स दीक्षावसरो महान् ।। यदैवेच्छा तदा दीक्षा गुरोरा ज्ञानुरूपतः ।। न तीर्थं न व्रतं होमो न स्नानं न जपक्रिया। दीक्षयाः कारणं किंतु स्वेच्छा प्राप्तेतु सद्गुरौ ।।

शुभ कर्मांच्या बाबतीत ज्योतिषशास्त्राचा व कालाकालाचा निर्णय जरी वरील प्रमाणे असला तरी ज्यावेळी सिद्ध पुरुषाच्या रूपाने सद्-गुरूंची प्राप्ती होते त्यावेळी कालाकालाचा विचार न करता दीक्षा ग्रहण केली पाहिजे. ज्यावेळी सद्गुरूंचा दुर्लभ सहवास मिळून, ते प्रसन्न होऊन, कृपा करण्याची त्यांची इच्छा होईल व ते शिष्याला दीक्षा घेण्याविषयी अनुमती देतील ती दीक्षेची सर्वश्रेष्ठ वेळ आहे असे समजले पाहिजे. त्याचप्रमाणे गुरुशिष्याची उभयतांची दीक्षा देण्याघेण्याची इच्छा होईल त्यावेळीही दीक्षा होऊ शकते. ज्यावेळी सद्गुरूंची कृपा करण्याची इच्छा होते त्यावेळी शिष्याने कालाकालाचा विचार न करता अगदी निःशंक मनाने दीक्षा ग्रहण करावी.

सामर्थ्यसंपन्न सद्गुरू शास्त्र व अलौकिक व्यवहाराचे पालन बाह्यतः लोक मार्गी लागावेत म्हणून उत्तम रीतीने करीत असतात. खरे पाहाता ते विधिनिषेधातीत झाले असतात. ते ज्यांच्यावर कृपा करतात त्यांनाही ते सर्व बंधनातून सोडवून विधिनिषेधातीत करतात. पण ही सर्व प्रक्रिया मनाची आहे. शरीराची राहाटणी शास्त्राधारे व्हावी व

सर्व मर्यादा सांभाळून शिष्याकडून व्यवहार पाळला जावा अशीच त्याची इच्छा असते. अशा सद्गुरूंची गाठ भाग्यवशात् क्वचितच पडते. साधारणपणे बाह्य क्रियाकर्म इत्यादीमध्येच गुंतलेले गुरू दृष्टीस पडतात. त्यांच्या ठिकाणी शक्तिपाताने अनुग्रह करण्याचे सामर्थ्य असत नाही,

साधनक्रियांची वैशिष्टचे :–

साधनात कोणकोणत्या क्रिया होतात हे आपण पाहिले. आता त्यांची वैशिष्टचे काय आहेत हे पाहू.

क्रिया अर्थशून्य नाहीत:–

साधनात ज्या ज्या विविध क्रिया होतात त्या अर्थशून्य तर नाहीत ना असा साधकाला संशय येतो. परंतु कुंडलिनी महाशक्ती जागृत झाल्यावर मंत्र, यंत्र, जप, तप, पाठ, पूजन इत्यादी जे या जन्मी व जन्मजन्मांतरी केलेले असते ते सर्व या नानाविध क्रियांच्यारूपाने फलसंपन्न होते. अशा क्रिया होणे ही परम भाग्यकारक व पुण्यकारक गोष्ट आहे. सद्गुरूंची कृपा झाल्याशिवाय हा क्रियांचा प्रसाद प्राप्त होत नाही. साधनाच्यावेळी क्रिया होत असताना साधक ज्या काही शुभ व अशुभ क्रिया करतो त्या सर्व क्रिया आत्मप्राप्तीसाठीच होत असतात, यात तीळमात्र शंका नाही. साधकाचे ओरडणे, बडबडणे व वाटेल तसे बोलणे या क्रिया जपाचे फल देतात. नानात-हेच्या शरीराच्या ज्या हालचाली होतात त्या पूजेचे फल देतात. साधनात येणारी तंद्रा किंवा निद्रा समाधीचे फल देतात रेचक, पूरक, कुंभक व प्राणायामाच्या क्रिया बलीचे काम करतात. त्यामुळे सर्व पापांचा नाश होतो. साधनाच्या वेळी जे काही बोलणे होते त्यापासून स्तोत्रपाठाचे फल मिळते. हाताने निरनिराळ्या अवयवांना केलेला स्पर्श व स्वत:च्या शरीराच्या अंगप्रत्यंगांना केलेले मर्दन हे मंत्रन्यासाचे काम करतात. क्रिया करताना खाल्लेले अन्न हे हवनाचे फल देते. क्रियाशक्तीच्या आवेशात साधकाची जिकडे दृष्टी जाते किंवा पाहिले जाते ते त्याचे पाहाणे ध्यानरूप होते. त्यामुळे त्याला ध्यानाचे फल मिळते. क्रिया करताना साधक जेव्हा जमिनीवर पडतो, लोळतो, आडवा होतो किंवा कसाही कलंडतो तेव्हा त्याला साष्टांग नमस्काराचे फल मिळते. अशाप्रकारे कुंडलिनीशक्ती जागृत झाल्यावर साधकाला जन्मजन्मांतरी केलेल्या नानाविध साधनांच्या आपापल्या संस्कारानुरूप क्रिया होतात. या क्रिया शुभ असोत अगर अशुभ असोत, त्या सर्व आध्यात्मिक ज्ञानामध्ये परिणत होऊन महामंगलदायक व सुखदायक होतात.

आनंदाची प्राप्ती :—

साधन करताना साधकाला ज्या ज्या क्रिया होतात त्या त्या क्रियांपासून त्याला परमानंदाची प्राप्ती होते. योगशिखोपतिषदाच्या सहाव्या अध्यायात म्हटले आहे की, "ज्या वेळेला साधकाला मागे सांगितलेले दिव्य अनुभव साधन करताना येतात त्यावेळी साधक अपरिमित आनंद व उल्हासाने उत्फुल्ल होऊन हसतो. प्रसन्न होतो. प्रेमाने स्वतःच स्वतःशी क्रीडा करतो व अगदी महान सुखात बुडून जातो. या आनंदाला स्थळकाळाची मर्यादा राहात नाही. अत्यंत घाणेरड्या, दुर्गंधीयुक्त, मलीन स्थानामध्ये किंवा संडासामध्ये सुद्धा बसल्याबसल्या क्रिया होऊन मन आनंदात बुडून जाते.

श्रीमुकुंदराजांनी आपल्या परमामृत ग्रंथात वेदान्ताचे निजवर्म श्रीगुरुमुखाने शक्तिपात होऊन, शिष्याला मिळाल्यावर आनंदाची प्राप्ती अष्टसात्त्विक क्रियांच्या द्वारा साधकाला प्राप्त होऊन, साधक कसा कृतार्थ होतो, हे स्वानुभवसुख हा बाराव्या प्रकरणात फार बहारीने वर्णन केले आहे.

विसरे प्रकाशे स्वरूप । हारपे सांपडे आपोआप । ऐसा करितां साक्षेप । मन स्थिरावे ॥ ११.२८ ॥ निवांत भोगी स्वरूप । डुल्लत आपोआप । मग तया सुखाचें माप । कवण करी ॥ २९ ॥ स्वेदकंपादि उठती । अष्टसात्त्विक भाव प्रगटती । पावे साम्राज्यसंपत्ती । रंक जैसा ॥ १२.१ ॥ चित्त चैतन्यीं हारपे । उरिजे ज्ञप्तिस्वरूपें । अखंडित आपआपें । ब्रह्मानंद ॥ २ ॥ तया सुखाचेनि समरसें । पावे सुलीन दशे । तें बोलावे कैसें अनुभवीं जाणती ॥ ३ ॥ जैसें अमृत चाखे आपुली चवी । तैसें स्वसुख अनुभवीं । तेथे कोण आठवी । संसारासी ॥ ४ ॥ वोळे स्वानंदाचा घन । दाटे सुख परिपूर्ण । तयामाजी विवेक सुजाण । हारपोनि जाय ॥ ५ ॥ अहंता स्वरूपीं गळे । विषयतृष्णा मावळे । इंद्रियांचे लळे । क्रियेवीण पूर्ण होती ॥ ६ ॥ महासुखाचे अरुवारी । आलिंगी स्वानुभूती सुंदरी । ज्ञानमात्र इयापरी । स्वरूप भोगी ॥ ४ ॥ निरसिता नेणीव । स्वरूपीं समरसे जाणीव । मग एकछत्री राणीवयोगियासी ॥ ८ ॥ सदा स्वानंदाचे सोहळे । विषयविजाती वितळे । स्वरूपसुखाचेनि मेळें । इंद्रिया तृप्ती ॥ ९ ॥ परमसुखाचेनि भरें । एकही स्फुर्ती न स्फुरे । कार्यजाती विसरे । निमिषात ॥ १० ॥ करूनि यज्ञाचिया कोडी । उभवितीं स्वर्गाची गुढी । ते सुख किजे कुर्वंडी । या ब्रह्मसुखासी ॥ ११ ॥ आनंद आनंदासी घोंटी । बोलतां परेसी पडे मिठी । मुक्यानें सुखाच्या गोष्टी । केवि कीजे ॥ १२ ॥

खुंटले मनाचे जाणणे । ते सुख अनुवादावें कवणें । हे अनुभवती तोचि जाणें । इतरां टकमक ॥१३ ॥ ऐशी पावोन योगखुण । स्वानंद भोगितो परिपूर्ण । तया योगिया न घडे शीण । संसाराचा ॥ १३.१ ॥

"सद्गुरुकृपेने शक्ती जागृत झाली की ती ऊर्ध्वगामिनी होऊन नानाविध क्रिया करू लागते. त्यांमुळे स्वरूपाचा क्षणभर प्रकाश पडतो तर क्षणभर विसर पडतो. मध्येच पूर्वसंस्कारांचा उदय झाल्यामुळे ते आपोआप गुप्त होते. क्रियांच्या जोरामुळे केव्हा ते आपोआपच सापडते. अशारीतीने क्रिया होता होता शेवटी मन आपोआप स्थिरावते. अशा रीतीने निवांतपणे मन स्वस्वरूपाचा उपभोग घेऊ लागले असता आनंदाने आपोआप डोलू लागते. अशाप्रकारे डोल येऊ लागल्यामुळे जे सुख होते त्या सुखाची गणती कोण करील ?

अशाप्रकारे आत्मस्वरूपाची प्राप्ती झाल्यावर स्वेद, कंप रोमांच इत्यादी सात्त्विक अष्टभाव साधकाच्या ठिकाणी उत्पन्न होतात. या क्रिया होणे ही किती भाग्याची व पुण्याची गोष्ट आहे हे यावरून ध्यानात येईल. या क्रिया आत्मस्वरूपरूप आहेत कारण आत्मस्वरूपाच्या प्राप्तीनंतर व आधीही त्या प्रकट होतात. असे झाले म्हणजे एखाद्या भिकाऱ्याला साम्राज्य प्राप्त व्हावे अशी स्थिती होते. साधनात होणाऱ्या क्रिया ह्या साम्राज्याप्रमाणे मोलाच्या व श्रेष्ठतम आहेत. (ह्याची जाणीव साधकाने निरंतर बाळगली पाहिजे.) असे असले तरी याची जाणीव न राहिल्याने भिकाऱ्याला जशी साम्राज्याची किंमत कळत नाही त्याप्रमाणे साधकालाही या क्रियांची किंमत कळत नाही. या क्रियांमुळेच चित्त चैतन्यात विलीन होऊन साधक ज्ञानमात्रच शिल्लक राहातो. अशी स्थिती झाली की साधकाला आपोआप अखंड ब्रह्मानंद अनुभवास येतो. ह्या सुखाच्या ठायी जीव समरस झाला म्हणजे तो त्यातच लीन होतो. त्या स्थितीचे वर्णन कोण करील ? ज्यांना त्याचा अनुभव आहे तेच ते जाणतात. अमृताने जशी स्वतःची चव घ्वावी त्याप्रमाणे साधक स्वसुखाचा अनुभव घेत असतो. तेथे संसाराची आठवण कोणास होणार ?

साधनात क्रिया सुरू झाल्या की आनंदाचा जणू मेघच वर्षू लागतो व परिपूर्ण असे सुख प्राप्त होते. त्या सुखामध्ये ज्ञानाज्ञान निवडणारा विवेक हारपून जातो. या क्रियांचे सामर्थ्य अपरंपार असते कारण त्यामुळे स्वस्वरूपाच्या ठायी अहंकार विलीन होतो. विषयांची तहान नाहीशी होते. कोणत्याही प्रकारचे बाह्य कर्मादी न करताही इंद्रियांच्या इच्छा पूर्ण होतात. परमसुखाच्या मृदू शय्येवर आत्मानुभूती म्हणजे स्वानुभवरूपी

सुंदर स्त्रीला जीव आलिंगितो व या रीतीने ज्ञानमात्र अशा स्वस्वरूपाचा अनुभव घेतो. या क्रियांमुळे नेणिवेचा निरास होऊन जाणीव स्वस्वरूपाच्या ठायी समरस होते. त्यामुळे योगीसाधकाला एकछत्री स्वराज्याची प्राप्ती होते. या साधनामुळेच साधक नेहमी स्वानंदाचे सोहळे भोगतो. विजातीय विषय वितळून जातात. एवढेच नव्हे तर स्वस्वरूपाशी मीलन पावलेली इंद्रिये तृप्त होतात. त्या आत्यंतिक सुखाच्या भरात एकही स्फूर्ती उत्पन्न होत नाही व एका निमिषात कर्मांची आठवण बुजून जाते. याज्ञिक लोक यज्ञ करून स्वर्गलोकी आपला झेंडा उभारतात पण ते स्वर्गसुख या साधनाने प्राप्त होणाऱ्या ब्रह्मसुखावरून ओवाळून टाकावे.

शक्तिपातयोगसाधनातील क्रियांमुळे उत्पन्न होणारा आनंदच आनंदाचे घुटके घेतो. त्या आनंदाचे वर्णन करताना परावाणीही कुंठित होते. अशा रीतीने वाचाच मुकी झाल्यावर ती सुखाच्या गोष्टी काय सांगणार? मनाची जाणण्याची शक्तीच जेथे कुंठित होते तेथे त्या सुखाचे वर्णन कोण करील? जो अनुभवी मनुष्य आहे तोच ते सुख जाणतो. इतरांना याबाबतीत नुसते टकमक पाहावे लागते हेच खरे. कारण अनुभूती ही चीजच निराळी आहे. या प्रकारची शक्तिपातयोगाची गुरुकिल्ली प्राप्त होऊन जो परिपूर्ण अशा स्वानंदाचा उपयोग घेतो त्या साधकयोग्याला संसाराचा शीण पडत नाही."

शक्तिपातयोगाच्या वेधदीक्षेमुळे आनंदावस्थेची प्राप्ती कशी होते हे कुलार्णवतंत्राच्या १४ व्या उल्लासात सांगितले आहे.

आनंदश्चैव कंपश्चोद्भवो घूर्णा कुलेश्वरी।
निद्रा मूर्च्छा च वेधस्य षडवस्थाः प्रकीर्तिताः ॥५॥

गुरुदेवांच्या अनुग्रहाने जेव्हा शिष्याला वेधदीक्षा प्राप्त होते तेव्हा आनंद, कंप, आसनापासून उत्थान, घुमणे किंवा डोलणे, निद्रा व मूर्च्छा या सहा अवस्था शिष्याच्या ठिकाणी प्रकट होतात. या सहाही अवस्थांमध्ये आनंदावस्थेची प्राप्ती ही मूर्धन्य स्थानी असल्याने ती प्रथम आली आहे.

सूतसंहितेच्या चतुर्थ खंडातील ३५ व्या अध्ययातही शक्तिपाताने आनंदप्राप्तीची सर्व लक्षणे तत्काल कशी प्रकट होतात हे सांगितले आहे.

देहपातस्तथा कंपः परमानंद हर्षणे।
स्वेदो रोमांच इत्येतच्छक्तिपातस्य लक्षणम् ॥२१॥

ज्यावेळी शक्तिपातयोगाची दीक्षा मिळते त्यावेळी शिष्याचा देह जमिनीवर आडवा पडतो. कंप होऊ लागतो. मन अत्यंत प्रसन्न होते व

परमानंदानें भरून जाते. अशाप्रकारे उद्‌भुत होणाऱ्या आनंदामुळे साधकाच्या अंगावर रोमांच उभे राहातात व त्याला घाम येतो.

कुलार्णव तंत्राच्या अष्टम उल्लासामध्ये शक्तिपातयोगाने आनंद-प्राप्ती कशी होते व या आनंदामुळे इतर लक्षणे कशी प्रकट होतात हे सांगताना श्री महेश्वर म्हणतात, " तुला वास्तविक खरा योग कशाला म्हणतात ते सांगतो. जेव्हा गुरूच्या शक्तिसंपातामुळे शिष्याची आंतरिक आत्मशक्ती कुंडलिनी देवी जागृत होते तेव्हा मन, प्राण व शरीराच्या नानाप्रकारच्या बाह्य व आंतरिक क्रिया होऊ लागून शिष्याच्या कोटी कोटी जन्मांचें संस्कार छिन्नभिन्न होऊन नानाप्रकारचे रूप धारण करतात. या क्रियांमुळे त्याला परमानंद होतो. तो आल्हादित होऊन हसू लागतो. त्याला परमप्रसन्नता प्राप्त होते. त्या आनंदाच्या आवेशामध्ये तो भूमीवर पडतो. लोळतो. कधी कधी आनंदाच्या उद्रेकात गाऊही लागतो. मागे वर्णन केलेल्या अनंत क्रियांची ही आनंदाची अवस्था मूलभूत भूमी ठरते. आनंदमदाने उत्साहित झालेले साधकाचे मन जेव्हा आंतरिक शक्तीच्या प्रेरणेने क्रिया करते तेव्हा त्या अवस्थेत त्याच्यावर कोणताही विपरित, वाईट किंवा दुष्ट परिणाम कोणत्याही प्रकारे होत नाही. त्याची बुद्धी निश्चलच राहाते. ज्यावेळी क्रियांचा आतील जोर संपतो तेव्हा साधक तत्काल आपल्या पूर्वीच्या अवस्थेत येतो."

साधनमहायज्ञात क्रियांद्वारा हवनः—

गुरुप्रदत्तशक्तीच्या प्रभावाने साधकाला ज्या नानाविध क्रिया होतात व जे बहुविध अनुभव येतात त्यामुळे त्याच्या पूर्वसंस्काराचा व पापाचा नाश होऊन तो आत्मप्राप्तीच्या मार्गात अग्रेसर होतो. बाह्य-चक्षूंच्याद्वारे दिसणारी परमेश्वराची सृष्टी सूक्ष्म अंशाने प्रत्येक मनुष्य मात्राच्या शरीरातील सुषुम्ना नाडीमध्ये सामावलेली असते. ज्यावेळी कुंडलिनीशक्ती क्रियाशील होते तेव्हा अंतरामध्ये हे विश्व सामावलेले आहे त्याची अनुभूती साधकाला येते. साधकाला संतोष व श्रद्धा प्राप्त व्हावी म्हणून ही सर्व शुभलक्षणे ब्रह्मस्वरूपाची अभिव्यक्ती करीत राहातात. ह्या सर्व क्रिया व अनुभव साधकाला त्याच्या गंतव्यस्थाना-पर्यंत जाण्यासाठी मार्गात दिसणारे जणू काही दीपस्तंभच असतात. एवढेच नव्हे तर साधकाला शेवटी कोठे जावयाचे आहे हेच या क्रिया दाखवीत असतात. शेवाळ्याने भरलेल्या विहिरीत खडा टाकला की शेवाळे दूर होऊन आतील स्वच्छ पाण्याचे दर्शन थोडावेळ घडते. परंतु शेवाळे एक झाल्यावर पुन्हा दर्शन नाहींसे होते. त्याप्रमाणे क्रियांद्वारा

मधून मधून ब्रह्माभिव्यक्ती होत असली तरी जोपर्यंत वासनादी संस्कार दूर होत नाही तोपर्यंत ब्रह्मप्राप्ती होत नाही. त्यासाठी शिवशक्तीचे सम्मिलन होणे आवश्यक ठरते. जोपर्यंत शिवशक्तीचे मिलन होत नाही तोपर्यंत नानाविध क्रियांचे व अनुभवांचे अलौकिक आश्चर्य साधक आपल्या अंतरामध्ये अनुभवीत राहातो. साधन हा एक महायज्ञच असतो. त्यामध्ये साधकाच्या वासनांचे, संस्कारांचे व अज्ञानाचे क्रियांद्वारा हवन होत असते. ज्यावेळी या यज्ञात पूर्णाहुती होईल त्यावेळी निर्विकल्प समाधीची अवस्था येऊन "**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः**" असे ज्ञान होऊन साधक कृतकत्य होईल.

या साधनरूप महायज्ञातील हवनाच्या प्रारंभापासून पूर्णाहुतीपर्यंत म्हणजे साधन सुरू झाल्यापासून शेवटपर्यंत ज्या ज्या घटनांचा साधकाला अनुभव येतो त्या सर्वांचे यथातथ्य करणे ही मनुष्यबुद्धीच्या पलीकडील गोष्ट आहे. प्रत्येक क्रियेचे विश्लेषण करणे व तिची कारणमीमांसा करणे हेही मनुष्यबुद्धीच्या आटोक्यातील नाही. ढोबळ व स्थूल मानाने जेवढी मीमांसा करता येणे शक्य होती तेवढी आतापर्यंत केली. परंतु हे कल्पनातीत साधन असल्याने क्रियांचे विश्वही कल्पनातीत असते. हा जयद्रथ व हा सूर्य या प्रमाणे ह्या क्रिया व हे अनुभव. एक आत्मप्राप्ती हेच लक्ष्य अभिप्रेत-असते. त्यामुळे विवेचन व विचक्षणा यांना गौणत्व येते व तेच खरे आहे. हे सर्व अनुभव देणारी अंतरशक्ती कुंडलिनी ज्या ज्या वेळी ऊर्ध्वगामिनी होईल त्या त्या वेळी आश्चर्यातिरेकाने मन स्तिमित होईल. असे तरतमभावात्मक क्रियानुभूतीचे अपार विश्व साधकापुढे साकार होते. परंतु या क्रियानुभूतींनीच साधक पूर्णपणे कृतार्थ होत नाही. ही क्रियानुभूतींची कथा जेव्हा ब्रह्मांड भेदून पैलाड जाते त्यावेळी ती महाशक्ती शिवाशी समरसून जाते. त्यामुळे पिंडब्रह्मांडाचा लय होऊन साधक कृतकृत्य होतो. कृतार्थ होतो.

कर्म, जाती व अवस्थांचे क्रियांना बंधन नाही :-

मागे लिहिलेल्या प्रमाणे कुंडलिनीशक्ती भिन्न भिन्न प्रकृतीच्या लोकांमध्ये त्यांच्या त्यांच्या शरीर, मन व प्राणाला अनुकूल होईल त्याप्रमाणे भिन्न भिन्न रूपाने योगशास्त्राने कथन केलेल्या समाधीनिमित्त शिवशक्तीच्या ऐक्यासाठी नानाप्रकारच्या क्रिया करते. सद्गुरुकृपेने दीक्षा झाल्यावर साधक स्त्री, पुरुष, बालक, तरुण, वृद्ध, रोगी, निरोगी, पापी, पुण्यवान, महामूर्ख, विद्वान, आस्तिक, नास्तिक यांपैकी कसाही असला तरी उपरोक्त लक्षणांपैकी काही लक्षणे तत्काल अगर क्रमाक्रमाने प्रकट

झाल्याशिवाय राहात नाहीत. सिद्धी आपापल्या संस्काराप्रमाणे साधकाला होत जाते. मात्र आत्मशक्तीच्या जागृतीमध्ये व क्रियांच्या उद्भूतीमध्ये कर्म, जाती अवस्था अगर आश्रम आड येत नाही. इतकेच काय देश, काल, परिस्थिती ह्या गोष्टीही क्रियांना बंधनकारक होत नाहीत. मनुष्यमात्र ईश्वरी ज्ञानाचा अधिकारी असल्यामुळे, **" म्हणोनि कुळ जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण। एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक ॥ ९.४५६ ॥ तेंचि भलतेणें भावें। मन मज आंतु येतें होआवे। आलें तरी आघवें। मागील वावो ॥ ४५७ ॥ तैसे लंवचि वहाळ ओहळ। जवं न पवती गंगाजळ। मग होऊनि ठाकती केवळ। गंगारूप ॥ ४५८ ॥ कां खैर चंदन काष्ठें। हे विवंचना तंवचि घटे। जंव न घापती एकवटे। अग्निमाजीं ॥ ४५९ ॥** असे श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केले आहे. प्रज्वलित अग्निमध्ये चंदनाची अगर खैराची लाकडे टाकली तरी शेवटी अग्नी त्या दोन्ही प्रकारांना आपल्यात सामावून घेतो. त्यांचे वेगळेपण तेथे शिल्लक राहात नाही. त्याचप्रमाणे सिद्धमहायोगाच्या क्रियांमुळे उत्पन्न झालेल्या अंतराग्नीत जन्मजन्मांतरीच्या सर्व संस्कारादिवासनांचे हवन होऊन साधक ब्रह्मरूप होऊन जातो.

विचार प्रवाह व एकाग्रता :–

साधन सुरू झाल्यावर चांगले वाईट नानाप्रकारचे अनंत विचार मनात सतत येतात. पूर्वायुष्यातील अनेक चांगल्या वाईट गोष्टी, संसारातील चिंता व भवितव्याबद्दलचे विचार याचवेळी पुढे दत्त म्हणून येतात. त्यामुळे मनाची एकाग्रता होत नाही. या जन्मीचे व पूर्व जन्मीचे संस्कार विकार, वासना, इच्छा, भोगाकांक्षा, सत्त्व-रज-तम हे गुण विचारांच्या रूपाने मनात उसळून येतात. यामुळे साधनाच्या प्रारंभीच्या अवस्थेत विचार कमी होत नाहीत व मनाची एकाग्रताही अल्पावकाशात साधत नाही. जोपर्यंत साधकाच्या मनात भोग, इच्छा आकांक्षा, तृष्णा, संसारवासना, संस्कार इत्यादी गोष्टी शिल्लक राहातात व त्या पूर्णपणे निवृत्त होत नाहीत तोपर्यंत विचार येत राहातात व मनाची एकाग्रता होत नाही.

साधन सुरू झाल्यावर अशाप्रकारे विचार उसळून आल्याने साधक घाबरून जातो. त्याला वाटते मन एकाग्र व्हावे म्हणून साधन घेतले पण येथे विपरीतच होत आहे. अशावेळी विचारांना थोपवून धरण्याचा, त्यांच्याशी सामना करून त्यांना बाहेर काढण्याचा किंवा मनन, जप, ध्यान आदी करून त्यांना दूर करण्याचा तो प्रयत्न करतो. या वेळी साधकाने महायोग

हा समर्पणाचा मार्ग आहे हे लक्षात घेऊन विचारांना कोणत्याही प्रकारे अडविता कामा नये. जितके विचार येतील तितके येऊ द्यावेत. विचार येणे हा सुद्धा एक क्रियेचा भाग असू शकतो. विचार उसळून आल्याने अंतःकरणात लपलेले संस्कार, वासना, इच्छा, भोगाकांक्षा इत्यादी बाहेर निघून जाऊन शरीर व मन शुद्ध होत जाते. जेव्हा ही शुद्धिकरणाची क्रिया पूर्ण होते तेव्हा मन आपोआप एकाग्र होते.

शारीरिक रोग, मानसिक जडता, संशय, निरुत्साह, आळस, भोगासक्ती, साधन करूनही उन्नती न होणे, दुःख, मानसिक कष्ट, अज्ञान अहंकार, जीवनासक्ती, द्वेष, अविवेक, हिंसा, दुःख, यमनियमांचे व खाण्या-पिण्याच्या नियमांचे पालन नीट रीतीने न होणे, स्पर्शास्पर्श दोष, पूर्व-जन्माचे तीव्रतम संस्कार उसळून येणे, पापाकडे प्रवृत्ती होणे, नानातऱ्हेच्या वासना, सांसारिक अडचणी इत्यादी अनेक कारणांमुळे साधनात अडथळे येऊन मन एकाग्र होत नाही. साधन नियमित केले म्हणजे ही विघ्ने दूर होऊन शरीर, मन, प्राण व नाडी शुद्धी होऊन मन आपोआपच एकाग्र होते. जशजशी ही शुद्धी घडून येते तसतसा चित्ताच्या सर्व वृत्तींचा निरोध होऊन मन हळूहळू व क्रमाक्रमाने शांत होत जाते. चित्तवृत्तीचा पूर्ण निरोध, विचाररहित स्थिती व पूर्ण वासनानिवृत्ती ही खूप वरची अवस्था आहे. दीर्घकाल, अखंड व प्रतिदिनी आदरपूर्वक अभ्यास केला म्हणजे ही स्थिती परमेश्वरकृपेने प्राप्त होते.

आज्ञाचक्रापर्यंत इंद्रियांच्या क्रिया कमी अधिक परिणामात होत असल्याचे दिसून येते. मनाच्या क्रिया तर होत राहातातच. ज्यावेळी आज्ञाचक्राचा भेद होतो त्यावेळी इंद्रियांच्या बाह्यक्रिया सर्वथा थांबतात परंतु मनाचा व्यापार तेव्हाही बंद होत नाही. जशजशी प्राणशक्तीची गती सहस्त्राराकडे वाढू लागते त्या त्या प्रमाणात मनही शांत होत जाते. ज्यावेळी सहस्त्रदलकमलामध्ये मन बांधले जाते त्यावेळी त्याचे चांचल्य पूर्णपणे नाहीसे होते. मन पूर्णपणे तेथे विलीन झाल्याने त्याची कोणत्याही प्रकारची वेगळी सत्ता किंवा कार्य दृग्गोचर होत नाही. यालाच अमनस्का-वस्था म्हणतात. शांभवी मुद्रा ही याची पूर्णता आहे. जोपर्यंत साधकाला ही अवस्था प्राप्त होत नाही तोपर्यंत बाह्यदृष्टीच्या उन्मेशनिमेषाचा व्यापार हा संपुष्टात येत नाही. ज्यावेळी बाह्यदृष्टीचा उन्मेषनिमेषाचा व्यापार थांबेल त्यावेळी अंतर्लक्ष स्थिर झाले आहे, मनावर विजय प्राप्त झाला आहे व आत्मचैतन्याचा प्रकाश उत्पन्न झाला आहे असे साधकाच्या अनुभवाला येते. मानसिक चांचल्य हे वायूच्या स्वंदनामुळे होत असते.

यासाठी या अवस्थेत मन, वायू म्हणजे प्राण व दृष्टी ह्या सर्व गोष्टी स्थिर राहातात. या अपूर्व अवस्थेत केवळ आकाशरूपी आत्मचैतन्य प्रकाशमान राहाते.

साधनातील क्रिया व अनुभव :–

क्रिया का होतात हे आपण पाहिले. आता साधन करताना साधकाला कोणकोणत्या क्रिया होतात व कोणकोणता अनुभव येतो याचा विचार करणे उदबोधक ठरेल. अगदी प्रथम महायोगाच्या चार अवस्था कोणत्या आहेत त्या पाहू. त्यामुळे साधनातील क्रिया व अनुभव यांचा क्रम व विकास कसा होतो हे कळून येईल.

वराहोपनिषदाच्या पाचव्या अध्यायात योगाच्या चार अवस्थांचे वर्णन करताना म्हटले आहे की –

आरंभश्च घटश्चैव तथा परिचयोऽपिच ।
निष्पत्तिः सर्वयोगेषुस्यादवस्थाचतुष्टयम ॥७१॥

चित्तवृत्तींचा निरोध होऊन ज्ञानप्राप्ती होऊन जीव ब्रह्मस्वरूप व्हावा यासाठी प्रवृत्त झालेल्या सर्वयोगामध्ये आरंभ, घट, परिचय व निष्पत्ती या चार अवस्था दिसून येतात.

आरंभ अवस्था:–

करणत्रय संभूतं बाह्यं कर्म परित्यजन् ।
आंतरं कर्म कुरुते यत्रारंभः स उच्यते ॥ ७२ ॥

ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या साधनत्रयामुळे उत्पन्न होणाऱ्या बाह्य कर्माचा त्याग करून साधक जेव्हा कुंडलिनी शक्ती जागृत होऊन तिच्या प्रेरणेमुळे होणारे आंतरिक व मानसिक कर्म करू लागतो म्हणजे त्याच्याकडून हे कर्म आपोआप होऊ लागते तेव्हा त्याला आरंभ अवस्था म्हटले जाते.

आरंभ अवस्थेमध्ये योगमाया कुंडलिनी शक्ती प्रथम हठयोगाला आरंभ करते. प्रथम साधनाला सुरुवात झाली की नाना प्रकारच्या शारीरिक क्रिया होऊ लागतात. आसने, बंध, मुद्रा, प्राणायाम व नाडी शुद्धी होऊ लागते. आसनामुळे शरीराला स्थिरता येते. बंध व मुद्रा झाल्यामुळे शरीर दृढ होते. प्राणायामाने शरीर कृश व लघु होते. नाडीशुध्दिद्वारा शरीरात साम्यता उत्पन्न होते. विषमता नाहीशी होते. अशा प्रकारे आरंभ अवस्थेतील हठयोगाच्या क्रियांमुळे शरीर परिपक्व होते व ते साधकाच्या ताब्यात राहू लागतो.

घटावस्था :–

वायुः पश्चिमतो वेधं कुर्वन्नापूर्यसुस्थिरम् ।
यत्र तिष्ठति सा प्रोक्ता घटाख्या भूमिका बुधैः ।।

महायोगाच्या दुसऱ्या अवस्थेला घटावस्था म्हणतात. या घटावस्थेत शरीर संपूर्णपणे शुद्ध व सत्त्वगुणयुक्त होते. विषयवासनांचा ऱ्हास होऊ लागतो. नेहमी ईश्वराचे स्मरण राहू लागते. हठयोग व लययोग हे सुगम होतात. साधकाचे अंतःकरण पवित्र व प्रसन्न राहू लागते. दिवसेदिवस वैराग्य चढते वाढते राहाते. ईश्वरप्राप्तीसाठी मन उत्साहित व त्याच बरोबर विरहाने व्याकूळ होते. आरंभावस्था व घटावस्था या एवत्रच दिसून येतात.

आरंभ अवस्थेत शरीर व घटावस्थेत मन सदृढ व पक्के होते. या दोन्ही अवस्थांमुळे मन व शरीर शुद्ध आणि स्वस्थ होते. त्यामुळे कुंडलिनीशक्तीचा ब्रह्मरंध्रामध्ये जाण्याचा मार्ग अत्यंत सुगम, सोपा व सरळ होतो. या दोन अवस्थांमुळेच साधकाचा प्राणवायू पश्चिममार्गाने सुषुम्नेमध्ये प्रवेश करतो व हळूहळू तो स्थिर करण्याची क्षमताही साधकाच्या अंगी येऊ लागते. या स्थिरता प्राप्तीच्या अवस्थेलाच शास्त्रकारांनी योग साधनातील घटावस्था मानले आहे.

परिचयावस्था :–

न सजीवो न निर्जीवः काये तिष्ठति निश्चलम् ।
यत्र वायुः स्थिरः रवे स्यात्सेयं प्रचयभूमिका ।। ७४ ।।

परिचयावस्थेमध्ये साधकाचे प्राण अंतरआकाशातील बोधगगनामध्ये विलीन होतात. प्राणशक्ती कुंडलिनी देवी हृदयाकाशामध्ये प्राण स्थिर करून सहस्त्रारामध्ये शिवाशी एकरूप होते. ज्यावेळी प्राणाचा अशा प्रकारे निरोध होतो त्यावेळी साधकाचे शरीर निष्क्रिय व निर्जीव आहे असे भासू लागते. साधकाचा देह मृतवत् आहे असे वाटते कारण बाह्य लक्षणांवरून सजीवतेचे एकही चिन्ह दिसत नाही. मात्र आतमध्ये तो सजीवच असतो.

परिचयावस्थेमध्ये प्राण व आत्मशक्ती एकत्रित होते. यामुळे महायोगातील परिचयावस्था किंवा सिद्धावस्थेची महती खूप मोठी समजली जाते. या अवस्थेला प्राप्त झालेला साधक सिद्ध होतो. त्याला अलौकिक सामर्थ्य प्राप्त होते. कुंडलिनी देवीची कृपा व गुरुदेवांचा परमानुग्रह यामुळे परिचयावस्था प्राप्त होते. या अवस्थेत शरीरामध्ये

व्याप्त असलेले प्राण केवळ संकल्पाने सर्व शरीरातून खेचले जाऊन मूलाधारात एकत्र होतात. ज्यावेळी अशाप्रकारे प्राण एकत्र येण्यास सुरवात होते तेव्हा साधकयोग्याला अनिर्वचनीय सुखाचा अनुभव येतो. शरीरातून ज्या ज्या ठिकाणाहून प्राण खेचले जातात ते ते ठिकाण मृतवत्, निश्चेष्ट व निष्क्रिय होऊ लागते.

सर्व शरीरात व्याप्त असलेले प्राण एकत्रित, अंगुष्ठमात्र व अतिसूक्ष्म होऊन सुषुम्ना विवरामध्ये प्रवेश करतात. असा प्रवेश झाला की मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञाचक्रांना भेदून प्राण सहस्त्रारात जातात. यावेळी जठराग्नी व मन प्राणात मिसळून जातात. बिंदूचे म्हणजे वीर्याचे स्वतःच्या ठिकाणीच भस्म होऊन त्याचे ओजामध्ये म्हणजे सामर्थ्यामध्ये रूपांतर होते. असे झाले म्हणजे सर्व ब्रह्मांडाला क्रियाशील करणाऱ्या व सर्वांचे जीवन-रूप असलेल्या प्राणाचा परिचय होऊन साधकयोगी कृतार्थ होतो. या अवस्थेत साधकाच्या बुद्धिमध्ये आत्मतेजाचा प्रकाश उत्पन्न होतो. **" तत्र ऋतंभरा प्रज्ञा "** अशा अवस्थेत सत्य व सम्यक् ज्ञानाचे अवलंबन करणारी जी बुद्धी साधकाला प्राप्त होते तिला ऋतंभरा प्रज्ञा म्हणतात. अशा प्रकारच्या सत्यज्ञानाच्या साक्षात्काराने साधक सिद्ध होतो व प्रकृतीवर आपले प्रभुत्व स्थापन करतो. त्याला सर्वत्र शक्तीचे भांडार खुले होते. कुंडलिनी शक्ती सरलता धारण करते व सुषुम्नेमध्ये आपले स्थान स्थापित करते. यामुळेच साधकयोग्याला आत्मज्ञान अत्यंत सहज व सुलभतेने होते.

निष्पत्ती अवस्थाः–

यत्रात्मना सृष्टिलयौ जीवन्मुक्तिदशागतः ।
सहजः कुरुते योगं सेयं निष्पात्तिभूमिका ॥

निष्पत्ती अवस्थेमध्ये साधकयोग्याच्या ठिकाणी आत्मज्ञानाचा उदय होतो. त्यामुळे पिंडब्रह्मांडाचा लय होतो. यावेळी साधकयोग्याच्या जीवाचे जीवपण जाऊन त्याला शिवपण प्राप्त होतो व कुंडलिनी महा-शक्ती आधाररूप परमशिवामध्ये विलीन होतो. त्यावेळी योग्याला जीवन्मुक्तदशा प्राप्त होते.

क्रिया व अनुभवः–

शक्ती जागृत झाल्यावर साधकाला ज्या क्रिया होतात, जे अनुभव येतात व जी लक्षणे प्रकट होतात ती इतक्या विविध प्रकारची आहेत की त्यांची गणना करणे व वर्गीकरण करणे केवळ अशक्यप्राय आहे.

तरीसुद्धा उद्‌बोधित कुंडलिनीचा अविष्कार पुढील प्रकाराने झालेला दिसून येतो.

चतुर्विधा सा संदिष्टा क्रियावत्यादि भेदतः ।
क्रियावती वर्णमयी कलात्मा वेधमय्यपि ।।

अविर्भावलक्षणावरून कुंडलिनीचे क्रियावती, वर्णमयी, कलात्मा व वेधमयी असे चार प्रकार होतात.

विशेषकरून योगाचे आविष्कार पुढील चार प्रकाराने होत असल्याचे दिसून येते.

मंत्रो लयो हठो राजयोगोंऽतर्भूमिकाः क्रमात् ।
एक एव चतुर्धाऽयं महायोगोऽभिधीयते ।। १२९ ।। योगशिखोपनिषत्

हठ, मंत्र, लय व राजयोग या एकाच योगाच्या चार अंतर्गत भूमिका आहेत. या चार प्रकाराने विभक्त होऊन क्रिया होताना व निरनिराळे अनुभव येताना दिसले तरी हा एकच योग आहे. सिद्धयोगामध्ये या चारही योगांचा समावेश होत असल्याने त्याला महायोग म्हटले जाते.

दीक्षा झाल्याबरोबर साधकाचे शरीर, मन, बुद्धी व वासना यांचे शुद्धीकरण सुरू होऊन भक्ती व ज्ञानाचा उद्रेक व आविष्कार होत असल्याने त्या दृष्टीनेही क्रिया होऊन साधकाला अनुभव येतात.

येथे एक गोष्ट साधकाने विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे की साधन करताना क्रियांचा क्रम एकसारखा राहील असे नाही. त्याचप्रमाणे एक क्रिया चालू असताना दुसरी होणार नाही असेही नाही. एका वेळेस मिश्रस्वरूपात अनेक बाह्य व अंतर्गत क्रिया साधनाच्या वेळी चालू असतात. क्वचित एक एक क्रिया श्रमक्रमाने होऊनही प्रगती होत राहाते.

हठयोगाच्या क्रिया :–

उद्‌बोधित कुंडलिनीशक्तीचा भौतिक पातळीवर जो आविर्भाव होतो तोच वास्तविक हठयोगात अभिप्रेत आहे. हठ या संस्कृत शब्दात दोनच अक्षरे आहेत "ह" हे सूर्यवाचक व "ठ" हे चंद्रवाचक आहे. अर्थात हठयोगाचा अर्थ चंद्रसूर्यमीलन असा होतो. म्हणून ज्यात इडा-पिंगला नाड्या, अपान व प्राणवायू किंवा मनाचा प्राणशक्तीत लय होणे या शारीरिक गोष्टींचा समावेश होतो तो हठयोग होय. सिद्ध-सिद्धांतपद्धतीत या दृष्टीने असे म्हटले आहे की–

हकारः कीर्तितः सूर्यष्ठकारश्चद्रं उच्यते ।
सूर्याचंद्रमसौर्योगाद्धठयोगो निगद्यते ।।

हठयोगाच्या पातळीवर जेव्हा कुंडलिनी कार्यान्वित होते तेव्हा तिला क्रियावती संबोधणे अगदी युक्त आहे. ह्याच स्थितीत साधकाच्या अनेकानेक हठयोगाच्या क्रिया आपसुखच चालू असतात. तो हेतूपूर्वक काहीही करीत नाही. ह्या त्याच्या क्रिया नूतन जागृत झालेल्या शक्तीच्या प्रभावाने तिच्या दाबाखाली आपोआप सुरू असतात. हठयोगान्तर्गत असलेल्या या क्रिया आसने, प्राणायाम, बंध व मुद्रा यांच्या रुपाने उद्‌बोधित कुंडलिनीच्या प्रभावामुळे घडून येतात. मात्र कोणत्या क्रिया कशाकरिता होत आहेत यासंबंधी साधकास त्यावेळी आंवाका नसतो. काही क्रिया योगशास्त्राच्या कोठल्याही संदर्भ ग्रंथांमध्ये मुळीच आढळून येत नाहीत. कधीकधी या हठयोगाच्या क्रिया इतक्या गुंतागुतीच्या व कठीण असतात की त्या साधनाव्यतिरिक्तवेळी करणे केवळ अशक्यप्रायच होय. कुंडलिनी सुप्त असताना आवश्यक त्या पद्धतीने अवयव वाकविणे नेहमी असमर्थतेचे असते. या क्रियांपैकी काही विशिष्ट महत्त्वाच्या क्रिया हठयोगावरील सर्वमान्य ग्रंथात नवीन साधकाने कुंडलिनी शक्ती जागृत करण्याकरिता उपयोजाव्यात असे सांगितले आहे. पण उद्‌बोधित झालेली कुंडलिनी शक्ती याच क्रिया अगदी सहज सरावातल्याप्रणाणे शारीरिक आरोग्य पूर्णपणे सांभाळून महायोग होताना दृष्टोत्पत्तीस येतात.

नाडीशुद्धीच्या क्रिया :–

शरीरातील सर्व नाड्या मलाने भरलेल्या असतात. त्यामुळे प्राण सुषुम्ना नाडीमध्ये सहजतेने प्रवेश करू शकत नाही. या कारणाने प्राणायामाची सिद्धी होत नाही व तत्त्वज्ञानही होत नाही. म्हणून साधनाच्या सुरवातीला नाडीशुद्धी होणे आवश्यक असते. यासाठी गुरुकृपेने जेव्हा कुंडलिनी शक्ती जागृत होते तेव्हा प्रथम ती साधकाकडून नाडीशुद्धीच्या क्रिया करविते. वातक्रम, व्युत्क्रम, शीतक्रम, भस्त्रा, वायुसार, नौली, कपालभाती इत्यादी क्रिया नेती, धौती, बस्ती इत्यादी क्रियांचे काम करतात. या क्रिया साधकाला आपोआप आयूच्या द्वाराने रेचक, पूरक व कुंभक प्राणायामाच्या रूपाने होतात. अर्थात साधकाच्या मुखातून, नाकातून, गुदद्वारातून व लिंगातून प्राणापान वायूने सोडणे, ग्रहण करणे व निरोध करणे यांच्यारूपाने या सर्व क्रिया कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने होत राहातात.

नाडीशुध्दी होत असताना अनेक प्रकारे अंग विकृतीच्या क्रिया होतात. चेहऱ्यावर नानाविध भाव उमटतात. देहविक्षोभ, व्यायाम,

अंगमर्दन, झोप, घर्षण, डोळ्यातील बुबळे निरनिराळ्या तऱ्हेने व प्रकाराने फिरविणे, हातपाय फेकणे व पसरणे, डोळे लहान मोठे करणे, धावणे, फिरणे, घूर्णा म्हणजे शरीर डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे गोलाकार फिरणे, शरीर मागे अथवा पुढे पडणे, मान गोलाकार फिरणे, घरभर गडबडा लोळणे, नाक, डोके इ. अवयव जमिनीला घासणे, नृत्य करणे, बेडकाप्रमाणे इकडून तिकडे उडया मारणे व पडणे, नुसत्या उडया मारणे, ओलांडल्यासारखी उडी मारणे, वेडयाप्रमाणे दारू पिऊन उन्मत्त झालेल्या माणसाप्रमाणे किंवा भूत अंगात आलेल्या माणसाप्रमाणे शारीरिक व मानसिक क्रिया करून त्याप्रमाणे भाव दाखविणे इत्यादी क्रिया प्राणवायूची गती ऊर्ध्व झाली की साधकाकडून आपोआप होतात. या क्रियांप्रमाणेच आपापल्या प्रकृतिप्रमाणे कितीतरी विविध विकृत क्रिया साधकाकडून होतात. कंप, रोमांच, अंतःस्फुरण, स्पंदन, स्पर्श, जांभया, हसणे, रडणे, पडणे, खांबाप्रमाणे स्थिर होणे, शरीर जड होणे, जमिनीला चिकटून जाणे, श्वासप्रश्वास अत्यंत जोरजोराने होणे, घाम येणे, डोळ्यातून पाणी गळणे, लाळ गळणे, शरीर कृश होणे, मलमूत्र अल्प होणे, कोष्ठकाठिन्य होणे, कमी किंवा जास्त झोप येणे अगर झोप नाहीशी होणे, थंडी वाजणे, ताप आल्यासारखे वाटणे, शरीरात जो सुप्त रोग असेल तो प्रकट होऊन बाहेर पडणे, शरीर दुखू लागणे, पोटात दुखणे, कामवासना उत्तेजित होणे, आत्यंतिक कामेच्छेने वीर्यपात होणे, जुलाब किंवा जास्त लघवी होणे, ताप येणे, उचकी, श्वास, दमा इत्यादी शरीरात मूलतः असलेले रोग वाढणे, भूक वाढणे किंवा कमी होणे, इत्यादी साधकांच्या संस्कारानुसार कुंडलिनीशक्ती सर्व दोषांच्या निवारणार्थ नाना प्रकारच्या क्रिया करविते. या क्रियांमुळे मन बाह्यज्ञानशून्य व निष्क्रिय होते. प्राणकलेचा प्रवाह मूलाधारातून सहस्राराकडे व पुन्हा सहस्राराकडून मूलाधाराकडे वाहात असतो. या प्राणकलेच्या स्रोतामुळे नानातऱ्हेच्या सुखाचा अनुभव येतो. मेरुदंडात तीव्र कंपन होऊन शरीर शून्य होते.आपल्याला शरीरच नाही अशी प्रतीती येते. सर्वत्र शून्य भासू लागते. डोळे इतके आत ओढले जातात की कितीही इच्छा केली तरी ते उघडले जात नाहीत. शरीरातून विजेचे प्रवाह चालले आहेत याचा अनुभव येतो. सर्व शरीर इतके आत खेचले जाते की ते चिमटून लहान होऊन नाहीसे होईल असे वाटते. मन इतके आवेशायुक्त होते की शरीरात कोणीतरी प्रवेश केला आहे व अष्टौप्रहर आत क्रिया चालू आहेत याची जाणीव होते. जेथे कोठे मन

एकाग्र होईल तेथे शरीर झटकन कापू लागते व अनिच्छेने शरीर हलू लागते. अत्यंत घाणेरड्या, मलीन स्थानामध्ये किंवा संडासामध्ये शौचाला गेल्यावरही मन आनंदमग्न राहाते.

कधी कधी रस्त्यावरून चालताना मनात इतका तीव्र आवेश येतो की साधकाला वाटते आपण जमिनीवरून चालूच नये. आकाशातून उडत जावे. जोरजोराने पळावे. शरीर इतके हलके होते की एखादे वाळलेले पान हवेवर आपसुख तरंगत राहाते तसे शरीर हवेवर तरंगत आहे अशी अनुभूती येते. कितीही चालले तरी शरीर थकत नाही. मन प्रफुल्लित व प्रसन्न राहाते. स्वप्नामध्येसुद्धा अप्रसन्नता वाटत नाही. नित्याच्या व्यवहारात काहीही इष्ट किंवा अनिष्ट घडले तरी त्यामुळे मन विचलित होत नाही. सकाळ संध्याकाळी भूकेची वेळ झाल्यावर ज्याप्रमाणे माणसाचा जीव भुकेने व्याकूळ होतो त्याप्रमाणे साधनाची वेळ झाली की साधनासाठी त्याचा जीव व्याकूळ होतो. मग त्यावेळी इच्छा नसली तरी क्रियेचा वेग जाणवू लागतो. त्याला साधनानाला बसल्याशिवाय चैनच पडत नाही. शरीर मन व प्राण हे साधनासाठी इतके विवश होतात की त्यावरील ताबा नाहीसा होतो. साधकाचे रोग अत्यंत त्वरेने नाहीसे होतात.

साधनात साधकाला सिद्ध, पद्म, भद्र, मुक्त, सिंह, गोमुख, वीर, धनु, मृत, गुप्त, मत्स्य, पश्चिमोत्तान, मत्स्येंद्र, गोरक्ष, उत्कट, मयूर, कुक्कुट, कूर्म, मंडुक, वृक्ष, गरूड, वृषभ, शलभ, मकर, उष्ट्र, भुजंग इत्यादी योगाची नानाप्रकारची आसने होतात. या आसनांनी शरीराला स्थिरता प्राप्त होते व अग्नी प्रदीप्त होऊन पचनक्रिया उत्तमप्रकारे होऊ लागते. त्यामुळे रजोगुण व तमोगुणांचा लोप होत जाऊन शरीर निरोगी राहाते.

साधकाला कित्येक योनीतील आसने होतात कारण जीवाचे कोट्यवधी योनीतून जन्म झालेले असतात. जन्मजन्मांतरी भोगलेल्या योनीतील अती सूक्ष्म संस्कार जीवावर झालेले असतात. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर उक्त प्रकारच्या नानाविध क्रिया होऊन हे संस्कार स्मृतिपथात येऊन निघून जातात. स्वप्नाप्रमाणे हे संस्कार साधकाला ध्यानावस्थेमध्ये भासमान होतात. या संस्कारांमुळेच साधक स्वाभाविकपणे आसनादी क्रिया करतो. कोणत्या योनीचे कसकसे संस्कार आहेत हे शारीरिक, मानसिक, प्राण व स्वरांच्या क्रियेवरून अनुमानाने साधकाला समजून येतात. किंवा ज्यावेळी शुद्ध स्मृती दृढ होते त्यावेळी

साधकाला जन्मजन्मांतरातील संस्कारांचा उत्तमप्रकारे अनुभव येतो असे प्रत्यक्ष दिसते. सारांश संस्कारांच्या दृढ परिणामांमुळेच चौऱ्यांशी लाख आसनांपैकी हजारो प्रकारची आसने साधक आपोआप करतो. पद्म, ताल, वृक्ष, इत्यादी उद्भिजयोनींची; कूर्म, मत्स्य, मकर, इत्यादी जलयोनींची; भुजंग, शलभ, वृश्चिक इत्यादी कीटयोनींची; मयूर, गरूड, कुक्कुट, हंस इत्यादी पक्षीयोनींची व सिंह, वृषभ, उष्ट्र इत्यादी पशुयोनींची आसने तो करतो. साधनाच्या वेळी शक्तीकडून साधकाला उभे करून, बसवून, झोपून, आडवे पाडून, उलटसुलट करून, वाकडेतिकडे व्हावयास लावून नानाप्रकारांनी आसने करवून घेतली जाताना दिसून येते.

बंध व मुद्रा :–

महामुद्रा, नभोमुद्रा, उड्डयान, जालंधर, मूलबंध, महावेध, खेचरी, विपरीत करणी, योनी, वज्रोली, शक्तिचालिनी, ताडागी, मांडुकी, शांभवी वैश्वानरी, वायवी, आकाशी, पार्थिवी, आंभसी, आश्विनी, पाशिनी, काकी, मातंगी, आणि भुजंगिनी या पंचवीस मुद्रा योग्यांना सिद्धी देणाऱ्या आहेत. साधनात आसनाबरोबरच साधकाला त्याच्या पूर्वसंस्काराप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे या होतात. आसनांचे मुख्य कार्य शरीर स्थिर करून दहा वायूंना उत्तमप्रकारे चालविणे हे आहे व मुद्रांचे प्रधान कार्य शरीर दृढ करणे व प्राणवायूला शरीराच्या विशेष भागात स्थिर करणे हे असून त्याच्या योगाने मन धारणा करण्यास समर्थ होते.

साधन होत असताना मुद्रा शरीराच्या कोणत्या स्थानात होतात ते पाहाण्यासारखे आहे. मूलाधारात व योनिस्थानामध्ये अश्विनीमुद्रा, मूलबंध व महाबंध होतो. गुदद्वाराचे संकोचन व विकास झाल्याने हया क्रिया होतात. बेंबी व पोटाच्या ठिकाणी उड्डयान बंध, ताडागी व सारंगी मुद्रा होतात. यांचे कार्य पोटात वायू भरणे व सोडणे हे आहे. कंठ संकोच झाला की जालंदर बंध, डोळ्यांच्या ठिकाणी त्राटक व शांभवी मुद्रा होते. कानात नादश्रवण, षण्मुखी मुद्रा व भ्रामरी होते. जिभेच्या ठिकाणी खेचरी, नभोमुद्रा व मांडुकी होते. मुखात भुजंगी, काकी व योनीमुद्रा होते. मस्तकाचे ठिकाणी विपरीत करणीमुद्रा आणि सर्वांगाचे ठिकाणी महामुद्रा, महावेध व ताडन परिधानादी क्रिया होतात. याप्रमाणे साधकाला शास्त्रानुसार कुंडलिनी शक्ती आपोआप क्रिया करविते. या मुद्रांच्या साधनाने साधकाचा आनंद व उत्साह वाढतो व त्याचा

नित्य अभ्यास होत राहिल्याने जठराग्नी प्रज्ज्वलित होतो. या क्रियांमुळे श्वास, प्लीहा इत्यादी वीस प्रकारचे श्लेष्म रोग दूर होतात.

प्राणायाम :–

हठयोगशास्त्रात कुंडलिनी शक्ती जागृत करण्याकरिता प्राणायाम हेच मुख्य साधन सांगितले आहे. योगशास्त्रानुसार कनिष्ठ प्राणायामात घाम, मध्यमात कंप आणि उत्तमात प्राणाचे उत्थान होऊन कुंडलिनी जागृत होते. मात्र हे प्राणायाम आपल्या इच्छेने परिश्रमपूर्वक करावे लागतात. परंतु गुरुकृपेने ज्यावेळी कुंडलिनी शक्ती जागृत होऊन क्रिया करू लागते. त्यावेळी त्यापेक्षाही उत्तम प्राणायाम अनायासे, अपरिश्रमाने आपोआप स्वतः होतात. त्यांच्या भोगाने घूर्णा, योगनिद्रा, रोमांच इत्यादी आनंदाची चिन्हे उत्पन्न होऊन साधक आनंदाच्या आवेशामध्ये ओंकार ध्वनी करू लागतो. अंग मोडणे, कंप, भ्रमण, खूप घाम येणे नाना तऱ्हेचे उच्चार इत्यादी क्रियाही त्याबरोबर होतात. आनंदाचे अश्रू त्याच्या डोळ्यातून ओघळू लागतात व साधकाला ज्ञानयुक्त मूर्च्छा येते. असे घडू लागले म्हणजे खरा योग कशाला म्हणतात याचा अर्थ स्पष्ट होऊ लागतो. हाच उत्तमातील उत्तम प्राणायाम होय. ज्या ज्या वेळी कुंडलिनी शक्तीला सुषुम्ना मार्गातून ब्रह्मरंध्रात जाण्याची आवश्यकता उत्पन्न होते त्या त्या वळी कुंडलिनी महादेवी स्वतः साधकाकडून योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे नाना प्रकारच्या क्रियांबरोबर प्राणायाम करविते. त्यामुळे साधकाचे शरीर, मन व प्राण स्वस्थ होऊन त्याला विनासायास आपली अभीष्ट सिद्धी प्राप्त होते.

याचप्रमाणे कुंडलिनी महाशक्ती साधकाकडून कित्येक प्रकारचे प्राणायाम करविते. सूर्यभेदन, उज्जायी, सीत्कारी, शीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्छा, व प्लाविनी हे आठ प्रकारचे कुंभकप्राणायाम आहेत. याच्याशिवाय बाह्य, आभ्यंतर, स्तंभवृत्ती व केवल कुंभक हेही प्राणायाम आहेत. हेही आवश्यकतेनुसार साधकाला स्वतः आपोआप होतात. या सर्वांचे प्रत्यक्ष ज्ञान महायोगाचे साधन करण्यानेच होते. याच्या बरोबरच साधकाला पंचमहाभूतांच्या तत्त्वसमूहाचे ज्ञान आतून स्फुरू लागते. साधक जन्मजन्मांतरी ज्ञान, योग, भक्ती, मंत्र, जप, देवी-देवतांची पूजा इत्यादी साधने मोक्षप्राप्तीसाठी करीत आलेला असतो. महायोगाच्या साधनात पूर्व जन्मातील संस्कारानुसार साधन प्रकट होत जाते. जर पूर्वजन्मी ज्ञानाचे साधन केले असेल तर त्याला हे साधन करताना आत्मतत्त्वाच्या एकत्वाचा अनुभव येऊ लागतो. योगसाधनाचे

संस्कार यमनियमादी अष्टांग योगातील क्रिया होऊन प्रकट होतात. चित्त चांचल्य, चित्तक्षोभ, भय, त्रास, शंका, संशय, उग्रता, गर्व, प्रफुल्लता, विषाद, स्वप्नयुक्त निद्रा, सुषुप्ती, मूर्छा, भाव इत्यादी भगवत्प्रेमाच्या लक्षणांच्या द्वारा भक्तिसाधनाचा आविष्कार होतो. पूर्वजन्मात मंत्र-योगाचा अभ्यास केल्यास वरील भक्तिमार्गाच्या लक्षणांबरोबरच साधनाला देवदेवतांची दर्शने होतात. पूर्वजन्मातील विभिन्न साधनाभ्यासामुळे साधकांना एकसारखे अनुभव व एकसारख्या क्रिया होत नाहीत. प्रत्येकाची प्रवृत्ती व प्रकृती भिन्न असते. त्यामुळे साधकांच्या क्रियांमध्ये व अनुभवात वैविध्य व वैचित्र्य दिसून येते. इतके सर्व जरी भिन्न असले तरी साधनाचे अंतिम फल समाधी, ज्ञान व मोक्ष हे एकच आहे हे अगदी निःसंशय.

नऊरस :–

रौद्रोऽद्भुतश्च श्रृंगारो हास्यं वीरो दया तथा ।
भयानकश्च बीभत्स शांतः सप्रेम भक्तिकः ।।

रौद्र, अद्भुत, श्रृंगार, हास्य, वीर, दया, भयानक, बीभत्स व शांत हे नऊ भावरस आहेत. तीक्ष्णता, विस्मयजनकता, रतिजनकता, प्रसन्नता, उत्साह, करुणा, भयसूचकता, घृणा व नम्रता हे नऊ रसांचे भाव आहेत. कुंडलिनी शक्ती जागृत झाली की नाना प्रकारच्या अद्भुत शास्त्रांचे ज्ञान व सर्व प्रकारचे अज्ञात भाव समूह स्वतः क्रमाक्रमाने प्रकाशित होत जातात. या भावावेशामध्ये साधक आत्यंतिक आनंदात निमग्न होऊन जातो. साधनाच्यावेळी त्याच्या मनात ज्या ज्या गोष्टींचे आतून स्फुरण होते त्या त्या गोष्टी क्रियारूपाने आपापल्या संस्कारानुरूप साधकाकडून प्रकट होत जातात. या भावक्रियांचा कोणताही ठराविक क्रम नाही. ज्यावेळी जो भाव किंवा जी वृत्ती येते ती तसे आपले काम करते. अव्यक्त चैतन्यशक्तीमुळे साधकाच्या मनाला सूक्ष्मातिसूक्ष्मापासून कधी कधी तीव्रातितीव्र भावनांच्या प्रेरणा होत असतात. हे असे का होते व कशासाठी होते याबद्दल साधकाने निष्कारण विचार करण्याचे कारण नाही. आतून उसळून येणाऱ्या भावांना व क्रियांना कोणताही अडथळा न करता व त्यांना न थांबविता साधकाने त्यांना त्यांच्या दृष्टीने योग्य असलेल्या कार्यात परिणत होऊ देण्याची नितांत आवश्यकता आहे. अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने साधकाने अत्यंत निःशंक व निर्भय होऊन आपल्या इच्छाशक्तीला क्रियेमध्ये परिणत होऊ दिले पाहिजे.

ज्यावेळी साधकाच्या ठिकाणी रौद्ररसाचा आविष्कार उत्पन्न होतो त्यावेळी साधनकालात साधक क्रोधाने व कर्कश भाषेने आपले रौद्ररूप प्रकट व प्रकाशित करतो. ज्यावेळी साधकाच्या ठिकाणी अद्‌भुत रसाच्या क्रिया होतात त्यावेळी तो महाविस्मयता दाखवितो कारण त्याला तसे विस्मयकारक अनुभव येत असतात. त्याचप्रमाणे साधकाच्या ठिकाणी श्रृंगाररसाचा आविर्भाव झाला की तो आपल्या उपास्य देवतेला पतीभावनेने पाहातो किंवा आत्मरतीत निमग्न होतो. साधकाच्या ठिकाणी हास्यरसाचा विकास झाला की साधक साधनकालात स्मित, हसित, विहसित, अवहसित, अपहसित व अतिहसित अशा सहाप्रकारच्या हास्यांपैकी कोणत्याही प्रकारच्या हास्याने त्याच्याकडून हसण्याची क्रिया होते. इतकेच नव्हे तर तास तासपर्यंत साधक नानाप्रकाराने हसत राहातो. साधकाच्या ठिकाणी क्रिया होत असताना जेव्हा वीररसाचा आविर्भाव होतो त्यावेळी तो उत्स्फूर्त गर्जना, आरडाओरड, शरीर इकडे तिकडे फेकणे, तोडणे, वाकविणे, ओरबाडणे, आवशामध्ये कठिणातले कठीण कामही सहज करणे इत्यादी क्रिया करतो. अथवा त्या अवस्थेत तो बळकटातील बळकट वस्तूही तोडूमोडू शकतो. अर्थात साधनकालात साधक वीराप्रमाणे उत्साहपूर्ण होतो. साधनाच्यावेळी पुष्कळसे साधक करुणरसाने भरून जातात व अत्यंत कष्टदायक अशा करुणा उत्पन्न करणाऱ्या स्वराने रडू लागतात. त्यामुळे इतरांच्या मनातही करुणा उत्पन्न होऊन त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागतात. पुष्कळशा साधकांना साधन करताना अंतःकरणात भयाचा संचार झाल्याचे अनुभव येते. त्यामुळे भयभीत होऊन त्यांच्या तोंडून भयसूचक शब्द बाहेर पडतात. कित्येक साधकांच्या तोंडून साधनकालात निंदा व घृणास्पद शब्द बाहेर पडतात. इतकेच नव्हे तर तिरस्कारसूचक अशा शरीराच्या चेष्टाही त्यांच्याकडून आपोआप घडून येतात. शांतभाव उत्पन्न झाला की साधनकालात साधकाच्या मन, प्राण व शरीरातील इतर क्रियांचा रोध होऊन तो स्वस्थ व चुपचाप बसतो. त्यामुळे तो आपोआपच हळूहळू आपल्या अंतरात्म्याशी संलग्न होत जातो. यामुळे त्याला परमशांती व महासुखाचा अनुभव येतो.

याप्रमाणे महायोगाच्या साधनात साधकाला अंतरात्म्याच्या प्रेरणेने शरीर, मन व प्राण यांच्या क्रिया होतात. त्यामुळे त्याला सर्व तत्त्वांचे व भौतिक विषयसमूहाचे ज्ञान होते. या रीतीने ही प्राकृतिक तत्त्वे साधकाला अनुकूल होतात. त्यांचे स्थान, कार्य, स्थिती व स्वरूप यांचे ज्ञान साध-

काला स्वतः होते. साधक या ज्ञानाच्या जोरावर आवश्यकतेनुसार त्यांच्यापासून आपली भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती करून घेतो. त्याचबरोबर हे लक्षात येते की ही भौतिक तत्त्वे साधकाला कधीही प्रतिकूल होत नाहीत.

मंत्रयोगाच्या क्रिया :–

कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर वाचेवर जो परिणाम होतो तो मंत्रयोग होय. सिद्धपुरुष आपल्या सिद्धसंकल्पवाणीने स्त्री व पुरुष साधकास एकाक्षरी किंवा अनेकाक्षरी मंत्रोपदेश करतात. त्याने साधकाची सुप्तशक्ती जागृत होते. हे अक्षर किंवा शब्दसमुच्चय काही विशिष्ट मंत्र असतो. त्यांच्या जपाच्या योगाने साधक मायेच्या आवरणातून मुक्त होतो. मंत्र शब्दाची व्याख्या "**मननात् त्रायते इति मंत्रः**" अशी आहे. ज्यावेळी जप करता करता मनन सुटते, मन नाहीसे होते, मंत्र थांबतो, त्रिपुटीचा नाश होतो व साधकाला लयावस्था प्राप्त होते तो मंत्रयोग होय.

गुरूने मंत्र दिल्यावर शक्ती जागृत होऊन नाना तऱ्हेच्या क्रियांचे अनुभव साधकाला येतात किंवा मागे सांगितलेल्या चार प्रकारांपैकी एखाद्या प्रकाराने दीक्षा झाल्यावर साधकाला आतून मंत्र, कविता, ॐकार इत्यादी स्फुरू लागतात. या मंत्राने अनेक क्रिया आविर्भूत होतात.

भगवंताची प्राप्ती व्हावी म्हणून नारदाच्या सांगण्यावरून ध्रुवाने मधुवनात खूप तपश्चर्या केली. शेवटी ध्रुवाच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन भक्तकामकल्पद्रुम परमेश्वर गरुडावर बसून मधुवनात आला. प्रत्यक्ष परमेश्वर पुढे येऊन उभा राहिला तरी ध्रुवाने आपले डोळे मुळीच उघडले नाहीत कारण ध्रुव निश्चल अंतःकरणाने हृत्कमलीच सच्चिदानंद प्रभूचे रूप स्पष्टपणे पाहात होता. ध्रुव डोळे उघडत नाही असे पाहून तो पाहात असलेले आपले स्वरूप भगवंताने त्याच्या हृदयातून गुप्त केले. अशा प्रकारे शुद्धचैतन्य जगदात्मा एकाएकी दिसेनासा झाला आणि हृदयात अंधकार दिसू लागला तेव्हा ध्रुवाने आपले नेत्र उघडले. तेव्हा हृदयात दिसत असलेले रूप प्रत्यक्ष आपल्यापुढे उभे आहे असे त्याच्या दृष्टीस पडले. ते रूप पाहिल्याबरोबर ध्रुवबाळ अगदी गडबडून गेला. आता काय आणि कसे करावे हे त्याला सुचेना. त्याने ईश्वराच्या चरणी लोळण घेतली. त्याला दृढ आलिंगन दिले आणि हात जोडून तो तटस्थपणे त्याच्याकडे पाहात उभा राहिला.

ईश्वराची आपण पुष्कळ स्तुती करावी अशी ध्रुवाच्या मनाने फार उचल घेतली होती. परंतु स्तुती कशी आणि कोणत्या शब्दांनी

करावी हे त्याला कळेना. तसे स्फुरण त्याला होईना. हे स्फुरण आपल्याला कसे होईल ? या विवंचनेत तो असताना सर्वांचा अंतरात्मा भगवान याने त्याचे मनोगत जाणले. याला शक्तिपात दीक्षा देऊन याची अंतःशक्ती जागृत होऊन हा तिच्या स्फूर्तीने माझी स्तुती आपोआप करू लागेल असे जाणून त्यांनी आपला शंख ध्रुवाच्या गालाला लावला. त्या शंखाचा स्पर्श होताच " **अनधीतस्य शास्त्रस्य स्वत एव प्रकाशनम्** " असे होऊन ध्रुवाला अद्भुत वाणीची स्फूर्ती झाली व तो परमेश्वराची स्तुती करू लागला.

अशा प्रकारे शक्तिपात झाल्याशिवाय मंत्र चैतन्ययुक्त होत नाही. अगर अंतःस्फूर्तीने मंत्र, कविता इत्यादी स्फुरत नाही. साधनात मंत्रजप सुरू झाला की त्या बरोबरच हृत्कंप, ब्रह्मग्रंथी व विष्णूग्रंथीचा भेद, सर्व अवयवांचे वर्धन म्हणजे वायूने सर्व अंग फुगणे, आनंद, अश्रू, रोमांच देहामध्ये देवतेचा आवेश, वाचा गदगद होणे ही लक्षणे व क्रिया दिसतात. मनाची प्रसन्नता, संतोष, दुमदुम शब्द ऐकू येणे, सूर्यतेजाप्रमाणे आत्मतेजाचे दर्शन, निद्रा क्षुधा, जप, रम्यता, आरोग्य, गांभीर्य, क्रोधहीनता, लोभहीनता इत्यादी चिन्हे दिसली तर मंत्रसिद्धी व देवतेची प्रसन्नता झाली असे समजावे. असे मंत्रमहोदधीत म्हटले आहे.

शक्ती जागृत झाली की मंत्रयोग कसा सिद्ध होतो ते बृहन्नील व नीलतंत्रात सांगितले आहे. "हे देवी ! ऐक. ज्याचा अनुभव आला असता विद्या शीघ्र सिद्ध होते असे सर्वश्रेष्ठ ज्ञान सांगतो. मूलाधारात सर्पाकृती कुंडलिनी शक्ती आहे. ही शक्ती शक्तिपात दीक्षा झाल्यावर संचालित होते. तिच्या संचलनाने प्राणवायूही घुमू लागतो. त्यामुळे ही शक्ती झिन् झिन् चिन् चिन् शब्द करीत वर उठत ब्रह्मरंध्रात जाते आणि परत मूलाधारात येते. या जाण्यायेण्यात मन लीन झाल्याने मंत्रशिखा म्हणजे मंत्राची अग्निज्वालेसारखी प्रकाश करणारी शक्ती उत्पन्न होते. ती सर्व मंत्रांना प्रदीपित व चैतन्यमय करते. अंधकारमय घरात जसे काही दिसत नाही तसे शिखाहीन मंत्राने कोणतीही सिद्धी होत नाही."

शारदा तिलक तंत्राच्या प्रथम पटलामध्ये दीक्षा झाल्यावर कुंडलिनीच्या जागृतीमुळे मंत्रसृष्टी कशी होते हे सांगताना म्हटले आहे की, " गुरुदीक्षा झाल्यावर जाणीवस्वरूप व स्वप्रकाशणारी अशी ज्ञानशक्ती कुंडलिनी देवी साधकाला आपल्या स्वरूपाचे ज्ञान करून देण्यासाठी विशेष गुणयुक्त होऊन क्रियाशील झालेली दिसते. त्यावेळी ती आपल्या ब्रह्ममयी शक्तीने अनेकानेक गुणवती शक्तीचे चमत्कार करते. त्या शक्ती-

पासून ध्वनी, नाद, निबोधिका, अर्धेंदू, परा, पश्यंती, मध्यमा व वर्णमालेला प्रकाशित करणारी वैखरीवाणी उत्पन्न करते. ही कुंडलिनी शक्ती तेजोरूप होऊन गुणाचा आश्रय करून इच्छा, ज्ञान व क्रिया या तीन रूपाने प्रकाशित होऊन वर वर्णन केल्याप्रमाणे वाणी व वर्णमालेची सृष्टी करते. या गोष्टीचा अनुभव साधनकालामध्ये साधक शरीरात होणाऱ्या क्रियांच्या लक्षणावरून घेऊ शकतो.

कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर प्रथम संवित्स्वरूपाची जी अवस्था असते त्यात शरीर, मन व प्राण शक्तिहीन झाले असली तरी चेतनामात्र राहिलेली आहे असा साधकाला अनुभव येतो. ज्यावेळी कुंडलिनीशक्ती शक्तिरूपाने प्रकाशयुक्त होते तेव्हा साधकाला आपल्या ठिकाणी मन व प्राणाच्या क्रियाशक्तीचा अनुभव येतो. नंतर ध्वनी उत्पन्न झाल्यावर साधकाला आत अव्यक्त ध्वनी शब्दरूपाने ऐकू येतो. परंतु या नादाचा नेमका निर्देश मात्र करता येत नाही. जेव्हा कुंडलिनी नादाचे रूप धारण करते तेव्हा साधक अंतरंगामध्ये व्यक्त व सूक्ष्मातिसूक्ष्म नाद अगदी स्पष्टपणे ऐकतो. यानंतर साधकाला निबोधिका अवस्थेचा बोध होतो. या अवस्थेतच त्याला ज्योतींचे दर्शन होण्यास आरंभ होतो. त्यानंतर अर्धचंद्राचे दर्शन होऊन बिंदुरूप ज्योती प्रकाशू लागते. त्यामुळे सर्वप्रकारचे नाद सुस्पष्ट होत जातात. हे नाद भिन्न भिन्न शब्द, वीणा, बासरी, भुंगे यांच्या रूपाने परा, पश्यंती व मध्यमा वाणीमध्ये अनुभवाला येतात. शेवटी वैखरीवाणीच्या द्वारे वर्णमालेचे रूप घेऊन नानाप्रकारच्या क्रियांद्वारा नाद शब्दरूपाने व्यक्त होतो.

ती परमदेवतास्वरूपिणी ईश्वरीशक्ती जागृत होऊन उत्तम प्रकारे क्रिया करू लागली म्हणजे साधकाच्या सर्व शरीरात ती व्याप्त होऊन मंत्रमय जगताची रचना करू लागते. त्या योगाने साधनामध्ये वेदादिशास्त्रांचे बीजमंत्र असलेल्या प्रणवाचा ध्वनी साधक आतून करू लागतो. त्याचबरोबर आवेशात नानाप्रकारच्या देवी, देवता, शिव, शक्ती, विष्णू, सूर्य, गणेश, दुर्गा, भरव, नृसिंह, वराह, वासुदेव, हयग्रीव पुरुषोत्तमादी देवतांचे ओम्, ह्रीं, श्रीं, क्लीं इत्यादी बीजमंत्राचे उच्चारण करून जोरजोराने अगर आतल्याआत जपू लागतो. अशाप्रकारे साधकाने न पाहिलेले, न ऐकलेले व न शिकलेले अनेक प्रकारचे विविध मंत्र जागृत झालेली कुंडलिनी शक्ती निश्चयपूर्वक साधकाच्या मुखातून प्रकट करते. यातील काही मंत्र व बीजे साधकाच्या नावाला व राशीला प्रतिकूल व अनिष्ट असले तरी ते आतून शक्तिकडून प्रकट होत अस-

त्याने ते चैतन्यरूप व सिद्धरूप होऊन साधकाचे कल्याणच होते. यामुळे चैतन्य मंत्राने जागृत होणारी कुंडलिनी शक्ती किंवा जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तीकडून प्रकट होणारे चैतन्यस्वरूप मंत्र यांची एकताच सिद्ध होते.

याप्रमाणे जागृत कुंडलिनी शक्तीच्या व्यक्त, अव्यक्त अगर व्यापक अवस्थेपासून अगदी प्रथम वेदाचा बीज मंत्र ओंकार प्रकाशित होतो. ओंकारानंतर निरनिराळ्या देवतांच्या मंत्रांची रचना होते. याकरिता कुंडलिनी शक्ती जागृत झाली की प्रथम ओंकार शब्द ध्वनीरूपाने परावाणीमध्ये होत असल्याची जाणीव होते. याचे कारण असे आहे की ओंकारापासूनच मंत्रसृष्टीचा आरंभ होतो. हे ॐ अक्षरच ब्रह्म आहे व तेच अत्यंत श्रेष्ठ आहे. हा ओंकार आपल्या अंतःकरणात स्वतःहून आपोआप स्फुरण पावत असल्याचा जो साधक अनुभव घेतो त्याची जी इच्छा असेल ती परिपूर्ण होते. हे ॐ अक्षर अत्यंत श्रेष्ठ अवलंबन आहे. योगसाधनाने या परम आश्रयाची जाणीव होऊन साधक त्यात रमून गेला म्हणजे त्याला ब्रह्मलोकाची प्राप्ती होते असे कठोपनिषदात म्हटले आहे.

ज्यावेळी गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत होऊन महायोग सिद्ध व्हावा म्हणून कार्यरत होते तेव्हा ती योगमाया शक्ती समस्त वैदिक मंत्रांच्या स्वरांचे संपादन करते. त्यावेळी हा ओंकार परावाणीत प्रस्फुरित होऊन पश्यंती व मध्यमा यांच्यातून जाऊन वैखरीने व्यक्त होतो. ॐ प्रत्यक्ष वैखरीतून उच्चारण होण्याच्या क्रियेला आरंभ झाला की साधकाच्या मूलाधारात कंपनाला प्रारंभ होतो. या कंपनाबरोबरच षड्ज, ऋषभ, गांधार इत्यादी नानाविध स्वरांनी दीर्घ प्रणवाचा उच्चार होऊ लागतो. अशाप्रकारे आतून उच्चारित होणाऱ्या प्रणवाच्या ध्वनीचा अर्थ, स्वर, व्यंजन, वर्ण यांच्याशी कोणताही संबंध राहात नाही. कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेमुळे साधकाकडून मूलाधारापासून जेव्हा आपोआप वरीलप्रमाणे उच्चारण होऊ लागते तेव्हा साधक बहुतेक करून संज्ञाशून्य होतो व हृदयाकाशात पुष्कळशा नादांचा गुंजारव ऐकतो. परंतु नादाचा निर्देश मात्र करू शकत नाही. ज्यावेळी साधकाकडून ओंकाराचा आवेशाने उच्चार होत राहातो तेव्हा तो प्लुत होतो. त्यावेळी साधकाला आपण अत्यंत जोरजोराने ओंकार ध्वनीचे उच्चारण करीत असल्याचे ज्ञान राहात नाही. अशा प्रकारचा गगनभेदी ध्वनी रात्रीच्या वेळी खुल्या मैदानात मुद्दाम केला तर तो तीन मैलापर्यंत ऐकू जातो. साधकाकडून

ज्यावेळी कुंडलिनी शक्तीच्या आतील जोराने ओंकाराचे उच्चारण होत राहाते तेव्हा तो आवाज इतका श्रुतिमधुर असतो की ऐकणाराचे मन अगदी मुग्ध होऊन जाते. मात्र त्या आवाजाचे स्वर इत्यादी लक्षात येत नाहीत. इतकेच नव्हे तर तो आवाज निरनिराळ्या स्वरांचे एकत्रित मिश्रण झाल्यामुळे एका विलक्षण अशा अद्‌भुत स्वराची प्रचीती येते. ज्याप्रमाणे सामवेद म्हणणारा व ऐकणारा श्रोता त्यातील स्वरांच्या एकतेमध्ये तल्लीन होतात त्याप्रमाणे ओंकाराचा आतून उमटणारा ध्वनी साधकाला व ऐकणाऱ्याला अर्थबोधरहित आश्चर्यामध्ये बुडवून टाकतो. यातील स्वरांचा काही भाग हुंकार शब्दांशी मिळून बाहेर पडतो, परंतु तो सर्वस्वी हुंकार असतो किंवा ओंकार पूर्णपणे हुंकाराशी मिसळून बाहेर उमटतो असे म्हणता येणार नाही. याचे खरे कारण असे आहे की आतून आपोआप उमटणाऱ्या या ओंकाराच्या विचित्रतेचे वर्णन करता येत नाही.

साधनात कुंडलिनी शक्तीच्या जागृतीमुळे वरीलप्रमाणे वैखरीची क्रिया होऊन प्रणवध्वनी उमटतो व त्याचा जप होतो. काही वेळाने तो लय पावतो. परंतु साधन संपल्यावर आपल्या इच्छेने साधकाने साधनात जसा ओंकार होतो तसा आवाज व उच्चार केला तरी त्याला साधनात आपोआप आतून होणाऱ्या ओंकारामुळे जो आंनद व जे मानसिक समाधान मिळते ते मुद्दाम करण्याने मिळत नाही. दहापाच वेळा अशा रीतीने उच्चारण केल्यावर असे वाटते की आता पुरे करावे. दमल्या-सारखे वाटून गळ्याचा स्वरभंग होतो. स्वाभाविकपणे होणाऱ्या क्रियेच्या आवेशामध्ये कित्येक साधकांचा महिना महिना पर्यंत दररोज चारचार पाचपाच तास दीर्घ प्रणवाचा जप होतो. या जपाच्या वेळी साधकाचा स्वर अगदी गगनभेदी होतो. प्रणवाच्या इतक्या दीर्घ उच्चारामुळे साधकाचे शरीर स्फूर्तियुक्त होते. महामाया कुंडलिनी शक्तीच्या अद्‌भुत व अपार सामर्थ्यामुळे होणाऱ्या योगक्रियांच्या कौशल्यांचे सामर्थ्य लिहिणे सांगणे व समजाविणे हे केवळ अशक्य आहे. या दीर्घ प्रणवध्वनीच्या नंतर कित्येक भाग्यवान साधकांचा हा ध्वनी सूक्ष्म होत जातो. महायोग-साधनात याला स्वतःप्रणव असे नाव आहे. उक्त दीर्घ प्रणवजपापेक्षा सूक्ष्म जप होण्याने मनाला त्याच्या शतपट सुख अनुभवाला येते. या स्वतःप्रणव जपाची क्रिया साधकाच्या अंतरामध्ये अष्टौप्रहर चालू असते. स्वप्नामध्येही साधकाचे मन क्रियात्मक राहाते. या क्रियेच्या आरंभाचा,

अवधीचा व शेवटचा कोणताही नियम सांगता येत नाही. साचेबंदपणा हे याचे स्वरूपच नाही.

सूक्ष्म प्रणवाच्या जपाचा आरंभ झाल्यानंतर योगापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची साधकाच्या मनाला इच्छा होत नाही. या जपामुळे मन अंतर्मुख होऊन राहाते व विषय वासनांचा ऱ्हास होत जातो. मन आत्मतत्त्वामध्ये अत्यंत निष्ठावान होते व मूर्च्छित होऊन राहाते. काम-क्रोधादी दोषांनी साधक व्यथित होत नाही. प्राणप्रवाहाचे स्पंदन बहुतांशी चालू राहाते परंतु श्वासप्रश्वास दीर्घ होत नाहीत. ही क्रिया चालू झाल्यावर साधकाला साधनाला बसल्यावर दुसऱ्या क्रिया कमी होतात व हीच क्रिया मुख्य राहाते. याच्याचबरोबर कधी साधकाला अगदी सूक्ष्म नाद ऐकू येतात. हे नाद कधीकधी अत्यंत दूर अंतरावरून तर कधीकधी अगदी जवळून ऐकू येत आहेत असे वाटते. या अवस्थेमध्ये साधकाच्या अंतरामध्ये त्याचे मन शांत, शून्य व एकाग्र होते. हळूहळू मधूनमधून त्याला बाह्यविस्मृती होत जाते परंतु बहुतेक करून या अवस्थेत बाहेरील विषयग्रहण करण्याचे साधकाच्या मनाचे सामर्थ्य राहाते. या स्वतःप्रणव जपाच्या अवस्थेमध्ये मन धारणा करण्यास पूर्ण समर्थ होते. याच्या जोरावरच साधक आळस व निद्रा यांना जिंकतो. इतकेच नव्हे तर साधकाच्या शरीरात सत्त्वगुणांचा संचार नेहमी असतो.

साधना सुरू झाली की मंत्रयोग नानाप्रकारच्या स्वर विक्रिया होऊन कसा होतो हे पाहाण्यासारखे आहे. साधनाच्या सुरवातीला साधकाच्या मूखातून निरनिराळे विकृत शब्द बाहेर पडू लागतात. साधक नाकातून किंवा गळ्यातून अनेक प्रकारचे शब्द काढतो. पशू, पक्षी, बेडूक कुत्रा, मांजर, सिंह, वाघ इत्यादी निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज आपो-आप उमटून स्वरसाधना होऊ लागते. गर्जना, हुंकार, चीत्कार, भयंकर शब्द, बडबडणे, अद्‌भुत भाषा बोलणे, आक्रंदन, ओरडणे, नानाप्रकारचे सूर काढून रडणे, खदखदून व खळखळून निरनिराळे भाव व्यक्त करीत हास्यध्वनी करणे, गायन व भगवन्नाम संकीर्तन करणे, मुखाने मृदंग, तबला, सनई इत्यादीकांचे शब्द काढणे, नियमबद्ध टाळी वाजवून ताल धरणे, गद्य, पद्य, अथवा गीताची रचना करणे, व्याख्यान देणे, आलस्य-रहित व उत्साहित राहून अनंत प्रकारच्या स्वतःसिद्ध अशा या क्रिया साधकाकडून होऊन त्यांची आवश्यकता संपली की त्या बंद होतात.

या साधनात साधकाला दिव्य शब्दाची व नादाची उत्पत्ती शरीरात होऊन अनुभूती कशी होते याचे वर्णन रामगीता व उमासंहितेत

पुढीलप्रमाणे केले आहे. शक्तिपातयोगाचे साधन करता करता जसजशी नाडीशुद्धी होत जाते तसतसा साधकाच्या अंतरामध्ये ज्योतिस्वरूप आत्म्याचा प्रकाश उदित होऊ लागतो. हा प्रकाश उदित होण्यापूर्वी किंवा नंतर साधकाला नाना प्रकारचे नाद ऐकू येतात. हे नादाचे शब्द व्यक्त व अव्यक्त असे दोन प्रकारचे असतात. ज्या शब्दांना बाहेरच्या कोणत्याही शब्दाची उपमा देता येत नाही त्यांना अव्यक्त म्हणतात. जे शब्द तास किंवा घंटेप्रमाणे स्पष्ट प्रतीत होतात त्यांना व्यक्त म्हणतात. हे शब्द वर्णात्मक आणि ध्वन्यात्मक असे नानाप्रकारचे असतात. आघाताशिवाय किंवा उच्चाराशिवाय जे शब्द अंतरात स्वतः होतात त्यांना मंगलदायक शब्दब्रह्म म्हणतात. शब्दब्रह्मस्वरूप अनाहत नादाचे नऊ प्रकार आहेत असे सांगतात. योगशास्त्रात नाद असंख्य सांगितले आहेत परंतु योगसाधन करणारे साधक या नादांचा अनुभव नियमित संख्यारूपाने घेतात.

ज्यावेळी साधन करताना मन आकाश तत्त्वामध्ये जाते त्यावेळी सूक्ष्म आकाशापासून नाद उत्पन्न होतो. त्यावेळी साधकाला अंतरामध्ये सूक्ष्म अशा शून्यरूप ज्योतीचे दर्शन होते व शब्द ऐकू येतात. जेव्हा प्राणवायू ब्रह्मरंध्रात जातो तेव्हा मेघध्वनी व शंखनाद ऐकू येतो. क्षंतराकाशात प्राण गेल्याने हा महान् ध्वनी होऊ लागतो. घंटेप्रमाणे अनेक वाद्ये वाजू लागतात. हे शब्द साधकाच्या प्रगतीचे सूचक आहेत. असा अनुभव येऊ लागला म्हणजे म्हणजे आपला मार्ग बरोबर आहे असे साधकाने निश्चित समजण्यास हरकत नाही.

नादाचे प्रकार :–

हठयोग प्रदीपिकेच्या चतुर्थ उपदेशामध्ये हे दिव्य नाद किती प्रकारचे आहेत हे सांगताना असे म्हटले आहे की, " हे नाद समुद्र, मेघ, धवधबा, गाडी, धडधता अग्नी, भेरी, काहल, दुंदुभी, मार्दल, मृदंग, शंख, घंटा, किंकिणी, कांस, झांझर, टाळ्या, तंतूवाद्य, वीणा इत्यादी वाद्ययंत्राप्रमाणे होतात. त्याचप्रमाणे बैल, मोर, भुंगा, मधमाशी, झिन् झिन्, चिण्चिण् आदी पशुपक्षी व कीटपतंगाचे शब्दाप्रमाणे शब्दध्वनी ऐकू येतो. स्त्रियांचे गीताप्रमाणे किंवा पुष्कळशा लोकांच्या कोलाहलाप्रमाणे घोषयुक्त शब्द ऐकू येतात. या ध्वनिप्रमाणेच अव्यक्त ब्रह्मओंकाराचा ध्वनी ऐकू येतो. या सर्व नादामध्ये चिचिण, घंटा, शंख, वीणा, टाळ्या, बांसरी, मृदुंग, भेरी आणि मेघ हे दहा नाद मुख्य आहेत.

हंसोपनिषदामध्ये या दिव्य नादश्रवणाचे फल काय मिळते हे

सांगितले आहे. "अगदी प्रथम चिण्नाद प्रकट झाल्याने शरीरात झनझनाट होतो. दुसरा चिंचिण नाद झाल्याने शरीर तुटू लागते. तिसऱ्या घंटानादाने खूप घाम येतो. चौथ्या शंखनादाने मस्तक कंप पावू लागते. पाचवा तंत्री नाद ऐकू येऊ लागल्यावर टाळूपासून अमृत टिपकू लागते. सहाव्या करताल नादामुळे अमृताचे आस्वादान होते. सातव्या बासरीच्या नादाने गूढ विषयांचे ज्ञान होते. आठव्या मृदंगनादाने परावाणीचे ज्ञान होऊन वाक्सिद्धी होते. नवव्या भेरीनादाने शरीराची सुंदरता, अदृश्यसिद्धी व आवरणरहित दिव्यदृष्टी प्राप्त होते. आणि दहाव्या मेघनादाच्या श्रवणाने साधक समाधीत ब्रह्माशी एकता प्राप्त होऊन ब्रह्मरूप होतो.

सिद्धमहायोगांतर्गत मंत्रयोगाचे साधन जेव्हा होऊ लागते तेव्हा त्याचा महिमा कसा अनुभवाला येतो हे वायवीय संहितेच्या २९ व्या अध्यायात पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

सर्ववेदमयी देवी सर्वमंत्रस्वरूपिणी । सर्वमंत्रात्मिका विद्या वेदविद्याप्रकाशिनी ॥ ७ ॥ सैव कुंडलिनी माया शुद्धाध्वपरमासती । सा विभागस्वरूपैव षडध्वात्मा विजृम्भते । तत्र शब्दस्त्रयोऽध्वानस्त्रयश्चार्थाः समीरिताः ॥ ८ ॥

अशाप्रकारे कुंडलिनी शक्ती जागृत होऊन क्रियाशील झाली की वास्तविक योगाला म्हणजे अंतरंग साधनाला आरंभ होतो. हाच मार्ग खरा सिद्धप्रद म्हणजे मोक्षदायक आहे कारण या स्वाभाविक सिध्दमहायोगाच्या उपायानेच वेदज्ञानमयी, मंत्रस्वरूपिणी, सर्वमंत्रात्मिका विद्येचा व वेदविद्येचा प्रकाश करणारी कुंडलिनी शक्ती साधकाकडून क्रिया करवून घेते. या शक्तीमुळेच सर्व मंत्र व सर्व विद्यांच्या विज्ञानाचा प्रकाश साधकाला प्राप्त होतो. त्याला देवीदेवतांची दर्शने होतात. त्यांच्या अनुग्रहाचा लाभ होतो. मंत्र व वेदादिक शास्त्रांच्या मंत्रांचे विशेष ज्ञान साधकाला होते व वेदाचे गूढ रहस्य त्याला समजू लागते.

साधन करताना भविष्यात होणाऱ्या गोष्टींचे ज्ञान साधकाला होते. कोणत्याही शास्त्राचा थोडासा जरी अभ्यास केला तरी वाचता वाचताच त्याला त्यातील मर्म व भावार्थ समजू लागतो. अभ्यासिलेल्या विषयाची व्याख्या करण्याची विचित्र शक्ती त्याला प्राप्त होते.

लययोगाच्या क्रिया :–

शक्तिपातदीक्षा झाल्यावर नानातऱ्हेच्या क्रिया होऊन नाडीशुद्धी होऊ लागते. नाडीशुद्धी झाली की साधकाला अनाहत नाद ऐकू

येऊ लागतो. कशावरही आघात झाल्याशिवाय किंवा कसलाही उच्चार केल्याशिवाय जो शब्द शरीरात आपोआप होत असताना ऐकू येतो त्यास अनाहत नाद किंवा शब्दब्रह्म असे म्हणतात.

साधन करताना मन ज्यावेळी आकाश तत्त्वामध्ये जाते त्यावेळी सूक्ष्म आकाशापासून नाद प्रवर्तित होतो. ज्यावेळी प्राण ब्रह्मरंध्रामध्ये जातो त्यावेळी मेघ व शंखाचा ध्वनी ऐकू येतो. अंतराकाशात प्राण गेल्याने घंटेसारख्या वाद्याचा महाप्रचंड नाद ऐकू येऊ लागतो. शंकराचार्यांनी आपल्या प्रबोधसुधाकर या प्रकरण ग्रंथातील नादानुसंधानप्रकरणम् यात असे म्हटले आहे की, "या नादाचे अंतर्भागात जे ज्योतिस्वरूप ब्रह्म सतत वास करते तेथे जर मनाची एकाग्रता झाली तर ते मन पुन्हा संसारबंधनाला कारणीभूत होत नाही. बऱ्याच वेळपर्यंत या नादानुसंधानामुळे होणाऱ्या श्रेष्ठ आनंदाच्या अनुभवाने जी चित्ताची एकाग्रता होते ती दुसऱ्या अनेक प्रकारांनी होणाऱ्या एकाग्रतेपेक्षा श्रेष्ठ होय."

साधनात समुद्राच्या लाटांचे आदळणे, मेघांच्या गर्जना, झऱ्यांचे झुळझुळणे, धबधब्याचे आदळणे अनाहत नादाच्या रूपाने ऐकू येते. गाडी, जळणारा अग्नी, भेरी, काहील, दुंदुभी, मृदंग, शंख, घंटा, किंकिणी, वीणा, बासरी, नगारा, इत्यादी नानानाद्यांचे असंख्य नाद ऐकू येतात. बैल, मोर, भुंगा, मधमाशी इत्यादी निरनिराळ्या पशुपक्षांचे आवाज नादरूपाने ऐकू येतात. स्त्रियांची गाणी, कोलाहलासारखे शब्द, चिण्चिण् झिन्झिन्, सुईसुई, असेही ध्वनी आतून उमटतात. काही वेळा अत्यंत सूक्ष्म असे नाद ऐकू येतात. काहीवेळा जप, मंत्र, श्लोक व भजनेही ऐकू येतात. काहीवेळा साधकांना साधनातील काही सूचना स्पष्ट ऐकू येतात तर काही वेळा इतर माहिती, भविष्य व आप्तमित्रांसंबंधी सूचना ऐकू येतात या नादाकडे साधकाचे मन आपोआप खेचले जाऊन तेथे मनाचा हळूहळू लय लय होऊ लागला की त्याला ब्रह्मभाव प्राप्त होऊ लागतो.

श्रीमदाद्यशंकराचार्य आपल्या प्रबोधसुधाकर या प्रकरण ग्रंथांतील मनोलय या प्रकरणात साधकाला नादानुसंधानाने ब्रह्मभाव प्राप्त होऊ लागला की त्यामुळे त्याची स्थिती कशी होते हे सांगताना म्हणतात, "संसारातील अनेक तापांनी व कष्टांनी श्रमून गेलेले आणि नाना प्रकारच्या योनी फिरण्याने दमून गेलेले अंतःकरण नादानुसंधान होऊ लागले की परमानंदाची प्राप्ती झाल्यावर कधी कोणत्याही ठिकाणी चंचल होत नाही. त्या ब्रह्मानंदाच्या भरात मी कोण? हे काय? हा कोणाचा? इत्यादी अनेक प्रश्नांची व विचारांची मालीका जरी मनात

येत असली तरी नादानुसंधानाने साधकाच्या मनाची व विचाराची गती खुंटते तेव्हा ते मूर्च्छित होते. समुद्रास मिळालेली नदी जशी समुद्ररूप होते त्याप्रमाणे नादात मनाचा लय होऊन पुष्कळ काल आत्मस्वरूपाचा अनुभव घेऊन मन आत्मरूप होते. दुधापासून निराळ्या काढलेल्या तुपाचे ज्याप्रमाणे पुन्हा दूध होत नाही त्याप्रमाणे आत्मस्वरूपात लीन झालेले मन पुन्हा विषयांची इच्छा करीत नाही. आत्मस्वरूपात जेव्हा चित्त लीन होते तेव्हा ते मूर्च्छित होऊन विषयचिंतन करण्यास असमर्थ होते.

क्रियाशक्तीच्या चालनामुळे मनाला जो लय प्राप्त होतो त्यामुळे भांग न पिताही भांग घेतल्याप्रमाणे रात्रंदिवस एका दिव्य नशेत, धुंदीत व मस्तीत साधक निमग्न होतो. चालता, बसता, फिरता, बोलता मन आत खेचले जाऊन मस्तीत मन निमग्न होते. कोणतेही व्यावहारिक कार्य आपण करू नये व सर्व गोष्टींपासून अलिप्त राहावे असे वाटू लागते. आपण काही ऐकावे, बोलावे, करावे व सांगावे असे वाटतच नाही. एखादा मद्यपी आपल्या नशेत धुंद होतो तशी अवस्था होते. भांग व मद्य पिणाऱ्याची धुंदी उतरते व मागाहून त्याला ग्लानी येते परंतु आत्मशक्तीच्या जागृतीमुळे जी दिव्य लयावस्था प्राप्त होते ती रात्रंदिवस टिकून राहाते व ती कधींच संपू नये असे वाटते. त्यापासून जो दिव्यानंद प्राप्त होतो त्याचे वर्णन करणे शक्य नाही.

राजयोगाच्या क्रिया :–

" ज्या पातळीवर अध्यात्मिक अनुभूतीचे दिव्य दर्शन होते व एका अपरिमित शांतीसुखाचा लाभ होतो तिलाच राजयोग म्हटले आहे. राज या संस्कृत शब्दातील राज् या धातूचा अर्थ लकाकणे किंवा चमकणे असा आहे. आपणा स्वतःमध्ये निर्वाणाचा व ईश्वर साक्षात्काराचा एकमेव प्रत्यय घेणे हाच राजयोग होय. ब्रह्माहमस्मि हा प्रत्यय होणे म्हणजेच राजयोग किंवा ज्ञानयोगाची परिसमाप्ती. जेव्हा अविचार, हीन विचार आणि कामक्रोधासारखा मलिन विकार यांचा ईश्वरीय दिव्य प्रेमाने पूर्ण बीमोड होतो आणि भावनेच्या पातळीवर जागृत कुंडलिनी शक्ती दिव्य भावावेशात परिणत होते तेव्हा तिलाच आल्हादिनीशक्ती म्हणतात. हाच भक्तियोग होय. " असे राजयोगाचे विवेचन देवात्मशक्ती कुंडलिनी या ग्रंथात श्रीविष्णूतीर्थस्वामीमहाराजांनी केले आहे.

श्वेताश्वतर उपनिषदामध्ये गुरुकृपेने कुंडलिनी जागृत होऊन ब्रह्माभिव्यक्तीची दिव्य दर्शने कशी होतात हे सांगताना म्हटले आहे की –

नीहारधूमार्कानिनिलानलानां खद्योतविद्युत्स्फटिकशशीनाम् ।
एतानि रूपाणि पुरःसराणि ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे ।।

सिद्धगुरूच्या संकल्पाने शक्ती जागृत झाल्यावर जाड प्रतीचे धुके, धूर, सूर्य, वायू, अग्नी, काजवा, विजेची चमक, स्फटिकमणी ही ब्रह्माची अभिव्यक्ती करणारी रूपे प्रकट होतात.

साधकाला दिव्यरूपाची दर्शने कशी होतात याचे सूर्यगीता व उमा संहितेत पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

यदा कुंडलिनी शक्तिराविर्भवति साधके । तदा स पंचको मत्तेजो ऽनुभूति ध्रुवम् ।। ततस्तु तमसि ध्यानी पश्यति ज्योतिरैश्वरम् । श्वेतं रक्तं तथा पीतं कृष्णमिंद्रायुधप्रभम् ।। भ्रुवोर्मध्ये ललाटस्थं बालार्क सम तेजसम् । दर्शनं नाम दिव्यानां दर्शनं चाप्रयत्नतः ।।

जेव्हा कुंडलिनी शक्ती साधकाच्या ठिकाणी क्रियारूपाने प्रकाशित होते त्यावेळी अन्नमय, प्राणमय, मनोमय इत्यादी पंचकोशात साधकाला परमेश्वराच्या सूर्यरूप ज्योतिर्मय तेजाचा निश्चयाने अनुभव येतो. ध्यानाच्यावेळी साधकाला अंधकारमय अंतराकाशात ज्योतिरूप ईश्वराचे दर्शन होते. ती ज्योत शुभ्र, तांबडी, काळी व इंद्रधनुष्याप्रमाणे नानाप्रकारच्या रंगांची असते. ती ज्योत ललाट प्रदेशातील भ्रूममध्याचे ठिकाणी प्रातःकाली उगविणाऱ्या सूर्याप्रमाणे दिसते. यालाच दिव्यदर्शन म्हणतात. शक्ती जागृत झाल्यावर असे दर्शन प्रयत्नाशिवाय आपोआप होऊन राजयोगाच्या पूर्णतेकडे साधक वाटचाल करतो.

पातंजल योगदर्शनात राजयोगाचे साधन कसे होते हे सांगताना समाधीपादात व्यासांनी लिहिलेली पुढील तीन सूत्रे पाहाण्यासारखी आहेत. **विषयवती वा प्रवृत्तिरुत्पन्ना मनसः स्थितिनिबंधिनी ।। ३५ ।। विशोका वा ज्योतिष्मती ।। ३६ ।। वितरागविषयं वा चित्तम् ।। ३७ ।।**

ज्यावेळी कुंडलिनीशक्तीच्या प्रेरणेने क्रिया करता करता साधकाचे शरीर, मन व प्राण राजयोगाचे उत्कर्ष साधन करतात त्यावेळी विषयवती प्रवृत्ती उत्पन्न होते. या सर्व समाधीअवस्थात इंद्रियविषयांचे अलौकिक अनुभव येतात. त्या अवस्था मनाच्या चिकाटीस कारणीभूत होतात. त्यावेळी साधकाच्या चित्ताच्या स्थिरतेकरता अंतरामध्ये दिव्य वस्तू अगर ज्योत स्वतः प्रकट होते. त्यामुळे सर्व इंद्रियविषयांसंबंधीची आसक्ती हृदयातून निघून जाते व चित्त हृदयात मुरून जाते. दिव्यज्योतीच्या दर्शनाने साधकाचे मन स्वाभाविकपणेच तिच्यामध्ये गुंतून जाते व त्याला साधनाचे फल आपल्याला मिळेल किंवा नाही अशी

चिंता राहात नाही. प्रकाशमान दिव्यज्योतीचे दर्शन होताच साधकाच्या चित्ताला त्याच्यामध्येच निरतिशय सुखाचा अनुभव येतो.

उपरोक्त दिव्य ज्योतीचे दर्शन विविध प्रकारांनी कसे होते हे वायवीय संहितेच्या ३८ व्या अध्यायात पुढीलप्रमाणे सांगितले आहे, "या ज्योतीचे दर्शन कित्येक प्रकारांनी होते. विजेची चमक, विजेचा प्रकाश, नक्षत्र दर्शन, चंद्र, सूर्य व अग्नीचे दर्शन, ज्योतीचे दर्शन किंवा कोटचावधी सूर्याच्या ज्योतिप्रमाणे उग्रदर्शन व अनुग्रहसूचक महाज्योतीचे दर्शन होते. या ज्योतींचे रंगही नानाप्रकारचे असतात. याशिवाय प्रज्ज्वलित अग्निशिखा, दीपशिखा, बिंदू, काच, स्फटिकमणी, काजवा यांच्याप्रमाणे लहानमोठ्या रूपरंगाचे दर्शन होते. कधीकधी ताऱ्यांनी भरलेले आकाश नीलाकाश, धूर, अंधकार आणि अत्यंत घोर अशा अंधकाराचे दर्शन होते. साधन करता करता साधकाचे मन जितके सूक्ष्म विषयाचे ग्रहण करण्यास समर्थ होते तितकी तितकी सूक्ष्मातिसूक्ष्म दर्शने साधकाला होतात.

ज्ञान, योग, भक्ती इत्यादी मार्गाने तपस्या करता करता जेव्हा सद्गुरूची प्राप्ती होऊन कुंडलिनी शक्ती जागृत होते व ईश्वरपरायणतेमुळे चित्त शुद्ध होते तेव्हा साधकाला कोणत्याही प्रकारचे आवाहन न करता वर वर्णन केलेल्या दर्शनांशिवाय सिद्धपुरुषांचे दर्शन, आपल्या गुरुदेवांचे दर्शन, ब्रह्मा, विष्णू, महेश किंवा आपल्या इष्टदेवतेचे दर्शन होते. गंधर्व, अप्सरा, विद्याधर, नाग, यज्ञ, राक्षस, किन्नर आदी देवतांचीही दर्शने साधनात होतात. सात्त्विक भावापन्न साधकाला विशेषेकरून संन्यासी, ब्रह्मचारी, शिवलिंग अथवा अन्योन्य देवतांच्या प्रतिमेचे दर्शन ध्यानाच्यावेळी अमनस्क अवस्थेत, जागृतीत किंवा स्वप्नातही होते. विशेषकरून साकार उपासक व भक्तिप्रधान साधकांना ही दर्शने अधिकतर प्रमाणात होतात.

जे साधक कामनापूर्वक देवतेच्या चैतन्यमंत्राचा जप किंवा गुरुप्रदत्त शक्तीची आराधना करतात त्यांना त्यांच्या कामनासिद्धीसूचक अशी वरील दर्शनाप्रमाणेच दर्शने होतात. बालक, कुमारी, छत्र, रथ, दीप, प्रासाद, देवमंदिर, राजगृह, पद्म, नदी, हत्ती, घोडा, बैल, समुद्र, फलभारयुक्त वृक्ष, पर्वत, पेटलेला अग्नी, कच्चे मास, ग्रह, नक्षत्र, चंद्र, रत्न, सूर्य, अलंकार, सिंहासन, विमान, ध्वज, राज्याभिषेक, सफेत चंदन, शुभ्र वस्त्र, धान्य, कुंकू, मध, पांढरी मोहरी, राजा व स्त्री समुदय या

सर्व मंगलदायक वस्तू स्वप्नात किंवा ध्यानाच्या वेळी स्वप्नासारख्या अवस्थेमध्ये साधकाला दिसतात. ही सर्व दर्शने शुभसूचक व प्रगतिदर्शक असतात.

याशिवाय नवे पात्र, खीर, फळ, शिजविलेले अन्न, दही, दूध, वाद्ययंत्र, सुंदर स्त्रिया, ब्राह्मण, गाई, हंस, कबुतर, नीलकंठ, मोर, मुंगूस, कोल्हा, हरिण, बेडूक, फुले, सद्वाक्य, अंजन, पाण्याने भरलेला कलश, आरसा, मासे व मद्य भक्षण, शव, रडणे, ऊस, वेदध्वनी, वाहन, चाबूक, अंकुश, मंगलगीत, सैनिक, प्रिय व्यक्तीचे दर्शन, सूर्योदय, चंद्र-ग्रहण, सूर्यग्रहण, मोठमोठी घरे, श्रीमंतांचे वाडे, राजमहाल इत्यादी स्वप्नात दिसतात. त्याचप्रमाणे देवमंदिरात जाण्याचे, हत्तीवर, घोड्या-वर किंवा बैलावर बसल्याचे, पर्वतावर चढण्याचे व अग्नीत प्रवेश करण्याचे स्वप्न साधकाला दिसते. याशिवाय कितीतरी भयानक स्वप्नेही साधकाला पडतात. पुष्कळ स्त्रियांसह भोजन करणे, पक्व मांस खाणे, शरीराला कीड लागल्याचे पाहाणे, विष्ठेचा लेप करणे, रक्ताने स्नान करणे, रक्तपात किंवा मद्यपान करणे, कच्चे मांस खाणे इत्यादी प्रकारची भयंकर स्वप्नेही पडतात. ही सर्व स्वप्ने सिद्धी व प्रगतीची सूचक असतात. साधकाने अशी किंवा अन्य कोणतीही भयानक स्वप्ने पडली तरी ती सर्व मंगलदायकच समजली पाहिजेत.

याप्रमाणे कुंडलिनी शक्तीच्या जागृतीने साधकाच्या अंतरामध्ये नानातऱ्हेच्या क्रिया सुरू होतात. तेव्हा त्याला स्वप्नामध्ये किंवा साध-नामध्ये देवांच्या प्रतिमा, देवतांचे उत्सव, संकीर्तन, शंख, तास व घंटा इत्यादी वाद्यांचे नाद, उत्तम कथांचे श्रवण, अत्यंत रमणीय, मनोहर व दिव्य स्थानांचे दर्शन होते. आपण आकाशात उडत आहोत किंवा शून्यात गमन करीत आहोत असे साधकाला वाटते. कुंडलिनीशक्तीच्या जागृती-मुळे आतील द्वार मोकळे झाल्यामुळे मन ज्या ज्या वेळी अंतर्मुख होते व अंतर जगात प्रवेश करते त्या त्या वेळी चालता, फिरता, बसता, क्रिया करताना अथवा निद्रेत आपापल्या संस्काराप्रमाणे विशेषतः श्रद्धाभक्ति-युक्त साधकांना बहुतकरून अशी दर्शने होतात व अनुभव येतात.

दिव्यस्पर्शज्ञान : –

कुंडलिनीच्या दिव्य स्पर्शाचा अनुभव साधकाला येऊन त्याच्या ठिकाणी ज्ञानाचा प्रकाश उत्पन्न होऊन राजयोग आपोआप कसा साधला

जातो याचे वर्णन रुद्रयामल तंत्राच्या १५ व्या पटलामध्ये पुढीलप्रमाणे केले आहे.

अनंतज्ञानलिलयां यां भजंति मुमुक्षवः। सुप्ता सर्पोपमा मौला पाति साधकमीश्वरी ॥ १ ॥ चैतन्या कुंडलिशक्तिर्वायवी बलतेजसा। चैतन्या सिद्धिहेतुस्था ज्ञानमात्रं ददाति सा। ज्ञानमात्रेण मोक्षः स्याद्वायवी ज्ञानमाश्रयेत् ॥ २ ॥

मूलाधार हे स्थान अनंत अशा ज्ञानाचे घर आहे. त्या ठिकाणी सुप्त नागिणिप्रमाणे वास करणारी कुंडलिनी शक्ती साधकाचे पालन व रक्षण करते. यासाठी मोक्षेच्छू साधक नेहमी तिचेच भजन करतात. ती वायवी शक्ती कुंडलिनी, सद्गुरूंच्या अहेतुक कृपेने जागृत होते. ही शक्ती जागृत झाली की क्रियाशील होऊन सिद्धीला म्हणजे मोक्षाला कारण होते. इतकेच नव्हे तर साधकांना ही शक्ती आनंदस्वरूप आत्मज्ञानाचे दान करते. कारण केवळ ब्रह्मज्ञानानेच मोक्ष होतो म्हणून साधकांनी वायवी शक्ती कुंडलिनीपासून उद्भूत होणाऱ्या ज्ञानाचा आश्रय करावा.

योगचूडामणी उपनिषदात आपल्या दिव्य स्पर्शाने कुंडलिनी शक्ती ज्ञानदान करून राजयोग साधन कसे करवून घेते हे सांगताना म्हटले आहे की, " या कुंडलिनी शक्तीचा आश्रय केल्यामुळे ती जागृत शक्ती अग्नी, मन आणि प्राणासहित सुषुम्नेत प्रवेश करून वर चढू लागते. ज्याप्रमाणे सुई वस्त्राला स्पर्श व वेध करीत जाते तशी कुंडलिनी शक्ती मूलाधारापासून सुषुम्नेतील चक्रांचा वेध करीत ब्रह्मरंध्रात जाते. त्यावेळी साधकाला तिच्या दिव्य स्पर्शाचा अनुभव येतो. ज्यावेळी जागृत कुंडलिनी शक्ती शरीरामध्ये अशाप्रकारे क्रिया करते त्यावेळी भुंगा जसा कमलावर मृदुमृदू विचरण करतो तसा मृदू व कोमल अशा महासुखकर दिव्यस्पर्शाचा साधकाला अनुभव येतो. हा स्पर्श आवश्यकतेनुसार कोमल अथवा कठोरही असतो.

दिव्यरसः—

योगशिखोपनिषदात व धर्मसंहितेत दिव्यरसाची प्राप्ती राजयोगात कशी होते हे सांगताना म्हटले आहे की, " ज्यावेळी महायोगाचे साधन करणाऱ्या साधकाला कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने केवल कुंभक होऊन प्राण स्थिर होऊ लागतो त्यावेळी नानाप्रकारचे नाद उत्पन्न होऊन मस्तकातील चंद्रमंडळाकडून अमृतस्राव होऊ लागतो. आत्मशक्तीच्या उद्बोधनानंतर

खेचरी क्रिया झाली की साधकाची जीभ उलट होऊन टाळूत जाऊ लागते व वर खेचली जाते. त्यावेळी गळ्याच्या आणखी क्रिया अशा होतात की त्यावेळी ही जीभ पडजिभेला वर करून आत जाते. त्यावेळी अकस्मात सुधारसाचे पान घडते. अथवा हीच जीभ जेव्हा आभ्यंतरिक क्रियाशक्तीच्या योगाने टाळूला घट्ट चिकटून बसते तेव्हा सहस्त्रारातील शीतल चंद्रामृत पाझरते. त्याच्या सेवनाने साधक नखाशिखांत शांत होतो. अशा प्रकारे नित्य अभ्यासाने अमृतपान करीत राहिल्याने साधक अमर होतो.

साधक ज्या दिव्य रसाचे सेवन साधनात करतो त्याचे किती प्रकार असतात हे घेरंड व याज्ञवल्क्यसंहितेत पुढीलप्रमाणे सांगितले आहे. या रसाचा स्वाद प्रथम खारट, क्षारयुक्त, कडू, तिखट व कषाय असा असतो. मध्ये तो लोणी, तूप, दूध, दही व ताक यांच्याप्रमाणे असतो. शेवटी मध व द्राक्षाच्या रसाप्रमाणें अमृतपान होते. सिद्धमहा-योगाचे साधन सतत करीत राहिल्याने साधकाचे मन आज्ञाचक्रामध्ये लय पावून ज्यावेळी भ्रूमध्यामध्ये आत्मदर्शन होते त्यावेळी जिभेच्या मूळाशी अमृतस्राव होऊन त्याचे सेवन साधक करतो.

या दिव्यरसपानाचे गुण व महिमा सांगताना योगसागर ग्रंथामध्ये म्हटले आहे की, " निरंतर साधनाभ्यासाने जेव्हा वर वर्णन केलेल्या दिव्य रसाच्या भिन्न भिन्न रसांचे पान साधकाला घडते तेव्हा लवणादी क्षार-रसाने त्याच्या रोगाचा नाश होतो. आम्लरसाने शरीराच्या कातडीची शिथिलता नाहीशी होऊन अकाली केस पिकत नाहीत. मधुररसाच्या प्राशनाने शास्त्रज्ञानाचा प्रकाश साधकाच्या ठिकाणी उत्पन्न होतो. ज्यावेळी तुपाच्या स्वादाचे रसपान होते त्यावेळी साधकाला अमरत्व म्हणजे मोक्षप्राप्ती होते.

दिव्यरसाप्रमाणे दिव्य वासही साधकाला साधनात येतात. हे वास विविध प्रकारचे असतात. त्यात साधकाचे मन लीन झाले की अगदी निस्संदेहपणें मन स्तंभित होते.

शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच सांसारिक प्रबल विषयांमुळे मनुष्याचे मन बलत्काराने बंधनात पडते. या विषयामध्ये आसक्त झाल्याने मनुष्याचे पतन व अधोगमन होऊन सर्वनाश होतो. हे विषय मनुष्याचे मन खेचून घेऊन त्याला नानात-हेच्या कामभोगवासनेत गुंतवून हतप्रभ करून दुःखी करतात. परंतु ज्यावेळी सद्गुरुकृपेने शक्ति-

पातयोगाचे साधन सुरू होते त्यावेळी साधक या पाचही विषयांचा दिव्य अनुभव अंतरामध्येच घेतो. साधकाला स्वतःच्या शरीरातच उपरोक्त पाच विषयांचा अनुभव येत असल्याने त्याचे कधीही पतन न होता उलट ऊर्ध्वगमनच होते. यासाठी श्रीमहेश्वरांनी अनुप्रणित केलेल्या सिद्धमहायोगाच्या आश्रयाने मन अंतर्मुख करून साधक स्वतःमध्येच सर्व विषयांचा उपभोग घेत सुखी होतात.

[आधार बारावा]

★ शक्तिपातयोगाची फलनिष्पत्ती ★

१) मनोरूपपट फाटून जातो
२) त्रिपुटीचा भेदव्यवहार नाहीसा होतो
३) महाभूतांची जवनिका फिटते
४) ब्रह्मप्राप्ती
५) साम्यावस्थेची प्राप्ती
६) जन्ममरणाची निमे कथा
७) अविद्येचा नाश
८) हृदयग्रंथींचा भेद
९) कैवल्यप्राप्ती–



येथपर्यंत आपण शक्तिपातयोगाच्या साधनाचे यावच्छक्य संक्षेपाने विवेचन केले. त्यावरूनच या साधनाचे फल ब्रह्मप्राप्ती आहे याची जाणीव साधकाच्या अंत:करणात बिंबली आहे हे निश्चित आहे. ही ब्रह्मप्राप्ती होते म्हणजे नेमके काय होते याचे विवेचन आपण थोडक्यात पाहू.

मनोरूप पट फाटून जातो:–

शक्तिपातयोगाचे साधन करताना मनोरूप पट फाटून साधक सशरीर ब्रह्म कसे होतात हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज ज्ञानेश्वरीच्या पाचव्या अध्यायात म्हणतात, " अर्जुना ! ज्यावेळेस नियमित साधन साधकाकडून होईल त्यावेळी प्राणांचा निरोध आपोआप होऊन चिदाकाशात मनाचा लय होतो. त्यावेळी साधकाच्या नानाप्रकारच्या वासनांची विवंचना आपोआप थांबते. ज्या मनोरूप पटावर हे संसाररूपी चित्र उमटत असते तो मनोरूपी पट या साधनाने फाटून जातो. ज्याप्रमाणे सरोवर आटल्यावर त्यातील प्रतिबिंब नाहीसे होते त्याप्रमाणे मनोरूप सरोवरातील संसाराचे प्रतिबिंबही नाहीसे होते. अशाप्रकारे साधन करताना जेव्हा मनच नाहीसे होते तेव्हा अहंकारही विरघळून जातो. अशाप्रकारे ब्रह्मस्वरूपाचा अनुभव घेणारा पुरुष शरीरधारी असतानाच ब्रह्म होतो. (ज्ञानेश्वरी ५. १५६. ते १६०)

त्रिपुटीचा भेदव्यवहार नाहीसा होतो :–

" जो साधक सद्गुरूने सांगितलेले साधन नियमित करतो त्याचे मन भ्रांतिरहित होते. मग ते आत्मस्वरूपाला सोडून जात नाही.

जोपर्यंत समुद्रात मीठ पडत नाही तो पर्यंत ते समुद्रापासून वेगळे व लहान दिसते. परंतु ते जेव्हा समुद्रात मिसळते तेव्हा समुद्रायेवढेच व्यापक होते. त्याचप्रमाणे ज्याने नित्य साधन करून आपले मन संकल्प-रहित करून घेतलेले असते त्याचे मनच चैतन्यस्वरूप झालेले असते. त्यामुळे बाह्यतः दिसण्यात साधक एकदेशी व परिच्छिन्न दिसत असला तरी त्याने त्रिभुवन व्यापलेले असते. त्याच्या बाबतीत " मी एक कर्ता, " " हे एक कर्म " व " अमुक एक कार्य " असा हा त्रिपुटीचा भेदव्यवहार स्वभावतःच नाहीसा होऊन बंद पडतो. लोकदृष्ट्या त्याने जरी सर्व कर्मे केली तरी तो अकर्ताच असतो. " (ज्ञानेश्वरी ५. ३४ ते ३७)

महाभूतांची जवनिका फिटते :–

" पुरुषार्थशून्यांनां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति "

ज्यावेळी शक्ती जागृत होऊन प्रतिप्रसव क्रमाला सुरवात होते त्यावेळी पिंड ब्रह्मांडाची संहारणी होते. उभारणीच्या वेळी चैतन्यशक्ती-मुळे व्यक्त झालेले गुण आपल्या कारण महत्तत्त्वासहित अव्यक्तामध्ये विलीन होतात. म्हणजे चैतन्यशक्ती आपल्या मूळ स्वरूपामध्ये प्रतिष्ठित होते. हेच कैवल्य होय. अशी पातंजलयोगसूत्रातील कैवल्यपादामध्ये कैवल्याची व्याख्या केली आहे. शक्तिपातयोगसाधनेने या कैवल्यरूप फलाची निष्पत्ती होते व साधक कृतकृत्य होतो. श्रीसंत ज्ञानेश्वरमहा-राजांनी मोठ्या रसाळ शब्दांमध्ये साधकाला प्राप्त होणाऱ्या या स्थितीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

मग ब्रह्मरंध्री स्थिरावोनी । सोऽहंभावाच्या बाह्या पसरूनी । परमात्मलिंगा धांवोनी । आंगा घडे ॥ ६.३०५ ॥ तंव महाभूतांची जवनिका फिटे । मग दोहिसी होय झटे । तेथ गगनासकट आटे । समरसी तिये ॥ ३०६ ॥ पैं मेघाचेनि मुखी निवडला । समुद्र कां वोघी पडिला । तो मागुता जैसा आला । आपण पयां ॥ ३०७ ॥ तेवी पिंडाचेनि मिषें । पदीं पद प्रवेशे । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ॥ ३०८ ॥

ज्यावेळी चैतन्यस्वरूप कुंडलिनी शक्ती मस्तकाच्या पोकळीत सहस्रदल कमलातील ब्रह्मरंध्रात स्थिर होऊन सोऽहं या भावनेच्या बाह्या पसरून परब्रह्मलिंगाला मिठी मारून त्याच्या स्वरूपाशी ऐक्य पावते तेव्हा त्या पंचमहाभूतांचा पडदा नाहीसा होतो व शिव आणि शक्ती यांचे ऐक्य होते. ज्याप्रमाणे समुद्राचे पाणी मेघांच्याद्वारा समुद्रा-पासून वेगळे होऊन पुन्हा तेच पाणी मेघातून जमिनीवर पडून नदीच्या

ओघात सापडून समुद्राला मिळते त्याप्रमाणे देहोपाधीच्या निमित्ताने वेगळा भासणारा जीवात्मा जागृत चैतन्यशक्तीच्या साहाय्याने परब्रह्मात प्रविष्ट होतो. हे एकत्वही वरील समुद्राच्या पाण्याप्रमाणेच होय. नंतर

ब्रह्मसूत्रामध्येही अध्याय ४ सूत्र ४ मध्ये " **अविभागेन् दृष्टत्वात्** " असे सांगून उपरोक्त भाव व्यक्त केला आहे. त्यावर भाष्य करताना श्रीमत् आद्यशंकराचार्य म्हणतात, " जीव हा मुक्त होऊन परमात्म्याशी अविभक्त राहातो कारण श्रुतीमध्ये तसे दृष्टीस पडते. ते तू आहेस, मी ब्रह्म आहे, तेथे तो दुसरे काही पाहात नाही, की जे तो त्या परमात्म्याहून निराळे आणि विभक्त असे पाहील. इत्यादी श्रुती जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्यच दाखवितात. ज्याप्रमाणे हे गौतमा ! शुद्ध उदक शुद्ध उदकामध्ये मिसळले असता तसेच होते त्याप्रमाणे ज्ञानी अशा मुनीचा आत्माही तसाच होतो असे कठोपनिषदात म्हटले आहे.

" **चितितन्मात्रेण तदात्मकत्वादित्यौडुलोमिः** ॥ ४.४.६ ॥ म्हणजे जीव हा केवल चैतन्यस्वरूपाने व्यक्त होतो. कारण ते त्याचा आत्मा आहे असे औडुलोमी म्हणतो. असे ब्रह्मसूत्रात व्यासांनी स्पष्ट केले आहे. त्यावर भाष्य करताना आचार्य म्हणतात, " ज्यापासून सकल द्वैत निरस्त झाले आहे, जे प्रसन्न आहे आणि जे कोणत्याही शब्दाने सांगता येत नाही " अशा चैतन्यरूपाने जीव हा व्यक्त होतो.

ब्रह्मप्राप्ती :–

शक्तिपातयोगसाधनाने ब्रह्मप्राप्ती कशी होते हे सांगताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

आम्ही साधन हें जें सांगितले । तेंचि शरीरी जिही केले । ते आमुचेनि पाडे आले । निर्वाळलेया ॥ ६.३२६ ॥ परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचिये मुसें । वोतीव जाहले तैसे । दिसती आंगें ॥ ३२७ ॥ जरी हे प्रतीती हन अंतरी फाके । तरी विश्वचि हे अवघे झाके । तव अर्जुन म्हणे निके । साचचि जी हो ॥ इये अभ्यासी जे दृढ होती । ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती ।

साधनाने ब्रह्मप्राप्ती होते याचा निर्वाळा या ओव्यातून श्रीज्ञानेश्वर महाराजांनी दिला आहे.

साम्यावस्थेची प्राप्ती : –

शक्तिपातयोगसाधनामुळे साधकाला एक अपूर्व अशी साम्यावस्थेची प्राप्ती होते. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, " साधक साधन करून सिद्ध म्हणजे ज्ञानी होतो. तो ज्ञानी झाला म्हणजे सदोदित

आपल्यासारखेच आत्मरूपाने सर्व चराचरात्मक जग पाहातो. सुखदुःखाचे विकार व शुभाशुभ कर्मे ही दोन आहेत असे आपल्या मनोवृत्तीने तो समजतच नाही. हे समविषम पदार्थ आणि ज्या ज्या काही चित्रविचित्र वस्तू आहेत त्या सर्व आपले अवयवच आहेत असे तो मानतो. हे संपूर्ण त्रैलौक्यच आपण आहोत असे त्याला सहजच अनुभवाला येते. त्यालाही एक शरीर असते हे खरे असले तरी तो सुखदुःखे भोगतो, असे लोक व्यवहारात म्हणतात. तरीपण आम्हाला तर अशीच अनुभूती आहे की तो "परब्रह्मच आहे." म्हणून हे अर्जुना! आपल्या ठिकाणी सर्व विश्व पाहावे व आपण स्वतः विश्वरूप व्हावे अशा समदृष्टी प्राप्त करून देणाऱ्या शक्तिपातयोगसाधनेचाच साधकाने अभ्यास केला पाहिजे. या मार्गाने प्राप्त होणाऱ्या समदृष्टीच्या लाभापेक्षा या जगात दुसरा मोठा लाभ नाही. (६.४०४ ते ४१०)

"साधक शेकडोशे जन्म भक्तीची वाटचाल करतो. विषयसुखाची आशा तो कधीही धरीत नाही. त्याला फलाचीही इच्छा नसते. असे असले तरी अज्ञान संपत नाही. परंतु ज्यावेळी कर्मक्षय होऊन ज्ञानाची पहाट होण्याची वेळ येते तेव्हा त्याला सद्गुरूंची गाठ पडून शक्तिपातयोगाचे साधन मिळते व ज्ञानरूपी ब्रह्मात्म्यैक्य दृष्टीचे ऐश्वर्य त्याच्या दृष्टीस पडते. त्यावेळी तो जिकडे पाहातो तिकडे त्याला मीच एक आहे असा अनुभव येतो. इतकेच नव्हे तर तो स्वस्थ बसला तरी या अनुभवात फरक पडत नाही. त्याला सर्व ठिकाणी परमेश्वरावाचून दुसरे काही दिसत नाही. ज्याप्रमाणे पाण्याच्या डोहात बुडालेल्या घटाच्या आत व बाहेर पाणीच असते त्याप्रमाणे तो माझ्या आत असतो व मी त्याच्या अंतर्बाह्य असतो. शेवटी हे संपूर्ण विश्व श्रीवासुदेवरूपच आहे असा अनुभूतीरूप रसाचा भाव त्याच्या अंतःकरणात निश्चित होतो. (ज्ञानेश्वरी ७.१२९ ते १३६)

जन्ममरणाची निमे कथा :—

"जो साधक जन्मभर श्रीसद्गुरूंनी दिलेले साधन करतो त्याच्या जन्ममरणाच्या फेऱ्याची कथा सदाचीच संपते. या साधनाच्या प्रयत्नामुळेच साधकाला समग्र परब्रह्माच्या प्राप्तीचे फल मिळते. हे फळ पिकले असता त्यातून पूर्णतारूपी रस गळतो. आपण कृतकृत्य झालो आहोत या आनंदाने साधकाला धन्यता वाटते. त्याची आत्मज्ञानाची तीव्रतर इच्छा व हौस पूर्ण होते. कर्माचे सर्व प्रयोजन संपते. त्याचे मन नाहीसे होते.

त्यामुळे भेदरूप दैत्याचे आस्तित्वच संपते. (ज्ञानेश्वरी ७. १७५ ते १८९)

अविद्येचा नाश :–

चित्शक्ती जागृत झाल्यावर अविद्येचा नाश होऊन मनुष्य जन्माचे ध्येय जे मोक्ष तो प्राप्त होतो. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, "शक्तिपातस्वरूप असंगशस्त्राने जेव्हा साधकाची अंतःशक्ती जागृत होते तेव्हा अविद्येचा नाश होऊन साधक ब्रह्मरूप होतो. या साधनामुळे वर्षाऋतूच्या अखेरीस ज्याप्रमाणे ढग आकाशाला टाकून सोडून जातात त्याप्रमाणे मनाला मोह व अभिमान आपण स्वतः होऊन सोडून जातात. निर्धन व निर्दय अशा मनुष्यास ज्याप्रमाणे त्याचे आप्त व नातेवाईक कंटाळून सोडून जातात त्याप्रमाणे साधक विकारांच्या कचाट्यात सापडत नाही. केळीला केळी आल्यावर ती जशी उन्मळून पडते तशा प्रबल, निःसंदेह व यथार्थ आत्मस्वरूपाच्या लाभामुळे त्या साधकाच्या क्रिया आपोआप हळूहळू सुटत जाऊन बंद पडू लागतात. वृक्षाला आग लागली असे पाहून त्यावर बसणारे पक्षी ज्याप्रमाणे तो सोडून जिकडे रस्ता सापडेल तिकडे पळून जातात त्याप्रमाणे साधकाच्या बाबतीत सर्व विकल्प आपण होऊन सोडून जातात. त्याची भेदबुद्धी नाहीशी होते. सूर्योदय झाल्यावर रात्र जशी आपोआप नाहीशी होते तसा आत्मस्वरूपाचा लाभ झाल्यावर साधकाची देहाहंता व देहविषयक अभिमान अविद्येसह पळून जातो.

हृदयग्रंथींचा भेद :—

कठोपनिषदाच्या अध्याय दोन व तीन मध्ये यमाने नचिकेताला मृत्यूला पार करण्याचा मार्ग सांगताना सुषुम्नेचा आश्रय करणाराच म्हणजे या शक्तिपातयोगाचा स्वीकार करणाऱ्याच्याच हृदयग्रंथींचा भेद होऊन अमृतस्वरूप होतो म्हणून सांगितले आहे. ही प्राप्ती कशी असते हे सांगताना ऋषी म्हणतात—

यदा पंचावतिष्ठंते ज्ञानानि मनसा सह । बुद्धिश्च न विचेष्टति तमाहुः परमां गतिम् ॥ २-३-१०॥ तां योगामिति मन्यन्ते स्थिरामिंद्रियधारणाम् । अप्रमत्तस्तदा भवति योगो हि प्रभवाप्ययौ ॥११॥ यदा सर्वे प्रमुच्यंते कामा येऽस्य हृदि श्रिताः । अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥१४॥ यदा सर्वे प्रभिद्यन्ते हृदयस्येह ग्रंथयः । अथ मर्त्योऽमृतो भवत्येवावद्धयनुशासनम् ॥१५॥

शक्तिपातयोगाचे साधन नियमित करणाऱ्या साधकाची ज्यावेळी पाचही इंद्रिये मनासहित आत्म्यामध्ये स्थिर होतात आणि बुद्धी आपल्या

व्यापारातून निवृत्त होते तेव्हा त्याला अत्यंत श्रेष्ठ गती म्हणतात. अशा प्रकारच्या स्थिर इंद्रिय धारणेलाच शक्तिपातयोग म्हणतात. जेव्हा इंद्रियांची स्थिर धारणा होते तेव्हा साधक प्रमादरहित होतो. या साधनाच्या अभ्यासाने जेव्हा साधकाच्या हृदयात असणाऱ्या सर्व वासना संपूर्णपणे नाहीशा होतात तेव्हा तो मृत्युरहित होतो व याच देही ब्रह्मरूप होतो. सर्व वेदांचे हेच सार व हाच उपदेश आहे की ज्यावेळी या शक्तिपातयोगसाधनेने हृदयातील संपूर्ण ग्रंथी छिन्नविछिन्न होऊन तुटून जातात व बुद्धीची सर्व बंधने नाहीशी होतात तेव्हा मनुष्य मृत्युरहित म्हणजे अमर होतो.

योगकुंडलिनी उपनिषदाच्या पहिल्या अध्यायामध्ये ब्रह्म, विष्णू व रुद्र या तीनही ग्रंथींचा भेद होऊन साधकाला परावस्था कशी प्राप्त होते हे सांगताना म्हटले आहे की --

ज्वलनाघातपवनाघातोरुन्निद्रितोऽहिराट् । ब्रह्मग्रंथि ततो भित्त्वा विष्णुग्रंथि भिनत्त्यतः ॥८५॥ रुद्रग्रंथि च भित्त्वैव कमलानि भिन्नत्ति षट्। सहस्रकमले शक्तिः शिवेन सह मोदते ॥८६॥ सैवावस्था परा ज्ञेया सैव निर्वृत्तिकारणा ॥८७॥

ज्यावेळी शक्तिपात होऊन अभ्यंतरस्थ अग्नीच्या द्वारा प्राणवायू तप्त होऊन त्याच्या क्रियेमुळे सर्पाकृती कुलकुंडलिनी जागृत होते तेव्हा ती शक्ती ब्रह्म, विष्णू व रुद्र या तीन ग्रंथींचा आणि सहाही चक्रांचा वेध करीत करीत सहस्त्रारातील परम शिवाशी एरूप व एककरस होते तेव्हा साधकाला निरतिशय आनंद प्राप्त होतो. हीच साधनाची परावस्था होय. या अवस्थेमध्ये जो आनंद प्राप्त होतो त्याचे वर्णन शब्दात करता येणे शक्य नाही. असा हा आनंद स्वानुभवानेच जाणता येतो.

कैवल्यप्राप्ती :-

शक्तिपातयोगाने साधकाला समाधीप्राप्ती व कैवल्यप्राप्ती कशी होते हे सांगताना एकनाथी भागवतात नाथ म्हणतात, " मनाची तळमळ नाहीशी होणे हीच खरी समाधी होय. वसिष्ठादी प्राचीन अतिसमर्थ ज्ञानी चालते बोलते समाधिस्थ होते. देवर्षी नारदांचा समाधीबोध कधी लीलेनेही भंग पावला नाही. स्वस्वरूपाला पाहून जो मूर्च्छित झाला तो आपला आपणच तरतो. असे महात्मे स्वतः तरून लोकांचा उद्धार करतात. शुक व वामदेव यांनीही अशा प्रकारचा बोध प्रकट केला आहे.

या शक्तिपातयोगाची परिणिती इंद्रियांच्या पलीकडे असलेल्या आत्यंतिक सुखात होते. सुखातच साधक राहातो व तेथून तो कधीही

बाहेर येत नाही. स्वस्वरूपाच्या ओळखीबरोबर साधक सुखाच्या साम्राज्यावर आरूढ होतो. शेवटी त्या सुखाशी समरस होऊन विरून जातो. या समरस सुखस्थितीपेक्षा दुसरे काहीही श्रेष्ठ नाही. इंद्रिये या स्थितीला कधीही जाणत नाहीत. या स्थितीपेक्षा इतर कोणताही सुखलाभ साधकाला श्रेष्ठ वाटत नाही. या सुखात निमग्न राहिल्यामुळे अत्यंत भयानक दुःखातही त्याची मनःस्थिती अविचल राहाते. मेरू पर्वतापेक्षा मोठ्या अशा दुःखाच्या डोंगराखाली साधक दडपला गेला तरी त्याचे चित्त दुःखाने दडपत नाही.

शक्तिपातयोगाने ज्ञानबोध झाला की साधकाला सर्व कर्मे करीत असतानाही देहाचे देहपण स्फुरत नाही. हेच समाधीचे मुख्य लक्षण आहे. परमेश्वरस्वरूपाला साधक प्राप्त होऊन देहभान विसरतो व पूर्ण स्वानंदाचा अनुभव घेतो. सुखानेच त्याची सुखस्वरूपता होते. मग हा ज्ञानी ब्रह्मरस पिऊन परमानंदाने तृप्त होतो.

केवळ ताठरलेल्या तटस्थ वृत्तीला जर कोणी समाधी समजत असतील तर त्या ज्ञात्यांच्या बुद्धीला भ्रम झाला आहे असे म्हणावे लागेल. कारण ती खरोखर समाधी नसून त्या स्थितीत वृत्ती मूर्च्छित असते. निरंतर निरभिमानालाच अखंड समाधी म्हणतात. पण काष्ठासारखे होऊन राहाणे ही खरी समाधी नव्हे. जे अशा काष्ठासारख्या तटस्थपणाला समाधी मानतात त्यांना खऱ्या स्वरूपाचे निश्चित ज्ञान नसते. त्यांचे ते केवळ अनुमानाचे बोलणे असते. जोपर्यंत मनात वासना शिल्लक आहे तोपर्यंत समाधी कशी प्राप्त होणार ? सगळ्या संकल्पांचा शेवट होणे यालाच निर्विकल्प समाधी म्हणतात. सर्व शास्त्रांनी हेच प्रतिपादन केले आहे. हीच खरी समाधी होय. शेळीजवळ साप आला की तिच्याही वृत्ती भीतीने जागच्या जागी थिजून तटस्थ होतात. पण तशी निश्चेष्ट स्थिती म्हणजे समाधी नव्हे. अकस्मात् व अनपेक्षित एखादे दिव्यस्वरूप दृष्टीस पडताच वृत्ती आश्चर्याने थक्क होते व भान हरपून शरीर तटस्थ होते. पण ती एक वृत्ती आहे. समाधी नव्हे. प्रथमच आत्मस्वरूप दृष्टीस पडताच अनावर झालेला विस्मय दाबून टाकून निश्चिल स्थित होणे हीच खरी समाधी होय. जेथे कल्पना पूर्णपणे विरून जाते तेथे विस्मय कोठून स्फुरणार ? सूक्ष्म वासना स्थिर झाल्या की विस्मय आपणच नाहीसा होतो. तेथे बाध्यबाधकता संपते व अहं ही सर्व अविद्या सुटते त्याला सहजसमाधी म्हणतात. अशी समाधी किंवा कैवल्य शक्तिपातयोगाच्या साधनाने साधकाला प्राप्त होऊन शेवटी तो

अनादी जन्ममरणपरंपरेतून सुटून मूलतः संकोचाने स्वतःच प्राप्त केलेल्या जीव दशेचा त्याग करून शिवशक्तीच्या सामरस्याने अखंड आनंदात निमग्न होतो. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या स्थितीचे वर्णन करताना म्हटले आहे की–

म्हणोनि आसनाचिया गाढिका । जों आम्ही अभ्यास सांगितला निका । तेणे होईल तरी हो कां । निरोध मया ॥ ६.३६४ ॥ येन्हवी तरी येणे योगे । जैं इंद्रिया विंदाण लागे । तैं चित्त भेटो रिगे । आपण पेया ॥ ३६५ ॥ परतोनि पाठिमोरे ठाके । आणि आपणियाते आपण देखे । देखतखेवो वोळखे । म्हणे तत्त्व हे मी ॥ २६६ ॥ तिये ओळखि- चिसरिसे । सुखाचिया साम्राज्यी बैसे । मग आपणपा समरसें । विरोनि जाय ॥ ३७६ ॥ जयापरते आणिक नाही । जयाते इंद्रिये नेणती कही । ते आपणचि आपुल्या ठायीं । होऊन ठाके ॥ ३७७ ॥

येथे शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र हा ग्रंथ श्रीगुरुमाऊलीच्या कृपेने पूर्ण झाला. त्यांच्या चरणी माथा ठेवून थांबतो.



साररूप विषय–

"येथपर्यंत जे काही सांगितले त्यावरून हे स्पष्ट होते की शक्तिपाताशिवाय म्हणजे भगवंताची कृपा झाल्याशिवाय कोणताही जीव पूर्णत्व प्राप्त करू शकत नाही. जीवाच्या धारणाशक्तीच्या भेदानुसार शक्तिपाताचे प्रमाण कमीजास्त किंवा भिन्न दिसून येते. मात्र हेही तितकेच खरे आहे की जीव कितीही सामान्य कोटीतील असला किंवा भोग, वासना, आकांक्षा इत्यादींनी कितीही गुरफटलेला असला तरी एकदा त्याच्यावर शक्तिपात झाला की तो श्रेष्ठ अशा ब्रह्मपदाला अवश्य पोहोचतो. मात्र भोगाकांक्षादी विक्षेपांमुळे जीवाच्या परमपदाला जाण्याच्या गतीला अडथळा उत्पन्न होतो. जर शक्तिपाताची मात्रा तीव्रातितीव्र असेल व हे आडवे येणारे विक्षेप जर नसतील, तर अत्यंत शीघ्र गतीने म्हणजे क्षणभरातसुद्धा जीव परमपदाला जाऊ शकतो. शक्तिपात दीक्षेच्या वेळी योग्यायोग्यतेचा विचार केला जात नाही. मात्र (जीवाच्या) मुळातील योग्यतेनुसारच शक्तिपाताचे प्रमाण स्वाभाविकपणे निश्चित होत जाते. परंतु प्रमाण काहीही असले तरी भगवंताच्या शक्तीचा महिमा इतका मोठा आहे की, एकदा का होईना, (सिद्धगुरूकडून) ही शक्ती साधकात संक्रमित झाली की ती त्या जीवाला भगवंताच्या घरी (ब्रह्मपदाला) पोहोचविल्याशिवाय शांत होत नाही हे अगदी निःसंशय"

–म. म. श्रीगोपीनाथ कविराज